

पूर्णायनमः

मानव धर्म शास्त्र

– लेखक –

श्री सुरेशस्वामी हिरेमठ

मु. पो. गोरठा ता. बसवकल्याण जि. बिदर



– प्रकाशक –

चरपट्टाधिपति राचोटि शिवाचार्य


कट्टीमनि संस्थान हिरेमठ

मु. पो. मेहकर, ता. भालकी जि. बिदर.


To prof of Marathi
B.H.U.
[illegible] [illegible] [illegible] 3661
Q:4192
155M0. Varanasi



मानव धर्म शास्त्र



श्री. जगदाचार्य रेणुक आगस्त्य मुनींना मानव धर्माचा उपदेश करीत आहेत.



पूर्णायनमः

मानव धर्म शास्त्र

- लेखक -

श्री सुरेशस्वामी हिरेमठ

मु. पो. गोरटा ता. बसवकल्याण जि. बिदर



- प्रकाशक -

श्री. ष. ब्र. चरपट्टाधिपति राचोटि शिवाचार्य

कट्टीमनि संस्थान हिरेमठ

मु. पो. मेहकर, ता. भालकी जि. बिदर

प्रथम मुद्रण इ. स. १९८० (१००० प्रती) वर्षं प्रतिपदा शके १९०२

– प्रकाशक –

श्री. ष. ब्र. चरपट्टाधिपति राचोटि शिवाचार्य
कट्टीमनी संस्थान हिरेमठ
मु. पो. मेहकर ता. भालकी जि. बिदर
आणि
हिरेमठ मु. पो. डोंणगोपूर ता. भालकी जि. बिदर



– लेखक –

श्री सुरेशस्वामी हिरेमठ
पो. गोरटा (B) ता. बसवकल्याण जि. बिदर




पुस्तक मिळण्याचे ठिकाण –

१) श्री विश्वशांतिधाम मु. पो. चाकूर जि. उस्मानाबाद
२) श्री सुरेशस्वामी हिरेमठ मु. पो. गोरटा (B)
(व्हाया) बसवकल्याण जि. बिदर

मूल्य २० रुपये

– मुद्रक –
संतोष प्रिंटिंग प्रेस, चाकूर

— अनुक्रमणिका —



ग्रंथ समर्पण


कर्नाटक राज्य बिदर जिल्हा मेहकर ग्राम कट्टीमनी संस्थान बृहन्मठाधिपति मूळ आचार्यांना संबोधून जी "विरूप" = "रूपातीत" निष्कल ब्रह्म शक्ती आपल्या "अक्ष" = "ज्ञानाक्षाने" विश्वं जीवांच्या पाप पुण्यमय कर्म योगाला साक्षीभूत होऊन विराज मान आहे, त्या सकल ब्रह्म रूप "श्रीगुरुविरूपाक्षलिंग" दिव्य सन्निधीत.

"मानव धर्म शास्त्र"

हे ग्रंथ पुष्प अनन्य भाव भक्तीने समर्पण करतो.

ग्रंथकर्ता

सुरेशस्वामी हिरेमठ गोरटा (B)



मानव धर्म ध्वज

– मानव धर्म ध्वज –

ह्या जगाचे मूल कारण असलेले परशिव ब्रह्म सत्, चित् आनंद, नित्य परिपूर्ण या पंच लक्षणाने युक्त आहे. त्यात अविनाभाव संबंधाने अखंड असणारी ब्रह्म चैतन्य शक्ती, उन्मेषण, विमर्श, इच्छा, ज्ञान, क्रिया, अशी पंचविध आहे. ती मूल शक्तीच सकल भुवन ब्रह्मांड नायक, सजाद्योत, वामदेव, अघोर, तत्पुरुष ईशान, पंचमुख पंचब्रह्म सदाशिव रूप धारण केलेली आहे. तीच शक्ती पंच आचार्य, ईश्वर, रुद्र, विष्णु, ब्रह्मा, या पंच नियामक दैवतांच्या रूपात प्रकट होऊन अनुग्रह, निग्रह, लय, स्थिती, सृष्टी ह्या पंच, विधान द्वारे आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, पंच भूतात्मक चराचर नियाम्य जीवांचे जगद्रूप धारण केले आहे. या प्रपंचाचा अंश मानव देह पंच भूत, प्राण, अपान, समान, दान, व्यान हे पंचप्राण नेत्र, घ्राण, जिव्हा, कर्ण, त्वचा पंच ज्ञानेन्द्रिय. पाद, गुद, गुह्यय, वाक, पाणी, पंच कर्मेन्द्रिय. रूप, गंध, रस, शब्द, स्पर्श, पंच, विषयाने पूरित आहे. अहिंसा सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया पापनिरोधक पंच, क्षमा, दान, पूजा, जप, ध्यान पुण्योत्पादक पंच या स्वाभाविक नियमाने युक्त आहे. प्रत्येक ग्रामाचा योगक्षेम व न्याय शासन सर्व काली पंच, दैव मंडळी द्वारा चालत असते. सकल प्रपंच पंचपंच म्हणून प्रतिपादन करीत असल्यामुळे मानव धर्मध्वज हिरवा, तांबडा, पांढरा, निळा, पिवळा हा पंच वर्णात फडकत आहे. ध्वजाच्या मध्यभागी असलेला ब्रह्म बोधक व विश्व बोधकबिंदू गोलाकार पूर्ण चिन्हाने सुशोभित आहे. हा ध्वज मानव जातीचा एकात्मभाव, सर्वात्मभाव, ऐक्यभाव, समभाव व समृद्धीभावाचे मार्गदर्शन करून सुख शांति देणारा आहे.

मानव धर्म ध्वजाचा विजय असो !
धर्मासाठी जगा । धर्मासाठी जागा ।
धर्मासाठी वागा । धर्मासाठी सहन करा ।
धर्मासाठी शासन करा ।
धर्मानेच विश्वाला शांति.

– मानव धर्म गीत –

(ताल दादरा, राग यमन कल्याण)

मानव धर्माचा या विजय होऊ दे ॥धृ०॥

स्वानुभवी असति तया । ज्ञानमृत पाजुनिया ॥
मानवकुल रक्षाया । सतत स्थैर्य दे ॥१॥

अहिंसा सत्यमस्तेय । दया क्षमा ब्रह्मचर्य ॥
दान पूजा जप ध्यान । नित्य असू दे ॥२॥

पापासी संहारुनी । पुण्याते वाढवुनी ॥
नियमाच्या आचरणी । पूर्ण सौख्य दे ॥३॥

देवऋषी मुनीजन । राजा रंक सर्व गण ॥
धर्म हे सकल साधन । भाविती मुदे ॥४

सर्व ताप संहारितो । विश्वास शांति देतो ॥
आनंद जो पसरितो । सर्व शक्ती दे ॥५॥

अंत रहित धर्मासिया । विवेके शरण जावया ॥
भ्रांति भाव निरसुनिया । सद्गतीस दे ॥६॥

धर्मास्तव जागावे । धर्मास्तव उठावे ॥
धर्मास्तव त्यागावे । जीवन जगू दे ॥७॥

कल्याण सर्व जगाचे । असेल साधायाचे ॥
साह्य घ्या धर्माचे । सफल होऊ दे ॥८॥

धर्माचा जरी आधार । घेतील शासनकार ॥
ठरतील कर्तबगार । यशस्वी गाजू दे ॥९॥

सिंहासनि जगद्गुरु । तपस्वी वीर गंगाधरु ॥
गुरु राज वाणि जगभरु । मुक्त मिरवुदे ॥१०॥

संगय्यास्वामी वकील, चाकूरकर

श्री १००८ जगद्गुरु ज्ञान सिंहासनाधीश्वर जंगमवाडी मठ
वाराणशी (श्री क्षेत्र काशी)



श्री विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजी

– प्रस्तावना –

श्री वे. मू. सुरेश स्वामी हिरेमठ गोरटा जि. बिदर (कर्नाटकराज्य) यानी "मानवधर्म शास्त्र" नावाचा ग्रंथ आम्हास अनुग्रहित केला. हा ग्रंथ त्यांच्या दीर्घ चिंतनाचे व अनुभवाचे फळ आहे. त्यांचे चिंतन साऱ्याजगाला उद्देशून सृष्टीचे अंग असलेल्या मानव जीवनाचे विश्लेषण आहे. येथे देश, काल, कुल व गोत्र ह्या सिमीत विचाराला स्थान नाही. अंधश्रद्धेच्या प्रभावात सापडून जगांतील नानारितीच्या क्षोभास अवकाश करून देणाऱ्या भावनेला हा ग्रंथ एक सवाल आहे – एक समस्या आहे. मानवाच्या शांति समाधानाचा एक मार्ग आहे. यातील वैज्ञानिक विश्लेषण विचारवंताना मान्य होण्याजोगे असून त्यास सनातन धर्मावलंबी यांचे अनुमोदन प्राप्त होण्यासारखे आहे.

"धर्म" म्हणजे सामान्य रूढींतील मत नव्हे, पंथनव्हे, सांप्रदायनव्हे. समस्त चराचर ब्रह्मांडाला सृष्टी, स्थिति, लय, निग्रह व अनुग्रह या नियमात चालविणारा, सर्वामध्ये गुप्तरित्या प्रचोदक शक्ती असलेला, प्रगट अथवा विकसित गुण अनादि व स्वभाव सिद्ध आहे.

या जगात मानवाचा उदय होण्यापूर्वीच निरीक्षणावस्थेत असलेले विश्व तंत्र आहे. याच्या कार्यानुवर्तीच मानवाचा जन्म असल्यामुळे धर्म मानवाला सहज व स्वाभाविक आहे. कोणत्याहि मताने समर्थन केले नाही आणि निषिद्धही मानले नाही. धर्माचे अवलंबन मानवाच्या प्रगतीचा मार्ग आहे. परंतू त्याचे विरुद्ध वर्तन नाशाला कारण आहे. या धर्माचेमूळ व त्याची शक्ती

जाणून त्याच्या तंत्रात सहभागी होऊन आपला जन्म सफलकरून घेण्याची शक्ती मानवातच असल्यामुळे तो इतर प्राण्यापेक्षा भिन्न व श्रेष्ठ आहे. संस्कृती, नागरिकता धर्माच्या जाणीवेने रूपधारण केल्याचा जीवन प्रकार आहे. मानव जीवन केवळ स्वाभाविक प्राकृतिक पशु जीवन न होता, दैविक होण्यासाठी धर्मसंपत्ती म्हणजे आपल्यातील प्रच्छन्न असलेल्या चैतन्य शक्तीचा उपयोग करून उर्ध्वगामी व्हावे लागेल. विश्वगतीने समन्वय न पावणाऱ्या मानवाचा जीवनक्रम सफल होणार नाही, मधुर होणार नाही.

या जीवन क्षेत्रात संकुचित भावनेला स्थान नाही.हिंसा असत्य, स्तेय (चोरी) व व्यभिचार ह्या केवळ मानसिक विकृती व्यक्ती क्षेत्रात डोके घालून विश्व बांधव्याला आड येवून व विरोध गति, अपस्वर व अनैसर्गिक प्रलाप निर्माण करून धर्मक्षेत्रात विसंगती आणतात. मानवातील पशु जीवनाचा विकास करणारे ताल, लय, वेगळे व सुस्वरही वेगळेच आहेत. ते म्हणजेच अहिंसा सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य,दया,क्षमा,दान,पूजा,जप व ध्यान होत. यापासून धर्म संग्रह होतो, लोक संग्रह होतो. म्हणजे मानवाचे आवरणमय पशु जीवन ईश्वरमय होते. व लोक नंदन होते.

ग्रंथ कर्त्याने आपले विचार अशा विस्तृत अंशाच्या आधारावरून लिहीले आहेत. असा सर्वमान्य विचार प्रस्तुत धर्मक्षोभाच्या काळात स्वागतार्ह आहे. मानव जात एकच-एक म्हणविणारी ही गोष्ट विश्वकुटुंबाचा मूळ पाया आहे. या मार्गात आम्हा सर्वांचे चिंतन व्हावे लागेल.

ग्रंथ कर्त्याने आपल्या दीर्घ चिंतनाने नूतन विश्लेषण आमच्या अनुभवास आणून दिले आहे. "मानव जीवनाचे पृथःकरण"

याचा विचार लिहीताना भावतत्त्वाचे विश्लेषण, भावतत्त्व ऊर्ध्वभाव, अधोभाव, नैसर्गिकभाव, अनैसर्गिकभाव अशा विविधरूपाने दाखविले आहे. हे विश्लेषण समस्त मानव गुणाची कार्यं प्रवृत्ती व कर्म फलाची जाणीव करून, त्याच्या जीवनासंबंधी प्रगतीच्या अध्ययनावर प्रकाश देणारा विचार चिंतनीय आहे.

धर्म, नीती, समाज, राष्ट्र व विश्वकुटुंब या विषयावर आपले धीमंत व श्रीमंत विचार देऊन ग्रंथ कर्त्यांनि सर्व मानवसमाजास मार्ग दर्शन केले आहे. केवळ समाज शास्त्रालाच नव्हे तर धर्म शास्त्राला सुद्धा गौरव आणून देणारे ग्रंथ कर्त्यांचे प्रकाशन आदरणीय आहे.

के. बी. रामकृष्णराव
प्राध्यापक

तत्त्वशास्त्र विभाग
मानस गंगोत्री
मैसूर विश्वविद्यानिलय
सूर. (कर्नाटक)


— प्रकाशकांचे दोन शद्ब —

प्रकाशक :— श्री. ष. ब्र. राचोटि शिवाचार्य हिरेमठ
मेहकर जि. बिदर

यौवनावस्थेतील मानवाला म्हातारपण येताच त्याची शक्ती क्षीण होऊन तो विद्रूप दिसत असल्याप्रमाणे धर्माचार्य व धर्मपीठ त्याग, तपश्चर्या, योग, भक्तीज्ञान, क्रियाचाराने भ्रष्ट झाल्यामुळे ते निस्तेज होऊन तिरस्कार भावनेत दिसूलागले आहेत. त्यांच्या ठिकाणी जीवनाचे ध्येय व उद्देश आणि कर्तव्याची जाणीव नाहीशी झाली आहे.

मांत्रिका प्रमाणे मंत्र घालणे, भूत, प्रेत, पिशाच्च्यादि ग्रहबाधेच्या निवारणासाठी दोरी गंडा करणे, ताईत घालणे, भविष्यकाराप्रमाणे ज्योतिष, रमल व सामुद्रिक शास्त्राच्या सहायाने भविष्य सांगणे जारण, मारण, उच्चाटण, वशीकरण, भानामति आदि दुष्टमंत्राच्या प्रयोगाने आपले वर्चस्व समाजावर घालून प्रतिष्ठा वाढविणे, वैद्या प्रमाणे औषधोपचार करणे, व्यापार करणे, शेतीकरणे, या प्रकारे पोट भरण्यासाठी पैसा मिळविण्याचा उद्योग करणारे हे सर्व गुरुलोक स्वानुभव ज्ञान शून्य झालेआहेत.

"नगुरोरधिकम्" गुरु पदवीपेक्षा दुसरी कोणतीच पदवी श्रेष्ठ नाही, असे श्रुति घंटा घोष करून सांगत असली तरी त्याला न जुमानता अनेक विध शास्त्राभ्यासाद्वारे केवळ शाब्दिक ज्ञानावडंबर प्राप्त करून लौकिक पदव्या लिहून घेतात हे सर्व स्वस्वरूपज्ञान शून्य नामधारी गुरुचे लक्षण आहे. आपल्या अंगावर दैवी संपत्ती म्हणविणारे भस्म, रुद्राक्ष, पंचजटा व पंचमुद्रा धारण करून इंद्रिय संयमी होऊन न रहाता अज्ञानदशेतील भोग लोलूप जडजीवा प्रमाणे आपल्या पवित्र शरीरावर मोती पवळे, रत्न व सोने चांदी निर्मित अलंकार धारण करून



— प्रकाषक —

श्री पीठाधिपति ष. ब्र. राचोटि शिवाचार्य हिरेमठ

मेहकर (जि. विदर)

श्रीमंतीचा डौल मिरवीत वित्तेषण लोकेषण वृत्तीने संचार करीत, फिरणारे हे सर्व धर्म पालक गुरु नव्हेत.

शिष्याच्या हृदयांतील ताप परिहार करणारे गुरु क्वचित असून त्याचे वित्त (पैसा) हरण करणारेच गुरु बहुसंख्य दिसून येत आहेत, सद्याचे मठ मंदिर दुर्व्यसन व दुराचाराचे माहेरघर झाले आहेत. "यद्यदाचरतिश्रेष्ठः तत्तदाचरति इतरे जनाः" या म्हणीप्रमाणे सामान्य मानव धर्म बाह्य होऊन हिंसा, असत्य, चोरी व व्यभिचार या दुराचारामध्ये व मांस मद्यादि दुर्व्यसनामध्ये वर्तन करीत असल्यामुळे गुरुपासून शिष्य, आईबापा पासून मुले, राजापासून प्रजा, शिक्षकापासून विद्यार्थी, स्वामी पासून सेवक, पापकर्मात पडणे ही परंपराच झाली आहे.

चतुष्पाद पशूच्या रक्षणासाठी एक मालक असल्याप्रमाणे नवरा, बायको, मुले व पैसा या तीन पाशाने बांधला गेलेल्या अज्ञान मानव पशूला पापकर्मापासून रक्षण करण्यासाठी गुरु एक पालक असतो.

राष्ट्र शासनाने प्रजेच्या संरक्षणासाठी अन्नविकास, वस्त्रविकास' आदि अनेक विकासाची कामे हाती घेतल्या प्रमाणे धर्माधिकारी असलेल्या गुरूनी मातृभक्ती, पितृभक्ती, आचार्य-भक्ती, अतिथिभक्ती, ईशभक्ती. आदि सद्गुणाचा विकास करून मानव समाजांत प्रेमाची समृद्धी करविणे, एकात्मभाव निर्माण करणे, हे त्यांचे मुख्यकर्तव्य आहे. राष्ट्रशासन हिंसा, असत्य, चोरी व व्यभिचार ही चार पापे करणाऱ्या अपराध्यांना राज-दंडाद्वारे शिक्षा करून वहिर्व्यवस्था करते. त्याप्रमाणें मानव विकास कार्यात तत्पर होऊन पापनिरोध करणारे अहिंसा, सत्य, अस्तेय, (चोरी न करणे) ब्रह्मचर्य या मानवतेच्या चतुस्सीमेचे शिक्षण

देणे हे धर्म गुरुचें मुख्य कर्तव्य आहे. प्रजेच्या सुखासाठी राष्ट्रशासन पंच महाभूताचे संशोधन करून रेल्वे, टेलीव्हिजन, विद्युतशक्ती आदि अनेक प्रकारे भोग सामुग्री उत्पन्न करीत असल्या प्रमाणे अंधळा, लन्गडा, मुका, बहिरा, आदि पतित जीवाविषयी विचार पूर्वक देव घेव करणारे दया, क्षमा या नियमाचे व साधु, संत, ऋषि, मुनि, योगी, त्यागी, तपस्वी इत्यादि पूज्यलोकाविषयी दान नियमाचे शिक्षण प्रजेला देऊन अंतरिक प्रेम समृद्धी करणे धर्म पीठावरील गुरूचे कर्तव्य आहे. धर्म गुरूने मानव धर्म विकास ध्येय सिद्धीसाठी एकास्थानी बसून एका विचाराने वार्षिक सभा सम्मेलन करावे व इहलोक, परलोक व पारमार्थ इच्छित सुख देणाऱ्या पूजा, जप व ध्यान या नियमाचे प्रयोगात्मक शिक्षण देऊन परस्परात अंतरिक धर्मसमृद्धी करणे धर्म गुरुचे कर्तव्य आहे.

धर्म संस्थेच्या गुरु लोकानी जनवस्ती पासून दूर असलेल्या निसर्गरम्य प्रदेशात गुरुकुलाश्रम, योगाश्रम, तपाश्रमाची स्थापना करावी. तेथे बटूना धर्म शिक्षण देऊन तपःशक्ती सामर्थ्य संपन्न योग्य गुरुमूर्ती तयार करण्याचे कार्य अखंड चालत असावे. त्यापासून मठ सर्व योग्य प्रभुत्वामध्ये प्रकाशमान होऊन राहातील. राजा भू पति असून भू दक्षिणा (शेत सारा) घेतो. धर्मगुरु ज्ञान दाता असल्यामुळे देह दक्षणा घेतो. ते धन लोक कल्याणासाठी विनियोग करावे. जसा शेतकरी अन्न पेरून वाढवून ते पिकवून खातो व ते अन्न दुसऱ्याना देतो व दान करतो. त्याप्रमाणे धर्म गुरुनी अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणें) ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा जप व ध्यान या दहा नियमाचे स्वतः पालन करावे व शिष्य वृंदाना ज्ञान क्रिया रूपाने शिक्षण देऊन पालन करावयास भाग पाडावे. राष्ट्रशासन प्रजेच्या कल्याणासाठी

कर्मयोग संपादन करून. सहकार देतो. त्याप्रमाणे धर्मगुरुनी ज्ञानयोग संपादन करून राष्ट्राच्या योग क्षेमासाठी ज्ञान प्रदान-कार्य निरंतर चालावे. त्यायोगे धर्म आणि राष्ट्र दोन्ही लंग-ड्याच्या मार्गदर्शनाने अंधळा मार्गधरून चालतो. तसे कर्मयोग व ज्ञानयोग परस्पर समरस पावून चाललेतर त्यांची ध्येयपूर्ति होऊन जीवन सुखमय होते. त्याप्रमाणे धर्मसंस्था व राष्ट्रशासन संस्था हे दोन्ही एकाच ध्येयासाठी चालल्यास राजा प्रजामध्ये गुरु शिष्यामध्ये पिता पुत्रामध्ये, बंधुबंधूमध्ये,स्वामी सेवकामध्ये प्रेम-समृद्धी व नीति समृद्धी होऊन राष्ट्रात अंतरिक व बहिर्व्यापिक सुख शांति निर्माण होते.

या महान् उद्देशासाठी सदा सर्व काळ धर्मचिंतन कर-णारे व मानव धर्माचा बोध करणारे त्रिकाल शिवलिंग पूजा-तत्पर वेदमूर्ती सुरेशस्वामी हिरेमठ गोरटा यांच्याशी चर्चा कर-ताना धर्म हे सुखशांति विज्ञान आहे. असे मला समजल्या वरून सर्वांचे रक्षण करणारा धर्म आता सर्वांचा संहार करण्याच्या मार्गावर दिसत असून तो नकोसा वाटू लागला आहे. अशा विज्ञान युगाच्याधर्म संकट काली आपल्याकडून एक धर्मविज्ञान ग्रंथ निर्माण व्हावा ज्या योगे मानव कुलाची उन्नती होईल म्हणून अपेक्षा केली त्याला त्यांनी सहर्ष मान्य केले.

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपोध्यानमिति धर्मस्य संग्रहः ॥

सिद्धांत शिखामणि या संस्कृत ग्रंथातील वरील एका श्लोकावर यांनी "मानव धर्म शास्त्र" ग्रंथ लिहीण्यास प्रारंभ केला त्रिकाल स्नान व त्रिकाल पूजेच्या व्यतिरिक्त इतर काली त्यांचे लेखन कार्य चालत असे. ग्रंथ कर्त्यांना त्यांच्या कर्मयोगाचा भारविशेष

असलातरी त्यांची आत्म निष्ठा अतीव असल्यामुळे ते सर्व सहन करीत लेखन कार्य चालवीत असत त्यांचे शिक्षण म्हणजे वाचून लिहून पांडित्य प्राविण्याने पुढे आलेले नव्हे व कोणत्याहि ग्रंथाचे वाचन केलेले नाही एकादैवी शक्तीने व अंतस्फूर्तीने लिहीत असत. धर्म जिज्ञासा या भावनेत धर्म का पाहिजे, धर्मम्हणजे काय, धर्म कसा असवा हे तीन प्रश्न आहेत त्याप्रकारे धर्माचे प्रयोजन धर्माचे प्रमेय आणि धर्माचे प्रयोग अशा तीन भागांत ग्रंथाची रचनाकेली आहे. धर्म म्हणजे एका काळातील सिद्ध, साधु, संत,महंत ,योगी, त्यागी, जपी, तपी, सन्याशी आदि कोणाकडूनही आलेला नसून हे चराचर जग जेव्हा उत्पन्न झाले आहे तेव्हाच मानवाचा उदय झाला आहे. त्या मानवाबरोबरच अहिंसादि ध्यानांत दश नियमाच्या रूपाने धर्मही आलेला आहे, असे सिद्ध केले आहे. धर्म हा जैन, शिख, हिंदू, बौद्ध, ख्रिस्त, इस्लाम म्हणून न सांगता तो मानवाच्या अंगी अहिंसादि ध्यानांत दश नियम रूपाने स्वाभाविक प्रवृत्तीचा विकास करणारे साधन आहे म्हणून सिद्ध केले आहे. धर्म म्हणजे मत, पंथ, समाज व सांप्रदाय आहेत असे न सांगता तो, मानवाच्या अंगी स्वभाव सिद्ध असे सांगितले आहे. धर्म म्हणजे श्रद्धा, भक्ती,विश्वास ठेऊन डोळे झाकून वागणे असे न सांगता अहिंसादि ध्यानांत दश नियम प्रत्यक्ष प्रयोगामध्ये आणून अनुभव घेणे असे प्रतिपादन केले आहे. गणित शास्त्रात आय, व व्यय क्रम सांगितल्या प्रमाणे धर्म शास्त्र हा पाप पुण्य परिणाम स्वरूप सुखदु:खम्हणविणारे भोगोत्पादक व भोगविभाजक कर्माचे विवरण केलें आहे. गणित, भूगोल, खगोल, रसायन,आयुर्वेद आणि भौतिकशास्त्र, भाषाभेद, लिपिभेद, कार्य भेदाने वेग वेगळच्या स्वरूपात दिसून आलेतरी मूल तात्त्वीक रूपात

जगांतील सर्व मानवाना एकाच प्रकारचा अनुभव येत असल्या-मुळे धर्मशास्त्र सुद्धा अहिंसादि दश नियमाच्याद्वारे एकाच प्रकारे सुखानुभव देणारे आहे. म्हणून सिद्ध केले आहे.अहिंसादि ध्यानांत दशनियमाच्या धर्माला सर्व मानव जातीची स्वानुभूति प्रत्यक्ष प्रमाण आहे असे सिद्ध केले आहे.

धर्माधर्म विचाराच्या संकटकालामध्ये हा ग्रंथ उपयुक्त होऊन मानव कुलाच्या सुखशांतिसाठी विज्ञान रूपात मार्गदर्शन करील या आशेने प्रकाशन कार्य हाती घेतले आहे."विज्ञानरूपेण-संसार भयनिवर्तते" (चाणक्य सूत्र)
या वचनाप्रमाणे मानव धर्मशास्त्र ग्रंथरूपी विज्ञान दीपाने जगांतील अज्ञान अंध:काराचा नाश होऊन शांति प्रस्थापित होईल आणि अभ्युदय व नि:श्रेयस सिद्धीसाठी सहायक होईल अशी अपेक्षा आहे.

ग्रंथ प्रकाशनासाठी श्रीमान धर्मवीर गुरुभक्ती परायण श्री त्रिंबकराव ऊर्फ बाबासाहेब पाटील चाकूर यांनी आपले पिता कै. भीमराव पाटील यांच्या स्मरणार्थ उदार मनाने धन साह्य केले, मला अत्यानंद होतो. त्याना व त्यांच्या धर्मपत्नी सौ. कमलाबाई आणि चि. शिवशंकर व चि. अनिलकुमार या सर्वांना दीर्घायुष्य व सकलैश्वर्य प्राप्त होवो असा शुभाशिर्वाद

श्रीमान मल्लिकार्जुनस्वामी व श्रीमान लक्ष्मणराव तेलंग (पेन्टर) चाकूर यानी मुद्रण कार्यात विविध प्रकारे सेवा समर्पित केल्यामुळे त्यांना शुभाशिर्वाद.

चाकूर येथील संतोष प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. मारुतीराव शिंदे आणि मुद्रण सहायक संगमनाथ घाळे व शिवसांब शेटे यांनी काळजीपूर्वक मुद्रणकार्य केल्यामुळे त्याना शुभाशिर्वाद

- लेखकाचे हृद्गत -

"मानव धर्म शास्त्र" ग्रंथ प्रथम मी कानडी भाषेत लिहून प्रकाशित केला. महाराष्ट्रातील अनेक शिष्य बांधवानी मराठी भाषेत लिहीण्यासाठी इच्छा प्रदर्शित केल्यामुळे तो ग्रंथ मराठी भाषेत लिहून वाचकांच्या सेवत सादर करण्यास अत्यानंद होतो.

भूत शास्त्राच्या अविष्काराने निर्माण केलेल्या दैनंदिन-कर्म योगाच्या भोग साधनाने मानवी मनाला विस्मित केले आहे. प्राचीन काळी रात्रीच्या अंधारात काष्ठ ज्योतीच्या प्रकाशांत कालक्षेप करीत असलेला मानव तैलदीप, घृतदीप, ग्यासदीप असा विकास पावत शेवटी विद्युद्दीपात जीवित आहे. आपल्या प्रवासासाठी बैल, गाढव, घोडा, उंट आदि सजीव वाहनाद्वारे मंद-गतीने जाणारा मानव मोटर, रेल्वे, आकाशयानादि निर्जीव वाहनाने अति वेगाने संचार करीत आहे. आपल्या प्रेमी लोकांना प्रत्यक्ष भेटून संतोषित होणारा मानव पोष्ट, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हिजन आदि साधनाने एका निमिषात प्रत्यक्ष भेटीचा आनंद उपभोगीत आहे. संकट काली आपल्या रक्षणासाठी काठीचा उपयोग करणाऱ्या मानवाने भाले, बर्ची, तलवार, ढाल, बंदूक आदि शस्त्राचा उपयोग करीत अखेर जगाचा विध्वंस करावयाच्या दुष्टहेतूने अणुबाँबची निर्मिती केली आहे. इतकेच नव्हे तर पृथ्वीच्या सभोवति अहोरात्र भ्रमणं करणारे गुरु, शनि मंगळ, चंद्र या गृह नक्षत्र गोलावर जाऊन त्यां ग्रहाच्या भू गर्भात असलेल्या सोने, चांदी आदि धातू आणून साऱ्या जगावर आपले संपत्ती साम्राज्य स्थापित करण्याची अपेक्षा करीत आहे. तथापि

त्याच्या मनाला संतृप्तीच नाही. त्याच्या ही पेक्षा दीर्घकांक्षी होऊन चंद्र, मंगळ लोकांत आपली जनवस्ती वाढवून तेथे आपले शासन प्रस्थापित करावे अशी अपेक्षा धरून आहे. भविष्य काळी चंद्रलोक माझा आहे, असे एका राष्ट्राने म्हटल्यास तुझे नाही माझे आहे असे दुसरे राष्ट्र म्हणू लागेल. या पासून मी तू म्हण-त्रिणारा अहंभाव उद्रेक पावून शेवटी महायुद्ध होऊन जन संपत्ती नाश पावणे या शिवाय दुसरे कांही नाही.

वैज्ञानिक मानव ईश्वर ही वस्तू काल्पनिक आहे.म्हणून समजतो. त्याला "चक्षुर्वै सत्यम्" या म्हणी प्रमाणे जे प्रत्यक्ष दृष्टी गोचर होत आहे तेच सत्य आहे असे समजतो. मानवाने आपल्या इच्छा, ज्ञान, क्रिया या शक्तीचा उपयोग करून अनंत उपभोग पदार्थं निर्माण केले आहेत. या जड पदार्थाच्या चिंतनाने आणि भोग विलासामध्ये मग्न होण्याने त्याचे मन जड झालेआहे त्रिषय भोग सुखच मानवाचे अंतिम साध्य झाले आहे. याशिवाय दुसरी एक दिव्य शक्ती आहे यावर जड विज्ञानी मानव विश्वास करीत नाही. राष्ट्राच्या प्रत्येक कर्मात हिंसा,असत्य भाषण, चोरी परस्त्री परपुरुषाचे अनैतिक प्रमाद, मद्यपान, मांस भक्षण, जुगारादि दुष्ट प्रवृत्ती वाढत आहेत. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला दुखऊन आपण सुखी रहावे या भावनेत आपला कर्मयोग चालवित असतो. मानवाच्या मनांतील आत्मिक भीती नाहीशी होऊन राष्ट्रपतिवध, मंत्रीवध, योगीवध, न्यायाधीशवध, देशभक्तवध अशी जेथे तेथे हिंसाच वाढली आहे. प्रजाराज्य जाऊन त्याची हिंस्र-पशुराज्यांत गणना होत आहे. राष्ट्रातील सन्मानित व्यक्तीचे जीवन कष्टप्रद झाले आहे. बलिष्ठ दुर्जीवी लोक नानाप्रकारची

पीडा देत असून त्यांना कोणी आश्रयदातें नाहीत अशी अवस्था-झाली आहे. हे जड विज्ञान कितीही पुढे गेले तरी उपयोगाचेनाही.

अधुनिक काळी कांही लोक धर्म म्हणजे परंपरागत सांप्रदाय, जाती, चाली, रूढी असे समजत आहेत. कांही लोक स्पृश्यास्पृश्य व रोटी बेटीच्या देव घेवीचा विचार करणे याला धर्म समजले आहेत. कांही लोक उपास्य दैवतांच्या पूजा, जप, उपासनेलाच परंपरागत धर्म समजत आहेत. त्या योगें मानव समाजात परस्पर जातीद्वेष, जात्यांधता वाढून राष्ट्रात अशांतता होऊ लागली आहे असे धर्मासंबंधी गैर समज होऊन विचार-वंताना असला धर्म आम्हास नको तो राष्ट्राच्या शांति पूर्ण कार्यास विरोध करणारा आहे. असा समज झाला आहे.

मानवी मनाला अंतर्प्रवेशक होऊन मनाच्या पलिकडे कोणती दिव्य वस्तू आहे या तत्त्वाकडे गेल्याविना जगात शांति सुख संभवत नाही. श्री ज. गुरु रेणुकशिवाचार्य व अगस्त्यमहर्षी संवाद रूप संस्कृत सिद्धांत शिखामणि या ग्रंथातील मानव धर्माचा बोध करणारा श्लोक

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपोध्यानमिति धर्मस्य संग्रहः ।।

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप व ध्यान हे दहा नियम मानवाच्या अंगी जन्मसिद्ध स्वाभाविक प्रवृत्ती आहे. याचा अभाव झाल्यास मानव जीवित राहणारनाही या प्रवृत्तीचा दुसऱ्या जीवाविषयी उपयोग करणाऱ्या भाव प्रयो-गाला मानव धर्म म्हणतात. मानवाची सर्व क्रिया मनाचे मूल-कारण असलेल्या भावतत्त्वाने चालत असतात. त्या भावतत्त्वाच्या विश्लेषणाला मानव धर्म म्हणतात.

श्री अगस्त्य महर्षींनी सप्त समुद्र जल प्राशन केले असे पुराण ग्रंथात वर्णन आहे. या अलंकारिक भाषेचा अर्थ म्हणजे श्री ज. गुरुरेणुक शिवाचार्यांच्या हृदयाकाशामध्ये विशाल रूपात वाहाणाऱ्या मानव धर्म तत्त्वाचा ज्ञान समुद्र गुरु मुखाने ऐकून अगस्त्य महर्षींनी पान केले असा होतो. त्या ज्ञान समुद्राचा श्रोतच "सिद्धांतशिखामणि" नामाभिधानाचा ग्रंथ सुशोभितआहे त्या श्रोताचा एक रस कणच "अहिंसा सत्यमस्तेयं" या श्लोक रूपांत मला प्राप्त झाला अमृताचा एक बिंदू पान केल्याने अमर होतो. या म्हणी प्रमाणे वरील श्लोकच मानव धर्माचे सार असून माझ्या स्वानुभव विकासाच्या भाव स्फूर्तीतून "मानव धर्मशास्त्र" हा बृहद्ग्रंथ झाला आहे.

प्राचींन काळी आचार्य शिष्य वृंदाना सन्मुख वसवून शिकविलेले विषय शिष्यानी श्रवण करून कंठस्थ पाठकरण्यास श्रुति म्हणतात. आणि ते श्रवण केलेले विषय मनांत मननपूर्वक स्मरण ठेऊन दुसऱ्यांना सांगण्यास स्मृति म्हणतात. अशा प्रकारे गुरु शिष्याच्या परंपरेत आलेले ज्ञानच श्रुति स्मृति ग्रंथ रूपाने आज उपलब्ध आहे. त्याच प्रकारे "श्री जगद्गुरु रेणुकाचार्य अगस्त्य महर्षी" यांच्या गुरु शिष्य परंपरेतून वहूकालापासून श्रुति स्मृति रूपाने आलेले ज्ञान दोन हजार वर्षा पूर्वी गुरुवंश-संभूत " श्री शिवयोगी शिवाचार्य" यानी "सिद्धांत शिखामणि" साहित्य रूपाने लिहीला आहे.

ऊर्ध्वभाव, अधोभाव, नैसर्गिकभाव, अनैसर्गिकभाव, गणित साध्यद्रव्य, अगणित साध्यद्रव्य, कालद्रव्य, ज्ञानद्रव्य, क्रियाद्रव्य, उत्पादक व विभाजक आणि मूल्य हे शब्द आमच्या संशोधनांत ज्या भावार्थाने गृहित धरले आहेत. त्याच भावार्थाने

वाचकानी गृहीत धरावे.

श्री. ष. ब्र. राचोटि शिवाचार्य पीठाधिपति कट्टीमनि संस्थान हिरेमठ मेहकर हे द्विकाल पूजा निष्ठ तपोजीवी त्याग व वैराग्याने पूरित आहेत. या महा भागानी **"मानव धर्मशास्त्र"** ग्रंथ लिहीण्याची प्रेरणा देऊन माझ्याकडून ती सेवा घेतली ग्रंथ लिहीण्याच्या कामी सर्व तो परी व्यवस्था करून प्रकाशन कार्य हाती घेतल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रीय लोकांच्या सेवेत ग्रंथ सादर करण्याचा सुयोग प्राप्त झाला. याकरीता त्यांच्या दिव्य चरणी अनन्य भाव भक्तीने वंदनपूर्वक कृतज्ञता समर्पण करतो.

वे. मू. श्री. संगय्या स्वामी वकील चाकूर हे प्रशांत व गंभीर जीवनातील व्यक्ती असून त्यांच्या व्यक्तित्त्वाचा गुणगौरव कितीही केलातरी थोडाच आहे. यानी माझ्या समागमे एक वर्ष अखंड राहून मराठी भाषेत लिहीण्याच्या कामी विशेष मदत केली यांच्या सहयोगाने हे महान कार्य पार पडल्यामुळे त्यांना महा-गुरु रेणुक शिवाचार्य सर्वतोपरी मंगल करो अशी शुभेच्छा करतो.

चाकूर येथील आदर्शजीवी श्रीमान् **विश्वंभरराव कुलकर्णी** (बी. ए. बी. एड्,) व श्रीमान पंडित **विनायकराव** निलंगेकर यानी या ग्रंथाचे परिशीलन करून साहित्याच्या दृष्टीने शुद्ध करून दिल्यामुळे या उभयतांचे हृत्पूर्वक अभिनंद करतो.

चाकूर येथील सन्मानित आदर्शजीवी **वे. मू. रामय्या स्वामी व सौ. त्रिवेणीबाई** या दंपत्तीनी मुद्रणकाली त्रिकाल पूजा-नुष्ठान सेवा सत्कार केल्यामुळे याना महागुरु मोक्ष मार्गात प्रवृत्त करो अशी शुभेच्छा करतो.

चाकूर येथील श्रीमान भक्तराज **त्रिंबकराव उर्फ बाबासाहेब पाटील** हे पूजा, जप, भजन, कीर्तन नामस्मरणादि

पुण्य कर्मात निरंतर वेळ घालविणारे एक आदर्श व्यक्ती आहेत. त्यांच्या धर्मपत्नी सौ. कमलादेवी याही भक्तीपूर्ण निष्ठावंत माता आहेत. पाटील साहेब यांनी आपल्या पितृस्मरणार्थ या ग्रंथ प्रकाशनासाठी गुरु दक्षणा रूपाने धन साह्य केले. या दांपत्याना सकलैश्वर्य प्राप्त व्हावे अशी अपेक्षाकरून शुभाशिर्वाद देतो.


श्री. गु. भ. शिवदासप्पा गादगे पोष्टमास्तर चाकूर श्री. वे. मू. चंद्रशेखर स्वामी मठपती या उभयतानी आमच्या त्रिकाल पूजानुष्ठांनात सेवा सर्मपित केल्यामुळे यांना शुभाशिर्वाद

बार्शी येथील गु. भ. श्री. भीमाशंकरप्पा होनराव यांनी या ग्रंथाची प्रेसकॉपी आपल्या सुन्दर अक्षरात लिहून दिली आहे. त्यांना शुभाशिर्वाद.


सुरेश स्वामी हिरेमठ गोरटा
ग्रंथकर्ता



❀ ग्रंथ लेखकाचा परिचय ❀



गोरटा तालुका बसव कल्याण जिल्हा बिदर (कर्नाटक राज्य) या गावी हिरेमठ एक पवित्र स्थान आहे. या मठाचे अधिपति श्री रेवणसिद्ध स्वामी व त्यांच्या धर्म पत्नी सौ.गुरुदेवी या पतिभक्ती परायण व धर्मनिष्ठ होत्या. श्री रेवणसिद्ध स्वामी



मानव धर्म संशोधक
श्री सिद्धवीर स्वामी सालीमठ बनहट्टीकर
तडोळा (राजेश्वर) जि. बिदर

सदाचार संपन्न व सात्विक प्रवृत्तीचे असून खाजगी शिक्षकाचेकाम व गावाचे पौरोहित्य काम करून चरितार्थं चालवित असत. या दांपत्यास पुत्र संतान नसल्यामुळे ते चिंतातूर होते. श्री रेवणसिध्द स्वामीजीनी काम्य संकल्प करून ज्ञानी, तपस्वी पुत्र व्हावा या अपेक्षेने पंचाक्षरी महामंत्राचे अनुष्ठान केले. तेव्हा त्यांच्या स्वप्नांत एक शिवयोगी येऊन त्यानी तुम्हाला पैसा पाहिजे की मुलगा असा प्रश्न केला. त्यावेळी मला मुलगा पाहिजे असे स्वप्नातच उत्तर दिले.पूर्व संकल्पानुसार एक वर्षानंतर या दांपत्याचे पोटी मिती माघ वद्य अमावाशा शके १८३७ शनिवार रोजी दैवीगुण संपन्न पुत्र रत्न जन्मास आले. याचे नाव सुरेश स्वामी ठेवण्यात आले. त्यानंतर तीन मुले झाली. यांच्या बालपणीच सौ. माता गुरुदेवी शिवैक्य पावल्या. त्या योगे श्री रेवणसिध्द स्वामीजीना पत्नी वियोगाचे दुःख व लहान बालकांच्या संगोपनाचा भार पडून अतिशय कष्ट झाले. त्यावेळी गावातील माता भगिनींनी मुलांच्या संगोपनात पुष्कळ मदत केली.

श्री रेवणसिध्द स्वामीजी स्वतः शिक्षक असल्याने सुरेश स्वामी व राचोटि स्वामीना आपल्या घरीच चौथ्या इयत्तेपर्यंत शिक्षण दिले. मुलाना संस्कृत शिकविण्याची इच्छा प्रबल होती परंतू परिस्थिती अनुकुल नव्हती. अशात मुलांचे मामा मेहकर-मठाधिपति श्री मरिस्वामी देशिकेंद्र महाराज सहज गोरट्यास आले. त्यावेळी त्यांना श्री रेवणसिध्द स्वामीनी मुलांची इच्छा संस्कृत शिकावयाची आहे कसे करावे असे विचारल्यावरून त्यांनी दोन्ही मुलांच्या अभ्यासासाठी एका विद्वान शास्त्रीची योजना करून गोरटा मठात पाठशाळाच काढली. त्यात पुष्कळ विद्यार्थी शिकत होते. पाठशाळेत महाराजाचे फक्त २ वर्षे शिक्षण झाले.

याच काळात धर्म प्रचाराच्या उद्देशाने संचार करीत असलेले श्री पूज्य सिध्दवीर स्वामी सालिमठ वनहट्टीकर हे येऊन गोरटा मठात वर्षाकाठी कांही दिवस राहत होते. एके दिवशी सुरेश स्वामी पूजा करून सहज अंगणात उभे होते तेव्हा श्री. सिध्दवीर स्वामी महाराजानी "अरे मुला इकडे ये तुला मंत्र सांगतो" म्हणून कानात मंत्र सांगितला. या मंत्राचा अभ्यास केलास तर न शिकता तू विद्वान होशील शिकण्याचीं गरज नाही" असे म्हणाले यावरून सुरेश स्वामीची अभ्यास करण्याची वृत्ती नाहिशी होऊन मंत्राचे मनन व चिंतन करीत एकांतात बसण्याची प्रवृत्ती वाढली त्याना जनसंपर्क नकोसा वाटू लागला.

याच सुमारास मेहकर मठाधिपति श्री मरिस्वामी देशिकेंद्र घरी आले. तुमचा दुसऱ्या नंवरचा मुलगा राचोटि स्वामी यांस माझ्या मठाच्या उत्तराधिकारासाठी द्या नाहीतर मी जेवणार नाही उपवास करीन अशी प्रतिज्ञा करून आसन मांडून बसले. त्या मुळे रेवणसिध्द स्वामींजीना फार अवघड वाटू लागले.मुलगा देण्याची इच्छा नव्हती त्यांच्या प्रेमाच्या हट्टामुळे देण्याचे मान्य केले. तेव्हा त्यानी भोजन केले. कांही दिवसानी त्यास मेहकर मठास नेऊन शिक्षणासाठी सोलापूर येथे वारद पाठ शाळेत ठेविले व नंतर १९३६ साली यांचा पट्टाभिषेक झाला.

इकडे सुरेश स्वामीना मंत्राचा निधिध्यास लागून अखंड एकांतात बसण्याच्या विचाराने वडीलाना न पुसता श्रीशैलास पळून गेले. कांही दिवस तेथे राहून घरी परत आले तेव्हा वडीलानी मुलाच्या प्रेमातिशयाने येथेच अनुष्ठान कर म्हणून गावाजवळील एका मळचांत पर्णशाला निर्मून दिली. तेथे सुरेश स्वामीनी श्री पर्वतस्वामी मठ लालवाडी बिदर यांचेसह सहा महिने

मौनव्रतस्थ राहून अनुष्ठान केले. त्यांना दैवी शक्तीचा अनुभव येऊ लागला अंतर्नाद मूलक मंत्र ध्वनी ऐकू येऊ लागला योगातील कांही प्रयोगाचाही अनुभव येऊ लागला. घरी राहण्याची त्यांची इच्छा दुरावली म्हणून वडीलाना न सांगता वनहट्टीकर महाराजाकडे गेले. ते बनहट्टीकर महाराज सतत संचार करीत लहान मोठ्या गांवी फिरत होते. त्यांची सेवा, सत्कार व पूजेची व्यवस्था करण्यासाठी दोन वर्ष त्यांचे सेवेत राहिले. त्यांचे प्रवचन "अहिंसा सत्यमस्तेयम्" या श्लोकावर होत असे त्याचे चिंतन सुरेशस्वामीजीच्या अंतःकरणात विंब्रून गेले दोन वर्षानंतर वनहट्टीकर महाराजानी तुझी सेवा पुरे तू सेवेत पासझालास आता येडशीच्या डोंगरात अनुष्ठान करण्यासाठी जा अशी आज्ञा केली.

सुरेश महाराजानी येडशीला जाऊन श्री रामलिंगेश्वर मंदिराच्या पश्चिमेस एक मैलाच्या अंतरावर गाद्या नावाचे एकांत स्थान पसंत केले. तेथून पूर्व व पश्चिमेस चार मैल, उत्तरेकडे येडशी तीन मैल दक्षिणेकडे दोन मैल कोणतेही गांव नसलेल्या अशा पारिजात, बिल्व, चंदन, वनजाई आदि पुण्यवृक्षराजाने नटलेल्या निर्जन प्रदेशात ओढयाच्या काठावर एक पर्णकुटीबांधली. वै. शुद्ध त्रयोदशी सोमवार शके १८५८ (१९३६)या शुभमुहूर्तावर अनुष्ठान आरंभ केले. सर्व कामे आपण स्वतःच करून घेत असत. अंगावर कौपीन व उत्तरीयवस्त्र असून अंथरण्या व पांघरण्यासाठी साळीच्या तनसाच्या चटईचा उपयोग करीत होते. पाणी पीण्यासाठी एक आणि शौचास जाण्यासाठी एक अशी दोन मडकी उपयोगीली जात होती. दूध, तूप, फळफळावळादि कोणताही आहार न घेता दिवसा कडूलिंबाचा पाला व रात्री मूठभर कच्ची ज्वारी खाऊन अखंड मौनव्रती राहून प्रातःकाळी चारतास

माध्यान्ही तीन तास. सायंकाळी चारतास अशा रीतीने त्रिकाळ-स्नान, त्रिकालपूजा व पंचाक्षर मंत्रानुष्ठान चालत असे त्या वनांत वाघ आदि हिंस्र पशूचा निवास होता. एके दिवशी पूजेस बसल्यावेळी एक भयंकर सर्प जवळ येऊन बसला महाराजानी डोळे मिटवून भगवंत कांही करो म्हणून त्याच्याकडे न पहाता ध्यान करीत बसले. भगवंतावरील अटल विश्वास ढळू दिला नाही. या प्रकारे एक वर्ष अखंड अनुष्ठान चालल्या नंतर श्री सिद्धवीर स्वामी बन्हट्टीकर महाराज आले त्याना मोठा आनंद झाला. "तू कठोर वैराग्याने अनुष्ठान करशील अशी मला कल्पना नव्हती फार चांगले झाले" असे उद्गारले. सुरेश स्वामी म्हणाले आपल्या आशिर्वादाने भगवती मातृ देवतेचे दर्शन होते. अंतर्नादमंत्र स्वच्छ ऐकू येतो. तेजोमय प्राणलिंगाचे दर्शन होते असे सांगितल्या बरोबर बन्हट्टीकर महाराजाना अत्यानंद होऊन कवटाळून हृदयाशी घट्ट धरले. मग उभयतानी विचार करुन "सद्धर्म गुरुकुल" आश्रम स्थापून धर्म प्रचाराचे कार्य सुरु केले. त्यानंतर गुरुकुलात पुष्कळ विद्यार्थी मंत्रानुष्ठान, योगानुष्ठान शिकण्यासाठी प्रविष्ट झाले. गुरुकुलाच्या योग क्षेमासाठी श्री बन्हट्टीकर महाराज संचार करून आर्थिक मदत करीत असत. सुरेश स्वामीजी आश्रमांतील विद्यार्थ्यांना साधन शिक्षण देत असत. सुरेश स्वामीजी सतत तीन वर्षे दूध व केळीवरच राहिले. पुष्कळ लोकांना त्यांच्या दैवी शक्तींचा अनुभव येऊ लागला. एकावेळी त्यांना १०६ टक्के डिग्री ताप आला तेव्हा प्रवचन चालू होते. त्यावेळी वैद्यराज "लिंगप्पा शेटे चाकूरकर" उपस्थित होते. त्यानी "तुम्ही अंगात येवढा ताप असताना बोलता याचे मला आश्चर्य वाटते औषध घ्या, स्नान करू नका" म्हणाले. सुरेश महाराजानी



— लेखक —

सुरेशस्वामी हिरेमठ गोरटा (जि. बिदर)

"स्नान पूजा सोडावयाची नाही भगवंताच्या इच्छेने जे व्हावयाचे असेल ते होईल" असे निर्धारपूर्वक उद्गार काढले. ताप अपो-आप कमी झाला.

अनुष्ठानासाठी आलेल्या एका साधकाने माझ्या अंगात दाह होतो असे सांगितल्यावरून त्याला खडी साखर व लोणी खावयास देण्याची व्यवस्था केली. असे अनेक वेळा सांगून साखर लोणी खाल्ले त्यानंतर एके दिवशी खरोखर त्याच्या अंगात आग पडून रडू लागला महाराजांचे पाय धरून मला क्षमा करा मी पुष्कळ वेळा खोटे बोलून खाल्ले आता माझ्या अंगात असह्य दाह होतो म्हणून गडबडा लोळू लागला तेव्हा महाराजानी त्यावर न रागावता या पुढे असे करू नको समाधान पूर्वक रहा म्हणून भस्म दिले. त्यानंतर त्याचा दाह नाहिसा झाला.

गुरुकुलांत दरवर्षी श्रावणमासी जपयज्ञाचा कार्यक्रम चालत असे त्यात शेकडो साधकानी भाग घेतला. यज्ञांतील दैनंदिन कार्यक्रम प्रातःकाळी सामुहिक प्रार्थनेत राष्ट्रगीत व धर्मगीत त्यानंतर पूजा, जप, ध्यानाचे शिक्षण व मानव धर्माचा उपदेश असा होता. महाराजांच्या मंत्र सामर्थ्याचा भक्ताना अनुभव येऊ लागला त्या योगे महाराष्ट्र व कर्नाटकात गुरुकुलाची ख्याती विशेष प्रमाणांत वाढली. दूरदूरचे सद्भक्त गुरुकुलास येऊ ले. गुरुकुलास आलेल्या अतिथी अभ्यागताच्या सेवा सत्काराचे कार्य श्री काडप्पा कोर्ती मनगूळी व सोलापूरचे दानय्या स्वामी हिरेमठ व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सुशीलाबाई यांनी उत्कृष्टरितीने सेवा भावनेने केले.

महाराजांचे तिसरे बंधु श्री काशीनाथ महाराज आश्रमांत राहून अनुष्ठान करून वैराग्य वृत्तीने राहत होते. चवथेबंधु

श्री गुरुपाद स्वामी १७ वर्ष वयाचे असून त्यांचे लग्न झाले होते. ते गुरुकुलात आजारी पडून वारले.

सोलापूरचे कलेक्टर श्रीमान स्मिथ साहेब आश्रमास आले व आश्रम पाहून आनंदीत झाले. त्यानी महाराजाना विचारले की सध्या मोठमोठ्या राष्ट्रात जागतिक महा युद्ध चालू आहे. "त्यात कोणाला यश येईल." तेव्हा महाराजानी इंग्लंडचा विजय होईल असे सांगितले. त्याच वेळी आश्रमा करीता ९९ वर्षाच्या कराराने १०० एकर जमीन दिली.

डोंगरातील दुषीत जलाने साधकाच्या प्रकृतीला बाधा होऊन नाना प्रकारचे रोग होऊ लागले. अरोग्य तज्ञ लोकांनी दुषित जलामुळे साधकाना हे स्थान पोषक नाही. स्थानांतर करावे लागेल. असा अभिप्राय दिल्यामुळे आश्रमाच्या स्थानांतरासंबंधी विचार चालू झाला. याच सुमारास हैद्राबाद स्टेटमध्ये रजाकाराचा धुमाकुळ वाढत्या प्रमाणांत चोहीकडे सुरु झाला. त्याचा उपद्रव आश्रमाला सुद्धा होऊ लागला. कारण हैद्राबादची सरहद्द एक मैलाच्या अंतरावर होती. सोलापूरचे कलेक्टर श्रीमान घाटगे साहेब यानी सतत एक महिना संरक्षण दल ठेवले काँग्रेस सेवादलाचे कार्यकर्ते **श्री लक्ष्मणराव चाकूरकर** हे ही होते. यापुढे परिस्थिती अत्यंत बिघडणार आहे संरक्षण करणे शक्य नाही. स्थानांतर करावे. अशा सूचनेमुळे गुरुकुलाची जमीन व जनावरे विकून सरकारी जमीन परत करून सोलापूर जवळील टेकेकरवाडीच्या स्टेशनाजवळ आश्रम नेला तेथे हैद्राबाद स्टेटमधून येणाऱ्या निर्वासिताना अन्न वस्त्र देण्यांत आश्रमातील लाखोरुपये खर्च झाले.

महाराजांची जन्मभूमी गोरटा येथील त्यांचा मठ व

गांव रजाकारानी जाळून उध्वस्त केले व लुटल्यामुळे महाराजांचे वडील **श्री रेवणसिद्ध स्वामी** टिकेकरवाडीच्या गुरुकुलास आले. कांही दिवस राहिले. पुत्रवियोगाच्या दुःखाने व मठाच्या नाशाने मानसिक त्रासामुळे त्याना समाधान लाभेना म्हणून महाराजानी त्याना काशी क्षेत्राला घेऊन गेले. बरोबर काशीनाथ महाराजही होते. तेथे दोन महिने दररोज भजन, पूजन, कीर्तन व श्री विश्वनाथाचे दर्शनात काल क्रमणा होऊ लागली येथेच महाराजानी "सुराज्य विज्ञान" नावाचा ग्रंथ मराठी भाषेत लिहीला. हैद्राबाद राज्य स्वतंत्र होताच आश्रमाकडे परत यावयाची तयारी केली. तेव्हा वडील सुरेश स्वामीना म्हणाले तुम्ही जा मी घराकडे येत नाही माझ्या सेवेसाठी गुरुपादचे लग्न करून जवळ ठेऊन घेतले होते पण त्याला ही देवाने. नेले, तुम्ही मला सोडून बारावर्षापासून आश्रमकाढून त्यागवृत्तीने अरण्यांत राहिलात, श्री राचोटि स्वामीना मेहकर मठास दान दिले. श्री काशीनाथ महाराजांचे ही संसाराकडे लक्ष नाही. मी निराधार झालो आहे. अशास्थितीत परत येऊन जळालेल्या मठाची राख भरण्यापेक्षा सन्यास घेऊन या पुण्य क्षेत्रात राहीन. अखेर गंगामातेच्या उदरांत जल समाधी घेईन असे निक्षून सांगितले. सुरेश स्वामीजीना चिंता लागली व म्हणाले, माझी आई बालपणीच स्वर्गस्थ झाल्यामुळे तुम्ही सन्यासीच आहात या दुर्जीवीला आईची सेवा घडली नाही. आपण येथेच रहातो म्हणता, आपल्याला सोडून मी कसा जाऊ असे म्हणताना त्यांचा कंठदाटून भरून आला. "अप्पा" तुम्ही पुत्र वियोगाच्या तापाने असे म्हणता या पुढे मी आपल्या सेवेत राहीन. आपली सेवा नाही केल्यास माझी त्रिकाल पूजा सफल होणार नाही. अशा प्रकारे समजावून

वडीलाना बरोबर घेऊन टिकेकरवाडी येथील गुरुकुलाश्रमासआले.

स्वातंत्र्याची चळवळ थांबून सर्वत्र शांतता झाल्यामुळे सर्व निर्वासित लोक आपल्या गावाकडे परत गेले होते. श्री राजोटि शिवाचार्य मेहकर करानी "आपण आमच्या मठाकडे चला तेथे राहून पुढील आयुष्य जन सेवेत व साहित्य सेवेत घालऊ' म्हणा- त्यामुळे विचार करुन वडीलासह मेहकरकर महाराजा बरोबर डोणगोपूर मठास गेले. तेथे तीन वर्ष राहिल्यानंतर वडील त्याना उद्देशून म्हणाले काशी क्षेत्रात श्री विश्वनाथाच्या दरबारात माझी सेवा करतो म्हणून मला परत घेऊन आलात. त्याची अठवण आहेका ? सुरेश स्वामीनी उत्तर दिले तुमच्या सेवेसाठी गुरुकुल सोडून आलो सेवेतच आहे. वडील म्हणाले "मुला"माझा आशि- र्वाद तुला पाहिजे असल्यास तू लग्न कर. यानेच माझ्या मनाचे समाधान होईल. नाही केल्यास माझा वंश दीप खंड पडेल असे दु:खोद्गार काढले. त्यावेळी सुरेश महाराजांचे वय ३५ वर्षाचे होते. ते म्हणाले लग्न केल्याने योग्य वधू नाहीभेटल्यास माझे त्रिकाल पूजानुष्ठान थांबून जाईल. त्रिकाल पूजेचे व्रत आमरण चालावे अशी अपेक्षा आहे. तेव्हा वडील म्हणाले "मी दर रोज दोन वेळा देवाची पूजा प्रार्थना करतो माझ्या आयुष्यात केलेले सर्व पुण्य तुझ्या रक्षणासाठी अर्पण करतो." या वचनावर तुझा विश्वास असल्यास लग्न कर नसता उपाय नाही." यावर महा- राज धर्म संकट आहे असे समजून स्तब्ध झाले.

महाराज चाकूरला आले येथे संगण्णा करंजकर, रामलिंग स्वामी, होनय्या स्वामी व मी आणि लक्ष्मणराव (पेन्टर) या जीवलग प्रेमी शिष्य बांधवाना सर्व हकीगत कळविली यावर विचार विनिमय होऊन श्री संगण्णा करंजकरानी

वडीलाची आज्ञा म्हणून गृहस्थाश्रम स्वीकार करा. ऋषी जीवन सोडू नका. जन सेवा करीत जीवन व्यतीत करा असे सांगितले. त्याप्रमाणे महाराजानी लग्न करण्याचे ठरविले. विदर येथील श्री पापनाशेश्वर मंदिरात लग्न विधी पार पडला.

– गृहस्थ जीवन –

पूज्य वडिलांच्या आशिर्वादाने सुरेश स्वामीजीच्या धर्मपत्नी सौ. वनदेवी माता या महान् पति भक्ती परायण असून त्याही दोन वेळा स्नान रुद्राभिषेक पूजा व जप करतात. कठीण प्रसंगी देखील त्यानी नित्य पूजानुष्ठान सोडले नाही.घरीआलेल्या अतिथीचा सत्कार मुलांचे संगोपन महाराजांची सेवा हे प्रत्यक्ष पाहिल्यास आदर्श गृहस्थ जीवनाचे दर्शन घडते. एक वेळ माताजीच्या प्रकृतीमध्ये दोष उत्पन्न झाला सोलापूरला नेले तज्ञ डॉक्टरानां दाखविले पोटाचे ऑपरेशन करावे लागेल नऊ दिवस सतत अंथरुणावर पडून रहात्रे लागेल असा त्यांनी अभिप्राय दिल्या नंतर माताजी म्हणाल्या आता ऑपरेशन करून घेतल्याने बरे होईल परंतू कांही काळा नंतर तरी या शरीराला मरण येईलच ते आताच का येईना पूजा व्रत सोडावयाचे नाही असे म्हणून परत आल्या कांही दिवसानी तो रोग त्यांच्या मंत्रानुष्ठानानेच नाहीसा झाला.

एकावेळचा प्रसंग असा घडला की श्रावण मास होता मठातील श्री रेवणशिद्धेश्वर लिंगास अभिषेक करण्यासाठी गांवातील पुष्कळ भक्त लोक जमले होतें. महाराज आंतील देव घरांत पूजा करीत होते. मध्य घरात माताजीचे तान्हे मूल वारले त्यांची आई सौ. रत्नम्मा चिट्टेकर रडू लागल्या तेव्हा माताजीने आपल्या आईला "रडू नको आत बाहेर पूजा चालू आहे परमेश्वरी इच्छा

शांत रहा" म्हणून गप्प बसविले. व स्वत:ही तटस्थबसल्या पूजा मंगलारती तीर्थ प्रसादानंतर अंत्यविधी केला. याप्रसंगाने माताजीची स्थितप्रज्ञता, ईशनिष्ठा व धैर्याची सर्वांनाच प्रचितीआली. १९५४ साली महाराजांचे वडील श्री रेवणसिद्ध स्वामी शिवाधीन झाले.

महाराज गृहस्थजीवनात राहून त्रिकाल स्नान, त्रिकालपूजेचे अखंड वृत चालवीत असून सार्वजनिकरित्या विश्वशांतिसाठी ठिकठिकाणी जपयज्ञ व लघुरुद्र महारुद्राचे कार्यक्रम आणि ग्रंथ लेखनाद्वारे मानवधर्म प्रचार कार्य चालवित आहेत.

बसवकल्याण येथे १९५४ साली श्री गुरु राचोटि शिवाचार्य मेहकर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री बनहट्टीकर महाराज यांच्या नेतृत्वात त्रिपुरांत तळ्याच्याकाठी ५ कोटि पंचाक्षर मंत्राचा जपयज्ञ करून तेथे त्रिपुरांतकेश्वर शिवलिंग स्थापन केले.

कांही कालानंतर तपोनिष्ठ काशीनाथ स्वामी महाराज यांचा विमलखेड जि. बिदर हिरेमठास गुरु पट्टाधिकार झाला. हे महान्‌विद्वान असून त्यांची प्रवचन शैली अत्यंत चित्ताकर्षक परिणाम कारक आहे. महाराष्ट्रात ते फारच लोक प्रीय आहेत

सलगर जि. गुलबर्गा येथे एक कोटि पंचाक्षर महामंत्राचा जपयज्ञ केला. बिदर येथील श्री पापनाशेश्वर लिंगास महारुद्राभिषेक केला. आणि मेहकर महाराजांच्या सहयोगाने देवणी (बाजार) येथेही एक कोटि पंचाक्षर महामंत्राचा जपयज्ञकेला.

मानवधर्म (मराठी), पूजाजपध्यानप्रयोग, धर्म आणि राष्ट्र, श्री रुद्र पूजा जप प्रयोग, हे ग्रंथ लिहिले आणि मानव धर्म शास्त्र बृहद्‌ग्रंथ प्रथम कानडी भाषेत लिहून तो पुन: मराठी भाषेत

लिहिला. लिहीताना मी त्यांच्या सेवेत होतो. अंतःस्फूर्तीने लिहीत असत. लिहीतेवेळी माझ्या आत कोणीतरी बसून सांगितल्या सारखे होते, असे अनेक वेळा माझ्या समोर उद्गार काढले. त्यांच्या सहवासांत सतत दोन वर्ष राहिल्यामुळे त्यांच्या योग-शक्तीचा अनुभव मला प्रत्यक्ष आला. गृहस्थ जीवनांत राहून देखील त्याग तपश्चर्या सोडली नाही. त्यांची त्रिकाल पूजा प्रारंभ होऊन ४५ वर्षे झाली अखंडपणे चालत आहे.

मानवधर्म प्रचार व प्रसाराच्या महान उद्देशाने चाकूर येथे "विश्वशांतिधाम" स्थापन केले आहे. त्यासाठी **श्री महादेव-स्वामी सरपंच, श्री राजलींग स्वामी** या उभयतानी भूमी दान दिली असून गावातील अनेक प्रतिष्ठित लोक या महान् कार्यांत सहभागी आहेत.

पू. महाराजांना मी त्यांच्या बालपणा पासून ओळखतो गुरुकुलातील सहवास त्यानंतरच्या काळात आलेल्या संबंधामुळे आणि **"मानव धर्म शास्त्र"** ग्रंथ मराठीभाषेत लिहिण्याचे वेळीं त्यांच्या सानिध्यात राहून सेवा करण्याचे भाग्य लाभल्याने मला महाराजाच्या उदात्त, धर्ममय जींवनातील तपःसामर्थ्य व दैवी गुण शक्तीचा अनेक भक्ताना आलेल्या फलस्वरूप अनुभवाच्या अनेक घटनाची माहिती आहे.

श्रीमान **त्रिंबकराव उर्फ बाबासाहेब पाटील** यानी या ग्रंथ मुद्रणासाठी उदार अंतःकरणाने धन सहाय्य करून धर्मक्षेत्रात कीर्ती संपादन केली असून चाकूर गावाचा गौरव वाढविला आहे त्यांच्या औदार्यामुळे मला साहित्य क्षेत्रांत स्थान मिळाले याबद्दल त्यांचे धन्यवाद

— संगय्या रामय्या स्वामी वकील, चाकूर

ग्रंथ परिचय -

"मानव धर्म शास्त्र" या ग्रंथाचे लेखक परम पूज्य श्री. सुरेश स्वामी महाराज यांचा व माझा परिचय १९४२ पासून असून आज पर्यंत माझ्यावर त्यांचे पुत्रवत प्रेम आहे. सतत ४५ वर्षा-पासून महाराज त्रिकाल पूजा करतात. त्या तपो बलावर त्यांनी "मानव धर्म शास्त्र" प्रथम कानडी भाषेत लिहिला कर्नाटक राज्यातील महाविद्यालयातून व ग्रंथालयातून या ग्रंथाची मागणी होऊ लागली तेव्हा मी व श्री मल्लिकार्जुन स्वामी उभ-यतानी मराठी भाषेत ग्रंथ लिहिण्याची विनंती केली. महा-राजानी ते मान्य करून तो ग्रंथ मराठी भाषेत लिहिला. त्याबद्दल आम्हांस अत्यानंद होतो. त्यांचे साहित्य"धर्म हे विज्ञान आहे.''या तत्त्वावर आधारित आहे वैज्ञानिक स्वरूपाचा हा वरील ग्रंथ केव्हा प्रकाशित होईल ही इच्छा होती ती आमची चिंता दूर झाली या विषयावरील त्यांचे व्यापक विवेचन सर्व मान-वाना मान्य होण्यासारखे आहे. या ग्रंथात जात-पात, मत पंथ, कुल, गोत्र या मर्यादित विचाराला स्थान नाही. महाराष्ट्रीयाना हा महान ग्रंथ भाग्यानेच लाभला आहे. पू. श्री. ष. ब्र. राचोटि शिवाचार्य महाराज मेहकर यानी हा ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल आम्ही त्याना अभिवंदन करतो.

श्रीमान त्रिंबकराव उर्फ बाबासाहेब पाटील चाकूर यानी आपल्या वडीलांच्या स्मरणार्थ एक हजार ग्रंथ मुद्रणाचा संपूर्ण खर्च देऊन अक्षय किर्ती मिळविली आहे.

लक्ष्मण विठ्ठलराव तेलंग, चाकूर

-00-

।। ॐ पूर्णाय नमः ।।

मानव धर्मशास्त्र

धर्माचे प्रयोजन

.... गुरु स्तोत्र ....

न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः ।
तस्मात् परतरं नास्ति तस्मै श्री गुरवे नमः ।।
ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोःपदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मुक्तिमूलं गुरोःकृपा ।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्रुद्रश्च ईश्वरः ।
गुरुःसर्वं गुरुःसत्वं गुरुरेऽव परंशिवः ।।
पंचानन मुखोद्भूतान् पंचाक्षरमनूपमान् ।
पंचब्रह्म मयान्नौमी पंचाचार्यान् जगद्गुरून् ।।

– पितृ वंश वर्णन –

(आर्या)

जे गुरुवंश संभूत सात्वीक रुद्रेश्वर प्रपितामहा ।
सु कुलजा पतिनिष्ठ जी, नागांबिकादेवी प्रमातामहा ।।१।।
श्री गुरुपादस्वामी पितामहा माझे महाज्ञानी ।
पार्वतीमातामहा पतिव्रता सत्शीला सद्गुणी ।।२।।

द्वीकाल पूजानिष्ठ मत्पितृदेव रेवणसिद्ध स्वामी ।
गुरुदेवी महासाध्वी, माता मदीया धर्मानुगामी ।।३।।
ज्ञानपिता बन्हट्टी सालीमठ श्री सिद्धवीर स्वामी ।
पाजुनिया ज्ञानामृत केलेधन्य स्मरतो निरंतर मी ।।४।।
या मानव धर्मशास्त्र ग्रंथारंभी अनन्य भक्तीने ।।
करितो वंदन सुरेश हिरेमठ गोरटेकर विनयाने ।।५।।



- धर्म -

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपोध्यानमिति धर्मस्य संग्रहः ।।

(सिद्धांत शिखामणि धर्माचार स्थल)

"धर्म" हा स्वाभाविक असून अनादि कालापासून स्वयंसिद्ध आहे. जड व चेतन अनंत ब्रह्मांड ज्या वस्तूत सृष्टी, स्थिती, लय, निग्रह आणि अनुग्रह ह्या पाच नियमात वर्तन करीत आहेत, त्यांना आधारभूत असलेल्या महद् वस्तूला धर्म असे म्हणतात.

"धर्म" शद्वाचा व्याकरण शास्त्राच्या नियमानुसार विचार केला असता "धृञ्"-(धारण करणें)या धातूच्या पुढे 'मन्' प्रत्यय लागल्याने तीन प्रकारे त्याची उत्पत्ती होते."ध्रीयते लोकः अनेन इति धर्मः"

ज्या वस्तू पासून अनंत लोक धारण केले गेलें आहेत तो धर्म आहे. "धरति धारयति वा लोकं इति धर्मः" जी वस्तू आनंत लोक धारण करीत आहे तो धर्म आहे. "ध्रीयते यः सधर्मः" ज्या वस्तूने अनंत लोक धारण केले जातात तो धर्म आहे.

भूत वर्तमान व भविष्य या त्रिकाली धर्म समस्त वस्तूना धारण करीत असल्यामुळे धारण करण्याची क्रिया त्यांत नित्य आहे असा अर्थ होतो. धारण वस्तूच्या सानिध्यात धारणीय वस्तू अखंड आहे म्हणून धारण वस्तू एक असल्याचे प्रत्यास येते. धारणरूप धर्म समष्टी रूपांत (व्यापक) असून त्यात धारणीय वस्तू व्यष्टी रूपाने (एकदेशी) दिसून येतें. उदा – माता शिशूला नव मास आपल्या गर्भात धारण करीते. ते शिशू जन्म पावल्यानंतर त्याच्या संगोपनार्थं सर्वतोपरीने आपल्या भावनेत धारण करते. शिशूचे अहार, विहार, निद्रा, मल मूत्रादिक सर्व क्रियासंबंधी अहोरात्र अविश्रांत रीतीने धारण करीत असते. शिशूच्या अंगी डोळे, कान, हात, पाय इत्यादि ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रिय पूर्ण विकास पावले नसले तरी त्याच्या रोदन क्रियेवरून त्याला एका वस्तूची अपेक्षा आहे असे दिसून येते. आईच्या धारण मात्रेने ते तात्काळ प्रशांत होते. या वरून शिशू ही आईला केवळ भावनेत धारण करीत आहे असा बोध होतो. परंतू आईने त्या शिशूला भाव, मन, कायाने परिपूर्ण धारण केले आहे. धारणाद्धर्ममित्याहूर्धर्मोधारयते प्रजाः ।

यत्स्या धारण संयुक्तं सधर्म इति निश्चयः ॥

(महाभारत कर्ण पर्व ६९–५८)

धारण क्रिया असल्यामुळे त्याला धर्म म्हणून सांगितले आहे. "धर्म" हा प्रजेला धारण करीत आहे. जी वस्तू धारणीय वस्तूसह असते. तोच धर्म आहे असे ह्या वाक्यावरून स्पष्ट होते. धर्माने अनंत ब्रह्मांडाला धारण केले आहे. आकाशांत दिसून येणारे सूर्य चंद्रादि ग्रह, नक्षत्र, ते सर्व एकेक लोक आहेत. आम्ही त्या लोकाना निरीक्षण केल्यास ते तेजोमय लहान रूपात दिसून येतात. त्या लोकातील मानवांनी आमच्या लोकास निरीक्षण केल्यास हा लोक देखील प्रकाशमय लहान रूपाने दिसतो. आमच्या चर्म चक्षूला गोचर होणारे अनंत तारागणादि सर्वग्रह मृत्युलोक म्हणून संबोधिले जातात. जगांतील प्रत्येक वस्तूचे नित्य परिवर्तन होत असल्या कारणाने ह्यांची मृत्युलोकांत गणना केली जाते. आमच्या ह्या मृत्यु लोकात जड व चेतन दोन प्रकारच्या वस्तू आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, वनस्पत्यादिका—मध्ये ज्ञान शक्ती अत्यंत गूढ म्हणजे सुषुप्तावस्थेत असल्यामुळे ते सर्व जड आहेत. या जड वस्तूंच्या ठिकाणी ज्ञानशक्ती अ प्रगट असल्या मुळे धर्म वस्तूच्या बरोवर असला तरी त्यांना प्रतिक्रिया रूपाने धर्माला धारण करणे साध्य नाही.

पशु, पक्षी, कृमी व कीटकात ज्ञान शक्ती सामान्य पणे असून मानवामध्ये विशेष असल्याचे प्रत्यक्ष अनुभवास येते. चेतनात्मक पशु पक्षामध्ये ज्ञान शक्तीचा अनुभव येत असला तरी एका क्रियेला प्रतिक्रिया स्वरूपाने विचार करण्याची शक्ती त्याच्या मनाला नाही. त्या पशूच्या स्वामीने अन्न पाणी समोर ठेवल्यास तो खातो पीतो आणि त्याला बांधून टाकलेल्या पाशाच्या अवकाशा मध्येच खाणे पीणें साध्य आहे. तहान भूक लागल्या

वेळीच अन्न पाण्याचे स्मरण होते. संतृप्त झाल्यानंतर कितीही खाद्य पदार्थ समोर असले तरी त्या वस्तूंची अपेक्षा करीत नाही. त्याच्या मनाला पुनः पाहिजे असे आठवत नाही. श्रम करीत असताना प्रत्यक्ष कामाचे स्मरण होते. या पूर्वी मी किती ओझे वाहिले या पुढे किती वाहवयाचे आहे आणि सध्या किती आहे याची जाणीव त्यास नाही. म्हणजे भूत भविष्य वर्तमानाची काल गणना त्याच्या मनाला स्मरत नाही. त्याच्या मालकाने हातातील काठी वर केल्यास माराच्या भितीने पळून जातो. अग्नि पाहून घावरून पळून जातो. व्याघ्र, सिंह, सर्पादिक हिंस्र प्राण्यांच्या भितीने पळून जातो. यावरून पशूलाही मरणाची भिती असल्याचे प्रत्यक्ष दिसून येते. अहार, निद्रा, भय, मैथून ह्यासर्व क्रिया स्वप्नावस्थेत अनुभवित असल्यामुळे पशु पक्षांना असलेल्या परिस्थितीपेक्षा उन्नतावस्थेला जाणे साध्यनाही. या सामान्य ज्ञान मूलक धारणरूप धर्माच्या सह असला तरी प्रतिक्रिया रूपाने धर्माला धारण करण्यास ते पशू असमर्थ आहेत.

चैतन्य सृष्टीतील मानवाला विशेष ज्ञान आहे. "मानव" ह्या शद्बाचा विचार केला असता मन = मंथन करणे म्हणजे त्याच्या मनाला सदैव विचार वृत्तीचे मंथन करण्याची क्रिया असल्याचे दिसून येते. मानवाच्या मनात इच्छा,ज्ञान क्रिया ह्या शक्ती प्रगट असल्यामुळे एका क्रियेला प्रतिक्रिया रूपाने विचार करण्याची विशेष शक्तीआहे म्हणून "मानव" हे नांव अन्वर्थकरूपाने शोभत आहे. मानव आपले जीवन क्रमेण अधिकाधिक उज्वल करण्याच्या कामी पात्र आहे. जीवनोपयोगी अवश्यक वस्तू प्राप्त करण्याची ज्ञानशक्ती त्याला असल्यामुळे मानव प्रकृतीच्या स्वाभाविकतेवर अवलंबून न रहाता आपल्य

कर्तृत्व बलाचा उपयोग करीत असतो. शरीर संरक्षणासाठी अन्न, जल, वस्त्र ह्या वस्तू अनिवार्य अवश्यक आहेत.

जगात प्रथमतः प्रकृतीने खाद्य धान्य निर्माण केले आहे. मानवाने आपल्या कर्तृत्व बलाने कृषिशास्त्राचा आविष्कार करून विपुल अन्नधान्य उत्पादन करण्यास प्रारंभ केला आणि ते धान्य मूल रूपात उपयोग न करीता दळणे, कांडणे, कुटणे, पाक बनविणे इत्यादी क्रियेद्वारा विविध प्रकारच्या कर्तृत्व शक्तीचा उपयोग करुन त्या वस्तूंचा उपभोग घेत असतो. शरीर संरक्षणासाठी वस्त्र अवश्यक असून कापूस मूल स्वाभाविक रूपांत उपयोग होत नाही असे समजून त्या कापसाचे रुई, तंतू, वस्त्र आदि निर्माण करण्याचा क्रम संशोधन करून नानाविध वस्त्रांचा उपभोग घेत असतो. जीवन रक्षणासाठी पाण्याची अवश्यकता वाटून वर्षाकालातील त्या स्वाभाविक जलाचा उपयोग सदासर्वकाल होणार नाही असे समजून तळी, विहीरी निर्माण केल्या. स्नान पाना करीता त्या जलाशयाचा उपयोग स्वाभाविकपणे होत नाही असे जाणून लहान मोठी पात्रे निर्माण केली. पृथ्वी, आप, तेज, वायू ही तत्त्वे मूल स्वाभाविक अवस्थेत आपल्याला उपयोगी होणार नाहीत असे जाणून ह्या जड–भूतपदार्थावर आपल्यातील ज्ञान शक्तींचा उपयोग करून रेल्वे, मोटार, आकाशयान्, जलयान्, टेलीफोन, मायक्रोफोन् तारायंत्र, रेडिओ, टेलीव्हिजन आणि अणु परमाणूंचे संशोधन करून शरीर संरक्षणासाठी अनेक प्रकारच्या उपभोग वस्तू निर्माण केल्या.

सारांश – मानवाला इच्छा, ज्ञान, क्रिया या शक्तींच्या

आधारे प्रकृतीच्या मूल एका क्रियेला प्रति क्रिया स्वरूपात उपयोग करण्याचे सामर्थ्य स्वाभाविक आहे. या वरून सर्व प्राण्यापेक्षा मानव हा विशेष ज्ञानाने अग्रेसर आहे. धारण रूप धर्मासह असून त्या धर्माला प्रतिक्रिया रूपाने धारण करण्याचे सामर्थ्य मानवातच आहे. या कारणास्तव मानवाला धर्म पाहिजे असे सिद्ध होते.

– मानवाला धर्म का पाहिजे –

मानवाच्या अंगी इच्छा शक्ती प्रबल असल्यामुळे तो आई, बाप, बंधू, भगिनी, मित्र, पति, पत्नी, पुत्र, पौत्र, आयुष्य आरोग्य, विद्या बुद्ध्यादि सकल भोग वस्तू आणि धन, धान्य, वस्त्र, सुवर्ण, रजत, गो, अश्व, गृह, भूमी आदि उपभोग वस्तू पाहिजेत म्हणून अखंड अपेक्षा करीत असतो. या शिवाय दारिद्र्य दुःख, रोग, चिंता, भय, पीडा, अपमान ही सर्व नको वाटतात. आपण कधीही मरूनये ही ईच्छा बाळगून अमर होऊन रहावे अशी अंतिम अपेक्षा करतो. पाहिजे व नको ह्या दोन अपेक्षेमध्ये जी वस्तू अंतर्भूत वसलेली आहे तीलाच सुख असे म्हणतात. खाणे पीणे, पहाणे, ऐकणे, स्पर्शकरणे, वासघेणे, चालणे, बसणे, उठणे, झोपणे, श्वास घेणे, सोडणे, बोलणे आदि अशा भोगोपभोग सर्व क्रियामध्ये मानव सुखाचीच अपेक्षा बाळगून अंतिम लक्ष ठेऊन जगत आहे. सुख पाहिजे ह्या अपेक्षेमध्ये त्या भोग वस्तूंचा अभाव असल्याचा अनुभव येतो. या अभाव प्रतीतीमुळे त्या भोग-पदार्थांच्या प्राप्तीसाठी इच्छा, ज्ञान, क्रिया प्रगट होऊन आपल्यातील कर्तृत्व शक्तीचा उपयोग करीत असतों. परंतू कर्तृत्व शक्तीच्या उपयोगासाठी त्याला एका विशेष क्षेत्राची अवश्यकता आहे. ज्या प्रमाणे गहू, ज्वारी आदी खाद्य धान्य उत्पादनासाठी

भूमी ही आधारभूत झालेली आहे. त्याप्रमाणे अनेक सुख-पदार्थांचा विकास करण्यासाठी जी वस्तू आधारभूत आहे त्या महद्वस्तूला धर्म असे म्हणतात.

मानवाला सुखाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. ते सुख भोगोपभोग वस्तूंच्या योगानें अनुभवास येते. भोगोपभोग वस्तू प्रत्यक्ष कार्य रूपांत अनुभवास येत असली तरी ह्या कार्याला कारण रूप एक वस्तू अवश्यक आहे. ती असल्या शिवाय कार्य संभवत नाही. कार्यरूप घटाला ज्याप्रमाणे मृतिका (माती) कारण रूप झाली आहे त्याप्रमाणे समस्त भोगोपभोग सुख वस्तूना धर्मच मूल कारण आहे.

"सुखस्यमूलंधर्मः" (चाणक्य सूत्र २ अध्याय १)
या वरून मानवाला धर्म का पाहिजे व त्यांचे प्रयोजन काय आहे हे सिद्ध होते.

– धर्माचे अस्तित्त्व केव्हा पासून –

ह्या चराचर विश्वाच्या उदयासह मानवाचा उदय झालेला आहे. जगाच्या उदयास्त क्रियेला धर्मानेच धारण केले आहे. मानवाचा जन्म झाल्यापासून धर्माचा अनुभव त्याला आलेला आहे. धर्म हा स्वभावसिद्ध असल्यामुळे त्याला कोणी निर्मिले नाही स्थापिले नाही. ज्याप्रमाणे ऊस व त्यातील गोडी दोन्ही एकदाच उदय पावले आहेत त्याप्रमाणे धर्मासह मानवाचा उदय एकदाच झाला आहे.

आमच्या ह्या जगाच्या अस्तित्वाचा विचार केला असता धर्म संस्कृतीच्या नित्य नैमित्तिक पूजा संध्यादि पुण्यकर्मात व विवाहादी मंगल कार्यात संकल्प सांगण्याची प्रथा प्राचीन काला पासून आलेली आहे.

सृष्टी संवत्सर संकल्प मंत्र

ॐ परशिव पंच ब्रह्म सदाशिवाज्ञया वर्तमानस्य अद्य ब्रह्मणः द्वितीय परार्धे श्वेत वराह कल्पे वैवश्वत मन्वंतरे अष्टाविंशतितमे कलियुगे प्रथम पादे भारत देशे अस्मिन् ( ) ग्रामे, अस्मिन् ( ) गृहे, अस्मिन् ( ) संवत्सरे, अस्मिन ( ) अयनें, ऋतौ, मासे, पक्षे, वारे, तिथौं अमुक) गोत्रोत्पन्नोऽहं इत्यादि.

ह्या संकल्पमंत्रात देश, काल, व गोत्र, हे तीन प्रामुख्याने सांगितले आहेत. जन्म काल, जन्म भूमी, कोणत्या गोत्रात जन्म पावला, हा विषय प्रत्येकाला अवश्यक आहे.

ह्या जगाच्या उत्पत्ती कालाचा विचार करणे अगत्याचे आहे. कृता, त्रेता, द्वापार कलि. ही चारी युगे मिळून एक महायुग होते. असली महायुगे एकाहात्तर मिळून

एक मन्वंतर होते. असले मन्वंतर चवदा आहेत. ते असे. स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुस, वैवश्वत, सावर्णिक, दक्षसावर्णिक ब्रह्मसावर्णिक, धर्मसावर्णिक, रुद्रसावर्णिक, देवसावर्णिक, इंद्रसावर्णिक, ह्या चवदा मन्वंतराची परिसमाप्ती होणें म्हणजे आमच्या ह्या जगाचे आयुष्य समाप्त होणे होय. 卐

प्रथमतः पाश्चिमात्य लोकांनी ह्या सृष्टीचा आरंभ होऊन केवळ पाच हजार (५०००) वर्षें झाली आहेत म्हणून " आर्यविशप उशर्का " यांचा अभिप्राय आहे. दुसरे इसाई

卐 – चार यूगाचे मानूष वर्षं –

युग नाम	संख्या	नियतकाल	सध्यांश	सर्वयोग
कृता युग	१४४०००+	१४४०००० +	१४४०००	=१७२८०००
त्रेता युग	१०८०००+	१०८०००० +	१०८०.०	=१२९६०००
द्वापार युग	७२०००+	७२०००० +	७२०००	= ८६४०००
कली युग	३६०००+	३६०००० +	३६०००	= ४३२०००

चारी युगाचे एकूण वर्षं ४३,२०,०००

संक्षेप रीतीनें सांगण्यांत येते की. ४,३२,००० हे कली युगाचे वर्षं होतात, या कलियुगाचे दोन पटीने द्वापार युग, कलियुगाचे तीन पटीने त्रेतायुग, कलि युगाचे चार पटीनें

लोकानी सृष्टचारंभ होऊन सहा हजार नऊशे चौऱ्याऐंशी (६९८४) वर्षं मानिले आहे. कांही पाश्चात्य लोकानी ग्रह नक्षत्राच्या उष्णतेच्या परिमाणा वरुन जगाची उत्पत्ती चाळीस लक्ष वर्षं (४००००००) मानिले आहे. भूगर्भ विशारद लोकानी ह्या पृथ्वीचे आयुष्य दहा कोटी

कृतायुग ह्या प्रकारे चतुर्यूगाचे ४३,२०,००० वर्षं होतात. वरील चारी युगे मिळून एक महायूग होते. असले महायुगे (७१) एकात्तर संपवून गेल्यास १ मन्वंतर होते एकामन्वंतराचे ३०,६७,२०,००० वर्ष होतात. एका कल्पा मध्ये (१४ चवदा मन्वंतर होतात. त्यांचे एकूण वर्षं ४,२९,४०,८० ००० होतात आणि सूर्यं सिद्धांतानुसार (१/१९) पद्य) त्याचें पंधरा (१५) संध्याकाल असतात.

त्याची एकूण संख्या २,५९,२०,००० वर्षं होतात

४,२९, ४०,८०,०००	चवदा मन्वतराचे एकूण वर्ष
२, ५९,२०,०००	पंधरा संध्याकालचे एकूण वर्ष
४,३२, ०००००००	सर्वं मिळून एक कल्प म्हणजे

ब्रम्हदेवाचां एक दिवस होतो, ह्या कल्प संख्येला मानुष्य वर्षांनुसार चार आब्ज बत्तीस कोटी वर्षं होतात अर्थात् आमच्या जगाचे आयुष्य समाप्त होते.

जगाचे भुक्त वर्ष (शके १९०१ इ. सन १९७८–७९)

सहा मन्वंतरचे वर्ष	१,८४,०३, २०,०००
सात संधीकाल वर्ष	००१,२०, ९६,०००
सत्तावीस युगाचे वर्ष	०११,६६, ४० ०००
कृत, त्रेता, द्वापारचे वर्ष	०००,३८, ८८,०००
कलियुगाचे	०००००, ०५,०८०
	१,९७,२९,४९,०८०

(१०००००००००) वर्षांचे मानिले आहे, "प्रोफेसर ज्योलिन" यानी समुद्र जलांतील लवणाचे कटुत्वांशाची परिक्षा करुन समुद्र दहा कोटी (१०,००,००,०००) वर्षांनें वहात आहे. म्हणून अभिप्राय दिला आहे. "प्रोफेसर एस् न्यू कोंब" यानी ही सृष्टी एक कोटी वर्ष पूर्वीची आहे म्हणून मानिले आहे.

(पाप्युल्लर अईष्ट्रा नमी पृष्ट ५०९)

— जगाचे भोग्य वर्षं —

सात मन्वंतराचे वर्षं	२,१४,७०, ४०,०००
आठ संधीकालाचे वर्षं	००१३८ २४०००
त्रेचाळीस महायुगाचे वर्षं	०१८,५७, ६०,०००
कलीयुग शेष वर्षं	४ २६९२०
	२,३४,७०, ५०,९२०
जगाचे भुक्त वर्षं	१,९७,२९, ४९,०८०
जगाचे भोग्य वर्षं	२,३४,७०, ५०,९२०
एकूण जगाचे आयुर्वर्षं	४,३२,००, ०००००

चार आब्ज बत्तीस कोटी वर्षं होतात.

प्रोफेसर हिलनार यानी सृष्टयारंभ २ कोटी वर्षाचा आहे असा अभिप्राय दिला आहे.

(सिक्रेट डाक्ट्रीन भाग ३ पृष्ट ६९४)

भारतीय व विदेशीय वर्तमान वर्ष

कल्पाब्द -	१,९७,२९,४९,०७९	हिजरी सन	१,३९८
सृष्टी संवत-	१,९५.५८,८५,०७९	जावा सन	१,९०४
वामन संवत	१,९६,०८,८९,०७९	इसाई	१,९७९
श्रीराम संवत	१,२५,६९ ०७९	पार्थियन इसवी	२,२२५
श्रीकृष्ण संवत	५,२०४	मलयकेतू ॥	२,२९०
युधिष्टिर संवत	५,०७९	ब्रह्मा ॥	२.५१७
बौद्ध संवत	२.२५३	रोमन ॥	२,७२९
महाविर जैन ॥	२,५०५	युनानी ॥	३,५५१
श्रीशंकराचार्य ॥	२,२५८	मुसा ॥	३,६८२
विक्रम सवत ॥	२,०३५	इब्राहिम	४,४१९
शालिवाहान ॥	१ ९०१	यहुदी ॥	५,५३९
कलचुरी	१,७३०	इरानी ॥	५,९८१
वलभी ॥	१,६५८	आदम ॥	७,३३०
फसली ॥	१,३८९	तुर्की ॥	७,५८७
बँगला ॥	१,३८५	मिस्त्री ॥	२७,६३०
हर्षाब्द ॥	१,३७१	पारसी ॥	१,८९,९४७
		खताई ॥	८,८८,३८,३४९
		चीनी ॥	९,६०,०२,२७९

प्रोफेसर काल महाशयांनी ७ सात कोटी वर्षं पूर्वीचे आहे. म्हणून मान्य केले आहे (क्लाईमेंट इन टाईम पृष्ट ३३५) चीनी निवासी वैज्ञानिकांनी सृष्ट्यारंभ ९, ६०, ०२, ४२३ वर्षापूर्वींचे मानिला आहे. सर विलियम्‌रामसन् यांनी दहा कोटी वर्ष पूर्वी असल्याचे मान्य केले आहे. (सिक्रेटडॉक्ट्रीन भाग २ पृष्ट ६९४) प्रसिद्ध अस्थीतत्ववेत्ता डॉ. विलियम आणि डाँ, स्मिथ् अॅडवर्ड आदी थोर लोकानी पृथ्वीतील उष्ण-तेची परीक्षा करुन तीचे आयुष्य दहा कोटी वर्ष असल्याचे मान्य केले आहेत. युरे नियम, हिलियम् बोलो नियम आदि धातू परिक्षक वैज्ञानिकांनी चोवीस कोटी ते तीस कोटी वर्षापूर्वी असल्याचे मान्य केले आहेत. प्रोफेसर निषचाप यानी सृष्टचारंभ पस्तीस कोटी वर्षं पूर्वीचे मानिले आहे. (सिक्रेट डॉक्ट्रीन पृष्ट ६९४) प्रोफेसर रेड यानी सृष्टचारंभ पन्नास कोटी वर्षाचा मानिला आहे: प्रोफेसर हक्सल यानी सृष्टचारंभ एक आब्ज वर्षं पूर्वीचा आहे असे मानिले आहे: (वर्ल्ड लॉइफ पृष्ट १८७) आणि कांही वैज्ञानिकानी एक आब्ज साठ कोटि वर्षं पूर्वीचा म.निले आहेत.

आमच्या ह्या जगाचा भूत कालाचा आयुर्निर्णय विदेशांतील भौतिक वैज्ञनिकानी कांही लोक पाणी, कांही लोक माती, कांही लोक अस्थिची परीक्षा करुन जाणीले आहेत. आणि विदेशांत चालू असलेल्या अनेक इसवी सनांच्या काल गणने वरुन पाच हजार ते एक आब्ज पर्गंत त्यांचा अखेरचा निर्णय होतो. विदेशीय वैज्ञानिक साहित्याचा

विचार केला असता जगदुत्पत्तीच्या भूत कालाचा निर्णय होतो. मात्र भविष्य कालाचा आयुनिर्णय त्यांनी सांगितला नाही. आमच्या भारतातील प्राचीन ऋषि, मुनी, आचार्यांनि आधि भौतिक आधिदैविक विज्ञानाने संशोधन करुन सृष्टी संवत्सर संकल्पामध्ये ह्या जगाची उत्पत्ती होऊन १,९७,२९,४९,०८०) एक आब्ज सत्याणव कोटी येकोण-तीसलक्ष यकोणपन्नास हजार ऐंशी वर्षे झाली असून या पूढे (२,३४,७०,५०,९२०) दोन आब्ज चवतीस कोटी सत्तर लक्ष पन्नास हजार नऊशे वीस वर्षे जगणार आहे, असा भविष्य कालाचा आयुर्निर्णय सांगितला आहे.

सारांश आमच्या भारतीय लोकांनी जगाचा भूत व भविष्य या दोन्ही कालाचा आयुर्निर्णय सांगितला ही सर्व सामान्य गोष्ट नव्हे, ह्या सृष्टी संवत्सराच्या संकल्पा वरुन आमच्या या जगाचा काल निर्णय केलेला आहे.

जगाच्या उत्पत्ती काला पासून जगाचा घटक असलेल्या मानवाचा वंश सूत्र अव्याहत पणें वहात आलेंला आहे, वंशाच्या मूल पित्याला गोत्र पुरुष म्हणतात. जगत् पिता पंचमुखी पंचब्रह्म सदाशिवाचे मानस पुत्र वीर, नंदी, भृंगी, वृषभ, स्कंद व मखारी, कालारी, पुरारी, वेदांरी, स्मरारी असे अनेंक गोत्र पुरुष आहेत. हे सर्व गण गोत्र पुरुष आहेत. ब्रह्मदेवाचे मानस पुत्र सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार, हे चार, कश्यप, अत्री, वसिष्ठ, विश्वामित्र, जमदग्नी. गौतम

भारद्वाजआदी अनेक ऋषि गोत्र पुरुष आहेत. वर वर्णन केलेल्या गोत्र पुरुषांचा वंश आज पर्यंत अविच्छन्न पणें चालत असलेला आहे. मानवाचे वंश सूत्र अव्याहात पणें चालत आल्याचे हा सृष्टी संवत्सर संकल्पच महत् प्रमाण साक्षीभूत आहे. दान, पुजा, जप, संध्या होमादिक नित्य पुण्य कर्माच्या वेळी व उपनयन, दीक्षा, विवाहादि नैमित्तिक मंगल कार्याच्या वेळी वंशाच्या मूल पित्याचे म्हणजे गोत्र पुरुषांचे नांव सांगण्यात येंते. वर्तमान काली कर्म योग प्रपंच्यात शेत, घर, गाई, बैल घोडा, धन धान्य आदी अनेक वस्तूंच्या देण्या घेण्याच्या व्यवहारा मध्येप्रत्यक्ष जन्मदात्या पित्याचे नाव लिहीण्यात येंते, अर्थात धर्म सरकारने गोत्र पुरुष म्हणजे वंशाच्या मूल पुरुषांच्या नावाला मान्य केले आहे. आणि राष्ट्र सरकारने प्रत्यक्ष जन्मदात्या पित्याच्या नावाला मान्य केले आहे. आता पर्यंत गोत्राचा विचार विमर्श करण्यांत आला यापुढे देशाचा विचार विमर्श करणें अत्यावश्यक आहे.

आमचे हे विशाल जग एशीया, यूरोप, अष्ट्रेलिया आफ्रिका, उत्तर अमेरिका, आणि दक्षिण अमेरिका अशा सहा खंडात विभागले आहें. त्या मध्ये आमचा एशीया खंड त्याच्या अंतर्गत आमचा भारत देश आहे. यात अनेक राज्य आहेत. त्यात आमचे एक राज्य, अनेंक जिल्ह्या मध्ये आमचा एक जिल्हा, अनेक ग्रामा मध्ये आमचे एक ग्राम त्या ग्रामा मध्ये आमचे एक घर. त्या घरा मध्ये आई, बाप

बंधू, भगिनी, नवरा, बायको, मुले, पशु, पक्षी, कृमी इत्यादि अनेक जीवराशी सर्व त्या घराला माझे घर, माझे घर, या भावनेतच वर्तन करीत आहेत. त्यात तुझ्या हिस्याला तें घर किती येईल? या प्रश्नाचे उत्तर इतकेच म्हणून निर्दिष्टपणें सांगता येणार नाही. आमचे हे जग अगणित काल प्रवाहातून वहात आले आहे. या जगाचा घटक असलेल्या मानवाचे वंश सूत्र तेंव्हा पासून चालत आले आहे. आमच्या ह्या जगाची उत्पत्ती होऊन (१,९७,२९,४९,०८०) एक अब्ज सत्याणव कोटी येकोणतीस लक्ष येकूणपन्नास हजार ऐंशी वर्षं झाली. तुला शंभर वर्षं आयुष्य, ह्या विशाल काल प्रवाहांत तू किती वेळा मेलास व जन्मला आहेस, तुझ्या भोगोपभोग वस्तू किती वेळा बदल झाले असावेत तुझे वंश सूत्र किती काला पासून चालत आलेला आहे? तुझे आई, बाप किती जण झाले असावेत. अशा ह्या सर्व नित्य अनित्य वस्तूचा विचार करता तुझ्या जन्म पत्रिकेला आणि जगांच्या जन्म पत्रिकेला परिशीलन करुन पहा. "**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान्निबोधत**" म्हणजे उठा, जागे व्हा, आचार्या कडून ज्ञानांमृत संपादन करुन अमर व्हा या साठी "**देश, काल, गोत्रम् संकीर्त्य**" म्हणून हे सृष्टी संवत्सर संकल्प सांगण्यांची धर्माज्ञा आहे. धर्माचे अस्तित्व केव्हा पासून ह्या प्रश्नाला "जगदादि काला पासून" हे उत्तर आहे.

- आस्तिक वाद -

ह्या जगाच्या अस्तित्वाची कल्पना आदी आहे. जगांतील सर्व वस्तू गोचर होण्या पूर्वी त्या सर्व कोणत्याही एका वस्तू मध्ये अति सूक्ष्म अवस्थेत आश्रय करुन राहिल्या असाव्यात, असे अनुभवास येते. कार्य रूपाने दिसून येणारे हे जग कारण रूपाने निसर्ग सिद्ध आहे. या जगाचे कार्य कारण रूप क्रियेला आधारभूत असलेली एक महद्-वस्तू आहे. असे सिद्ध होते.

पृथ्वीवर बीज पडून अंकुर फुटून वृक्ष होतात. प्रथम फूल येऊन नंतर त्याला फळे येतात. निंबाच्या बीजानें अंबा कधीही उत्पन्न होऊ शकत नाही. गहू पेरून ज्वारी कोणी पिकवणार नाही त्या त्या बीजा पासून तीतीच झाडे उत्पन्न होतात. सर्व वनस्पतीची उत्पत्ती व विकार होण्याच्या या नियमित क्रिये मध्ये साऱ्या वनस्पतीवर शासन करणारी एक गूढ आधारभूत महद्वस्तू असल्याचे दिसून येते.

भूगोला संबंधी विचार केला असता पर्वत कसे उत्पन्न होतात, नद्या पर्वता पासून कशा उगम पावतात त्या सर्व एका विशिष्ट दिशेलाच का वाहव्यात, अशा नियमित विविध क्रिये मध्ये प्रच्छन्न रूप आधार भूत एक महद्वस्तू असल्याचे स्पष्ट होते.

खगोल शास्त्र दृष्टया परिशीलन केले असता सूर्य चंद्र नक्षत्रादि सर्व ग्रह एका विशिष्ट नियमाला अनुसरून आकांशात भ्रमण करीत असतात.प्रति दिन निश्चित कालीच सूर्य चंद्राचा उदयास्त होतो. सूर्य गोल आमच्या पृथ्वी पासून नऊ कोटी तीस लक्ष मैल अंतरावर असल्याचे भूत-शास्त्र प्रतिपादन करित आहे. हे सूर्य गोल दोन कोटी मैल खाली पृथ्वी जवळ आल्यास जग उध्वस्त होईल अथवा असलेल्या स्थाना पासून दोन कोटी मैल वर गेल्यास जगातील सर्व प्राण्यानां जीवनावश्यक उष्णता कमी पडून जग नाश पावेल.

पावसाळा, हिवाळा, उन्हाळा, हे तीन्ही काल आपल्या नियमानुसार निश्चित समयाला उदय पावतात. त्यात विशेषतः प्रकृती मध्ये अति वृष्टी, अनावृष्टी, अकाल-वृष्टी, विषवृष्टी न होता प्रकृती सुवृष्टी रूपानें रक्षण करिते. अतिहिम, अहिम न होता सुहिम होऊन रक्षण करते. अति ग्रीष्म, अग्रीष्म न होता सुग्रीष्म होऊन जगाचे संरक्षण करीत आहे. अशा प्रकारे पृथिव्यादि पंच तत्वे, सूर्य, चंद्र नक्षत्रादि ग्रह, वर्षादि काल, नदी, सागर जलाशय ह्या सर्वा मध्ये ज्ञान शक्ती प्रत्यक्ष दिसून येत नसली तरी त्या सर्वा मध्ये एक नियम बद्धता निरंतर दिसून येते. या-वरून एक नियामक शक्ती आहे असे सिद्ध होते.

मानवाच्या शरीरा मध्ये कांही क्रिया अव्याहत पणें चालत आहेत. त्यांच्या संबंधी आम्ही अज्ञात अवस्थेत

आहोत. हृदयस्पंदन, रक्तप्रवाह, स्नायूचलन, अन्नपाचन, नेत्रस्पंदन, स्वासोछ्वास या सर्व क्रिया आपापल्या स्वभावा नुसार एका विशीष्ट नियमाला अनुसरुन अव्याहत पणें चालत असतात. या वरून जड चेतन समस्त वस्तूंच्या ठिकाणी गुप्त रीत्या नियंत्रण करणारी महान् शक्तीशाली एक महद्वस्तू अखंडपणे आहे म्हणून सिद्ध होते.

मानवास मी देही आहे म्हणून आपल्या जड शरीराचे अस्तित्वाची कल्पना करीत असल्या वेळी आपल्याहून वेगळचा असलेल्या विशाल जगाची कल्पना त्याला असते. आणि आपल्या शरीराच्या खाली, वर, आत, बाहेर, सभोवती व्यापून असलेल्या अगणित आकाश तत्वाच्या अनुभवाने गणित रूपी आपल्या शरीराची जाणीव होते. मी, आहे, या भावनेत त्याला आपल्याहून वेगळी असणाऱ्या प्रकृतीचा अनुभव येतो. माझे घर या भावनेंत दूसऱ्या घराची कल्पना त्याला आहे. माझे शेत या भावनेंत दूसऱ्या एका शेताची कल्पना आहे. प्रत्येक कार्यात माझे व माझ्याहून वेगळी म्हणून सदैव दोन पदांची तो सिद्धता करतो. मी आहे, ही भावना याला का उत्पन्न झाली असावी? अनंत वस्तूंच्या योगाने आपल्या अस्तित्वाचे विस्मरण होईल ह्या भीतीने "मी" "मी" ही भावना खाणे, पिणे, देणे, घेणे सर्व क्रिया मध्ये सदा आपल्या अस्तित्वाची कल्पना करते वेळी आणखी एका विशाल वस्तूच्या अंतर्भूत माझे अस्तित्व आहे असा अनुभव करतो.

मी व माझे मन, माझी बुद्धी, या भावनेत मन बुद्ध्यादिका पेक्षा विशाल ज्ञान कण असल्याचे प्रत्यक्ष आहे. मी किंचिज्ञ किंचीत् कर्तृ एक देशी आहो हे प्रत्यक्ष आहे. किंचिज्ञाला सर्व ज्ञत्वाची किंचित् कर्तृला सर्व कर्तृत्वाची एक देशीला सर्व देशित्वाची कल्पना तो अंतरंगात सदाअनुभवित असतो उदा:– स्त्री, पुरुष, पतिपत्नी, पिता पुत्र, राजा रंक, गुरु शिष्य, स्वामी सेवक, ही सर्व पदे परस्पर सापेक्ष भावनेत आहेत शेवटी " **मानव** " या व्यापक पदा मध्ये ऐक्य पावतात. या प्रमाणें किंचिज्ञ, किंचित् कर्तृ, एकदेशीय हे सर्व अनेक जीवपद आणि सर्वज्ञ, सर्वकर्तृ, सर्वदेशीय, अनेक देव पद सर्व क्रियाशील आहेत. म्हणजे कर्माधीन आहेत. किंचित् महत् सर्व पदाला अवकाश देऊन सहज स्वभावसिद्ध असलेल्या महद्वस्तूला परमात्मा, परशिव, परब्रह्म म्हणतात. आदी असलेल्या या जगाला अनादि अशी महद्वस्तू अखंड आश्रय भूत आहे. या वरून आस्तिकवाद सिद्ध होतो.

- परशिव तत्वाचा विमर्श -

सच्चिदानंद नित्य परिपूर्ण स्वरूपअसलेला परशिवब्रह्म आपल्या स्वाभाविक शक्तीने समन्वित आहे. ती शक्ती परशिव ब्रह्मात अविनाभाव संबंधाने असून उन्मेषण, विमर्श इच्छा, ज्ञान,क्रिया अशी पंच विध आहे.आपल्या शक्तीसहीत असलेला परशिव ब्रह्म शक्त्यादि पृथिव्यांत छत्तीस तत्वांच्या

रूपाने विकास पाऊन सृष्टी, स्थिती, लय, निग्रह आणि अनुग्रह ह्या पंचविध कार्यांने वर्तन करणाऱ्या अनंतब्रह्मांडाला आधारभूत आहे. त्या महद्वस्तूला परब्रह्म, परशिव, लिंग, स्थल अशी अनेक नावे आहेत.

ते परशिव ब्रह्म सत्, चित्, आनंद, नित्य व परिपूर्ण या पंचलक्षणानें युक्त आहे.

सत् = उपाधी रहित अव्यय स्वरूप असणें.
चित् = उपाधिरहित चिद्रूप स्वयं प्रकाशीत असणें
आनंद = निरुपाधिक सहजानंद स्वरूप असणें.
नित्य = सत् चित् आनंद त्रिकाल अबाधित असणे
परिपूर्ण = शिव तत्व शक्त्यादि पृथिव्यांत तत्वा बरोबर चराचर सृष्टीच्या कार्य कारणरूप क्रिये मध्ये अंतर्बहिर अखंड रूपाने व्यापून असणे

परशिव ब्रह्म हे शक्ती विशिष्ट असल्यामुळे सविशेष म्हणविते. त्यांतील शक्ती अविनाभावसंबंधाने असून साधर्म्य स्वरूपात आहें. उदा :– आकाश व वायू हे दोन्ही अविनाभाव संबंधाने आहेत. आकाश हे नेत्रं गम्य असून वायू त्वगेंद्रिया द्वारे स्पर्शगम्य आहे. ही दोन्ही पृथक होऊन राहणे शक्य नसून ओतप्रोत परस्पर व्यापून आहेत आकाशतत्व स्थिर आहे. वायू तत्वाचे सामान्यचर व अतिचर दोन प्रकार आहेत. वायू अतिचरामध्ये अनुभवाला येत असून सामान्य चरामध्ये आकाशा बरोबर तादात्म्य-होऊन रहातो. वायू व आकाश ही दोन्ही साधर्म्य रूपानें

दिसून येत असले तरी ते एक नसून दोन आहेत. अग्नितत्व डोळ्याला दिसते. त्यांतील दाहक शक्तीं त्वचेला जाणवते साखर डोळ्याला दिसते त्याची गोडी जिभेला कळते. फूल नेत्राला दिसते त्याचा गंध नाकाला जाणवतो. या सर्व वस्तू अविनाभाव संबंधाने एक होऊन दिसल्या तरी त्या वेग-वेगळ्या आहेत. त्याप्रमाणे परशिव ब्रह्म सविशेष असून त्याची शक्ती अविनाभाव संबंधात साधर्म्य रूपाने आहे.

परशिव ब्रह्म केवळ "**सत्**" रूपानें असून त्याची शक्ती **सत्–असत्** अशी उभयरूप आहे.

उदा :– सुवर्ण व त्याची प्रभा ही दोन्ही अविनाभाव संबंधात आहेत. "**प्रभा**" ही केवळ सत् रूप असून सुवर्ण मात्र "**सत्-असत्**" असे उभयरूप आहे. प्रभा अग्नि संस्काराने निस्तेज होत नाही. व ती तराजूने तोलून गणना करणें साध्य नाही सुवर्णाचे अनंत अलंकार रूपानें परिवर्तन होत असले तरी त्याच्या प्रभे मध्ये परिवर्तन होत नाही. परंतू प्रभा सुवर्णामध्ये आत बाहेर व्यापून त्या अलंकाराला व सुवर्णाला निरंतर आश्रय होऊन राहिल्या प्रमाणे ब्रह्म हे केवल "**सत्**" रूप आहे. सुवर्ण अग्नि संस्काराने न घटता अनंत अलंकार रूपांत परिवर्तन होत असले तरी त्या सुवर्णाच्या अस्तित्वाला बाधा येत नसल्यामुळे शक्ती "**सत्**" रूप आहे. आणि सुवर्णात उत्पन्न होणारे नामरूपा-त्मक अनंत अलंकार नाश पावत असल्यामुळे शक्ती "**असत्**" रूप आहे. या वरून ब्रह्म केवळ सत् आहे. त्याची

शक्ती सत् व असत् उभय रूप आहे,

उदा :– गणित शास्त्रात शून्य (०) आणि एक (१) अंक हे दोन आहेत. शून्य हे ब्रह्म असून अंक ही साधर्म्य शक्ती आहे, असे गृहित धरल्यास शून्य केवळ सत् रूप असून (१) अंक सत् असत् उभयरूप आहे. ते असे आहे की शून्याचे निरीक्षण केले असता, कोणत्याही वस्तूच्या संख्येचा बोध होत नाही. एका शून्या पुढे अनेक शून्य लिहीत गेल्यानें (०००) वृद्धी होत नाही. शून्या खाली शून्य (०/०) दिल्याने बेरीज होत नाही व वजा होत नाही. याकरिता शून्य अव्यय, अक्षय, अगणित या संज्ञामुळे **"सत्"** रुप आहे. एक ह्या अंकाला निरीक्षण केले असता गणिताचा बोध होतो. एक ह्या अंकामध्ये दुसरा एक अंक मिळविल्यास दोन होतात. अशा प्रकारे एकेक अंक क्रमाने मिळवित गेल्यास नऊ संख्या पर्यंत वृद्धी होते. पुन: त्या नऊ संख्येला क्रमानें एकेक अंक वजा करीत गेल्यास दोन अंका पर्यंत वजा होऊन शेष एक अंकाचा वजा होत नाही, ह्या सर्व अनेक अंकाला एक हा अंकच मूल कारण आहे. मूल एका अंकाला बाधा येत नाही म्हणून एक हा अंक सत् रूप आहे. अेक अंकापासून नऊ संख्ये पर्यंत वृद्धी क्षय होत असल्या कारणानें असत् रूप आहे. शुन्या (०) प्रमाणें परशिव ब्रह्म केवळ सत्‌रूप असून एक (१) अंका प्रमाणें त्याची शक्ती सत् असत् अुभयरूप आहे.

शिव व शक्ती हे दोन मूल तत्व आहेत.

शिवतत्वाचे अंग असलेले शक्ती तत्वच अनंत जगद्रूपानें भासे मान होते.
उदा :– अतिसूक्ष्म असलेली विद्युत् शक्ती ती मूल रूपांत अनुभवास येत नाही व जाणवत नाही. कोणत्याही एका वस्तू मध्ये मिळून त्याचा संचालन क्रिये वरून मात्र ती एक शक्ति असल्याचे अनुभवास येते, आणि मानवाच्या शरीरा मध्ये देखील सूक्ष्म अशी एक अदृश्य शक्ती असून अनंत कर्मयोग चालवीत असते. त्याप्रमाणें मूल शक्ती-तत्वानेच सूक्ष्म लोकांतील ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, आणि सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिकादि दैवतांचे रूप धारण केले आहे आणि तीच शक्ती पंच भूतात्मक मानव सृष्टीतील स्त्री, पुरुष, पशु, पक्षादि समस्त जड व चेतन रूपानें भासमान होते. शिव-शक्तीं हे शब्द पुल्लिग स्त्री लिंगामध्ये उपयोग केला तरी शिवतत्व पुरुष वाचक शक्तीतत्व स्त्री वाचक असे न समजता तत्व वाचक म्हणून समजून घ्यावे. शिवतत्व अव्यय, अक्षय, स्वरूप, असून त्याची शक्ती सकल निष्कल क्रियेला आश्रय भूत असून तेच मूल बीज आहे.

– सृष्टीचे मूलतत्व –

गाढनिद्रेंतील मनुष्य एकदम जागा होतो. त्या प्रमाणें परशिव शक्ती सृष्टीच्या कार्याला उन्मुख होऊन प्रथमतः उन्मेषण शक्ती उत्थान पावली. त्या उन्मेषण शक्तीत विमर्शाशक्ती पाण्यात पडलेल्या तैल बिंदू प्रमाणें

प्रतरण पाऊन प्रकाशीत झाली. आणि त्या विमर्शा शक्तीत इच्छा शक्तीचा आविर्भाव होऊन इच्छा शक्ती मध्ये ज्ञान शक्ती अंतरंग रूपानें क्रिया शक्ती बहिरंग रूपानें प्रकाशीत झाली आहे.

"**पिंडी ते ब्रह्मांडी**" या म्हणी प्रमाणें समष्टी रूप परशिव ब्रह्मांत असणारी मूल चैतन्य शक्तीच व्यष्टी रूप मानवा मध्ये प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या पंच-शक्ती उन्मेषण, विमर्शा, इच्छा, ज्ञान, क्रिया ह्या होत. उद :– मनुष्य सहज स्थितीत असता शेताला जावे ही वृत्ती उत्थान पावणें ही उन्मेषण शक्ती होय. वृत्ती उत्थान पावताच आपल्या स्वस्थाना पासून शेतापर्यंत ज्ञानाचा प्रकाश पडून त्याची दिशा मार्ग प्रदीर्घ स्थानाचा अवकाश भावनेंत मूर्तीमंत रूपाने दिसणें ही वमर्शा शक्ती होय. उद्दीष्ट स्थाना पर्यंत प्रत्यक्ष जाण्याच्या कामी प्रवृत्त होणें ही इच्छा शक्ती होय. कसे जावे जाण्याचे साधन क्रमाची जाणीव होणेंही अंतर्क्रियात्मक ज्ञानशक्ती असून प्रत्यक्ष शरीराने व अन्यवाहान साधनानें शेतापर्यंत जाऊन पोंहचणें बहिर्क्रिया शक्ती होय.

परशिव ब्रह्म आपल्या शक्ती सह सहज लीलामात्रे करून शिवादि पृथ्व्यांत छत्तीस तत्वांच्या रूपानें विकास पावले आहे.

शिव – शक्ती - सदाशीव - ईश्वर – शुद्ध विद्या – काल – माया – कला - अशुद्धविद्या – राग –

नियति – पुरुष -- प्रकृति – बुद्धी – अहंकार -- मन – श्रोत्र – त्वक् – नेत्र – जिव्हा – घ्राण -- वाक् – पाणी – पाद -- पायू -- उपस्थ – शब्द – स्पर्श – रूप – रस – गंध – आकाश वायू – अग्नी – जल – पृथ्वी –

" **परशिव शक्ती** " " **चित् अचित्** " दोन प्रकारची आहे. चित् शक्ती ही चैतन्य असून अचित् शक्ती जड आहे. चित् शक्तीत भाव तत्वाचा उदय झाला अचित् शक्तीत प्राण व पंचमहाभूत तत्व निर्माण झाले आहेत. चित् शक्तीत सूक्ष्म चित् –अचित् आणि अचित् शक्तीत स्थूल चित् अचित् असे चार प्रकार झाले आहेत. सूक्ष्म चित् अचित् शक्ती मध्ये सर्वज्ञ, सर्वकर्तृ, सर्वदेशीय अशा नियामाक दैवतांची सूक्ष्म सृष्टी निर्माण झाली आहे. स्थूल चित् अचित् शक्तीत किंचिज्ञ किंचित्कर्तृ एक देशीय नियाम्य जड जीवांची सृष्टी निर्माण झाली आहे.

- सृष्टीचे पंच विधान व पंच दैवत -

नियाम्य अशा प्रजेला प्रथम नियामक राजा असतो. त्या प्रमाणें, नियाम्य जड जीवांची सृष्टी उत्पन्न होण्यां पूर्वी नियामक दैवतांची सूक्ष्म सृष्टी प्रथम निर्माण झाली आहे. **"प्राणाद् वायु रजायत"** (पुरुष सूक्त तैत्तीरी यारण्यक ३।१.२ १३) प्राणा पासून वायू,

वायू पासून अग्नि, अग्नि पासून जल, जला पासून पृथ्वी या क्रमानें सूक्ष्म तत्वा पासूनच जड तत्वाची उत्पत्ती झालेली आहे.

परशिव शक्तीच्या चिद्रूप चैतन्याचे प्रथमस्फुरण "सदाशिव तत्व" हेच झाले आहे. त्याला पंचब्रह्म सदाशिव म्हणतात.

स्वतेज स्फटिका भासं जटा जूट विराजितम् ।
सिरोभिः पंच भिर्युक्तं पंचानन समन्वितम् ॥
प्रत्याननं विशेषेण त्रिनेत्रं भस्म भूषणम् ।
दशभिर्बाहुभिर्युक्तं पादद्वय सुशोभितम् ।
पद्मसंस्थं महादेवं सर्वाभरण भूषितम् ।
दिव्य वस्त्र परिधानं दिव्यायुध धरंशुभम् ॥
शूलं च परशुंचैव खड्गं वज्रा भये तथा ।
दधतं दक्षिणैंर्हस्तैस्तथा वाम करैः शुभैः ॥
नागं पाशं चांकुशंच घंटां वन्हिं तथै वच ।
सर्व लक्षण सयुंक्तं भुक्ति मुक्ति प्रदायकम् ॥
सृष्टयादि पंच सामर्थ्यं पंचाक्षर मंत्र मयम् ।
पंच ब्रह्मात्मकं देवं सदाशिव महंभजे ॥

पंच ब्रह्म सदाशिव परिशुद्ध भावावरण स्फटिक वर्णमय शरीरी असून पंच जटा मुकुटानें शोभित आहे. सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरूष, ईशान पंचमुख पंचदश लोचनानेयुक्त आहे. शूल, परशु, खडग, वज्र, अभय

उजव्या हातात व सर्प, अंकुश, पाश, घंटा, प्रलयाग्नि, डाव्या हातात सुशोभित आहेत. दिव्य वस्त्राभरण असून मस्तकावर लिंग धारण केलेला आहे. भस्म, रुद्राक्ष, गंध पुष्पमालादिकानें अलंकृत आहे सृष्टी स्थिती, लय, निग्रह व अनुग्रह पंचविध सामर्थ्य संपन्न आहे. सकल निष्कल भोगी उद्युक्त मूर्ति व नित्य मुक्त असून प्रमथ लोक निवासी आहे. पंच ब्रह्म सदाशिव अनंत स्थूल सूक्ष्म लोकांचा कर्ता व पिता आहे.

।। पंचब्रह्म मंत्र ।। सद्योजातं प्रपद्यामि सद्यो जाताय वै नमो नमः भवे भवे नाति भवे भवस्वमां भवोद्भवाय नमः ।।१।। वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमः श्रेष्ठाय नमो रुद्राय नमः कालाय नमः कलविकरणाय नमो बलवि करणाय नमो बलाय नमो बल प्रमथनाय नमो सर्व भूत दमनाय मनोन्मनाय नमः ।।२।। अघोरे भ्योऽथघोरे भ्यो घोर घोर तरेभ्यः । सर्वेभ्यो सर्व शर्वेभ्यो नमस्ते अस्तु रुद्र रूपेभ्यः ।।३।। तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धी मही । तन्नोरुद्रः प्रचोदयात् ।।४।। ईशानः सर्व विद्यानामीश्वरः सर्व भूतानां । ब्रह्माधिपतिर्ब्रह्मणोऽधिपति ब्रंह्मा शिवो मे अस्तु सदाशिवोम् ।।५।।

(यजुर्वेद तैत्तिरियारण्यक मंत्र ७/३४/४४–४५–४६–४७)

कोणत्याहि एका वस्तूची उत्पत्ती होण्याकरिता **"कर्तृ" "उपकरण" "द्रव्य"** ह्या तीन्ही वस्तूंची अनिवार्य अवश्यकता आहे. मातीचे पात्र बनविण्याच्या कामी कुंभार कर्ता आहे. मातीही द्रव्य असून चक्र इत्यादिक

वस्तू उपकरण असल्या प्रमाणें पंच ब्रह्म सदाशिव सर्वज्ञ, सर्व शक्तीमान्, सर्व देशीय, असून ह्या सृष्टीच्या उत्पत्ती कार्याला "**कर्तृ**" आहे. शिवादी पृथ्व्यांत छत्तीस तत्वे "**द्रव्य**" आहेत स्थिती, निग्रह, लय, अनुग्रह हे पंच विधान "**उपकरण**" आहेत. श्रीपंचब्रह्मसदाशिवाने "**बहुस्यां प्रजायेय**" (छान्दोग्य श्रुति ६-२-३) असा जगदुत्पत्तीचा संकल्प केला. समुद्र तरून जाण्या पूर्वी नांव रोगाचे पूर्वी औषध. अपराधाचे पूर्वी न्यायाधीश. शिशू जन्मापूर्वी मातेच्या स्तनाला दुधाची उत्पत्ती असणें हे स्वाभाविक आहे. या प्रमाणे अपार व अनंत असलेले जन्म मरण, सुख दुःख रूपी भवरोग्याच्या अनंत जीव राशी उत्पत्तीच्या अगोदर त्या जीवांच्या शाश्वत सुखाला मूल असलेला अनुग्रह पद प्रथम असल्या कारणाने प्रथमतः अनुग्रह पदा पासून सृष्टचारंभ होऊन निग्रह, लय, स्थिती सृष्टी, अशा क्रमाने ऊर्ध्व सृष्टी पासून अधो सृष्टी उत्पन्न झाली आहे.

पंच ब्रह्म सदाशिवाने पुत्रार्थि प्रजार्थि होऊन प्रथम अनुग्रह कर्त्या पंच आचार्यांना पांच मुखाने जन्म दिला.

सद्योजात मुख मासीत् रेणुकाचार्यं आराध्य उद्भवति ! वामदेव मुख मासीत् दारुकाचार्यं आराध्य उद्भवत्ति! अघोर मुख मासीत् ! घंटाकर्ण गणेश आराध्य उद्भवति ! तत्पुरुष मुख मासीत्

धेनुकर्णं गणेश आराध्य उद्‌भवति ! ईशान मुखमासीत् विश्वकर्णं गणेश आराध्य उद्‌भवति !

(यजुर्वेदांतर्गत वीरलैंगोप निषत्)

– अग्रनुह कर्ता पंच आचार्य –

श्री रेणुक शिवाचार्यं, श्री दारुक शिवाचार्यं, श्री घंटाकर्णं शिवाचार्यं, श्री धेनुकर्ण शिवाचार्यं, श्री विश्वकर्ण शिवाचार्यं हे पंच आचार्यं माया विरहित परिशुद्ध भाव तत्वाचे स्फटिकवर्णमय देह धारी आहेत. आणि स्वयं प्रकाशित, जटामुकुट मंडित, भालाग्नि नेत्र, दंड, कमंडलू, शंख, प्रसाद पात्र, भस्म घुंटिका, पंच मुद्रांकित, आहेत. हिरवा, तांबडा, निळा, पांढरा, पिवळा, क्रमेण पंचवर्ण दिव्य वस्त्राऴंकृत. असून जितेंद्रिय, सर्वज्ञ, सर्वशक्तीमान्, चेतन अचेतन अनंत ब्रह्मांडाला अनुग्रह (मोक्ष) प्रदायक, आहेत दीक्षा शिक्षादि कार्यात सर्व तंत्र स्वतंत्र अखंड ब्रह्मानुसंधान तत्पर, असून काला तीत. नित्य मुक्त अनुग्रह सामर्थ्य संपन्न होऊन प्रमथ लोकात वास करून आहेत.

त्या नंतर निग्रहकर्ता ईश्वर, लयकर्ता रुद्र, स्थिती कर्ता विष्णु, सृष्टी कर्ता ब्रह्मा, या चार दैवता पंचब्रह्म सदाशिवाचे मानस पुत्र आहेत.

– निग्रहकर्ता ईश्वर –

ईश्वर माया सहित शुद्ध विद्या तत्त्वाचा भाव

प्राण ज्योतिर्मय शरीरधारी, ब्रह्म चिन्ह (लिंग) मस्तकांकित, जटा मुकुट, एकमुख, त्रिनेत्र, वरद, अभयहस्त, दिव्यवस्त्राभरण, भस्म रूद्राक्ष, गंधमालादि अलंकृत, असून अंबिका शक्तीसहित, निग्रह सामर्थ्य संपन्न होऊन ईश्वर लोकात वास करून आहे.

— लय कर्ता रुद्र —

रुद्र माया सहित शुद्ध विद्या तत्वाचा भाव, प्राण, ज्योतिर्मय शरिर धारी बह्म चिन्ह (लिंग) मस्तकांकित, जटा मुकुट मंडित चंद्रकलाधर, एकमुख' त्रिनेत्र नीलग्रीव, नागाभरण, परशु, शूल, वरद. अभय, वाम, दक्षिण कर चतुष्टय, गज व्याघ्र चर्मांबंर, भसितोद्धूलन, त्रिपुंड्रभस्मधारण, रुद्राक्ष, रुंडमालाधर, पार्वतीशक्तीसहित, वृषभ वाहन, वृषभध्वज, सकलदेवसेवित लयसामर्थ्य संपन्न होऊन रुद्र लोकांत वास करून आहे.

— स्थितिकर्ता विष्णु —

विष्णु माया सहित शुद्ध विद्या तत्वाचा भाव, प्राण, ज्योतिर्मय शरीरधारी, नीलवर्ण, स्वयंप्रकाशित, ब्रह्म चिन्ह (लिंग) मस्तकांकित, एक मुख नेत्र कमलद्वय शंख, चक्र, गदा, पद्म, वाम दक्षिण कर चतुष्टय, भस्म रुद्राक्षालंकृत पीतांवर, किरीट, कौस्तुभमणिआदी आलंकृत दिव्यगंध माल्यादि भूषीत लक्ष्मी शक्तीसहित गरुड वहान गरुड ध्वज रक्षण सामर्थ्य संपन्न होऊन विष्णु लोकांत वास करून आहे.

सृष्टी कर्ता ब्रह्मा

ब्रम्हदेव माया सहित शुद्ध विद्या तत्वाचा भाव, प्राण, ज्योतिर्मय, शरीरधारी, ब्रम्हचिन्ह मस्तकांकित चतुर्मुख, अष्टनेत्र, चतुर्भुज, रक्तवर्ण, रक्तवर्ण-पीतांवरधारी, अक्षमालाधर, भस्मरुद्राक्षालंकृत, पाश, दंड, कमंडलु. अभय, युक्त वाम, दक्षिण करचतुष्टय हंसवाहन, हंसध्वज, सरस्वतीशक्ति सहित सृष्टी सामर्थ्य संपन्न होऊन ब्रम्ह लोकांत वास करून आहे.

पंच आचार्य माया विरहित परिशुद्ध भाव तत्वाचे देह धारी व कालातीत असून नित्य मुक्त आहेत. ईश्वर, रुद्र, विष्णु, ब्रह्मा, व क्रमेण त्यांच्या शक्ती अंबिका, पार्वती, लक्ष्मी, सरस्वती ह्या चारी देवता माया सहित शुद्ध विद्या तत्वाचे भाव, प्राणमय दोन अवरणाचे देह धारण केले असल्यामुळे सर्वज्ञ, सर्वशक्तीमान, आहेत. त्याना देह पाश नाही. मात्र सदाकाली निग्रह, लय, स्थिती, सृष्टी, या चतुर्विध कार्यामध्ये निरत होऊन अनंत लोकांच्या योग क्षेमा साठी महा प्रलय कालापर्यंत त्यानी कोणताही एक देह धारण करूनच राहावे लागते. त्याना ब्रम्हसामरस्य जीवन मुक्त होणे साध्य नाही. म्हणजेच त्या काल पाशानेबंधित आहेत.

मानव, माया सहित अशुद्ध विद्या तत्वाचे देह धारी असल्या मुळे याला भाव, प्राण, भूत, तीन आवरण आहेत. म्हणून किंचिज्ञ् किंचित्कर्तृ, एक देशीय आहे. आणि पुत्र, दारा, धन ईषणत्रयाने युक्त असून कर्मपाश काल, पाश, देह पाश, ह्या त्रिपाशाने बंधित झाला आहे.

शिव-शक्ति, आणि सदाशिव ह्या तीन तत्वाने युक्त परिशुद्ध भावावरण मय शरीर धारी पंच आचार्य आहेत.

शिव,–शक्ति,–सदाशिव,– ईश्वर, – शुद्धविद्या–काल,

-माया व कला ह्या आठ तत्वाने युक्त भाव व प्राण दोन आवरण मय शरीरधारी ईश्वर, रुद्र, विष्णु, ब्रम्हा या चार देवता आहेत.

शिवादि पृथ्व्यांत छत्तीस तत्वाने युक्त भाव, प्राण व भूत त्रिआवरणमय मानव शरीर आहे. **उदा :–** एका खनिज आप द्रव्या संबंधी विचार केल्यास क्रुडाईल, कॅरोशिन, व पेट्रोल हे सर्व त्रिविध प्रकारे अनुभवास येतात.कारण पृथ्वीचे जड पर-माणू अधिकाधिक मिश्रण होत गेल्याने, जड म्हणविले आहेत. आणि कमी होत गेल्या प्रमाणे क्रमेण सूक्ष्म झाले आहेत. क्रुडआईल कॅरोसिन, पेट्रोल ही सर्व नामे क्रमेण एका आप द्रव्यातील जडांश कमी करून शुद्धी संस्कार केल्याचा परिणाम आहे. अन्यथा काही नाही. सारांश पृथ्वी, आप, तेज. वायू व आकाश ह्या पाच तत्वापेक्षा प्राण तत्व सूक्ष्म आहे. प्राण तत्वापेक्षा भाव तत्व अति सूक्ष्म असल्यामुळे ती मूल परशिव चैतन्यशक्तीच छत्तीस तत्वाच्या आवरण धर्मानुसार स्थूल, सूक्ष्म, कारण या प्रपंच रूपानें भासमान होते.

सृष्टी म्हणजे जड चेतन जीवांच्या उत्पत्तीचे कार्य नियमित रूपांत चतुर्मुख ब्रह्माकडून चालविण्यात येते. स्थिति म्हणजे सृष्ट जड चेतन जीवांना नियमित रूपांत विष्णु कडून रक्षण करण्यात येते. लय म्हणजे जड चेतन जीवांच्या उत्पत्ती स्थिती ह्या कार्याला आड येणारे अनिष्ट दुरितांचे निवारण करून त्या दोन्ही कार्याला रुद्राकडून अनुरूप अवकाश प्राप्त करून देण्यांत येतो. निग्रह म्हणजे जड चेतन जीवांच्या उत्पत्ती, स्थिती लय, हे सर्व एका विशिष्ट नियमानुसार चालणाऱ्या क्रिया मध्ये अतिक्रम होऊ नये म्हणून ईश्वराकडून नियंत्रण करण्यांत येते. अनुग्रह म्हणजे सृष्टी, स्थिति, लय, निग्रह या चार नियमित

अवस्थेला अनुसरून जें जड चेतन सर्व जीवराशी जन्म मरण रूपात भ्रमण करीत असतात. त्या सर्व जीवाना पंच आचार्या-कडून बंधमुक्त करून जीवन मुक्ती प्रदान करण्यांत येते. जनन, शैशव, बाल्य, तारुण्य, वार्धक्य ह्या अवस्था सर्व मानवाना स्वाभाविक पणे असतात. ह्या अवस्था एकामध्ये एक उदय पावत असून प्रत्येक वस्तू उत्पत्ती, स्थिती, लय, निग्रह, अनुग्रह, ह्या पंचविध क्रिया मध्ये चालत असतात.

उदा :– मातेच्या उदरातून उत्पन्न झालेल्या शिशूला रक्षण असून ती शैशवावस्था लय (परिवर्तन) पावत असते आणि बाल्याव-स्था उत्पन्न होऊन त्याला रक्षण असून बाल्यावस्था लय पावत असते. आणि तारुण्यावस्था उत्पन्न होऊन त्याला रक्षण करीत तारूण्यावस्था लय पावत वृद्धाप्याचा उदय होतो. जनन, शैशव, बाल्य, तारुण्य,वृद्धाप्य या जीवनावस्थेच्या क्रियेमध्ये सृष्टी, स्थिती, लय, ह्या तिन्ही क्रियेला अनियमितपणे न होऊ देता नियंत्रण करणे याला निग्रह म्हणतात. जीवांचे जनन मरणादिक बंधन तुटून अंतिम मोक्ष प्राप्त करणे याला अनुग्रह म्हणतात. उत्पत्ती स्थिति, लय, निग्रह, अनुग्रह, कर्ता ब्रह्मा, विष्णु रुद्र, ईश्वर व पंचआचार्य या पंच नियामक अधि दैवता कडून चराचरप्रपंचाचा योग क्षेम निरंतर चालत असतो. आकाश मंडलातील परिशुद्ध वायुतत्व पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या योगाने पाण्याच्या रूपाने पृथ्वीवर अधोमुख होऊन वाहतो पुन: ते पाणी तेज तत्वा-च्या उष्ण कणामुळे वायूच्या रूपाने ऊर्ध्व गतीनें जाऊन आपल्या मूल स्थितीला पोंहचतो. त्याच प्रमाणे कार्यरूप हे जीव व जग सृष्टी, स्थिती, लय, निग्रह, ह्या क्रियाच्या द्वारे जन्म मरणादिक असीमित चक्रात सापडून असह्य दु:ख तापाने अखंडपणे भ्रमण

करीत करीत बंध मुक्त होऊन शेवटी अनुग्रह स्वरूप मोक्ष प्राप्त करणें जीवाचे चरम (अंतिम) लक्ष्य आहे.

मानवातील नैसर्गिक धर्मप्रवृत्ति

जगद्रूपी महा मंदिरात प्रवेश करतानां शिशु मातेच्या गर्भरूपी महाद्वारांतून येताना हात जोडून नमस्कार मुद्रेने जन्मतो. शिष्य गुरुसन्निध अनुग्रह संपादन करण्याची अपेक्षा धरून साष्टांग प्रणिपात पूर्वक शरण जात असल्या प्रमाणे प्रकृती माता शिशूला आस्तिक्य भावनेंत निग्रह करून जन्म देते. शिशू जन्मताच त्याच्या रसनेला स्तनपान करण्याची शक्ती स्वाभाविकपणे ठेविलेली आहे. त्वचेला शयनाचे काठिण्य व मृदुत्व व वायूचे शितोष्ण समजण्याचे स्पर्शज्ञान स्वाभाविक पणें आहे. रडते वेळी आपल्या मातेच्या धारण मात्रेने प्रशांत होते. या वरून मातेच्या अंगाला समजण्याचे स्पर्शज्ञान स्वाभाविक आहे. प्रथम शिशूच्या मनाला मातृ प्रेम समजते, त्या नंतर मातेच्या रूपाला समजते. मातेचा वियोग ते सहन करू शकत नाही खाणे, पीणे, बसणे, उठणे, झोपणे व खेळणे, आदि सर्व क्रिया मध्ये **"आई या उर्ध्व"** भावनेंतील प्रेममय वातावरणात विहार करते. आणि पुनः भाऊ, बहीण- आदि लोकाना समजते. घरातील गाई, म्हशी, घोडा बैल इत्यादिक चेतन पशु, प्राण्याना समजू लागते. त्या नंतर माझे घर, माझी बाहुली, माझा चेंडू अशा खेळण्याच्या वस्तू माझे म्हणून बाह्य जगाचे संस्कार त्याच्या मनाला होत होत **"अधो भावाचा"** विकास होतो. मी व माझा म्हणून द्वंद्व भावाचा उदय होतो. ह्या दोन्हीच्या अंतराळामध्ये सदैव व्यापून असणारा **"नैसर्गिक भाव"** आहे. आपल्याला अवश्यक असणाऱ्या खेळण्यांच्या वस्तुचा अभाव होताच, दुसऱ्याची वस्तु अपहार करण्याच्या इच्छे मध्ये

"अनैसर्गिक भावाचा" उदय होतो. शुद्ध ऊर्ध्व भावमय मातृ पितृ प्रेमाचा विसर होत आपली वायको, नवरा, मुले, घर, शेत, धन, धान्यादि सर्व भोग वस्तूच्या संस्काराचे आवरण होऊन. "अधो-भाव" व अनैसर्गिक भाव या मध्ये मानवाची कर्तृत्व शक्ती जागृत होते.

ज्ञानमय चैतन्य मानवाच्या स्वाभाविक प्राकृतिक नियमाचा विचार करता आई शिशूला जन्म देऊन स्तनपान करीत त्या बरोबर ध्वनि संकेत न करता, न बोलता दुसऱ्या कोणाचाही संपर्क न होऊ देता एकांतात ठेवल्यास शिशू मूक होऊन वाचाहीन होते. या वरून त्या शिशूला दुसऱ्याचे बोलणें, चालणें, वागणें यांच्या संपर्कानें मानसीक अहार मिळून ज्ञानमय कोश समृद्ध होत होत तो महान वक्ता होतो. मानवी मनास मानसिक अहार नसल्यास मानव विकास कुंठित होईल. या कल्पित क्रियेचे अनुकरण करून अवाधित रूपाने परंपरा चालविणे हा मानवी निसर्ग होय. आणि मानवाचा वस्त्र परिधानक्रम बाल्यावस्थेत आई, बापा, कडून होत असलातरी तो पुढे मोठा झाल्या नंतरही वस्त्रा विना राहणें मानवतेला भूषण नाही. असे समजतो. वस्त्र धारणा कृत्रीम म्हणावीतर साऱ्या जगातील मानवाला वस्त्राविना जीवन जगणें साध्य नाही. कारण कल्पित वस्त्रधारण क्रियेचे अनुकरण करून अबाधित रूपाने परंपरा चालविणे हे मानव निसर्ग होय. या वरून कल्पना होते. की, वस्त्र परिधान मानवी कृती असली तरी मानवाचा प्राकृतिक निसर्ग आहे. आई, वाप, शिशूला नामकरण करतात. तो शिशू मोठा होऊन आपले नांव सर्वांना सांगतो सर्व लोक परस्पर नामकरण नाही, केल्यास मानवाचे सर्व व्यवहार चालणार नाहीत. साऱ्या जगातील

मानवांनी ही क्रिया अंगीकारली आहे. मानवाने आपल्या बुद्धी बलानें नामधारणा ठरविली आहे. निर्नामी झाल्यास जीवन जगविणें साध्य नाही. हे नामकरण मानव निसर्ग होय. जगातील सर्व मानवानी तारूण्यावस्थेत विवाह विधीचा अंगीकार केला आहे. देश, काल व परिस्थिती प्रमाणें लग्नविधी करतात. त्या योगे परस्पर स्त्री–पुरुष नैतिकबंधनात राहून परस्त्री, स्वस्त्री, स्वपती, व परपुरुष या कल्पनेने संयमित होऊन रहातात आई, बहीण, बाप, बंधू-ही कल्पना जगातील साऱ्या मानव समाजांत आहे. अमक्या स्थानी आहे. अमक्या स्थानी नाही. असे नाही यावरून जगाच्या आद्यंत सर्व ठिकाणी मानवाची जीवनचर्या सारखीच असणें हे मानव निसर्ग होय. मानवी बुद्धीशक्तीचा उपयोग न होता आपोआप विकास पावणे. प्राकृतिक (जडवस्तू) निसर्ग होय. मानवानें आपल्या बुद्धी शक्तीद्वारे चेतन अचेतन वस्तूंचा विकास करुन उपभोग घेणें मानव निसर्ग होय.

या सृष्टीच्या जड चेतन वस्तूच्या ठिकाणी एकेक प्रकारचा गुण धर्म स्वाभाविक रूपाने असल्याचे अनुभवास येते. पृथ्वी तत्वांत धारण धर्म, जलतत्वात द्रव धर्म, अग्नी तत्वात दाहक धर्म, वायू तत्वात स्पंदन धर्म, आकाश तत्वात व्यापन धर्म, वज्रात शिलाभेदन धर्म, औषधांतरोगनिवृत्ति धर्म, विद्युत् शक्तीत नानाविध यंत्र संचालन धर्म, साखरेत रुचि धर्म, शिले मध्ये काठिण्य धर्म, माती मध्ये मृदुत्व धर्म, ह्या प्रकारे एकेक वस्तूत एकेक गुण धर्म स्वाभाविक असल्याचे प्रत्यक्ष अनुभवास येते. **श्री जगद्गुरु रेणुंक शिवाचार्य** यांनी अगस्त्य महामुनीना मानव धर्माचा उपदेश केला आहे.

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यम् दया क्षमा ।
दानं पूजा जपोध्यानमिति धर्मस्य संग्रहः ।।

(सि० शि० धर्माचार स्थल)

"अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान पूजा, जप व ध्यान हे दहा नियम मानवाच्या अंगी जन्मसिद्ध प्रवृत्ती आहे, धर्म मानवाच्या ठिकाणी दहा प्रकारे असल्याचे अनुभवास येते. ह्या दहा नियमाचे आचरण सदा करणे हा मानव धर्म होय."

अहिंसा

"मला कोणी मारू नये, माझे मन कोणी दुखऊ नये या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्म प्रवृत्ति प्रमाणें तू दुसऱ्यांचे मन दुखऊ-नये, दुसऱ्यांला मारूनये, दुसऱ्यांची प्राणहत्या करूनये, या अहिंसा नियमाचे आचरण कर."

सत्य

"माझ्या बरोबर दुसरे कोणी असत्य बोलूनये या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्मप्रवृत्ति प्रमाणे तू दुसऱ्या बरोबर अप्रिय, असह्य, असत्य भाषण न करता सत्याने बोल'' या सत्य नियमाचे आचरण कर."

अस्तेय

"माझे भोगोपभोग सकल पदार्थ दुसऱ्यानी कोणी चोरु-नये ह्या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्मप्रवृत्ति प्रमाणे तूही दुसऱ्यांच्या अन्न, वस्त्र, धन, धान्यादि सकल वस्तू न चोरता या अस्तेय नियमाचे आचरण कर."

ब्रह्मचर्य

"दांपत्य जीवनांतील उभय स्त्री पुरूषानी परस्पर

आपल्या विषयी अन्य स्त्री, पुरुषाकडून विनय भंग व व्यभिचार प्रमाद घडू नये ह्या तुमच्या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्मप्रवृत्ति प्रमाणे तुम्ही सुद्धा अन्य सर्व स्त्री–पुरुषाबरोबर अनैसर्गिक भावनेने विनयभंग विषय प्रमाद वर्तन न करता त्यांच्याशी आपल्या माता पित्या सारखे ऊर्ध्व भाव भक्तीनें वर्तन करून आपल्या दांपत्य जीवनातच अधो प्रेमाने वीर्याचा सदुपयोग होणाऱ्या अशा या ब्रह्मचर्य नियमाचे आचरण करा."

दया

"आपल्यावर माता, पिता, आचार्य, बंधू, बांधव, स्वामी, राजा, ईश्वर इत्यादी वरिष्ठ जनांची दया असावी ह्या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्मप्रवृत्ति प्रमाणें तू सूद्धा अंधळा, लंगडा, मुका, अशक्त, बधिर विधवा, बाल, वृद्ध रोगी, विद्यार्थी दीन, दुःखी, निपुत्रिक, अनाथ, अज्ञानी, इत्यादि कनिष्ठ जीवा विषयी सदा सर्वदा, दया नियमाचे आचरण कर."

क्षमा

" आपल्या कडून दुसऱ्या विषयी कोणताही अपराध घडल्यास त्या अपराधा संबंधी त्यांचे कडून कोणत्याही प्रकारची शिक्षा होऊ नये ह्या तुझ्या जन्म सिद्धस्वाभाविक धर्म प्रवृत्ति प्रमाणें तू सूद्धा दुसऱ्यानी तुझ्या संबंधी केलेल्या सामान्य अपराधा विषयीं अक्षम्य भावानें शिक्षा न करता क्षमा या नियमाचे आचरण कर."

दान

"तू माता पित्या कडून देह, दान रुपानें प्राप्त करून जन्मला आहेस. बंधू बांधवादि सर्व वरिष्ठ जनांकडून सेवादान घेऊन वृद्धी पावला आहेस. गुरु जनाकडून विद्या दान घेऊन श्रेष्ठ

ज्ञानी झाला आहेस. राष्ट्राकडून सर्व विध संरक्षणाचें अभय दान संपादान केले आहेस पाऊस वारा, ऊन, थंडी, अन्नौषधि हे सर्व तुझ्या जीवित चरितार्थ साधनेंला आवश्यक सकल वस्तूप्रकृति माते पासून विना मूल्य दान रूपानें प्राप्त केल्या आहेस. तुझ्या ह्या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्म प्रवृत्ति प्रमाणें तू सुद्धा माता, पिता, गुरु, अतिथी, राजा, ईश्वर इत्यादिक पूज्य लोकांच्या संन्निधी तुझे संग्रहित अन्न, वस्त्र, धन, धान्य, सोनें, चांदी, गाई, घोडे, भूमि, कन्या इत्यादि भोगोपभोग सकल वस्तू समर्पण करणे हे दान होय. दान कर्मा शिवाय जीवित चालऊ नको. प्रतिदिन दान करूनच अन्नोदक सेवन कर. कदापि न विसरता दान या नियमाचे आचरण कर."

पूजा

आपल्यावर दुसऱ्यानी प्रेम करावे. आपला आदर-करावा, सन्मान करावा. पूज्य शरणार्थि भावाने आपल्याला वंदन करावे. ह्या तुझ्या जन्मसिद्ध नैर्सगिक धर्म प्रवृत्ति प्रमाणे तू सूद्धा आई–बाप, गुरू, राजा, अतिथी आदी पूज्य लोकावर प्रेम भक्ती ठेऊन त्यांची सेवा पूजा कर. या चराचर विश्वांचे पंच नियामक सृष्टी, स्थिती, लय, निग्रह, अनुग्रह, करणारे ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर आणि पंच आचार्य या कोण-त्याही इष्ट देवतेची पूजा कर. अंगावर यज्ञोपवीत (ब्रह्मसूत्र) धारण कर. सोनें चांदी इत्यादि धातु निर्मित "ॐ" प्रणवाक्षर अंगावर धारण करून पूजा कर. इष्टलिंग अखंड अंगावर धारण करून पूजा कर.

खाणे पीणे, अंगाला लेपन करणारे तैलादि सूगंधी द्रव्ये औषध इत्यादिक सकल द्रव्य तसेच पदार्थ रूपाने न सेविता

ब्रह्मार्पित (लिंग) करून प्रसाद रूपाने सेवन कर अशा कोणत्याही प्रकारे पूजा कर, पूज्य लोकाकडून जनन, पूज्य लोकाकडून ज्ञान, पूज्य वरिष्ठ लोकांच्या प्रेमातच सकल विध संवर्धन संरक्षण प्राप्त करीत असलेला तू प्रतिदिन पूजा या नियमाचे आचरण कर."

जप

"दुसऱ्याकडून सदा सर्वदा आपली स्तुति व्हावी. कीर्ति व्हावी, आपला गौरव व वर्णन व्हावे पुनः पुनः आपले जप (स्मरण) व्हावे ह्या तुझ्या जन्मसिद्ध स्वाभाविक धर्म प्रवृत्ति प्रमाणें तू सुद्धा पूज्य देवता स्वरूप आई, बाप, गुरु, अतिथी, बंधू, बांधव. राजा, स्वामी, इत्यादिकांची स्तुति, कीर्ति, स्मरण, चिंतन वर्णन कर. आपल्या वाणीनें कठोर, निंदा, तिरस्कार, अपमान भाव दर्शक अपशब्दांचा उच्चार कदापि न करता सदा प्रिय वचनानें सर्वांशी प्रेम कर.

सृष्टी, स्थिती, लय, निग्रह, अनुग्रह या पंच नियामक ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर आणि पंच आचार्य या कोणत्याहि इष्ट दैवता-दर्शक नाम मंत्राचा जप कर. ब्रह्म तत्व दर्शक "ॐ" प्रणवा क्षराचा जप कर. भोग मोक्ष देणाऱ्या शिव पंचाक्षर महा मंत्राचा जप कर, अथवा कोणत्याहि भाषेतील ईश्वर तत्व दर्शक नाम मंत्राचा जप कर. खाणे, पीणे, लिहिणे, नेसणे कोणत्याहि भोगोपभोग सकल वस्तु तसेच पदार्थ रूपाने न सेविता मंत्राने अभिमंत्रित करून तीर्थ प्रसाद रूपाने सेवन कर. खाता, पीता, उठता, बसता, काम करता, विषय सेविता सतत मंत्राचे मनन कर. कदापि न विसरता सदा सर्वदा या जप नियमाचे आचरण कर."

ध्यान

"आपल्याला कोणत्याही प्रकारचे अनिष्ट, दुरीत, दुःख, ताप न संभवता सदा सुखाने असावे हे मानव जीविताचे अंतिम ध्यान आहे.

इहलोकांतील पुत्र, दारा, धनादिक सुखे व परलोकांतील ब्रह्मपद, विष्णुपद, रुद्रपद, ईश्वरपद सकल देवपदांची सुखे जन्म मरणरूप भवित्व रोगात अंतर्भूत होतात. परंतू लिंगांगसामरस्य रूप जीवन्मुक्तीचे चिरसुख भवित्व रोगापासून अतीत असल्यांमुळे अखंड अमरत्व सुखाची अपेक्षा हे अंतिम ध्यान आहे. ह्या अंतिम सुखाच्या ध्यानार्थ भूत, प्राण, भाव या तनु त्रयाचा-मलविक्षेप होऊन "अहं" (मी) केवल शुद्ध ज्ञानरूप आहे या आत्म तत्वाचा अनुभव होणें हेच ध्यान होय,

मी कोण आहे हे जाण, आत्मतत्वओळख आत्मतत्वाच्या अनुसंधान मूलक "अहं" भावाची ग्रंथी नाश पाऊन सर्वात्मभावाने सकल चराचर प्रपंच शिवस्वरूप ब्रह्मानंद स्वरुप होत असल्याकारणाने मी सर्व साक्षीभूत आहे या आत्मतत्वाचे ध्यान कर. सदा सर्वदा या ध्यान नियमाचे आचरण कर."

धर्मांत मानवाचा जन्म होऊन धर्मातच त्याचे जीवित चालत असले तरी धर्माचे दशनियम— अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा. दान, पूजा, जप, व ध्यान हे मानवाच्या ठिकाणी जन्मसिद्ध स्वाभाविकपणें प्रकृति क्रिया निर्मित असल्याचे प्रत्यक्ष दिसून येत आहे. तथापि त्या स्वाभाविक दशनियमाला हा मानव इच्छा, ज्ञान, क्रिया ह्या कर्तृत्वशक्तीच्या द्वारे आपल्याहून भिन्न प्राण्या विषयी प्रतिक्रिया रूपाने म्हणजे प्रत्यक्ष प्रयोगांत उपयोग करून अनुभव घेणें याला धर्म संग्रह अथवा-

-धर्माचार म्हणतात.

ह्या दश निमांत कांही लोकांनी "अहिंसा परोमोधर्मः" एक अहिंसेलाच परमधर्म आहे. म्हणून "नास्ति सत्यात् परोधर्मः" सत्यच श्रेष्ठ आहे. म्हणून "ब्रह्मचर्यम् परंतपः' ब्रह्मचर्यंच श्रेष्ठ धर्म म्हणून " दया धर्मस्य जन्मभूमिः" दया ही श्रेष्ठ धर्म आहे म्हणून "क्षमा वा नेंव सर्वम् साधयति" क्षमा नियमाच्या पालन करण्यांने सर्व सिद्धी होते. "नास्ति दानात् परं धर्मः" दाना पेक्षा श्रेष्ठ धर्म अन्य कोणताही नाही. म्हणून आणि कांही लोकांनी पूजा, जप, ध्यान, संध्या, होमादिकालाच श्रेष्ठ धर्म आहे. म्हणून सांगितले आहे. अनेंक माहात्मे व विभूतिनी धर्माच्या एकेक नियमाला प्राधान्य देऊन तो एकच श्रेष्ठ धर्म आहे. म्हणून सांगितला आहे. वाक् (मुख) पाणि (हात) पाद, गुद, गुह्य हे पंच कर्मेंद्रिय आणि श्रोतृ (कान) त्वचा (चर्म) नेत्र (डोळा) घ्राण (नाक) रसना (जीभ) पंच ज्ञानेंद्रिय, अशा कर्मेंद्रिय ज्ञानेंद्रिय या समूहालाच मानव शरीर म्हणून समजण्याच्या ऐवजी केवल एका हाताला, केवल एका पायाला, केवल एका नेत्राला, असे एकेक अवयवालाच पूर्ण देह म्हणून समजणे अनुचित होत असल्याप्रमाणें धर्माच्या दहा नियमाला पूर्ण धर्म आहे, असे न समजता कोणत्याहि एका नियमालाच पूर्ण धर्म आहे म्हणून कल्पना करणे हे धर्मज्ञानाचा अभाव होय. अहिंसादिक दश नियमाच्या सामूहिक रूपाला पूर्ण धर्म आहे म्हणून श्री जगद्गुरु रेणुक शिवाचार्यानी आज्ञा केली आहे.

धर्म आणि राष्ट्र

चेतनात्मक जीवाना आपल्या सुख समृद्धी साठी एकांगी होऊन न राहाता. अन्य जीवांचा सहयोग प्राप्त करण्याची अपेक्षा

असल्याचे प्रत्यक्ष दिसून येते.

क्रमी कीटकामध्ये गणना असलेले जीव डास, चिलटे, माशा, मधमाशा व मुंग्या आदि सर्व सामूहिक पणे सांघिक रूपानें वास करून राहातात.

कावळे, चिमण्या, पोपट, आदि पक्षी रात्री सामूहिक रूपानें वृक्ष, उद्यान, वन, प्रदेशामध्ये वास करून राहातात. आपल्या दैनिक आहाराच्या प्राप्तीसाठी एकाकी होऊन न जाता थव्या थव्याने (सांघिक रूपाने) संचार करीत असतात,

हरीण, उंट, हत्ती, वनगाई, रानडुकरे, माकड आदी पशु आपापल्या सजातीया मध्ये सामूहिक कळप रूपानें वनामध्ये संचार करीत असतात.

वाघ, सिंह, अस्वल, आदि हिंस्त्र पशु दुसरे आपली हिंसा करतील या भीतीने गिरी, गुहा, घोरारण्यामध्ये सामूहिक पणे वावरत असतात.

या सर्व प्राण्या मध्ये ज्ञानाने अग्रेसर असलेला मानव जन्मा पासून मरणा पर्यंत सांघिक जीवनांविना आपली सुख समृद्धी प्राप्त करणे त्याला साध्य नाही.

शिशू आईच्या उदरातून जनन पावताच त्यास स्तन पान तेवढेच करून त्या शिशू बरोबर न बोलता ध्वनिसंकेत न करता त्याला एकांतात ठेविल्यास त्याचा ज्ञानमय कोष समृद्ध न होता वाचा हीन मुके होईल. या वरून शिशूच्या शरीर, मन, व भावाचे अभिवृद्धी साठी आई, आपल्या काया, वाचे, मना-भावा पासून पोषण करून वाढविते. शिशु मोठा होत होत, घरा-तील बहीण, भाऊ, आई, बाप, आदि सांघिक जीवनाच्या सामूहिक प्रेमाच्या वातावरणात वाढत असते. एकटा एकांत स्थळामध्ये

बसला असता मनाला करमत नसून दुसरा कोणीतरी सोबती पाहिजे म्हणून अपेक्षा होत असते. या वरून मनुष्य जीवना मध्ये व्यक्तिगत सुख समृद्धी साठी सांघिक जीवनाची अतिशय अवश्यकता आहे असे सिद्ध होते.

एका अवस्थे पासून दुसऱ्या एका उन्नतावस्थे मध्ये परिवर्तन होऊन मानव जीवन पूर्णावस्थेला नेणाऱ्या विधी विधानाला धर्म संस्कार म्हणतत.

मानवाला जन्मदारभ्य मरणा पर्यंत धर्म संस्कार होतेवेळी सामूहिक संयमय जीवनामध्ये समर्पण होण्या विना व्यक्तीगत आणि सामूहिक सुख शांती मिळविण्यांस तो असमर्थ आहे.

धर्म संस्काराचा विमर्शात्मक दृष्टीने विचार केला असता, शिशूच्या जनन काली आईला स्वतःच प्रसव क्रिया करणें साध्य नसते. आपल्याहून भिन्नव्यक्तीचा सहयोग पाहिजेच पाहिजे अर्थात् शिशूचा जन्म सांघिक जीवना विना साध्य नाही. स्त्री, पुरुषांना आपल्या वैयक्तीक दांपत्य प्रेमा मध्ये पुत्र संतान प्राप्त झाले तरी त्या शिशूच्या नामकरण संस्कारा मध्ये आपण उभय दंपत्ती असमर्थ आहो; असे समजून गावातील सौभाग्यवतीमहिलांना व पुरोहिताना आमंत्रण देऊन आपल्या घरी बोलावीत असतात. त्याना आसन देऊन गंध, कुंकुम, फल, तांबूल पूर्वक सत्कार करून त्या शिशूचे आई, बाप, विनयान्वित होऊन कांही काल आपला शिशू आहे म्हणविणाऱ्या अहं भावाचा त्याग करून तुमचे शिशू आहे. म्हणून सामूहिक वातावरणात सौभाग्यवती महिलांच्या व पुरोहितांच्या संघ सभे मध्ये अनन्य भावाने दोन्ही हाताने त्या शिशूला समर्पण करीत असतात. त्यावेळी सर्वांनी बहू हस्तानें त्या शिशूला सांघीक शक्ती मध्ये स्वीकार

करून धर्म संस्कार नियमानुसार मंगल आशिर्वचन पूर्वक नामकरण संस्कार करतात. नामकरण केलेले शिशू बहू हस्तानें पुनः आईचे जवळ आल्या नंतर माझे बाळ म्हणून वात्सल्य भावाचा अहंभाव पुनः जागृत होऊन ती त्याची स्वामीनी असली तरी नामकरण संस्कारा मध्ये मात्र अल्पकाल आपले स्वामित्व विसरत असते, शिशू नामकरण संस्करापासून नामधारी होऊन राष्ट्रामध्ये त्याच्या अस्तित्वाची गणना होते. जर केवल आई, बापाकडूनच त्या मुलाचे नामाभीधान झाले असल्यास त्याचे नांव काय असावे? असे कोणतेही एक नाव दुसऱ्यांना कल्पून घेण्यासाठी साध्य नसते, गावांतील लोक कोणीही साक्षीभूत नसल्यामुळे राष्ट्रामध्ये एका नवीन मुलाचा जन्म झाला म्हणून कल्पना करणें साध्य नाही जनन आणि नामकरण संस्कारामध्ये दुसऱ्यांनी साक्षीभूत न राहिल्यास ते शिशू मोठा होऊन हा कोणाचा मूलगा हा कोण असावा? हा कोणाच्या संपत्तीचा अधिकारी होणार? म्हणून समाज कल्पना करतो. राष्ट्राच्या सुव्यवस्थेसाठी कल्पीलेले स्थावर जंगम संपत्तीचे घटक असलेल्या घर, शेत, आदि वस्तू मनुष्याच्या हक्कपत्रांत नोंदणी करणें शासन संस्थेला साध्य नाही. बहुजन समाजाने मान्य केल्याची प्रतिक्रिया म्हणजेच शासन संघ होय.

धर्म संस्कार पूर्वक नाव ठेवलेल्या शिशूचे आई, बाप, माझा मुलगा म्हणून व्यष्टी रूपानें धारण करतात. समाज आमका मूलगा अमक्या नावाचा म्हणून समष्टी रूपाने ओळखतो.

उपनयन (गुरुसन्नीध ठेवणे) आणि दीक्षा संस्कारामध्ये आई बाप ज्ञानार्जन व विद्यार्जनासाठी आचार्य सन्निधी मध्ये गुरु दक्षणा सहित साष्टांग प्रणिपात पूर्वक अनन्य भाव भक्तीने

प्रार्थना करून आपल्या मुलानां समर्पण करीत असतात. माझा मूलगा म्हणविणाऱ्या व्यष्टिरूप अहं भावाचे निरसन करून "तुमचा मुलगा आहे" म्हणून समष्टी रूप व्यापक भावनेत समर्पण केल्याविना आचार्य त्या मुलानां उपनयन व दीक्षा संस्कार करणार नाहीत. आचार्यांच्या गुरुकुल आश्रमा मध्ये मुलानांसमर्पित केल्या नंतर त्या आश्रित बटूला आपला शिष्य समजून दीक्षा संस्कार करीत असतात. मुले घरी आई बापाच्या संस्कारा मध्ये असल्या वेळी माझे घर, माझें बंधू बांधव, माझे गांव म्हणून अल्प क्षेंत्रात वावरत वाढत असतात. ते विद्यार्जना साठी गुरुकुलाश्रमांत शिक्षण क्षेत्रात वास करून असंबंधित सामुदाईक जनसेवा करीत सामुदायीक जनाच्या शिक्षण संस्थेकडून अशन, वसन, शयन आदी व्यवस्था पाऊन विद्यार्जन करतात. आचार्या पासून दीक्षारूप शिक्षण घेऊन त्या दीक्षीत बटूला समावर्तन (सोडमुंज) संस्कार विधि नियमानुसार उपनयन व्रताचे विसर्जन होते, म्हणजे समष्टी व्यापक रूप गुरुकुल आश्रमांतून निवृत्त होतो. पुन:आचार्य त्या शिष्याला स्वगृहाला जाऊन आई, बाप, अतिथी, गुरु, राष्ट्र आदींच्या सेवे साठी आज्ञा करून पाठवीत असतात.

विवाह विधी मध्ये वधू वराचे आई, बाप, विवाह विधी आपणच न करून घेता पुरवासी बंधु, बांधवाना, पुरोहिताना, आचार्यांना अमंत्रण पूर्वक आपल्या घरी बोलाऊन घेत असतात. त्यांना आसन, भोजन, फल तांबूल दक्षणा पूर्वक सत्कार करून वंदन करतात. सर्वांची आज्ञा संपादन करून आचार्यांच्या अध्यक्षते खाली जमलेला सभावृंद संघ शक्तीमध्ये विवाह विधीच्या अनुसार "**कूर्यात् सदा मंगलम् शुभ लग्न सावधान**" असा उभय वधु वराना "ईश्वर सदा मंगल करो" म्हणून आशिर्वाद देतात.

ब्रह्मचर्याश्रमा पासून गृहस्थाश्रमा मध्ये मानवाचे जीवन परिव-र्तन होते वेळी वधुवराचे आई बाप, कांही काल आमची मुले नाहीत तुम्हा दैव जनांची मुले आहेत. म्हणून सामूहिक संघा-मध्ये ते समर्पण केल्या विना विवाह विधान होत नाही. विवाह विधीच्या धार्मिक संस्कारा मुळे वर, वधूला ही माझी पत्नी म्हणून व वधू, वराला माझा पति म्हणून व्यष्टी रूप भावनें मध्ये धारण करीत असतात. मानव समाज, ही स्त्री अमक्याची पत्नी व हा पुरुष आमक्या वधूचा पति म्हणून त्या वधु वराचा नाम रूपादीक सर्व व्यापक रूपाने मान्य करीत असतो.

आता पर्यंत मंगल कार्याचे विवेचन करण्यांत आले. मानवाच्या मरणोत्तर अंत्येष्टी संस्कारामध्ये त्याच्या अंत्य संस्का-रासाठी बंधू, बांधवाना, पाहुण्यांना, पुरवासी लोकाना अमंत्रण पूर्वक बोलावणार नाही. दुःखाची वार्ता ऐकून त्यांच्या दुःखांत सहभागी होण्यासाठी प्रेम भाव दया भावनेने सर्व लोक आपण होऊ-नच येत असतात, जर कोणी नाही आल्यास आणि त्या घरात एक दोघेच असल्यास किंवा विधवा, रोगी, बाल, कुमारी असल्यास? अथवा पुष्कळ लोक असले तरी घरांतील व्यक्तीच्या वियोगाने अपार दुःख झाल्यामुळे त्यांच्या शरीराच्या मनोभावना बलहीन होतात. म्हणून शव धूणें, वाहून नेणें, दहन करणे समाधीकरणें या सर्व क्रिया त्यांना साध्य न रतात. मरणाला साक्षीभूत होऊन कोणी न राहिल्यास त्याच्या उत्तर कालाच्या गृह भाराला हक्क-दार कोण आहेत याचा निर्णय करणें साध्य नसल्यामुळे मानवा-च्या अंत्य संस्काराला ही सामूहिक जन संघाची अत्यंत अवश्य-कताआहे. सारांश जनन, नामकरण, उपनयन, दीक्षा, समावर्तन, विवाह, अंत्येष्टी आदि धर्म संस्कारामध्ये मुख्यतः जन्मापासून,

मरणा पर्यंत मानव जीवन, परिवर्तन होत असल्या वेळी धार्मिक क्षेत्राच्या सांघिक जीवना मध्येच पूर्तता होते. सांघिक जीवन-मानव विकासाला अनिवार्य अवश्यक असल्याचे प्रत्यक्ष आहे. धर्मसंस्काराने उत्तरोत्तर अभिवृद्धी होऊन व्यक्तीगत सुख शांती साठी, राष्ट्राच्या व्यापक सुख शांती साठी अवकाश प्राप्त होत-आहे. जर कांही लोक राष्ट्राच्या योग क्षेमा साठी धर्म हा अना-वश्यक आहे. असे म्हणतील तर? धर्माविना राष्ट्राचे अस्तित्वच संभवत नाही. शासन संघराष्ट्र केवल मानव संरक्षणा साठी नसून मानवातील धर्म रक्षणा साठी आहे. राष्ट्र धर्मनिरपेक्ष नसून धर्म सापेक्षक आहे. उदा :— कृषिकानें अन्न धान्याचे उत्पादन नाही केल्यास दळणें, कांडणें, सडणें, पाक करणें आदी साधन सामुग्री निरर्थक होत असल्या प्रमाणें धर्म संस्कार पूर्वक मानवाना सुसं-स्कार युक्त सुचारित्र्य दैवी गुण मानवता संपन्न नाही केल्यास राष्ट्र मानव समाजाच्या व्यापक सुख शांतीला संरक्षण करण्याच्या कामी असमर्थ होते.

जेथे मानव आहे, तेथे मानवता असणे स्वाभाविक आहे. हिंसा, असत्य, स्तेय व्यभिचार या दुष्कृती संभवल्यास त्या सर्व वस्तू राष्ट्राचे घटक असल्या मुळे राष्ट्र नियामक शासन संघ त्या पाप कर्म प्रवृत्त व्यक्तीला अपराधी समजून बंधनांत ठेवते. आणि मानवी स्वातंत्र्याला परतंत्र करीत असते. अहिंसा सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य या चार, मानवाच्या सुख शांतीच्या चतुः सीमा आहेत. या वरून हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचार राष्ट्र संघालाही मान्य नसल्याचे प्रत्यक्ष आहे. मानवाच्या अंतःकरणात गुप्त पणे सदैव वास करून असलेल्या धर्म रूप नियामक शक्तीचे बाह्यांगच राष्ट्र नियामक शासनसंघाची शक्ती आहे. म्हणजे

मानवाच्या अंतर्भूत असलेल्या त्या नियामक शक्तीचे राष्ट्र प्रतिनिधी स्वरूप असल्याचे प्रत्यक्ष आहे. इंग्लंड, रशिया, अमेरीका, चीन, जपान, फ्रान्स, जर्मन, भारतादि मानव निर्मित लहान मोठी अनेक राष्ट्रे असली तरी, त्या सर्व राष्ट्रांचे राजकारण एकच एक आहे. त्याची भौगोलिक चतुःसीमा वेग वेगळी असली तरी त्या राष्ट्रांच्या राजकारणाची चतुःसीमा मात्र अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, याच होत, या चार धर्म नियमाचे उल्लंघन जे प्रजाजन करतात ते राष्ट्र वाह्य म्हणवितात.

हिंसा असत्य स्तेय व्यभिचार या पाप कर्मकृत अपराध्याना राष्ट्र शासन करण्या पूर्वी मूळ असलेल्या अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य या चार धर्म नियमाचे शिक्षण प्रजा जनाला देऊन सुप्रजा निर्माण करून सुशासन पद्धती अमलात आणणे अवश्यक आहे.

राष्ट्र धर्माचा आश्रय घेऊन शिक्षणा द्वारे प्रजेचा नैतिकस्तर उच्च स्थानाला नेल्याविना जगाला शांती सुखाचा लाभ होणें शक्य नाही. धर्म आणि राष्ट्र हे दोन्ही अनुगामी सह गामी होऊन वर्तन न केल्यास विश्वाच्या सुख शांतीचा विचार निष्फळ ठरतो.

मानव धर्माचे उत्तरांग असलेल्या दया, क्षमा, दान, पूजा, जप, आणि ध्यान या सहा नियमाचे शिक्षण प्रजेला दिल्यानें वैयक्तीक सुख शांती तसेच राष्ट्रात व्यापक सुख शांती निर्माण होते.

राष्ट्राचा योग क्षेम विशेषतः धर्माचे अंग असलेल्या पूजा जप व ध्यान या तीन विधानाद्वारे चालत असतो राष्ट्रपति सर्व प्रजेला पूज्य असून प्रजा त्यांची पूजक व सेवक असते. राष्ट्र पतीचे अंग असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्या पासून क्रमेण

उत्तरोत्तर सर्व अधिकारी लोक परस्पर आदर व पूज्य भावनेत आच-रण करीत करीत अखेर राष्ट्रपतीला सर्व श्रेष्ठ व पूज्य समजतात.

राष्ट्रपतीसुद्धा आपण स्वतः पूज्य व श्रेष्ठ आहे असे न समजता राष्ट्राचे प्रतीक असलेल्या राष्ट्रध्वजाला सर्व श्रेष्ठ मानतो त्याच्या सन्मानार्थ पूज्य भावनेनें वर्तन करीत असतो. राष्ट्रपती आणि सर्व प्रजा राष्ट्रध्वजाला राष्ट्र देवता म्हणून राष्ट्रभक्तीने पूज्य पूजक भावनेंनें वर्तन करीत असतात. ध्वजाचा गौरव तोच राष्ट्राचा गौरव' ध्वजाची पूजा तीच राष्ट्राची पुजा ध्वजाचा सन्मान तोच राष्ट्राचा सन्मान असे समजतात. त्या राष्ट्रध्वजाला गंध, अक्षता, कुंकुम, पत्र, पुष्पमालाद्वारें आलंकृत करून सुगंध धूप घृत कर्पूरदीपारती ओवाळून बहिक्रिया असलेली पूजा संपते. सर्व प्रजा आपल्या मुखाने राष्ट्रध्वजाच्या स्तुती किर्तीचिं गुण गानाचा जप करीत अखेर त्या ध्वजाच्या जय घोषाच्या निनादा-बरोबर वाणीचा विराम होतो. आणि कायावाच्या मनोभावे बहिर्सृष्टीला विसरून राष्ट्रध्वजाच्या नाम रूपाला भावनेंत चिंतन करीत ध्यानासक्त होतात, मात्र यांच्या प्रेमभक्तीला राष्ट्रध्वज जाणत नाही. जसे कमल पत्र जला मध्ये रहात असले तरी जलाचा संपर्क त्याला नसल्याप्रमाणें राष्ट्रध्वज प्रजेच्या नामरू-पात्मक प्रेमाला जाणत नसले तरी राष्ट्रभक्ताच्या प्रेमाच्या विरा-माला ते महदाश्रय स्थान झाले आहे. राष्ट्रपती प्रजेच्या राष्ट्र-प्रेमाला जाणून आनंद मानतो. प्रजाजनाने राष्ट्रपति विषयी दर्श-विलेले पूजा (आदर सत्कार) जप (स्तुती स्तोत्र) ध्यान ह्या क्रिया सगुण साकार रूप आहेत. राष्ट्रध्वज प्रजेच्या प्रेमाला जाणत नाही तथापि प्रजेचे भक्ती प्रेम राष्ट्रध्वजाविषयी सकल राष्ट्राच्या वतीनेंच त्याचा उपयोग होत असतो. राष्ट्र म्हणजे

विशिष्ट नामरूपाने गोचर न होता व्यापक स्वरूपांत भक्तीप्रेमाचा उपयोग होत असल्यामुळे ध्वज पुजा म्हणजे नामरूपातीत निराकार असलेल्या राष्ट्राच्या सूक्ष्म महाशक्तीची पूजा, जप, ध्यान होय.

एका राष्ट्रामध्ये एका नंतर एक अनेक राष्ट्रपति होत असतात. मात्र राष्ट्रसत्ता अखंड असते. ती कधी ही नाश पावत नाही, कोणत्याही प्रकारचे विधान असले तरी त्याचे अस्तित्व सदा सर्वदा असतेच हे बहिर्सृष्टीला दिसत नसले तरी सकल प्रजा त्या राष्ट्र शक्तीला जाणत असते. प्रजा त्या सूक्ष्म राष्ट्र शक्तीच्याठायी राष्ट्रध्वजाच्या वतीने प्रेम भक्ती पूर्वक सामाविष्ट होऊन राहातात, पूजा, जप, ध्यान या तीन नियमामध्येच राष्ट्राचा कर्मयोग चालत असतो. राष्ट्रध्वजा विषयी प्रेम भक्तीचा अभाव होऊन प्रजानास्तीक झाल्यास राष्ट्रामध्ये अल्पकाल अराजकता प्राप्त होते, कर्म योग प्रपंचातील सर्व जीव दुःखानें त्रस्त होऊन सुख शांतीच्या अभावानं त्याचे जीवन जगविणें कष्ट साध्य होते.

राष्ट्राचा कर्म योग (प्रपंच) क्रमाने चालण्यासाठीं राष्ट्राविषयी. राष्ट्रपति विषयी, राष्ट्रध्वजा विषयी सर्व प्रजा अतिशय भक्ती प्रेमाने पूजा जप ध्यान ह्या तीन विधीचे वर्तन केल्या शिवाय राष्ट्रांत सुख शांती लाभणार नाही त्यासाठी राष्ट्र सदा सर्वदा धर्मांकीत होऊन राहावे लागेल. सारांश मानव धर्म हाच राष्ट्र धर्म. राष्ट्र धर्म हाच विश्व धर्म होय,

मत पंथाचे समालोचन

प्रचलित रुढीत असलेली हिंदु, बौद्ध, ख्रिस्त आणि इस्लाम हे चार मते प्रामुख्याने आहेत. गौतम बुद्धाचे अनुयायी

बौद्ध नीरीश्वर वादी आहेत. ते अहिंसा या नियमाचे पालन करीत असतात. यांची मत स्थापना होऊन २५४१ वर्षे झाली आहेत. येशू पासून स्थापित मताला "क्रैस्त" मत म्हणतात. क्रैस्त लोक परमात्मा, निर्गुण, निराकार, मानतात. पुनर्जन्मावर त्याचा विश्वास नाही. त्यांना "बायबल" ग्रंथच प्रामाण आहे. या मता-चा आरंभ होऊन १९७९ वर्षे झाली आहेत, महंमद पैगवरा पासून इस्लाम मताची स्थापना झाली. परमात्मा निर्गुण निराकार आहे. असे महम्मदीय लोक मानीत असतात. पुनर्ज-न्मावर त्यांचा विश्वास नाही. "कुराण" त्यांचा प्रमाण ग्रंथ आहे, त्यांची मतस्थापना होऊन १३८७ वर्षे झाली. आहेत.

हिंदु (वैदिक) मताचे अंतर्प्रभेद शैव-शाक्त, गाणपत्य, सौर, वैष्णव, विश्वकर्मा ही सहा मते प्रामुख्याने आहेत. शिवाची उपासना करणाऱ्यानां शैव, विष्णूची उपासना करणाऱ्यानां वैष्णव शक्तीची उपासना करणाऱ्यांना शाक्त, गणपतीची उपासना कर-णाऱ्यांना गाणपत्य, सूर्याची उपासना करणाऱ्यानां सौर, शिवादि पांच दैवतांची उपासना करणाऱ्याना पांचाळ अथवा विश्वकर्मा म्हणतात. अशा उपासना भेदावरून मत, पंथ, व सांप्रदायाची उत्पत्ती झाली आहे. शैव मतस्थापक आद्य शंकराचार्य होऊन २२५६ वर्षे झाली आहेत. वैष्णव मतस्थापक रामानुजाचार्य याना होऊन ९६१ वर्षे झाली आहेत. मध्वाचार्यांना होऊन ७३९ वर्षे झाली आहैत. मताचार्यांच्या काला पासून विचार केला असता; उपासना भेदावरून मत सांप्रदायाचे विशिष्ट जन समुदाय गट निर्माण झाली आहेत. हे वस्तुत: एकेक विशिष्ट स्वतंत्र धर्म होऊ शकत नाहीत. इस्लाम मता मध्ये पुरुषा सारखे स्त्रीयाना प्रार्थना मंदिराला जाण्या करीता आज्ञा नाही. पुरुषा प्रमाणें स्त्रियाना

कोणत्या हि प्रकारचे धर्म संस्कार होत नाहीत. जैन व बौद्ध, मत सांप्रदाया मध्ये पुरुषाना गुरु दीक्षा, यज्ञोपवीत धारणा, पूजा, जप, ध्यान या विषयी अवकाश असल्या प्रमाणे स्त्रीयाना पुरुषा समान अधिकार नाही. शैव, वैष्णव, शाक्त, सौर, गाणपत्य, इत्यादि वैदिक अवैदिक मत, पंथ व समाजा मधील स्त्रीयानां विशेष स्थान नाही. इहलोक, परलोक, परमार्थ या त्रिविध सुखाच्या प्राप्तीसाठी त्यांनां स्वातंत्र्य नाही. पुरुष आपल्या सुखोपभोगा साठी अवश्यक असलेल्या, घर, शेत, धन, गाई, घोडा. इत्यादिक अनेक जड-चेतन भोग पदार्थ संग्रह करीत असल्या प्रमाणें स्त्री, ही एक विशेष भोग पदार्थ आहे म्हणून समजतात. पुरुषाना उपनयन संस्कार करुन यज्ञोपवीत धारणा, गायत्री मंत्रोपदेश वेद वेदांगाचे अध्ययन, पूजा जप संध्या होमादि नित्य विधीचे पालन व्हावे म्हणून आज्ञा असल्या प्रमाणें स्त्रीयाना उपनयन संस्कार व यज्ञोपवीत धारणा नाही. पूजा जप संध्या होमादि नित्य कर्मानुष्ठानात त्याना अधिकार नाही. कांही लोकानी स्त्री, ही पुरुषांची सह-धर्म चारीणी आहे म्हणून पुरुषानी केलेल्या सत्कर्माच्या पुण्याचे फळ त्याना विनायासे प्राप्त होते म्हणून सांगितले आहेत. स्त्री विधवा अथवा अविवाहित राहून जीवन चालवीत असल्यास? तिला इह, पर, परमार्थ या सुख प्राप्तीचे साधन काय आहे? कांही नाही, पतीनें केलेल्या पुण्य कर्माचे फळ पत्नीला विनायासे प्राप्त होत असल्यास पतीनें केलेल्या पाप कर्माला सुद्धा तिने भागीदार व्हावे लागेल ना? असे सांगणें सृष्टी धर्माच्या समभा-वाला संम्मत होत नाही. हे सर्व मानवी स्वातंत्र्याच्या स्वामित्वा-वर मत सांप्रदाईकांचे अन्याय व अतिक्रमण झाले आहे. स्त्री पुरुष या उभयता मध्ये कर्तृत्व शक्ती स्वतंत्र रूपानें असल्यामुळे

ते आप आपल्या कर्माला आपणच बाध्य होतात. त्या करीता स्त्रीयानाही इह, पर पारमार्थ ह्या त्रिविध सुखाच्या प्राप्तीसाठी साधन असलेल्या धर्माचरणाचे स्वातंत्र्य असणें मानव पदाला भूषणास्पद आहे.

कांही मत पंथीय लोकांनी आपल्या मताच्या अभिवृद्धी साठी दुसऱ्या मतांतील लोकाना प्रायश्चित्त रूपानें शुद्धी संस्कार मूलक मतांतर करून आपल्या मताची संख्या वाढविली आहे. याच्याहि पेक्षा पैशाचिक कृती म्हणजे स्त्रीयांचा बलात्कार पूर्वक अपहार करून आपल्या मतात घेणे आणि मांस, मद्य, सुरा, व्यभिचारादिक दुष्ट प्रमादानें मनाला वश करून मतांतर करणें किंवा कांही सांप्रदायीक लोकानी विद्या हीन लोकाना विद्या, धन हीन लोकाना धन, अन्न हीन लोकांना अन्न, वस्त्र हीन लोकाना वस्त्र, देऊन प्रेम संपादन करून शेवटी त्यांना मतांतर करून आपल्या मताची लोकसंख्या वाढवितात. आणि त्या स्त्री व पुरुषा बरोबर शेवटी लग्न करतात. हे केवळ धर्माच्या अज्ञानतेचा भ्रमच म्हणावे लागेल. असल्या पैशाचिक कृतीच्या साक्षी करीता इतिहास आज-पर्यंत साक्षीभूत आहे.

मत स्थापकानी आत्मा अनात्मा तत्वा संबंधी व मूल शाश्वत मोक्ष सुखा संबंधी विविध कल्पनेने प्रतिपादन केले आहे. चार्वाक मतीय लोकानी देहच आत्मा म्हणून मान्य केला आहे. सौगत मताच्या लोकांनी प्राणच आत्मा म्हणून मान्य केला आहे. जैन मताच्या लोकानी देहादिका पेक्षा विलक्षण असलेला आत्मा देह परिमित होऊन संकोच विकास धर्मानें युक्त असल्याचे मानतात. बौद्ध मतिय लोकानी बुद्धीलाच आत्मा म्हणून मान्य केले आहेत. कौळ यामळ (नाथ पंथी) शाक्त मतिय लोकानी

आनंद मात्रांलाच आत्मा म्हणून मान्य केले आहेत. पांचरात्र वैष्णव लोक आत्मा नाडी मध्यगत असून अणु परिमाण आहे म्हणून मानतात. लौकीक लोक आत्मा, देह, पुत्रादिक रूप आहे म्हणून मानीत आहेत. मीमांसक भेद वाद भाट् प्रभाकर मतिय लोक आत्मा स्वानुभूति प्रमाण ज्ञान समेत आहे. असे मानीत आहेत. न्याय वैशेषिक मतिय लोक आत्मा आकाशा प्रमाणें महत्परिमाण होऊन पाषाणा प्रमाणें जडरूप असून मनःसंयोग बुद्धयादिकाने किंचिद्धर्म आहे म्हणून मानीत असतात. सांख्य पातंजल मतिय लोक आत्मा असंग चिन्मात्र रूप आहे म्हणून मानीत आहेत. अद्वैत वेदांत मतिय लोक आत्मा ज्ञप्ती सत्तामात्र शुद्ध अद्वितीय स्वरूप आहे म्हणून मानीत असतात. पाशुपत कापालीक मतिय लोक आत्मा नित्य व्यापक चैतन्य रूप आहे. म्हणून मानीत आहेत शिवाद्वैत सिद्धांती लोक आत्मा नित्य व्यापक ज्ञान क्रिया रूप आहे म्हणून सांगत असतात.

चार्वाक मतिय लोकानी मरणाला मोक्ष मानिले आहे. जैन मतिय लोकानी आकाशा मध्ये अलौकिक दिव्य सामर्थ्याने उत्तरोत्तर गमनाला मोक्ष मानिले आहे. बौद्ध लोकानी सुखदुःख नसलेली शुद्धी बुद्धी संसक्तीलाच मोक्ष मानिले आहे. कौळ यामळ (नाथ पंथी) शाक्त लोकानी आकाश गमनादि सिद्धी प्राप्तीलाच मोक्ष मानिले आहे. आनंद मार्गीय शाक्त लोकानी आनंद प्राप्तीलाच मोक्ष मानिले आहे. पांचरात्र वैष्णव लोकानी वासुदेवात्मक प्रकृति मध्येस्वरूपाची हानी न होता सशरीरी होऊन तादात्म्य पावणे याला मोक्ष मानिले आहे. लौकीक लोकांनी पुत्र भार्या दिका सह व्याधि दुःख नसता केवल सुखमय होऊन राहाणें यालाच मोक्ष मानिले आहे. पूर्व मिमांसकानी स्वर्गादि पद प्राप्तीलाच मोक्ष मानिले

आहे. नैय्याईक वैशेषिकानी आत्मा शरीर इंद्रियादिक एकेवीस दु:खाचा अत्यंतिक नाश पाऊन पाषाण प्राय होऊन राहणे याला मोक्ष मानिले आहे. सांख्य लोकानी प्रकृति पुरुष विवेकानें अविद्या नाश हेच मोक्ष मानिले आहे. पातंजल मतिय लोकानी योगाभ्यास मूलक मनोलय द्वारा अज्ञानाचा नाश पावणे यालाच मोक्ष मानिले आहे. वेदांत लोकानी चिन्मय ब्रह्म स्वरूप ज्ञानाने व्यवहारीक द्वैत बंध निवृत्तीलाच मोक्ष मानीला आहे. पाशुपत लोकानी अनंत नद्या समुद्रामध्ये आपले स्वरूपाचे ऐक्य पावत असल्या-प्रमाणे सालोक्यादि पदवीच्या अतीत आत्मा ज्ञप्ती मात्र रूप आहे असे मानणें यालाच मोक्ष मानिले आहे. कापालीक लोकानी कर्तृत्व अभिमान हाच संसार मान्य केला असल्यामुळे त्याचे अतीत ज्ञप्ती मात्र स्वरूपानें असणें हेच मोक्ष मानिले आहे सारांश – शैव, वैष्णव, सौर, शाक्त, गाणपत्य, जैन, बौद्ध, चार्वाक, इस्लाम, ख्रिस्त. ज्यू, पारशी, यहुदी, शिख, आदि अनेक मत आहेत. वारकरी पंथ, कबीर पंथ, नानक पंथ, महानुभव पंथ, अशा प्रकारें अनेंक पंथ आहेत. ब्राह्मो समाज, चैतन्य समाज सत्य शोधक समाज, आर्य समाज असे अनेंक आहेत. ह्या जगात अनेंक मत, पंथ, समाज आहेत. देश, काल, परिस्थित्य नुसार मानव धर्माची मूल तत्वेच कांही अंशाने वेग वेगळ्या स्वरूपात वेगळ्या अवस्थेत वेग वेगळ्या भाषेमध्ये - सांगीतली आहेत. मत पंथ सांप्रदाईक लोक परस्परांना सामान्यत: स्पृश्य मानीत असले तरी अन्नोदक ग्रहण करणें, शरीर संबंध वाढविणें हे कार्य आपल्या मत पंथाला विरोधी होत आहे असे मानीत असून ते धर्म बाह्य आहे असे समजतात. व केवल रोटी बेटी व्यवहारा पुरतेच सर्व मतानुयायी परस्परांना अस्पृश्य मानीत असतात.

वस्तु स्थितीचा विचार केला असता खाणें, पीणें मुलगी देणे, घेणे हे धर्मा संबंधीचा विचार नसून हे त्या कालची सामाजिक परिस्थितीच्या लोकानी कल्पित केलेला विषय आहे. धर्मा संबंधीचा गैरसमज होऊन गेलेला आहे. कांही कालांतरानें ह्या मत पंथ समाजाचे विविध कल्पनेनें परस्पर अनुयायी लोकांत अज्ञान मूलक स्पृश्यास्पृश्य, जेष्ठ कनिष्ठ भावनेत द्वेषासूया निर्माण झाल्याचा आहे. धर्माच्या नावाखाली अनंत जीव–हिंसेने रक्तपात होऊन मानव समाज मरून खंड खंड रूपाने दिसून येतो. ह्या मत पंथाचे इतिहासाचे अवलोकन केले असता. चार हजार वर्षा पूर्वी हे कोणत्याही मत, पंथ किंवा समाजाचे अस्तित्व नव्हते. म्हणून स्पष्ट निर्णय होतो. सृष्टीच्या काल प्रवाहा मध्ये मानव निर्मित मत पंथ समाज अनेका नेक उदय पावतील अथवा विलोप होतील मात्र धर्म हा जगदादी काला पासून असून मनुष्याच्या अंगी स्वभाव सिद्ध आहे. धर्म म्हणजे पाप कर्माचा निरोध करून पुण्य कर्माच्या योगाने इच्छित सुख वस्तू प्राप्त करणेंचे साधन होय.

स्पृश्यास्पृश्य मूल विचार

अस्पृश्य म्हणजे शिवण्यास योग्य नसलेला. स्पृश्य म्हणजे शिवण्यास योग्य असलेला असा अर्थ होतो. जी वस्तू शिवण्यास योग्य वाटत नाही ती म्हणजे या जगात मला शिवाय दूसरे कांही नाही. मानवाचे शरीर मलमय आहे. मल मूत्र हे बहिर्मल आहेत. आपण सेवन केलेल्या अन्नोदकाचेच मल मूत्र रूपांने परिवर्तन होते. त्याच्या विसर्जना मध्ये व धुण्यामध्ये तिरस्कार वाटत असल्या कारणाने याला प्रिय वाटत नाही. मलाला स्पर्श करून धुण्याच्या क्रियेमध्ये निरूपाय असल्यामुळे हे कार्य अपरिहार्य आहे असे समजतो. हे बाह्यमल सर्वांना दिसते. परंतु मानवाच्या

मनाच्या अंतराळी सुद्धा एक प्रकारचा मल आहे. तो अंतर्मल आहे. ह्या अंतर्मळाला मानवानी स्पर्श केल्यास दुसऱ्यांना तो अस्पृश्य दिसतो. या अंतर्मलाला मानवाच्या मनाने स्पर्श केल्यास हा मलिन झालेला जगाला दिसून अस्पृश्य होतो. ज्वारी, गहू, बाजरी, साळी, आदि अहार धान्य पिकविण्याच्या कामी त्याना आड येणारे हरळी, कुंदा, इत्यादि दूषित तृण बीज सर्व भूमीच्या अंतराळीच जसे वास करून आहे. त्या प्रमाणे मानवाच्या अंतराळी सुद्धा मल कण असून त्याच्या सुखाच्या प्राप्तीला ते आड येत असतात. मानवाचे मनोमय अंतरिक मल म्हणजे हिंसा. असत्य, चौर्य व व्यभिचार हे चार होत. माझी कोणी हिंसा करू नये ही जन्म सिद्ध नैसर्गिक प्रवृत्ति आहे. म्हणजे अहिंसा हा सुखमय असल्यामुळे स्पृश्य झालेली आहे. हिंसा हा दुःखमय वाटत असल्या मुळे अस्पृश्य झाली आहे, माझ्या बरोबर दुसऱ्यानी असत्य भाषण करु नये अशी ही जन्मसिद्ध नैसर्गिक प्रवृत्ति आहे, सत्य हे सुखमय असल्या मुळे स्पृश्य झाले आहे. असत्य हे दुःखमय वाटत असल्या मुळे अस्पृश्य झाले आहे. सोने, चांदी पैसा, आदी भोग पदार्थांचा दुसऱ्या कडून अपहार केला जाऊ नये अशी त्याची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. म्हणजे चोरी करू नये ही अस्तेय स्पृश्य आहे. चोरी ही अस्पृश्य झाली आहे. दांपत्य जीवनांतील सर्व मानवानी आपल्या पति पत्नीच्या परस्पर प्रेमात दूसऱ्या कडून हस्त क्षेप होऊ नये आणि स्त्रीला आपला पति परस्त्रीच्या ठिकाणी विषय भोग भोगून आपल्या वरील प्रेमाचा अभाव होऊन व्यभिचार प्रमादा मध्ये प्रवेश घेऊन नये. किंवा पुरूषाला आपली पत्नी परपुरुषाच्या ठिकाणी विषय भोग सेवन केल्याने आपल्या वरील प्रेमाचा अभाव होणाऱ्या व्यभिचार

प्रमादा मध्ये प्रवेश घेऊ नये. म्हणून उभय दंपत्तीच्या विचारा मध्ये परस्पर प्रेम योग म्हणून ब्रह्मचर्य हेच स्पृश्य झाले आहे आणि व्यभिचार प्रमाद अस्पृश्य झाला आहे.

सारांश हिंसा, असत्य, स्तेय, व व्यभिचार, हे चार मानवाच्या मनाच्या अंतराळातील मल असून दुःखमय समजून अस्पृश्य झाले आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय व ब्रह्मचर्य हे चार सुखमय होऊन स्पृश्य झाले आहेत. मानवानी आपल्या अंतरिक मलच बहिर्सृष्टी मधील आपल्याहून दुसऱ्या प्राण्या विषयी उपयोग केल्याने हा दूसऱ्यांना नको वाटून अस्पृश्य म्हणवितो. माझी दूसरे कोणी हिंसा करु नये, असे अहो रात्र आपल्या अंतर्मलाला भिऊन राहाणारा आपण मात्र दुसऱ्या जीवांची हिंसा करून दुखविल्यास अंतर्मलाला हा स्पर्श केल्याचे दुसऱ्यानी पाहून हा त्याना अप्रिय वाटून अस्पृश होऊन दिसतो. माझ्या बरोबर दुसऱ्यानी अप्रिय असत्य भाषण करू नये म्हणून असे अहोरात्र अंतर्मलाचा तिरस्कार वाटून भिऊन रहाणारा आपण दुसऱ्या बरोबर असत्य अप्रिय भाषण केल्यास हा सज्जन लोकाला अप्रिय वाटून अस्पृश्य म्हणविला जातो. सोने, चांदी, पैसे आदी आपले उपभोगाच्या वस्तू दूसऱ्या लोकाकडून कदापि चोरल्या जाऊ नयेत. म्हणून अहो रात्र आपल्यांतील अंतर्मलाचा तिरस्कार वाटून भीऊन वागणारा आपण दूसऱ्या लोकांचे पैसे चोरून त्याना दुखविल्यास अन्य लोकाना हा अप्रिय असह्य वाटून तो अस्पृश्य म्हणविला जातो. दांपत्य जीवनांतील स्त्री पुरुषानी दुसऱ्या स्त्री पुरुषा कडून आपल्यावर प्रमाद स्वभावामुळे व्यभिचार प्रवृत्तीचे दुर्विचारांचे संस्कार होऊ नयेत म्हणून अहर्निश आपल्या अंतर्मलाचा तिरस्कार वाटून भीऊन वागणारे दुसऱ्या

दांपत्य जीवनातील स्त्री पुरुषा बरोबर प्रमाद स्वभावाने वर्तन केल्यास ते दुःखित होऊन दुसऱ्याना अप्रिय व असह्य वाटून हे अस्पृश्य म्हणवितात. अस्पृश्य हे मानवाच्या अंतराळातील मल आहे. ते आपल्याहून दुसऱ्या लोका विषयी उपयोग केल्या पासून अस्पृश्यता निर्माण झाली आहे. मानवांच्या मूल सुख शांतीचा भंग करणारे दुर्जीवी पापजीवाना सामूहिक मानव समाजा मध्ये ठेवल्यास त्यांचा संस्कार सुजन लोकांना होऊन त्यांच्या भावनेत दूषित विचारांची प्रेरणा होते. त्या योगाने व्यापक मानव समाजात अनैसर्गिक भावनेचा दूषित व्यवहार वाढून राष्ट्रामध्ये अशांतता निर्माण होते. आणि सन्मानित लोकांचे जीवन कष्टप्रद होत असून शिवाय मानव धर्माचे अस्तित्वच नाश पावते. अस्पृश्यता ही एक जात, मत, पंथ, किंवा समाज नसून हिंसा व्यभिचारादिक हे अंतर्मल सन्मानित दुसऱ्या लोका विषयी उपयोग करणाऱ्या अधम पापी जीवाना सुजन लोका पासून अलिप्तपणे ठेवणे म्हणजे दूरठेवणे आहे. उदा :—पिकविण्यासाठी सेजलाऊन ठेवण्यांत आलेल्या केळी आंबे- आदि फळामध्ये कांही फळे कृमी दोषाने नासून गेल्यास ती नासलेली फळे वेगळी काढून फेकून देत असतात आणि अधुनिक कृषि शास्त्रानुसार गहु, ज्वारी आदि बीज निर्माण क्षेत्राच्या जवळ पास सजातीय पिकाचे क्षेत्र राहू नये असा एक नियम आहे. याचे कारण म्हणजे त्या पिकावर वसलेल्या पतंगानां त्यांतील पराग स्पर्श झाला असल्यास तो पराग वैज्ञानिक बीज क्षेत्रातील पिकावर वसले असल्यास दुर्बल सस्यावरील परागाचे संस्कार होऊन पूर्ण शुद्ध बीजाचे उत्पत्ती होणें साध्य नाही. त्याप्रमाणें प्राचीन कालांतील धर्म क्षेत्रात

मानवाचा विकास हेच मुख्य असल्यामुळे हिंसा, असत्य स्तेय, व्यभिचार ह्या दुष्कृति प्रवृत्त होऊन मातृहत्या, पितृहत्या गुरुहत्या, राजहत्या, योगीहत्या, मंत्रिहत्या, गोहत्या, मातृगमन, भगीनीगमन, पुत्रीगमन, पतिव्रतागमन, आणि मांस, मद्य, आदि मादक पदार्थांच्या सेवन करणाऱ्या महा पातकी दुर्जीवांना अस्पृश्य समजून त्यांना मानव समाजाच्या सामुहिक जीवन क्षेत्रात ठेवल्यास त्या योगाने सर्व लोकांना दुर्विचारांचे संस्कार होऊ नयेत या भीतीने अलिप्त म्हणजे दूर ठेवीत असत. अस्पृश्यतेच्या उत्थानाला मूल कारण हेच आहे. प्राचीन काळी धर्म शासन असल्यामुळे मानवाची जोपासना करण्याच्या कामी ते अती जागृतपणे रहात असे. मानवाचे अधः पतन होऊ नये ही अपेक्षा बाळगून मानव समाजाच्या अंग प्रत्यांगाना लक्ष पूर्वक संरक्षण करण्याचे विधान धर्मसंस्थेकडे होते. मानवांच्या कर्मयोगाच्या सुख सोयीकडे तितके जास्त लक्ष पुरवित नसत. शरीर सौख्याची साधने अतिशय झाली असल्यास भोग प्रविणता जास्त वाढून इंद्रिय सौख्य हेच मुख्य चरम (अंतीम) लक्ष होईल म्हणून या भीतीने मानवांची वेष भूषा देखील साधी होती. इंद्रिय संयम हेच मुख्य असून मनाच्या आंतरिक साधनाने भाव शुद्धीला प्राधान्य होते. त्या योगाने सेवा परायणता, आज्ञा पालन करण्याची कार्यक्षमता, चांगली होती. मुख्यतः धर्म शासना मध्ये मानवाचा विकास हेच अंतीम ध्येय असल्यामुळे त्याला येणारे अडथळे व अडचणी निवारण कर–ण्याच्या विधाना मध्ये ही अस्पृश्यता प्रारंभ झालेली आहे. धर्म शासनाने राजे महाराजे लोकाना गुरु सान्निध्यात गुरुकुलाश्रमांत वास करून जेष्ठ कनिष्ठ राजा रंक क्षुद्र भाव न ठेवीता

समान वस्त्र, समान भोजन, समान शयन अशी सभेत ची शिक
आणि गो सेवा, तपोवन सेवा, आश्रम सेवा अतिथी अभ्या
सेवा, व गुरु सेवा अशा सेवा कार्यामध्ये वावरून भाव शुद्धी का
शुंद्धीच्या योगाने मानव जीवनाचा विकास कसा होतो अ
शिकविलेजाई धर्म शासन असल्या मुळे आई बापाची आज्ञा
राजाज्ञा, गुरुआज्ञा, धर्माज्ञा कोणी उल्लंघन करीत नसत. अ
श्रद्धामय कालात बहिष्कृत लोकाना दूर स्थळा मध्ये ठे
त्याना सपींड समानोदक समजून वर्तन करीत नसत. "सपिं
म्हणजे शुद्ध देही पिंड प्रदान केलेलेल्या रक्त संबंधात समान
असणारे व "**समानोदक**" म्हणजे पाक पानादिका कामी समा-
नता असणारे म्हणून अर्थ होतो. अती कामी, अती क्रोधी, महा-
पातकी दुर्जीवाना पाक पानादिका मध्ये समान भावनेत वर्तन
करीता म्हणजे त्यांच्या कडून अन्नोदक न सेविता प्रत्यक्ष त्यांच्या
कडून सेवा न घेता, त्याना अस्पृश्यते मध्ये ठेऊन झाडणे म
काढणे, चर्मशुद्धी करणे, पादत्राण बनविणे, अशा असंबंधि
सेवा त्यांच्या कडून घेवून त्याना अन्नोदक देऊन संरक्षण करी
असत. अशा कनिष्ठ भावनेत त्याना पाहून त्याना पश्चात्ता
होण्या जोगे शिक्षा करण्याची रीत धर्म शासनात होती श्रद्धा-
मय जीवं आमच्या अपराधाला शिक्षा होणे योग्य आहे आम-
च्याने तशा प्रकारचे महा अपराध व्हावयाचे नव्हते. तथापि
उपाय नाही असले कनिष्ठ नीच सेवा कार्य करून जीवि
चालविण्याने आमच्या पातकाचे क्षालन होऊन शुद्धता होते
अशी त्यांची भावना होती. धर्म शासनामुळे शिक्षित
अपराधी स्त्री पुरुषांना पुरनिवासस्थाना पासून अलिप्त दूर
स्थळा मध्ये ठेवण्यांच्या क्रमात अस्पृश्यतेचे शिक्षा विधान

निर्माण झाले आहे, प्राचीन कालातील अपराधी मानवांना शिक्षा करून ठेवण्यांचे कारागृह म्हणजे जन संसर्गा पासून दूर स्थळामध्ये नेऊन ठेवणें' हे होत. हे धर्म शासनाचे बहिष्कृत कारागृह झाले होते. सध्याच्या मानव समाजाला हे दृश्य विस्मयकारक दिसत असेल. ह्या वर्तमान काळी सुद्धा सामान्य अपराध्यांना कारागृहा मध्ये ठेवणे व आमरण शिक्षित अपराध्याना अंदमान, निकोबार, आदि समुद्रातील बेटावर ठेवणें. हे अद्याप प्रत्यक्ष आहे. मानव समाजात धर्मशासन कांही काला नंतर क्रमेण कमी होत होत गेल्याने व भाव बंधन शिथिल झाल्यामुळे मानवात आत्मीक भीती नाहीशी झाली, आणि भौतिक शास्त्रांच्या योगाने कोणी कोणाला न जुमानता, मान्य न करता, मानवाच्या बुद्धी मध्ये विचक्षणा ज्यास्त झाल्याने भाव प्राधान्य ते मध्ये आज्ञा पालन करण्याची कार्य क्षमता क्रमेण नाहीसी झाली. त्यामुळे अपराध्यांना शिक्षा करण्यांचे विधान व कारागृह निर्माण झाले.

जगात कोणतेही एक तत्व प्रथम उत्थान पावल्या नंतर त्याची साध्यता होई पर्यंत साधन क्रमात कांही थोडीशी सुद्धा न चुकता तपोजीवी होऊन समाज चालत असतो. प्राचीन काला-तील गुरुकुलाश्रम, मठ, मंदिर या धर्मसंस्थेतील आचार्य तपोशील वैराग्यशील, ज्ञानशील असून मानवाचा विकास हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. त्या महा उद्देशाला अडथळे उपस्थित करणाऱ्या महा पातकी, अधम जीवींना बहिष्कार देऊन त्यांना अस्पृश्य म्हणून मानीत असंत. धर्माचार्यांनी योगभ्रष्ट, तपोभ्रष्ट, शीलभ्रष्ट होऊन मठ, मंदिर, गुरुकुलाश्रम ह्या सर्व धर्म संस्था उपभोग्य वस्तू आहेत असे गृहीत धरुन ध्येय शून्य वर्तन करू लागले त्या मुळे अस्पृश्य ह्या तात्त्विक विधानाचा लय होवून अस्पृश्य ही

एक पूर्वीपासून चालत आलेली परंपरागत जात आहे. अशी खोटी कल्पना झाली आहे. हजारो वर्षा पासून मानवाला मानव म्हणून न समजता धर्म शासनाच्या अधिकाराचा दुरुपयोग करून अतिक्रमणाने वर्तन करून धर्मांच्या नावाखाली महा अन्याय केलेला आहे. अधम जीवानी आपल्या कर्तव्य भ्रष्टतेने पतितहोऊन आम्ही अस्पृश्य आहोत असे समजून ते वागत असतील परंतु कर्मयोगातील व्यवहारिक पुर वासिय, सर्व लोकांनी अनेक शेकडो वर्षे त्यांच्या बरोबर भाषण करताना निंद्यभावनेत ठेवून त्यांच्या बरोबर बसणे, उठणे, खाणे, पीणे ह्या सर्व कार्यात हे मानव आहेत असे समजून त्यांच्या बरोबर साम्य भावनेने वागले नाहीत. सामूहिक लोकाकडून सभा सम्मेलनात देखील त्यांना निंद्य व तिरस्कार बुद्धीने वागवण्यात आले. अपराध्याच्या पातकाचे क्षालन झाल्या नंतर सपींड समानोदक म्हणून वर्तन करण्यास त्यांच्या साठी धर्म संस्थेने निश्चीत काल मर्यादा न ठेवल्यामुळे त्यांच्या अल्प अपराधाला महा शिक्षा दिल्या सारखे होईल. हे एक महापातक समजावे लागेल. मातृहत्या, पितृहत्या, राजहत्या, स्त्रीहत्या अशा महा पातकांचा पाप संस्कार मानवाच्या रक्त परमाणू मध्ये किती काल पर्यंत अवशेष होऊन राहील, या गोष्टीचा आम्ही विचार केला असता. अनुवंशीक संस्कार रूपाने कर्म परमाणू येत असतात असे असल्याचे अनुभवास येते. याचे कारण म्हणजे आई बापांतील अनुवंशिक संस्कार मुख, वर्ण, ध्वनी, नाक, ओठ, दात, डोळे, कान, हात, पाय ह्या पैकी कोणतेही एक रूप लावण्या मध्ये उतरून साम्यता दिसून येते, हे निश्चित आहे. यात कोणत्याही प्रकारचा संदेह नाही. आई बापांतील अनुवंशिक संस्कार त्यांच्या मुला मध्ये अर्धा भाग, त्याच्या नातवा मध्ये चतुर्थांश

भाग, अशा क्रमेण कमी होत होत वंशाच्या सात पीढी पर्यंत अनुवंश संस्कारचा संपूर्णतः नाश होतो. रक्त परमाणू मध्ये शुद्धता येते. आणि प्राण, भाव, ह्या चैतन्य कणा मध्ये सुद्धा दुसऱ्या जीवाना बाधा न होण्या सारखे शुद्ध होतात. जसे मोठ्या शहरांतील नहाण्या गटारे या मधील दुर्गंध पाणी सर्व एकत्र जमून कोणत्याही एका ओड्याला नदीला जाऊन मिळाल्यास त्याच स्थानी प्रत्यक्ष उपयोग करण्यास येत नाही. ते पाणी आरोग्याला बाधक होते परंतु तेच पाणी दूर वहात वहात जावून महानदीत व्यापून गेल्यास पाक व पानाला उपयोग केला तरी बाधू शकत नाही. त्याप्रमाणे महा पातकी लोकांच्या रक्ता मधील दूषित प्राण, भाव, कण क्रमेण सात पीढ्या पर्यंत निःशेष होऊन परिशुद्ध होतात, असल्या परिशुद्ध शरीर धारी जीवांना सपींड समानोदका विषयी स्पृश्य म्हणून समजावे लागेल. सपिंड म्हणजे पिंड समानता मध्ये गणनां करून त्याना स्पृश्य समजून त्यांची मुलगी करणे आपली मुलगी त्याना देणे ही प्रेम समानता शारीरिक समानता होय. समानोदक म्हणजे परस्पर लोकानी समान अवस्थेत भोजन करणे व त्यांचे भोजन आपण करणे त्याना स्पृश्य समजून वर्तन करण्यास कोणत्याही प्रकारचा संदेह नाही. कारण मातृहत्या, पितृहत्या, राजहत्या, योगीहत्या, अशा महा पातक करणाऱ्या वर्तमान कालातील पापात्म्यानां अस्पृश्यात गणना करून बहिष्कार घालून सज्जन लोका पासून अलिप्त दूर ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे.

राष्ट्रा मधील अपराधी लोक बंध मुक्त होतात व पुनः नवीन अपराधी लोक कारागृहात जात असतात. अपराध्या करीता कारागृह सदा मुक्तद्वार असल्या प्रमाणे **"मानव विकास"** ह्या

तात्विक विधाना मध्ये अस्पृश्यता ही अत्यंत अवश्यक आहे. धर्म शासन नष्ट झाल्यामुळे मानवांचा विकास करण्याची धर्मशिक्षण-क्षेत्रे नाहीशी झाली आहेत. सध्याच्या धर्म संस्था, मठ, मंदिर,व आचार्य हे सर्व संकुचित अवस्थेत असून मत सांप्रदाईक स्वरूपात आहेत. धर्म हा मानवाच्या सुखसाधनेचे एक विज्ञान आहे म्हणून निर्धारित पणे सांगणारे साहित्य ग्रंथ अधुनिक काली नाहीत आणि त्याला राजाश्रय नाही, पुर्वीचे अस्पृश्य म्हणविणारे आता ते स्पृश्य झाले आहेत. मात्र आत्ताचे नवीन अस्पृश्य म्हणजेहिंसा चौर्य, असत्य, व्यभिचार, ह्या पाप कर्मात पतित व मद्य, मांस, सुरापानादिक प्रमाद स्वभावात वावरणाऱ्या अधम जीवांच्या विषयी विचार करणे कष्ट साध्य झाले आहे. आता पर्यंत मानवाच्या अंतर्मलाचा विचार करण्यात आला या पुढे बहिर्मलाचा विचार करणे अत्यावश्यक आहे. आईच्या उदरातून शिशू जन्म घेवून येत असल्या वेळी मलमय होऊन येते शिशूच्या मनाला त्या मलाचा स्पर्श नाही. परंतु दूर जावून मल मूत्र विसर्जन करण्याचे सामर्थ्य देखील नाही. तथापि आई आपल्या निरतिशय प्रेमाच्या वात्सल्य भावनेत त्या शिशूचे मल मूत्र धूत असते. मुलाच्या ठिकाणी ज्ञानोदय होताच सृष्टीच्या सकल वस्तूना ते जाणत असते आणि त्याचे मल धुणे, तोंड धुणे, दांत घासणे, स्नान करविणे, धूतवस्त्र नेसविणे इत्यादि आईच्या ह्या सर्व क्रिया पाहून वालकांच्या मनांत स्पृश्य अस्पृश्य ह्या द्विधा भावानेचे स्मरण होते. तो पुढे मोठा होऊन कर्मयोग या प्रपंच्यात मानव म्हणवितो. मल मूत्रा साठी दूर जाऊन विसर्जन करून पाण्याने धुऊन स्वच्छ करतो. तोंड धुणे,दात घासणे,स्नान करणे, धूत वस्त्र नेसणे, ह्या सर्व क्रिया शरिराच्या बहिर्मलाचे

शुद्धी करण्यासाठी आहेत. आणि पुन: घर सारविणे, झाड लोट करणे, स्वयंपाकांची भांडी पात्रे घासणे व धुणे, स्नान करून शुचिर्भूत होऊन स्वयंपाक करणे, या सर्व क्रिया अंतर्मनाच्या शुद्धीसाठी आहेत. मानवाच्या मनाला बहिर्मलाचा संस्कार झाल्यास ते मन मलमय होवून हिंसादिक पापकर्म करण्याच्या कामी निणार नाही त्या मलाचा परित्याग झाला नसल्यास शरीरात विकृति होऊन नाना प्रकारचे रोग होत असतात अशा खाण्या पिण्याच्या कर्म योगात सुद्धा स्पृश्य अस्पृशाचा विचार आहे. ऋतुकाली स्त्री अस्पृश्य म्हणविते याचे कारण की ऋतुकाली तिच्या अंगातील रक्त परमाणू दूषित झाले असल्यामुळे तिच्या हाताचे अन्नोदक सेवन करणे योग्य नाही. तिने दुसऱ्यांच्या शिशूला स्पर्श केल्यास त्याला बाल क्षय रोग होण्याचा संभव असतो. तिच्या पतीने स्पर्श केल्यास रोगी संतती जन्म पावते त्याकरीता त्या स्त्रीची अस्पृश्यामध्ये गणणा केली आहे. क्षय, उपदंश, प्रमेह, महा रोग पीडित सर्व लोकाविषयी अस्पृश्य समजून आचरण करावे लागते. नसता रोग परमाणूंचा संस्कार होतो. मांस, मद्य, मादक पदार्थ सज्जन लोकाना प्रिय वाटत नसून अस्पृश्य वाटतात. मांस, मद्य, सेवन करणाऱ्या हिंसक दुर्जीवी कडून अन्नोदक सेवन करण्या पासून त्या पाक पदार्थातील रुची मध्ये रूपांतर होत नसले तरी शरीरा मध्ये दोष उत्पन्न होणे हे प्रत्यक्ष दिसत नाही. आणि हा संसर्ग जड दृष्टीच्या अनुभवाला येणार नाही पण आत्मा व अनात्मा, ह्या ज्ञानाचे अनुसंधान करणाऱ्या साधकांचा भाव अति शुद्ध असल्यामुळे त्याना हा संसर्ग दोष त्यांच्या अंतर्भावनेला आवरण निर्माण करणारा अतिसूक्ष्म मलच आहे.ते अन्न त्याना प्रिय वाटत नाही.

सारांश मानवाच्या अंतर्बहि र्या दोन्ही मलाचे शुद्धी नाही केल्यास मना मध्ये जडत्व प्राप्त होऊन मनाच्या पलिकडे काय आहे? म्हणून विचार करणारी आत्म शक्ती नाश पावते. मानवाच्या अंगी दोन मल स्वाभाविकपणे असले तरी त्याचे शुद्धीकरण नाही केल्यास याचे जीवन नाश पावते.

तिर्थे विवाहे यात्रायां संग्रामे देश विल्पवे ।
नगर ग्राम दाहादा स्पृष्टा स्पृष्टिर्न दुष्यति ।
दीर्घ काष्ठे शिला पृष्ठे नौकायां जान्हवी जले ।
सभायां सत्र शालायां स्पर्श दोषो न विद्यते

(बृहत् पाराशर स्मृति)

मानवाच्या अंतर्शुद्धी साठी जी स्थाने बाधू शकणार नाही ती सर्व स्पृश्य आहेत, म्हणून सांगण्यात येते. महा तीर्थ यात्रेत आगमन केलेले सर्व लोक पवित्र संकल्पात येऊन जमा झालेले असतात. तेथे व्यक्तिगत सुख सौकर्यासाठी कोणी आले नाहीत. या करीता एकमेकानी परस्पर स्पर्श करण्याने दोष होत नाही. मठ मंदिराला अधो भावनेच्या कर्मयोगाच्या सुख प्राप्ती साठी कोणी न येता, गुरु व देवतांचे दर्शन घेऊन कृतार्थ व्हावे या भक्ती प्रेमाच्या ऊर्ध्व भावनेत येत असल्याकारणाने आलेले सर्व लोक तेथे स्पृश्य म्हणविले जातात. एका पक्षाने विचार करून अस्पृश्य ह्या भावनेत मठ व मंदिर, तीर्थ ह्या पवित्रस्थानाला स्पर्श केल्याने त्याच्या मधील पावित्र्य नष्ट होते असे गृहित धरल्यास अपवित्र जीवानां पवित्र करण्यांचे सामर्थ्य त्यात नाही म्हणून समजावे लागेल. जे कोणी मठ मंदिर, तीर्थ स्थानाला दर्शनार्थी होऊन भक्ती भावाने येत असतात ते सर्व भक्तच आहेत. अस्पृश्य नव्हे ही सर्व पुण्य क्षेत्रे मानव लोकांची अंतर्शुद्धी

करणारी साधने झाली आहेत, आणि विवाह, सभा मंडपात येणारे लोक पवित्र संकल्पात येत असल्यामुळे येक मेकाला स्पर्श केल्याने त्याना दोष होत नाही. परंतु व्यक्तिगत जीवन क्षेत्रात असणाऱ्या हिंसा, असत्य स्तेय, व्यभिचारादिक या प्रमाद स्वभावाच्या अस्पृश्याना घरात प्रवेश नाही. असले पाप कर्मी दुर्जीवाना घरात प्रवेश दिल्यास त्यांच्या सहवासाने परस्पर लोकांच्या मनात प्रेमाभिवृद्धी होऊन **"संसर्गजादोष, गुणा: भवन्ति"** या उक्तिनुसार त्यांच्या ठिकाणी असलेले दुराचार दुर्व्यसन ह्या दोषाने घरातील लोकाना संसर्ग दोष होऊन व्यक्तिमय जीवनाचे अध:पतन होईल या भीतीने स्पृश्य दोषाचा विचार करणे एथे अवश्य आहे. प्रकृति मध्ये निसर्गाचा कोप होऊन अन्नाभाव, जलाभाव होऊन मरण्याचे प्रसंगी जीव रक्षण करून घेणे ही फार मोठी गोष्ट आहे. असल्या कठीण प्रसंगी स्पृश्य अस्पृश्याचा विचार करणे आवश्य नाही.

गावात राहाणाऱ्या एखाद्यांच्या घराला आग लागल्यास अस्पृश्याने आत प्रवेश करू नये असे म्हणाल्यास त्या घरातील लहान मोठे प्राणी पशू व धन धान्य सर्व जळून नाश पावेल. अशा संकट काली स्पृश्यास्पृश्य दोषाचा विचार करण्याची अवश्यकता नाही. प्रसंगोपात कोणतेही एका अनपेक्षित कार्य निमित्ताने दीर्घ असलेल्या लाकूड व धोंडयावर बसले असता दोष होत नाही. नदी, सरोवर, समुद्रात, जल प्रयाण करता उपयोगी पडणाऱ्या जहाज नौका मध्ये व रेल्वे, मोटार या वहानात बसल्या वेळी स्पृश्यास्पृश्य या दोषाचा विचार करणे अवश्यक नाही. साधु सत्पुरुषांच्या महा आचार्यांच्या देश भक्तांच्या सभा सम्मेलनामध्ये ज्ञानार्जना साठी येणारे सर्व लोक पवित्र संकल्प धरून येत

त्यामुळे अस्पृश्य म्हणून प्रवेश नाही दिल्यास "नहि ज्ञानेन सदृश ज्ञानाच्या समान ह्या जगात कोणतीच वस्तू नाहीच नाही. अ प्रकारच्या पवित्र ज्ञान प्रदान कार्याला अडथळे निर्माण केल्या महा पातकामध्ये गणना होत असल्या कारणाने सभा सम्मेल मध्ये स्पृश्यास्पृश्य भेद नाही. यज्ञ समारंभाच्या सभा मंडपा जमलेले आचार्यांनी, ऋत्वीजानी, पुरोहितानी, सभावृंद सर्वांचे भाव, मन, काया दैवी भावनेंत प्रेरित होऊन बाह्य विष भोगाना विसरून असल्या मुळे स्पृश्यास्पृश्य दोष नाही. ए सांगण्याचा सारांश व्यक्ति विशिष्ठ अल्प जीवी दुष्ट दुराचा कुसंस्कारी अस्पृश्यांचा सहवास झाला असल्यास त्या योगा अज्ञानी लोकांत प्रमाद स्वभावाची प्रेरणा होऊन दुर्मार्ग प्रवृ होतील म्हणून अस्पृशांचा विचार करणे अत्यावश्यक आहे.आचा साधु सत्पुरुष तत्ववेत्ते संन्याशी आणि ब्रम्हचारी ह्या सर्वां जीवन सदा काळी उर्ध्व भावनेंतील पुण्य कर्मा मध्येच रहात अ त्यामुळे अशा महात्मे लोकाना सर्व लोक स्पृश्यच आहेत. स्पृश्य स्पृश्य हा मूळ धर्म नसून देश, काल, अवस्था ह्या परिस्थित्य नुसार त्याचा विचार असतो मात्र वंश परंपरागत सांप्रदाय नव्हे ही निर्विवाद गोष्ट आहे.

वर्णाश्रम विचार

वर्ण– म्हणजे अर्थ व्यवस्थेसाठी करून घेतलेले प्रभेद आहेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण मोक्षापेक्षी आहेत.आचा ज्ञानादातृ व मोक्षदातृ असल्या मुळे तो अतिवर्णाश्रमी म्हणवि जातात कर्मयोग व ज्ञानयोग ह्या दोन चक्राने संसार रूपी गाडी चालत असतो त्या दोन्ही मधून एक नष्ट झाल्यास राष्ट्रा कर्मयोग थांबून शांती स्थापना होत नाही.

आचार्य ज्ञान प्रदान करून चैतन्य रूपी मानव संपत्तीचा विकास करतो. हिंसादिक पाप कर्म न होण्या जोगो मानवाना धर्म शिक्षण देतो. त्याच्या व्यवस्थे साठी आचार्य पाहीजे. मठ मंदिर धर्म संस्थेची अत्यंत अवश्यकता आहे. राष्ट्रातील प्रजाना ज्ञानप्रदान कार्य सामूहिक रूपाने निरंतर चालावे म्हणून त्या कार्याला अतिवर्णाश्रमी आचार्य व ब्राह्मण वर्ण हे दोन्ही पाहिजे आहेत. राष्ट्राचा कर्मयोग निरंतर चालविण्याकरीता क्षत्रिय रक्षणासाठी, वैश्य व्यापारकरण्यासाठी, शूद्र कृषिकर्मा साठी पाहिजे आहेत. अशा प्रकारच्या राष्ट्राच्या सामूहिक अर्थ व्यवस्थे साठी करून घेतलेले हे प्रभेद आहेत.

ब्राह्मण कोणाला म्हणावे, हा मोठा प्रश्न उद्भवतो. केवळ ब्राह्मण वंशात जन्म घेतल्या वरूनच ब्राह्मण म्हणावयाचे नसते. त्याच्या अंगी ब्राह्मण्यत्व नसल्यास तो ब्राह्मण म्हणविला जात नाही. ब्राह्मण असणाऱ्याच्या अंगी ब्राह्मण वर्ण पाहिजेत व ब्राह्मण्यत्वही पाहिजे "ब्राम्हजानातीतिब्राम्हणः" जो ब्रम्हतत्व जाणतो तो ब्राम्हण आहे. येथे गुण वैशिष्ठ्याला प्राधान्य दिले आहे. परंतु गुण नसता केवळ नामधारी ब्राह्मण असला तर ते ही उपयोगाचे नाही.एखादीशूद्र व्यक्ती सुद्धा गुण विशेषाने ब्राह्मण म्हणविली जाईल परंतु याच्या योगाने ब्राह्मण वर्ण वंश परंपरा असणेची अवश्यकता नाही. म्हणून बहुजन समाजाला अशी शंका येईल. ह्या वर्तमान काळी राष्ट्रांतील प्रजेनांअवश्यक भोग वस्तूंचा अभावहोऊ देऊ नये म्हणून त्यांची वंश परंपरा राखून ठेवण्यात आली आहे, उत्तम जातीची, गाय, म्हैस, शेळी, मेंढी, बैल, घोडा, आदी अनेक प्राणी कोणत्याही समयी सर्वांना प्राप्त व्हावेत म्हणून त्याची वंश परंपरा राखून ठेवून वाढवीत असतात. आणि अन्न धान्या मध्ये

देखील उत्तम जातीच्या गहु, ज्वारी, कापूस, अंबा, केळी, औ
इत्यादि. अनेक जातीतल्या फल मूलांचा शोध करून त्यांची
वाढ करीत असतात. जे उत्तम फल दाई असून राष्ट्रातील
प्रजेना सुखमय होणार आहे त्याची परंपरा राखून समृद्ध
केल्या शिवाय साध्य नसल्या प्रमाणे, ज्ञान प्रदान करणारा
ब्राह्मणवर्ण, गुरु वंश परंपरेच्या रूपांत अवश्य पाहिजे आहे असे
वाटते. आचार्यांनी, वर्णसंपन्न. गुणसंपन्न, धर्मसंस्कारसंपन्न
असावे. ज्ञान प्रदान हे कार्य सर्वांत श्रेष्ठ आहे. ते सर्वांनां पाहिजे
आहे, त्याची वंश परंपरा राखून नाही ठेवल्यास मानव समाजात
अज्ञानाची वाढ होते. क्षत्रीय, वैश्य, शूद्र हे राष्ट्राचे अर्थ व्यवस्थे
साठी योजीले आहेत. या करिता चातुर्वर्ण व्यवस्था अवश्यक आहे
असे सिद्ध होते.

आश्रम– म्हणजे आमरण श्रम करणे, आपले श्रम योग्य कर्तव्या
साठी आमरण उपयोग करणे. ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, व
संन्यास ह्या चारी आश्रमामध्ये आयुष्याची विभागणी करून
वागण्याची योजना केली आहे. मानव आपल्या स्वबुद्धीने आयु
ष्याचा सद्विनियोग करू शकणार नाही. मनुष्याला शंभर वर्षे
आयुष्य कल्पून त्याच्या विनियोगासाठी धर्म शासनाचे बंधन
नसल्यास मरणा पर्यंत भोग प्रवीण होऊन पशुवत् जीवन घालवीत
राहील. पुत्र, दारा, धन ह्या भोग वस्तूंच्या उपभोगांत कोणा
सही संतृप्ती झाली नाही. अजून ही "पाहिजे पाहिजे" अशा या
भोग लालसेला सीमा नाही. मानव विषय सुखाच्या अधो भाव-
नेत अखंडपणे वावरत असणे हे स्वाभाविक आहे. उदा– पाणी
स्वतः आपण होऊन ऊर्ध्वगतीस जाऊन दूसऱ्या जीवनां उपयोगी
पडणार नाही. मानवानें आपल्या कर्तृत्व शक्तीने अधो वाहीनी

पाण्याचा निरोध करून उर्ध्व वाही रूपाने संग्रह केल्यास ते पाणी अनंत जिवांच्या पाक पानाला व पिकाना उपयोगी होऊन संरक्षक होते. त्या प्रमाणे मानवाचा आयुर्भाग हिशेबशीर पणे वाटून त्याचे व्यक्तीगत जीवन उर्ध्व प्रवृत्तीच्या पुण्य कर्मात जावो व त्याचा आत्म विकास व्हावो या उद्देशासाठी आश्रम व्यवस्था करण्यात आली आहे. मानवाने धर्म शासनाच्या आधीन राहून आपल्या आयुष्याचा सद्विनियोग करण्या साठी आश्रम योजना केली आहे. शंभर वर्षाच्या आयुष्या मध्ये पंचवीस वर्षे पर्यंत आचार्यांच्या सान्निध्यात राहून आत्मा व अनात्मा, या विचारांचा–आध्यात्म विद्येचा अभ्यास करणे, व पुढील गृहस्था श्रमात पालन करावयाच्या सर्व नियमाचे ज्ञान संपादन करून विषय भोगांत संय्यमित होऊन रहाणे व ह्या श्रेष्ठ ज्ञानाची प्राप्ती करणे, हाच ब्रह्मचर्याश्रम होय. पुत्र दारा धना मध्ये सदसद्विवेक पूर्वक वर्तन करून आपल्या दैनंदिन कर्मयोगात सत्याने वागणे, आई, बाप, गुरु, अतिथी व राष्ट्र ह्या सर्वा विषयी पंचवीस वर्षे पर्यंत सेवेत तत्पर होऊन राहणे. हा गृहस्थाश्रम होय. संसाराचा भार आपण स्वतः न वहाता आपल्या पुत्र परिवारादिकावर सोपवून त्याना दैनंदिन कर्म योगाचे मार्गदर्शन करीत पति पत्नी उभयतानी विषय संयमतेने राहून पूजा, जप व ध्यान, या पुण्य कर्मात पंचवीस वर्षे आयुष्याचा विनियोग करणे हा वान प्रस्थाश्रम होय. पुत्र, दारा धन ह्या पूर्वाश्रयाचा निरसन पूर्वक सर्वसंग परित्याग करून केवळ स्वसंरक्षणार्थ करतल भिक्षा, तरुतल वास म्हणजे हातात भिक्षा मागून भोजन करणे, आणि झाडाच्या सावलीत वास करून ब्रह्मानुसंधान करणे, आणि मोठ्या गावी पांच रात्री व लहान गांवी एक रात्र याप्रमाणे वास करून तेथील लोकाना

ज्ञानोपदेश व सन्मार्ग प्रवृत करीत पंचवीस वर्षा पर्यंत रहाणे, हाच सन्यासाश्रम होय.

मानव जातीचे विश्लेषण

कांही लोक स्त्री, पुरुष,, ह्या दोनच जाती आहेत असे म्हणतात. परंतु त्या दोन्ही स्वतंत्र जाती नाहीत. स्त्री पुरुष या दोन्हीला "मानव" ही संज्ञा दिली आहे. मानव जातींत स्त्री व पुरुष दोन भाग आहेत. उदा– वनस्पति शास्त्रांत हरबरा, भूईमूग, उडीद, मूग, तूर, मटकी, आदी कांही धान्य द्विदल आहेत. ते दोन्ही दल विभक्त (वेगळे) करून पेरल्यास त्याला अंकुर फुटत नाहीत. उत्पत्तीची कार्यक्षमता त्यामध्ये व्हावयाची असल्यास ते दोन्ही दल अविभक्त ठेऊन वरील आवरणाने युक्त असावे लागतील. त्या प्रमाणे पुरुषांचे अर्धांगी स्त्री, स्त्रीचे अर्धांग पुरुष दोन्ही अर्धांग कर्मयोग प्रपंच्या मध्ये स्वयंचर असले तरी प्रेमातिशयामध्ये, स्त्री पुरुषांच्या दोन्ही अर्धांग अविभक्त स्वरूपाचे समीकरण झाल्या विना संतानोत्पत्तीच्या कार्य क्षमते मध्ये ते समर्थ होणार नाहीत. मानव जात ही एक असून सकल मानवा करिता धर्म हा एकच एक आहे. हा निर्विवाद सिद्धांत आहे. शरीर संरक्षणा करीता अन्नोदक सेवन करण्याच्या कामी स्वाभाविकपणे सर्व मानव पात्र आहेत. त्याप्रमाणे अहिंसादि ध्याना पर्यंत हे दहानियम मानव जातीच्या सर्व स्त्री पुरुषांच्या उन्नती साठी नित्य नियम असून समान अधिकाराने उपयोग करण्यासाठी सर्व पात्र आहेत. अशी श्री जगद्गुरु रेणुक शिवाचार्य यानी आज्ञा केली आहे.

अधुनिक मत पंथीयांच्या पूर्व काली ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर व सरस्वती. लक्ष्मी. पार्वती. अंबिका आदी सकल दैवतांची उपासना सामान्य पणे सर्व मानव करीत असत. अशा विशिष्ट

दैवताचीच उपासना करा दुसऱ्या दैवताची उपासना करू नका म्हणून या जेष्ठ कनिष्ठ भावना त्या काली नव्हत्या. दैवतउपासंना दीक्षा, उपनयन, विवाह, वास्तु, या मंगल कार्यात नैमित्तिक रूपाने करणे त्यांची परंपरा होती. मात्र ब्रह्मोपासना (लिंग) नित्य करीत असत. श्री जगद्गुरु रेणुकादि पंचाचार्य लिंग मुखातून उदय पावून भूलोकात येऊन त्यांनी मानव धर्माचाराचा बोध केला. हे पंच आचार्य सर्व सामान्य जीवा प्रमाणे योनीजन्य मानवनव्हेत. मानव योनीत जन्म घेणे म्हणजे पापकर्मी जीवांचे स्थान आहे. जननेंद्रिय मूत्र पूरति दुर्गंधमय अपवित्र स्थान असल्यामुळे असल्या नीच स्थानी जन्म घेणाऱ्या सर्व जीवांना त्यांच्या पाप कर्माची ही शिक्षाच होय. प्रकृति माता अजिक्य अनंत अपार अनुपम अगणित महिमाशाली असून वैज्ञानिकासही तिचा अंत लागला नाही. मानव भौतिक पंच तत्वांच्या साह्याने साऱ्या जगाची वार्ता एका निमिषार्धांमध्येच जाणू शकतो. भूम्याकाशांत अति वेगाने संचार करणाऱ्या जडपदार्था मध्ये देखील चैतन्य कण गुप्तपणे आहेत. शिला मध्ये बेडूक जन्म पावणे, लाकडामध्ये क्रमी कीटकांची उत्पत्ती होणे. आणि चेतनात्मक मानव प्राणी जडरूपी अन्न पाण्याचे सेवन करून जगणे हे सर्व विचार लक्षात घेतले असता सर्व जड वस्तु चैतन्याचे अंग आहेत. असा बोध होतो.

अत्यंत गूढ चैतन्यं जडमव्यक्तमुच्यते
(सि शि. मणि परिच्छेद–५)

चैतन्यमय प्राणशक्ती ज्या वस्तू मध्ये अत्यंत गुप्तपणे वास करून आहे. ते सर्वजड आहे. असे अनुभवास येते. पंच-आचार्य सर्वशक्ती संपन्न असल्यामुळे दिव्य देह धारण करून भू लोकात अवतीर्ण पावणे त्याना असाध्य गोष्ट नव्हे. तथापि आमच्या जड सृष्टीच्या नियमानुसार सर्व प्राणी मात्रानां जड

वस्तूंच्या द्वारे जन्मास यावे म्हणून त्यांचे शासन आहे. जसा न्यायाधीश अपराध्यांना शिक्षा करतो. आणि तो स्वत: त्या न्यायाचे पालन करतो, त्याप्रमाणे प्राणमय सूक्ष्म शरीर धारी आचार्य केवळ पुण्यमय शरीरी असल्यामुळे लिंग मुखातून अवतीर्ण पाऊन लोकानुग्रह कार्याची पूर्ती झाल्या नंतर पुन: त्याच लिंगमुखात सशरीरी होऊन अंतर्धान पाऊन आपल्या प्रमथ लोकाला गमन केले आहेत.

आचिनोति हि शास्त्रार्थानाचरे स्थापयत्यपि ।
स्वयमाचरते यस्तु स आचार्य इति स्मृत: ।।
सि. शि. मणि दीक्षा गुरु स्थल)

जो शिष्य समुदायाला धर्म शास्त्राच्या रहस्यार्थाचा बोध करतो. व धर्माचाराची स्थापना करून प्रचार करतो, आणि जो स्वयमेव आचरण पूर्वक वागतो. तोच आचार्य म्हणवितो. श्री पंचाचार्य मानव धर्मातील ज्ञान क्रियाचारांची स्थापना करून अखिल मानव जातीचे आचार्य झाले आहेत. उदा-गणित शास्त्राचे मूल सिद्धांतात आय, व्यय, अवशेष, -असे तीन भाग आहेत. पदार्थां मध्ये तोल करणाऱ्या वस्तूमध्ये व अनेक भाषामध्ये विविधता असली तरी गणित शास्त्राच्या उत्तरा मध्ये मात्र भिन्नता नसून एकच आहे. त्याप्रमाणे प्रत्येक मानवाच्या अंगी पंच ज्ञानेंद्रिय, पंच कर्मेंद्रिय, मन, बुद्धी, चित्त, अहंकार, चतुष्टय व काम क्रोधादि षड्विकार सर्व समाविष्ट आहेत. निसर्ग शक्ती सर्व मानवाना एकाच निग्रह शक्तीने नियंत्रण करून संरक्षण करते. सर्व मानवांच्या ठिकाणी मूल "नित्य स्वाभाविक आत्म तत्व" एकच स्वरूपाचे आहे. मानवाच्या सर्व सुखाच्या प्राप्तीसाठी धर्म सुद्धा एकच एक आहे. मानव धर्म शास्त्राचा प्रयोजनात्मक विषय परि समाप्त होतो.

- धर्माचे प्रमेय -

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः ॥

(सि. शि. मणि धर्माचार स्थल)

भूत, प्राण, भाव तत्वाचा विमर्श

ही चराचर सर्व सृष्टी भूत प्राण भाव अशा तीन प्रकारानी युक्त आहे. प्राणा पासून वायू, वायु पासून अग्नि, अग्नि पासून जल, जलापासून पृथ्वी असे पंच महाभूत अधो वाहीनी होऊन उत्पन्न झाले आहेत. हे पुनः क्रमेण उर्ध्व गतीनें पृथ्वी तत्व जला मध्ये, जलतत्व अग्निमध्ये, अग्नितत्व वायुमध्ये, वायुतत्व प्राणा मध्ये असे रूपांतर होत होत समरस पावतात. म्हणजे प्राणतत्वच अधो वाहिनी क्रिया मध्ये भूत सृष्टीच्या रूपाने भासमान होते. ही पाच तत्वे सामान्य व विशेष अशा दोन प्रकारे चालत असतात.

पृथ्वी समष्टी रूपांत असून अंतरिक्षा मध्ये अणु रूपांत आहे. जलतत्व समुद्रादि महा जलाशया मध्ये विशेष रूपाने असून इतर स्थानी ते जलकण सामान्य रूपाने आहेत. अग्नितत्व सूर्य गोला मध्ये विशेष रूपाने असून जल, स्थल, आकाशादि सर्व स्थाना मध्ये सामान्य रूपानें आहे. वायुतत्व अंतरिक्षामध्ये विशेष रूपाने वाहात असून जड चेतन सर्व प्राण्यांच्या रक्षणासाठी सामान्य पणें वाहात आहे.

प्राण तत्वाच्या समस्त कार्यानां अवकाश दिलेले भाव तत्व आहे. उदा – साखर व त्यातील गोडी यादोन्हीस वेगळे करता येत नसल्या प्रमाणें प्राण आणि भाव ही दोन तत्वे अविना भाव संबंधानें आहेत. प्राण तत्व जल, स्थल, तरु, लता,

काष्ठ पाषाणादि अचेतन वस्तूंच्या ठिकाणी सामान्य पणें असून पशू पक्षादि चेतन जीवांच्या अंगी भार वाहणें चलन, धावन, स्फुरण इत्यादि क्रियारूपाने विशेष अनुभवास येते.

मानवेतर सर्व सृष्टी सामान्य भाव तत्वाचा असून मानवाच्या मननात्मक क्रिया मध्ये चैतन्यभावतत्व, विशेष रूपाने आहे. मानवादि चेतन जीवांचे पंच भूतात्मक जड शरीर अति सूक्ष्म प्राण, भाव तत्वाने युक्त असल्या मुळे हे स्वयं चेतन जीवी झाले आहेत. जसे परिशुद्ध वायु तत्वाचे जल होऊन पुन: तेच अत्यंत कठीण रूपात (बर्फ) हिम होत असल्या प्रमाणे अति सूक्ष्म असलेले मूल, भाव व प्राण तत्वे अनंत नाम रूपमय जगद्रूपानें दिसत असतात.

मानवाचे स्थूल शरीर अति सूक्ष्म प्राण भाव तत्वाने युक्त आहे. प्राणतत्व स्वयं चेतन नसून ते जड आहे. परंतू भाव तत्व स्वयं चेतन आहे. त्या कारणाने प्राण तत्व कार्य रूपाने चलन पावण्या करीता भाव तत्वाची प्रचेतना अवश्यक आहे. भाव तत्वाची प्रचेतना म्हणजे इच्छा ज्ञान, क्रिया, ह्या शक्तीचे उत्थानच होय. भाव तत्वा मध्ये इच्छा, ज्ञान,क्रिया शक्ती उत्थान पावताच प्राण तत्वा मध्ये व्यापून मनाच्या वृत्ती व्यापक रूपाने परिणामकारी होतात. उदा – अंब्याचे झाड ही वृत्ती भावनेत उत्थान होताच त्या झाडाचे फाटे, पाने, फुले, फळे आदि झाडाचे रुप दिसणे हे प्राण तत्व होय, अनंत नाम रूप वृत्ती ज्या वस्तूत जन्म पाऊन आश्रीत झाल्या आहेत ते भाव तत्व होय. वृत्ती म्हणजे भाव तत्वाची ग्रंथी होय. प्रपंचातील सर्व वस्तु एकेक वृत्तीच आहेत. उदा – पाण्याला जल, वाटर, नीरू अशा भाषा भेदाने विविध नांवे असली तरी मूल पाणी ही व्रत्ती रूप

वस्तू मध्ये भिन्नाभिप्राय नाही. व प्रत्यक्ष दिसणाऱ्या पाणी या वस्तू मध्ये ही भिन्नता नाही. भावनेत गोचर होणारे पाणी ही वस्तू जगांतील सर्व मानवाना एकाच रूपाने अनुभवास येते. पाण्याला पाणी म्हणून समजणाऱ्या वन वृत्तीलाच मन म्हणतात. शिशूची भावना जन्मत: सृष्टीतल्या कोणत्याहि वस्तूना न जाणणाऱ्या आवस्थे मध्ये असते. आई, वाप, भाऊ, वहीण, आदि सृष्टीचे वहीर्जीवी सर्व त्याच्या बरोवर बोलून बोलून अनेक वस्तूना दाखवीत त्याच्या अंतर्भावाला वहिर्मुख करून अनंत वस्तूंच्या कल्पना रूपी वृत्तीचे संस्कार करीत असतात. शिक्षण म्हणजे सृष्टीच्या वस्तू मधील गुण स्वभावाविषयी शाब्दिक रूपाने कल्पून घेतलेल्या वहिर्वृत्ती होत, आणि ज्या शिक्षका–कडून अभ्यास करून आपल्या व्यापक भावक्षेत्रात संग्रहित-केल्या जातात. अशा प्रकारच्या अनंत वृत्याकाररूपाने वाहत असणे यालाच मन म्हणतात. भाव तत्व वहिर्मुख होऊन वाहत असल्या वेळी त्या मनाला अनंत वृत्तीचे संस्कार घडून आवरण होत असल्यामुळे परिमित शक्तीने युक्त असते. परंतु तोच भाव अंतर्मुख होऊन व्यापक भाव क्षेत्राच्या आवकाशात गेले असल्यास तो भाव वहिर्सृष्टीतल्या नाम रूपाच्या वृत्याकार अवस्थेला विसरून विशालत्व संपादन करून या सृष्टींतील जीवांच्या बुद्धीला गम्य न होणाऱ्या, नकळणाऱ्या ,न दिसणाऱ्या वस्तूनां देखील दिग्दर्शन करीत असतात. रेडिओ, टेलीव्हिजन, अणुपरमाणूंचे संशोधन कांही काळा पूर्वी नव्हते. त्या संशोधकाचा भाव, कारण रूपांत असणाऱ्या सृष्टीचे मूल बीजाणु कार्य रूपांत प्रत्यक्ष करून घेतले आहे. त्यालाच संशोधन म्हणतात. त्यानंतर त्या संशोधनाचे अनुकरण करून त्याची परंपरा मानवाच्या मनांत

वृत्ती रूपाने संग्रहीत होते. भाव तत्वाच्या अंतरात ईच्छा, ज्ञान, क्रिया शक्ती पुत्र दारा धनादि अनंत वृत्ति रूपाने युक्त आहेत. भावनेतील, बायको नावाची वृत्तीच बहिर्सृष्टीतील व्यक्ती विशिष्ट स्त्री रूपात वास केलेल्या भाव चैतन्याला आपल्या शरीर इंद्रिय-द्वारा डोळ्याने पाहून, कानाने ऐकून हाताने स्पर्श करून आनंद-मानतो. परस्पर जीवांचे इंद्रीयज्ञान म्हणजे शरीराच्या अंत-र्भागांत वास केलेल्या भाव चैतन्याचा संगम करणारे साधन आहे. उभय जीवांच्या भाव संगमात सुखाचा अनुभव होतो. या सुखा-मध्ये मी तू या द्वैत भावाचे निरसन होते.

उदाहरणार्थ – गहू, ज्वारी, बाजरी, हरबरा, आदि धान्य अहारा-साठी उपयोगांत आणावयाच्या क्रमात दळणे, कांडणे, पाक बन-विणे, ह्या साधनाद्वारे भोजनकरून संतृप्त होणारी क्रिया ही धान्याचे विभाजन आहे. अखंडपणे चालणाऱ्या या विभाजन क्रिये मध्येंच त्यांतील कांही बीज भूमीच्या उदरांत पेरून संग्रहित केल्यास त्या बीजांतील विशिष्ट नामरूपाकृती विशाल भूमी-क्षेत्रात समावून कांही काळ व्यापून जाते. नंतर क्रमाने अंकुर सस्य, पत्र, पुष्प, फल, ह्या अनंत रूपाने विकास पाऊन भोग विभाजनाला सहायक होते. या प्रमाणे. पुत्र दारा धनादिकाच्या सुख दुःख भोगामध्ये अखंडपणे भ्रमण करणाऱ्या एकदेशी अधो भावाचा निरोध करून. इच्छा, ज्ञान, क्रिया, या कर्तृत्व-शक्तीने, माता, पिता, गुरु, अतिथी, राष्ट्र, ईश्वर या व्यापक उर्ध्व भावनेत उपयोग केल्यास, तो भाव सुखदुःखमय नाम रुपाला विसरून प्रकृतीच्या व्यापक भाव क्षेत्रात प्रवेश करून पुण्यमय प्रच्छन्न शक्ती निर्माण होते. ती शक्तीच पुत्र, दारा, धनादि नाम रूपमय इच्छित भोग रूपाने आपल्या प्राणमय सूक्ष्म शरिरा-

मध्यें संग्रह करून राहातात. पुन: जन्मांतराने माता, पिता, बायको मुले, भाऊ, बहीण, इष्ट, मित्र, या विविधरूप चैतन्यमय शरीर पात्र द्वारे परस्पर जीवानी सुख अनुभवणे हे मागच्या जन्मी उर्ध्व-भावनेत उत्पन्न झालेल्या प्रच्छन्न शक्तीची प्रतिक्रिया स्वरूपाचे भोग विभाजन होय.

शेतकरी गहू, ज्वारी, आदि मूल धान्य पेरतो. प्रकृती त्या एका बीजाला अनंत बीजाच्या रूपाने प्रत्येक बीजावर रक्षण कवच (आवरण) ठेऊन उत्पादन करीत असते. त्याप्रमाणे एकदेशी भावमय जीवाच्या ठिकाणी बीज रूपानेअसणारी इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्ती समष्टी (व्यापक) रूप ऊर्ध्वभावक्षेत्रात पेरल्यास (उपयोग केल्यास) ती वाढून तिच्या प्रतिक्रिया स्वरूपात म्हणजे पती, पत्नी, मुले आदी भविष्य काली (जन्मांतरी) चैतन्यमय शरीराच्या रूपाने अनंतविध भोग प्राप्त होतात. **उदा**— जसे शेतकरी भूमीत एक बीज पेरून अनंत बिजाचे उत्पादन करतो. आणि पृथ्वी व्यापक क्षेत्र असून बीज त्या पृथ्वीचा अंशमय भाग आहे. समष्टी भूमींत व्यष्टी बीज पेरल्याने ते बीज व्यापक क्षेत्रांत आपले आस्तित्व गमावून पुन: ते बीज अनंत रुपाने प्रकाशित होते. या प्रमाणे ह्या वर्तमान काली प्रकृतीच्या व्यापक भाव क्षेत्रात मानवाने आपल्यांतील अल्पशक्तीच्या उर्ध्व भावाचा उपयोग केल्यास भाव रूपी बीज नामरूपातीत होऊन समृद्ध होतो. आणि भविष्यकाली (जन्मांतरी) तो भाव विविध भोग पदार्थाच्या रूपाने प्रकाशित होऊन अधो भावनेत विभाजन होतो.

सुख म्हणजे परस्पर जीवानी इंद्रियद्वारे भाव संगम करणे हे होय. आई, बाप, बायको, नवरा, मुले, भाऊ, बहीण, आदी शरीरधारी जीव प्रत्यक्ष पणे सुखमय वाटत असले तरी

परस्पर जीवाच्या भावनेचा हा परिणाम आहे. **उदा** – बायको एक स्वतंत्र अवस्थाच आहे असे मानावें तर बायको नावाची वस्तु निर्दिष्टपणे नाहीच नाही. याचे कारण बालपणी ही मुलगी कुमारी होती. हा मुलगा ब्रह्मचारी होता. लग्न विधीच्या योगाने पति, पत्नी अवस्था प्राप्त झाली आहे. तीच स्त्री आपल्या मुलाला आई झाली. बापाला मुलगी झाली. भावाला बहीण झाली आजाला नात झाली बायको ही अवस्था निर्दिष्टपणे असती तर विविध जीवाना विविध प्रकारे सुखमय होऊन दिसली नसती नवरा ही एक अवस्था निश्चित पणे आहेच असे समजावे तर तो आपल्या आई, बापाला मुलगा होतो. बहिणीला भाऊ होतो. सासु सासऱ्याना जावाई होतो. आपल्या नातुला आजोबा होतो. या वरुन कल्पना होते की आई, बाप, नवरा, बायको, भाऊ बहीण, सासु सासरे, इष्टमित्र सर्व एक व्यक्ती विशिष्ट भाव चैतन्यच अनेक जीवाना विविध प्रकारे प्राकृतिक नियमानुसार सुखाचा अनुभव देतो. एका पुरुषाची पत्नी दुसऱ्या पुरुषाची पत्नी होऊ शकत नाही. एका स्त्रीचा नवरा दुसऱ्या स्त्रीचा नवरा होऊ शकत नाही. आपली बहीण दुसऱ्यांची बहिण होऊ शकत नाही. आपला बंधु दुसऱ्याचा बंधु होऊ शकत नाही. आपली माता पिता दुसऱ्याचे माता पिता होऊ शकत नाहीत परस्पर जीवांना प्राकृतिक शासना प्रमाणे सुखमय भोगाचा अनुभव घ्यावा लागेल. आई, बाप, बायको, नवरा, मुलगा, भाऊ बहीण, सासू, सासरे आदि जीवचैतन्य हे सर्व भोग पदार्थ म्हणविले जातात. भोग पदार्थ ह्या सृष्टी मध्ये विकत मिळू शकत नाहीत. व परस्पर जीव आपल्या स्वेच्छेने बदलू शकत नाही. प्रत्यक्ष त्या वस्तूंच्या रूपाने सुखदुःखाचा अनुभव घ्यावाच लागेल.

उपभोग पदार्था मध्ये समाविष्ट असलेल्या घर. शेत, बैल, गाय, घोडा, म्हैस. चांदी, सोने, पैसा सेवक आदि सर्ववस्तू आपल्या इच्छे प्रमाणे बदल करून उपभोग घेऊ शकतात. आमचे शेत दुसरे विकत घेतात व आपले शेत म्हणतात आमची गाय दुसऱ्यांनी खरीदी घ्यावी व आपली गाय म्हणावी. आपले घर विकल्याने दुस-याचे घर होते. सारांश उपभोग पदार्थ मनुष्य आपल्या स्वेच्छेने बदलु शकतो. आमच्या गाईला दुसरे लोक ही गायच म्हणतात. आमच्या शेताला दुसरे लोक शेतच म्हणतात. आमच्या घराला दुसरे लोक घर म्हणूनच समजतात. पदार्था विषयी सर्व मानवाचा अभिप्राय व भावना एकच आहेत. उपभोग वस्तु गाय तिने दूध दिले तर सुख, नाही दिले तर दुःख होते. सेवकाने योग्य काम केले तर सुख, नाही केले तर दुःख होते. बैल कामाचा असला तर सुख होते. बिना कामाचा असल्यास दुःख होते. ह्या सर्व उपभोग्य वस्तूच सुखमय नसून त्या वस्तू कडून दुसऱ्या वस्तूची अपेक्षा असते. मात्र भोगवस्तू तशा नसून केवळ त्या वस्तूच सुखमय वाटतात. वायको नवरा परस्पर सुख-मय आहेत. आई बापाला मुलगा सुखमय आहे. भावाला बहीण, मित्राला मित्र सुखमय आहेत. प्राकृतिक नियमानुसार सुख दुःख रूपाने अनुभवणारा मुख्यतः भावच आहे.

ह्या भाव तत्वाचा विचार केला असता, मन ही वस्तू वृत्त्याकार रूपाने सदा वहात आहे. मन वृत्त्याकार होण्याच्या कार्याला जी वस्तू कारण आहे त्याला भाव म्हणतात. उदा – धोंडा व लाकूड हे दोन्ही मूलतः निसर्ग जन्य पदार्थ आहेत त्या पदार्थाला मानवी मनाचा संस्कार होऊन त्या धोंडचा व लाक-डाचे जाते, उखळ, कोने, स्त्री पुरुषादी अनेक मूर्ती व कपाट

पाट, चौकट, सर, खांब, कडचा, किलच्चण आदि अनेक वस्तू निर्माण होतात. धोंडा व लाकूड दोन्ही निसर्गजन्य वस्तू कारण रूप असून वरील सर्व वस्तू त्याचे कार्य रूप आहेत. पूर्वी त्या मूळ वस्तूला धोंडा व लाकूड हे नांव होते. परंतू मूल नांव विसरून ना: संबोधलेल्या नाम रूपाने ओळखले जातात. या प्रमाणे कारण अव-स्थेतील भाव द्रव्यात इच्छा, ज्ञान, क्रियाशक्तीच्या योगाने कार्य रूपात वृत्ती रूपानें वाहणाऱ्या क्रियेला "मन" ही संज्ञा आहे.

जीवाचे पृथःकरण

मानव जीवाचा विचार केला असता, भूत, प्राण, भाव या तीन अवरणांनि तो युक्त आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश पंच तत्वाचे स्थूल शरीर हे भूतावरण आहे. या जड शरीराला धारण करणारा म्हणजे त्याला विकृती न होऊदेता रक्षण करुन चेतना देणारे सूक्ष्म शरीर हे प्राणावरण आहे. भूत प्राण ह्या दोन्हीला प्रत्यक्ष कार्य स्वरूपांत योजना करून देणारे कारण–शरीर भावावरण आहे. उदा – मानवास विशिष्ट स्थानाला जावयाची आपेक्षा झाल्यास अंतस्थ वृत्ती रूपानें संदेश देणारे एक भाव तत्व आहे. संदेश मिळताच हस्त पादादि अवय-वाना चेतना देणारे प्राण तत्व आहे. आणि प्रत्यक्षात शरीराने चालणें भूत तत्वाचे कार्य आहे. कोणतेही एखादे कार्य करावयाचे असेल तर भाव तत्वा विना संभवणार नाही.

भाव तत्वाचे प्रकर

कार्य परत्वे भाव तत्वाचे चार प्रकार आहेत. ते असे ऊर्ध्वभाव, अधोभाव, नैसर्गिकभाव, अनैसर्गिकभाव,

ऊर्ध्वभाव म्हणजे ज्या भावाच्यायोगाने असे कर्मकेले जाते की ज्याचे फळ ह्या वर्तमान काली न मिळता भविष्य काळी

(जन्मांतरी) भोगण्या करिता शिल्लक राहाते. उदा – माता, पिता, आचार्य, अतिथी राष्ट्र, इष्टदेवता,, ईश्वर आदी पूज्य लोकांची सेवा करतानां जो भाव असतो तो उर्ध्व भाव होय. अधोभाव म्हणजे जीवाच्या ठिकाणी भूत कालीन (पूर्वजन्म) प्रच्छन्न अवस्थेत असलेले भोग ज्या कर्माच्या योगाने विभाजन होतात. ते कर्म करण्याला अवश्य असणारा भाव अधोभाव होय. उदा – पती, पत्नी, पुत्र, पौत्र, धन, कनकादि वस्तू संबंधी सुख दुःखाचा अनुभव येणे हाच अधोभाव होय.

नैसर्गिक भाव म्हणजे आपल्या स्वाभाविक इच्छेनुसार आपण दुसऱ्याशि वर्तन करताना जो भाव दुःखोत्पादनाला अवरोध करून सुखोत्पादनाला योग्य पात्रता निर्माण करतो तो नैसर्गिक भाव होय. उदा – आपणास दुसऱ्यानी हिंसा करू नये हा भाव स्वाभाविक असल्या मुळे आपण दुसऱ्याची हिंसा करू नये म्हणणारा अहिंसा भाव नैसर्गिक आहे. आपल्या बरोबर दुसऱ्याने असत्य बोलू नये. अशी इच्छा सर्वांला स्वाभाविक असल्यामुळे आपणही दुसऱ्या बरोबर असत्य असह्य अप्रिय भाषण करूनये म्हणणारा जो भाव तो भाव नैसर्गिक भाव होय. आपल्या उपभोग वस्तू दुसऱ्यानें चोरूनये असे वाटणे हा भाव स्वाभाविक असल्यामुळे आपण दुसऱ्यांची वस्तू चोरुनये म्हणविणारा अस्तेय भाव हा नैसर्गिक भाव होय, दांपत्य जीवनातील स्त्री पुरूषानी आपली पत्नी परपुरूषा बरोबर व आपला पति परस्त्री बरोबर कामुक विचाराची प्रेरणा करू नये म्हणणारा भाव स्वाभाविक असल्या मुळे आपण अन्य स्त्री पुरुषांच्या ठिकाणी अशुद्ध प्रेमाचा उपयोग करू नये म्हणविणारा ब्रह्मचर्य भाव नैसर्गिक भाव होय,

अनैसर्गिक भाव--म्हणजे. आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीच्या विरुद्ध दूसऱ्याशि वर्तन करतानां जो भाव उदय पावतो आणि जो भाव केवळ वर्तनमान काली म्हणजे या जन्मी मात्र सुखाचा अनुभव येऊन भविष्यकाली म्हणजे जन्मांतरी त्याचा परिणाम दुःखाच्या रूपाने विभाजित होतो. तो अनैसर्गिक भाव होय.

उदा-- आपल्याला दुसऱ्यानी हिंसा करू नये ह्या नैसर्गिक भावा विरूद्ध आपण दुसऱ्याची हिंसा करावी म्हणविणारा भाव अनैसर्गिक भाव होय. आपल्या बरोवर दुसऱ्याने असत्य बोलूनये ह्या नैसर्गिक भावा विरुद्ध आपण दुसऱ्याशी असत्य, अप्रिय, असभ्य भाषण करू नये म्हणविणारा भाव हा अनैसर्गिक भाव आहे. आपल्या उपभोगाच्या वस्तू दुसऱ्यानी चोरूनये ह्या नैसर्गिक भावा विरूद्ध आपण दुसऱ्याची वस्तू चोरी करणे स्तेयात्मक अनैसर्गिक भाव आहे. दांपत्य जीवनांतील स्त्री--पुरुषानी आपली पत्नी पर-पुरुषा बरोबर व आपला पती परस्त्रीशी विनय भंग व अब्रह्मचर्याचे वर्तन करूनये म्हणविणाऱ्या नैसर्गिक भावा विरूद्ध आपण अन्य स्त्री. पुरुषाशी व्यभिचार प्रवृत्तीने वागणे अनैसर्गिक भाव होय. या भाव तत्वाच्या विकास करण्याच्या साधनेला मूल्य असे म्हणतात.

मूल्य-- कोणत्याहि एका सुख दुःखाचा भोग असो, अगर कोणताहि एक पदार्थ निर्माण करावयाचा असो, अथवा त्याची प्राप्ती करावयाची असो- त्या करिता ज्या द्रव्यांचा उपयोग होतअसतो त्याना मूल्य म्हणतात.

एक साध्य द्रव्य, तीन साधन द्रव्ये अशी चार द्रव्ये मिळून मूल्य निष्पन्न होते.

साध्यद्रव्य -- मानवाच्या इच्छेत सदैव एखाद्या विशिष्ट वस्तू

अपेक्षा असते. इच्छित भोग वस्तूचे दृश्य चित्र त्याचे इच्छेत प्रच्छन्न रूपाने असते. ते साध्य द्रव्य आहे. एक गणित साध्य-द्रव्य आणि दुसरे अगणित साध्यद्रव्य असे त्याचे दोन प्रकार आहेत. गणित साध्यद्रव्य विशिष्ट रूपाचे आहे. अगणित साध्य द्रव्य अविशिष्ट म्हणजे व्यापक रूपाचे असते.

साधन द्रव्य– यात काल द्रव्य, ज्ञानद्रव्य, आणि क्रियाद्रव्य तीन प्रकार आहेत.

कालद्रव्यः– भूत, प्राण, भाव यांचा विकास व विलीन होण्याच्या मध्ये जे अंतर असते, अथवा एका कृतीच्या आरंभा पासून त्याच्या अंता पर्यंत जो अवधी लागतो ते काल द्रव्य होय.

ज्ञानद्रव्य– मानवाच्या इच्छेत प्रच्छन्न रूपाने असलेल्या साध्य-वस्तूच्या प्राप्तीसाठी योग्य क्रियेचे प्रकाशन करणारे ज्ञान अंतर्साधन ज्ञान द्रव्य आहे.

क्रियाद्रव्य– मानवाच्या इछेत साध्य वस्तूच्या प्राप्तीसाठी शारीरिक योग्य क्रिया ही वहिर्साधन क्रिया द्रव्य होय. उदा– एका व्यक्तीला एका महिन्यास एक हजार रुपये प्रमाणे वेतन आहे असे समजून येथे धनाची अपेक्षा हे साध्य द्रव्य आहे. त्याला लागणारा एक महिना कालावधी व एक महिन्यात करावे लागणारे ज्ञानाचे श्रम तसेच एक महिना शारीरिक परिश्रमाची क्रिया ही तीन साधन द्रव्यें होत. या चार द्रव्यांचा उपयोग करण्याने मूल्याची उत्पत्ती होते. त्या मूल्याचे प्रतिफलच म्हणजेच प्रत्यक्ष धनाची (वेतन) प्राप्ती होय. उदा– एका व्यक्तीस शेताला जाण्याची अपेक्षा आहे. ते शेत त्याच्या भावनेत साध्य द्रव्य आहे. शेत कोणत्या दिशेला आहे. त्याचे मार्ग दर्शन करणे हे ज्ञानद्रव्य आहे. डोळे, पाय, आदि इंद्रियाचे संचालन होऊन जाण्याचे

शारीरिक परिश्रम हे क्रिया द्रव्य आहे. आपल्या निवास स्थाना पासून शेताला पोहोंचे पर्यंत लागणारा समय काल-द्रव्य आहे. शेत नावाच्या इच्छा रूपी साध्य द्रव्यासंबंधी काल (वेळ) ज्ञान (बौद्धिक श्रम) क्रिया (शारीरिक श्रम) या तीन साधन द्रव्यांचा उपयोग करण्याने निष्पन्न होणाऱ्या मूल्याचे प्रतिफल म्हणून प्रत्यक्ष शेताची प्राप्ती होते. सारांश मानवाने साध्य द्रव्या संबंधी काल, ज्ञान, क्रिया, या तीन साधन द्रव्यांचा उपयोग करण्याने त्या मूल्याचे प्रतिफल इच्छा द्योतक शेत, घर, घोडा, धन, पैसा इत्यादि अनेक भोगोपभोग वस्तू प्राप्त होतात. या वरून मूल्य मानवाच्या ठिकाणी अखंड स्वाभाविक पणे असल्याचे अनुभवास येते.

कर्म प्रभेद

जगांतील सर्व वस्तू अनेक प्रकाराने प्रवाहित होत असतात. नद्या आपल्या पात्रांत वाहात असतात. वायू आकाशांत वाहात असतो. वनस्पती बीजा पासून वृक्ष व वृक्षा पासून बीज, असा क्रम चालत आला आहे. त्याप्रमाणे मानव देखील **ऊर्ध्व-भाव, अधोभाव, नैसर्गिकभाव, अनैसर्गिकभाव** ह्या चार प्रकारच्या भावा पैकी कोणत्याना कोणत्या एका भावाच्या आधीन होऊन अव्याहत पणे चालत असतो. मनुष्य कर्माधीन असल्यामुळे एक निमिष देखील कर्मकेल्याविना राहणे शक्य नाही. तो जन्म घेऊन बाल्य, तारुण्य, वृद्धाप्य शरीर मूलक पुत्र दारा धनादि समस्त वस्तूंचा उपभोग घेत घेत जन्म मरण रूपी कर्म प्रवाहामध्ये सदा वाहात असतो. मनुष्यास एका स्थाना पासून दुसऱ्या स्थानाला जावयाचे असल्यास आदि व अंत्य युक्त सरळ रेषेची गमन क्रिया समाप्त होऊ शकते. परंतू जन्म मरणरूपी कर्म

प्रवाह मात्र सरळ रेषे प्रमाणे सीमित नसतो.

" चक्रनेमिक्रमेणैव भ्रमंति हि शरीरिणः "

(सि. सि. मणि पिंड स्थल)

या प्रमाणे मोठ्या चक्राकार गोल वर्तुळाच्या रेषे वरून कितीही गमन केले तरी, गमन क्रिया समाप्त होत नसल्यामुळे अखंड कर्म प्रवाहाच्या चक्राकारांत असीमित होऊन मानव फिरत असतो. उदा– गणित शास्त्रांत आय, व्यय, अवशेष, हे तीन प्रमेय प्रामुख्याने आहेत. आय पासून व्यय स्थानाला जाई पर्यंतच्या मधल्या कालावधीतील संग्रहित धनाला अवशेष म्हणतात. मूलतः विचार करून पाहिले असता आय. म्हणविणारे कारण असून व्यय आणि अवशेष हे दोन्ही त्याचे कार्य झाले आहेत. त्या प्रमाणे मानवाच्या कर्मांचे विवरण उत्पादक विभाजक आणि संचित अशा तीन प्रकारचे आहे. कर्मांचे उत्पादन होऊन प्रारब्ध-रूपांत विभाजित होई पर्यंतचा मधला कांही काळ प्रच्छन्नरूपाने संग्रहित होऊन राहतो. त्याला संचित कर्म म्हणतात. उत्पादक (आगामी) कर्म कारण झाले असून विभाजक (प्रारब्ध) कर्म आणि संचितकर्म हे दोन्ही त्याचे कार्य झाले आहेत. उत्पादककर्म म्हणजे कार्यावस्थेतून रूपांतरित होऊन कारण अवस्थेत जाऊन पोहोंचणे. आणि विभाजक कर्म म्हणजे कारणावस्थेतून कार्यरूपांत सृष्ट वस्तूची उत्पत्ती होणे होय.

जगांतील सर्व वस्तू उत्पादक अवस्थेत ऊर्ध्वगामी असतात. आणि विभाजक अवस्थेत अधोगामी असतात. उदा– पाणी बाष्प होऊन सूक्ष्म वायूच्या रूपांत संग्रह होऊन राहण्याची क्रिया पुढील पावसाची उत्पादक आहे. आणि वरील सूक्ष्म वायू बाष्प होऊन पुनः पाणी होऊन पावसाचे रूपानेखाली

पडगे विभाजक आहे. उत्पादक अवस्थेत सर्व वनस्पती, बीज, अंकुर, पल्लव, पुष्प, फल, या पूर्णावस्थेला जाईपर्यंत त्याचा विकास क्रम ऊर्ध्व गामी असतो. आणि मनुष्य, पशु पक्ष्यादि समस्त प्राणी उदय पावून शैशव, बाल्य, तारूण्याच्या पूर्णाव-स्थेला जाण्याच्या क्रमांत त्यांचे शरीरातील कण ऊर्ध्वगामी असतात. आणि विभाजक अवस्थेत सकल वस्तू क्रमेण क्षय पावून अधोगामी होऊन नाश पावतात. उत्पादक (आगामी) कर्म, संचित कर्म आणि विभाजक (प्रारब्ध) कर्म हे तीन प्रकारचे कर्म मान-वाच्या ठायी उत्पन्न होतात. उर्ध्व भाव. अधोभाव, नैसर्गिक भाव अनैसर्गिक भाव या चार प्रकारच्या भावांतील इच्छारूपी साध्य,-द्रव्या संबंधी ज्ञानद्रव्य, क्रियाद्रव्य, कालद्रव्य, यांचा उपयोग होण्याने भाव तत्वा मध्येच सर्व कर्माची उत्पती होत असते.

भाव एव हि जंतूनां कारणं बंधमोक्षयोः ।
भावशुद्धौ भवेन्मुक्तिर्विपरीते तु संसृतिः ।।

(सि. शिखामणि भावार्पण स्थल

भावच सकल जीवाचे कर्माला कारणीभूत आहे. विप-रीत भावाने जीवाचे अधःपतन होऊन पशु, पक्षी वनस्पत्यादि योनी मध्ये जन्म घेऊन नाना विध सुख-दुःखाचा अनुभव घेत असतो. जन्म मरण रूपी बंधनाला आणि पुनरावृत्ति रहित मोक्षाला भावच मूल कारण आहे.

ज्ञान, क्रिया, काल ह्या साधन द्रव्यांचा ईश्वरप्राणि-धानांत उर्ध्वभावाच्या इच्छारूपी गणितसाध्यद्रव्यासंबंधी उपयोग करण्याने त्याचा परिणाम जन्मांतरी नाना विध सुखमय भोगोपभोग वस्तूरूपाने प्राणमय सूक्ष्म शरीरात संग्रहित होत असतो.

हिंसा, असत्य, स्तेय. व्यभिचार या अनैसर्गिक भावांच्या इच्छारूपी गणित साध्य द्रव्यासंबंधी ज्ञान, क्रिया, काल या साधन द्रव्यांचा उपयोग होण्याने त्या मूल्याचा परिणाम या वर्तमान कालांत सुखमय वाटत असला तरी ह्या पापरूपी मूल्यांचा प्राणमय सूक्ष्म शरीरात संग्रह होऊन भविष्य काली म्हणजे जन्मांतरी नानाविध दुःख दूर्भोगाच्या रूपाने प्रारब्ध कर्माच्याद्वारे विभाजन होते.

पुत्र, दारा, धनादिक अधोभावाच्या इच्छारूपी गणित साध्य द्रव्या संबंधी ज्ञान, क्रिया, काल, या साधन द्रव्यांचा उपयोग करण्यापासून आपल्या प्राणमय सूक्ष्म शरीरात संग्रहित होऊन राहिलेलें पूर्व जन्मकृत पाप, पुण्य, रूप मूल्ये भौतिक जड शरीरद्वारा नानाविध सुख दुःखाच्या रूपानी विभजित होतात.

अहिंसा, सत्य, अस्तेय. ब्रह्मचर्य ह्या नैसर्गिक भावाच्या इच्छारूपी अगणित साध्य द्रव्यांच्या संबंधात ज्ञान, क्रिया, काल ह्या साधन द्रव्यांचा उपयोग होण्याने निर्दिष्ट नाम रूपमय वस्तू भावनेंला गोचर होत नसल्यामुळे त्या मूल्याचा परिणाम पापकर्माला निरोध करून पुण्य कर्म करण्याला योग्य पात्रता आणून देणारा आहे. नैसर्गिक भावामध्ये पाप पुण्य म्हणविणाऱ्या परिमित द्रव्याचे उत्पादन होत नाही. हे उन्नत व अनवत या दोन्ही अवस्थेच्या मध्यभागी एक विशिष्ट मध्य बिंदु म्हणून आहे. उदा :—जलाशया मधील पाणी वर उच्च स्थानाला नेंऊन पोंहचवावयाचे असल्यास विद्युत् अथवा कोणत्याही एका साधनाने एका विशिष्ट पात्रा (पाईप) द्वारे प्रच्छन्नरूपांत जाण्यासारखे करण्यांत येते. पुनः ते पाणी स्वाभाविक पणें अधोमुखी होऊन पतन होण्याचे समयी मात्र ते जल अनुभवास येते. . त्याप्रमाणें

मानवाच्या भावनेंत कर्माचे उत्थान होऊन या भौतिक शरीर-द्वारा योग्य अयोग्य कोणतीही कृति घडल्यास ते कर्म सूक्ष्म शरीरात प्रच्छन्न अवस्थेत संचय होऊन राहातें. पुनः जन्मांतरी भौतिक शरीरद्वारा प्रारब्धकर्म प्रत्यक्ष सुख दुःखाच्या रूपाने विभाजित होते.

मानवाच्या ठिकाणी भावद्रव्य सदैव व स्वाभाविक असल्यामुळे त्याच्या कडून घडणारे कर्मही पण स्वाभाविकच आहे. परंतू कर्माचे प्रतिफल भोगण्यांची अवश्यकता काय? प्रकृतीनें आपल्या स्वाभाविक नियमानुसार त्याचा विकास झाल्या-कारणानें त्या कर्माची जबावदारी समष्टीरूप प्रकृतीवरच राहील परंतू व्यष्टीमय जीवानें सुख दुःखाच्या रूपाने त्या कर्माचें फल भोगलेच पाहिजे. म्हणून त्या त्या जिवानां बंधनात ठेवणें अन्याय होत नाही काय? या शंकेला उत्तर असे की समस्त प्राण्यांना सुख पाहिजे असून दुःख नको असते. दुःखाचे मूळ कारण अस-लेल्या अनैसर्गिकभावाचा हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचार या पाप कृतीचा संकल्प मानवाच्या अंतरात उदय होताच नैसर्गिक-भावाच्या विरूद्ध वर्तन करुनको म्हणून मानवाच्या अंतःकरणात सदैव जागृत असलेली निग्रह शक्ती अनुग्रह पूरित दिव्य संदेश देऊन नियमन करीत असते. तथा पित्या शक्तीची आज्ञा उल्लंघन करून आपल्याहून भिन्न जीवाविषयी वर्तन करुन अपराध होत असल्याकारणानें त्याचे परिणामफल दुःख भोगण्याची जबावदारी व्यष्टी रूप मानवावर राहील. मात्र समष्टीरूप प्रकृती त्या कर्माला बाध्य होणार नाही उदा :— कृषि व्यवसायामध्ये मानवी आहार धान्ये गहू, ज्वारी, साळ, आदि पिकांच्या समृद्धीला आवरण उत्पन्न करणारे म्हणजे नाश करणारे नागरमोथा,

हरळी, कुंदा, आदि अनेक प्रकारचे तृण भूगतच असतात. परंतू वाधा करणाऱ्या तृणाचा परिहार केल्या विना आहार धान्याचे उत्पादन संभवत नाही. तसेच अवनतीला नेणाऱ्या अनैसर्गिक भाव प्रवृत्तीचा त्याग करून उन्नतीला नेंणारा नैसर्गिक भाव आणि ऊर्ध्वभाव या दोन्हीचे रक्षण केल्याशिवाय मानवानां भोग सुखे लाभणार नाहीत.

पृथ्वी अखंड एकाकार दिसत असली तरी ती अनंत परमाणू युक्त असल्या कारणाने वनस्पतीचे बीज विविध रूपाने परिवर्तन होते.

जल अखंड एकाकार दिसत असले तरी ते अनंत कणा पासून युक्त असल्यामुळे अहो रात्र वाहत असते.

अग्नी अनंत परमाणूने युक्त असल्या कारणाने मानवाच्या उपभोगामध्ये रेल्वे, रेडिओ, मोटार, विद्युद्दीप व पाकादीक क्रिये मध्ये परावर्तीत होत असतो.

वायु तत्व अनंत परमाणूने युक्त असल्या कारणाने चलन, धावन, ध्वनि प्रसरण, आणि सर्व प्राण्याच्या श्वासोछ्वासा आदि क्रिये मध्ये सदा वाहते.

मूल प्राण तत्वा पासून पृथ्वी, आप, तेज, वायू. ही चार तत्वे उत्पन्न झाली आहेत. त्या परमाणूचे स्वभाव धर्म विविध-रूपी असल्या कारणाने या जड सृष्टीचा प्रवाह अनंत प्रकारे वहात आहे.

कोणते ही कार्य एका वस्तू पासून संभवत नाही एका क्रियेला प्रति क्रिया होण्यासाठी दुसऱ्या एका वस्तूची अवश्यकता आहे. याप्रमाणे मानवाच्या ठायी एकाच भाव तत्वाचे कार्य परत्वे ऊर्ध्वभाव, नैसर्गिकभाव, अधोभाव, आणि अनैसर्गिकभाव

असे चार प्रकार झाले आहेत. त्या भाव तत्वाच्या अनंत परमा
मुळे अनंत कर्माची उत्पत्ती होत आहे. उत्पादक (आगामी)
विभाजक (प्रारब्ध) कर्म या दोन्ही बिंदूच्या मध्य अवकाशां
मानव जीवन प्रवाह सदा वाहत आहे. दुःखाचे मूळ कारण अ
लेल्या अनैसर्गिक भावांचा त्याग करून सुखाचे मूळ कारण अ
लेल्या ऊर्ध्वभाव व नैसर्गिकभाव या दोन्ही मध्ये इच्छा, ज्ञा
क्रिया, काल या द्रव्यांचा उपयोग करणे अत्यंत अवश्यक आहे
उदा– कृषी शास्त्रात अन्न वस्त्र उत्पन्न करण्याचे कामी त्या
येणारे अनिष्ट दुरिताचे निवारण करणे म्हणजेच अन्न वस्त्रां
प्राप्ती होय. या प्रमाणे मानवाच्या सुखासाठी पाहि
असलेले सकल भोग पदार्थ प्राप्त करण्याचे कामी त्याला आ
येणाऱ्या आवरणाचा परिहार करणे म्हणजेच सुख प्राप्ती हो
कृषी व्यवसायात अन्न उत्पादनाच्या क्रमा मध्ये पूर्व आणि उत्त
असे दोन प्रकार आहेत. भूमी पेरण्यास योग्य व्हावया साठी नां
रणे, कुळवणे खतघालणे इत्यादी कामे ही पूर्व साधने हो
बीज पेरणे, खुरपणे, कृमि कीटकांचा नाश करण्यासाठी औषधो
पचार करणे, आणि रक्षणकरणे, कापणे, रासकरणे ही सर्व का
उत्तर साधने आहेत. त्या प्रमाणेच सकल दुःखाला कारणी
असलेल्या अनैसर्गिक भावांचा हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचा
ह्या पासून उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रकारच्या पापकर्मांना अवरो
करून म्हणजे पुण्य कर्माचे उत्पादन करण्यासाठी येणाऱ्या अनि
आवरणाचा परिहार करून योग्य पात्रता निर्माण करावयाच
कामी नैसर्गिक भावांचे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य हे च
नियम पूर्व साधन आहेत. सकल सुखाला मूळ कारणी भूत अ
लेल्या पुण्य कर्माच्या उत्पादनासाठी दया, क्षमा, दान, पू

जप, व ध्यान हे सहा नियम क्रमेण उत्तरोत्तर साधन आहेत.

भोक्ता भोज्य आणि प्रेरक

मानव हा भोक्ता असून मानवेतर पशु, पक्षी, कृमी, कीटक, वनस्पत्यादि चेतन व अचेतन समस्त भोगपदार्थ भोज्य आहेत. हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचार ह्या अनैसर्गिक भावांच्या-योगाने पाप कर्माची उत्पत्ती होऊन मानव त्याच्या फल विभाजनेला पशु, पक्षी, वनस्पत्यादि योनी मध्ये जन्म पावून भोज्य-म्हणवितो. अर्थात् मानवेतर सर्व योनीभोज्य असून मानव हा भोक्ता आहे. या जगात अंडज, पिंडज, उद्भिज, आणि स्वेदज अशा चार प्रकारच्या जीव राशी आहेत. अंडज–अंडचा पासून उत्पन्न होणारे पक्षी, कृमी कीटक पतंगादि सर्वाची गणना केल्यास यांचे एकवीस लक्ष प्रकार आहेत. पिंडज–पिंडा पासून पिंड उत्पन्न होऊन जन्मणारे जीव वाघ, अस्वल, सिंह, घोडा, गाय व मनुष्यादि एकेक प्रमाणे गणना केल्यास एकवीस लक्ष प्रकारच्या जीव योनी आहेत. उद्भिज – भूमी मध्ये जन्म पावणारे अंबा, लिंब, बोर, जांभळ, संत्रे, चंदन, गहू, ज्वारी आदी सर्व एकेका प्रमाणे गणना करीत गेल्यास एकवीस लक्ष प्रकार आहेत. स्वेदज – पाण्यात जन्म पावणारे मासे, कासव, बेडूक, चिरटे, उवा आदि जीवराशी एकेका प्रमाणे गणना करीत गेल्यास एकवीस लक्ष प्रकारच्या जीव राशी होतात. उदा– संगीत शास्त्रा मध्ये सा, री, ग, म, प, ध, नी, अशा मूल सात स्वरांचे थाट, राग, उपराग, जात, असे अनंत प्रकार झाले आहेत. आणि पाक शास्त्रात खारट, अंबट, तिखट, गोड, कडू व तुरट या सहा रसा-नेच अनेक विध पाक पदार्थ निर्माण करता येतात याप्रमाणे केवळ मानवाच्या हिंसा, असत्य, स्तेय, व व्यभिचार या चार

अनैसर्गिक भावातील पाप कर्मानेच चौऱ्याऐंशी लक्ष प्रकारचे पापकर्म संभवतात. या सर्व भोग योनी शिक्षा विधान पात्र झाले आहेत. आमच्या ह्या सृष्टीतील मानव जीवाच्या शरीर परमाणू मध्ये चौऱ्याऐंशी लक्ष प्रकारचे परिवर्तन पावण्याचे गुणधर्म आहेत. किंचिज्ञ मानवाच्या पाप कर्माच्या अपराधाला सर्वज्ञ, सर्वकर्तृ, सर्व शक्तीमान पंचब्रह्मसदाशिव हा न्याय शासनाचा न्यायाधीश आहे.

किंचित्सत्वरजोरूपं भोक्तृसंज्ञकमुच्यते ।
अत्यंततामसोपाधिर्भोज्यमित्यभिधीयते ।
परतत्वमथोपाधिर्ब्रह्मचैतन्यमीश्वरः ।
भोक्ता भोज्यं प्रेरयिता वस्तुत्रयमिदं स्मृतम् ॥

(सि. शि. मणि पिंडस्थल)

किंचित्सत्व व रजो गुणविशेष असलेला जीव चैतन्य भोक्ता म्हणवितो. अत्यंत तामस उपाधि सामान्य रजोगुण विशिष्टजीवचैतन्य भोज्यम्हणवितो. शुद्ध सत्वगुण उपाधि विशिष्ट ब्रह्म चैतन्य पंच ब्रह्म सदाशिव हा प्रेरक म्हणवितो.

वर सांगितलेल्या श्लोकाच्या तीसऱ्याओळीत 'ब्रह्म चैतन्य मीश्वरः' म्हणून सांगितले आहे. हे वाक्य माया सहित शुद्ध विद्या तत्व देह धारी असलेल्या निग्रह कर्त्या ईश्वराला संबोधून न सांगता ब्रह्म चैतन्य म्हणून या पद विशेषण मूलक परशिव ब्रह्म चैतन्याचे प्रथम स्फुरण "सदाशिव तत्व" परिशुद्ध चैतन्य असल्यामुळे सृष्टी, स्थिती, लय, निग्रह, व अनुग्रह हया पंच सामर्थ्यं संपन्न पंच ब्रह्म सदाशिवाला उद्देशून सांगितले आहे.

असे भोक्ता भोज्य प्रेरक तीन प्रकार आहेत. भोक्ता असलेल्या किंचिज्ञ जीवाला सर्वज्ञ पंचब्रह्मसदाशिव प्रेरक आहे म्हणून मान्य केल्यास जीवानी केलेल्या सर्वकृत कर्मांचे फळ प्रेरक असलेल्यां पंचब्रह्मसदाशिवालाच भोक्ता व्हावे लागेल अशी शंका प्राप्त झाल्यास सर्वज्ञ असलेला पंचब्रह्मसदाशिव किंचिज्ञ जीवाला प्रेरणा करणे म्हणजे हिंसा, असत्य, स्तेय, व व्यभिचार या अनैसर्गिक भाव प्रवृत्ती मध्ये प्रवेश करून अधःपतन होण्यापूर्वी तू ह्या पापकृती मध्ये प्रवेश करू नको म्हणून हृदयामध्ये अंतर्नाद मूलक प्रेरणा करीत असतो. अनैसर्गिक प्रवृत्तीच्या पाप कर्मांचा निरोध करणे म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, व ब्रह्मचर्य या नैसर्गिक प्रवृत्ती मध्येच प्रवेशकर असा अर्थ होतो. जीवाला ऊर्ध्व प्रवृत्तीचे दया, क्षमा, दान, पूजा, जप, व ध्यान या पुण्य कर्मा मध्येच उत्तरोत्तर अभिवृद्धी पावण्या जोगे करून पुनरावृति रहित मोक्षालाही प्रेरणा अवकाश देणारी आहे. असा बोध होतो. प्रेरक असलेला पंच ब्रह्म सदाशिव जीवाच्या अधःपतनाला निरोध करण्यामध्येच दया पूरित होऊन प्रेरणा करीत असतो. मात्र त्या प्रेरणेचे जीवाने उल्लंघन केल्यास अनैसर्गिक भावांच्या पाप कर्मात प्रविष्ट करण्याने त्याला साक्षीभूत होऊन त्या कर्मांचे प्रतिफल म्हणून पशु-पक्ष्यादि तिर्यंग् योनी मध्ये जन्म घेऊन पापाचे दुःख भोग म्हणून न्याय शासन आज्ञा करते. जीवाच्या कृत कर्माला प्रेरक असलेला पंचब्रह्मसदाशिव भोक्ता न होता जीवच भोक्ता होतो. फल मूलादि वनस्पती, पशु पक्षादि जीव भोज्य आहेत. मानव ज़ीव भोक्ता आहे. सर्वज्ञ सर्व कर्तृ असलेले पंचब्रह्मसदाशिव सदैव प्रेरक असतो.

स्वाभाविक पापकर्म

पुण्य विशेष पाप अल्प मानवयोनी. पापविशेष व पुण्य अल्प पशु पक्ष्यादि योनी पापविशेष व पुण्य अतिअल्प तरूलता पाषाणादि जड योनी. केवल पापविशेषांने दुःखाचा अनुभव घेणारी प्राणमय सूक्ष्मशरीराची नरक योनी. केवल पुण्य विशेषाने सुखाचा अनुभव घेणारी प्राणमय सूक्ष्म शरीराची देव योनी असे चार प्रकारच्या योनी आहेत.

पुत्र दारा धनादि भोग सूखामध्ये मानवाला दुःखाचे स्वमरण होते. स्त्री पुरुषाच्या अतिविषय भोगात रोगभय आहे. द्रव्य समृद्धीमध्ये, राज चोरादिकांचे भय, मान सन्मानामध्ये दैन्यतेचे भय, सामर्थ्यामध्ये शत्रूचे भय, सौंदर्यामध्ये वार्धक्याचे भय; शास्त्रार्था मध्ये वाद–विवादाचे भय, सद्गुणामध्ये दुर्जनाचे भय, देहा मध्ये मरणाचे भय आहे. या जगात केवळ शुद्ध सुख लाभणें साध्य नाही. जसे शुद्ध सुवर्णाचे अलंकार होत नहीत त्यात किंचित रजत अथवा ताम्र धातूच्या मिश्रणाची अवश्यकता असते तसे मानवाकडून होणाऱ्या पुण्यकर्मात सुद्धा पाप कर्माची उत्पत्ती होत असते. म्हणजे मानवानी हेतू पूर्वक पापकर्म करावेच असा अर्थ होत नाही. पूजा जप संध्यादि ऊर्ध्वभावमय पुण्य कर्मानुष्ठानमध्ये विनियोग होणाऱ्या दीपारती मध्भे पतंग पडून जळून मरतात. सुगंध धूपाच्या योगाने वातावरणातील सूक्ष्म कृमीकिटक मरतात. होमहवानादिकाच्या धूराने वायूमंडलातील सूक्ष्म दुषित किटाणू नाश पावतात. कृषी व्यवसायाचे नांगरणें, कुळवणें,खुरपणें आदि कामामध्ये अनंत जीवपरमाणूची हिंसा होते. चालणे, उठणे, बसणें व श्वासोछ्वासाच्या क्रिये मध्ये सुद्धा अनपक्षित पणें अनंत जीवाणू नाश पावतात. ऊर्ध्वभावाच्या

पुण्यकर्मात एका उद्देशासाठी इच्छा, ज्ञान, क्रिया, काल या द्रव्यांचा उपयोग करण्यामध्ये दुसऱ्या जीवाची हिंसा होत असलेळी प्रत्यक्ष अनुभवास येते. असले अनपेक्षित सामान्य पापकर्म राजा, रंक, योगी–भोगी, ज्ञानी आणि अज्ञानी या समस्त मानवाकडून स्वाभाविक पणें घडत असते.

सकल मानवाचा शरीरधर्म एकाच प्रकारचा आहे. सर्वांच्या देहाची उत्पत्ती मलमूत्र पूरित स्थाना मध्ये होत असते. मानवाच्या शरीरातील रजोवीर्य मल कण देह रूपाने विकास पावतात. मानव सेवन करीत असलेल्या अन्न जलादिकाचे जठरा-अग्नि पचन करून दुर्गंध मलकणांत परिवर्तित करतो. आतीशौच व अती मलबद्धता यानें शरीर जगणें शक्य नाही. परंतू अती–शौच अतीमलबद्धता न होता, शरीर रक्षणाला योग्य नियमित मलाची अवश्यकता असल्याचे दिसून येते. आपण सेवन केलेल्या आहारापासून उत्पन्न झालेला मल आपल्या शरीरात परिमित संग्रह करून जगत असतो. या वरून मानव हा अप्रत्यक्ष मलहारी असल्याचे दिसून येते. यावरून अनपेक्षित पाप कर्मापासून उत्पन्न झालेल्या भोग शिक्षेस सर्व मानव समान भोगी आहेत.

इहलोक आणि परलोक शासन

अपराधी कारागृहा मध्ये परतंत्र असून आपल्या स्वतःच्या घरात स्वतंत्र असतो त्याप्रमाणें सर्वजीव पाप कर्माचे फल स्वरूप दुःख भोगण्यात परतंत्र असून पुण्य कर्माचेफल सूख भोगण्यामध्यें स्वतंत्र असतात. पाप कर्मात पतित जीवांच्या अप-राधाला शिक्षा न झाल्यास सृष्टीचे सर्व कार्य नियमित पणें चालणार नाही. त्यामुळे जगामध्ये अपराधी सदा असतातच आणि त्याच्या अपराधाला शिक्षा देणारा न्यायदंडही

सदैव असतोच. या लोकांतील मानवांच्या न्यायसंस्थे मध्ये हिंसा, असत्य, स्तेय व्यभिचार या अनैसर्गिक भाव प्रवृत्तीमध्ये प्रवृत्त झालेल्या पतित आपराध्याला अन्न पानादिक देऊन त्याचे रक्षण करून त्यांच्या मनाला पश्चात्ताप होण्याजोगे अनेक प्रकारचे शिक्षारूपी शासन आहे. अपराध न्याय संस्थेच्या निदर्शनाला नाही आल्यास न्याय संस्था आपराध्याला शिक्षा करण्याच्या कामी असमर्थ असते. ते असे की, मानव समाजामध्ये सदा पशुहिंसा होत असते. तो वाचाहीन पशू न्यायासना समोर जाऊन आपले कष्ट सांगण्यास असमर्थ आहे. परंतू ती पशू हिंसा अपराध नाही काय? अपराधच. एका अपराध्याला वीस वर्षाची शिक्षा झाली असल्यास तो ती शिक्षा पूर्ण न भोगता सृष्टीच्या नियमानुसार मध्येच मरण पावला तर राहिलेली शिक्षा खोटी आहे काय? एका आपराध्याला आमरण कारावासाची शिक्षा झाली असल्यास आणि त्यानंतर तो कुष्टरोगी झाल्यास त्याला कारागृहातून मुक्त-करण्यांत येंते तेव्हा न्यायसंस्था त्याला दिलेली शिक्षा भोगावयास लावण्यांच्या कामी असमर्थ आहे परंतू ती शिक्षा खोटी आहे का? नाही.

या वरील सर्व आपराधापेक्षा विशेष आपराध आहे. असे न्याय संस्थेला दिसून आल्यास अखेरची शिक्षा म्हणजे देहां-ताची शिक्षा देण्यांत येते. एका व्यक्तीकडून मनुष्य वधाचा आप-राध घडल्यास त्याच्या अपराधाला मरणाची शिक्षा होते. दूसऱ्या एखाद्या अपराध्या कडून पितृ वध झाला असल्यास त्याच्या अप-राधाला मरणाची शिक्षा होते. तिसऱ्या एका व्यक्तीकडून गूरूचा वध झाला असल्यास त्याच्या अपराधालाही मरणाचीच शिक्षा होते. असे मनुष्यवध, मातृवध, पितृवध, राजवध, मंत्रीवध, योगीवध,

स्वामीवध इत्यादि महात्म्यांचे वध करणाऱ्या पातक्याला ही एकच एक मरणाची शिक्षा देण्यांत येते. याहून दुसरी शिक्षा नाही. सर्व मानवाच्या पदव्या समान नसल्यातरी मरण दंडापेक्षा दुसरी विशेष शिक्षा देण्याचे सामर्थ्यंच इह लोकांतील न्याय संस्थेला नाही. अशा प्रकारच्या सामान्य शिक्षा देण्याचा न्याय संस्थेचा धर्म आहे. सारांश मानवी न्याय संस्था केवळ मानव वधाचाच विचार करते. मातृवध, पितृवध, राजवध, योगीवध, आदि महात्म्यांचे वधाच्या महा पातकाला येथे शिक्षा देण्याचे कामी न्याय संस्था असमर्थ आहे.

न्याय संस्थेच्या दृष्टीला न येणारे कित्येक अपराध आहेत. मातृगमन, स्नुषागमन, सासूगमन, पुत्रीगमन, मित्र पत्नीगमन, आचार्यपत्नीगमन, श्रोत्रिय ब्रह्मनिष्टपत्नीगमन, पतीव्रतास्त्रीगमन, भगीनीगमन राजागुरुदेवतादिकांच्या धनाची चोरी, माता पिता आचार्य यांच्या विषयी असत्यभाषण व मिथ्या साक्षी देणे, असल्या अनिर्णित अगणित गुप्त अपराधाला शिक्षा देणारी दुसरी एक व्यवस्था नसल्यास ही सृष्टी न्यायशील न्याय प्रिय नाही म्हणून समजावे लागेल. या सृष्टीचे मूल कर्तृ- असलेला पंच ब्रह्म सदाशिव सर्वन्यायी आहे. सर्वजीवाच्या कृत कर्माला साक्षी असून तो कर्माध्यक्ष म्हणवितो. आणि असल्या अनिर्णित अनंत अपराधाला तो रोग, दुःख, दारिद्रय, पीडा, आदि अनेक प्रकारचे दुर्भोग दुःख देऊन शिक्षा करतो. सामान्य अप- राध्यांना औषध उपचाराने बरे करून कर्माचे परिमार्जन करतो. आणि महापातकी जीवांच्या अगणित अनिर्णित अपराधास एथे न्याय दंडाच्या अधीन शिक्षा न झाल्यास ते सर्व अपराध गुप्त राहून सूक्ष्म व्यापक भाव प्राण सृष्टी मध्ये संग्रह होऊन शिल्लक

राहतात. सृष्टी ही नियमाधीन व सर्वन्यायी असल्यामुळे कांही आपराधी न्याय दंडाच्या आधीन होऊन शिक्षा अनुभवीतात कांही अपराधीलोकांच्या अपराधाला न्याय दंडाची शिक्षा न होणें हे विषम होते. याचे कारण की इह लोकांतील न्यायाधीश किंचिज्ञ मानव जीव असल्यामुळे सर्व लोकांच्या अपराधाला पूर्ण शुद्ध न्याय देऊ शकत नाहीत इहलोकांच्या राजदंडाला वंचना करून राहिलेल्या असंख्यात सहकर्मी पापी अपराध्याला पाप क्षालनासाठी प्रायश्चित्त देण्याकरिता पूर्वी संग्रहित होऊन असलेल्या दुषित कणानें व्यापक सृष्टीतील प्राणकण मलीन होतात. त्या प्राणतत्वापासून उत्पन्न झालेले पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश या पंच तत्वामध्ये विकृती उत्पन्न होऊन निसर्गाचा विशेष विकोप होतो. अतिवृष्टी' अनावृष्टी, अकालवृष्टी, विषवृष्टी अतिहिम, अहिम, अतिग्रीष्म, अग्रीष्म विद्युत्पात, झंझावात, चक्रवात भूकंप युद्ध, दुष्काळ, सांक्रमिक आदि महारोगसंभवणे हीच विकृती होय.

सुवृष्टी– समयानुसार पाऊस पडून नद्या, नाले, तळी, विहीरी पाण्यानें भरून राष्ट्रातील सर्व जीवांच्या रक्षणाकरिता जलदान करते. पिकांची समृद्धीकरून पत्र, पुष्प, मूल, फल, धान्यादिकांनी प्रजेचे रक्षण करून संतृप्त करते. गाय, बैल, आदी पशू तृणपर्णादि खाद्य येथेच्छ खाऊन दृढ काय होऊन मानवाच्या संरक्षणाला सर्व प्रकारची सेवा करीत असतात. मात्र प्रकृतीचा विकोप झाल्यास चार प्रकारच्या पीडा करते. अतिवृष्टी, अनावृष्टी, अकालवृष्टी, विषवृष्टी, हे होत

अतिवृष्टी :– भयंकर पाऊस पडून सर्व पिके नाश पावतात. तळी, विहिरी, मोठ मोठी धरणे व नद्या, सर्व पाण्याने तुडुंब

भरून फुटून, नगर, पुर, गांवे, शिबीरे, आश्रम आदि विशेष जल प्रवाहाने (पुराने) मानव समाज नाश पावून मृत्युमुखी पडतो.

अनावृष्टी– पावसाच्या अभावी सर्व वनस्पती फल, मूल, अन्न धान्यादिकांचा अभाव होतो, विहीरी तळी नद्या धरणेआदि जलाशय निर्जल होऊन मळे बागेतील पुष्प, फले, मूल, धान्य इ.वाळून जातात. तृणपर्ण चारा वाळून गाय, म्हैस आदि पशूंना खाद्याचा अभाव होऊन ते दूध देत नाहीत. बैल, घोडा आदि श्रमिक पशु अन्नाभावी शेतीच्या कामाला असमर्थ होतात व मरतात.

विषवृष्टी– उत्तम पिकावर पाऊस पडून रोग जंतूची उत्पत्ती होत असल्यामुळे खाद्य वनस्पती नाश पावतात.

अकालवृष्टी– अन्न धान्यांची पिके काढणीला आल्या वेळी पावसाची गरज नसताही पडून पिकलेंल्या धान्यांस भिजवून कुजवून नाश करते.

हिमकाल– थंडीने प्राण्यांच्या आणि फल मूल अन्न धान्यादि वनस्पती वाढविण्याच्या कामी सर्व विध साहाय्यक होऊन संरक्षण करते. तीच थंडी प्रकृति मध्ये विकृती होऊन सर्व जीवाना दोन प्रकारची पीडा करते.

अतिहिम– भयंकर थंडीने फल मूलादि व वनस्पतीचा नाश होतो आणि मानव समाज मृत्युमुखी पडतो.

अहिम– थोडीही थंडी न होता सर्व वनस्पतीनां नाना विध रोग कृमीच्या अपायाने अन्नौषधींचा अभाव होतो.

ग्रीष्मकाल– उन्हाळ्यांत उन्हाच्या तापाने चराचर सर्व प्राण्यांच्या रक्षणासाठी अमृत प्राय असून नानाविध रोग जंतूचा परिहार करतो. पशू पक्षी मानवादि सर्व जीवांच्या रक्षणासाठी आवश्यक उष्णता देऊन संरक्षण करतो. आणि वायु मंडळ परिशुद्ध करतो.

भूमी वांझ न राहता सकलविध वनस्पतीना जन्म देण्याच्या कामं समर्थ होते.

अतिग्रीष्म– अती उन्हाच्या तापाने नद्या सरोवरे धरणादि जला-शय आटून मळे व उद्याने वाळून जातात, आणि विशेष उन्हा-मुळे मानव समाज मृत्युमुखी पडतो.

अग्रीष्म– उन्हाच्या अभावाने भूमी तापतनसल्यामुळे उष्णता कमी पडून ती फलवती न होता वांझ होते. नानाविध रोगांचा उपद्रव ज्यास्त होऊन मानवादी सर्व प्राणी मरतात.

विद्युतपात– आकाशांतील मेघ समुहाच्या संघर्षाने उत्पन्न होणाऱ्या विद्युतपाताने वने, वृक्ष, उद्याने, पुर, पट्टण, आदि जळून सर्व जीव मृत्यु मुखी पडतात.

भूकंप– पृथ्वीच्या कंपायमानाने दोन भाग होऊन त्याच्या योगाने घरे, आश्रम, मोठ मोठी शहरे भूमींत गडप होऊन अनेक जीव मरतात.

झंझावात– भयानक वाऱ्याने झाडे, वेली, घरे, मंदिरे, पुर, पट्टणा-तून राहणाऱ्या मानवांची सुख साधनसामुग्री नष्ट भ्रष्ट होऊन माणसे पीडित होतात. व मृत्युमुखी पडतात.

रोग– कॉलरा, प्लेग, श्लेष्मज्वर, (इन्फ्लुइंझा) क्षय, महामेह, उपदंश, प्रमेह, आदि संसर्गजन्य रोगापासून मानवसमाज पीडित होऊन मृत्युमुखी पडतो.

महायुद्ध– परस्पर राष्ट्रात द्वेष असूया मूलक संघर्ष होऊन रक्त-पाताने मानव कुलाचा संहार होतो.

क्षाम– दुर्भिक्ष मूलक अन्नाभाव, जलाभाव, वस्त्राभाव, होऊन मानव समाज नष्ट होतो.

विज्ञान वादी मानवाने आपणास आवश्यक असलेली सुख सौकर्य

सामुग्री अनंत प्रकारची कल्पून त्यांना येणाऱ्या अनिष्ट दुरित परिहारार्थं अनेक प्रकारच्या योजना कल्पिल्या असल्या तरी हा आपल्या सुख समृद्धी मध्ये पूर्णता पावणार नाही. हा किंचिज्ञ, अल्पजीवी असल्यामुळे त्याचे सर्व कार्य सीमित रूपात असणे स्वाभाविकच आहे. मात्र प्रकृती, अनंत, अपार, अनुपम, आणि महिमाशाली असल्यामुळे मानवाच्या बुद्धीशक्तीला ती गम्य होणे शक्य नाही. व राष्ट्रांतील प्रजेला कोणताही एखादा रोग झाला तर दुषित खाद्य अहार पुष्प, फल, मूल नानाविध धान्यादिकांना क्रमी कीटकांचा उपद्रव झाल्यास त्याचे परिहारार्थं औषध उपचाराचे संशोधन कार्य हाती घेण्याचे आंतच दुसऱ्या प्रकारचा रोग उद्‌भवतो. या विज्ञानी मानवाला एक वेळ गोचर झालेल्या अनिष्टाला परिहार करण्याची उपाय योजना यशस्वी झाली असली तरी दुसऱ्यान्दा त्याचा प्रभाव होऊ देऊ नये म्हणून किती ही दक्षता घेतली असली तरी प्रकृती त्याला पीडा करण्यासाठी अनेक प्रकारच्या विषम स्वभावाने युक्त असल्याने त्याची महती किंचिज्ञ अल्पजीवानां समजणे कसे साध्य होईल. एक योजना संशोधन करून त्याचा उपयोग करण्याचे आंतच दुसऱ्या एका प्रकारचे परिवर्तन पावणाऱ्या प्रकृतिच्या धर्माला अडविणे मानवाला सर्वथा साध्य नाही. मानवातील नैसर्गिक धर्म असलेल्या अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य यांचे उल्लंघन करून हिंसा असत्य, स्तेय, व्यंभिचार या दुष्ट पाप कृती मध्ये असंख्यात जीव प्रवृत्त झाले असल्यास पापी मानव समाजाचे भूत, प्राण, भाव दूषितकण प्रकृतीच्या व्यापक भाव, प्राण, भूतामध्ये प्रवेश करतात. ह्या प्रकृतीने अशा पापी मानवांच्या पाप क्षालनार्थं पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे

तीन काल, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व सूर्य चंद्रादि सर्व ग्रह संरक्षणाचाधर्म सोडून मानव कुलाचा संहार करीत असतात.

"प्रकृति कोपः सर्व कोपेभ्यो गरीयान्"

(चाणक्य सूत्र प्रथमा ध्याय).

ग्रहभय, राजभय, चोरभय, रोगभय, आदि भया पेक्षा प्रकृति कोपाचे भय सर्वात श्रेष्ठ मानिले जाते. सूक्ष्म शरीराचे दैवत शनी, राहू, मंगळ, भूत, प्रेत, पिशाच्च आदि ग्रहांची पीडा निवारण करण्यासाठी दीपाराधन, मंत्रजप, होम, तर्पण अन्नशांति असे अनेक क्रम आहेत. राजकोप झाल्यास त्यास अनन्य भावाने शरण गेल्यास प्रशांत होतो. चोरभयाचे राजदंडाच्या शासनाने शमन होते आणि रोगभय औषधाच्या उपचाराने निवारण होते परंतु प्रकृतीच्या अंगी विकृती होऊन विकोप पावल्यास त्या भय निवारणार्थ तिचे प्रसन्नते साठी मानवाची कोणतीही उपाय योजना चालत नाही. प्रकृतीच्या विकोपा पासून होणारे कष्ट सहनच करावे लागतात. या शिवाय दुसरा उपाय नाही. सर्व कोपा मध्ये प्रकृती कोप सर्व श्रेष्ठ आहे असे सिद्ध होते.

"प्रकृति विकृति जायते नोत्तमानाम्"

(भर्तृहरि शतक).

मानवाच्या पुण्य कर्माचे सुकृत चांगले असल्यास पंच महाभूते नियमित रूपात वर्तन करून रक्षण करतात. पंच महाभूताच्या निसर्गाचा आणि मानवाच्या निसर्गाचा परस्पर निकट संबंध आहे. आता पर्यंत इह लोकाच्या शासन शिक्षेचा विचार करण्यात आला या पुढे परलोक शासन शिक्षेचा विचार करण्यात येत आहे.

मानवाला जाग्रत अवस्थेतून सुषुप्ति अवस्था (गाढनिद्रा) प्राप्त होते. सुषुप्ति अवस्थे मध्ये स्वप्नावस्था प्राप्त होते. त्या स्वप्नावस्थेतील सूक्ष्म शरीरच मी आहे असे समजून तो सुख दुःखाचे सर्व व्यवहार जागृत अवस्थे सारखे अनुभव करतो. त्या प्रमाणें मानवाच्या मरण काली अनेक विध तापाच्या अतिरेकाने जागृत अवस्था विसरून त्यास सुषुप्ति अवस्थेत मरण संभवते त्यानंतर तो जीव सूक्ष्म शरीर धारी होऊन राहतो. तेव्हा त्याला मी जड देहातच आहो असे वाटते. म्हणजे मरणा नंतरही ते सूक्ष्म शरीर पूर्वी असलेल्या जड देहाच्या रूपांत शिक्षा भोगण्यासाठी असते. किंचिज्ञ अल्प जीवाला मेल्याचे स्मरत नाही. मृत जीवाच्या सूक्ष्म शरीर धारी अपराध्याला त्याच्या पाप कर्मांची आठवण देऊन त्याप्रमाणें सूक्ष्म सृष्टीतील देव लोकांची न्याय-संस्था त्यास शिक्षा करते. तेव्हा तो जीव आम्ही पुनः पुनः असले पाप कर्म करणार नाही म्हणून पश्चात्ताप करतो.

मानवाच्या न्याय संस्थेनें मरण दंडाची शिक्षा केल्यास प्रत्यक्ष शिक्षा देताच एका निमिषार्धात देहांतून प्राण निघून जातो ह्या अत्यल्प काळात मरण शिक्षे पासून होणाऱ्या दुःख ताप महा पातकांच्या कर्म शिक्षेला बरोबर होणार नाही. मानवा कडून पातक, उप पातक, महा पातक पंचमहापातके अशी अनेक विध पापकर्मे संभवतात. परंतू त्या कर्मांची शिक्षा अनुभवण्याची पात्रता या जड शरीरांत नाही. आणि महा शासन शिक्षा करण्यांची साधन सामुग्री सुद्धा आमच्या ह्या सृष्टींत नाही. प्राणमय सूक्ष्म देहाला तप्तलोहशयन, तप्तशिलाशयन, तप्तसूचीशूल, गुदशंकुताप करणे, शस्त्रच्छेदन, नरककूपवास, तप्ताग्निवास, मलभक्षण, मूत्रपान, इत्यादि अनंत प्रकारच्यां शिक्षेचे कष्टांत

दीर्घ काल ठेवले असल्यास ते सूक्ष्म शरीरात जड शरीरा प्रमाणे विकृती होऊन मरत नसून शिक्षा भोगण्याची त्यास पात्रता असते या सर्व अनेक कारणा वरून महा पातकी जीवांच्या कर्माला शिक्षा करण्याची सूक्ष्म सृष्टींतील देव लोकाची न्याय संस्था यम शासन रूपानें आहे असे सिद्ध होते.

मानवाच्या ठिकाणी पूजा जपादिक विशेष पुण्य कर्मानुष्ठान करण्याची पात्रता आहे. पण त्या विशेष पुण्याला विशेष सुख अनुभवण्याची पात्रता या जड देहाच्या इंद्रियानां नसून सामान्य सुख भोगण्याची पात्रता आहे. आणि विशेष सुख भोगाची साधन सामुग्री सुद्धा या लोकात नाही. नेत्राला सामान्य प्रकाश ग्रहण करण्यांची शक्ती असून विशेष प्रकाशाने डोळे दिपून अंधार होतो, कानाला सामान्य ध्वनी ऐकण्याची शक्ती असून विशेष ध्वनी ऐकून वधिरत्व येते. तिखट, खारट, अंबट, गोड आदि वस्तू विविध पाक पदार्था मध्ये मिसळून सेवन केल्या तर रसनेला रसस्वादाचा आनंद होतो. तिखट मिठादि मूल पदार्थच सेवन केल्यानें रसनेला रसस्वाद रुचत नाही. त्या करीता मूळ पदार्थाच्या विशेष गुण धर्माला सामान्य गुण धर्मात रूपांतर करणें हाच पाक शास्त्राचा आविष्कार होय. अर्थात रसनेला विशेष रसस्वादाचा आनंद गृहण करण्याची पात्रता नसून सामान्य रसस्वाद सेवन करण्याची पात्रता आहे. नेंत्राला सुरूप कुरूप, घ्राणाला सुगंध दुर्गंध, कर्णाला निंदा स्तुति, त्वचेला कठिण व मृदुत्व, रसनेला कडू व गोड, अशा सुख दुःख म्हणविणाऱ्या दोन प्रकारचा अनुभव येतो. यावरून केवळ विशेष शुद्ध सुखाचा अनुभव घेणें म्हणजेच परलोक सूक्ष्म सृष्टीचा देव लोक होय.

मानव आपल्या स्वप्नावस्थेत सूक्ष्म शरीर धारण

करून सुख दुःखाचा अनुभव घेत असतो. स्वप्नातील प्राणमय सूक्ष्म शरीरा भोवती पंच भूत तत्वाचे आवरण झाल्यामुळे तेथे शुद्ध प्रकाश नसून अत्यंत मंद प्रकाशांत स्वप्न सृष्टीचे व्यवहार चालत असतात. परंतू परलोकांतील दैवताचे प्राणमय सूक्ष्म शरीर स्वयं प्रकाशित असल्यामुळे त्यांना अंधार नाही व रात्र ही नाही. सदैव जागृत अवस्था त्याना आहे. त्यांच्या नेत्राला निमिष-स्पंदन नाही. निद्रा व स्वप्नावस्था नाही. वार्धक्य व रोग नाही. चिर यौवन शाली असतात. त्यांच्या भोगोपभोग वस्तु प्राण तत्वाच्या असल्या कारणाने त्या भोग पदार्थां कडून शुद्ध सुखाचाच अनुभव येत असतो. पर लोकांतील दैवताचे शरीर मनो वेगाचे आहे. इच्छीत भोग वस्तू इच्छा मात्रे प्राप्त होऊन तृप्ती पावणाऱ्या इच्छा भोगी आहेत. त्यांना जल सेवन नसून अमृत पान आहे. अहाराची प्रतिक्रिया असलेल्या मल मूत्रांचे विसर्जन नाही. कानाला केवळ मधुर ध्वनी व स्तुति स्तोत्रांचा आनंद असून निंदा कर्कशादि कठोर ध्वनीचे दुःख नाही. त्वचेला मृदुत्व नेत्राला दिव्य प्रकाश, रसनेला रुचि, घ्राणाला सुगंध असा केवळ शुद्ध सुखाचाच अनुभव येतो. प्राणमय सूक्ष्म शरीरी दूर दृष्टी दूर श्रवणी व भूत, भविष्य वर्तमान त्रिकाल ज्ञानी असतात. त्या सूक्ष्म लोकांत कामधेनु, कल्पवृक्ष, चिंतामणि, दिव्यायुधे, विमानादि भोग साधनानी वैभव संपन्न असतात. त्यामुळे पर लोकांतील विशेष पुण्यमय भोग सुख भोगणाऱ्या अनेक देव योनी आहेत. सृष्टी, स्थिती, लय, निग्रह कर्ते ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर, ह्या दैवता असून अनुक्रमाने त्यांच्या पदव्या ब्रह्मपद, विष्णूपद, रुद्रपद, ईश्वरपद, ह्या होत. पर लोकांतील त्या देव पदांच्या सुखात, सालोक्य, सार्ष्टी, सामिप्य, सारुप्य, व सायुज्य असे पाच प्रकार आहेत.

सालोक्य– रुद्र दैवताच्या लोकात वास करून राहणे.
सार्ष्टी– रुद्र दैवताच्या समान ऐश्वर्य प्राप्त करणे.
सामिप्य– रुद्र दैवताच्या समीप वास करणे.
सारूप्य– त्रिशूल, डमरू, व्याघ्रचर्म, भस्म, रुद्राक्ष, चंद्रकलाधर, रुंड मालादी अलंकाराने सुशोभित असलेल्या साक्षात रुद्र दैवता प्रमाणे रूप धारण करून वैभव भोगणे.
सायुज्य– साक्षात् सगुण मूर्ती असलेल्या रुद्र दैवताच्या शरीरामध्ये विलीन होऊन राहणे.

सालोक्यादि पदवी प्राप्त केलेल्या जीवानी, सृष्टी नियामक असलेल्या मूळ ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर, या दैवतांच्या भोगैश्वर्यामध्ये समान लोक, समान देह, समान भोग, असणारे असंख्यांत ब्रह्मा, विष्णू, रुद्रादि झाले असले तरी अनंत ब्रह्मांडाची सृष्टी, स्थीति, लय, निग्रह, या नियामक कार्या मध्ये त्यांचा अधिकार नसतो. मूल नियामक दैवतांचे ते नियाम्य होऊन केवल पुण्य विशेषाने सालोक्यादि पदव्या भोगणारे भोग जीवी आहेत. एवढेच.

पुत्र दारा धनादिका पासून प्राप्त होणारे अल्प कालांतील लौकिक सुख व दीर्घ काल भोगणारे सालोक्यादि परलोक सुख हे सर्व पुण्य असे पर्यंत भोगून शेवटी नाश पावणारे आहेत. पाप विशेष मूलक प्राप्त होणारी नरक योनी, पुण्य विशेष मूलक प्राप्त होणारी देव योनी, तेथील पाप पुण्य कर्माचे परिमार्जन झाल्यानंतर त्या जीवानां पुनर्सृष्टी मध्ये सुषुप्ति अवस्था प्राप्त होते. पुनः ते जीव प्राण वायू मध्ये विलीन होऊन वायू पासून अग्नि, अग्नि पासून जल, जला पासून पृथ्वी, पृथ्वी पासून वनस्पती, वनस्पती पासून अन्न, अन्ना पासून रज वीर्याचे रूप होऊन जीव पुनःजन्म घेतो. आणि चक्र नेमी क्रमाच्या रूपांत

अखंड जन्म मरण रूपांत भ्रमण करित असतो.

इहे लोक सुख, व परलोक सुख ही दोन्ही सुखे "मी" व "माझे' ह्या दोन बिंदूच्या मध्यभागी कल्पीले आहेत "मी" म्हणविणारा दृष्टा, माझे म्हणविणारे दृश्य आहे. या दोन्हीच्या मध्यभागी जीवाचा कर्म प्रवाह सदैव वाहत असतो. उदा– गहू, ज्वारी आदि धान्याच्या गर्भामध्ये पीठाचे कण स्वाभाविक आहेत. ती धान्ये दळल्यास त्या धान्यावर असलेल्या आवरणाचा परिहार होऊन पीठाची प्रचिती येते. मात्र, पीठद्रव्य निर्माण केले नसून पीठाचा आविष्कार होतो. त्याप्रमाणे सुख-वस्तूचा आणि सुखापेक्षी जीवांच्या मध्यभागी असलेले आवरण परिहार करणे म्हणजेच सुख वस्तूची प्राप्ती होय. एका जीवाला उत्तम पत्नी पाहिजे म्हणून अपेक्षा असते. दुसऱ्या एका जीवाला योग्य पति पाहिजे, म्हणून अपेक्षा असते. एकाला गुण संपन्न दीर्घायू मुलगा पाहिजे एकाला ज्ञानी दयाशील आई बाप पाहिजेत. एकाला तत्वदर्शी गुरु पाहिजे. एकाला आज्ञा पालक शिष्यपाहिजे तर कांही जीवाना परस्पर सन्मित्र पाहिजेत कांही जीवाला बहीण भाऊ पाहिजे. म्हणून परस्पर जीव भोगापेक्षी असणे स्वाभाविकच आहे. बाप, मुलगा, पति-पत्नी, यांना असलेले आयुष्य अरोग्य विद्या, बुद्धी रूपलावण्य यौवनदि सर्व भोग त्यानी आप आपल्या कर्तृत्व शक्तीने प्राप्त केले आहेत. कोणी कोणाला निर्माण केले नाही. पति पत्नी योग, पिता पुत्र योग, सासु सुनेचा योग, मित्र मित्राचा योग, बंधुभगीनीचा योग, राजा–प्रजेचा योग, गुरु शिष्याचा योग, असले सह कर्मी सहभोगी असं–ख्यात जीव आहेत. त्यांच्या योग्यतेनुसार समान कर्म धर्माचा विचार करून परस्पर सहभोगी जीवाला योग (जोडणे) शक्ती

सामर्थ्यनियाम्य असलेल्या किंचिज्ञ मानवाला साध्यनाही. उदा-कृषि व्यवसाया मध्ये दोन बैल समवयस्क, समानांग, समशक्ती, समजाती होऊन काम करण्यासाठी ते बैल स्वाभाविकपणे असमर्थ असून त्याच्या योजनेला शेतकरी आपल्या योजक शक्तीने समर्थ असतो. त्या प्रमाणे सृष्टीच्या नियामक देवता ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर व पंच आचार्य हे सर्वज्ञ, सर्व शक्तीमान असून नियाम्य किंचिज्ञ किंचित्कर्तृ जीवाच्या समान कर्मधर्मानुसार सृष्टी, स्थिती, लय, निग्रह अनुग्रह या पाच प्रकारे सकल जीवांच्या भोगांचा योग जोडण्याच्या योजक शक्तीने समर्थ आहेत.

पुनर्जन्म

मानवाला आपल्या सुख प्राप्तीच्या कामी अनैसर्गिक भावनेपासून उत्पन्न झालेल्या दुःखावरणाचा परिहार होऊन पुत्र दारा धनादि अनेक विध सुख पदार्थांचा विकास पावण्यासाठी एक विशिष्ट कालावधी पाहिजे. उदा—कृषिक गत वर्षी पिकलेल्या धान्याचा या वर्तमान काळी उपयोग घेत घेत पुढील वर्षाच्या उपभोगासाठी धान्याचे उत्पादन करीत असतो. त्या धान्याच्या उत्पादनाला कालावधी असल्या प्रमाणे मानवाच्या या वर्तमान काळी केलेल्या कृत कर्माचे पाप पुण्य रूपी फल या जन्मीच उपभोगास येत नसून ते भविष्य काळी म्हणजे जन्मांतरी उपभोगासाठी अवशेष राहत असते. या जन्मी केलेल्या पाप पुण्याचे फल याचजन्मी उपभोग घेऊन खर्च झाले असल्यास पुढील जन्मी भोगण्यासाठी कोणत्याही कर्माचे अवशेष राहत नाहीत. पृथ्वीला प्रथम बीज द्यावे लागते नंतर अनंत बीजाच्या रूपाने ती देतअसते. या निसर्गाच्या नियमाप्रमाणे मानवाला आपल्या सुख प्राप्तीसाठी प्रथम त्याचे मूल्य द्यावे

लागते. त्यांच्या शिवाय भोगोपभोग वस्तू प्राप्त होणार नाहीत. विनामूल्य सर्व भोग पदार्थ प्राप्त होत असते तर पुत्र, दारा,धन, आयुष्य, आरोग्य, विद्या, बुद्धयादि वैभवाने सकल प्राणी समान सुखी होऊन राहिले असते. इतकेच नव्हे आंधळा, लंगडा,व मुका, आल्पायुषी आणि दीर्घायुषी, सुरूप, व कुरूप, ज्ञानी व अज्ञानी स्वामी आणि सेवक, राजा, व प्रजा, गुरु व शिष्य, पशू, पक्षी, कृमि कीटक व वनस्पत्यादिका मध्ये विषमता देखील जगात निर्माण झाली नसती. सर्वजीवांना सकल भोग पदार्थ विनामूल्य प्राप्त होत असल्यास निसर्ग शक्ती न्यायशील व नियमाधीन नाही म्हणून समजावे लागेल. ती शक्ती न्यायशील व नियमा-धीन असल्यामुळे सर्व जिवांचे सकल भोग पदार्थ विना मूल्य प्राप्त होत नसून मूल्यानेच प्राप्त होत असतात.

या कर्म योग रूपी प्रपंचामध्ये कोणतीही एखादी वस्तू प्राप्त करावयाची असल्यास ती विनामूल्य मिळणार नाही. त्या प्रमाणेच मानवानी पुत्र, दारा, धन, आयुष्य, आरोग्य, विद्या, बुद्धी, भोगैश्वर्यादिकाच्या प्राप्ती साठी पुण्य रूपी पण्य म्हणजे मूल्य दिल्याचे त्या जीवाला स्मरत नाही. याचे कारण जीव किंचिज्ञ असल्यामुळे एका वृत्ती वर दुसऱ्या एका वृत्तीचे आव-रण झाल्यामुळे पहिल्या वृत्तीचे विस्मरण होत असते. ते असे की, दैनंदिन जेवलेल्या खाल्लेल्या ऐकलेल्या सांगितलेल्या घेत-लेल्या किंवा दिलेल्या या सर्व क्रिया सामान्यतः स्मरणांत राहत नाहीत. कारण अन्य वृत्तीच्या आवरणा मुळे त्याचे विस्मरणहोत असल्याने जीवाच्या कृत कर्मावर जन्मांतराचे आवरण असल्या-मुळे त्या कर्माचे विस्मरण होणे स्वाभाविक आहे. पुत्र, दारा, धनादि सकल भोग सर्वमानवाला समान नाहीत. का, म्हणजे

त्या भोग पदार्थांच्या प्राप्तीसाठी मूळ कारण असलेल्या पुण्य-रूपी मूल्याच्या उत्पादनामध्ये सर्व मानवाची कर्तृत्व शक्ती समान नसल्यामुळे भोग प्राप्तीमध्ये विषमता असणे स्वाभाविक आहे. कर्माची उत्पत्ती प्रथमतः भावनेत उदय पावते. व प्राणा-मध्ये ती चलन पाऊन जड शरीराच्या द्वारे त्याची क्रिया संभ-वते पुनः त्या कर्माचे चित्र प्राण व भावमय सूक्ष्म शरीरामध्ये सुख दुःखाचे तरंग चित्रीत होतात. उदा– चित्र निर्माण करणारे (कॅमेरा) यंत्र पार दर्शक असलेल्या लेन्सद्वारे मनुष्याचे प्रतिबिंब संग्रह करते. किती ही प्रकारचें चित्र काढले तरी लेन्समध्ये संग्रह न होता आतील पटावर (रील) चित्रित होतात. परंतू चित्र निर्माण करण्याचे कामी लेन्सच कारण असून ते माध्यम झालेली आहे. त्या प्रमाणे या जन्मी केलेल्या पाप पुण्य कर्माची रूप रेषा लेन्सा प्रमाणे असलेल्या डोळे, कान, आदि ज्ञानेंद्रियद्वारे प्राणमय सूक्ष्म शरीरामध्ये ऊर्ध्वं मुखी होऊन संग्रहित होतात. उदा–चलत चित्रामध्ये (सिनेमा) तेजः पुंज विद्युत प्रकाश मधल्या पारदर्शक चित्रपटामध्ये प्रवेश करून बाह्यपडद्यावर तेच चित्र उमटते. चित्र-पटामध्ये भरून असलेली लहान लहान अनेक चित्रे प्रकाशाच्या सह योगाने स्त्री, पुरुष, पूर ग्राम, वृक्ष, वल्लरी, गिरी, गुहा, सरोवर, सागर, खग, मृग, गो, व्याघ्र आदि नाम रूपाने बाहे-रील पडद्यावर विशाल स्वरूपात दिसून येतात. पडद्यावर दिस-णारे चित्र खरे नसून आतील चित्रपटात असलेली चित्रे खरे आहेत. पुर्व जन्मकृत पाप पुण्य कर्माच्या परिणाम स्वरूप स्थूल शरीरा संबंधित पुत्र, दारा, धन, गृह भूमी समस्त भोगोपभोग वस्तू आतील चित्र पटावरील चित्रा प्रमाणे प्रतिछाया रूपाने असतात. पण ते खरे भोग चित्र नसून खरेभोगचित्र प्राणमय

सूक्ष्म शारीरामध्ये संग्रहित असलेले जड शरीरद्वारे विभाजित होतात. सूक्ष्म शरीरामधील मुलाचे चित्र संपताच स्थूल शरीराचे रूपाने दिसणारा मुलगा मरतो. धनाचे चित्र संपताच दारिद्रय येते. पुनः मुलाचे चित्र येताच दुसरा मुलगा जन्मतो. वायकोचे चित्र येताच दुसरी वायको येते. ह्या सृष्टीमध्ये दिसून येणारे समस्त भोग, खरेभोगवस्तू नसून सूक्ष्मशरीरामध्ये असणाऱ्या प्रच्छन्न (गप्त) भोगाच्या प्रतिक्रियारूप भोगसाधनाचे पात्र होऊन भोग विभाजित होत असतात.

मानवाच्या पाप पुण्य कर्माचे विवरण चित्रगुप्त लिहून ठेवतात असे म्हणतात. वस्तुतः तसे नसून मनुष्याने केलेल्या सर्व कर्माचे चित्र सूक्ष्म शरीरात गुप्त रीतीने संग्रहित असलेले गुप्त चित्र होय. चित्रपटामधील सर्व चित्र समाप्त होताच नाटक संपल्या प्रमाणें प्राणमय सूक्ष्म शरीरामधील गुप्तभोगचित्र समाप्तीला प्रत्यक्ष या जड शरीराचा मृत्यू समजावा. मानव आपल्या कर्तृत्वशक्तीमध्ये स्वतंत्र असून इष्ट अनिष्ट कोणतेही कर्म केल्या नंतर पुनः त्या घडलेल्या कर्मा विषयी त्याच्या बुद्धी शक्तीचा उपयोग होऊ शकत नाही. उदा — कृषिक भूमिला नांगरून कुळऊन खात घाळून बीजा रोपण करे पर्यंत आपल्या ज्ञान क्रियेचा उपयोग करण्याच्या कामी स्वतंत्र असतो. जे बीज पेरतो त्याचे परिणामफल तेच प्राप्तकरीत असतो हे निश्चित आहे. मात्र ते बीज अंकुर सस्य पल्लव शाखा वृक्ष पुष्प व फल यांच्या रूपाने क्रमशः विकास पावते. त्याला अवश्यक असणारा पाऊस थंडी ऊन वायु आदि पुरविण्याचे कामी किंचिज्ञ मानवाचे बुद्धी शक्तीचा उपयोग होत नसून तो परतंत्र आहे. त्या कार्याला निसर्गशक्ती सर्वसमर्थ आहे. आणि पूर्ण फलद्रूपझाल्या नंतर

त्या धान्याच्या उपभोगा साठी मानवच हक्कदार असला तरी मधल्या कांही मर्यादित काला पर्यंत निसर्ग शक्तीच्या नियंत्रणात त्याला राहावे लागते, त्या प्रमाणें मानव या वर्तमान काळी ऊर्ध्व भाव व अनैसर्गिकभावामध्ये इच्छा, ज्ञान व क्रिया. शक्तीचा उपयोग करण्याच्या कामी स्वतंत्र आहे. त्या करिता पाप पुण्य कर्मांचे उत्पादन होऊन ते कर्म प्राणमय सूक्ष्म शरीरा मध्ये संग्रहित होत असते. आणि मरणा नंतर त्या पूर्व कृतकर्मानुसार जड देहाचे रूप धारण करण्यासाठी प्राणा मध्ये जे जे कर्म प्रच्छन्न रूपानें संग्रहित झालेले आहेत. ते ते सर्व दुःख भोग रूपाने अधो-भावनेंमध्ये कांहीकर्म स्वेच्छा रूपाने, कांही कर्म परेच्छा रूपानें, कांही कर्म अनिच्छा रूपाने व संचितकर्म प्रारब्धाच्यारूपानें विभाजित होत असतात. म्हणजे आपण केलेल्या पाप पुण्य कर्मांचे फळ आपणच भोगावे लागेल हे सत्य असले तरी जन्मांतरी त्या कर्मांचे फल भोगण्या विषयी मानव प्रकृती मातेच्या स्वाधीन असून परतंत्र आहे. सारांश मानवाने मागच्या जन्मी केलेल्या पाप पुण्य कर्मांचे फल या जन्मी सुख दुःख रूपानें भोगून त्याचे विभाजन करीत करीत पुनः त्याच्या बरोबर नवीन कर्म पुढच्या जन्मा साठी तो पाप पुण्य कर्मांचे उत्पादन करीत असतो.

पुत्र, दारा, धनादि इहलोक सुख आणि सालोक्य, सार्ष्टी सामिप्य, सारूप्य, सायुज्य, परलोक सुख ही दोन्ही सुखे अभ्युदय-पदाचे बोध करीत असतात. इहलोक परलोकसुखे पुण्यरूपी मूल्य असे पर्यंत राहून अखेर नाश पावतात. परंतू जन्म मरणाच्या अतीत असणारे लिंग (ब्रह्म) अंग (जीव) सामरस्य रूप जीवन्मुक्तीचे निश्श्रेयस चिरसुख सर्वा पेक्षा महान आहे.

इहलोक सुख भूत, प्राण व भाव या तीन अवरणानी

युक्त आहे. परलोक सुख प्राण व भाव या दोन अवरणानी युक्त आहे. भूत प्राण भाव तनु त्रयाच्या अवरणाचा नाश करून मूल-परशिव ब्रह्मामध्ये समरसपावणे या पारमार्थिक सुखाला निर्वाण, पुनरावृत्तिरहितमोक्ष, लिंगांगसामरस्य, शीवजीवैक्य अशी अनेक नांवे आहेत.

अहिंसा, सत्य, अस्तेय व ब्रह्मचर्य हे चार नियम पाप कर्माच्या उत्पादनाला अवरोध करून पुण्य कर्माच्या उत्पादनाला योग्य पात्रता आणून देणारे आहेत.

दया, क्षमा, दान, पुजा, व जप हे पांच नियम अभ्युदय पदाचा बोध करणारे इहलोक सुख परलोक सुखाची प्राप्तीकरून पुनरावृत्ती रहित मोक्ष प्राप्ती साठी योग्य पात्रता आणून देणार आहेत.

ध्यान या एका नियमा पासून अभ्युदयात्मक अनेक भोगपद परिसमाप्त पावतात. त्या मूल अवकाश स्थलला निःश्रेयस सुख किंवा मोक्ष सुख म्हणतात.

यतोऽभ्युदय निःश्रेयस सिद्धिः सधर्मः

(वैशंशिक दर्शन १. २)

लौकीक, पारलौकीक, पारमार्थिक ही त्रिविध सुखे धर्मानेच प्राप्त होत असतात.

मानव धर्म शास्त्राचा प्रमेयात्मक विषय परि समाप्त होतो.

धर्माचा प्रयोग

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः ।।
(सि. शि. मणि धर्माचार स्थल)

अहिंसा

अहिंसा या शब्दाचा विचार केला असता; दुसऱ्याची हिंसा करू नको, वध करू नको, दुःख देऊ नको. असे विविध प्रकारचे अनेक अर्थ होतात. मूल आईच्या उदरा पासून जन्मल्या-नंतर तात्काल रडते. रडण्यापूर्वी ते मूल प्रशांतमय सुखात होते. त्याच्या मृदु अंगाला वायूच्या शीतलतेचा व भूमीच्या काठिण्याचा स्पर्श होऊन रडत असते. आणि जठराग्नीच्या प्रचेतनाने अहाराची त्यास आवश्यकता वाटून त्वचेच्या स्पर्श ज्ञानापासून दुःख (हिंसा) होऊन शिशू रडत असते. त्याच्या रडण्याच्या क्रिये वरून शिशू-मध्ये प्रशांतमय अहिंसेची अपेक्षा प्रच्छन्न (गुप्त) पणें असल्याने दिसून येते. प्रथमतः शिशू आईच्या रूपाला जाणत असते. नंतर कानाने तिच्या ध्वनीला समजते. आणि आपल्या आईचा वियोग सहन करीत नसल्या मुळे त्यास (हिंसा) दुःख होते. शिशूच्या ठिकाणी आपल्या सर्व अवयवाचे परिज्ञान होताच शरीरच "मी" आहे, ही भावना जागृत होऊन दुसऱ्यानी माझी हिंसा करू नये अशी अपेक्षा ते करीत असते. आणि माझे"मन,,ही भावना जागृत होऊन दुसऱ्यानी आपल्या मनाची हिंसा करू नये व दुःख देऊ नये अशी अपेक्षा होत असते. या प्रकारच्या अपेक्षे मध्ये नैसर्गिक भावाच्या अहिंसेचेज्ञान, क्रमाने वाढून तो शिशू पुढे कर्तृत्वशक्ती-संपन्न पूर्ण मानव होतो. आपल्या विरूद्ध असणाऱ्याच्या कृतीला

आणि त्याच्या कठोर वचना पासून त्याच्या ठिकाणी अनैसर्गिक प्रवृत्तीचा हिंसा भाव उदय पावतो. आपल्यातील सुख शांतीचा अभाव होताच नैसर्गिक भावाच्या विरूद्ध दुसऱ्याची हिंसा करावी म्हणून अनैसर्गिक भावाची अपेक्षा होते. तेंव्हा तू हिंसा करू नको, व मानवते पासून पतीत होऊ नको म्हणून त्यांच्या अंत:करणांतून अनुगृह पूरित निग्रह रूप एक नियामक शक्ती संदेश देत असते. अहिंसा तत्व मानवाच्या अंगी जन्म सिद्ध स्वाभाविक प्रवृत्ती असून हिंसेचे ज्ञान कालांतराने उदय पावते. "अहिंसा एक तत्व आहे." हिंसा हे तत्व नसून अहिंसा तत्वाच्या अभावी प्रचीतीला येते. अहिंसेच्या अभावाला हिंसा म्हणतात. उदा-प्रकाश एक स्वतंत्र वस्तू आहे. परंतु अंधार एक स्वतंत्र वस्तू नाही. प्रकाशाच्या आत्यंतिक अभावाला अंधाराची अनुभूती होते. सूर्य सर्व काल प्रकाश देत असतो. पृथ्वी आपल्या कक्षेंत सूर्याच्या सभोवती फिरत असल्यामुळे पूर्व आणि पश्चिम गोलार्ध क्रमा क्रमाने येऊन दिवस आणि रात्र होतात. सूर्याच्या समोर पूर्व गोलार्ध येताच त्याच्या आवरणामुळे सूर्याचा प्रकाश पश्चिम गोलार्धावर पडत नसल्यामुळे अंधार होतो मात्र त्याच्या शिवाय अंधार म्हणून स्वतंत्र वस्तू नाही. प्रकाशाप्रमाणे अहिंसा एक स्वतंत्र तत्व आहे. आणि मानवाच्या सुख शांतीचे मूळ स्थान आहे. मानवाने आपण चिरंतन जीवित राहावे. आणिआपले जठराग्नीच्या तापाच्या हिंसे पासून रक्षण व्हावे, या अपेक्षेने आहाराची योजना करून घेतली आहे, आपल्याला थंडी, पाऊस, व उन्हाच्या योगाने हिंसा (दु:ख) होऊ नये म्हणून अनेक प्रकाराची वस्त्रे निर्माण केली आहेत. आपल्या पायास कठीण प्रकारचे खडे काटे या पासून हिंसा (दु:ख) होऊ नये म्हणून पादत्राणाचा उपयोग तो करीत

असतो. आपल्या गमनागमन क्रिये मध्ये अतिश्रमाम्नीहिंसा होऊ नये म्हणून बैल, घोडा, उंट, हत्ती, मोटार, आकाशयानादि वाहनाची त्याने निर्मिती केली आहे. सर्व प्रकारे आपल्या जीवित रक्षणासाठी घर निर्माण करून त्यामध्ये आपल्या जीवनावश्यक भोगोपभोग सामुग्री संग्रहित केली आहे. आणि व्याघ्र, सिंह, सर्प, विंचू, आदि विषारी हिंश्र पशू व जंतू या पासून व शत्रू कडून हिंसा होऊ नये म्हणून आपल्या रक्षणासाठी त्याने लहान मोठी शस्त्रास्त्रे निर्माण केली आहेत सारांश मानवांच्या सर्व व्यवाहारामध्ये अहिंसा हेच त्याचे अंतिम लक्ष्य आहे.

"पृथ्वी मातर् मामा हिंसीः"

यजुर्वेद श्री रुद्र सूक्त (४।७।१।११)

हे पृथ्वी माते माझी हिंसा करू नको, भू कंपादि भयंकर स्वरूप धारण करून हिंसा करू नको. सुवर्ण, रजत, रत्न, आदि सुख वस्तू देऊन अहिंसामय होऊन माझे रक्षणकर अन्नौषधी व वस्त्र देऊन माझे अहिंसेने रक्षणकर. म्हणून हा मानवप्र कृतिमाते विषयी अखंड व अनन्य भावाने अहिंसेची अपेक्षा करीत असतो. अहिंसा तत्वाने युक्त असलेली प्रपंचातील समस्त जड चेतन वस्तू मला अहिंसामय होऊन तिने रक्षण करावे अशी अपेक्षा करणारा हा मानव व्यापक सृष्टीचा अंशीभूत घटक आहे. अहिंसा तत्व मानवाच्या ठिकाणी स्वभावसिद्ध असले तरी आपल्या शारीरिक मोहाच्या स्वार्थलोलुपतेने अनैसर्गिक भावनेने पर हिंसेच्या दुष्कृती मध्ये प्रवेश करून मानवपदापासून तो पदच्युत होतो. हिंसे पासून मी सुखी होतो, म्हणून अज्ञानाने अनेक पाप कर्म करण्याच्या प्रवृत्तीचे संस्कार त्याच्या भावनेवर प्रामुख्याने होत असतात.

मानवाच्या अंतःकरणामध्ये हिंसा, व अहिंसा असे दोन प्रकारचे संघर्ष सदैव चालत असतात. हिंसे पासून अधःपतन होते व अहिंसे पासून उन्नत अवस्थेला जाण्याच्या कामी योग्यता प्राप्त-होते. मूल प्रकाश शुद्ध असला तरी त्याच्यावर कोणत्याही एका वस्तूचे आवरण (लेप) झाल्यास तो प्रकाश जसा दिसत नाही. तसा मानवाच्या ठिकाणी अहिंसा ही स्वाभाविक असली तरी अंतःकरणाच्या भाव पटलावर जन्म जन्मांतराच्या भोग संस्काराचे आवरण होत असल्यामुळे हिंसा भाव उत्थान पावतो. पशू-पक्षी कृमी कीटकादी प्राण्यामध्ये विशेष ज्ञानाचा अभाव असल्यामुळे ते जड म्हणविले जातात. दुसऱ्यानी कठोर वाणीने शिव्या-दिल्यास त्यांच्या मनाला हिंसा (दुःख) होत नाही.आणि अहिंसा-प्रवृत्ती ग्रहण करण्याची त्यांच्यात पात्रता देखील नाही. त्या करीता पशु, पक्षी, प्राण्याच्या वधाला हिंसा म्हणून मान्य केले. परंतू चेतनजीवी मानवामध्ये प्राणहिंसा व मानसिकहिंसा असे दोन प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारच्या हिंसे पासून होणाऱ्या अपराधाचा विचार करण्यासंबंधी न्याय संस्थेने मान्य केले आहे. परंतु पशूपक्ष्यांच्या हिंसेला मान्य केले नाही. पशू पक्ष्यांच्या हिंसेला इह लोकातील न्याय संस्थेने मान्य न केले तरी ती हिंसा नव्हे-का ? अपराध नव्हे का ? अपराधच आहे. परंतू आपल्याला होणाऱ्या हिंसेचा प्रतिकार करण्याची कर्तृत्व शक्ती पशूचे ठिकाणी नाही, आणि न्याय संस्थेकडे जाऊन आपल्यावर होत असलेले हिंसेचे प्रकार सांगण्याची पात्रता सुद्धा त्या पशूला नाही. असल्या अर्निणित अपराधाना नानाप्रकारची शिक्षा देण्याच्या कामी निसर्ग शक्ती स्वतंत्र व समर्थ आहे.

इह लोकांतील न्याय संस्थेचे न्यायाधीश अल्पज्ञ असल्यामुळे

केवळ मानवाची हिंसा मान्य करीत असतात. आणि साक्षीदारांच्या पुराव्यांचा आधार घेऊन न्याय दान करतात. या परोक्ष ज्ञानाच्या आधारावरून न्याय होत असल्याने तो न्याय पूर्ण व शुद्ध होत नाही. ही न्याय संस्था हिंसा निरोधक आहे. मात्र आहिंसा तत्वाचा विकास करण्याच्या कामी असमर्थ आहे. मानवामध्ये आहिंसा स्वाभाविक असली तरी जन्मा पासून मरणा पर्यंत त्याच्यावर हिंसेचे आवरण न होऊ देण्या सारख्या आहिंसा तत्वाच्या संस्कारामध्येच त्याला वाढावे लागते. हे सामर्थ्य धर्म-शिक्षणामध्ये आहे.

मानवामध्ये सत्व, रज, तम, असे तीन प्रकार आहेत. सत्वगुण प्राधान्य मानवाकडूनही अनपेक्षित हिंसा कर्म स्वाभाविक पणे घडत असते. उदा– कृषि कर्मातील व्यवसाया मध्ये नांगरणे, कुळवणे, खुरपणे, कापणे आदी कामाच्या वेळी अनपेक्षित अनेक कृमी कीटकांची हिंसा सहज संभवते. पूजा, जपादि पुण्य कर्मा-नुष्ठानात आपल्या प्राण वायूच्या परिशुद्धतेसाठी सुगंध धूपाचा विनियोग होतो, त्याने अति सूक्ष्म दुषित किटाणूची हिंसा होते, घृत, कर्पुरादि दीपारतीमध्ये पतंग पतन होऊन त्याची हिंसा होते. संध्या होमादि नित्य नैमित्तिक कर्मामध्ये हविर्द्रव्याचा अग्निमध्ये विनियोग केल्यास अनंत कृमीची हिंसा होते. जीवन रक्षणासाठी पाक बनविणे, प्रकाशाचा उपयोग करणे, स्नान करणे, वस्त्रधूणे, आदि क्रिया मध्ये सुद्धा अनेक सूक्ष्म कृमींचा नाश होतो. आप-ल्याश्वासोच्छ्वास व गमनागमन क्रियेमध्ये ही अनेक कृमी कीटकांची हिंसा होते. असले अनपेक्षित हिंसा कर्म सहज सामान्य पणे सत्व गुण प्राधान्य मानवाकडूनच नव्हे तर जगांतील इतर जन सामान्य मानवाकडून ही संभवतात.

या अहेतुक अनपेक्षित हिंसे पासून उत्पन्न होणारे पाप-कर्मांचे फलविभाजनासाठी दारिद्रय रोगादि प्रत्यक्ष तापदायक भोगप्राप्त होत नसून मल मूत्राची बाधा, शौचादि क्रिया मध्ये येणारे दुःख व गमना गमन क्रिये मध्ये आकस्मिक पणे येणारे दुर्गंध इत्यादिका पासून दुःख प्राप्त होऊन पूर्व जन्म कृत अन-पेक्षित हिंसा कर्मांचे विभाजन होते. हे मानवाला स्वाभाविक आहे. अध्यात्म चिंतन करणाऱ्या आत्मा आनात्मा या विवेक विचा-रांच्या सत्वगुणी जीवाला आपले शरीरच मलमय असल्याचे दिसून येते. त्याने सुक्ष्मातिसूक्ष्म मानसिक पापाची हिंसा होऊन त्या कर्मांचे विभाजन होत असते.

मलकोशे शरीरेऽस्मिन् महा दुःख विवर्धने ।
तडिदंकुरसंकाशे को वा मोदेत पंडितः ॥

(सि. शि. मणि संसार हेय स्थल)

मलाचे भांडार असलेल्या महादुःखाची उत्पत्ती करणा-ऱ्या शरीरा विषयी ज्ञान्याला तिरस्कार भाव उत्पन्न होतो. सत्व-गुण प्राधान्य मानव अहिंसा तत्वाची क्रियाशील व्यक्ती असून त्या तत्वाचा उपदेश करीत हिंसा कर्म नाश करण्याचे कामी ज्ञानाचा प्रसार करतो. प्रकाश अंधाराचा नाश करीत असल्या प्रमाणे अहिंसामय सत्वशील ज्ञानी लोकांची जीवनचर्या समस्त मानवांना मार्गदर्शक होते. भाव, मन व कायेने अहिंसामय होऊन वागणाऱ्या महान विभूति समस्त प्रपंचातील जीवात्म्याच्या सेवे-मध्ये तन्मय होऊन वागत असतात. अशा तत्वनिष्ठ विभूतींचा आत्मा असंख्यात जीवात्म्याना आकर्षण करण्याच्या प्रच्छन्न शक्तीने युक्त असतो. उदा – विद्युत्शक्ती जगांत व्यापून असली तरी ती शक्ती यंत्रा मध्ये एकत्रित होऊन अनंत क्रियेला चालना

देत असते. त्या प्रमाणें अहिंसा भाव सर्वत्र व्यापक असला तरी तत्वनिष्ठ विभूती मध्ये एकत्रित होऊन अनंत जीवात्म्यानां मार्ग-दर्शन करतो. वैराग्य, विवेक, विनय, दया, सौजन्य, बुद्धी, सिद्धी शम, दम, शांती, सत्कर्म, धैर्य, स्थैर्य, दान, आस्तिक्य, भक्ती, तप व योग या सर्व गुणाने युक्त असून अलौकिक शक्ती संपन्न महा-योगी सत्वगुणी म्हणविला जातो.

रजोगुण प्राधान्य मानवाच्या ज्ञानचक्षुपुढे हिंसा अहिंसा हे दोन वाद सदैव चालत असतात. या सृष्टीचे राज्य-सूत्र रजोगुण युक्त असते. राजा दुष्ट निग्रह, व शिष्ट परिपालक असून प्रजेला आनंदित करतो. रजोगुणी मानव आपले शरीर व तत्संबंधित पुत्र, दारा, धन, बांधवादि समस्त भोगोपभोगानंदा-मध्ये मग्न होतो. धनमोह, कृपणता, दुर्मद, दुराभिमान, शत्रुत्व निर्दयत्व, करूणाहीन, कापटच, चंड, कोप, कदन, कर्कशता, व दांभिकता, या सर्व गुणाने युक्त होऊन भोग प्रवीण असतो. आपल्या भोगा मध्ये दुसऱ्याचा उपद्रव झाला असल्यास त्याची हिंसा करतो.

तमोगुण प्राधान्य मानव अज्ञानाच्या अंधःकारानें युक्त असून सदा देहाभिमान वाळगीत असून अधो प्रवृत्तीनें चालत असतो. मतिमंद, वंचक, जडभाव, विशेषनिद्रा, निषिद्धकर्म, आलस्य, मनोचंचलता, कृतघ्नता, दुराशा, मात्सर्य, मूर्ख, दुर्मोह, माता, पिता, आचार्य, अतिथी देवतादिक पूज्य लोकांच्या ठिकाणी भक्ती शून्यता, तसेच केवळ विषयांध होऊन चालत असतो. तो स्व पर लोकांच्या हिंसा प्रवृत्ति मध्ये वावरत असतो.

अहिंसेचे ज्ञान मानवा शिवाय इतर प्राण्यामध्येही अनु-भवास येते. मानवानें पशूला मारण्यासाठी हातात काठी घेऊन

वर उचलल्यास त्याच्या हिंसा प्रवृत्तीची जाणिव होऊन तो-आपल्या रक्षणासाठी पळत सुटतो. हिंश्र पशूला मारण्या करीता गेल्यास त्याला या हिंसा प्रवृत्तीची जाणीव होताच तो भय पाऊन स्वसंरक्षणार्थं गिरि गुहेत लपून बसतो. पक्षी मनुष्याचा व हिंश्र पशूचा ध्वनी ऐकताच हिंसेच्या भीतीनें उडून जातात. या वरून मानवेतर सर्व पशू पक्षामध्ये सुद्धा स्व संरक्षणार्थं अहिंसा भाव स्वभाव सिद्ध असल्याचे प्रत्ययास येते.

आपल्याला दुसऱ्यानी स्वार्थ लोलुपतेने हिंसा करू लाग-ल्यास आपल्या संरक्षणा साठी त्याला योग्य शिक्षा देऊन हिंसा करणें अहिंसा होय. कारण हा देह माता पित्या पासून जन्म घेत-ल्यामुळे या शरीरावर त्यांचे स्वामीत्व आहे. आचार्यांनी ज्ञान दान करून सन्मार्ग प्रवृत्त केल्या मुळे त्यांचे स्वामित्व आहे. हे शरीर राष्ट्राचे अंशीभूत घटक असल्यामुळे याच्यावर राष्ट्राचे स्वामित्व आहे. हा देह ईश्वर प्राप्तीच्या पुण्य कर्माचे साधन असल्यामुळे हे अमूल्य आहे. दुसऱ्यानें अन्याय प्रवृत्तीने हिंसा करीत असल्यास त्याचा योग्य प्रतिकार करून स्व संरक्षण करून घेणें अहिंसा होय.

स्वार्थ प्रवृत्तीच्या दुष्ट लोका द्वारे हिंसेने आपण मरणें म्हणजे मानवी कर्तव्य पराङ्ग मुखता असून माता, पिता, गुरु आणि राष्ट्र द्रोह केल्या सारखे होते. अन्याय प्रवृत्तीने हिंसा करणाऱ्या हिंसकाला योग्य शिक्षा नाही दिल्यास राष्ट्रामध्ये हिंसा प्रवृत्ती ज्यास्त वाढविल्या सारखे होईल. योग्य शिक्षा दिल्यास व्यापक सुख शांतीला अवकाश मिळून दुसऱ्यानां येणाऱ्या अनिष्ट दुरिताचे नियमन केल्याचे श्रेय प्राप्त होऊन शिक्षा करून दुःख देणें, न्याय पर हिंसा ही अहिंसा होय. हिंसा किंवा अहिंसा ही केवळ कृतीवर अवलंबून नसून उद्देशावर अवलंबून असते.

उदा – राजा दुष्ट, निग्रह व शिष्ट परि पालक होऊन रंजन करतो. दुष्ट लोकाच्या हिंसेचे नियमन करण्यासाठी त्याना न्याय संमत दंड व शिक्षा देऊन हिंसा करणें ही अहिंसा होय. या प्रकारे राजाने दुष्ट लोकाची हिंसा करणे ही हिंसाकृति राजाच्या व्यक्तिगत सुखसमृद्धीसाठी नसून समस्त मानव कोटीच्या सुख-समृद्धीसाठी असते. या करिता ती हिंसा अहिंसा होय. राष्ट्राची शासन शक्ती हिंसक अपराध्याना दंड व शिक्षा देऊन पश्चात्ताप करवून हिंसा निरोध करते. एवढेच तिचे साध्य आहे. मात्र हिंसा भावाचे परिवर्तन करून त्याला अहिंसा तत्वाची दीक्षा देणें आणि उच्चस्तराला जाण्या सारखे मार्गदर्शन करणे राजदंडाला साध्य नसून धर्म संस्थेला साध्य आहे.

कृषिक, आहार धान्याची पिके वाढविण्याच्या कामी त्याला नाश करणाऱ्या पशु पक्ष्याना मारून पळऊन हिंसा करतो; येथे शेतकऱ्याचा भाव पिकाची समृद्धी करून ज्ञानी मानवाचे रक्षण करावयाचे आहे. मात्र पशू पक्ष्यांना मारून हिंसा करावी अशी भावना नाही. म्हणून ती हिंसा अहिंसा होय. पशु पक्ष्याला भय दाखऊन मारण्याचे प्रसंगी त्या कृषिकाचा मारण्याचा नेम चुकून आकस्मिक पणें तेथून जाणाऱ्या पथिकाला मार लागून मरण पावला तर ही हिंसा प्रत्यक्ष असली तरी अहेतुक हिंसा म्हणून न्याय संस्थेच्या नियमाप्रमाणे शेतकरी निरापराधी म्हण-विला जातो एक वाटसरू दुसऱ्या वाटसरूला मारू लागल्यास तो वाटसरू त्या मारणाऱ्याची हिंसा करतो. न्याय सम्मत तत्वसंम्मत हिंसा प्रवृत्ती प्रथमतः ज्याच्या भावने मध्ये उदय पावते तो अपराधी असून त्याच्या प्रतिकारार्थ घडणाऱ्या स्वसंरक्ष णार्थ केलेली हिंसा सदुद्देशपर असल्यामुळे ही हिंसा अहिंसा होय.

प्रतिकाररूप अहेतुक न्यायपर हिंसा अहिंसा असून त्यापासून उत्पन्न होणारे दुःखाचे तरंग दुःखोत्पादक होणार नाहीत. पशूंच्या ठिकाणी आपल्या रक्षणासाठी अहिंसेचे ज्ञान स्वाभाविक आहे. पशूकडून दुसऱ्याची हिंसा घडल्यास त्या हिंसा कृतीच्या योगाने माझ्याकडून अपराध घडला म्हणून ज्ञानी मनुष्या प्रमाणे तो जाणू शकत नाही. आपण केलेल्या हिंसा कृती बद्दल तो आपली हिंसा करील म्हणून भय पाऊन लपून बसत नाही. यावरून पशूच्या ठिकाणी आपल्या कडून घडलेल्या अपराधाला समजण्याचे ज्ञान नाही असे सिद्ध होते. परंतू मानव आपल्या कडून घडलेल्या हिंसा कृती विषयी आपण शिक्षेला पात्र होऊ या भावनेने, भीतीने गुप्तपणे राहून आपल्या अपराधा पासून वाचून राहाण्यांचा प्रयत्न करीत असतो. यावरून हा आपल्या अपराधाला जाणत असल्याचे सिद्ध होते. मानवामध्ये जागृदवस्था प्रामुख्याने असून स्वप्न, सुषुप्ती, हे दोन्ही अवस्था सामान्यआहेत जागृदावस्था ही कर्तृत्व शक्ती संपन्न असल्यामुळे भोगउत्पादक आणि भोगविभाजक आहेत. स्वप्न सुषुप्ती दोन्ही केवळ भोगविभाजक आहेत.

एका मनुष्याने स्वप्नात दुसऱ्याची हिंसा केली अथवा त्याच्या कडून अन्नदान धनदान घडले या पाप पुण्यं कर्माचा परिणाम स्वरूप सुख दुःख, दुसऱ्या जीवांना कांहीच संभवत नाही. स्वभावतः हा केवळ मनोमय सूक्ष्म प्राण सृष्टीतील व्यवहार असल्यामुळे मानवाची इच्छा, ज्ञान, क्रिया, ह्या शक्ती कालद्रव्या मध्ये उपयोग केल्याने वृत्तीरूप साध्य द्रव्यावर त्याचे संस्कार होत असल्या कारणाने त्याचे प्रतिफल प्रत्यक्ष सुख दुःख रूपाने कोणते हीभोग प्राप्त होत नाही. मनोमय वृत्ती हा मनाचा व्यापार असून ही

केवळ भोग विभाजक आहे. परंतू पशूमध्ये जागृदावस्था अत्यंत सामान्य असून स्वप्न सुषुप्ती या अवस्था विशेष आहेत. आणि पुण्योत्पादक असलेला ऊर्ध्वभाव, व पापोत्पादक असलेला अनैसर्गिकभाव हे दोन्ही पशुंच्या ठिकाणी नसल्यामुळे त्याला पुण्य पाप कांहीच संभवत नाही. त्या करीता पशूला सुख दुःखाचा अनुभव होणे मानवाच्या स्वप्नसृष्टीप्रमाणे केवळ भोग-विभाजक आहे.

व्याघ्र, सिंह, अस्वल, साप, विंचू, आदि हिंश्र जीव मानवाची हिंसा करण्याची प्रवृत्ती असणारे आहेत. त्यांच्या हिंसेला निरोध करून मारणे ही हिंसा आहिंसा होय.

सात्विक प्राणी असलेल्या हरीण, गाय,बैल, म्हैस, शेळी ससा, इत्यादि पशु अहिंसक प्राणी असले तरी मानवाच्या अहार धान्याचा नाश करण्याच्या कामी त्याला मारणे ही हिंसा अहिंसा होय. परंतू स्वार्थ लोलुपतेने आपल्या आहारासाठी त्याची जीव हिंसा ही निश्चित हिंसा होय. मानव आपल्या जिभेच्या लालसेने पशूपक्ष्यांची हिंसा करीत असतो. ही हिंसा होय.स्वसंरक्षण करून घेण्याची ज्ञान शक्ती पशूच्या ठिकाणी नसल्यामुळे ते आपले रक्षण करून घेण्याच्या कामी असमर्थ आहेत. त्या पशूला शस्त्राने छेदन करीत असताना शरीर सुखा पासून 'वंचित होऊ लागलो' असा भाव होऊन तो आर्त स्वराने ओरडतो. तापातिरेकाने भीती वाळगून मलमूत्र विसर्जनकरतो दुःखातीरेकाने दीर्घस्वास सोडीत शरीर कंपायमान होऊन डोळ्यांतून अश्रू गाळतो. रक्त-स्रावाची वेदना सहन न होऊन प्राण विसर्जन करतो. पशू हिंसे-मध्ये उत्पन्न होणारे दुःख तरंग हिंसकाच्या प्राण व भावनेत स्पर्श होऊन आवरण रूपाने संग्रह होत असतात. नंतर

जन्मांतराने मानवात दुःख रूपाने विभाजन होतात. याकरीता मानवापासून होणारी पशुपक्षी हिंसा ती हिंसा असून सर्वथा अपराध होतो.

आईच्या प्रसूती क्रियेमध्ये मूल अडल्यास आईच्या संरक्षणासाठी वैद्य शिशूला शस्त्रक्रिया करून काढून आईचे संरक्षण करतो. येथे जेष्ठ वस्तूच्या संरक्षणासाठी कनिष्ठ वस्तूची हिंसा करणे अहिंसा होय. आई वाप, गुरुजनादि वरिष्ठ लोकानीं मुलाना बाल्यावस्थेत सन्मार्ग प्रवृत्त करण्यासाठी सदुद्देशाने त्याना मारणे शिव्या देणे ही हिंसा अहिंसा होय.

वेदोक्त अहिंसा

मानवाच्या स्वाभाविक गुण धर्मांचा विचार केला असता. आपल्या आधिपत्यांत असलेल्या पती, पत्नी, पुत्र, बंधु आदि प्रेमी जनाच्या हिंसने त्याला अपार दुःख होते. त्याप्रमाणे, प्रकृतिच्या स्वामित्वांत असलेल्या पशु पक्षादि जीव हिंसेची पापे मानवाकडून घडल्यास प्रकृति मातेचा प्रकोप होतो. त्यासाठी पशूपक्षांची हिंसा ज्ञानी मानवाला सर्वथा सम्मत होणार नाही. यज्ञ, याग देवताराधना आदि पुण्यं कर्मामध्ये पशू हिंसा करण्याचा सांप्रदाय आला आहे.

"वैदीकि हिंसा हिंसा न भवति"

वेदामध्ये सांगितलेल्या विधि प्रमाणे हिंसा केल्यास ती हिंसा नाही म्हणून कांही लोक आपल्या रक्त पिपासेने हिंसा करून समाधान मानतात. तथापि ती प्राण हिंसाच होय.

मांसानां खादनं तव्दन्निशाचर समीरितम् ।
श्रूयते हि पुराकल्पे नृणांव्रीहिमयः पशुः ।।

येनानुजंत यज्वानः पुण्य लोक परायणः ॥
(महाभारत अनुशासन पर्व ११५-५६)

सुरां मत्स्यान् मधु मांस मासवं कृस रौदनम्।
धूर्तैः प्रवर्तितं ह्येतन्नैतद् वेदेषु कल्पितम् ॥
(महाभारत शांति पर्व २६५-९)

प्राचीन कालांतील मानव पुण्यं कर्म म्हणविणाऱ्या यज्ञयागादिका-मध्ये केवळ अन्नाचाच उपयोग करीत होता. मद्य मांसादि मादक पदार्थांचा उपयोग करण्याची प्रथा अधुनिक काळांतील धूर्त व असूरी लोका पासून रूढींत आली आहे, असे या प्रमाणावरून सिद्ध होते.

हिंसात्मक कृतीला यज्ञ म्हणता येत नाही "यज" धातू पासून यज्ञ शब्द उत्पन्न झाला आहे. यज्ञ म्हणजे देवपूजा जप, ध्यान आणि दान, असा अर्थ होतो. असुर लोकानी आपली रक्त पिपासा शमविण्याकरिता गाईची हिंसा करून यज्ञ केले आहेत. "गो" यज्ञा मध्ये गायीची पूजा करण्यात येते. देव यज्ञा मध्ये गायीला "अघ्न्या"म्हणजे गायीची हिंसा करणे योग्य नाही असे सिद्ध करून पूज्य भावांची कल्पना दर्शविली आहे. आजपर्यंत देवतांचे वंशज गो पूजक आहेत.

वैदिक यज्ञा मध्ये मांसाचा तिव्र निषेध केलेला आहे. मांस जाळून टाकणारा चिताग्नि हा त्याज्य आहे म्हणून सांगितले आहे. मृत मानवाच्या अंतेष्टि संस्कारामध्ये उपयोगील्या जाणाऱ्या अग्निला बहिष्कृत मानले आहे. यावरून यज्ञाच्या पवित्र वेदिकेवर स्थापना केलेल्या विशुद्ध अग्नीत हिंसा केलेल्या पशूचे मांसाचा उपयोग करणे योग्य नाही. याला काय प्रमाण आहे. "ऋव्याद" हा शब्द मांस भक्षी आणि मांस जाळणारा

अशा अर्थाचा आहे. अग्नि मांस जाळणारा असल्यामुळे भाव-दूषित होऊनये या उद्देशासाठी "क्रव्यादांशंत्यक्त्वा" म्हणून यज्ञाच्या वेदिकेवर स्थापन केलेल्या अग्नितील अल्पसा भाग बाहेर काढून टाकून देतो.

क्रव्यादमग्निं प्रहिणोमिदूरं यमराज्ञोगच्छतु रिप्रवाह ।
इहै वाय मितरो जातवेदा देवेभ्यो हव्यं वहतु प्रजानन् ।।
(ऋग्वेद ७।६।२१९)

"मांस भक्षण करणारा व जाळणारा अग्नि" मी काढून बाहेर टाकतो. हा अग्नि पापाचा भार वाहाणारा आहे. त्यासाठी यम राजाच्या सदनाला निघून जावो म्हणून ऋत्विज यजमानाच्या वतीनें सांगून यज्ञाचा आरंभ करतो या "क्रव्याद" अग्निच्या व्यतिरिक्त असलेला पवित्र अग्नी, देव असतो. त्यापवित्र अग्नि-देवतेची तो स्थापना करतो.

अग्निदेव आम्ही समर्पण केलेल्या हविर्द्रव्यास देवतेच्या सन्निध नेऊन पोहंचवितो, का ? म्हणजे तो अग्निदेव समस्त देवतांना जाणणारा सर्वज्ञ आहे. आणि यजुर्वेदाच्या अनेक मंत्रामध्ये परमेश्वरा विषयी आमच्या मुलांना व पशूनां, गो अश्वादिकानांही हिंसा रूप मृत्यू पासून रक्षण करावे अशी प्रार्थना केली आहे.

मानस्तनये मानो गोषुमानो अश्वेषु रीरिषः ।।

कांही मंत्राचा वाक्यांश अशाप्रकारे आहे. "पशून्पाही" = पशूचे रक्षण करा "गाम् मा हिंसीः" = गाईची हिंसा करू नका, "अजाम् मा हिंसीः" "अवीं मा हिंसीः" = शेळ्या मेंढ्यादि पशूंची हिंसा करू नका, "इमं मा हिंसीद्विपादपशुं" = द्विपाद पशूंची हिंसा करू नका, "मा हिंसी रेक शफं पशुम्" =

एका खुराच्या-गाढव घोड्यादि पशूंची हिंसा करू नका. अखेर "मा हिंस्यात् सर्वाभूतानि' = कोणत्याहि प्राण्याची हिंसा करू नको असे निक्षून सांगितले आहे. ऋग्वेदामध्ये इतकी कठोर आज्ञा केली आहे की,

> यः पौरुषेण क्रविषा समङ्क्तेयो अश्वेन पशूना
> यातु धानः । यो अघ्न्या या भरति क्षीरमग्ने तेषां
> शीर्षाणि हरसापि वृश्च ॥ (ऋग्वेद ८-४-८-१६)

जो मानव घोड्याचे मांस खातो. आणि गो क्षीराची चोरी करतो अशा अधम जीवाचे मस्तक च्छेदन करावे म्हणून आज्ञा केली आहे. यज्ञा मध्ये पशू बांधण्याचा विचार करताना असा प्रश्न संभवतो की तो कोणता पशू असेल? "शतपथ" ब्राह्मण ग्रंथा मध्ये असलेल्या एका संभाषणा करून याचा अर्थ स्पष्टपणें समजून येतो. "कतमः प्रजापतिः" प्रजापति अर्थात प्रजेचे पालन करणारा कोण असे विचारले असता "पशुरिति" पशूच पालक झालेला आहे म्हणून उत्तर आले आहे. याचे तात्पर्य असे आहे की ज्या वस्तू व जी शक्ती प्रजेला पोषण करीत असते. त्याला पशू म्हणून सांगितले आहे. त्यासाठी पशूंचा व्यापक अर्थ वेग वेगळ्या पशूंची चर्चा करून यज्ञा मध्ये केलेली आहे. "नृणां व्रिहि मयः पशुः" मानवाच्या यज्ञामध्ये अन्नमय पशूचा उपयोग होत आलेला आहे. "यज्ञेन यज्ञमय जंत देवाः"देवानी यज्ञा पासून यज्ञ केले आहेत- यज्ञाच्या रक्षणासाठी यज्ञ मय पशू झाले होते. निरुक्त ग्रंथा मध्ये या मंत्राचा अर्थ करीत असता यास्काचार्यांनी "अग्निः पशुरासी त्तम् देवा अलभंत" अग्नीच पशू झाले होते. त्याला देव प्रसन्न झाले होते म्हणून लिहीले आहे. एवढेच नव्हे. तर,

"अग्निः पशुरासी त्तेनाय जंत। वायुः पशुरासीत्ते नाथ जंत। सुर्यः पशुरासी त्तेनाय जंत। अग्नि, वायू, आणि सूर्य देखील पशू आहेत म्हणून सांगितले आहे. "अभद्नन् पुरुषं पशुं" या मंत्रा मध्ये पुरूषांना सुद्धा पशू म्हणून सांगितले आहे. तसेच सप्त परिधी व एकवीस समिधा यांचीही चर्चा करण्यांत येते.

सप्ता स्यासन् परिधयः त्रिसप्त समिधः कृताः॥

याचा अर्थ दोन प्रकारे होतो. पहिला :– शरीरगत सप्त धातूच परिधि झाले आहेत. पंच ज्ञानेंद्रिय पंच कर्मेंद्रिय दश प्राण आणि एक मन ही सर्व मिळून एकवीस समिधा होतात. देवानी ह्या सर्वांपासून आत्मरूपी पुरुषा बरोबर "शरीरयज्ञ" केला. या सर्वांच्या सहयोगाने मानव शरीर सृष्टीची निर्मिती झाली. दुसरा अर्थ :– संगीत ही यज्ञ पर आहे. संगीतामध्ये सप्त स्वरच सप्त परिधी होत. एकवीस मूर्छनाच समिधा झाल्या आहेत. "नाद" हा तेथे पशू झाला आहे. यापासून "संगीत यज्ञ" होतो.

"धाता धेनु रभवद् वत्सोऽस्या स्तिलः"

(अथर्ववेद १८–४–३२१)

अर्थात् साळीच धेनु झाली आहे. आणि तीळ तिचे वत्स आहे.

अश्वाः कणा गावस्तंडुला माषका स्तुशाह।
शाम मयोस्ये मांसानि लोहित मस्य लोहितम्॥

(अथर्ववेद ११–३–५ तथा ११–३–७)

येथे तांदळाचे कण अश्व झाले आहेत. तांदुळ गाय झाली आहे त्याचेवर असलेले कवच चर्म झाले आहे. तांदळावरील श्याम भाग मांस झाला आहे.आणि तांबडा भाग रुधिर झाले आहे. असे वेदाचे प्रमाण आहे. यज्ञात गाई, अश्व, वधाचा उल्लेख कुठेच आढळत नाही. हवन प्रकरणामध्ये घोडा, गाय, शेळी, मांस, अस्थि

आणि मज्जादि शब्द येत असले तरी ते सर्व अन्नाचा बोध करणारे आहेत. प्रत्यक्ष पशूंचा आणि त्यांच्या अवयवांचा उपयोग नाही. असे यावरून सिद्ध होते. "शतपथ" ब्राह्मण ग्रंथामध्ये सुद्धा केवळ दळलेले पीठ "लोम" आहे त्यात पाणी मिसळल्या नंतर "चर्म" होते. तिबल्यानंतर 'मांस" म्हणविते. ते भाजल्यानंतर त्याला "अस्थी" म्हणतात. त्यात तूप घातल्यावर "मज्जा" म्हणून पक्व झालेल्या आहार पदार्थाला "पाक्त पशू" म्हणून सांगितले आहे.

"मांस पाक प्रतिक्षेधस्थ तद्वत्" (१२-२-२) यज्ञामध्ये ज्याप्रमाणे पशू हिंसेचा निषेध करण्यात आला आहे. त्याप्रमाणे मांसाहार सुद्धा निषिद्धच मानला आहे. "धेनु वच्च अश्व दक्षणा" (मिमांसा १०-३-६५) गायी प्रमाणे घोडा सुद्धा यज्ञामध्ये दक्षिणा देण्यासाठी उपयोगीला जातो. या शिवाय त्याची हिंसा करून मांस सेवन करू नये म्हणून सांगितले आहे.

"अपि वा दान मात्रं स्वाद भक्ष शद्वनाभि संबंधनात्,,

(मिमांसा १०-७-१५)

तो केवळ दान देण्यांसाठीच आहे. का? म्हणजे गायी प्रमाणें घोड्याच्या संबंधानेही कुठेच भक्षण शद्व आलेला नाही. तात्पर्य मनुष्याच्या भोजन काली केवळ अन्नाचाच उपयोग होत असतो. या शिवाय गो, अश्वादिकाचा उपयोग नाही. यज्ञ यागादि पुण्यकर्मामध्ये हिंसा करणें वेद विहीत नाही. असे सर्व प्रमाणा वरून सिद्ध होते.

मानवाला शाकाहार नैसर्गिक आहे.

मानवा मध्ये शाकाहार आणि मांसाहार असे दोन प्रकार आहेत. कांही लोक शुद्ध शाकाहारी असून कांही लोक शाकाहार व मांसाहार असे मिश्र आहारी आहेत. मानवाने

आपल्या शरीर संरक्षणासाठी मांसाहार सेवन करणे अनैसर्गिक आहे. पशू तृण पर्ण खाऊन जीवित आहेत. तृण पर्णादि जड आहारामध्ये ज्ञानकण कमी असून जड शक्ती विशेष असल्यामुळे पशूंच्या ठिकाणी भार वाहाण्याची शक्ती विशेष असते. कितीही तृण पर्ण खाल्ले तरी त्या पशूंना अपचन होत नाही. हा प्राकृतिक व स्वाभाविक नियम आहे. परंतू ज्ञानी मानवाने अन्न धान्यांचा आहार, विशेष रीतीने सेवन केला असता, अपचन होऊन त्यास बाधा उत्पन्न होते. त्यासाठी मानवानें मानसिक संयमतेनें मिताहार सेवन करणे हा मानसिक प्राकृतिक नियम होय. पशू पासून उत्पन्न होणाऱ्या दूध व तूपांत ज्ञान कण विशेष असल्याचे प्रत्यक्ष असले तरी त्यांच्या मांसामध्ये जडकण आहेत.

"अभिवर्धतां पयसाभि राष्ट्रेण वर्धताम्"

(अथर्ववेद ६–७८–२)

"हे मानवानो दूध तूप सेवन करून धष्ट पुष्ट व्हा, तसेच राष्ट्राची समृद्धी करा. पशूंचे दूध तूप सेवन करा मात्र मांस सर्वथा सेवन करू नका' अशी अथर्ववेदाची आज्ञा आहे.

हिंसा कर्मामध्ये पशूपक्षांचे प्राण विसर्जन होत असता. त्यांना होणारे दुःखाचे तरंग त्याच्या भूत, प्राण, भावावर विशेष संस्कारित होत असतात. ते दुःखाचे तरंग मानवाच्या जड दृष्टीला दिसत नसले तरी सर्वत्र व्यापून असतात. आम्ही श्वासोच्छ्वास घेत असताना, ओरडत असताना, बोलत असताना, सर्व ध्वनि, तरंग रूपाने वायूत प्रसरण पावून व व्यापून राहाण्याचा गुणधर्म त्यात असल्यामुळे रेडिओ, वायरलेस यंत्राद्वारे त्या ध्वनि तरंगाला आकर्षित करून प्रतिध्वनी उत्पन्न करणारे भौतिक विज्ञानांचे प्रयोग या तत्वाला साक्षी भूत आहेत.

प्राण, अपान, समान, उदान, व्यान असे पंच प्राण वायु-मध्ये "समान" वायू पासून ध्वनि प्रसरण कार्य होत असल्या-प्रमाणे हिंसेपासून होणाऱ्या दुःखरूपी तरंगाचा प्रत्यक्ष पणे जड दृष्टीला अनुभव होत नसला तरी त्याचे संस्काररूप दुःखाचे-तरंग सूक्ष्मरूपाने मृतप्राण्याच्या मांसकणांत विशेष रूपाने संग्रहित होत असतात व सर्वत्र व्यापून जातात. प्रत्यक्ष हिंसक व मांस भक्षक या दोघांच्या सापेक्ष भावनेंत तो मांस भक्षण करीत असल्या कारणाने त्या पदार्थाला ते प्रत्यक्ष संबंधित जीवी आहेत. या करीता त्याचे दुःख तरंग त्यांच्या मध्ये प्रवेश करून तात्का-लिक वर्तमान काली त्याचा परिणाम दिसत नसला तरी रक्त, मांस,मज्जा, रेतस् (वीर्य) उत्पन्न होऊन त्याने जडत्व येवून काम, क्रोध, मद, मत्सर, मोह, लोभ आदि रूपाने अधोमुखी विषय भोग प्रवृत्तिकडे वाहात असतात. जन्मांतरी नानाविध दुःख रूपानें पीडा करीतात. हिंसा कर्मरत सहकर्मी सहभोगी पापजीवी राष्ट्रामध्ये अनंत झाले असता,त्या पापमय दुःखाचेतरंग राष्ट्राच्या व्यापक प्राण, भाव तत्वामध्ये प्रसरण पाऊन प्रकृतिमध्ये विशेप विकोप होऊन मानव समाजास नानाविध पीडा करतो.

शुद्ध शाकाहार भोग सुखाला उपयोगी असून, संतानो-त्पत्तीच्या कार्य क्षमतेला महत्तर साधन होऊन सूप्रजा निर्माण करणारा आहे. शुद्ध अहिंसामय तपोनिष्ठ जीवाच्या ठिकाणी शुद्ध शाकाहारापासून उत्पन्न झालेल्या वीर्य, ओजाच्या रूपाने परिणत होऊन ऊर्ध्व मुखाने वाहाते. व आत्मा अनात्मा या तत्वानुसंधानाला साहायक होते. असले अहिंसामय तपोनिष्ठ पुण्य जीवी राष्ट्रामध्ये पुष्कळ झाल्यास त्यांच्या पुण्य शक्ती जगाच्या सर्व भागाला व्यापून टाकतात व त्या योगे सुवृष्टीने पिकाची

समृद्धी होते. आरोग्याची सकल संपदा वाढून सर्व मानव सुख शांतीच्या सदनामध्ये विश्राम पावत कालक्षेप करीत असतात.

मांस भक्षण मयुक्तं सर्वेषां (चाणक्य सुत्र षष्ठाध्याय)

समस्त मानव जातीला मांस भक्षण अयोग्य आहे. म्हणून सांगितले आहे. कांही प्रसंगी अन्नाभावाने राष्ट्रामध्ये दुर्भिक्ष होऊन अनेक लोक मृत्युमुखी गेल्याचे इतिहास सांगत आहे. या विरुद्ध मांसाच्या अभावाने दुर्भिक्ष होऊन मानव समाज मृत्युमुखी पडल्याचा इतिहासांत उल्लेख नाही. मानव आपल्या कर्तृत्व शक्तीनें फल मुल धान्याचे उत्पादन करतो. आपल्या श्रमाचा उपयोग होत असल्यामुळे शाकाहार घेण्यास मानव पात्र आहे. नैसर्गिक जन्म पावलेल्या पशूचा उपयोग करणे म्हणजे त्याच्या पासून उत्पन्न होणाऱ्या दूध तुपादि वस्तूचे सेवन करण्यास पात्र झाला आहे. या शिवाय त्या प्राण्याची हिंसा करून मांस भक्षण करणे निसर्ग नियमाच्या विरूद्ध होते. भारत कृषी प्रधान राष्ट्र असल्यामुळे कृषि कर्म धनोत्पादक आहे. अन्न वस्त्र उत्पादनाचे कामी पशूच मुख्य साहाय्यक आहेत. त्यांची हिंसा न करता अहिंसेनें संरक्षण करणे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. पशू राष्ट्राची चैतन्य संपत्ती असल्या कारणाने पशू हिंसा करणे हा राष्ट्र द्रोह आहे.

१) मांसाहारी प्राण्यांचे दात अधिक तीक्ष्ण असतात.कारण त्यांना आपल्या तीक्ष्ण दातांनी मांस खाता यावे. उदा. वाघ, सिंह, व मांजर परंतू शाकाहारी प्राण्यांचे दात एका ओळीने व एका चौकटीत बसविलेले असतात. उदा. गाय, म्हैस, घोडा, इत्यादि मनुष्याचे दात वाघ, सिंह, मांजर त्यांच्या दातांशी मिळते जुळते नसून ते गाय, म्हैस व घोडा या प्राण्यांच्या दातांशी

मिळते जुळते असतात. म्हणून मनुष्य प्राणी हा पूर्ण शाकाहारी आहे.

२) मांस भक्षण करणाऱ्या प्राण्यांच्या पिलांची डोळे जन्मल्यानंतर कांही ठराविक दिवसा नंतर उघडतात. उदा. कुत्रा मांजर, वाघ आणि सिह परंतू शाकाहारी प्राण्यांत मात्र तशी स्थिती अगदि या उलट असते. उदा. गाय, म्हैस इत्यादिची वासरे जर मांसाहारी प्राण्या प्रमाणे आपली मुले डोळे झाकूनच जन्मली तर आपण सुद्धा विनधोक व जाहीरपणें मांस भक्षण करावे नसतां आपण प्रकृतिमाते विषयी अपराधी व्हाल.

३) मांसाहारी प्राण्यांच्या शरीरातून घाम येत नाही. त्यांच्या शरीरांतील घाम जिभेच्या टोकानें आणि पायाच्या स्पंजा द्वारे निघून जातो. आणि त्यांच्या शरीराचा एक प्रकारचा दुर्गंध वास येत असतो. परंतू शाकाहारी प्राण्यांच्या शरीरांतून घाम येतो व त्यांच्या शरीराचा उग्र वास येत नाही.

४) मांसाहारी प्राणी पाणी आपल्या जिभेच्या साहचानें पीतात. वाघ, सिह, आणि मांजर या उलट शाकाहारी प्राणी पाणी तोंडानें पितात. उदा. घोडा, म्हैस वगैरे. जर आपली मुले सुद्धा जिभेच्या साहचानें पाणी पिऊ लागली तर आपली गणना मांसाहारी प्राण्यांत केली जाईल.

५) वाघ, सिह आणि मांजर यांच्या डोळ्यांत एक प्रकारचे प्रखर तेज असते कारण त्यांना रात्रींच्या वेळी शिकार करावी लागते. म्हणून त्यांचें डोळें अंधारात अधिक प्रखरतेनं चमकतात परंतू शाकाहारी मध्ये तसे नसते. सिंह, वाघ, मांजर इत्यादि मांसाहारी प्राण्यांचे स्वभाव चंचल,क्रोधी,उग्र आणि उत्तेजक वन असलेले तात. या उलट बैल, म्हैस, घोडा, गाढव,

हत्ती आणि बकरी इत्यादि शारिरीक श्रम करणाऱ्या प्राण्यांचे मुख्य आहार गवत, कडबा, हिरवा भाजीपाला आणि इतर धान्य आहेत. म्हणून ते सर्व प्राणी सहनशील शांत आणि कोमल अंतःकरणाची असतात. मांसाहारी व शाकाहारीत वरील प्रमाणें फरक दिसून येतो. म्हणून मांसाहार सेवन करणाऱ्या व्यक्ती सुद्धा स्वभावाने कामी 'क्रोधी' भांडखोर व असभ्य असतात.

वनस्पतीची हिंसा, हिंसा नाही काय? अशी शंका उद्भवल्यास त्याचे उत्तर असे की, मानव गाढ निद्रेच्या सुषुप्ति अवस्थेमध्ये असता श्वासोच्छ्वास आणि जठराग्नीचे पाचन कार्य अव्याहत पणें चालत असते. परंतू भावतत्वाचे अंग असलेले मन, बुद्धी, चित्त, अहंकार, अंतःकरण, चतुष्टय, लुप्तावस्थेत असल्या कारणाने सुख दुःखाची प्रचिती होत नाही. त्याचप्रमाणें केवळ सुषुप्ति अवस्थेमध्ये असणाऱ्या वनस्पतीची हिंसा केल्याने सुख दुःखाची प्रचीती होत नाही. पशूपक्षाच्या हिंसे पासून उत्पन्न होणाऱ्या दुःखाच्या तरंगाचा मानवाच्या अंतःकरणाला स्पर्श होत असल्याने हिंसेची जाणीव होत असते. परंतू वनस्पतीचा उपयोग करीत असता प्रत्यक्षात सुख व दुःखाची जाणीव होत नाही. त्याकरीता वनस्पतीचा उपयोग करणे अहिंसा असून मानवाचे जीवन रक्षणाला स्वाभाविक पणे योग्य आहे.

मानव जीवाचा विकास करण्यासाठी, अहिंसा तत्वाचा संस्कार जन्माच्या आदिपासून यावा लागतो. एवढेच नव्हे तर पवित्र वातावरणा मध्ये मुलांची अभिवृद्धी करणें अत्यावश्यक आहे. जैन, वैष्णव, शैव, वीरशैवादि सांप्रद्रायिकांनी वंश परंपरागत पितृ धर्म समजून त्या अहिंसा तत्वाचे परिपालन करीत आले आहेत. त्याकरीता त्या पुण्य जीवी लोकाना पशुहिंसाच काय ?

मांसाहाराची कल्पना सुद्धा येत नाही. परंतू मांसाहाराचा संस्कार असलेल्या सांप्रदायिकाना पूर्व संस्कार अनुवंशिक होऊन आल्यामुळे जन्मतःच त्याच्या रसनेंद्रियाला आमिष आहाराचा संस्कार झालेला असतो. असल्या लोकाना मांसाहाराचा त्याग करणे म्हणजे एक मोठी समस्या होऊन असाध्य वाटते. त्या करीता पवित्र अहिंसा तत्वाचा संस्कार भावी राष्ट्राची सुप्रजा निर्माण करण्या साठी मूल भूत पाया झाला आहे.

मी कधीही मरू नये अमर होऊन राहावे, अशी अपेक्षा करणारे मानव शरीर एकदा मृत्यु मुखी जाणार हे निश्चितआहे. जनन मरण निसर्ग सिद्ध आहे. परंतु शरीरांतील आत्मा मात्र अमर आहे. शरीरच "मी" आहे म्हणून अमर रुपी आत्म्याच्या ठिकाणी भावना झाल्यामुळे त्या शरीराला होणारे सुख दुःख आपल्याला होते. असे तो समजत असतो. "मी" केवळ ज्ञान स्वरूप आहे असा आत्म्याच्या ठिकाणी परिशुद्ध ज्ञानाचा प्रकाश उदय पावताच अहिंसामय अमर रूप होतो. अहिंसा नियमाच्या शिक्षण क्रमाशिवाय ते तत्व साध्य होत नाही. अहिंसामय तत्वशील लोकांचा सहवास सेवा, व उपदेश या पासून मानवाच्या भावनेला हिंसेचे आवरण न होता स्वाभाविक असलेल्या अहिंसा भावाचा विकास होतो. अहिंसा नियम सर्व सामान्य पणें व्यापक रूपाने सर्व लोकाना प्राप्त होण्यासाठी अहिंसामय संस्कार असलेल्या पुरुषांच्या, गुरू लोकांच्या आश्रमात, गुरुकुलांत बाल्य वयातील मुलाना ठेऊन विद्यार्जन करावे लागते. त्या पासून अहिंसा तत्वांचे संस्कार मुलांच्या काया, वाच्या, मनामध्ये प्रबल होवून वाढत असतात. नैतिक आधारावर अससेल्या शिक्षण संस्था साऱ्या राष्ट्राला नैतिक धर्माची दीक्षा देऊन त्यास पुण्यशील

करावयाचे आहे. भोग प्रवृत्ती मध्ये मानवाचे मन अनावर होवून नास्तिक भावनेंत प्रवेश करून अनेक हिंसात्मक दुष्कृति करीत ब्रह्मज्ञानी हत्या, मातृहत्या, पितृहत्या, गुरुहत्या, राजहत्या, मंत्रिहत्या, न्यायधीशहत्या, मातृभक्तहत्या, पितृभक्तहत्या, गुरुभक्तहत्या, देवभक्तहत्या, जेष्ठ भक्त हत्या, राज सेवक हत्या, स्वामीहत्या, स्वामी भक्तहत्या, पुत्री हत्या , पत्नी मातृ हत्या, आचार्य पत्नी हत्या, श्रोत्रिय पत्नी हत्या, पतिव्रता स्त्री हत्या, गर्भिणी हत्या, गर्भपात हत्या, शिशु हत्या, विधवा स्त्री हत्या, बाल हत्या, बंधु हत्या, भगिनी हत्या, बंधु पुत्र हत्या, बंधु पत्नी हत्या, जामात हत्या, वंध्या स्त्री हत्या, ब्रह्मचारीहत्या, मित्र हत्या, शिष्य हत्या, सेवक हत्या, मातृ बंधु हत्या, पितृ बंधु हत्या, कुमारी हत्या, गुरु बंधु हत्या, दासी हत्या, गो हत्या, अश्व-हत्या, वृषभ हत्या, पशु पक्षी हत्या, पथिक हत्या, आणि राष्ट्र ध्वज भंग, देवता मंदिर विध्वंस, प्रार्थनामंदिरविध्वंस, देवता मूर्ति भंजन, न्यायालय विध्वंस, इत्यादि प्रत्यक्ष जड दृष्टीला गोचर होण्या सारखे जीवचैतन्य नसले तरी त्याच्या विध्वंसानें अनेक मानवाच्या मनोभावनेला दुःख देणारे असल्या कारणाने ती हिंसाच होय. केवळ एका हिंसाकर्मा पासून काया, वाचा, व मन या त्रिविध रूपांत एकेवीस लक्ष प्रकारची पाप कर्मे संभव-तात. धर्मच राष्ट्राचा प्राण आहे. धर्मच राष्ट्राचा मूळ पाया आहे. राष्ट्राने धर्माचा आश्रय घेवून धर्म पीठाला प्रोत्साहान दिल्यास सारे विश्वच अहिंसा तत्वमय होते. प्रकृति माता अहिंसामय होऊन सदा सर्वदा सर्व प्राण्यांना संरक्षण करते.

मानव धर्म मंदिराच्या प्रथम सोपान असलेल्या अहिंसा नियमाची परि समाप्ती होते.

.... सत्य ....

"सत्" हे परशिव ब्रह्माच्या पाच लक्षणा पैकी एक आहे. ते भूत, भविष्य, वर्तमान या त्रिकालामध्ये ही परिवर्तन न पावणारे असल्यामुळे "सद्रूप" या नामाभिधानाने ओळखिले जाते. "सद्रूप" चैतन्यनच "असत्" वस्तूत समाविष्ट होऊन जीव रूपाने कर्म मय प्रपंचामध्ये मानव जन्मास आलेला आहे. अनित्य असलेल्या प्रपंचाला नित्य आहे, अशी कल्पना करून "सत्" वस्तूच "असत्" रूपाने परिणत झाली आहे.

सत् शब्द म्हणजे खरेच बोल, खरेच आचरण कर.व सत्य असलेल्या वस्तूलाच जाण अशा तीन प्रकारचा बोध करतो. शिशु आईच्या उदरापासून जन्मताच बोलत नाही. वाक्सामर्थ्य उगम पावून क्रमानें बोलू लागल्यास सत्यासत्याचा क्रम प्रारंभ होतो. माझे हात, माझे पाय, माझे डोळे, व माझे कान या सर्व अवय-वांचा परिचय होऊन शरीरच मी आहे अशी दृढ भावना करून घेते. माझे आई बाप, बहीण भाऊ म्हणून या सर्वांना तो ओळ-खतो. व घोडा, गाय, घर, शेत आदि अनेक वस्तू माझ्या आहेत म्हणून समजू लागतो. इतर वस्तू माझ्या नाहीत म्हणून भाव-पूर्ण विश्वास होताच सत्यासत्याची कल्पना उगम पावते. बाल-पणी आई मुला बरोबर वात्सल्य भावानेत बोलत असते. खाणे, पीणे, खेळणे, आदि अपेक्षित वस्तू देऊन आनंदित करते. मुले आपल्या खेळण्यामध्ये परस्परात असत्य बोलून भांडू लागल्यास त्यांना आई उपदेश करून "तू खरे बोल म्हणून सांगितलेले विस-रून लबाड बोलू लागलास" अशाप्रकारे सत्य बोलण्याची प्रेरणा करीत असते. मुलगा पुढे मोठा होऊन आपले आई, बाप,

बंधुजनाबरोबर धन कनकादि वस्तूं देण्याघेण्याच्या व्यवहारामध्ये सत्यच बोलत असतो. आपल्या कुटुंबातील सर्व लोकांबरोबर सत्य बोलावे म्हणून परस्पर अपेक्षा करीत असतात. यावरून सत्य प्रत्येकाचे ठिकाणी जन्मसिद्ध प्रवृत्ति असल्याचे कळून येते. कुटुंबांतील सर्व लोक परस्पर विश्वास पूर्वक सत्य बोलून सत्यानेच वागत असल्यामुळे त्यांचे जीवनसूत्र सरळपणे चालत असते. त्यांतील कांही लोक असत्य बोलणे, वागणे, करू लागल्यास परस्परा मध्ये प्रेमाचा अभाव व अविश्वास होऊन कौटुंबिक क्षेत्राची व्यवस्था विघडते. त्यानें सुखाचा अभाव होऊन दु:खानुभव होतो. त्याकरीता मानवाच्या जीवन सूत्राला सत्यच मूलाधार आहे.

प्रत्येक मानव माझ्या बरोबर दुसऱ्याने सत्य बोलावे अशी अपेक्षा करतो. दुसऱ्याच्या असत्य भाषणानें भय, दु:ख उत्पन्न होऊन आपल्या सुख शांतिच्या ध्येयाला विघ्न समजतो. माझ्या बरोबर दुसऱ्यानें असत्य बोलू नये अशा आपल्यानैसर्गिक भावांच्या इच्छे विरूद्ध आपण असत्य बोलावे म्हणून अनैसर्गिक भावनेचा उदय होताच त्याच्या अंत:करणात सदैव वास करून असलेली निग्रह रूप नियामक शक्ती तू असत्य बोलू नकोस व मानवते पासून पतित होऊ नकोस अशा अनुग्रह पूरित दिव्य दृष्टीने संदेश देऊन नियमन करीत असते. तेव्हा त्याच्या मन: प्रवृत्तिमध्ये सत्यासत्याचा द्वंद्व भाव निर्माण होतो. त्या अंतर्नादाला न जुमानता तो असत्य बोलतो. असत्य हे स्वतंत्र एक तत्व नसून सत्याच्या अभावी असत्याची प्रतिती येते.

आपल्या नैसर्गिक सत्याचे विरूद्ध अनैसर्गिक असत्य बोलणाऱ्या मानवाला नैतिक पातळीच्या मानव समाजामध्ये उच्चस्थान नसते. मानव आपल्या भोग वस्तुंच्या संबंधित असलेल्या शेत घर,

आदि वस्तू दुसऱ्या बरोबर देण्याघेण्याच्या परस्पर व्यवहारा- मध्ये केवळ वाचेने व्यवहार झाले असल्यास दोघांच्या स्मरणात दीर्घ काल राहणे शक्य नाही. व आपल्या पासून असत्य घडूनये आपली स्मृति चिरकाल राहावी आणि मानवाचे मरण अनि- श्चित असल्यामुळे क्रय, विक्रय केलेल्या स्थावर जंगम संपत्तीचा विचार दीर्घ काल राहावा अशी अपेक्षा धरून क्रय विक्रय पत्र, बक्षिसपत्र,दानपत्र,दत्तकपत्र,ताडपत्र,ताम्रपट शिलालेख, आदिवर लिहून देण्या घेण्यांत येतात. मानव आपले सत्या पासून पतन होऊ नये हा याचा मूल उद्देश आहे.

सत्याने वागणाऱ्या व्यक्तीचे जीवन स्वतंत्र असून सन्मा- नित व्यक्तीमध्ये त्याची गणना होते. मानव असत्य बोलून अपराधी झाल्यास सत्य बोलणारी व्यक्ती त्याच्या अपराधाचा विचार करण्यासाठी तो स्वत: असमर्थ असल्यामुळे न्याय संस्थे- कडे जातो. आपल्यावर होणाऱ्या असत्याक्रमणाचा विचार अर्जा- च्या द्वारे कळवितो. न्यायाधीश, वादी प्रतीवादी यांचे म्हणणे ऐकून घेऊन लिहून घेतो. त्या घटना प्रत्यक्ष पाहिलेल्या साक्षी- दाराना आणि वादी प्रतिवादीना न्यायधीश तुम्ही धर्माचे स्मरण करून ईश्वराच्या साक्षीने अथवा आत्म साक्षीने शपथ विधी पुरस्सर सांगावे अशी आज्ञा करीत असतो. त्या वेळी त्यांनी प्रमाण बद्ध होऊन सांगितलेल्या विचाराचा विमर्श करून न्यायधीश अपराधाचा निर्णय करतो. आणि अपराधाला शिक्षा देऊन पुन: दुसऱ्या वेळा त्याच्याकडून अपराध घडू नये म्हणून त्याच्या मनाला पश्चात्ताप करविणे हा न्याय दंडाचा मूल उद्देश आहे.

राष्ट्र शासनाचे समस्त व्यवहार संविधाना प्रमाणे चालत असतात. संसदेचा सदस्य, सभापती, राष्ट्रपती, सेनापती,

मंत्री व न्यायाधीश आपले पद ग्रहण करण्यापूर्वी ईश्वर मानणारे आस्तिक, ईश्वराला साक्षीभूत ठेऊन अथवा ईश्वराला न मानणारे निरीश्वरवादी नास्तिक आत्मसाक्षीने हे पद शपथ पूर्वक ग्रहण करतात. राष्ट्राची सर्व सूत्रे कर्तव्य निष्ठेवर अवलंबून असली तरी प्रत्येकाकडून होणाऱ्या अपराधा विषयी नियमन करणे शासन संस्थेला साध्य नाही. हे समजून श्रद्धावलंबी होऊन शपथ विधी अस्तित्वांत आणिली आहे. "शपथ" विधी पासून प्रत्येकाच्या ठिकाणी आत्मिक भीती उत्पन्न होते. प्रतिज्ञा करविणे हा अपराध निरोधाचा सदुद्देश आहे. प्रतिज्ञेलाही न जुमानता अपराध करीत असले वेळी त्यांच्या अंतःकरणात सदैव वास करून असलेली निग्रह रूप नियामक शक्ती ईश्वराच्या साक्षीने व आत्म साक्षीने राष्ट्राची सेवा करतो. म्हणून प्रतिज्ञा पूर्वक हे पद स्वीकारले आहेस. "तू असत्य बोलू नकोस व असत्य वागू नकोस म्हणून अनुग्रह पूरित होऊन अंतर्नियामक शक्तीने आज्ञा केली असली तरी त्याच्याकडे लक्ष न देता ते प्रतिदिन हाजारो अपराध करीत असतात. हे देश द्रोह, सत्य द्रोहात्मक अनंत अपराध राष्ट्रातील प्रजेच्या सुख शांतीचा भंग करणारे आहेत. असल्या गुप्त अपराधाला राष्ट्राकडून शासन मिळत नाही. व सत्य नियमाचा विकास करण्याचे सामर्थ्य ही त्यास नाही. केवळ प्रतिज्ञा विधीपासून मानव सत्यान्वेशी होत नसल्याने त्याच्या आत्मशुद्धीसाठी दुसऱ्या एका स्वतंत्र शिक्षण विधानाची अवश्यकता आहे. आत्म शुद्धी संपादन करून आत्मिक भीती पासून सत्यानें वर्तन केले असता तो मात्र असत्याच्या अपराधा पासून वाचून राहतो. राष्ट्राच्या प्रत्येक व्यक्तीला धर्म शिक्षणद्वारे सत्य नियामाचे शिक्षण प्राप्त करविणे अत्यावश्यक आहे. सत्याची व्यापकता व्हाव-

याची असल्यास सत्याचें संस्कार जन्मदारभ्य व्हावे लागतात. सत्पुरुषांच्या, आचार्यांच्या पूज्य व वरिष्ठ लोकांच्या सहवासात राहून सेवा केल्याने त्याचा विकास होतो. मनुष्याचे ठिकाणी "ओज" शक्तीचा अभाव असल्याने तो असत्य बोलत असतो. त्याच्या पासून होणारे लाभ अनैसर्गिक असून पापोत्पादक आहेत. असत्य वर्तनापासून विश्वास रूपी अमूल्य संपत्ती तो गमाऊन जड वस्तूंच्या संस्कारापासून मानवाचे मन जड होत असल्यामुळे तो सत्या पासून च्युत होतो.

सत्य किंवा असत्याचा विचार देश, काल व परिस्थित्यानुसार करावा लागतो. ज्या गोष्टी द्वारे दुसऱ्याची हानी होत असते ती असत्य होय. आणि ज्या गोष्टीने दुसऱ्याची हानी न होता आपला लाभ होत असल्यास ती सुद्धा सत्यच होय. तुमच्या घरात संपत्ती किती आहे? कुठे ठेवलीत असे विचारणाऱ्यानां ती संपत्ती अमक्या स्थानी ठेवली आहे म्हणून सत्य सांगितले असता, त्या संपत्ती विषयी त्याच्या मनाला अनैसर्गिक भावाचा दोष प्राप्त होऊन त्या संपत्तीचा अपहार करण्याच्या कामी प्रवृत्त होऊन मानवते पासून तो पदच्युत होतो. याकरीता ते धन स्वकष्टार्जित असल्यामुळे त्याच्या संरक्षणा संबंधाने वस्तुस्थिती न सांगणेच सत्य आहे. दुसरा मनुष्य पैसे उसणे मागावयास आला असता पैसे आहेत पण देत नाहीत असे म्हटल्यास त्याला वाईट वाटून विरोध होतो. स्व कष्टार्जित पैसे जवळ असूनही पैसे नाहीत असे सांगणे हे असत्य नसून सत्य आहे. एखादा व्यापारी वस्तु विक्री करीत असता दहा रुपयाचा माल वीस रुपये सांगून विकणें हा त्याचा गुन्हा नाही, कारण घेणाऱ्याचे घेणें किंवा न घेणें हे त्याच्या इच्छेवर अवलंबून असल्याने व्यापाऱ्याच्या स्वकष्टार्जित

असलेल्या वस्तूस कितीही किंमत सांगण्याचा तो हक्कदार आहे. त्याचे बोलणे असत्य नसून सत्य आहे. सत्य पालन करण्याच्या कामी प्रथमतः आपत्ती संभवते. लोकाना हा सत्यवादी आहे सत्याची मर्यादा विशाल आहे म्हणून भावना होताच प्रत्येक मानव सत्य असलेल्या महान व्यक्तीच्या इच्छा पुर्ती साठी जीवन समर्पण करण्याकरीता सिद्ध होतो. केवळ असत्य बोलूनच जीवन चालविणारा एखादा मनुष्य सुद्धा मिळणे साध्य नाही. कोणी एक मनुष्य असत्य बोलून आपला उदरनिर्वाह करीत असला तरी आपल्या प्रेमाच्या पत्नी, पुत्र, बंधु, मित्रादिका बरोबर खोटे बोलल्याची त्यांना कल्पना देऊन सत्यच सांगतो. तसेच तो आपल्या कुटुंबातील लोकांबरोबर असत्य बोलू लागल्यास त्याचे जीवन संरक्षणाचे उपाय कुंठित होतात. यावरुन सत्याच्या अभावी मानव जीवन चालणार नाही. असे सिद्ध होते.

पूजा, संध्या, होमादि, नित्य कर्मामध्ये उपनयन, दीक्षा विवाह, गर्भाधानादि नैमित्तिक पुण्य कर्मामध्ये श्रद्धांजली युक्त जलधारा पूर्वक ईश्वर सन्निधीत "देशकालगोत्रंसंकीर्त्य" म्हणून शिव संकल्प सांगण्याची पद्धत आहे. शिव संकल्प म्हणजे आपण करावयाच्या पुण्य कर्मामध्ये आरंभापासून शेवटापर्यंत भाव चंचलते मुळे सत्या पासून विचलित होऊ नये ते पुण्य कर्म पूर्ण यशस्वी व्हावे म्हणून सर्वकर्तृ व सर्वसाक्षी असलेल्या ईश्वरास उद्देशून सांगणें हे प्रतिज्ञा वाचक सत्य आहे. शिव संकल्पा पासून आपली सत्यनिष्ठा दृढ करून घेतो. या सृष्टीतील मानवाचे सर्व कार्य, सत्य निष्ठेच्या अंतर्भूत आहे.

सत्याचे काया, वाचा व मन असे तीन प्रकार आहेत. ते वागेंद्रियामुळे प्रतीतीला येत असतात. देण्याघेण्याच्या व्यवहारा-

मध्ये हाताने लिहून देणे कायिक सत्य आहे. वाचेने दुसऱ्याना दिलेले वचन पूर्ण परिपालन करणे वाचिक सत्य होय. ईश्वरा प्रति सर्व काली शुभ संकल्पात मनाची प्रवृत्ती दृढ भावनेत ठेवणे मानसिक सत्य होय. आपल्या नैसर्गिक सत्य ज्ञानाचा विकास करून सर्व मानवा विषयी सत्य बोलणे व सत्याने वागणे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. मानव आपला पुरुषार्थ दाखविण्याच्या उद्देशाने आपल्या जीवनांतील चांगल्या गोष्टीच दुसऱ्याना सांगतो. मात्र आपल्या कडून घडलेल्या दोष दुर्गुणांचा अपराध सांगण्याचे मनोधैर्य बहुधा तो करीत नसतो. यावरून त्याने पुर्णांशाने सत्य नियमाचे आचरण केले असा अर्थ होत नाही या जड सृष्टीमध्ये जन्म घेऊन येण्याच्या अगोदर याच्या संरक्षणासाठी आईच्या स्तनामध्ये दूध निर्माण झाले आहे. पुनः जन्मताच स्नतपान करण्याचे शिक्षण शिशूला नसताही स्वाभाविक शक्ती त्याचे ठिकाणी असतेच. निसर्गाच्या या सर्व कृतीचा विचार केला असता; आपल्या कृत कर्माच्या नियमानुसार ईश्वर प्रकृतीच्या रूपाने सर्व काल संरक्षण करीत असल्याचे प्रत्यक्ष असले तरी असत्याचे वर्तना पासून मी संरक्षण करून घेतो अशी भावना करून वागणे व वर्तन करणे ही अमानवता आहे. निसर्ग शक्ती अनियमित पणे वर्तन न करता प्रकृति रूपाने सर्व प्राण्यांच्या रक्षणासाठी सदा सत्य रूपाने वर्तन करीत आहे हे प्रत्यक्ष असले तरी मानव शरीरमोहाने अनेक अपराध करण्याच्या क्रमात सापडून माता पित्या बरोबर असत्य, आचार्या बरोबर असत्य, ब्रह्मज्ञान्या बरोबर असत्य, राजाबरोबर असत्य, मंत्र्याबरोबर असत्य,न्यायाधीशाबरोबर असत्य,पत्नीबरोबर असत्य, पतिबरोबर असत्य, पतिव्रता स्त्रीबरोबर असत्य, बंधुबरोबर असत्य, भावाच्या

मुला-मुली बरोबर असत्य, जामातावरोबर असत्य, ब्रह्मचाऱ्या बरोबर असत्य, मित्राबरोबर असत्य, शिष्यावरोबर असत्य, सेवकावरोबर असत्य, गुरु बंधु बरोबर असत्य, व मालकावरोबर असत्य, साक्ष देताना शपथविधीद्वारे ईश्वराबरोवर असत्य बोलून अनंत अपराध करतो. राष्ट्रामध्ये असले अनंत अपराध होत असतात. एका असत्य भाषणापासून एकेवीस लक्ष प्रकारचे पाप कर्म संभवतात. सत्य बोलण्याने पाप कर्माचा निरोध होवून पुण्य कर्म करण्यासाठी योग्य पात्रता येते. "सत्यं शिवं सुंदरम्" सत्य हे शास्वत असून मंगल रूप व सुखकर आहे. "सत्यंवद" सत्यच बोल. "सत्यमाचुर्नर एवाहि चक्रुः" (ऋग्वेद ४-३३-६) पुरुषाने सत्याचे परिपालन करून सत्याचे आचरण केले. "सुगाऋृतस्य पंथाः" (ऋग्वेद ८-३१-१३) सत्य मार्ग सुखाने जाण्यासाठी योग्य अवकाश देतो. "ऋतस्य पंथा न तरंति दुष्कृतः" (९-३३-६) दुष्कर्मी मानव सत्य मार्ग धरीत नाही. "सत्यस्य नावः सुकृतमपी परन्" (९-३३-१) धर्मात्म्याला सत्यरूपी नौका संसार समुद्रातून सुखरूप पार करते. "अस्माकं संत्वा शिष्यः सत्यः" (यजुर्वेद २-१०) आमची मनोकामना सत्य होवो. "अहमनृतात् सत्य मुपै मि" (यजुर्वेद १-५) मी असत्या पासून मुक्त होऊन सत्यच धारण करतो. "सुसस्याः कृषीष् कृधि" (यजुर्वेद ४-१० सत्याने युक्त होऊन कृषी कर्म कर. "ऋतस्य प्रथापेत" (यजुर्वेद ७-५५) सत्य मार्गानें चला "मधूर्मतिवाच मुदेयम्" (अथर्ववेद १-३४-३) मी वाचेने माधुर्ययुक्त बोलतो. "असतो मा सद्गमय" असत्या पासून सत्याप्रत नेणारी प्रवृत्ति माझ्यांत निर्माण कर.

मानव धर्म मंदिराचा द्वितीय सोपान असलेल्या सत्य नियमाची परि समाप्ती होते.

अस्तेय (चोरी न करणे)

अस्तेय शब्द दुसऱ्याची वस्तू चोरू नको, अपहार करू नको, वंचना करून आणू नको. आणुन दुसऱ्यानां देऊ नको असा बोध करणारा आहे. बाल्यावस्थेमध्ये मुलांना मी व माझे शरीर म्हणून समस्त अवयवाचे परिज्ञान क्रमा, क्रमाने होते. त्या नंतर माझी आई, बाप, भाऊ, बहीण, घर आणि खेळण्याच्या सर्व वस्तूना तो जाणतो. बालक आपल्या वस्तूला माझे म्हणून समजण्यामध्ये दुसऱ्याच्या वस्तूची कल्पना त्याला असते. दुसऱ्याच्या मुलाची खेळणी पाहून माझी नाही म्हणून तो जाणतो. अपल्या खेळण्याच्या कामी मन:पूर्ती होत नसेल तर दुसऱ्याची खेळणी पाहून. ती माझी नाहीत हे समजून देखील मन अनावर होऊन ती खेळणी झाकून आणते वेळी माझी स्तेय (चोरी) कृती योग्य नाही असे तो समजत असतों. बालकापासून होणाऱ्या स्तेय कृतीच्या चौकशीसाठी दुसऱ्या मुलाचे आई बाप येऊन माझ्या मुलाची खेळणी तू आणली आहेस ना ? असे विचारता आपला अपराध त्याना दिसूनये म्हणून आपल्या आई जवळ जावून लपून बसून तो रडतो या वरून अपराधाच्या अगोदर बालकाच्या ठिकाणी अस्तेय नियमाचे ज्ञान स्वाभाविक आहे म्हणून अनुभव येतो.

अस्तेय नियमाला अनुसरून मुलाचे पालक दुसऱ्याची वस्तू स्तेय (चोरी) करू नको दुसऱ्याच्या वस्तूला शिवू नको. असा पुन:पुन: उपदेश करून त्याला योग्य शिक्षा दिल्यानें त्याच्या मनाला पश्चात्ताप वाटून अस्तेय भाव दृढ होतो. त्याला योग्य मार्गदर्शन न झाल्यास. त्या बालकाच्या अंगी स्तेय (चोरी) प्रवृत्ती जास्त होऊन तारुण्यामध्ये त्याचे मन अस्तेय (चोरी न करणे) नियम

पालन करण्याचे कामी दुर्बल होते. बालकाचा विचार परिशुद्ध होण्यासाठी आई, बाप, बंधु, भगिनी, आदि घरातील लोकांचे वातावरण अस्तेय भाव युक्त असावे. यापासून बालकाला शुद्ध ज्ञान कणाचा. अहार प्राप्त होऊन भाव शुद्धी होते. आजचा बालक पुढे तो मोठा होतो. आपली बायको, मुलगा, घर, धन आदिवस्तू माझ्या आहेत म्हणून तो समजतो.आपल्या घरातील धन, कन-कादि वस्तूंचा अभाव होताच दुराशा उत्पन्न होऊन दुसऱ्याची वस्तू चोरून आणावी म्हणून अपेक्षा करीत असताना तू चोरी करू नकोस, मानवते पासून पतित होऊ नकोस, अस्तेय नियमाने वाग म्हणून त्याच्या अंत:करणातून अनुग्रह पूरित एक दिव्य संदेश त्यास मिळतो. त्याला तो न जुमानता लोभवश होऊन चोरी करतो. अस्तेय नियमाच्या ज्ञानाच्या अभावाला स्तेय (चोरी) म्हणतात. स्तेय स्वतंत्र नियम नसून अस्तेय (चोरी न करणे) स्वतंत्र नियम आहे. अस्तेय नियमाचे पालन करणे मानवांचे आद्य कर्तव्य आहे. कर्तव्य पालन करणारी व्यक्ती मानव समाजामध्ये आणि राष्ट्रामध्ये सन्मानित होऊन पूज्य गणली जाते. अस्तेय नियमाच्या पालन करणाऱ्या सज्जन लोकांवर दुसऱ्या कडून स्तेय (चोरी) घडले गेल्यास त्यांच्या व्यक्तीगत सुख शांतीचा भंग होतो. म्हणून चोराला न्याय संस्था अपराधी ठरवून शिक्षा करीत असते. शिक्षा-विधी पासून तस्करा (चोर) च्या मनाला पश्चात्ताप करवून त्याचे कडून पुन: अपराध न होण्यासारखे त्यास करावयाचे हा न्याय संस्थेचा उद्देश आहे. न्याय संस्थेचे शिक्षा विधान नसल्यास व्यक्तीगत जीवन सुखमय होऊन राहणे शक्य नाही. परंतू न्याय शासनाच्या भीतीने अपराध पूर्ण पणे कमी होणार नाहीत. त्याला धर्म शिक्षणाची अत्यंत अवश्यकता आहे.

चोरी करणारा अपराधी आपल्याकडून घडणाऱ्या दुष्कृति निंद्य आहेत असे समजत असतो. याकारणामुळे आपली दुष्कृति दुसऱ्यांच्या दृष्टीला पडू नये म्हणून गुप्तपणे चोरी करतो. परधनाच्या अपहारामध्ये त्याला भीती उत्पन्न होते. शासन संस्थेने पदार्थ स्तेया (चोरी) च्या अपराधाला मात्र कल्पीलेआहे. परंतू राष्ट्रामध्ये अनिर्णित अगणित अपराध गुप्तपणे संग्रह होऊन राहातात. श्रमिक एका स्वामीचे सेवक होण्याचे मान्य करून एक वर्षाला एक हजार रुपये प्रमाणें आपल्या श्रमाची विक्री करतो. सेवक आपल्या पुत्रदाराधनादिक अनेक वस्तूंच्या उपभोगामध्ये तो स्वतंत्र असून आपल्या आश्रित लोकावर मालक होऊन राहातो मात्र आपले शरीरश्रमा विषयी आपल्या स्वामीच्या आधीन राहातो. श्रमिकाने एका दिवसामध्ये पूर्ण होणाऱ्या कामाला दोन दिवस लावल्यास ते श्रमस्तेय, कालस्तेय होय. असले श्रमचौर्य, कालचौर्य, अपराधाचा विचार करण्यासाठी मालक न्याय संस्थे कडे गेल्यास, असल्या अपराधाचा विचार करण्याकरिता न्याय संस्था असमर्थ आहे. सेवकाने आपले श्रमशक्तीचा योग्य उपयोग करणे त्याचे कर्तव्य आहे. पण तो करीत नाही. श्रमचौर्य काल-चौर्य, न होण्या सारखे विचार पूर्वक मी माझा देह, श्रम करण्या-साठी विकून घेतलेला आहे. म्हणून आत्मिकभीती हा एकच उपाय आहे. याशिवाय दुसरे कोणतेच साधन नाही.

श्रम, काल, आणि ज्ञान या तीन वस्तू धनोत्पादक आहेत. सर्व क्रिये मध्ये श्रम, ज्ञान, व काल (वेळ) या तीन वस्तूंचा उप-योग होत असतो. या तीन द्रव्याला मूल्य म्हणून अर्थ शास्त्रांत सांगितले आहे. श्रम व ज्ञान या दोन्हीचा काळामध्ये उपयोग केल्यानें त्याचे प्रति फल (मोबदला) मिळणाऱ्या वस्तूला धन

ही संज्ञा अथवा चलन असे सांगण्यात येते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विद्या देऊन धन संपादन करावे म्हणून आपले ज्ञान, श्रम, व काल (वेळ),शिक्षण संस्थेला विकले, आहेत. कांही शिक्षक आपल्या श्रम, काल, व ज्ञानाचा योग्य रितीने उपयोग करीत नाहीत. शाळेला न जाता उपस्थितीपटात स्वाक्षरी करतात. वेळेवर शाळेला जात नाहीत. व शाळेला गेले तरी मनःपूर्वक शिकविण्याचे श्रम घेत नाहीत. पैशाच्या लालसेने घरी शिकवण्या करून पैसे मिळवतात. शिक्षक परस्पर प्रेमाने सहयोगानें मिळून काम करीत नाहीत. शाळेत वृथा कालक्षेप करीत असतात. यापासून होणारे श्रमचौर्य, ज्ञानचौर्य काल-चौर्य आणि धनचौर्य आदि सर्व अपराध कमी करावयाचे असल्यास शिक्षक लोकांच्या भावनेंमध्ये आम्ही राष्ट्राच्या शिक्षण संस्थेच्या सेवेसाठी ज्ञान, श्रम, व काल समर्पित केले असल्याची आत्मिक भीती त्यांना यावी लागते. भीती नसता असले गुप्त राष्ट्रद्रोहात्मक अगणित व अनिर्णित पापकर्म (अपराध) नाहिसे करणे न्याय संस्थेला शक्य नाही.

न्यायधीश अपराध्याकडून लाच रूपाने धनाचा अपहार करतो. अपराध्याला निरापराधी म्हणून मुक्त करून न्याय स्तेय (चौर्य) धन स्तेय करीत असतात.

अधिकारी पोलीस व कर्मचारीवर्ग प्रजेच्या संरक्षणा-कडे व सेवा कार्याकिडे दुर्लक्ष व वंचना करून मद्यपान, जुगार व हिंसा आदि अनेक दुष्कृतीच्या प्रवृत्तीला सहयोग देऊन धनस्तेय (चोरी) राजाज्ञा भंगस्तेय (चोरी) न्याय स्तेय (चोरी) आदि अनेक अपराध करीत असतात. देश सेवा करणारे देश भक्त आपल्या स्वार्थासाठी जनतेकडून व राष्ट्राकडून धनापहार करून

धनस्तेय, भक्तीभावस्तेय करतात. कित्येक लोक साधु सत्पुरुषांचे वेषामध्ये महत्कार्याचे नाव सांगून भाविक भक्त लोकाकडून धन धान्यादि वस्तू संग्रह करून स्वार्थासाठी उपयोग करीत असतात. हे धनस्तेय भावभक्तीस्तेय होय. कित्येक लोक देवच्या नावाने सोने, चांदी, भूमी, घरे आदि स्थावर जंगम वस्तूंचा अपहार करून देवताभक्तीस्तेय, भावस्तेय धनस्तेय करीत असतात.

राष्ट्रांत संभवणाऱ्या अनेक अपराधाचे निर्मूलन करून प्रजेमध्ये आत्मशुद्धी, मनःशुद्धी, देशभक्ती देशप्रेम परस्परबंधूभाव इत्यादि सद्गुण प्राप्त होऊन राष्ट्रामध्ये सुख शांती व्हायाची असल्यास धर्म शिक्षणच मूलाधार आहे. परंतू नैसर्गिक भावाचा अस्तेय नियम पुण्योत्पादनाला योग्य पात्रता आणून देणारा आहे. अनैसर्गिक भावस्तेयाने पापाची उत्पत्ती होऊन जन्म जन्मांतरी दुःख दारिद्र्य, रोग, भय, चिंता, आदि अनेक रूपाने भोगून विभाजन होते. उदा. आकाशवाणीकेंद्रात वायूमध्ये तरंगत असलेले ध्वनि-तरंग वार्ता प्रसारकरीत असता नभोवाणी त्या ध्वनि तरंगाला ग्रहण करून वार्ता कळविते. आमच्या बाह्य कानाला ते ध्वनितरंग ऐकू येत नसले तरी सर्वकाळ वायू मंडळामध्ये अप्रत्यक्ष पणे संग्रह होऊन असल्याचे अनुभवास येते. त्याप्रमाणे एका श्रीमंत व्यक्तीची संपत्ती चोरानें चोरी करून अपहार केली असता. त्या संपत्तीचा धनी या दुष्कृत्यायुळे अती दुःख करीत धनाचे चिंतन करीत माझेधन नेले माझे धन गेले !! कोण्या दुष्टानें अपहार करून नेंले असेल म्हणून धनाच्या मध्य बिंदू बरोबर चोराला उद्देशून त्याच्या मनो भावनेंमध्ये दुःखाचे तरंग उत्पन्न होतात. इकडे तस्काराचे मनांत मला धन प्राप्त झाले म्हणून आनंद होतो. या चोराच्या

मनोभावने मध्ये उत्पन्न होणारे आनंदाचे तरंग प्राप्त धना संबंधीतच असतात. मात्र धनस्वामी प्रीत्यर्थं नसतात. संपत्तीच्या स्वामीच्या भावनेला आणि चोराच्या भावनेला संपत्ती हा मध्य बिंदू असल्यामुळे संपत्तीच्या स्वामीचे मनात उद्‌भवणारे शाप, ताप, कोप, दुःखदायक आदि भाव तरंग तस्कराच्या भाव प्राणा मध्ये प्रवेश करून संग्रह करून राहतात. कालांतराने म्हणजे जन्मांतरी दुःख दारिद्र्य तापादि अनेकरूपाने भोगून विभाजन होतात. मनुष्याचे अंगी " ओज शक्ती " कमी झाली असल्याने तो स्तेय (चोरी) करीत असतो. त्या स्तेय मूलक त्याची भावना जड होऊन अस्तेय नियम पालन करण्यासंबंधी तो असमर्थ होतो. तो स्वाभाविक अस्तेय नियम क्रिया रूपामध्ये येण्याकरीता साधु सत्पुरुषांच्या, योगी, तपस्वी, आचार्यादि पूज्य थोर लोकांच्या सहवासात राहून सदुपदेश श्रवण करणें अवश्यक आहे. योगी तपोनिष्ठ लोकांच्या अंगात ओज शक्ती सदा ऊर्ध्व गतीने वाहात असते. त्यांचा सहवास व सेवेपासून योगशक्तीचा स्पर्श होऊन भावनेत नैसर्गिक अस्तेयभाव स्थिर होतो. प्रत्येक मानव विश्वांतील सर्व वस्तू विषयी अस्तेय नियमाचे पालन केल्यास राष्ट्रात सर्वत्र शांतता नांदत असते.

मानव अनैसर्गिक भावाच्या स्तेय कर्मामध्ये प्रवेश करून सुवर्णस्तेय रत्नस्तेय, रजतस्तेय, धनस्तेय, वस्त्रस्तेय, गो आश्वादि पशुस्तेय, पुस्तकस्तेय, अन्नस्तेय, श्रमस्तेय, विद्यास्तेय, गुरु, साधु सत्पुरुषा पासून ज्ञानस्तेय, भावस्तेय, न्यायस्तेय, राष्ट्रसेवास्तेय प्रसादस्तेय, देवता मूर्तिस्तेय, माता, पिता, आचार्य, अतिथी, आदि पूज्यजनांचे धनस्तेय, राष्ट्र धनस्तेय, राजधनस्तेय, मंत्रीधनस्तेय, प्रजाधनस्तेय, स्वामीधनस्तेय, सेवकधनस्तेय,

जंगमास्थिस्तेय, भस्मरुद्राक्षस्तेय, लिंगनंदीस्तेय, स्त्रीधनस्तेय, कन्याधनस्तेय, जमाताधनस्तेय, शिष्यधनस्तेय, ब्रह्मज्ञानीधनस्तेय ब्रह्मचारीधनस्तेय, आनाथ बालकधनस्तेय, मित्रधनस्तेय, विधवा धनस्तेय, कुमारीधनस्तेय, बंधुधनस्तेय, भगीनीधनस्तेय, पुत्रवती विधवा धनस्तेय, अंधधनस्तेंय, मूकधनस्तेय, पंगूधनस्तेय, रोगी धनस्तेंय, पथिकधनस्तेय, आदि अनेक स्तेय कर्माचे अपराध करीत असतो. एका स्तेंय पाप कर्मापासून अनंत जीव अनंत अवस्था भेदाने एक्केवीस लक्ष प्रकारचे पाप कर्म उत्पन्न होतात.

मानव धर्म मंदिराचा तृतीय सोपान असलेल्या अस्तेंय नियमाची परि समाप्ती होतें.

ब्रम्हचर्य

" बृह् " धातू पासून " ब्रह्म " (परशिव) आणि " चर् " धातू पासून " चर्य " (चालणें) जाणें, "ब्रह्मचर्य" या शद्वाचा ब्रह्म तत्वाकडे जाणें असा अर्थ होतो. हे चराचर विश्व ज्या वस्तू मध्ये जन्म पावून विराजमान आहे आणि ज्या वस्तू मध्ये अखेर लय पावतें त्या मूल आधार भूत वस्तूला ब्रह्म म्हणतात. ब्रह्म तत्वाकडे जाण्यासाठी जीवाला भाव, प्राण व भूत या आवरणाचे निवारण करण्याकरीता अवश्यक असलेल्या ज्ञान, व क्रिया या साधनेला " ब्रह्मचर्य " म्हणतात.

शिशू आईच्या उदरा पासून जन्म घेतल्या नंतर प्रथम त्याच्या मनाला 'आई' या उर्ध्व प्रेमाचा उदय होतो. आई या उर्ध्व प्रेमा मध्ये स्तन पान करतें. आणि आई या उर्ध्व प्रेमांत वाढून त्याच्या खेळण्याच्या सर्व क्रिया 'आई' या मध्यबिंदू बरोबर चालत असतात. शिशूला मी व माझे हात, पाय, डोळे, कान, या समस्त अवयवाचे ज्ञान होताच देहच मी आहे असे समजून समस्त प्रपंचाचे त्याचे ज्ञान वाढत असते.

तारुण्यांत पुत्र, दारा, धन आदि अनेक भोग उपभोग वस्तूंचा संस्कार होऊन त्याच्या अंतर्भूत असलेल्या जन्मगत उर्ध्व भावाच्या मातृ प्रेमावर अधो भावाचे आवरण होऊन स्वाभाविक मातृ प्रेमाचे विस्मरण होते.

शिशूच्या ठिकाणी कर्तृत्व शक्ती जाग्रत नसल्यामुळे आईच्या स्तना मध्ये प्रकृतीने दूध निर्माण केल्याप्रमाणें उर्ध्व भावाचे मातृ प्रेम देखील स्वाभाविक आहे. तो शिशू, क्रमाने मोठा झाल्यावर भोग उपभोग वस्तूंच्या प्राप्तीसाठी आपल्या

कर्तृत्व शक्तीचा उपभोग करीत असल्यानें जगातील सर्व स्त्री पुरुषा विषयी कर्तृत्व शक्तीनें आपल्या जन्मसिद्ध मातृपितृ भावाचा विकास करणें हाच ब्रह्मचर्याचा मूल उद्देश आहे.

प्रत्येक स्त्री पुरुषाला माझा पति परस्त्री विषयी आणि माझी पत्नी पर पुरुषाविषयी प्रणय भावनेत वर्तन करु नये अशी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. यावरून व्यक्तीगत सुखासाठी ब्रह्मचर्यभाव सर्व स्त्री पुरुषा मध्ये स्वाभाविक आहे; असे सिद्ध होते. ब्रह्मचर्य नियमाचे पालन केवळ मानवा संबंधीचाच विषय आहे. मानवाच्या ठिकाणी असलेल्या स्वाभाविक ब्रह्मचर्या विरुद्ध, अनैसर्गिक भावाच्या व्यभिचार प्रवृत्तीचा उदय होताच मानवते पासून अध:पतन होऊ नयें म्हणून अंत:करणातून एक दिव्य संदेश होतो. त्या अंतर्नादाला न जुमानता स्त्री पुरुष एकमताने व्यभिचार कर्मास् प्रवृत्त होतात. मानवाचे ठिकाणी मातृपितृ भाव जन्मगत असतो. स्त्री पुरुषाचे प्रणय भाव जन्मगत नसून तारुण्या मध्ये त्याची अनुभूती होते.

व्यष्टी मानव प्राकृतिक धर्माच्या आणि व्यापक प्राकृतिक धर्माच्या परस्पर संबंधाचा विचार केला असता, प्रकृतीनें मानवासाठी अनेक भोग वस्तू दिल्या आहेत त्या सर्व वस्तू तु तुझ्या कर्तृत्व शक्तीने संरक्षण करून उपभोग घे अशी ती मार्गदर्शन करीत असते. भूमाता वनस्पतीचे बीज आपले उदरात झाकून घेवून पुष्प, फल, बीज रूपाने विकसित करते. आंबा, द्राक्षा, नारळ, केळी, गहु, ज्वारी आदि विविध प्रकारच्या वस्तू वरील आवरणानें संरक्षण केल्या जातात याकारणाने फळामध्ये असलेले रस कण, व धान्यांतील पिठाचे कण मानवाच्या उपयोगासाठी सुलभ साध्य झाले आहेत. आईच्या उदरा पासून जन्म

पावणारे पक्षाचे द्रव (रस) रूप शरीराचे सूक्ष्मपरमाणू अंडाकाराच्या आवरणामध्ये रक्षण पावतें. डोळे, पाय, आदि अवयव पूर्ण विकास पाऊन बाहेर पडताच त्या पिलांचे आई संरक्षण करीत असतें. आणि आईच्या उदरामध्ये पूर्ण विकास पावणारे पशूंचे पिंड संरक्षणासाठी मांसमय आवरण (कवच) ठेऊन प्रकृतीने जन्म दिला आहे. आवरणातून बाहेर पडलेल्या वासराला आई आपल्या स्वामित्वाखाली रक्षण करीत असते. आईच्या उदरामध्ये सर्व आवयव विकास पाऊन वाढलेल्या शिशू (मानव) चे पिंडावर त्याचे संरक्षणासाठी प्रकृतीनें मांसमय आवरण निर्मिले आहे. आणि आईचे उदरापासून बाहेर पडलेल्या शिशूला तू सुद्धा झाकून संरक्षण कर म्हणून मूक संकेताचा बोध करून मानवाच्या हातामध्ये दिला आहे. अशा अनंत शक्तीशाली प्रकृतीने मानव, पशू पक्षी, व वनस्पती यांच्या रक्षणा विषयी विविध प्रकारचें आवरण निर्माण केल्यानें मानवानें शिशूच्या रक्षणासाठी वस्त्रावरण कल्पिले आहेत. वस्त्रावारण करण्याचा क्रम शिशूच्या बाल्यावस्थेंमध्येच कल्पित केला असल्यामुळे त्या शिशूला हस्त पदादि अवयवाचे ज्ञान होऊन माझे शरीर ही भावना दृढ होण्याच्या कार्याबरोबर वस्त्रावरणाचा संस्कार सुद्धा त्या शिशूला वाढून वस्त्र ही एक स्वाभाविक वस्तू आहे म्हणून समजत असतो. मी, व माझे शरीर असे व्यक्तिगत स्वामित्व प्रत्येक स्त्री. पुरुषाचे ठिकाणी अखंडपणे राहाण्यासाठी आपल्या शरीराच्या अंग प्रत्यांगाला वस्त्रावरण अवश्यक आहे.

स्त्री. पुरुषाचे सूक्ष्म अवयव दुसऱ्यांच्या दृष्टीला पडूनये म्हणून वस्त्रावरण कल्पिले आहे, स्त्री, पुरुषाचे भाव, व मन अधोगामी होणे स्वाभाविक प्रवृत्ती असल्यामुळे इंद्रिय दृग्गोचर

होण्याने मनाच्या ठिकाणी अनावर अवस्था उत्पन्न होऊनये या साठी वस्त्र आवरण कल्पिले आहे.

ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, आंबिकादि देव देवता दानव व मानव या सर्वांमध्ये हा वस्त्र परिधानाचा क्रम आलेला आहे. स्त्री पुरुषामध्ये वस्त्र परिधान करण्याची रीत वेग वेगळी आहे. वस्त्र विधान वैयक्तिक स्वामित्वरक्षणासाठी महत्तर साधन झाले आहे. वस्त्र परिधान क्रम नसता तर मानवामध्ये अनिर्बंध विषय सेवनाची प्रवृत्ती वाढून आई,बाप भाऊ, बहीण, गुरु, शिष्य, पति, पत्नि, म्हणून पूज्य पूजक भावामध्ये आचरण करणे शक्य झाले नसते. केवळ पशु जीवनासारखी अवस्था होऊ नये म्हणून वस्त्र आवरणाचा मानव समाजामध्ये एक विशेष नियम आहे. अहार जीवन रक्षणासाठी व वस्त्र मान रक्षणासाठी साधन आहे. एक वेळ अथवा एक दिवस अन्न नसले तरी जीवन चालेल परंतू वस्त्र नसता एक निमिष सुद्धा जीवन जगविणें शक्य नाही. म्हणजे मानवाला जीवन रक्षणापेक्षा ही मान रक्षण महान् आहे.

स्त्री, पुरुषामध्ये माझी पत्नी माझा पति असे परस्पर स्वामित्व भावाचे समाज बंधन प्रेम दुसऱ्यांना उपयोग करण्यासाठी अधिकार नसणें हे व्यष्टिमय एक देशी प्रेम आहे. पति पत्नी परस्पर बोलताना किंवा बोलावितांना त्यांचे पद (नाते) दुसऱ्याना बोध न होण्या जोगे या, जा, असे बोलावित असतात. आपल्या मुला बरोबर बोलत असताना तुमच्या बापाला बोलवा तुमच्याआईला बोलवा असे आपल्या पदाचा बोध न होण्या जोगे गुप्त पणे असावे म्हणून त्यांचा भाव होतो. माझा मुलगा माझी मुलगी असे सांगण्यामध्ये कोणालाही संकोच वाटत नाही. मात्र माझी

पत्नी माझा पति असे सांगणे स्त्री, पुरुषानां संकोच वाटतो. आणि अपरिचित व्यक्तीने स्त्रीयांना तुम्ही कोणाच्या घरच्या अहात असे विचारले असता, ती बाई मी अमक्याची पत्नी म्हणून न सांगता अमक्याची सून आहे. असा सासुसासऱ्याच्या नावाने परिचय देत असते. बहुधा त्यांचे पद सांकेतिक भावनेने समजले जाते. परस्त्रीला स्त्री म्हणून संबोधून दुसऱ्याना बोलण्याचा अधिकार नाही. दुसऱ्या बरोबर बोलत असतानां अक्का, ताई, आण्णा आदि संबोधून गौरवार्थ भावनेने बोलणे हा समष्टीरूप व्यापक भाव आहे. अक्का, आण्णा, असे संबोधून परस्पर बोलत असता वयो मानाचा विचार पडतो. एक बालक एका वयोवृद्ध बाईला अक्का म्हणून बोलवणार नाही, ती त्या मुलाला आण्णा म्हणून बोलावणार नाही. आक्का किंवा आण्णा हे पद समष्टी रूप व्यापक दिसले तरी सीमित आहेत. आई, ताई, आण्णा व आप्पा असे लहान मोठे कोणी असोत, त्याना परस्पर बोलत असताना वयो मनाचा विचार न करता बोलावण्यात संकोच वाटत नाही. बोलणें व चालणे या समस्त क्रिया मध्ये परस्पर बोलत असता सीतामाय, शांतामाय, पार्वतीमाय, सिद्धप्पा, मल्लप्पा, शंकरप्पा, वीरभद्रप्पा, असे अनेंक नाम सर्वसामान्यपणे मातृपितृ भावदर्शक असून व्यापक आहेत.

पति पत्नी परस्पर बोलत असताना सांगणे ऐकणे या सर्वक्रियामध्ये स्त्री, पुरुष भावनेनें पूरित असले तरी त्यांचा भावस्कार त्यांच्या मुलांच्या भावनेंला जाणीव होऊन त्यांची मुले देखील आपल्या आई बापा विषयी स्त्री पुरुष म्हणून भावना करावयास पाहिजे होती. परंतू तशी त्यांची मुले समजत नाहीत कारण त्या मुलांच्या अंगी मातृ पितृ भाव सदा स्वाभाविक आहे.

बाल्य जीवनांतील उर्ध्व भावनेंवर तारुण्यांत उदय पावणाऱ्या स्त्री, पुरुषांच्या अधो भावाचे आवरण होऊन जन्मगत मातृपितृ उर्ध्व भावनेला सामान्य रूप येते.

स्त्रीत्व, मातृत्व, पुरुषत्व, किंवा पितृत्व, असे एका व्यक्ती मध्ये दोन दोन अवस्था आहेत. साखर व त्यांतील गोडी, फूल व त्यांतील गंध हे दोन्ही वेगवेगळे असले तरी वेगळे करून दाखविता येत नाहीत. दोन्ही पद स्वाभाविक असून अविनाभाव संबंधाने युक्त असल्यामुळें स्त्री मातृ, व पुरुष पितृ ही दोन्ही पदे एका व्यक्ती मध्येच अनुभवास येतात. स्त्री पुरुष, पति पत्नी म्हणून दोघे परस्पर समान भावनेत वर्तन करीत असतात. त्यांची मुले त्यांच्या विषयी माता पिता म्हणून पूज्य भावनेने पहात असतात. पत्नीचे ठिकाणी पति स्त्री सौख्य भोगतो. मुलगा मातृ सुख भोगतो पतीच्या ठिकाणी पत्नी पति सुख भोगते मुलगा पितृ सुख भोगतो. असे एक व्यक्ती पासूनच दोन प्रकारची सुखे अनुभवास येतात.

भौतिक आधिभौतिक आधिदैविक व आध्यात्मिक शिक्षण क्षेत्रामध्ये मुलांना ठेवण्याच्या विधानाला ब्रह्मचर्य म्हणतात. ब्रह्मज्ञानी असलेल्या गुरूच्या सहचर्य होऊन राहणे याला ब्रह्मचारी, ब्रह्मचारीणी, कुमारी असे म्हणतात. आई बापाचे कार्य म्हणजे देहदान करणे एवढेच नसून ज्ञानाभिवृद्धी करणें ही त्यांचे आद्य कर्तव्य आहे. ज्ञान, दान कार्य ब्रह्मज्ञानी असलेल्या गुरुकडून प्राप्त होत असल्यामुळे गुरूची योग्यता आई बापा पेक्षा श्रेष्ठ आहे.

संस्कार विमर्श

मानव जीवनाच्या उन्नतीसाठी संस्काराची अती आवश्यकता आहे. गहू, ज्वारी, बाजरी, आदि धान्य अहार रूपात

उपयोग करण्यासाठी त्याधान्याला पाखडकून नीटकरून, सडून, दळून पाकसिद्धीकरून सेवनकरण्यापर्यंत अनेंक प्रकारचे संस्कार करावे लागतात.

दुधाला-दही, ताक, लोणी, तूप असे विविध रूपाने संस्कारीत केलेले दिसते. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, या पंचमहाभूताला संस्कार केल्याने रेल्वे मोटार, आकाशयान, टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हीजन, आदि अचेतन वस्तू सचेतन भासू लागल्या आहेत.

सर्वः स्व संस्कार वशाल्लघुर्भवति वा गुरुः।

विश्वांतील जड चेतन समस्त वस्तूमध्ये शूद्रत्व, ब्राह्मणत्व, राक्षसत्व, देवत्व, क्षुद्रत्व व श्रेष्ठत्व अशी अनेक पदे आपआपल्या कर्माच्या संस्कारानुगुणाने प्राप्त होतात. "संस्कार" या मूल शब्दाच्या अर्थाचा विचार केला असता सं = उत्तम, कार= करणे, म्हणजे चांगली कृती करणे असा होतो. संस्कृति म्हणजे विशेष कृती असा अर्थ होतो. अर्थात् काया, वाचा, मनें अहोरात्र जी व्यक्ती शुभ संस्कारामध्ये असते ती व्यक्ती पुण्यवान् व चारित्र्यवान होण्यांत कोणताच संदेह नाही.

सदाचार शील व्यक्ती जन्मतःच शुद्र असली तरी निःसंशय श्रेष्ठ पूज्य व वंद्य म्हणविते. शीलभ्रष्ट असंस्कारी मानव जन्मतः ब्राह्मण असला तरी तो. नीच निंद्य पतित आणि अतिशूद्र म्हणविला जातो. उत्तम संस्कारा पासून वाईट वस्तू सुद्धा उत्तम व बहुमूल्य होऊन अती उपयुक्त होत असते. उदा. – मृत पशूचे अस्पृश्य चर्म उत्तम संस्कारानें स्वच्छ मृदु, व सुंदर होऊन चांगले दिसते. ते चर्म हातांतील घड्याळाचे पट्टें, ब्यागा, पैशाची पाकीटे, उत्कृष्ट पादत्राणे,फुट बॉलचे कव्हर इत्यादि अशा

अनेक वस्तू रूपाने उपयोगांत येत आहेत. अस्पृश्य वस्तू संस्काराने स्पृश्य होऊन अत्यंत प्रिय होते. इतकेच नव्हे तर डमरू, दिमडी ढोल, चौघडा, नगारे, पेटीबाजा, तबला, मृदंग, एकतारी, सारंगी आदि नाना प्रकारच्या वाद्य रूपांत परीवर्तन होऊन शिव, विष्णु आदि पूज्य दैवतांच्या मंदिरामध्येही अत्यादर पूर्वक उपयोगांत येतात. निर्जीव वस्तूवर भिन्न भिन्न संस्कार होण्यानें ती उत्कृष्ट होऊन राहाते. त्याचप्रमाणे मानवावर संस्कार होण्याने त्याचा विकास व अभ्युदय होऊन शिव स्वरूप होतो.

"सं" – पूर्वक (डू) 'कृञ्' धातूला 'घञ्' प्रत्यय लावल्याने "सुटि=वृद्धौ, संस्कारः" या शब्दाची उत्पत्ती होते. म्हणजे मानवाच्या उन्नतीला अत्यावश्यक असलेल्या धार्मिक क्रियेला संस्कार म्हणतात. "आत्म शरीरान्यतर निष्ठविहित क्रिया जन्यः अतिशय विशेषः संस्कारः" निर्वचना मध्ये संस्काराचे यथार्थ स्वरूप स्पष्टपणें सांगितले आहे. अर्थात विहित क्रियाजन्य असलेल्या अतिशय आत्मा आणि शरीर या दोन्ही मध्ये असते. ते संस्कार दोन प्रकारचे आहेत. पहिला कार्यांतर योग्यता जनकत्वरूप असलेला. म्हणजे दीक्षा उपनयनादि संस्कार करून वेदाध्ययन ब्रह्मोपासना, आदि क्रिया करण्यास योग्यता प्राप्त होण्याने मोक्ष म्हणविणाऱ्या अंतिम सुखाच्या साधनेला कारण होते. दुसरा – "उत्पन्न दुरित मात्रनाशकः" म्हणजे पाप नाशक असलेल्या गर्भाधानादि संस्कारानें बीज गर्भ संबंधात असलेले दुरित निवारण करीत असतात. एकूण गर्भाधानादि संस्काराने मानवाचे पाप क्षालन होते.

मानव हा भूत, प्राण, भाव ह्या तीन प्रकारचा शरीरधारी आहे. भूत शरीराच्या रोग ऋजादिका पासून प्राप्त होणाऱ्या

दुःखाचा औषधोपचारादि जड संस्काराने परिहार होतो. परंतु पूर्व कर्मानुसार सूक्ष्म सृष्टी मध्ये उत्पन्न होणाऱ्या प्राण व भावगत अनिष्ट दुरितांचा अल्पज्ञ मानवाच्या बुद्धीला गम्य होणे साध्य नसल्यामुळे आपले यावज्जीवनाच्या शुभ कर्मामध्ये कोण-त्याही प्रकारची आडचण न होता त्याचा नाश होण्याच्या उद्देशाने संस्काराचे विधी विधान वेद, उपनिषद आणि स्मृति ग्रंथामध्ये सांगीतले आहेत. उत्तरोत्तर आपली अभिवृद्धी व्हावी म्हणून शुभ संकल्पात केल्या जाणाऱ्या विधानाला धार्मिक संस्कार म्हणतात. आईच्या उदरात पिंड स्थापन होण्यापूर्वीपासून त्यांच्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म अनिष्टदुरिताचा परिहार होवो. त्याचे जीवन शेवट पर्यंत सुखमयहोवो, म्हणून भाव सृष्टीमध्यें उपयोग होणाऱ्या शुभ संकल्पाला संस्कार म्हणतात. परिशुद्ध भावसंस्कार-जन्य दैवीशक्ती पासून आधिभौतिक, आधीदैविक तसेच आध्यात्मिक, या सूक्ष्म सृष्टीचे अनिष्ट परिहार होत असतात. त्या कारणाने इह पर सुखाला संस्काराची अत्यंत अवश्यकता आहे. त्या संस्कारानें उत्तरोत्तर अभिवृद्धी होत भावाधीन कर्मा-धीन असलेला जीव अखेर भावातीत असलेल्या ब्रह्म स्वरूपात तादात्म्य पावतो.

कोणतीही एखादी वस्तु असो, अगर मानव असो, आपला आपणच संस्कार पावणार नाही. संस्कार पावणाऱ्या वस्तु किंवा व्यक्तीपेक्षा ज्ञानक्रियेने बलिष्ठ असलेल्या दुसऱ्या व्यक्तीची अवश्यकता असते.

पूर्वाचार्यांनी शास्त्रात मानवाला गर्भाधाना पासून संन्यासा पर्यंत चाळीस संस्कार सांगितले आहेत. त्यातील मुख्यतः बारा संस्काराचा उद्देश वर्णन करीत आहे.

गर्भाधान संस्कार :– बीजारोपण करण्याचेपूर्वी भूमी आणि बीज, या दोन्हीची शुद्धता केली जाते. त्याप्रमाणें गर्भवतीच्या गर्भातील दोष निवृत्ती आणि बीज दोष निवृत्तीसाठी म्हणजे स्त्री पुरुषांच्या रजो वीर्याचे शुद्धतेसाठी तत्संबंधीत निषिद्धकाल मैथुनादी प्रयुक्त झालेले गर्भ दोष परिहार करणें हेच गर्भाधान विधान होय.

पूंसवन संस्कार :– पूंसवन–पूमान् म्हणजे वीर्यवान व बलवान् संतत्ती निर्माण करण्यासाठी आणि तो पिंड गर्भपात न होता त्याचे दुरित निवारण होऊन पूर्ण वाढून जन्मून यावा. या उद्देशाने केल्या जाणाऱ्या विधानाला पूंसवन संस्कार म्हणतात.

सिमंतोन्नयन संस्कार :– पती आपल्या उजव्या हातानें धर्म पत्नीचे हृदयास स्पर्श करून "तुझ्या गर्भात असलेल्या पिंडाला मी जाणतो. मी मानतो. ईश्वराला स्मरून गर्भाचे रक्षण करतो"

---

१) गर्भाधान. (२) पूंसवन (३) सीमंतोन्नयन (४) विष्णुवली. ५) जातकर्म. (६) नामकर्णं. (७) उपनिष्क्रमण. (८) अन्नप्राशन ९) चूडाकर्म.. (१०) कर्णवेध. (११) अक्षरारंभ. (१२) उपनयन १३) व्रतारंभ. (१४) समावर्तन (१५) विवाह. (१६) उपाकर्म १७) उत्सर्जन सप्त पाक यज्ञ संस्था. (१८) हुत. (१९) प्रहुत. २०) अहुत. (२१) शूलगव (२२) बलिहरण (२३) प्रत्यावरोहण २४) अस्टका होम. (२५) सप्तहविर्यज्ञसस्था अग्नयाधान. २६) अग्निहोत्र (२७) दर्शपूर्ण मास । २८ चातुर्मास (२९) अग्रयग्निष्टी (३०) निरूढ पशुबंध (३१) सौत्रामणि (३२) सप्त सोम यज्ञ अग्नि ष्टोम (३३) अत्याग्निष्टोम (३४) उक्थ्य (३५) षोडशी ३६) वाजपेय (३७) अतिरात्र (३८) आप्तोर्याम (३९) वानप्रस्थ ४०) संन्यास.

यापमाणें हे चाळीस संस्कार आहेत.

असे म्हणतो. आईने सेवन केलेल्या अन्नाचा रस गर्भातील पिंडाला पोहोंचतो. त्याप्रमाणे चवथ्या महिन्यांत पिंडात प्राण प्रतिष्ठा होऊन ज्ञानोदय कार्य प्रारंभ होतो. त्याकारणानें स्त्रीच्या दोन्ही डोळ्याच्या मध्यभागी म्हणजे नाकाच्या समान असलेल्या डोक्यांतील केसाच्या भांगाच्या मध्यस्थानी ज्ञान भाग असतो. त्याला सीमंतोन्नयन म्हणतात. दुःख, दारिद्रच, हिंसा, आदि दुष्कृतीचा आईच्या भाव मनाला अर्थात तिच्या ज्ञान केंद्र असलेल्या मस्तकाला स्पर्शकेल्याने त्रास न होता, केवळ सत्य, अहिंसा, शांती, संय्यम, भक्ती, ज्ञान, ईश्वरोपासना आदि पुण्य कर्मानुष्ठानांचा लाभ व्हावा म्हणून तिच्या गर्भात असलेल्या शिशूच्या रूप, लावण्य, सकलैश्वर्याने युक्त सुजीवी होऊन जन्मास यावे म्हणून करण्यात येणाऱ्या विधीला सिमंतोन्नयन म्हणतात.

जात कर्म संस्कार :– शिशु जन्म पावल्या नंतर ते दीर्घायु वज्रदेही होऊन ज्ञान, बल, तेजाने वाढून विद्वान व्हात्रे. म्हणून शुभसंकल्पामध्ये होम हवनादी पुण्य कर्म करून, सर्वारिष्ट निवारण होऊन जगून राहावे. व ज्योतिष्य शास्त्राप्रमाणे तिथी, वार, नक्षत्र, योग, करणं, याचा अनिष्टयोग जन्म काली आला असल्यास क्रम प्राप्त शांति करावी हे सर्व जात कर्मसंस्कार आहेत.

नामकरण संस्कार :– आयुष्य, बल, याच्या अभिवृद्धीसाठी व लोक व्यवहाराच्या सुरक्षततेसाठी ईश्वर प्रणिधान पूर्वक नामाभिधान करणे, नाम करण विधी होय.

कर्णवेध संस्कार :– शिशू रोग ऋजादिका पासून सुरक्षित राहावे, आणि शस्त्र प्रहार मूलक येणाऱ्या दुरितांचे आमरण परिहार होऊन वल तेजाने युक्त शतजीवी व्हावे, यासाठी कान टोचण्याचा कर्ण वेध विधी होय.

उपनिष्क्रमण संस्कार :– बालकाच्या आयुरारोग्य ऐश्वर्याच्या आभिवृद्धीसाठी, ईश्वराचा अनुग्रह व्हावा म्हणून, सूर्य, चंद्र, शिव, विष्णु, गणपती, आचार्यादी देवतांचे आणि गो, अश्व, व विल्व, शमी, अश्वत्थ या पुण्य वृक्षाच्या व नदी सरोवरादि पुण्य तीर्थ जलाशयाचे दर्शन करविणे उपनिष्क्रमण विधी होय.

अन्न प्राशन संस्कार :– शिशूने आईच्या गर्भात केलेल्या मल प्राशनाच्या दोष निवारणासाठी शुद्ध अन्ना पासून उत्पन्न झालेल्या ब्रह्म तेजा पासून इंद्रिय संय्यमित व्हावे आणि आयुष्य अभिवृद्धी व्हावी व जठराग्नीचा ताप निरसन व्हावा या संकल्पाने केले जाणारे ईश्वर प्रणिधान अन्न प्राशन विधान होय.

चौल संस्कार (जावळ काढणें) :– बीज आणि गर्भापासून उत्पन्न झालेल्या बालकाच्या पातकाचा नाश होण्यासाठी आणि आयुष्य बल, तेज याची अभिवृद्धी व्हावी म्हणून केल्या जाणाऱ्या ईश्वर प्रणिधानाला चौल विधान म्हणतात.

उपनयन संस्कार :– आई बापाने आपल्या मुलाला विद्यार्जनासाठी आचार्यांच्या सन्निधींत नेऊन ठेवण्याच्या क्रमाला उपनयन म्हणतात. उप = समीप नी (धातु) नय = नेणें. आचार्यांच्या जवळ नेणे. पालकांनी आपल्या मुलाना प्रवेशपत्राद्वारे पाठ शाळेत प्रवेश देत असतात. त्याप्रमाणे आचार्यांच्या सन्निधीत (गुरुकुलाश्रमात) विद्यार्जनासाठी मुलानां नेऊन ठेवण्याच्या विधीला उपनयन (ब्रह्मचर्याश्रम) म्हणतात. यात वेदाध्ययन, गायत्री मंत्रानुष्ठान, प्रामुख्याने आहे. **"वेद माता च गायत्री"** गायत्री देवता सकल वेदाची माता आहे. अपार असलेल्या वेदवेदांगाचा अभ्यास करणे व करविणे गुरु शिष्यांना साध्य नसल्यामुळे गायत्री मंत्रानुष्ठानापासून सकल वेदाध्ययन करण्याची पात्रता आपो आप येते.

गायत्री मंत्र :–

"ॐ तत् सवितुर्वरेण्यम् भर्गोदेवस्य धी मही धीयो योनः प्रचोदयात्"

सूर्य देवाचे श्रेष्ठतम (वर मागण्या योग्य) तेज आम्ही (मानव) बुद्धी मध्ये संग्रह करून ठेवीत असतो. तो (सुर्य देव) आम्हाला प्रेरणा (प्र×ईरण) देवो.

उपनयन विधीच्या द्वारे प्राप्त होणाऱ्या गायत्री मंत्रा पासून - अध्ययनामध्ये व सत्कर्मामध्ये बुद्धीला प्रेरणा व्हावी असा या मंत्राचा स्पष्टार्थ होतो.

दीक्षा संस्कार :– उपनीत बटूला आचार्य दीक्षा संस्कार करतो. दीक्षा या शब्दाचा विचार केला असता; दा (धातु) दी = देणें· क्षल (धातु) क्षाल = धुणें.

"दीयते परमं ज्ञानं क्षाल्यते च मलत्रयं" "दीयते" म्हणजे जी वस्तू गुरु पासून शिष्याला देण्यांत येते. त्याने परम ज्ञानाचा अनुग्रह होतो. "क्षाल" म्हणजे ज्यापासून भूत, प्राण, भाव हे तीन मलावरण धुऊन नाश पावतात, असल्या पवित्र दीक्षेचा अनुग्रह करणाऱ्या आचार्यांना दीक्षा गुरु म्हणतात. ती दीक्षा क्रियादीक्षा, मंत्रदीक्षा, वेधादीक्षा अशा तीन प्रकारच्या आहेत. शिष्याच्या मलमय स्थूल शरीराच्या शुद्धीसाठी गुरुकुलाश्रमांत प्रथम त्याला सेवारूपी शिक्षण देण्यांत येते. तेथे समानभाव समानभोजन, समानआसन, समानवस्त्रपरिधान अशा वेष भूषेमध्ये ही समानता असावी आणि आश्रमांत असणाऱ्या गुरू-जनांच्या पूजा जप होमादि विधीला उपयोगी होणाऱ्या पत्र पुष्पाची व्यवस्था करणे, गो सेवा, तपोवनातील पुण्य वृक्षांचे संगोपान, आश्रमाला येणाऱ्या अतिथींची सेवाकरणे, ब्राह्मी मूहूर्तावर उठून राष्ट्रगीत, धर्मगीत गुरुगीत, ईशगीत गात आश्रम

झाडणे, सडासम्मार्जन व पाक सिद्धी करणे आदि सेवा कर्मामध्ये मी राजाचा मुलगा, मंत्र्याचा मुलगा, धनिकाचा मुलगा, गरीबाचा मुलगा, असा कोणताच भेदभाव मनामध्ये न आणता, सर्वांनी समानतेने सेवेत रत असावे. त्यापासून कायाभाव व देह मोहाचे निरसन होते. विना सेवेने विद्यार्जन झाल्यास ती विद्या फलद्रूप होत नाही. आणि इह लोकाच्या जीवन सुख समृद्धीसाठी भौतिक विद्येमध्ये गण्य असलेले कृषि, आयुर्वेद, रसायन, खगोल, भूगोल, गणित, शिल्प, युद्ध आदि अनेक विद्यासंपादन करून जीवन चालविण्या मध्ये मानव लोभवश होऊन पापकर्म करूनये म्हणून अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, दया, क्षमा ह्या सहा धर्म नियमाचे शिक्षण असलेली ही क्रिया दीक्षा होय.

जन्मांतरी इहलोक, परलोक, नानाविध भोग प्राप्तीसाठी प्रच्छन्न रूपानें असून अवकाश देणाऱ्या पुण्य कर्मानुष्ठानाला अवश्यक आधिभौतिक, आधिदैविक, विद्येच्या शिक्षण विधानामध्ये अन्नदान, वस्त्रदान, भूदान, गोदान, धनदान, विद्यादान, औषध-दान, प्राणदान, व प्रेमदान पात्रापात्र विचार पूर्वक दान कर्माचे शिक्षण आहे.

मातृभक्ती, पितृभक्ती, आचार्यभक्ती अतिथीभक्ती, देशभक्ती, देवताभक्ती आदि पूजा कर्मानुष्ठानाचे शिक्षण आहे. मंत्रयोग, लययोग, हठयोग, राजयोग, शिवयोग, आणि पाशुपतास्त्र, गरुडास्त्र सुदर्शनास्त्र, वायुवास्त्र, अग्न्यास्त्र, जलास्त्र, आदि अस्त्रविद्या, आहेत. नारायण अष्टाक्षरी, विष्णु द्वादशाक्षरी, गणपतिनवाक्षरी शिवगायत्री, शिवपंचाक्षरी आदि अनेक मंत्रानुष्ठानाचे शिक्षण आहे. साधकाना पूजा करण्यासाठी षढध्वशुद्धी पूर्वक दैवतमूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून देणे, ब्रह्मचिन्ह शिवलींग व भस्म रुद्राक्ष

वस्तू, संस्कारपूर्वक प्रदान करणे म्हणजे दान, पूजा, जप ह्या तीन धर्म नियमाचे शिक्षण असलेली मनुदीक्षा होय-

आचार्य त्या शिष्यानां उद्देशून उपदेश करतात. शिष्यहो! "तुम्ही क्रिया दीक्षा, मनुदीक्षा संपादन केल्या अहांत. ब्राह्मी-मूहूर्तावर उठता व इष्ट दैवतांचे स्मरण करा, वंदन करा, आचार्यादि वरिष्ठ जनाला नमस्कार करा. शौच मुख मार्जन दंतधावन आदि प्रार्तविधी संपवून शीतजल स्नान करा. स्वच्छ धूत वस्त्रे परिधान करा. भस्म रुद्राक्ष धारण करा. अनुग्रह केलेल्या इष्ट दैवतांची पूजा करा. संध्या होम हवनादि करा. रुद्र सूक्त, पुरुष-सूक्त, श्रीसूक्त, ब्रह्मचर्य सूक्त आदि प्रातःकाल माध्यानकाल व सायंकाल या तीन्हीकाली पठण करा. दिवसा झोप घेऊनका, रात्री जास्त वेळ जाग्रण करू नका. गुरूच्या सन्मुख विनयान्वित होऊन राहा, वीरासन घालून वरिष्ठ जनापुढे बसू नका. माता-पिता आचार्य अतिथी त्यांच्या विषयी पूज्य भावनेनें वागा. मूत्र विसर्जन समयी जलाचा उपयोग करा. हात पाय धुवून आचमन करा. नदीच्या काठी, पुण्य वृक्षाच्या सावलीत, रस्त्यावर, देवता मंदिरासमीप, मठ मंदिर, आश्रमाजवळ, गाई गोठ्याजवळ, पाण्याच्या विहीरी जवळ, बेल, फुलांच्या उद्यानांत, सूर्याच्या-सन्मुखी होऊन मल मूत्र विसर्जन करूनका. दिवसा उत्तरेला रात्री दक्षीणेला मुख करून शौच करावे.गुरु बंधू आणि स्वाध्यायी लोकाबरोबर प्रेमाने राहा. अभ्यासामध्यें वंचना करू नका.अहिंसा सत्य, अस्तेय,ब्रह्मचर्य आदि नीति बोधपर ग्रंथ वाचा. तृणासन, पर्णासन, दर्भासन, कंबलासन, वल्कलासन, यांचा शयनात उप-योग करा. आई वाप आचार्य इष्ट देवता यांचे स्मरण करून झोपा. दक्षिण व पश्चिम दिशेला डोके करून झोपा. प्रथम डाव्या

अंगावर झोपा, भोजना नंतर दोन तासाने झोपा, प्रथम प्रहरी झोपा. आपल्या उशीवर ब्रह्मचाऱ्याने डाव्या हाताच्या करंगुलीने आईचे नांव लिहावे. ब्रह्मचारीणी कुमारिकेनें उजव्या हाताच्या करंगुलीने बापाचे नाव लिहावे. व त्या उशीवर डोके ठेऊन झोपावे. त्यापासून रात्री काम कल्पनेमुळें होणारे स्वप्न दोष नाहिसे होतात. तिखट, मीठ, अंबट आदि तीक्ष्ण पदार्थांचा त्याग करून दूध, तूप, मध, फल, मूळ, गहू, ज्वारी आदि सात्विक अहार सेवन करावे. खाण्याच्या पिण्याच्या सर्व वस्तू गुरुकडून अनुग्रह केलेल्या महा मंत्राने अकरा वेळा अभिमंत्रून इष्ट दैवतेला समर्पण करून प्रसाद रूपाने सेवन करा. अन्नाला परब्रह्म समजा तिरस्कृत भावनेने पाहू नका. तांबुल खाऊ नका. सुगंधी तेलाचा उपयोग करूनका. यम, नियम पूर्वक योगासन प्राणायाम करा. खालील अष्ट मैथुना पासून अलिप्त रहा.

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्यभाषणम् ।
संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेवच ॥
एतन् मैथुनमष्टांगम् प्रवदंति मनीषिणः ।
विपरीतं ब्रह्मचर्यम् एत देवाऽष्टलक्ष्मणम् ॥

स्मरणम् – नृत्य, नाटक, सिनेमा, स्त्रीयांची चित्रे पाहू नका. श्रृंगारिक कथा कादंबऱ्या वाचू नका, प्रत्यक्ष पाहिलेल्या स्त्रीचे स्मरण करू नका.

कीर्तनम्–स्त्रीयांच्या श्रृंगार रसयुक्त कौतुकाचे वर्णनात्मक काव्य पदे गाऊ नका. ऐकू नका. विषय भोगा संबंधीचेभाषण व श्रृंगार पर दृष्टांत सांगू नका. व ऐकू नका.

केलिः –स्त्रीया बरोबर कोणता ही खेळ खेळू नका. विनोद करूनका

प्रेक्षणम् – स्त्रींयाना निरखुन पाहू नका. चोरून पाहू नका. मागे

वळून पाहू नका स्त्रीया बरोवर एकांतांत अंधारात वसून बोलू नका. त्याना शिक्षक होऊन अभ्यास सांगू नका, अक्का, ताई, आई बरोबर एकाच आसनावर वसू नका. झोपू नका. कारण इंद्रियाचा समूह वलवान असल्यामुळे संय्यमाने राहा.

संकल्प – विषय विकारामध्ये प्रेरित होऊन विषय सेवनेच्या तृप्तीसाठी दृढ निश्चय करून पाप कर्माचा संकल्प करूनका.

अध्य वसायः – पापकर्माचा गुप्त रीतीने प्रयत्न करू नका.

क्रिया निष्पत्तिः – प्रत्यक्ष संभोग करूनका.'

अशा ह्या आठ प्रकारच्या मैथुन कर्माचा त्याग करून वैराग्य शील होऊन राहणे पूर्ण ब्रह्मचर्य होय. एका ब्रह्मचर्याच्या पालनासाठी आतापर्यंत उपदेश करण्यांत आला आहे. काया वाचा मनाने त्याचे पालन करणारा उत्तम साधक होऊन ऊर्ध्वरेता म्हणवितो.

प्राकृतिक बंधनानें बालक बालिकानां जन्मगत मातृ पितृ उर्ध्व-भाव बारा वर्षं पर्यंत स्वाभाविकपणें असतो. त्या स्वाभाविक ब्रह्मचर्याला पंचवीस वर्षा पर्यंत जगांतील सर्व स्त्री पुरुषा विषयीं मातृ पितृ भावाने आपल्या कर्तृत्वशक्तीने परीपालन करणें हे ब्रह्मचर्य व्रत होय. बारा वर्षे वया पासून रज वीर्याचे बीजाणुचा विकास आरंभ होऊन पंचवीस वर्षा पर्यंत पूर्ण विकास पावतात.

आहारामध्ये अन्न, जल. वायु असे तीन प्रकार आहेत. ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणीने आपल्या नित्य पुण्य कर्मानुष्ठानात होम, हवन विधीद्वारे गोघृत, चंदन, दर्भ, कर्पूर, धूप आदि द्रव्य, मंत्र विधीनें अग्नींत समर्पण करून त्या मंत्रमय वायुचे सेवन करावे. त्यापासून अंगामध्ये योग वाहिनी क्रिया वाढून "ओज" शक्ती निर्माण होत असते. जल, नित्य आहार असले तरी मंत्रमय

संस्कारापासून गुरुचरणामृत रूपानें आणि उपास्य दैवतांच्या तीर्थ रूपाने सेवन करावे, अन्न इष्टदैवताला समर्पण करावे. गुरु आई, बाप, दैवतादिकांचे स्मरण करीत प्रसाद भावनेत सेवन करावे त्या पासून शरीरात पावित्र्य येते. तीर्थ, प्रसाद रूपाने सेवन केलेल्या अन्नोदका पासून उत्पन्न झालेले वीर्य व रज कण, ऊर्ध्व रेत होऊन "ओज" निर्माण करतात. ते "ओज" तत्व चिंतनाला साहाय्यक होते.

रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदः प्रजायते ।
मेदादस्थि ततो मज्जा मज्जायाः शुक्र संभवः ॥
(श्रीसुश्रुताचार्य)

सेवन केलेल्या अन्नाचा जठराग्नी पासून पांच दिवसाने रस होतो. त्या रसाचे पांच दिवसाने रक्त होते. त्या रक्ताचे पांच दिवसांत मांस होते. त्या मांसाचा पांच दिवसानी मेद होतो. त्या मेदाची पांच दिवसानी मज्जा होऊन अखेर सप्त सार पदार्थाचे "वीर्य" "रज" होतात. अन्न, पाणी, वायू, या तीन पदार्थांचे जठराग्नीच्या संस्कारानें सात प्रकारात परिवर्तन पाऊन अखेर सप्त धातूचे सार अशा रज, वीर्याची उत्पत्ती होते. त्या मधील मल कण वाहेर टाकीत अन्न सेवन केल्या पासून तीस दिवस चार तासानी रजो वीर्याची उत्पत्ती होते.

"एवं मासेन रसः शुक्रो भवति पूंसां स्त्रीणां चार्तव मिति"
(सुश्रुत)

"मासेन याति शुक्रत्वमन्नं पाक क्रमा दिति" (धन्वंतरि)

रजोवीर्य कण, शरीरांत एका विशिष्ट स्थानी नसतात. तीळांत तेल, दुधात लोणी, उसात रस हे जसे ओत प्रोत व्यापून असतात. त्या प्रमाणे शरीरामध्ये रजो वीर्य व्यापून आहेत.

आचार्यांच्या सेवेमध्ये शरीर तपऊन त्या तापाने पापाचा क्षय होऊन क्रमेण सहन शीलता व संय्यमता वाढत असते. सेवा रूप तपाच्या तापाग्नीमध्ये मन, पवन, तप्त होऊन रज, वीर्य, ऊर्ध्व-रेत होऊन ओज रूपांत परिवर्तन होतात. अग्नि संस्काराने बीजांतील अंकुर नाश पावतो. त्या प्रमाणे सेवा रूप तपाग्नी पासून भाव, मन, काया मधील विषय भोग, कण, निवृत्तीमार्गांत परीवर्तन पावतात. सेवा प्राधान्य नसल्यास विषय भोग प्रवृत्ति वाढत असते. आचार्यादि सेव्य जनांच्या सेवेत त्यांचे संतुष्टतेसाठी सेवक होऊन ऊर्ध्व भावनेत वर्तन करणारे सेवा कर्म, निवृत्तिपर तपानुष्ठान होय. ब्रह्मचाऱ्याने सेवारूप तपा बरोबर विद्या संपादन करावी. विद्या ही अमूल्य वस्तू आहे. "विद्ययाऽमृत मश्नुते', विद्ये पासून अमरत्वाची प्राप्ती होते. जन्म मरण रूप सुख–दुःख भोगणाऱ्या जीवाच्या अमरत्व प्राप्तीसाठी अभ्यास करणे हे विद्या-र्जन होय. सर्व सामान्य पणे, सर्व जनाचे प्राण पंचभूताधीन, होऊन राहतात. यम, नियमादि अष्टांग योगाच्या अभ्यासानें योगी लोकांचे भूतशरीर प्राणाधीन होऊन राहाते. दूरदृष्टी, दूरश्रवण, परकाया प्रवेश, आकाश गमन, मृत देहांत प्राण प्रतिष्ठापना करणे, थोड्या अन्ना पासून पुष्कळ लोकाना जेऊ घालणे, पाण्याचे तूप-करणे, असे अनेक महत्वाचे चमत्कार म्हणजे प्राण जन्य पंचभूता-मध्ये इच्छा मात्रे परिवर्तन करून अद्‌भूत प्रकार करून दाख-विणे ही आधीभौतीक विद्या होय. शिष्याने गुरु पासून मंत्र दीक्षे-मध्ये प्राप्त केलेल्या चोवीस अक्षरांचा सूर्यगायत्री, सत्तावीस अक्षरांचा शिवगायत्री, नारायणअष्टाक्षरी, विष्णुद्वादशाक्षरी शक्तीत्रयोदशाक्षरी, गणपतिनवाक्षरी, रुद्रदशाक्षरी, शिवपंचाक्षरी मृत्युंजयादि मंत्रानुष्ठान केल्यास मंत्राधीन असलेल्या

दैवतांच्या प्रत्यक्ष साक्षात्कारद्वारे अनुग्रह संपादन करणे ही आधि-दैविक विद्या होय. उदा. पुराण कालांत त्रिपुरासुराने अंतराळांत तीन गांवे वसविली. भस्मासुराने दग्ध हस्त प्राप्त करून जगाला जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. विश्वामित्राने प्रति सृष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्यं संपादन करून, सत्वशील हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा केली. गोरक्षाने अणिमादि अष्टमहासिद्धी प्राप्त करून जगाचा नाश करण्याच्या कामी तो गर्व हत झाला. अगस्त्य ऋषीने सप्त समुद्र जलाचे पान केले. विंध्य पर्वतास आडवे पाडले. हे सर्व आधिदैविक विद्येपासून उत्पन्न झालेले सिद्धी सामर्थ्य होय. असल्या सिद्धी संपन्न ब्रह्मचारी साधकाला आध्यात्म विद्येचे अर्थात् आत्मा-अनात्मा या विचाराचे ज्ञान नसल्यास सिद्धीमुळे ऊन्मत्त होऊन मी तपस्वी, मी योगी, मी सिद्धपुरुष, असा अहंकार वाढून त्याच्या पासून जगाची हानी होणाऱ्या दुर्घटना संभवत असतात. हे जग नश्वर असून परिवर्तनशील आहे. हे सर्व अनित्य आहे, असे जाणून नित्य असलेल्या आत्म परमात्म तत्वाचे परिज्ञान करून घेण्यासाठी पूजा, जप, ध्यान व वेद वेदांगाचे अध्ययन करीत गुरु सेवारत असलेल्या परिशुद्ध अशा सत्‌शिष्याला वेधादीक्षेचा अनुग्रह करतात.

शरीरात्मविवेकेन पिंडज्ञानी स कथ्यते । (सि.शि मणि पिंड ज्ञान स्थल) आचार्य सत् शिष्याला आपल्या सन्मुख बसऊन त्याच्या ब्रह्मरंध्रा (मस्तक) वर आपला उजवा हात ठेऊन योगशक्तीने आज्ञान अंध:कराचा शक्तीपात करून, स्थूल, सूक्ष्म, कारण या तनुत्रयाला मी, साक्षीभूत आहे, शुद्ध ज्ञान स्वरूप आहे. असा ज्ञानोदय करून दिल्यानंतर शिष्य पिंडज्ञानी म्हणवितो. त्या आत्म ज्ञान्याला ही चराचर सृष्टी परब्रह्म स्वरूप आहे. असे दिसु लागते. आणि

त्यापासून पुनारावृत्ती रहित मोक्ष सुख प्राप्त करून देणारे ध्यान नियमाचे शिक्षण असलेली वेधा म्हणजेच वेधा दीक्षा होय. शिष्याच्या ठिकाणी जो पर्यंत "मी देही" असा देह भाव असतो. तो पर्यंत तो आई वापाचा मुलगा असून गुरुचा शिष्य म्हणवितो. त्या शिष्याला वेधा दीक्षेंच्या द्वारे शरीर व आत्म्याचा विवेक पूर्वक ज्ञानोदय झाल्यानंतर तो द्विजन्मा होऊन गुरु पुत्र, मोक्ष लक्ष्मी संपत्तीचा स्वामी होतो. म्हणजे मोक्षाधिकारी होतो. ही आध्यात्म विद्या होय. आचार्याकडून क्रिया, मनू, वेधा, या त्रिविध दीक्षेनें संपन्न झालेला सत् शिष्यच तप्त तनू म्हणवितो. परंतू अदीक्षित तनु म्हणजे दीक्षा नसलेला अतप्त तनू म्हणवून पापी व दुःखी होत असतो. अग्नी संस्कार झालेल्या बीजापासून अंकुर उगवत नाहीत, त्या प्रमाणे त्रिविध दीक्षेने शिष्याची तनु तप्त होऊन जन्म मरणाचा भवित्व दोष परिहार होऊन लिंग-अंग(जीव) सामरस्यरूप जीवन्मुक्ती पावतो. क्रिया व मनु या दोन दीक्षें पासून दुरित निवारण होऊन इह आणि परलोकाचे सुख प्राप्त होते. आणि मोक्ष प्राप्तीसाठी पात्रता निर्माण होते. वेधा दीक्षेपासून पुनरावृत्ती रहित मोक्ष प्राप्ती होते.

अठरा वर्षाची ब्रह्मचारीणी कुमारिका व पंचवीस वर्षाचा ब्रह्मचारी गुरुकुलाश्रमात वास करून तपाग्नीच्या ताप संस्काराने उर्ध्व रेत होऊन सुप्रजोत्पादनसाठी पात्र होतात.

न तस्तप तप इत्याहुर्ब्रह्मचर्यं तपोत्तमम् ।
उर्ध्वरेता भवेद्यस्तु स देवो नतु मानुषः ॥

दूध, तूप, कंद मूळादि सेवन करून शरीराला ताप देऊन तप केले असले तरी ते पूर्ण तप नव्हे. ब्रह्मचारीणी व ब्रह्मचारी यानी ऊर्ध्वरेत होऊन राहणे हेच श्रेष्ठ तप आहे.

तपाच्या तापाग्नी पासून रज वीर्यामध्ये परिशुद्धता येते. गोंदा-राचे अग्नी संस्काराने दीर्घ तंतू बनतात. साखरेचा पाक दिर्घ तंतुमय होतो. व मध दीर्घ काळ संग्रह करून ठेविल्यास दीर्घ तंतु होत असल्या प्रमाणें पंचवीस वर्षांपर्यंत ऊर्ध्वभावाच्या तपश्चर्येमध्ये वीर्य व रज, संग्रह केल्यास ते दीर्घतंतुमय होते. त्यापासून दीर्घदेही, दीर्घज्ञानी, दीर्घायुषि संतती होते. परंतु अविकसित वीर्य रजा पासून उत्पन्न झालेले मानवशरीर अल्प-देही, अल्पायुषी, अल्पज्ञानी जन्मते. ब्रह्मचर्याश्रमामध्ये असल्या वेळीच गृहस्था श्रमाचे शिक्षण मिळाल्यास भावी जीवन सुखमय होते. मानव जीवन आमरण पवित्र होऊन राहणे हाच ब्रम्हच-र्यांचा मूळ उद्देश आहे. ब्रह्मचारी ऊर्ध्वरेत असून सुप्रजा निर्माण करण्यासाठी अधोरेत होतो, त्या प्रमाणे प्रकृती सुद्धा उर्ध्वरेत असून उत्पत्ती, स्थिती, कार्यामध्ये विविध रूपांत अधोरेत होत असल्याचे दिसते.

सूर्य ऊर्ध्व रेत होऊन आपल्या तप्त किरणाने, नदी, समुद्र, सरोवरादि जलाशयांतील जलद्रव्य, वनस्पती मधील रस-द्रव्य, उर्ध्वाकर्षण शक्तीने शोषण करून मेघ मंडलात संग्रह करतो. पुनः वर्षा काली अधोरेत होऊन पाऊस पाडून वनस्पतीचे संर-क्षण करतो. आपल्या प्रकाशाने सर्व प्राण्याना वाढवून संरक्षण करतो. सूर्य ऊर्ध्वरेता असल्यामुळे त्याचे गुणधर्म आम्हास प्राप्त होवो. या उद्देशासाठी ब्रह्मचर्य आश्रमामध्ये सूर्याची उपासना प्रामुख्याने सांगितली आहे.

अग्नी ऊर्ध्वरेत असल्यामुळे, दिव्याची ज्योत खालील तेलाला ऊर्ध्व गतीने आकर्षण करते. आणि अग्नी खाद्यान्न शिजविण्यासाठी अधोरेत होऊन सर्व मानवाचे रक्षण करतो.

अग्नींतील धर्म आम्हाला प्राप्त व्हावा या उद्देशासाठी धूप, दीपारतीच्या विनियोगामध्ये आणि होम हवनामध्ये अग्नी देवतेची उपासना प्रामुख्याने सांगीतली आहे.

वायु पृथ्वींतील रस द्रव्य ऊर्ध्वं गतीने वाहून नेऊन मेघमंडलांत संग्रह करतो. आणि वर्षाकाली पावसाच्या रूपाने अधोरेत होऊन सर्व जीवाचे संरक्षण करतो. वनस्पती मुळापासून पृथ्वींतील पोषक द्रव्य ऊर्ध्वं गतीने आकर्षित करून ऋतुमान प्रकारे अधोरेत होऊन पुष्प, फल, रूपाने सर्व प्राण्यांचे संरक्षण करतात. या व्यापक प्रकृतीचा अंशमय घटक असलेल्या उर्ध्वरेत ब्रह्मचार्याला उद्देशून आचार्य गृहस्थाश्रम स्वीकारण्याचे शिक्षण देऊन आज्ञा करीत असतात.

समावर्तन संस्कार :– सम् = ब्रह्मचर्य व्रत सम्यक् योग्य रीतीने पूर्ण करणें. **आवर्तन** = आश्रम निवृत्त होणे, असा याचा अर्थ होतो. उपनीत गुरुकुल वासी असलेल्या ब्रह्मचाऱ्याला आचार्य समावर्तन–सोडमुंज विधीच्याद्वारे उपनयन व्रतापासून मुक्त करतात. आणि वेष भुषेमध्ये सुद्धा परिवर्तन करून गृहस्थाश्रम स्वीकारण्यासाठी स्वातंत्र्य प्राप्त करण्याच्या कामी ईश्वर प्रणिधान क्रमाला समावर्तन विधी म्हणतात. या सोडमुंज विधीच्याद्वारे तो ब्रह्मचारी स्वगृहास जाते वेळी आचार्य उपदेश करतात.

वेद मनू च्याचा योंऽते वासिनः मनुशास्ति सत्यंवद । धर्मंचर । स्वाध्यायान् मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजा तंतुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान् प्रमादितव्यं । धर्मान्न प्रमादितव्यं । कुशलान्न प्रमादितव्यं । भूत्यै न प्रमादितव्यं । स्वाध्याय प्रवचनाभ्यां । न प्रमादितव्यं. । देव पितृकार्याभ्यां न प्रमादितव्यं ।

तू सत्यच बोल, धर्माचरणामध्ये तत्पर होऊन राह स्वाध्यायामध्ये निर्लक्ष करू नको, अतिथी आचार्यादि वरिष्ठ लोक घरी आल्यास सेवेत वंचना करूनको, सत्यासाठी धर्मा साठी मागे हटू नको, शुभ कर्मामध्ये वंचना करूनको, तुझ्या उन्नतीच्या मार्गाला सोडू नको, वेद वेदांगाचे अध्यन अध्यापनाचे कार्य सोडू नको. देवपितृ कार्य विसरू नको, "प्रजा तंतुम् मा व्यवच्छेत्सीः" सुप्रजा निर्माण करण्याचे वंश सूत्र खंडित करु नको मातृ देवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव । अतिथीदेवो भव। यान्य नवद्यानि कर्माणी। तानि सेवितानि। नो इतराणी यान्य स्माकं सुचरितानि। तानित्वयोपास्यानि । नो इतराणी येके चास्म च्छ्रेयांशो ब्राह्मणाः। तेषांत्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यं श्रद्धया देयम्। अश्रद्धया देयम् । श्रिया देयम् । ह्रिया भिया देयम्। संविदा देयम्। ("तैत्तीरीयोप निषद,, एकादश अनुवाक)

आईला मनुष्य न समजता देव समज ! बापाला मनुष्य न समजता देव समज, आचार्याना मनुष्य न समजता देव समज, अतिथीला मनुष्य न समजता देव समज, त्यांची पूजा सत्कार कर, निर्दोष कर्मच करीत जा. निंदित पापकर्म करू नको, तुझ्या कर्तव्याला अनुसरून सद्भावाच्या अनिंदित कार्यांचे आचरण कर, सु च्यारित्र्यमय आचरणाचे अनुकरण कर ब्रह्मानुसंधान तत्पर शिवयोगी तुझ्या घरी आल्यास त्याना आसन देऊन सर्व प्रकारे सन्मान कर, श्रद्धा पूर्वक दान कर, तुझ्या आर्थिक परिस्थिति अनुसार म्हणजे तुझ्या उत्पन्नाच्या एक षष्ठां मांश दान कर्मात खर्च कर, अश्रद्धेने दानकरुनको, तू दान देत असलेल्या सर्ववस्तू ही देवाचीसंपत्ती आहे म्हणून भयभक्तीनें दान कर, पात्रापात्र विचार करून दान कर. अश्र

प्रकारे आचार्य आश्रम वासी ब्रह्मचाऱ्याला उपदेश करून गृहस्थाश्रम स्वीकारण्यासाठी आज्ञा करतात.

– गृहस्थ ब्रह्मचर्य –

चौऱ्या ऐंशी लक्ष जीव राशी सर्व पाप कर्माच्या क्षालनार्थ भोग योनी झाले आहेत. मानव एकटाच भोक्ता म्हणून पाप पुण्य कर्म करण्याच्या कामी स्वतंत्र कर्ता आहे. मानव जन्मात असल्या वेळी अनैसर्गिक भावनेत केलेल्या, पापविशेषाने पशू पक्षी वनस्पत्यादि नाना योनीमध्ये जन्म पावून त्या जीवाचे कर्माचे क्षालन झाल्या नंतर पुनः त्याजीवाना मानव जन्माला येण्याविना इहलोक, परलोक व परमार्थ सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही. उदा :– पथिक लोकानां पाणी पीण्यासाठी पान पोईची योजना केलेली असते. सेवक पथिक लोकांची मार्ग प्रतीक्षा करीत असल्या प्रमाणे पशू पक्षादि तिर्यक्योनीतले सर्व जीव मानव जन्माला यांवे व सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून ह्या गृहस्थाश्रमाची योजना केली आहे.

स्त्री–पुरुषामधील विषय सेवन क्रम युक्त ठेवण्यासाठी त्याला योग्य संस्काराची अवश्यकता आहे. स्त्री पुरुषाचे जीवन सुसूत्रपणे चालविण्याच्या विधानाला विवाह संस्कार म्हणतात. स्त्री पुरुषानी पति पत्नी या नात्याने रहावे म्हणून विवाह संस्काराची अवश्यकता आहे. पति पत्नीचे विषय सेवन क्रमयुक्त असावे म्हणून विवाह संस्काराचा उगम झाला आहे. वैद्य शास्त्रात वचनाग, कुचला, आदि विषारी वनस्पतीचा, औषध रूपाने सेवन केल्यास नपूंसक मनुष्य ही पुंसक होतो. तेच अक्रमाने सेवन केल्यास मरतो. स्त्री पुरूष पति पत्नी न होता त्यांनी अनिर्बंध विषय सेवन केल्यास मानव समाजा पासून ते पद भ्रष्ट होतात.

इतकेच नव्हे तर राष्ट्रांतील अनेक लोकांच्या सुख शांतीचा भंग होतो. नियमित विषय सेवनेनें सु प्रजा निर्माण व्हावी म्हणून विवाह संस्कार अस्तित्वात आला आहे. विवाह विधीसाठी योग्य वधु वरांचा विचार करणे अवश्यक आहे. नैष्ठिक ब्रह्मच-र्याचे शिक्षण पूर्ण झाल्या नंतर गृहस्थ जीवनांत गृहिणी भार माता पिता आचार्य अतिथी अभ्यागत लोकांचा सेवा भार आणि समाज भार असे अनेक भार असल्यामुळे भार वाहाण्याची शक्ती असण्यासाठी वधु–वरांचे ठिकाणी योग्य पात्रता असणे अवश्यक आहे. विवाह या शब्दाचा अर्थ "वि" = विशेष वाह = भार वाहाणें म्हणजे विशेष भार वाहून नेणें असा होतो. विवाह विधी मध्ये स्त्रीचे ग्रहण करावयाचे असते. ती आपल्या रक्षणाच्या कामी अबला आहे. तिने बाल्यावस्थेत आई बापाच्या आधीन, तारुण्यावस्थेंत पतीचे आधीन. वृद्धापकाली पुत्राधीन राहणे स्वाभाविक आहे. पुरुष कृषि कार्यादि शारीरिक श्रमामध्ये बलवान असल्या प्रमाणें स्त्री बलवान नाही. कोमलांगी व अबला आहे. परंतु ती शिशु संगोपन या कार्यात समर्थ आहे. पुरुष या कामी अ समर्थ आहे. ही आप आपल्या कार्यामध्ये बलवंत असले तरी परस्परामध्ये सहयोग नसल्यास दोघे ही बलहीन होतात. प्राकृतिक नियमाचा विचार केलाअसता गायी, म्हशी आदि मादी जनावरे बैल, रेडा, आदि नर पशुप्रमाणे शरीराने त्या सुदृढ नसतात. हरीण, वानर, वनचर प्राण्यांच्या मादी समूहावर एक नर अधीष्ठान ठेवून राहातो. पुरुष आपले पुरुषत्व रक्षण करण्याच्या कामी स्वतंत्र आहें. आणि स्त्री आपले स्त्रीत्व रक्षणाच्या कामी परतंत्र असून अबला आहे. स्त्रीनें विषय भोगासाठी अपेक्षा केल्यास पुरुषाचे मनात काम चेतना नाही झाल्यास ती भोगसुखासाठी

परतंत्र होते. या उलट स्त्रीच्या मनांत भोगसुखाची अपेक्षा नसली तरी पुरुष आपल्या बलाने संभोग सुख प्राप्त करू शकतो. या वरून पुरुष आपले पुरुषत्व रक्षणाच्या कामी बलवान् आहे. स्त्री आपले स्त्रीत्व रक्षणाच्या कामी अबला आहे हे सिद्ध होते.

स्त्री "रज" पुरुषाच्या "शुक्र (वीर्य) धातू पेक्षा निर्बल असते. शरीरामधील अस्थि आदि बलिष्ठद्रव्य शुक्र संभव आहेत त्वचा, रक्त, मांस, रोम, आदिमृदुद्रव्य, रज संभव आहेत. या कारणाने रज धातू पेक्षा शुक्र सबल असून त्यातील भूत, प्राण-कण बलवान असल्यामुळे पुरुष या प्राकृतिक नियमानुसार बल-वंत आहे, आणि स्त्री अबला असणें स्वाभाविक आहे. अशा अबला असलेल्या चैतन्य वस्तूला पुरुष आपल्या स्वामित्वामध्ये ठेऊन आमरण रक्षण करतो. आणि मनामध्ये माझी पत्नी ह्या भाव बंधनाने सर्व प्रकारें धारण करतो म्हणून समस्त भारामध्ये हा भार विशेष होय. विवाह विधीमध्ये वराला वधू दान, सांगितले आहे. मात्र वधूला वर दान सांगितले नाही. याचे कारण रक्षण पोषणामध्ये ती असमर्थ असल्यामुळे वराला वधूदान करण्यात येते. भूमी, धन, सोने, चांदी, गाय, बैल, घोडा, आदि अनेक जड चेतन वस्तू प्रमाणे स्त्री ही जड वस्तू नव्हे. त्या जड वस्तू सर्व केवल दान घेणाऱ्याच्या संतुष्टतेसाठी दिल्या प्रमाणे, स्त्रीला तसे दिले नाही. स्त्री ही इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीशाली, चेतन जीव असल्यामुळे पुरुषाधीन असली तरी तिला व्यक्ती स्वातंत्र्य पाहिजे. दान घेणारा वर, वधूचा स्वामी असून वधू त्याचा आधीन असतें. हे दोघे सहयोग जीवी होऊन राहावयास पाहिजेत. स्त्री पुत्र व धन या ईषण त्रयानें बंधित होऊन तो पुरुष स्वामी असला तरी त्यास त्याचे रक्षण, पोषण, करण्यासाठी अविश्रांतपणें,

वागावे लागते. म्हणून समस्त भारामध्ये स्त्रीभार महान आहे. माता, पिता, आचार्य, अतिथी, अभ्यागताचा सेवाभार, गृहस्थ जीवनामध्ये विशेष असल्या कारणाने विवाह शब्द विशेष भार वाहून नेणे या अर्थाने यथार्थ आहे. "गृहिणी गृहमुच्यते" ज्या घरात गृहिणी नाही, ते घर नसून मठ, मंदिर, आहे. यावरून स्त्री पुरुषाधीन असली तरी गृह स्वामीनी असून गृहाधिपत्य तिला आहे. पुरुषापेक्षा स्त्रीलाच समाजात धार्मिक क्षेत्रात विशेष सन्मान आहे. दीक्षा उपनयन विवाहादि प्रत्येक शुभ कार्यामध्ये आरती ओवाळणे आदि सन्माननीय कामास सौभाग्यवती स्त्रीयाच असणे अवश्यक आहे. आकस्मिक पणें एखाद्याच्या घरास बंधु-बांधव प्रेमीजना पैकी पति पत्नी मिळून आल्यास त्याना सन्मान पूर्वक वस्त्रालंकार समर्पण करण्याची रीत आहे. ते वस्त्र फक्त स्त्रीयानाच करतात. पुरुषाना नाही. शुभ कर्मामध्ये पति पत्नी उभयतानां सन्मानार्थ वस्त्रा-(सपूर्ण आहेर)-लंकार करणे कर्तव्य आहे. ते साध्य नसल्यास पुरुषाच्या सन्मानाला महत्व न देता, केवळ स्त्रीयांच्या सन्मानार्थ आहेर करण्याची रीत व्यवहारामध्ये आहे. अवला असलेल्या स्त्रीला मातृस्थान म्हणून समाजामध्ये विशेष सन्मान देण्यात येतो. सन्मान प्राप्त करण्यामध्ये ही पुरुषापेक्षा ती वलवती आहे.

स्त्रीयामध्ये प्रसूती वेदनेचे दुःख सहन करण्याची शक्ती व रोग ऋजादि प्रसंगी दुसऱ्यांची शुश्रूषा करण्याचे मनोवल विशेष आहे. ते मनोवल पुरुषानां नाही. शिशु संगोपन कार्यामध्ये मल मूत्राची शुद्धी करणे, स्तन पान करविणे, आदि कार्यामध्ये कीती ही कष्ट झाले तरी शांती, सहनशीलता आदि सद्गुण मातृस्थानी विशेष आहेत. स्त्री, अन्नपाना दिकामध्ये स्वत: अगोदर

सेवन न करता अतिथी अभ्यागत सासु, सासरे, पति, पुत्रा दिकाचे भोजनानंतर शेष प्रसाद घेण्यात संय्यमी आहे. पतिसाठी स्त्री आपल्या मातापिता, बंधु बांधवाच्या पूर्वाश्रयाचा त्याग करण्याच्या कामी अग्रणी आहे. पति पत्नी यांचे पारस्परिक विषय भोगा साठी स्त्री स्वतः सांकेतीक भावाने पतीला प्रेरणा करीत नाही. प्रथम पुरुषच पत्नीला विषय प्रवृत्तीची प्रेरणा करतो. पुरुषा पेक्षा स्त्रीचे मन विशेष संय्यमी आहे. पुरुष भोग सेवनामध्ये शारिरीक व मानसिक क्रियेने बल हीन होतो. त्याप्रमाणे स्त्री बल हीन होत नाही. कर्म वशात् पत्नी कालाधीन झाल्यास पुरुषाचे मनाला संय्यमता नसल्यामुळे तो शिघ्रकालीच दूसरी बायको करतो. एक पत्नी व्रतस्थ असणारे पुरुष फार कमी प्रमाणात दिसून येतात. पती कालाधीन होऊन विधवा झालेली स्त्री दुसरा नवरा करण्यास संकोच करते. जर ती संतानवती असल्यास ती वात्सल्य भावनेत तन्मय होऊन मुलांचा त्याग करणार नाही. आणि दुसऱ्या पतीचा विचारच तिच्या मनाला शिवणार नाही. अनेक माता या वर्तमान काली सुद्धा पतिव्रता आहेत. ह्या सर्व कारणा वरून स्त्रीयांच्या ठिकाणी शांती, संय्यमता, मनो निग्रह पुरुषा पेक्षा विशेष आहे. जीवनावश्यक असलेले अन्न वस्त्र प्राप्त करण्यामध्ये पुरुष योग्य असून पाक शुद्धी शिशू संगोपन अतीथी सेवा आदि गृह कार्यामध्ये स्त्रीच योग्य आहे. गृह स्वामीनी होऊन आंतर्स्वातंत्र्य स्त्रीयांना आणि बहिर्स्वातंत्र्य पुरुषाना असणे योग्य आहे. या प्रकाराने परस्पर अंतर्बहिर्व्यवस्था असे वर्गीकरण न करता क्रम सोडून चालले असल्यास संसार क्षेत्र सुखमय होणार नाही. स्त्री ही पुरुषाची सहधर्मचारीणी आहे. स्त्री पुरुष दोघे एका उद्देशाने न चालता भिन्नाभिप्राय झाल्यास दोन्ही दुःखित होतात.

"अपुत्रस्य गतिर्नास्ति" या स्मृती वाक्यानुसार ज्यांना पुत्र संतान नाही त्यांना सद्गती नाही असा याचा भावार्थ आहे. मुलगी जन्मली असता दुसऱ्यांच्या वंशाला दान दिली जाते. पितृ वंशाचा तिचा संबंध तुटून जातो. तेच पुत्र संतान झाले असल्यास त्याच्या आई बापाना आयुष्यांत पुण्य कर्मांचा लवलेश लाभला नाही तरी अशा पापी जीवाच्या मरणानंतर त्याचा मुलगा उत्तर क्रिया म्हणजे श्राद्धादि पुण्य कर्मांत अन्नदान, वस्त्रदान, धनदान, गोदान आदि पुण्यकर्म करतो. "माझ्या मृत आई बापानां हे पुण्यकर्म पोहोंचो" या शुभ संकल्पात प्रती वर्षाला श्राद्ध करून पुण्य कर्म आमरण पोहोंचवितो. या उत्तर क्रियेच्या पुण्यकर्मा-पासून आई बापाना सद्गती प्राप्त होत असल्यामुळे वरील वाक्याचा यथार्थ बोध होतो

संस्कार विधीच्या नियमानुसार सुप्रजा निर्माण करा-वयाच्या सदुद्देशासाठी विवाह संस्कार प्रामुख्याने सांगितलेला आहे. इहलोक, परलोक व परमार्थ या त्रिविध सुखाचे साधन म्हणूनच लग्न करावयाचे आहे. लग्न म्हणजे दोन जीवाच्या भाव मन, काया याचे तादात्म्य पावणें होय.

अधुनिक विवाह विधी केवळ जड शरीरांच्या दृश्य-सुखासाठी आहे असे समजून प्रजेच्या न्याय संस्थेनें रजिष्टर विवाह मान्य केला आहे. स्त्री पुरुषामध्ये स्वेच्छेने अनिर्बंध विषय सेवन वाढून व्यभिचार प्रमाद होऊ नये म्हणून रजिष्टर विवाह पद्धती अमलांत आणली आहे. रजिष्टर विवाह विधीमध्ये क्रिया, आचार, विचार, विधि, नियम कांही नाहीत. केवळ विषय सुखा-साठी परवानगी प्राप्त करण्या शिवाय दुसरे कांही नाही. रजि-ष्टर विवाह करणारे वधु वर आपल्या आई बापाचे स्वामित्वाचा

उच्छेद करतात. हे भावचौर्य, प्रेमचौर्य महा पातक होय. पुरातन काली स्वयंवर पद्धती प्रचलित होती. वधूने आपल्या इच्छे प्रमाणे पती निश्चीत करणें हे स्वयंवर विधान होय. वधुवरानें आपल्या मना प्रमाणे निश्चय करणे योग्य नाही. वधु-वर परस्पर दोघे अपरिचित असल्यामुळे परीक्षा करणे शक्य नाही. प्रत्यक्ष त्यानी एकमेकाना पाहिले असले तरी डोळे, नाक, रंग आदि दृश्य अवयवाचे सौंदर्य चित्ताकर्षक यौवनतेज एवढेच त्यांच्या बुद्धीला दिसत असते. ही बहिर्परीक्षा आहे. रोगी निरोगी पूंसक नपूंसक आदी अंग प्रत्यांगाची जाणीव होण्यासाठी शरीर-शास्त्र व आयुर्वेद शास्त्राचे ज्ञान पाहिजे.

पद्मिनी तदनु चित्रिणी शंखिनी हस्तीनी विदुः ।
उत्त मा प्रथमा भाषिता ततो हीयते युवत्तिरुत्तरोत्तरम्
(काम शास्त्र ।

पद्मीनी, चित्रिणि, शंखिनी, आणि हस्तिनी, अशा चार प्रकारच्या स्त्रिया असतात. पद्मीनी सर्वोत्तम, चित्रिणी उत्तम, शंखिनी मध्यम आणि हस्तिनी अधम, असा उल्लेख आढळतो.

चत्वारः पुरुषा बृह्मन्नामानि च यथा क्रमम् ।
शशो मृगो वृषश्चैव चतुर्थस्तुरग स्तथा ॥

शश (ससा), मृग (हरण), वृष (बैल), अश्व (घोडा), असे, चार प्रकारचे पुरुष असतात. शश सर्वोत्तम, मृग उत्तम, वृष मध्यम, अश्व अधम, असे सांगितले आहे. पद्मिनी जातीच्या स्त्रीला शश जातीचा पुरुष, चित्रिणी जातीच्या स्त्रीला मृग जातीचा पुरुष, शंखिनी जातीच्या स्त्रीला वृषभ जातीचा पुरुष, हस्तिनी जातीच्या स्त्रीला अश्व जातीचा पुरुष, या प्रमाणे स्त्री पुरुष जातिचा क्रम योग्य आहे. म्हणून वधु वरांचे लक्षण जाणण्याच्या

क्रमामध्ये हे चार प्रकार कल्पिले आहेत. त्याची जाणीव होण्यासाठी सामुद्रिक शास्त्राची माहिती असणे अवश्यक आहे. मानवी जीवनाला नित्य संबंध असलेल्या ज्योतिषशास्त्राचा तिथी, वार, नक्षत्र, योग, आणि करण, ग्रह कुंडली, लग्न कुंडली या पासून होणाऱ्या भावी जीवनांतील सुख दुःखाचा विचार करणे वधु वरानां साध्य नाही.

वधु वर सगोत्रिय नसावेत कारण एका गोत्रांतलेच असता वधु वराचे रक्त परमाणू सजातीय होतात. कृषि शास्त्रामध्ये एका जातिच्या मातीमध्ये दुसऱ्या जातीची माती व खात मिसळले तर वनस्पती विपुल प्रमाणांत फलित होतात. त्याप्रमाणे वधु-वर भिन्न गोत्राचे असल्यास त्यांचे रक्त परमाणू विजातीय होत असल्यामुळे त्यांच्या पासून बलवान् संतती जन्म पावते. आणि वधु-वर सगोत्रिय झाल्यास एकाच वंशाचे म्हणवून बहिण भावाचे संबंध केल्यासारखे होतात.

या सर्व कारणा वरून धर्म क्षेत्रामध्ये वधु, वर, भिन्न गोत्री म्हणजे दुसऱ्या गोत्रांतलेच असावेत असे निर्धारित केले आहेत. या कारणास्तव सर्व मानवजीव आपल्या जन्म दिलेल्या आईच्या नावाने कर्म योग न चालविता बापाच्या नांवानें चालवीत असतात. तू कोणाचा मुलगा आहेस ? असे विचारल्यास तो बापाचा परिचय देतो. उदा – भूमींत अंबा, केळी, गहू, ज्वारी कोणत्याही वनस्पतीचे बीजारोपण केले असल्यास त्या बिजाच्या संस्कारा प्रमाणे भूमीचे परमाणू परिवर्तन पावून पत्र, पुष्प, फलरूपाने विकास पावतात., म्हणजे काळी, पांढरी, लाल, अशी कोणत्याही प्रकारची भूमी असली तरी आपल्या मूल स्थितीला विसरून वनस्पतीच्या रूपाने परिवर्तन पावते. त्या प्रमाणे

आई एकागोत्रा (वंश) ची असून दुसऱ्या गोत्रांत येऊन पितृ गोत्राचा संबंध तुटून तिचे पूर्वाश्रय निरसन होते. आणि आई मुलाची स्वामिनी असलीतरी ती पतीच्या अधीन असून पतीच्या स्वामित्वात तिचे स्वामित्व असते.स्त्री,भूमी असून पुरुष बीज असल्यामुळे व्यवहारांत बापाचे नावसांगण्याचा प्रघात सर्व मानवकुलांत आहे. आई-बापाचे अनुवंशिक संस्कार पवित्र असावेत. त्यांच्या अंगी रोग ऋजादि कोणतेही दोष नसावेत. आई बापा पासून आलेले अनुवंशिक रोग, भावीसंततीला बाधक होऊन, औषधोपचाराना सुद्धा असाध्य असतात. या सर्व कारणावरून विचार केला असता सुप्रजा निर्माणार्थ योग्य वधु–वराची योजना करण्यासाठी माता, पिता, बंधु, इष्टमित्र, आदि नित्य संबंधित व ज्योतिष, आयुर्वेद सामुद्रिकशास्त्र व व्यवहारात निपुण अशा सर्वांची अवश्यकता आहे.

माता पिता महो भ्राता माता माता महोऽपिवा ।
कन्यादाः स्यूः ऋम्येणै ते पूर्वा भावे परः परः ।।
अधिकारी यदा न स्यात्‌दाख्याय नृप स्यसा ।
तद्गीराथ स्वयं गम्यं कन्यापि वरये द्वरम् ।।

(चतुर्थोऽध्याय ब्रृहत्पाराशर स्मृति)

कन्या दानाचा अधिकार असलेले आई, बाप, आजा आजी, भाऊ या पैकी कोणीही नसल्यास अखेर राजाने त्या वधूला योग्य वराचा विचार करून कन्यादान करावे म्हणून आज्ञा केली आहे. या वरून वधुवरानी मात्र आपल्या मताने निश्चय करून घेण्याचा अधिकार नसल्याचे स्पष्ट होते.

ब्राह्मो दैवस्तथै वार्षः प्रजा पत्य स्तथा सुरः ।
गांधर्वो राक्षस श्चैव पैशाश्चाष्टमो धमः ।।

(मनुस्मृति ३-२०)

विवाहाचे ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, असुर, गांधर्व राक्षस आणि पैशाच असे आठ प्रकार आहेत.

ब्राह्म विवाह :– माता पिता आचार्य लोकाकडून आणि आयुर्वेद ज्योतिष, सामुद्रिक आदि शास्त्रानुसार परीक्षा पूर्वक योग्य वधू-वरांची योजना करून वेद विधीनुसार सालंकृत कन्या दान करण्यास ब्राह्म विवाह म्हणतात.

दैव विवाह :– यज्ञ याग पुण्य कर्मामध्ये पौरोहित्य कामासाठी आलेल्या तरुणाला त्याच्या आई बापाची आज्ञा न घेता वधूच्या बापाने सालंकृत कन्यादान पूर्वक लग्न करून देण्याला दैव विवाह म्हणतात.

प्राजापत्य विवाह :– याग शाळेच्या महासभेमध्ये, आकस्मिक पणे आलेल्या वधू वराने, आपण होऊन मान्य करून आई बापाची आज्ञा घेऊन त्या सभेत वधू वराकडून प्रतिज्ञा करवून कन्यादान पूर्वक लग्न करण्यास **प्राजापत्य** विवाह म्हणतात.

आर्ष विवाह :– वराकडून बैल, गाई, सोने, किंवा चांदी संपादन करून कन्यादान पूर्वक लग्न करून देण्यास आर्ष विवाह म्हणतात.

असुर विवाह :– वर, वधूच्या आई बापाला शुल्क देऊन लग्न करण्यास असुर विवाह म्हणतात.

गांधर्व विवाह :– वधू वरानी परस्पर आपण होऊन संयोग पावणे गांधर्व विवाह होय.

राक्षस विवाह :– वधूला वर बलात्कार पूर्वक आपले घरी नेऊन लग्न लावून घेण्यास **राक्षस** विवाह म्हणतात.

पिशाच्च विवाह :– निद्रेत असता अथवा सहजस्थितीमध्ये असता, देहाची विस्मृति असता कुमारिकेचे बलात्कार पूर्वक अपहरण करून आपल्या घरी ठेऊन घेणें **पिशाच्च** विवाह होय.

सारांश ब्राह्म विवाह हाच सर्वोत्तम आहे. दैव, प्राजापत्य, व आर्ष हे तिन मध्यम आहेत. असुर, गांधर्व, कनिष्ठ आहेत. राक्षस व पिशाच्च हे दोन्ही अती कनिष्ठ आहेत.

विवाह संस्कार अत्यंत महत्वाचा आहे. हा मनुष्य जातीचा एक स्वाभाविक नियम असून संयमतेच्या क्रमाचा बोध करणारे साधन आहे. विवाह स्त्री पुरुषाच्या दोन्ही आत्म्याचे परस्पर एकीकरण, दोन्ही अर्धांगाचे समीकरण आणि स्त्री पुरुषांच्या अपूर्णतेची पूर्ती करणारे मुख्य साधन आहे. स्त्री, पुरुषांच्या शरीर मंदिरांत असलेले दोन्ही आत्मे एक मेकाना आवाहन करीत असतात. आणि विवाह संस्काराने ते दोन्ही आत्मे परस्पर समरस पावतात. संसार यात्रा सुखमय आणि शांतिपूर्ण चालविण्यासाठी सनातन महर्षींनी विवाह संस्काराचा अविष्कार केला आहे.

ब्रह्मचारी, वानप्रस्थ, संन्यास या आश्रमांतील लोक गृहस्थाश्रमाचाच आश्रयकरून आहेत. असा, महत्व पूर्ण असलेला विवाह संस्कार वेद विधीनुसार होणेअवश्यक आहे.

बंधु, बांधव, इष्ट, मित्र, पुरवासीजन, आचार्य, पुरोहित, वादक, गायक, समग्र लोकांनां बोलाऊन, आणि परलोकांतील समस्त दैवतामध्ये अनुग्रह संपन्न असलेल्या, पंच आचार्यांना पंचवर्ण वस्त्रालंकृत पंच कलश स्थापून, पंचब्रह्म मंत्रपूर्वक आवाहन करून, पूजा करून महाआचार्यांच्या अधिपत्या खाली, मुलीचा बाप आपल्या पत्नीसह वराला बोलाऊन, अर्घ्य, पाद्य, आचमन द्रव्याने त्या वराचा सत्कार करतो. त्या नंतर कन्यादान संकल्प करताना बाप माझ्या कुलांतील सर्व लोकानां परमेश्वराचा अनुग्रह व्हावा, आणि माझ्या वंशाच्या मागच्या-

बारा पीढी व पुढच्या बारा पीढीच्या लोकांना पवित्र करण्या-साठी आणि माझ्या आत्म शुद्धीसाठी जगत्पितृ असलेल्या पार्वती परमेश्वराचा अनुग्रह व्हावा. असे म्हणून सर्व प्रमथगणामध्ये षोडश महादानांतर्गत असलेले कन्यादान करतो. आणि जलधारा पूर्वक महा संकल्प सांगतो. त्यानंतर वधूचा बाप आपल्या पत्नी सहीत उत्तराभिमुख उभा राहून आपल्या मुलीला ग्रहण करून खालील मंत्र म्हणतो.

कन्यां कनक संपन्नां कनकाभरणै र्युताम् ।
दास्यामि शंभवे तुभ्यं शिवलोक जिगीषिया ॥
विश्वंभराः सर्व भूतास्साक्षिण्य सर्व देवताः ।
इमां कन्यां प्रदास्यामि शंभोः प्रीति कराय च ॥

हे शंभो, कनका भरण भूषित असलेल्या मुलीला मी माझ्या शिव लोक प्राप्तीसाठी तुला अर्पण करतो. विश्वांत तूच व्यापून आहेस. व पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, सूर्य, चंद्र यांच्या व सर्व देवतांच्या साक्षीनें ईश्वराचा अनुग्रह व्हावा म्हणून कन्यादान करतो. मंत्र पठण करीत एका नवीन पात्रामध्ये वराच्या अंजलीत वधूची अंजली ठेऊन त्यात एक नारळ ठेवतो त्यानंतर सुवर्ण बिल्व सहित कलश तीर्थाची धार धरून वराला उद्देशून म्हणतो. "माझ्या कन्येचे रक्षण कर. तुमची पुण्य समृद्धी होवो. मन, प्रसन्न होवो, अरिष्ट निवारण होवो, दिर्घायुष्य प्राप्त होवो, निरंतर सत्कर्म घडो" असे सांगून ही कन्या संतानाभिवृद्धी-साठी तुम्हास दिली आहे. भाग्य संपन्न असलेल्या या मुलीचा आपण स्विकार करावा. त्यानंतर वर "ॐस्वस्ति" म्हणून वधूच्या उजव्या बाहूला स्पर्श करून. "**धर्म प्रजा सिध्यर्थम्**" या वधूचा मी स्वीकार करतो असे म्हणतो. त्या नंतर आचार्य वराला आज्ञा करतो.

"धर्में च, अर्थे च, कामे च नाति चरितव्या त्वयेयम्" प्रथम वाक्य :– "धर्मेच नाति चरितव्या त्वयेयम्" तू धर्मांत अतिक्रमानें वर्तन करू नको. अतिक्रमण होऊ लागल्यास धर्म पालनाचे कामी वधू असमर्थ होते. आणि जीवाचे अंतिम ध्येय अशा मोक्ष सुखाच्या प्राप्ती साठी वंचित होते. या धर्ममार्ग प्रवृत्त अशा वधूला बंधनात ठेऊ नको. स्वातंत्र्य असूदे. आई, बाप, गुरू आदि पूज्य लोकांच्या सेवेत ती असल्या वेळी, तू तिच्या कडून सेवा घेऊ नको. आकस्मिक पणे तुझ्या घराला कोणी पूज्य अतिथी आल्यास त्यांची सेवा सन्मान करण्यामध्ये तू वंचना करू-नको. आणि तिच्या सेवेत अडथळा आणूनको. पूजा जपादि पुण्य कर्मानुष्ठानाच्या नित्य व्रतामध्ये तिला सहयोग दे. सोमवार, प्रदोष, एकादश आदि नैमित्तीक व्रतामध्ये तिनें असताना भोगाची अपेक्षा करूनको. तिच्या व्रतानुष्ठानपूर्तीनंतर अवशेष काल तुझ्या भोगासाठी आहे. ती दैवत व्रताचरणांत असताना पूज्य भावनेने पहा. व सहधर्मी होऊन वाग. तू पुण्य कर्म करीत असता एकट्याने न करता तिला बरोबरघेऊन कर. आणि तिला ज्ञानोदय होऊन विषयसुखामध्ये वैराग्य प्राप्त झाल्यास व संसार नको वाटल्यास पति म्हणून स्पर्श करू नको.

दुसरे वक्य :– "अर्थेच नाति चरितव्या त्वयेयम्" संपत्तीमध्ये अति क्रमाने वागू नको. धन कनकादि सर्व वस्तू माझ्या आहेत अशी भावना करून आई, बाप, गुरु आदि पूज्य लोकांच्या सेवा, सत्कारामध्ये वंचना करूनको. तुझ्या सहधर्मी-णीच्या संगोपनासाठी वंचना आणु नको. मद्यपानादि दुर्व्यसना-मध्ये व हिंसादिक पापकर्मामध्ये धनाचा उपयोग करू नको. विद्या दान, अन्नदानादि सत्कर्मात व पुण्य कर्मात त्या धनाचा उपयोगकर.

आणि अन्न वस्त्रादि भोग वस्तू तू एकटाच सेवन न करता तिला बरोबर घेऊन सेवन कर. तू भोजन, शयन व वस्त्र या सर्व भोगामध्ये समानता ठेव. तुझी संपादित संपत्ती तिच्या स्वाधीन ठेव. तुझ्या अवश्यकतेनुसार तिच्या पासून घे. तिच्या सह सर्वभोगवस्तूचा उपभोग घे.

तिसरे वाक्य :– **"कामे च नाति चरितव्या त्वयेयम्"** काम विषयांत अतिक्रमण पूर्वक वागू नको. या वधू विषयी वंचना करून पर स्त्रीच्या भोगाची अभिलाषा करूनको. एक पत्नी व्रताचे पालन कर. संतती निर्मितीसाठी अवश्यक भोगविषय सेवन कर. रोगामध्ये, ऋतुकाली, गर्भिणी असता व्रतउपासना व उपवासामध्ये प्रातः सायं संध्याकाली भोगापेक्षेने पत्नीला शिवू नको. विषय सेवन हेच अंतिम ध्येय न समजता भोगामध्ये संयमित होऊन राहा. अशी आचार्य आज्ञा करतात. वर त्याचे उत्तरात **"धर्मेच नाति चरामी"** मी धर्मात तिच्यावर अतिक्रमण करून वागणार नाही. **"अर्थेच नाति चरामी"** धन संपदे विषयी वधूशी अतिक्रमाने वागणार नाही. **"कामेच नाति चरामी"** विषय भोगांत तिच्या विषयी वंचनाकरून परस्त्री प्रमाद मी करणार नाही. एक पत्नीव्रतस्थ होऊन राहीन. या तीन नियमाने वचन बद्ध होऊन प्रतिज्ञा पूर्वक आत्म साक्षीने, ईश्वर साक्षीने गुरुसाक्षीने, मातृ पितृ साक्षीने, धर्म साक्षीने, सूर्य चंद्र साक्षीने व सभा साक्षीने या वधूचे दान स्वीकार करतो. या नंतर आचार्य वधूला अज्ञा करतात तुझ्या पित्यानें तुला या वरास दान केले आहे. या नंतर वधूनें उत्तरात आत्मसाक्षीनें, ईश्वर साक्षीने, गुरु साक्षीने मी या पतीस काया, वाचा, मनाने त्रिकरण पूर्वक समर्पितझाले असून सह धर्म चारिणी होऊन पतीव्रतेचे आमरण पालन करीन असे प्रतिज्ञा पूर्वक सांगते.

वधूचे आई, बाप, वर आपल्या पेक्षा वयाने लहान असला तरी त्या दानघेणाऱ्यास अतिथी देव समजून नमस्कार करतात. विवाह मंडपाच्या महा सभेत जमलेल्या सर्व स्त्री पुरुषा कडून व आचार्याकडून मंगल सूत्राला हस्तस्पर्श करवून सर्वांची आज्ञा घेवून वराच्या हातानें वधूच्या कंठामध्ये ते मंगल सूत्र बांधतात. तेंव्हा शुभ लग्न सावधान म्हणून सर्वांनी मंगलाष्टका द्वारे मंत्राक्षता पूर्वक आशिर्वाद करीत असतात. त्यानंतर वर वधूच्या पुढे उभाराहून ईश्वराची प्रार्थना करीत आपल्या उजव्या हाताने वधुचा उजवा हात अश्व मुद्रेने धरून तिला उठऊन उभा करतो. हा पाणी ग्रहण विधी होय. येथे काया, वाचा, मन या तीन प्रकारचा विवाह विधी संपला. विवाह संस्कारांतर्गत अनेक उपविधी आहेत. त्याचा विस्तार करण्यास अवकाश नाही.

विवाह **विधीचा सारांश :–** अन्नदान, जलदान, भूदान, गृहदान, गोदान, अश्वदान, गजदान, वृषभदान, रजतदान, सुवर्णदान, रत्न-दान, व वस्त्रदान, या अनेक दानकर्मामध्ये, दान देणारा दान घेणारा, आणि दान वस्तू ह्या तीन मुख्य आहेत. दात्याने दानदिल्या नंतर त्या दिलेल्या वस्तूवर त्याचे स्वामित्व राहात नसते. दान स्वीकारलेल्या व्यक्तीच्या स्वामित्वांत ती वस्तू येत असते. त्याचा सदुपयोग अथवा दुरुपयोग करण्यास तो अधिकारी आहे. गो, अश्व, आदि वस्तू चैतन्य जीव असल्यातरी ज्ञानहीन असल्यामुळे जड आहेत. या सर्व वस्तू कोणत्याही एका व्यक्तीच्या स्वामि-त्वांत राहणे त्यांचा स्वाभाविक धर्म आहे. पुण्य प्राप्तीसाठी दात्याचे दानकर्म असल्यामुळे दिलेल्या वस्तू विषयी निरपेक्ष भावनेत स्वामित्वाच्या अहं भावनेचा त्याग केल्यामुळे त्या वस्तू-वर दात्याचा कांहीच अधिकार नसतो. हे बिन शर्त दान होय.

कन्या दानामध्ये मात्र तसे नसून आई बापाचे मुली-वरील स्वामित्व नाहिसे होत नाही. वधू ही इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीने संपन्न असल्यामुळे पुरुषासमान चैतन्य जीवी आहे. वधू ही मूल्याने प्राप्त होणारी वस्तू नव्हे. साधु, सत्पुरुष, योगीभोगी, कला कोविद, धीर वीर, राजा महाराजादि सर्व आईच्या उदरा पासूनच या भूमीवर अवतीर्ण पावले आहेत. स्त्री ही पूज्य असून अमूल्य असल्यामुळे दुसऱ्यानां दान दिलीअसलीतरी तिच्या कर्तृत्व शक्तीला आणि तिच्या व्यक्ती स्वातंत्र्याला बाधा येऊ नये म्हणून तिची जीवन यात्रा सदैव सुखमय चालावी असा वधूच्या बापाने विचार करून आपले आशाश्वत जीवन गमावून गेले तरी आपल्या पश्चात त्या मुलीच्या सुख समृद्धीची अपेक्षा करणारे अनेक लोक तिचे अधिपती व्हावे आणि तिने आपले संरक्षण करून घेण्याच्या कामी ती असमर्थ असल्याने इह लोकां-तील आचार्यादि समस्त वरिष्ठ लोकानी तिचे पालक होऊन राहावे म्हणून इच्छा बाळगून, सर्वांच्या साक्षित्वामध्यें धर्म शास-नाच्या अधीन राहण्यासाठी व तीन नियमाचे बंधन घालून कन्यादान होते. वधूला ग्रहण करणारा, वर तिचा पती असला तरी तीन नियमाने बांधला गेल्यामुळे त्याला आपल्या स्वामित्वाचा उपयोग करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य नसते. एका पक्षाने वराकडून त्या वरील तीन नियमाचे उल्लंघन झाल्यास त्याच्या पतिपदाला गौणत्व प्राप्त होऊन धर्म शासनाकडून अपराधी म्हणविला जातो आई, बाप, गुरु, आदि समस्त लोक त्या संबंधी विचार करण्या-साठी अधिकार असणारे आहेत. पतिपदा पासून भ्रष्ट होणे म्हणजे दांपत्य जीवनाचा घटस्फोट असा अर्थ होतो, हे सशर्त दान आहे.

सूक्ष्म सृष्टीच्या प्रमथ लोकांत वास करून असलेले पंच आचार्य हे गुरु दैवतांचे पाच रंगाचे वस्त्रांलंकार आहेत. त्या गुरु देवतांचे दर्शक शुभचिन्ह अलंकार कल्पून वधूच्या अंगावर हिरवे काकण, पांढरे जोडवे, तांबडे कुंकुम, पिवळे मंगल सूत्र, निळे मणी, असे पाच प्रकारचे सौभाग्य चिन्ह उपयोगी कर–ण्याचा प्रकार समाजामध्ये प्रत्यक्ष चालू आहे.

लग्न कार्यामध्ये मंगलसूत्र व जोडवी हे आलंकार धारण करतात. अबला असलेली वधू आपल्या पतिला संर्मपित होऊन बलवती झाली.आपण पतीला सर्मपित झालो म्हणून पातिव्रत्याचा भाव तिच्या मनात सदैव वास करून राहावा. या उद्देशासाठी मंगल सूत्र प्रतिज्ञा वाचक आहे. आणि ही कुमारी आहे. की ? सधवा आहे की ? विधवा आहे. असे जाणून घ्यावयाचे असल्यास. तिच्या पायांतील जोडवी पाहून ही सधवा आहे. मुखावरील नथ व कुंकुम पाहून ही सधवा पतीआधीनआहे. केवल कुंकुमच असल्यास कुमारी आहे. या पैकी कोणते ही नसल्यास विधवा आहे असे ओळखता येते.

लग्न लावताना मंगलाष्टकें म्हणते वेळी संसार समुद्र सुख दुःख रूपाने अपार आहे. पुत्र, दारा, धन, या तीन वंधनात सापडून भोग सुखाच्या आशेने पापकर्मामध्ये प्रवृत्त होण्याची भीती आहे. यासाठी विषरूप हा भोग संसार मिथ्या आहे. नश्वर आहे. असे जाणून उभय दंपत्तीनो विचार पूर्वक वागावे. सावधान म्हणजे जागे व्हा असे सर्व लोक आज्ञा वाचक संदेश देतात.

मानवाच्या बाल्य जीवन कालांत बारा वर्षापर्यंत ब्रह्म-चर्य स्वाभाविक पणे आहेच. तारूण्यांत स्त्री पुरुषाना प्रणय भावाचा विकास होतो. मानवाच्या अंतरात असलेले स्त्री पुरुष

नैसर्गिकभाव बहिर्सृष्टीमध्ये परस्पर पति पत्नी होण्यासाठी धर्म संस्थेची आज्ञा संपादन करणे म्हणजेच विवाह संस्कार होय

– विषय सुख विमर्श –

स्त्री पुरुषाचे परस्पर प्रेम विशेष आकर्षण करणारे असते. विषय संस्काराचे आवरण भावनेवर विशेष होत असते, कान, डोळे, नाक, जीभ व चर्म या पाच ज्ञानेंद्रियाद्वारे मन सुख दुःखास ग्रहण करीत असते. एका वस्तू पासून एकाच इंद्रियाला सुखाचा अनुभव होतो. नेत्राला रूपानंद आहे. जिभेला रसानंद आहे. नाकाला गंधानंद आहे. कानाला नादानंद आहे. असे या इंद्रियांचे वैशिष्टच आहे. दुसऱ्या इंद्रियाचा सुखानुभव घेण्यास ते असमर्थ असतात. कर्ण (कान) नेत्र (डोळे) घ्राण (नाक) रसना (जीभ) हे चार ज्ञानेंद्रिय शरिराच्या एकेका विशिष्टस्थानी असून त्वगेंद्रिया (चर्म) चा स्पर्शधर्म सर्वांगामध्ये आत बाहेर व्यापक असतो. मल मूत्र कोषांतील स्पर्श ज्ञानाने मलाची विसर्जन क्रिया जाणवते. जठराग्नींतील तहान भूकेची जाणीव स्पर्श ज्ञानानें होते. कठिण किंवा मृदु, शीत किंवा उष्ण जाणणारा स्पर्श धर्म सर्वांगामध्ये पूर्ण व्यापून आहे. दुःख, व्याधी आदि त्वचेच्या स्पर्श ज्ञानाने जाणवतात. त्वगेंद्रियामध्ये चार ज्ञानेंद्रिय व सर्व कर्मेंद्रिय आश्रय पावून आहेत. स्त्री पुरूषांचे परस्पर रूपसौंदर्य नेत्राला, चुंबन रसनेला, प्रेमालाप कानाला, गंध घ्राणाला, गुह्येंद्रियाचे स्पर्शसुख मात्र सर्वांगाला आनंदित करणारे आहे. शरीराच्या कोणत्याही भागाला शिवले तरी त्वचेचा स्पर्शानंद होतो. आणि वात्सल्य भावनेत हातानें मुलाला स्पर्श करणें, मुखाने चुंबन घेणें, अंगाला कवटाळून धरणे ही सर्व स्पर्शानंद सुखे होत. स्त्री पुरुषाना प्रणय भावनेत पाहाणें, आलिंगन देणें, संभोग करणें, आदि सर्व क्रियेत

त्वगेंद्रिय स्पर्श सुखच सर्वांगामध्ये व्यापून असल्याचे सिद्ध होतें. स्त्री पुरुषांच्या स्पर्शानंदामध्ये मानवाची उत्पत्ती आहे. यावरून स्पर्श धर्म सर्व श्रेष्ठ असल्याचे प्रत्यक्ष आहे.

"कुरंग मातंग पतंग भृंगा मीना हताः पंचभिरेव पंच'

हरणाला कर्णेंद्रिय, हत्तीला चर्मेंद्रिय, पतंगाला नेत्रेंद्रिय, भ्रमराला घ्राणेंद्रिय, मत्स्याला रसनेंद्रिय, असे एकेका प्राण्याला एकेकच ज्ञानेंद्रिय प्रबल असून त्याच्या विषय सुखांत ते आधीन होऊन मरतात. मात्र पंच ज्ञानेंद्रिय प्रबल असले तरी त्वगेंद्रिय स्पर्शाचे विषय सुख सर्वांत श्रेष्ठ आहे. स्त्री, पुरुषांच्या मनात प्रणय प्रेमाचा उदय होऊन संभोग सुखामध्ये सर्वांगाला आनंद होतो. गुह्येंद्रिय स्पर्श सुखाच्या योगाने अत्यानंद होऊन वीर्य पतन झाल्यानंतर प्रणय प्रेमाचा अभाव होतो. शरीराच्या सर्व भागा मध्ये कण कण रूपाने व्यापून असलेले घन वीर्य त्वगेंद्रिय स्पर्शानंदातील कामाग्नीने तापून द्रवून अधोरेत होऊन पतन पावते.

स्वप्नामधील संभोग क्रिया मनोमय असली तरी त्यापासून वीर्य प्रत्यक्ष पतन पावते. याचे कारण म्हणजे कामादि विकार मनोजन्य आहेत. मनात विषय उत्थान पावताच त्याची क्रिया शरीराच्या इंद्रियामध्ये प्रचेतन होते. स्वप्नांत होणारे स्त्री-संभोग सुख केवळ मनोगत आहे. आणि सूक्ष्म शरीरही मनोमय आहे. त्या मनाची क्रिया स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन्ही शरीरा मध्ये व्यापक आहे. त्याप्रमाणे चर्मेंद्रियसुद्धा सर्व अवयवांना आश्रय देऊन त्याचा स्पर्श आत बाहेर व्यापून आहे. मनांत प्रणय भाव उत्पन्न होत असल्यामुळे ते चर्मेंद्रिय स्पर्श धर्मामध्ये व्यापून चर्माचे अंतर्भूत असलेले वीर्य कण कामाग्नीने तापून द्रवून पतन पावतात. स्वप्नांतील संभोगसुख मनोमय असले तरी वीर्य

पतनाला चर्मेंद्रियाचा व्यापक स्पर्श धर्मच कारण आहे.

मानसिक श्रमामध्ये "ओज" सत्वाचा विशेष व्यय होतो. शिक्षक, गायक, लेखक, विद्यार्थी, आध्यापक, बोधक, आदि बुद्धी जीवी लोकांत शारीरिक बल कमी असते. कृषिक, श्रमिक, सेवक कर्मचारी आदि श्रम जीवी लोकांत "ओज" सत्वचा अल्प व्यय होत असल्यामुळे, त्यांच्यांत शरीरबल विशेष असते. जाग्रत स्वप्न या दोन्ही अवस्थेमध्ये मनाची क्रिया ओजा पासून चालत असते. वीर्य अधो वाहिनी होऊन संतती प्रदानाला सहाय्यक होते. तेच संय्यमाने राहिल्यास उर्ध्व वाहिनी होऊन ओज रूपांत परिवर्तन पाऊन मननात्मक क्रियेला सहायक होते.

पशू पक्ष्यामध्ये कर्तृत्वशक्ती जाग्रत् नसून ते ज्ञान हीन असल्यामुळे प्राकृतिक बंधनाने उर्ध्व रेत आहेत. ऋतु माना-प्रमाणें विषय भोगांत अधो रेत होतात. पशूने तृण पर्णाचा आहार कीतीही सेवन केला तरी त्याना अपचन होत नाही. पशू पक्षी, अहारामध्ये व विषय भोगामध्ये प्राकृतिक नियमानुसार संयम-शील आहेत. परंतू मानवाला आहारामध्ये व प्रजोत्पादनामध्ये सर्व प्राण्याप्रमाणे प्राकृतिक बंधन नसून त्यांच्या अंगी कर्तृत्व शक्ती स्वतंत्र असल्यामुळे त्यांची सर्व क्रिया मनाधीन आहे. अहार अती सेवन केल्यास अपचन होते. हा ज्ञानाने मितहारी होऊन न राहिल्यास आरोग्य बिघडते. यासाठी विषय सेवना-मध्यें ज्ञान क्रियेने संयमित होऊन राहणे मनोमय प्राकृतिक बंधन आहे. यासाठी मानवाला विषय संयमतेचे शिक्षण पाहिजे. स्त्रीला स्त्रीने व पुरुषाला पुरुषाने पाहिल्याने प्रणय भाव उद्भवत नाहीत याचे कारण सजातीय आहेत. स्त्री, पुरुष, हे दोन्ही विजातीय असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी प्रणय भाव उदय पावतो. मानसिक

स्वास्थ्य व संयम राखण्यासाठी, सत्संग, ईश्वरोपासना, सदुपदेश, सत्सेवा, एकांतवास, सत्शास्त्रश्रवण, व सात्विक आहार यांची अवश्यकता आहे. मानव ज्ञानाने संयमित होऊन न राहिल्यास त्यांचे जीवन पशूपेक्षा ही खालच्या स्थितीचे होते यात संदेह नाही. संय्यम मानवाला स्वाभाविक आहे. संभोगांती हे पुरे असे वाटणें पुरुषाला प्राकृतिक बंधन आहे. अती विषय सेवन केले असता. इंद्रियामध्ये दुर्बलता प्राप्त होऊन क्षय, पंडू, उपदंश, प्रमेह, आदि रोग संभवतात. असंयम आयुर्बलाच्या नाशाला कारण आहे. संयम त्याच्या वृद्धीला कारण आहे.

मनुष्याचे आयुर्प्रमाण इतके वर्ष, इतके महिने, इतके दिवस असे निश्चित नसते. प्रत्येक जीवाच्या कर्मानुसार श्वासोच्छ्वास सेवन करण्याच्या प्रमाणावरून त्याच्या आयुष्याचा निर्णय होतो. अखंड चालणाऱ्या पूरक (श्वास घेणे) रेचक (श्वास सोडणे) श्वासोच्छ्वासाच्या पूरकामध्ये "सो" असा व रेचकामध्ये "हं" असा नादोच्चार होतो. "सो" मधील सकार काढल्यास "ओ" शिल्लक राहातो. "ह" मधून "ह" कार काढल्यास "०" अनुस्वार शिल्लक राहातो. शेष राहिलेला "ओ" आणि अनुस्वार ह्या दोन्हीच्या संगमामध्ये "ॐ" काराची उत्पत्ती होते. जप न करता आपण होऊनच अहो रात्र जप चालत असल्यामुळे या "सोहं" जपाला अजप जप म्हणतात.

हंस रूपं परात्मानं सोहं भावेन भावयेत् ।
तेदकतानता सिद्धिः समाधिः परमोमतः ॥

(सि. शि शिवयोग समाधिस्थल)

"सोहं" याचा पदच्छेद करता "सः" अहं" असा होतो. "सः" म्हणजे तो परशिवब्रह्मच आणि "अहं" म्हणजे

मी असा बोध करणारा "सोहं" जप परशिवब्रह्मच मी आहे असा याचा अर्थ होतो.

जप म्हणजे श्वासोच्छ्वास मनुष्याने श्वासोच्छ्वासाद्वारे प्राण वायू आपल्या नासिका पासून बारा अंगुल प्रमाणात दीर्घ वाहून रेचक पूरक मिळवून एक श्वासोच्छ्वास होतो. हे श्वासोच्छ्वास चोवीस तासाच्या एका दिवसात (२१६००) एकवीस हजार सहाशे वेळा चालतात. असे अनेक प्राचीन ग्रंथामध्ये त्याचे वर्णन केले आहे. त्या मानाने एका निमिषाला (१५) पंधरा श्वासोच्छ्वास होतात.

या वर्तनमान काळांतील मानवाच्या प्रकृतिमानाचा विचार केला असता. सर्व सामान्य पणें एका निमिषात (१८) आठरा श्वासोच्छ्वास होतात. या हिशेबाने एका दिवसाला (२५९२०) पंचवीस हजार नऊशे वीस होतात. या मानानेपूर्वी पेक्षा एक दिवसात (४३२०) चार हजार तीनशे वीस जास्त श्वासोच्छ्वास होतात. यावरून मानवाच्या शंभरवर्षाच्या आयुष्यामध्ये सोळा वर्षे आठ महिने आयुष्य घटत आहे. हे विवरण उत्तम प्रकृतिच्या मनुष्याचे आहें. मात्र दैनंदिन स्त्री पुरुषाच्या भोगामध्ये, रोगामध्ये, क्रोधामध्ये, चिंतेमध्ये, अती आहारामध्ये मनाच्या उद्वेगामध्ये, भयामध्ये, व निद्रेमध्ये, सर्व साधारण नियमा विरुद्ध श्वासोच्छ्वास जास्त होतात. या सर्व विशेष कारणामुळे वर्तमान काळी मानवाचे आयुष्य जास्त प्रमाणांत घटून क्षीण होत आहे. मानवाच्या श्वासोच्छ्वासाच्या क्रियेमध्ये पूरक व रेचक दोन्ही क्रिया स्वाभाविकपणे सदा चालत असतात. यांतील पूरक वायू दीर्घ काल रोखण्याला "कुंभक" म्हणतात. कुंभकामध्ये वायू नियमन केल्यानें प्राणाचे नियमन होते.

वायुतत्व व प्राण तत्व हे दोन्ही निकट संबंधी असल्यामुळे वायूचे नियमन म्हणजे प्राणाचे नियमन असा बोध होतो. मनुष्याच्या श्वासोच्छ्वास क्रिया बंद झाल्यास एका निमिषार्धांत प्राणाचे विसर्जन होते. यावरून प्राण हा वायुच्या आधीन असल्याचे प्रत्यक्ष आहे. पूरक व रेचक विधीने कुंभकामध्ये वायू संग्रह करून प्राणाचे नियमन करणे हा प्राणायाम विधी होय. एक निमिष कुंभकामध्ये आठरा श्वासोच्छ्वास एक तास कुंभकामध्ये दहाशे ऐंशी (१०८०) श्वासोच्छ्वास शिल्लक राहातात. रेचक पूरका पासून खर्च होणाऱ्या वायूला, रोखून कुंभक रूपांत संग्रह करणाऱ्या आयुष्याच्या मितव्ययाला आयुर्वृद्धी म्हणून सांगण्यात येते. दीर्घ काल कुंभकामध्ये वायु अडवून धरण्याने अपान वायूचे उत्थान होते. त्याद्वारे प्राणाचे नियमन होऊन चित्तावरील वृत्तीलीन पाऊन समाधी प्राप्त होते. योग समाधीत असल्यावेळी श्वासोच्छ्वास रक्त प्रवाह व मनाच्या सर्व क्रिया थांबतात. याचे कारण हे शरीर प्राणाधीन होऊन राहते. योग समाधीच्या कालावधी पर्यंत संग्रह होऊन राहिलेले श्वासोच्छ्वास पुढच्या भोगासाठी आयुष्य रूपामध्ये शिल्लक राहतात. या आयुष्याच्या संग्रह क्रमाला आयुर्वृद्धी म्हणतात.

स्त्री पुरुषाच्या स्पर्शानंदाचा उद्रेक होऊन सर्वांगामध्ये कामाग्नी व्यापून हृदय क्रियेचे स्पंदन जास्त होते. त्यामुळे श्वासाची क्रीया अतिवेगाने चालून श्वासोच्छ्वास जास्त खर्च होतात. कामाग्नीच्या तापाने वीर्य कण द्रऊन अधोवाहीनी होतात. यासाठी अतिमैथुनामध्ये आयुष्य आणि बल कमी होते. वीर्य, रजकण आत विरघळून अप्रत्यक्ष पणे नाश पावून आयुष्य क्षीण होते. योगाचे अंग असलेले पद्मासन, सिद्धासन, मयुरासन,

आदि अनेक आसने, व षण्मुखी, शांभवीमुद्रा, बंध वेद, धौती आदि षट्कर्म, सूर्य नमस्कार व्यायामादि शारिरीक श्रमामध्ये श्वासोच्छ्वास क्रिया अतिवेगाने चालत असली तरी मनाची प्रवृत्ति मात्र प्रशांत असते. वायूच्या विशेष दावाने वायूकोष अवकाश पावून विशाल होतो. विशेष परिश्रमाने श्वास कोषामधील वायु अवरोध केल्याने शक्ती निर्माण होत असल्यामुळे आयुर्वृद्धी होते. मनुष्याला प्रत्याहाराची अवश्यकता आहे. प्रत्याहार म्हणजे प्रति दिवसाच्या अहारामध्ये बदल होत गेल्यास पचन क्रियेमध्ये मल-शुद्धीमध्ये विविधता येते. हे साधक लोकांना योग्य नाही. एक स्वतंत्र आहार कल्पून रोज नियमित रूपाने सेवन करण्यामध्ये एक भाग अन्न, दोन भाग पाणी आणि एक भाग वायु सेवनासाठी पोटात अवकाश ठेवणें याला प्रत्याहार म्हणतात. धान्य, फल, मूल, दूध, तूप, मध हा उत्तम आहार आहे. तिखट मीठ, आंबट तळीव पदार्थ हा कनिष्ठ आहार आहे. यांच्या सेवनाने प्रकृती मध्ये उष्णता वाढते. वीर्य रक्षणामध्ये कांही अंशाने बाधा होते. मांस, मद्य, आदि निकृष्ट आहार असून त्याच्या सेवनाने आयुष्य क्षीण होते. हे सर्वथा त्याज्य आहे. शुद्ध आहार सेवन केल्या पासून शुद्ध रज वीर्याची उत्पत्ती होते. दांपत्य प्रेम नियमित विषय सेवन पूर्वक सुप्रजा निर्मितीसाठी आहे. म्हणून हे सर्व साधारण मानवाला समजत नाही. इतकेच नव्हे संतती ज्यास्त होत गेल्याने आपल्या विषय भोगासाठी अडचण होते. आणि त्यांचे लालन पालन करण्याचा संसार भार ज्यास्त वाढतो. असे कल्पून औषध व शस्त्रक्रिया आदि अनेक अनैसर्गिक साधनाच्या कृत्रिम योजना अस्तित्वात आल्या आहेत. मानवाचे अंतिम साध्य म्हणजे संय्यम प्राप्त करावयाचा आहे. कृत्रिम योजनाद्वारे

संतती नियमन करण्याने दांपत्य जीवनांतील स्त्री–पुरुषानां आरोग्य दृष्टचा अपाय कारक आहे. कृत्रिम साधनां बरोबर संभोग सुख घेण्याने गुह्येंद्रियामध्ये रज विर्याचा स्पर्श होत नाही या पासून उष्णता वाढून रुक्षता येते. विशेषतः स्त्रीयानां अनेक प्रकारचे रोग होतात. आणि पुरुषानां शस्त्रक्रिया केल्याने केवळ स्पर्श सुखापुरताच त्याचा उपयोग होतो. या कृत्रिम योजनामध्ये वीर्यबीजाणूमध्ये गर्भ धारणेची कार्यक्षमता राहात नाही. त्या दुर्बल वीर्य बीजाणु पुर्णांशाने "**ओज**" सत्व निर्माण होणार नाही. मानवाचा ज्ञान भांडार असलेल्या मस्तकाला "**ओज सत्व**" न लाभल्यास सत्व प्रधान गुण असलेला संयम, शांती व समाधान, विचार पूर्वक वागणारी कार्यक्षमता मनामध्ये राहत नाही. "ओज सत्वाचा" अभाव होऊन बुद्धीची शक्ती जड होते. "**ओज**" प्राण भावाचा सूक्ष्म तत्वांश आहे. ओज कमी असलेल्या मानवाची ज्ञान शक्ती जड होऊन काम क्रोधापासून तो असंयमी होतो. प्रजा जास्त होऊन अन्नवस्त्राच्या अभावामुळे राष्ट्रामध्ये दारिद्रच जास्त वाढते. या भीतीने कृत्रिम योजना उपलब्ध झाली आहे.

पुण्यमय संतती कितीही जन्म पावली तरी भू मातेला भार होत नाही, अल्प श्रम, अल्प भूमीमध्ये सर्व ऋतुमान अभिमुख होऊन अन्नौषधी फल मूलादि सर्व वस्तू विशेष प्रमाणांत देऊन संरक्षण करते. राष्ट्रामध्ये प्रजाजन जास्त झाल्यास त्या दारिद्रयाला नाहीसे करण्याचे सामर्थ्य मानवांत नाही. एका भागाची पूर्ती करण्यामध्ये दुसऱ्या एका भागांत अपूर्ति होणार असल्यामुळे या दारिद्रयाच्या प्रखर तापाला थांबविणे शक्य नाही. दारिद्रयाचा मूलोच्छेद होण्यासाठी राष्ट्रातील प्रजेच्या अंगी प्राण भाव परिशुद्ध करणाऱ्या पुण्य कर्मानुष्ठानाची क्रिया

पाहिजे. विपुल संतती देणाऱ्या प्रकृतीला राष्ट्रांतील प्रजा संतती नको व अति संतती नको. अशा सर्व मानवाच्या सामूहिक अपेक्षा प्राण व भावाच्या सूक्ष्म सृष्टी मध्ये व्यापून संग्रह होतो. ते संकल्प कांही कालानंतर भविष्य काली निःसंतान मूलक राष्ट्रात प्रजेचा अभाव होऊन संतती पाहिजे म्हणून पुनः वृत्ताकार रूपाने ती इच्छा फिरत असते. वीर्याचा उपयोग प्रजोत्पादनास झाल्यास मानव जन्मास येणाऱ्या जीवांना देह दान केल्याचे श्रेय लाभते. अथवा नैष्ठिक ब्रह्मचर्याचे पालन केल्यास पुण्य कर्म असलेल्या राष्ट्राची सेवा आणि पूजा जप ध्यानानुष्ठान अनुसंधाना-साठी वीर्य ऊर्ध्व रेत होऊन सूक्ष्म ओजाच्या रूपामध्ये उपयोगी पडते. संयम हा जड जीवांच्या दृष्टीला गोचर होणारा नव्हे ज्ञानी लोकांच्या भावनेला जाणवणारा आहे. ही संयम शक्ती जड अशा शस्त्र सामर्थ्यात सापडून छेद्य, भेद्य होणारी नाही. अनंत जीवात्म्याच्या भावनेला आपल्याकडे ओढून सन्मार्गाला ती प्रवृत्त करणारी आहे.

पुरुष अन्य स्त्रीया विषयी मातृ भावनेत आचरण करणें आणि स्त्रीयानी अन्य पुरुषाविषयी पितृ भावनेत वर्तन करणें हे गृहस्थ ब्रह्मचर्याचे आद्य कर्तव्य आहे. जड मती असलेल्या दांपत्याना अज्ञान मूलक संयम लाभत नाही. त्याकरीता त्यांच्या उन्नतीसाठी विषय सेवनामध्ये मनसोक्त वर्तन न करता मित होऊन आचरण करावें म्हणून सांगितले आहे. कारण हा संसार निःसार आहे. आत्मा व अनात्मा यांचा विचार पूर्वक ब्रह्मानु-संधान तत्पर व्हावे. हे ब्रह्मचर्याचे अंतिमलक्ष्य आहे.

यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राऽफलाक्रियाः ।। (मनुस्मृति)

ज्या घरांत व ज्या राष्ट्रांत स्त्रीयांचा पूज्य भावनेने आदर सत्कार केला जातो तेथे सर्व देवता निवास करतात. आणि तेथेच दैवी गुणसंपन्न सत्पुत्र सुकन्या जन्मास येतात. ज्या राष्ट्रामध्ये स्त्रीयांचा सन्मान होत नाही त्या राष्ट्रात दुःखित स्त्रीयांचे उदरी दुराचारी कुलघ्नप्रजेची उत्पत्ती होते. पतीने आपल्या पत्नीला सह धर्मिणी आहे असे न समजता दास्यत्व भावनेत पाहून अनादर पूर्वक मी मालक आहे असे समजून अनेक विध पीडा करून मन दुखविणे, तिरस्कृत भावनेनें कठोर वाणीचा उपयोग करणे, तिच्या माहेरच्या आई, बाप, बंधु, बांधवाच्या संबंधाने निंद्य वचन बोलणे, हे सर्व दुष्ट दुराचारी गृहस्थांचे लक्षण आहे. कांही लोक स्त्रीयानां शूद्र व नीच समजून त्यांच्या पूज्यत्वाला गौणत्व आणीत असतात. स्त्री ही अपूज्य असती तर तिच्या पासून जन्म पावलेली समस्त संतती ही अपूज्य आहे असे म्हणावे लागेल. स्त्री ही आपल्या घराची गृह स्वामीनी असून पतीला सहधर्म चारीणी आहे. आणि राष्ट्राला माता होऊन संरक्षण करते. स्त्रीयांना पतिव्रत प्राधान्य असल्याप्रमाणे पुरुषाना पत्नीव्रत प्राधान्य आहे. पति पत्नी यांचे दोन्ही व्रत समान कक्षेतले आहेत. स्त्री ही पति आधीन होऊन पातिव्रत्याचे पालन करावे म्हणून अनेक ग्रंथामध्ये सांगितले आहे. परंतू पतीने पत्नी व्रतस्थ असावे म्हणून विवाह विधीच्या मंत्रार्थामध्ये दिसून आले तरी इतर कोणत्याही ग्रंथामध्ये सांगितलेले नाही. हे मत पंथीय कालांतील पुरुष समाजाचे अतिक्रमण आहे असे म्हणावे लागेल. धान्योंत्पादनाला भूमी व बीज हे दोन्ही परिशुद्ध असावी लागतात. त्याविना वनस्पति सुफलित होणार नाहीत त्याप्रमाणे पत्नीने पति व्रतस्थ राहून व पतीने पत्नी व्रतस्थ होऊन न राहिल्यास

सुप्रजा निर्माण होणार नाही. पति पत्नी यांचा ग्रहस्थ धर्म हा ज्ञानाचा साम्य मार्ग आहे. पति स्वेच्छाचारी होऊन वर्तन करीत असला तरी पत्नीने मात्र ते सहन करून त्याच्या आधीन होऊन राहावे म्हणणारे गृहस्थ साम्यवाद न जाणणारे नराधम पशू होत. पत्नीव्रत म्हणजे पतीने आपल्या धर्म पत्नीला आदराने वागवावे असा आहे.

– गर्भाधान विमर्श –

गर्भाधानासाठी स्त्री पुरुषाच्या वयोमानाचा विचार केला असता; स्त्रीला सोळा वर्षे व पुरुषाला सव्वीस वर्षे, असून स्त्री पुरुषाच्या वया मध्ये कनिष्ठ दहा वर्षाचे अंतर असावे लागते. नाही राहिल्यास रज–वीर्याचे कण अपरिपक्व दशेत असून संतानोत्पत्तीच्या कार्यक्षमतेला योग्य होत नाहीत. प्रथमतः कन्या रजस्वला झाल्या नंतर संतानोत्पत्तीसाठी बलवती झाली म्हणून लोक समजत असतात. ती चूक आहे. पहिल्या ऋतुस्नाताच्या सोळाव्या दिवसाला गर्भाधान संस्कार करण्याचे व्यवहारांत रूढ आहे. हे अयोग्य आहे. प्रथम ऋतुस्नात झाल्यापासून मासीक ऋतु छत्तीस झाल्यानंतर गर्भकोष बलिष्ठ होऊन गर्भ धारणेस योग्य पात्रता निर्माण होते. म्हणजे ऋतुमति झाल्यानंतर तीन वर्षानि सर्व अवयवाने ती बलवती होते. या कालावधीचे पालन नाही केल्यास अपरिपक्व गर्भ कोशामध्ये गर्भ धारणा होऊन शरीर दुर्बल होते. व अनंत रोगाची उत्पत्ती होऊन जरा मरण ही शीघ्र पणे येतात. पुरुषाचे वीर्य बीजाणूचा पूर्ण विकास होण्यासाठी किमान पंचवीस वर्षाचा कालावधी पाहिजे. निरोगी स्त्री महिन्याला एक वेळा रजस्वला होते. स्त्रीयानां रजो दर्शन अनियमित काली होणे, न होणे हे दोन्ही रोगाचे लक्षण आहेत.

रोग चिन्ह असलेल्या रजस्वला स्त्रीच्या नाभीच्या अधो भागी पोटामध्ये रज ग्रंथी होऊन दुखते. पांढरा द्रव पदार्थ श्राव होणे म्हणजे श्वेत प्रदर होय. आणि विशेष रक्तस्त्राव होणे हा रक्त प्रदर होय. ही सर्व लक्षणे गर्भ धारणेला बाधक आहेत. जनन क्रियेमध्ये रक्तच प्रमुख आहे. रक्ताचा नाश म्हणजे प्रत्यक्ष व्यक्तीचा नाश होय. रज प्रवाह सामान्यतः तीन दिवसापासून सहा दिवस चालतो. याला "आर्तव,, अथवा "पुष्प,, म्हणतात. शुद्धार्तव गर्भाचे शुद्धबीज आहे. आर्तवाचा दोन तोळ्यापासून पाच तोळ्यापर्यंत श्राव होतो. हे उत्तम आरोग्याचे लक्षण आहे. स्त्रीयांची रज शुद्धी सात दिवसाला होते. शुद्ध व बलिष्ठ रजो वीर्याचा संयोग झाल्यास पवित्र जीवात्म्याचा उदय होतो. रजस्वला स्त्रीने अज्ञानाने अथवा प्रमाद स्वभावाने नियमा विरुद्ध वर्तन केल्यास भावी गर्भामध्ये दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. कारण रज प्रवाह स्त्रीयांच्या आरोग्या संबंधित विषय आहे. रज-स्वला स्त्रीने प्रथम तीन दिवस कोणालाही स्पर्श करू नये. आपण एकांगी होऊन तृणासनावर झोपावे. एकांत स्थळी राहावे. कारण रज शुद्धी पर्यंत भावनेमध्ये लेश मात्र प्रणय प्रेमाचा स्पर्श होता कामा नये. हा त्याचा महान उद्देश आहे. एखाद्या वेळी रज शुद्धीचे पूर्वी स्त्री पुरुषांचा संयोग झाल्यास उपदंश, प्रमेह, रक्त-पित्त आदि रोगाची उत्पत्ती होऊन बुद्धी, बल, तेज हे सर्व नाश पावून नेत्र निस्तेज होतात. या सर्व कारणावरून रजस्वला स्त्री अस्पृश्य आहे असे गृहित धरले आहे. रज प्रवाहामध्ये वीर्य बीज गर्भामध्ये स्थिर होऊन राहाणार नाही. यदा कदाचित दुर्भाग्यवश वीर्य बीज थांबल्यास महामेह, कुष्ठ आदि रोग पीडित संतती जन्म पावते. कांही स्त्रीयांना रज प्रवाह तीन दिवसापेक्षा अधिक

काल होतो. अशा काली रक्त प्रवाह संपूर्ण थांवे पर्यंत उभयता पति पत्नीने शुद्ध ब्रह्मचर्य व्रताचे पालन करावे.

रजस्वला स्त्रीने दिवसा झोपू नये. सूर्योदयापूर्वी उठावे. अंगाला व डोक्याला तेल लावू नये नानाविध अलंकार घालून सौंदर्य वाढवू नये. अति उष्ण, अती थंड जागेत वाऱ्या-मध्ये उन्हामध्ये झोपूनये. मनामध्ये कामक्रोधाचा विचार न आणता प्रशांत रीतीनें राहावे. पुष्प, फल तोडूनये. फळ चिरणे कापणे आदि कामाला निषिद्ध मानले आहे. मित भाषणी असावे तळीव पदार्थ व शिळे अन्न खाऊ नये. दूध, तूप, फळ, फळावळ, धान्य आदि सात्वीक आहार सेवन करावा. दळणे, कांडणे, कुटणे, पाणी आणणे, स्वयंपाक करणे आदि विशेष शारिरीक श्रमाचे कार्य करूनये. यामुळे प्रकृतिमध्ये उष्णता वाढून पुढे गर्भपात होण्याचा संभव असतो. शीर्षासन, मयूरासन, करूनये. सायकल, घोडा, व उंट आदि वाहानावर बसू नये. यापासून रजोगतीचा निरोध होतो. रज शुद्धी होई पर्यंत तिच्या कडून कोणतेही काम घेऊ नये. ऋतुकाली दूषित रजाचा स्त्राव होऊन गर्भ धारणेला योग्य असलेल्या शुद्ध रजोकणाचा संग्रह करणे हा प्राकृतिक नियम आहे.

कांही लोकांना अशी शंका येते की, अनेक नियम व बंधने स्त्रीयांनाच का? पुरुषाना का नाहीत? याचे उत्तर असे की, कृषी शास्त्रामध्ये नांगरणे, कुळवणे, खात घालणे, बी पेरणे, खुरपणे आदि अनेक कार्य भूमीलाच सांगितले आहेत. बीजाला मात्र शुद्ध होऊन राहणे एवढेच सांगितले आहे. भूमीत बीजारोपण होताच त्याचे अंकुर, पान, पुष्प, फल या अनंत रूपात परिवर्तन होते. एका बीजालाच भूमीने आपल्या उदरात ठेऊन त्याचे

अनंत रूपाने परिवर्तन होते त्याप्रमाणे पुरुषाचे वीर्य बीज स्त्रीच्या गर्भात रूपांतर पावून शरीराची उत्पत्ती होते. वीर्य बीजाला रूपांतर करण्याच्या प्राकृतिक नियमामध्ये स्त्री बलवती असल्या कारणाने स्त्रीयानाच विशेष नियम आहेत. पुरुषाना नाहीत.

स्त्रीयानी विविध रंगाची वस्त्रे धारण करावी. आणि पुरुषानी पांढरी वस्त्रे परिधान करावी. याचे कारण स्त्रीचे रज तांबड्या रंगाचे असून संतती निर्माण कार्यामध्ये चर्म, रक्त, रोम, नेत्र,ओठ, जीभ आदि सौंदर्याची विविधता उत्पन्न करण्याचे गुणधर्म असणारे आहे. आणि पुरुषाचे वीर्य पांढरे असून ते संतती निर्माण कार्यामध्ये अस्थि आदि सबल व श्वेत वस्तू उत्पन्न करणारे आहे. या सर्व कारणावरून या प्राकृतिक नियमानुसार स्त्रीयानी विविध रंगाची वस्त्रे व पुरुषानी पांढरी वस्त्रे परिधान करावी.

शरीराचे सप्तसार असलेल्या रजो वीर्याचा संगम होऊन मानव देहाची उत्पत्ती होत असली तरी त्याच्या बरोबर स्त्री पुरुषांच्या मनांत प्रेमाची साम्यता असणे अत्यंत अवश्यक आहे. स्त्री रजस्वला झाली असल्यास एका जीवाला जन्म देणारी मातृ देवता होते. मानसिक स्वास्थ्य पवित्र करणारी ईश्वरोपासनादि पुण्य कर्मासाठी स्पृश्य असून पुरुषाला मात्र अस्पृश्यआहे. भोजनोत्तर तात्काल, अजीर्ण काली, उपवासकाली, अतीश्रमकाली औषधसेवनकाली, दैविक व्रतानुष्ठान काली, आजारकाली क्रोधकाली, स्त्रीचे मैथुन वर्ज्य आहे. म्हणून सांगितले आहे. स्त्री पुरुषानी सच्चरित्र, समानशील, समानभाव प्रेमपूर्वक, शांत, प्रसन्न, निर्भय, निश्चित, होऊन राहावे. हे नियम संतती शास्त्राचे मुख्य तत्व आहे.

ऋता वृतौ स्वदारेषु संगतीर्या विधानतः ।
ब्रह्मचर्यं तदेवोक्तं गृहस्थाश्रम वासिनाम् ।।
(श्रीयाज्ञ वल्क्य)

"भार्यागच्छन् ब्रह्मचारी ऋतो भवति चैवहि"

आपल्या धर्म पत्नी बरोबर केवल ऋतु शुद्धी नंतर संभोग करणाऱ्याला गृहस्थाश्रम ब्रह्मचर्य म्हणून सांगितला आहे. गृहस्थाश्रमांत असणाऱ्या संयमी व्यक्तीला ब्रह्मचारी असा अनेक महर्षि लोकांचा अभिप्राय आहे. सूक्ष्म दृष्टीने विचार करून पाहिले असता, संपूर्ण चराचर विश्वच ब्रह्मचारी असल्याचे प्रत्यक्षआहे कारण सर्व ऋतु गामी असल्याचे दिसतात. जगांतील वनस्पती, वृक्ष, वेली, पशु, पक्षी, मनुष्याप्रमाणे ऋतुमति म्हणजे पुष्प येऊन त्या नंतर गर्भवती म्हणजे फलवती होणे प्रत्यक्ष आहे.

औषधयो भूत भव्यमहोरात्रे वनस्पतिः ।
संवत्सरः सहर्तुभिस्ते जात ब्रह्मचारिणः ।।
(अथर्ववेद ११-५-२०)

संवत्सर, भूत, भविष्य, वर्तमानकाल, वनस्पति, पावसाळा, हिवाळा व उन्हाळा, हे तीन्हीकाल ऋतु गामी आहेत. आकाशांतील काळा, पांढरा, धूम्र वर्णाचा मेघराज ग्रीष्म ऋतुमध्ये तप्तहोऊन (तपाचरण करून) अखेर वर्षा ऋतुमध्ये जलरूपी वीर्याचे अधोरेत होऊन भूमीत सोडतो. त्यापासून पृथ्वी गर्भवती होऊन नानाविध वनस्पती व जीव जंतूना प्रसवते. पशू पक्षी ऋतु गामी असल्यामुळे ते ब्रह्मचारी आहेत. त्यांचे वीर्य एक वेळी सुद्धा निष्फळ ठरत नाही. प्राकृतिक बंधनाच्या योगाने सर्व प्राणी ऋतु गामी असल्यामुळे त्यांचे रज वीर्य विषय सुखासाठी नसून संतती प्रदान कार्यासाठी आहे.

प्रजोत्पादन कार्यामध्ये मानव ज्ञान मूलक संयमाने राहून ऋतु कालीच संभोग सुख भोगावे असा ब्रह्मचर्याचा नियम आहे. स्त्री पुरुषांच्या एक वेळच्या संभोगाने गर्भ धारण होत नाही. याचे कारण भावजन्य असलेल्या कामादि विकाराचे संस्कार, पुनः पुनः होऊन त्या कामाग्नी पासून तप्त झालेले वीर्य बीज दुर्बल असते. ऋतुकाल अत्यंत महत्वाचा आहे. सामान्यपणे स्त्री रजस्वला झाल्यापासून सोळाव्या रात्री पर्यंत ऋतुकाल म्हणून सांगितला आहे. कांही स्त्रीयांना तीन दिवस कांहीना सहा दिवस रज श्राव होत असल्यामुळे त्यांच्या प्रकृती मानाला अनुसरून प्रथम चार रात्री अथवा सहा रात्री सर्व थैव त्याज्य म्हणून समजावे. आता दहा रात्री अथवा बारा रात्री ऋतुकाल शिल्लक राहतात.

यथा यथा रजो रात्रौ नैकट्यं हि निषेकतः ।
विस्फोटादि गदैर्युक्तो बालः संजायते ततः ॥
(श्री हरित संहितायाम्)

रजशुद्धीच्या नंतर जितके समीप दिवस पुरुष समागम करीत असतो तितके जास्त प्रमाणांत देवी, गोवर, व्रण, इसब, गजकर्ण आदि रोगाचा प्रादुर्भाव ज्यास्त होतो.

एष्टोत्तरोत्तरं विद्यादायुरारोग्यमेव, च ।
प्रजां सौभाग्यमैश्वर्यं बलंच दिवसेषु वै ॥
एकादशी त्रयोदश्यास्तु न पूंसकः स्यात् ॥
(श्रीसुश्रुत शारीरस्थाने)

रजो दर्शना नंतर पुरुष जितके उत्तरोत्तर दूर रात्री स्त्री समागम करील तितके अधिक विद्या, बुद्धी, आयुष्य आरोग्य आदि गुण संपन्न संतती होते. भाग्यशाली संततीची अपेक्षा

असणाऱ्यानी पूर्ण विचार पूर्वक वर्तन करावे. स्त्रीयांचे सोळा दिवस ऋतु कालांतील प्रथम चार दिवस सोडून उरलेल्या बारा रात्री मधील अकरावी व तेरावी रात्र या दोन रात्री निषिद्ध काल म्हणून समजाव्यात अकरा व तेराव्या रात्रीं संभोगामध्ये गर्भ धारणा झाल्यास, नपूसक किंवा वांझ संतती होते म्हणून सांगितले आहे. रजस्वला स्त्रीचे प्रथम चार रात्री आणि अकरावी व तेरावी रात्र अशा सहा रात्री निषिद्ध असून, राहिलेल्या दहा रात्रीमध्ये "युग्म" म्हणजे समरात्री पुत्र प्राप्ती साठी आणि 'अयुग्म" म्हणजे विषम रात्री कन्या प्राप्तीसाठी योग्य आहेत. म्हणून सांगितले आहे. समरात्रीमध्ये पुरुषाचे वीर्य बलवान असते. विषमरात्री मध्ये स्त्रीयांचे रज बलवान असल्यामुळे पुत्राची अपेक्षा असणाऱ्यांनी समरात्रीमध्ये व कन्येची अपेक्षा असणाऱ्यानी विषम रात्रीमध्ये गर्भाधान करावे. स्त्रीचे रजो दर्शनोत्तर ६–८–१०–१२–१४ आणि १६ या सम रात्री पुत्र प्राप्तीसाठी क्रमाने उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत. आणि ५–७–९–१५ या चार विषम रात्री कन्या प्राप्ती साठी उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत स्त्रीचे रज तीन भाग, पुरुषाचे वीर्य दोन भाग, एकत्र झाल्यास मुली जन्मतात. आणि पुरुषाचे वीर्य तीन भाग, स्त्रीचेरज दोन भाग, एकत्र झाल्यास पुत्र संतती होते. रज वीर्य समान झाल्यास नपूसक संतती होते.

रजो दर्शनाच्या नंतर अधिक काल उत्तरोत्तर होत गेल्याप्रमाणे स्त्रीचे रज परिशुद्ध होऊन परिपुष्ट होते. उत्तरोत्तर पुढील रात्री गर्भाधान झालेल्या, गर्भातील संतती अत्यंत शुद्ध बुद्ध धष्ट, पुष्ट, व दीर्घायु, रूपगुणसंपन्न आणि भाग्यवान निपजते. ऋतूचा काल सोळा रात्री पर्यंत मर्यादित आहे. कारण

गर्भाशयाचे मुख केवळ सोळा रात्रीच उघडे असते. आणि सोळा रात्रीच्या नंतर गर्भाशियाचे मुख बंद होते, कारण त्या काली पुढील मासिक रज शुद्धीसाठी नवीन रजाचा संग्रह होतो. म्हणून या वेळी कोणीही स्त्री समागम करू नये. केल्यास वीर्याचा गर्भाशया-मध्ये प्रवेश होत नसल्यामुळे मैथुन निषिद्ध सांगितले आहे. अशुद्ध रजाच्या संग्रह क्रियेमध्ये मैथुन केल्यास स्त्रीचे आरोग्य बिघडते. निरर्थक वीर्य नाश होऊन पुरुषाच्या शरीरांतील सत्वांश नाश पावतो. आणि अनेक रोग उत्पन्न होतात. कांहीच विचार न करीता सम विषम दोन्ही रात्री संभोग केल्यास नपूसक किंवा जुळी संतती होते. हा सर्वांनी लक्षांत ठेवण्या सारखा विषयआहे. एका रात्री एकाच वेळी संभोग करावा. अतिरेक झाल्यास वीर्याचा दुरुपयोग होऊन आरोग्य बिघडते. शुभ अशुभ वाराचा विचार केला असता. सोमवार, बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार, हे शुभ आहेत. या दिवशी गर्भाधान करणे शुभ आहे. मंगळवार,शनिवार आणि रविवार, हे तीन वार निषिद्ध आहेत.

शुभ अशुभ तिथीचा विचार केला असता, शुक्ल व कृष्ण यादोन्ही पक्षांतील ४–६–८–११–१४ पौर्णिमा आणि आमावस्या ह्या बारा तिथी वर्ज आहेत. आणि आई बापाची पुण्यतिथी वर्ज्य आहे. राहिलेल्या दोन्ही पक्षांतील २–३–५–७–९–१०–१२–१३ या सर्व मिळून सोळा तिथ्या गर्भाधानास शुभ आहेत.

शुभ अशुभ नक्षत्राचा विचार केला असता रेवती अश्विनी, पुष्य, अश्लेशा, मघा, चित्रा, मृग, मूळ, आणि जेष्ठा ही नऊ नक्षत्रे त्याज्य आहेत. या नक्षत्रामध्ये जनन पावलेले बालक पाप संतती असून आई बापाला पीडा करणारे असते.असे ज्योतिषशास्त्र सांगते.

याचे शांति कर्म ज्योतिष शास्त्रा मध्ये सविस्तर सांगितले आहे. भरणी, कृतिका, आर्द्रा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, विशाखा ही सात नक्षत्रे मध्यम असून राहिलेली रोहिणी, पुनर्वसु, उत्तरा हस्ता, स्वाती, अनुराधा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, आणि उत्तरा भाद्रपदा ही अकरा नक्षत्रे प्रजोत्पादनासाठी सर्वोत्कृष्ट आहेत. वस्तुतः प्रसूतीकाल हा खरा जन्मकाल नसून गर्भ स्थापनेचा कालच त्या शिशूचा खरा जन्म काल आहे. प्रथम शिशू आईच्या उदरात जन्म पाऊन त्या नंतर नऊ महिन्यानी बाहेर येते. कित्येक मुले चतुर्दशी, आमावास्या, या तीथीच्या अनिष्ट काली जन्म पाऊन पुढे ते महापुरुष झाले आहेत. गर्भस्थापना शुभ दिवस, शुभ तिथी, शुभ नक्षत्र या शुभ काळी होऊन संतती झाल्यास, अलौकीक सामर्थ्य असलेले गुणैश्वर्य युक्त बालक जन्मास येते. शुभ मास म्हणजे चार महिने हिवाळा वसंत ऋतुचे दोन महिने स्त्री–पुरुषांच्या समागमास शुभ होत.

ब्राह्मी मुहूर्त काल, दिवसा, सायंकाल, मध्यरात्रीकाल, प्रातःसंध्या, सायंसंध्याकाल, चंद्र सूर्य ग्रहणकाल, एकादशी, शिवरात्र, प्रदोष, सोमवारव्रत, चातुर्मासव्रत, श्राद्ध पूर्वदिवस, आपला जन्म नक्षत्रकाल, आचार्य जयंतीकाल, सूतक काल, मकरसंक्रांतकाल, वैध्रती व्यतिपात, परिघयोगाचा पूर्वार्ध, भद्रा व शिशूचा स्तनपान काल, हे सर्वकाल स्त्री संभोगास निषिद्ध सांगितले आहेत.

पति पत्नीचे अंतःपुर अथवा शयन मंदिर, माता, पिता, गुरुजनादि श्रेष्ठ लोकांच्या आणि कन्या, पुत्र, शिष्य, बांधवादि लहान जनापासून दूर असावे. दुसऱ्याचे भाषण व अपशब्द अर्वाच्य वाक्याचा ध्वनी कानाला ऐकू येत असेल अशा निषिद्धस्थानी

कोणीही संभोग करू नये. पति पत्नीचे शयन मंदिर शुद्ध वायू व प्रकाशयुक्त एकांत व निर्भय स्थानी असावे. आणि ब्रह्मा, विष्णु रुद्र, ईश्वर, सदाशिव, सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिका आदि देवतांचे व महा पुरुषांचे आणि देश भक्तांचे भाव चित्रानीं सुशोभित केलेले असावे. सुगंध धूपाचा विनियोग होत असावा.

शय्याचा विचार केल्यास अंथरूण जीर्ण होऊन मळकट झालेले नसावे. तेल आदि दुर्गंध पदार्थाचे डाग लागलेले नसावे. झोपण्याच्या अंथरुणावर पांढऱ्या रंगाच्या चादरीचा प्रत्येक वेळी धुऊनच उपयोग करावा. वरची चादर न धूता तसाच उपयोग केल्याने, रात्रीच्या दोषापासून आरोग्यास बाधा होऊन मनाची प्रसन्नता कायम राहात नाही. पति पत्नीचे अंथरूण नेहमी करता वेगवेगळे असावे. केवळ गर्भाधान प्रसंगी कांही काल एकशय्या-सीन होऊन राहावे. गर्भाधान कार्य संपल्या नंतर त्याच अंथरु-णावरं कधीही विश्राम पावू नये. त्याने उष्णता वाढून उपदंश प्रमेहादि रोग होतात. यासाठीं स्वतंत्र अंथरुणावर झोपणे योग्य आहे. पति पत्नीने आपणास सुंदर गौरवर्ण, दीर्घदेही, सत्वगुणसंपन्न मुलगा व्हावाम्हणून त्यांनीस्त्रीयांचे ऋतुशुद्धीनंतर चारदिवस तिला विलायची, जायफळ आणि जिरे या तीन पदार्थाचे पीठ करून जवाच्या पीठामध्ये पांढऱ्या सवत्स गाईच्या दुधांत कालवून त्यात तूप आणि मध ही दोन्ही विषम प्रमाणात मिश्रण करून चार दिवस खाण्यासाठी द्यावे. पूर्व कथितप्रकार कोणत्याहि एका रात्री पति पत्नीने अभ्यंग स्नान पूर्वक पतीने स्वच्छ शुभ्र वस्त्र धारण करावे. पत्नीने गुलाबी रंगाचे धूत वस्त्र धारण करावे. त्यानंतर स्त्रीने आपले हात पाय स्वच्छ धुवून प्रथम पतीच्या चरणाला वंदन करावे. सुगंध धूपदीपादि वस्तू जाळाव्या

इच्छा असल्यास पति पत्नीने दूध, फळ आदि मिताहार सेवन करावा. अत्यंत प्रेममय भावनेंत हास्य विनोद पूर्वक प्रसन्न मनाने दिव्याच्या स्वच्छ प्रकाशात गर्भाधान करावे

विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणी पिंशतु ।
आ सिंचतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते ॥१॥
आ ते गर्भो योनिमेतु पुमान् बाण इवेषुधिम् ॥
आ वीरो जायतां पुत्रस्ते दश मास्यः ॥२॥
ब्रह्मा बृहस्पति विंष्णुः सोमाः सूर्यस्तयाऽश्विनौ ।
भगोऽथ मित्रावरुणो वीरं ददतु मे सुतम् ॥३॥

हे भार्ये सर्व व्यापी परमेश्वर तुझ्या गर्भाशियांत गर्भ धारण करण्याचे सामर्थ्य देवो. परमात्मा गर्भाच्या अंग प्रत्यांगामध्ये रंग रूप गुणाने उत्कृष्ट रूपाने प्रवेश करो. तो प्राणदाता ब्रह्मदेव गर्भाला प्राणशक्तीने परिपूर्णकरो. अर्थात गर्भाला शतायुषी करो. आणि तोच सर्वाधार असलेला सृष्टीकर्ता गर्भाला उत्तमरीतीने धष्ट, पुष्ट, बलिष्ठ करो. त्या नंतर उभय पती पत्नीनी हे ब्रह्मा, हे बृहस्पती, हे विष्णु, हे सदाशिव, हे रुद्र अखिल देवाधि देवता आम्हाला त्र्यैलौक्य विजय पावणारा असा वीर व अमर पुत्र व्हावा अशी आम्ही इच्छाकरतो. आपण अनुग्रह करावा. सर्व गुण रूपाने बीज रूपात तुम्ही त्या जीवाच्या ठिकाणी प्रतिबिंबित होण्या जोगे करा. तुमचे दिव्य ऐश्वर्य, पुण्य, धैर्य, बल, तेज, वीरत्व, सामर्थ्यं, यश, ज्ञान, सौंदर्य, आत्मसंयमन प्रभुत्व, आरोग्य, आदिकांचा पूर्णांश आमच्या भावी संततीमध्ये स्थापन करा. या प्रकारे शुभ संकल्प पूर्वक प्रार्थना करून त्या नंतर शांत रीतीने मनांत पंचाक्षरी महा मंत्राचे ध्यान करीत गर्भाधान करावे.

रति सुखाचे आनंद काली पति पत्नीने ईश्वर चिंतन ध्यान; मनांत सतत ठेवावे. विषयाच्या प्रभावामध्ये ईश्वराचे स्मरण चिंतन करणे, हे सर्व सामान्य जीवाना शक्य नाही. जर सत्संग, व सत् श्रवण ईश्वरोपासना, करण्याचा संस्कार पूर्वीपासून मनाला असेल तर, त्याकाली स्मरणहोते. पवित्र भावनेने गर्भाधान केल्यास जगन्मान्य व जगद्वंद्य संतती होण्यामध्ये कोणताच संदेह नाही. थोडचा वेळा नंतर स्त्री पुरुषानी शीतजलाने स्नान करावे. प्रकृतिला मानवत नसल्यास साधारण उष्णोदकाने स्नानकरावे. आपली इच्छा असल्यास दूध फळ् आदि सात्विक अहार सेवन करून आप आपल्या अंथरुणावर झोपावे.

गर्भिणी स्त्रीयानी आहार विहारामध्ये नियमित असावे. सात्विक आहारच सेवन करावा. मांस मद्यादि तामस आहार सेवन करूनये. दूध, तूप, गहू, ज्वारी, फळ आदि सात्वीक आहार गर्भवतीने सेवनकरावे. त्याअन्नाचा रस गर्भातील शिशूला मिळून सात्विक गुण संपन्न जीव, जन्मास येतो. गर्भवतीने उताणे झोपू नये. ऊर्ध्वांग झोपण्याने गर्भात विकृति निर्माण होते. या बाबतीत जाग्रत असावे. अश्लील सिनेमा नाटक आदि पाहूनये. रात्री जाग्रण करूनये व दिवसा झोपूनये. रात्री भोजना नंतर दोन तासाने झोपावे. झोपताना अंथरुणावर बसून डोळे मिटून हातजोडून ईश्वराचे ध्यान करीत आई, बाप, गुरु आदिकांचे स्मरण करून शिवध्यान करीत झोपावे. स्त्रीचे मन स्वाभाविकपणे कोमल असते. आणि गर्भकाली अतिशय कोमल होतअसते. या करिता गर्भिणी स्त्रीयांच्या मनावर ज्या विचाराचा संस्कार होतो, त्यासंस्काराचा प्रभाव गर्भातील शिशूवर आमरण राहात असल्यामुळे, जसे आईने सेवन केलेल्या अन्नाचा रस शिशूला

मिळतो, त्याचप्रमाणे आईच्या विचार शक्तीचा गर्भातील शिशूवर परिणाम होतो. पवित्र संतती निर्माण करणारे संततीशास्त्र गर्भाधान विधी पासून जातक विधी पर्यंत परिशुद्धबीज, परिशुद्धपिंड, परिशुद्ध ज्ञानसंस्कारपूर्वक पवित्र संतती व्हावी. या उद्देशासाठी हे सर्व संस्कार सांगितले आहेत. धर्म शिक्षणाचा अभाव झाल्याने संतती शास्त्राची माहिती व्यवहारामध्ये नसल्यामुळे वागणे, चालणे, दुर्लभ झाले आहे. अनाधिकारी लोक गृहस्थाश्रमाचास्वीकार करीत असल्यामुळे गृहस्थाश्रमाच्या उच्च ध्येयाचे अवशेष न राहाता, अधुनिक गृहस्थ जीवन म्हणजे विषय भोगच त्यांचे अंतीम लक्ष होऊन अधःपतन झाले आहे.

वान प्रस्थाश्रम

गृहस्थाश्रमाची पूर्तता झाल्यानंतर गृहस्थ ब्रह्मचाऱ्यानी वानप्रस्थाश्रम, विधी पूर्वक स्वीकारून आपण स्वतः घरी असून सुद्धा प्रजोत्पादन कार्यापासून निवृत्त व्हावे आणि प्रपंच्यातील कामे आपण प्रत्यक्ष न करता आपल्या पुत्रादिकांना मार्गदर्शन करीत पूजा, जप, ध्यान, व्रतादिकाचे आचरण करीत काल क्षेप करावा. सर्व संग परित्याग करून वनामध्ये राहण्यासाठी पूर्व तयारी करून घेणे हाच वानप्रस्थाश्रम होय.

संन्यासाश्रम

गृहस्थाश्रमांत असल्या वेळी नाना प्रकारचे विषयभोग सेवन करण्यापासून भावनेत मालिन्य आलेले असते. त्या मलिन संस्कारमध्येच मानव मृतझाला असल्यास, त्या सर्व विषयभोगाचे संस्कार पुनः दुसऱ्या जन्मांत प्रबल होतात. गृहस्थाश्रमाचा विषय भोग संस्कार संन्यासाश्रमामध्ये निरसन करून, भावी जीवनाला पवित्र संस्कार स्वाभाविक पणे होऊन राहावेत, या उद्देशासाठी

संन्यासाश्रम सांगितला आहे. सर्व संग परित्याग करून पुनरावृत्ति-रहित मोक्षसुखासाठी संन्यासाश्रम आहे. सर्व संग परित्याग कर-ण्यामध्ये पत्नीत्याग हाच मुख्य हेतू आहे. पत्नीला धर्मशास्त्राच्या नियमाप्रमाणे क्रमप्राप्तस्वीकारकेलेला आहे. आणि क्रम सोडून तिचा त्याग केल्यास अपराध होतो. म्हणून संन्यास ग्रहण करण्यासाठीं पत्नीची सम्मत्ती घेणे अवश्यक आहे. कारण अबलेचे संरक्षण करण्यासाठी दुसरे कोणतेही साधन नसल्यास व्यवस्था करावी लागते. आणि संरक्षणाची व्यवस्था असून देखील केवळ भोग मोहासाठी तिची सम्मती नसल्यास सम्मती घेणे आवश्यक नाही. मुलगा कर्तव्यशील असून आईच्या रक्षणासाठी सर्व समर्थ असला तर पत्नीच्या सम्मतीची गरज नाही. विवाह विधी मध्ये प्रमाण पुरस्सर पाणी ग्रहण केलेल्या विवाह बंधनाचा विछेद करणे हाच संन्यासाश्रम आहे. बाल्य जीवनांत प्रत्येकाना ब्रह्मचर्य स्वाभाविक असते. पुढे उपनयन संस्कार पूर्वक गुरुकुल वासकरून नैष्ठिक ब्रह्मचर्य पूर्वक विद्यार्जन करतो. आणि समावर्तन विधी-च्याद्वारे उपनयन व्रताचे विसर्जन करून, गृहस्थ ब्रह्मचर्याश्रमाचे पालन करतो. आणि वानप्रस्थ आश्रमामध्ये संन्यास आश्रमाच्या विधीच्या द्वारे सर्वसंग परित्याग पूर्वक वर्तन करून जीवन्मुक्त होतो. जन्मदारभ्यमरणापर्यंत जीवन्मुक्तीसाठी ब्रह्मचर्य मूलाधार आहे. त्या ब्रह्मचर्य व्रताचे विरूद्ध अनै-सर्गिक भावनेने व्यभिचार कर्मामध्ये पतित झाल्यास एक्कवीस लक्ष प्रकारच्या पापकर्माची उत्पती होते. या सृष्टीतील शिक्षा-विधान योनीमध्ये जन्मपावून त्यांत ही पाप कर्माचे क्षालन न झालेल्या महापातकी लोकांना परलोकांतील सूक्ष्म सृष्टीच्या यम शासनाद्वारे नरक शिक्षा भोगावी लागते. पति पत्नीनी

प्रजोत्पादन नियमाच्या विरूद्ध मनसोक्त विषय सेवन केले असल्यास त्यामध्ये प्रत्यक्ष पापकर्म होत नसले तरी त्यामुळे आत्मोन्नतीसाठी वाधा येते. हा सूक्ष्म अपराध आहे.

व्यभिचार कर्म प्रभेद

व्रतस्थ पत्नीगमन, ऋतुमति पत्नींगमन, गर्भिणी पत्नीगमन, शिशुला स्तनपान करीत असल्यावेळी पत्नीगमन, रोगी पत्नी-गमन, निद्रिस्त पत्नीगमन, भोजनस्थ पत्नींगमन, आदि स्वपत्नीगमन, हे दोष आहेत. पत्नी भगीनी गमन, पत्नी जेष्ठ भगिनी गमन, मित्र पत्नीगमन, मित्र भगिनीगमन, मित्र स्वसागमन, मित्र स्नुषागमन, पत्नीसखीगमन, मातृसखीगमन, बंधुपत्नीगमन, बंधुपत्नी भगिनी गमन, पुत्री गमन, स्वसा गमन, स्नुषागमन, मातृ गमन, मातृ भगिनी गमन, गुरु पत्नीगमन, गुरुभगिनीगमन, गुरुपुत्रीगमन, गुरु बंधु पत्नीगमन, श्रोत्रियपत्नीगमन, श्रोत्रिय भगिनीगमन, श्रोत्रिय सेविका गमन, पतिव्रता गमन, कुमारी गमन, गुरुपत्नी भगिनी गमन, जामात भगिनीं गमन, विधवा गमन, बाल विधवा गमन वृद्ध विधवा गमन, पथिक स्त्री गमन, अर्चक स्त्री गमन, सैनिक पत्नी गमन, सैनिक भगिनी गमन, सैनिक पुत्री गमन, सैनिक मातृ गमन, सैनिक स्वसा गमन, सेवक पत्नी गमन, सेवक भगिनी गमन, सेवक पुत्री गमन, सेवक माता गमन, स्वामी पत्नी गमन, स्वामी भगिनी गमन, स्वामी पुत्री गमन, स्वामी स्नुषा गमन, शिष्य पत्नी गमन, शिष्य भगिनी गमन, शिष्य पुत्री गमन, शिष्य माता गमन, शिष्य स्नुषा गमन, विधवा शिक्षिका गमन, सधवा शिक्षिका गमन, राज पत्नी गमन, राज पुत्री गमन, राज माता गमन, राज भगिनी गमन, राज स्नुषा गमन, राज दासी गमन, राज पत्नी भगिनी गमन, मंत्रीपत्नीगमन, मंत्रीपुत्रीगमन

गमन, मंत्री भगिनी गमन, मंत्री दासी गमन, मंत्री स्नुषा गमन शिक्षक पत्नी गमन, शिक्षक मातृ गमन, शिक्षक भगिनी गमन, शिक्षक स्वसा गमन, आश्रित पत्नी गमन, भोजन स्थित स्त्री गमन, आश्रित पुत्री गमन, आश्रित भगिनी गमन, निद्रित स्त्री गमन, योगिनी गमन, सहजस्थित स्त्री गमन, विद्यार्थीनी गमन, योद्धास्त्री गमन, योद्धास्त्री भगीनी गमन, योद्धास्त्री पुत्री गमन, वलात्कारे स्त्री गमन, रोगी स्त्री गमन, मूकस्त्री गमन, अंध स्त्री गमन, पंगू स्त्री गमन, कुष्टरोगी स्त्री गमन, करहीन स्त्री गमन, उन्माद स्त्री गमन, चांडाल स्त्री गमन, शूद्र स्त्री गमन, वेश्या स्त्री गमन, क्षत्रिय स्त्री गमन, ब्राह्मण स्त्री गमन, ब्राह्मण पुत्री गमन, ब्राह्मण भगिनी गमन, माहेश्वर पत्नी गमन, संन्यास व्रतस्थ स्त्री गमन, दान कर्मरत स्त्री गमन, पूजा रत स्त्री गमन वैद्य पत्नी गमन, चिकित्सालय, सेविका गमन, मूक पत्नी गमन, अंध पत्नी गमन, दुर्बल पत्नी गमन, कुष्ठरोगी पत्नी गमन, कुष्ठरोगी स्त्री गमन, उन्माद पुरुष पत्नी गमन, दरिद्री पत्नी गमन, अपस्मार पुरुष पत्नी गमन, अपस्मार रोगी स्त्री गमन, निस्संतान स्त्री गमन, निस्संतान विधवा गमन, दु.खी स्त्री गमन, कारागृहवासी पत्नी गमन, कारागृहवासी भगिनी गमन, कारागृहवासी पुत्री गमन, कारागृहवासी स्नुषा गमन असले अनंत प्रभेद व्यभिचार कर्माचे आहेत. अनंत मानव, अनंत वर्ग, अनंत जाती, अनंत पद, अनंत वय, अनंत कर्म, जीवांच्या, देश, काल, अवस्था परिस्थिती आदि विविधते पासून स्त्री पुरुषामध्ये अनेक विध पाप कर्माची उत्पत्ती होते. एका व्यभिचार कर्मामध्ये एक्केवीस लक्ष प्रकारचे पाप कर्म संभवतात.

ब्रह्मचर्याचा नियम पाप निरोधक असून पुण्य करण्यासाठी योग्य पात्रता आणून देणारा आहे. दुरित कर्माला निरोध करून सत्कर्मासाठी अवकाश देणारा आहे. व्यभिचार निवृत्ति म्हणजे ब्रह्मचर्य नियमाचे पालन होय. अहिंसा, सत्य, अस्तेय, व ब्रह्मचर्य हे चार नियम पाप कर्माचा निरोध करून पुण्यकर्मासाठी पात्रता उत्पन्न करणारे आहेत.

शुक्र म्हणजे, वीर्य अर्थ बोधक प्रमाण.

तदेव शुक्रं तद् ब्रह्म ता आपः स प्रजापतिः (आयुर्वेद)

तेच वीर्य, तोच ईश्वर. तेच जीवन आणि तेच प्रजोत्पादक सृष्टीचे बीज आहे.

तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवाऽमृत मश्नुते (कठोपनिषत्)

तेच वीर्य आहे. तोच ईश्वर आहे. आणि त्यालाच अमृत म्हणतात

शुक्रं जीवन सर्वस्वं जीव ब्रह्माऽमृतं स्मृतं (भवतवामन)

शुक्र (वीर्य) हेच जीवनाचे सर्वस्व आहे, वीर्याला जीव, ब्रह्म, अमृत असेही म्हणतात.

व्यर्थी कारेण शुक्रस्य ब्रह्महत्यामवाप्नुते (स्मृतिग्रंथ)

वीर्य नाश करणे म्हणजे ब्रह्महत्या, जीवहत्या, जीव नाशच आहे.

योग्यी कारेण शुक्रस्य ब्रह्म तेजः प्रजायते (भक्तवामन)

वीर्याच्या सदुपयोगाने ब्रह्मतेज निश्चितपणे प्राप्तहोऊन वृद्धीपावते.

ब्रह्मणि वेद विद्या यै कस्यत् विद्या यै वा ।
चर्यते इति ब्रह्मचर्यम् ॥ (स्मृतिग्रंथ)

वेदामध्ये प्रतिपादन केलेल्या ब्रह्म विद्येच्या प्राप्तीसाठी पवित्र होऊन जो, नियम, व्रत, निष्ठेने चालतो त्यास ब्रह्मचारी म्हणतात.

प्रज्ञानेन लभेद् ब्रह्म ब्रह्मचर्येण निश्चितम् ॥ (भक्तवामन)


ब्रह्मचर्य व्रता पासून परब्रह्मा (मोक्ष) ची प्राप्ती निश्चित आहे.

ब्रह्मवेदः ब्रह्मज्ञानं ब्रह्मवीर्यं तु अमृतं (भक्तवामन)
ब्रह्म म्हणजे वेद, ब्रह्म म्हणजे ज्ञान, ब्रह्म म्हणजे वीर्य ब्रह्मच अमृत आहे.

ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमपाघ्नत (अथर्ववेद ११-२-१९)
विद्वान लोकानी ब्रह्मचर्य रूपी तपो बलाने मृत्यूला जिंकले आहे.

ब्रह्मचर्येण तपसा राजा राष्ट्रंविरक्षति (अथर्ववेद ५-१-७)
ब्रह्मचर्य रूप तपाने राजा राष्ट्राचे संरक्षण करतो.

मानव धर्म मंदिराचा चतुर्थ सोपान असलेल्या ब्रह्मचर्य
नियमाची परि समाप्ती होते.



– दया –

जगद्रूपी मंदिराच्या गुण धर्माचे पृथ:करण करून पाहिले असता असे दिसून येते की, पृथ्वी माता दयाशील होऊन जड चेतन सर्व वस्तूना धारण करते. सर्व वनस्पति पृथ्वीच्या दया रूप धारण क्रियेमध्ये अंकुर फुटून पुष्प, फलाने समृद्ध होऊन संरक्षित होतात. पृथ्वीवर कोणी निद्राकरो, संचारकरो बसो, पूजाजपादि पवित्र कर्मकरो. अथवा मल मूत्र विसर्जनकरो या सर्व कर्मामध्ये धरित्री माता दया पूर्ण असल्याचे सिद्ध होते.

आप तत्व, दया पूर्णतेने वर्षा काली पाऊस पडून वृक्ष वेली तृण पर्णाना पाणी पुरवून संरक्षण करते. नद्या आपल्या साठी वाहात नसून प्राण्याच्या संरक्षणासाठी दया पूरित होऊन वाहात असतात. त्यांत कोणी मल धुवो, स्नान करो, पाणी पीवो, अथवा तीर्थ रूपाने सेवन करो या सर्व कर्माला आप तत्वाने दया पूरित होऊन आश्रय दिला आहे.

तेज तत्वाचा सूर्य, दया पूर्णतेने ग्रीष्म काली (उन्हाळा) भूमीला तापून फलद्रूप होण्या जोगा अवकाश निर्माण करतो. नदी सरोवरादि जलाशयाला तापवून पुढील वर्षा काली पाऊस पाड- ण्यासाठी बाष्प निर्माण करतो. वनस्पतींना उष्णता देऊन वाढवितो.

वायू तत्व, दया पूर्णतेने चरार सर्व वस्तूना संरक्षण करतो. वनस्पतीना वाढवितो. सर्व प्राण्यांच्या श्वासोच्छ्वास क्रियामध्ये अखंड पणे वाहून प्राण रक्षण करतो. जगाच्या एका भागांतील वार्ता दूसऱ्या भागाला एका निमिषार्धात. नेऊन पोंहो- चवितो. संध्या होमादि पुण्य कर्मात धूप सामुग्रीद्वारे सुगंध वायू होऊन वाहातो.

आकाश तत्वाने पृथ्वी, आप, तेज, वायू, या चारी

तत्वाच्या सर्व क्रियेला दया पूरित होऊन अवकाश दिला आहे. सर्व प्राण्यांच्या गमनागमन क्रियेला आवकाश दिला आहे. आकाशामध्ये नादोत्पत्ती होत असल्यामुळे ईश्वराची स्तुति करो, जपकरो, निंदा करो अथवा तिरस्कृत भावनेने दुसऱ्याना अपमानितकरो ह्या सर्व कार्यासाठी दया पूरित होऊन आकाश तत्वाने अवकाश दिला आहे.

वनस्पति झाडे वेली इ. आपल्यासाठी जगत नसून सकल प्राण्याना पुष्प फळ देऊन दयापूर्णतेने संरक्षण करतात. गाई तृण पर्ण खाऊन आपल्यासाठी जगत नसून वात्सल्यप्रेमात आपल्या वासराला दूध पाजवितात. आणि योगी, भोगी लोकाना पिण्यासाठी दया भावनेने दूध देऊन उपयोगी पडतात. व देवाच्या अभिषेक पूजामध्ये पंचामृत रूपाने उपयोगी पडतात.

प्रकृतीची घटक असलेली माता, दया पूर्णतेने शिशूला नवमास गर्भामध्ये धारण करते. शिशू जन्म घेऊन येण्यापूर्वी आईच्या स्तनात प्रकृतीने दया पूरित होऊन दूधाची उत्पत्तीकेली आहे. आई शिशूच्या जन्मकाली प्रसव क्रियेच्या असह्य वेदना दयाशील होऊन सहन करते. शिशूच्या संगोपनार्थ आई दयारसभरित होऊन वात्सल्य भावनेने संरक्षण करते. त्या शिशूच्या बाल्यकाली मलधूणे, स्नानपानभोजन करविणे, निद्रा आदि शारिरीक धर्माच्या पूर्तीमध्ये बलहीन असलेल्या शिशूला दया पूरित होऊन माता संरक्षण करते. विद्या बुद्धीचे शिक्षण घेऊन ज्ञानाभिवृद्धी व्हावी म्हणून दया पूरित आई बाप आपल्यामुलांना गुरु सन्निधीत समर्पण करतात. गुरु आपल्या गुरुकुलाश्रमांत अनुग्रहपूरित दया दृष्टीने ज्ञान प्रदानासाठी ठेवूच घेतात. तो मुलगा पूर्ण कर्तृत्व शक्ती संपन्न होऊन आपल्या रक्षणासाठी व राष्ट्राच्या

रक्षणासाठी पूर्ण मानव होतो. मानवाची उत्पत्ती दया रस प्रेमाच्या श्रोतामध्ये उत्थान पावली आहे. त्या मध्येच वाढून तो मोठा होतो. हा मोठा झाल्यानंतर आपल्या चरितार्थ साधनेसाठी अवश्यक असलेल्या भोग वस्तूंचा अभाव होत असल्यास दुसऱ्या वरिष्ठ लोकांची दया असावी म्हणून अपेक्षा करीत असतो. विद्यार्थी विद्यार्जनामध्ये गुरूची दया व्हावी अशी अपेक्षा करतो. रोगी वैद्याची दया व्हावी अशी अपेक्षा करतो. दरिद्री धनिकाची दया व्हावी म्हणून आणि प्रजाजन राजाची दया असावी अशीअपेक्षा करतात.बलहीनलोक बलवान् लोकांची दया असावी म्हणून अपेक्षा करतात. अशा प्रकारे श्रेष्ठ लोकांची दया असावी म्हणून कनिष्ठ लोक सदैव अपेक्षा करीत असतात. त्यांच्यावर वरिष्ठांची दया झाल्यास मनाला सुख शांति मिळते. दया नाही झाल्यास अशांति होते. प्रत्येक मानव दया नियमाच्याद्वारे व्यक्तिगत सुख शांति-साठी परावलंबी असतो. आपल्यांतील स्वाभाविक असलेली दया दुसऱ्या विषयी उपयोग केल्याशिवाय आपण दुसऱ्याकडून दया संपादन करण्याचे कामी असमर्थ होतो. दया नियमाचे पालन करणारे नरश्रेष्ठ जगांत सन्मानित व पूज्यव्यक्ती म्हणून समजले जातात. देश भक्त समाजांतील मानवाना प्राप्त होत असलेल्या दुरितांचा परिहार करून स्वार्थ त्यागाद्वारे दयाभावनेत सेवा समर्पण करतात. साधु, सत्पुरुष, ऋषि, मुनी, मानव कोटीच्या उद्धारार्थ भक्ती, ज्ञान, वैराग्याचे मार्गदर्शन करून इहलोक, पर-लोक,पारमार्थ या त्रिविध सुखाच्या प्राप्तीसाठी केवळ दया भावनेत ज्ञान प्रदान करीत असतात. "**नहि ज्ञानेन सदृश्यम्**,, ज्ञानाच्यासमान कोणतीही वस्तू नाही.म्हणून हे अमूल्य आहे. आणि रत्न, धन, धान्य, सर्व वस्तू मूल्यवान् आहेत.मात्र ज्ञान चैतन्यमय असल्यामुळे त्याचे

मूल्य मापन करणे शक्य नाही. मानवाचे मन, अनैसर्गिक भावाच्या हिंसा, असत्य, चौर्य, व्यभिचार ह्या दुष्कृतिमध्ये प्रवेश करण्याची अपेक्षा करीत असताना अंतःकरणामध्ये सदैव वास करून असलेली चैतन्य नियामक शक्ती, "तू पाप कर्मामध्ये प्रवेश करू नको,, असे दयापूरित होऊन संदेश देत असते. कर्मबद्ध जीवाला पुण्य कर्माकडे जाण्याची पात्रता नसते. जसे पाशाने बांधलेला पशू बंध निवृत्तीसाठी परतंत्र असून त्याचा मालक त्याला बंध मुक्त करीत असतो. त्याप्रमाणे जीवाचे कर्म बंधनाला निवृत्त करणारे आचार्य दया पूरित भावनेत संचार करीत असतात. म्हणजे ज्ञान्याने अज्ञान्या जवळ जाणे हे दया तत्परतेचे कार्य आहे. प्रकाश अंधाराकडे जाऊन त्याचा नाश करतो. पावसाचे पाणी प्रवाहित होऊन वनस्पतीना संरक्षण करते. अशा बलवान वस्तूच बलहीन वस्तू प्रत जाऊन उद्धार करणे म्हणजे दयापूर्ण कार्य होय. हे सर्व विचार करीत असता आपल्या सुख सोईसाठी सकल वस्तू दया पूर्णतेने प्रसन्न व्हाव्या म्हणून मानवाने अपेक्षा करणे स्वाभाविक आहे. अनैसर्गिक भावनेच्या आवरण मूलक पुत्र, दारा, धन या भोगासंबंधी आसक्त होऊन दुसऱ्या विषयी निर्दयतेने वर्तन करणे मानवतेच्या स्वाभाविक प्रवृत्तिला विरोधक आहे. एवढेच नव्हे मानवी जीवनाच्या उन्नतीसाठी बाधक होते. मानवाला दया नियम जन्मसिद्ध असला तरी आपल्याहून वेगळ्या जीवा विषयी दया नियमाचा उपयोग करणे, आद्य कर्तव्य आहे. आंधळा मार्ग चुकून जात असता डोळसानी त्याला मार्ग दाखविणे हेच त्यांचे कर्तव्य आहे. तसे वर्तन त्याने नाही केले तर राष्ट्रशासनाच्या दृष्टीने अपराधी म्हणून समजत नसला तरी ती मानवी कर्तव्याची परांङ्गमुखता होय. प्रत्येक मनुष्याने आपल्या व्यक्तिगत सुखशांतीसाठी परस्पर दया

नियमाचे पालन करणे अवश्यक आहे. त्यापासून राष्ट्रांत अंतरिक सुखशांतीचा प्रसार होतो. सर्व प्राण्याच्या कष्टामध्ये विनामूल्य सेवा करणे हा दया नियम होय. सर्व प्राण्याच्या स्नान पानासाठी विहीरी, तळी पथिकांच्या विश्रांति साठी धर्मशाळा आरोग्य प्रदानासाठी औषधालय, विद्यार्जनासाठी पाठशाळा, भजन, पूजन, कीर्तन, पुराण, प्रवचन आदि पुण्य कर्मानुष्ठानासाठी ज्ञान क्षेत्र व अन्नसत्र चालविणारे मठ, मंदिर व योगाश्रम हे सर्व राष्ट्राच्या व्यापक सुखासाठी हे महत्कार्य, दया पूर्णतेने चालत असतात. जेष्ठ लोकाकडून कनिष्ठ लोकाना म्हणजे धनहीन लोकानां धन, अन्नहीन लोकानां अन्न, ज्ञानहीन लोकाना ज्ञान, विद्या हीनीना विद्या, वस्त्र हीनाना वस्त्र देऊन रक्षण करणे म्हणजेच दया नियमाचे पालन होय.

ईश्वराने पशूनां अति श्रमाचा भार वाहण्याची शिक्षा दिली असली तरी श्रम सहन करण्याची शक्ती, दयामय होऊन दिली आहे. तृण पर्णादि आहाराच्या कठिण वस्तू सेवन करण्यास कणखर दात दिले आहेत. पाण्यामध्ये बुडूनमरूनये म्हणून पोहण्याची शक्ती ही स्वाभाविक दिली आहे. रात्रीच्या अंधारात फिरण्याची शक्ती त्याच्या नेत्रामध्ये स्वाभाविक आहे. ह्या सर्व कारणावरून विचार केला असता ईश्वर पापी जीवांच्या कृत कर्माला शिक्षा देण्यासाठी शासक होऊन न्यायी म्हणवितो. आणि जीवाच्या ठिकाणी अति दुःख ताप सहन करण्याची शक्ती देऊन कर्म फल भोगण्याच्या कामी दयामय असल्याचे दिसून येते. चराचर सकल वस्तूमध्ये दया तत्व सदा प्रकाशमान आहे. ह्या सृष्टीचे मूल कारण असलेल्या परशिव चैतन्य दयापूर्ण असल्यामुळे त्याच्या अंग प्रत्यांगातून दयारस भरून वाहत आहे.

मानव धर्म मंदिराचा पंचम सोपान असलेल्या दया नियमाची परी समाप्ती होते.

– क्षमा –

बाल्य जीवनांतील मुलाकडून खाण्यापीण्यामध्ये, खेळ-ण्यामध्ये, अज्ञान स्वभावाने कोणताही एखादा सामान्य अपराध घडल्यास आई त्याकडे लक्ष न देता क्षमाकरते. मुलानी कोणती एखादी वस्तू नाश करो, अथवा चोरून नेवो, दुसऱ्याना देवो, बाल्य वयातील अज्ञान सहजावस्थेच्या अपराधाला बहुधा कोणी लक्ष पुरवीत नसतात. एखाद्या वेळी रागेभरले व मारलेतरी. वात्सल्यभावनेने क्षमा संपन्न होऊन त्या मुलाशी प्रेमाने वर्तन करीत असतात. मुला विषयी निर्दय होऊन शिक्षा करावी अशी अपेक्षा बहुधा कोणी करीत नाहीत.कारण त्याच्या पासून होणाऱ्या अपराधामध्ये कोणताही उद्देश नसतो. अहेतुक अपराध असल्या-मुळे त्याना क्षमाकरणे स्वाभाविक आहे. याचें कारण त्या मुलाना अपराध करण्यामध्ये माझे तुझे अशी भावना नसते. खेळण्याच्या नादामध्ये बहुमूल्य वस्तू कोणी मागो, अगर कोणी हातातूनघेऊन जावो, देऊनये म्हणण्याचे स्मरण मात्र तेंवढे असते परंतू त्या वस्तूचा मोह नसतो. ही एक जन्मसिद्ध कर्म बंधन सहजावस्थेची प्रवृत्ति होय. तोच मुलगा मोठा झाल्यास अनैर्सागिक भावनेचे आवरण होऊन, हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचार या दुष्ट प्रमाद-प्रवृत्तिमध्ये अपराध घडल्यास, तो अपराध दुसऱ्याना माहीत होऊनये म्हणून त्याची विशेष अपेक्षा असते. कारण अपराध माहित झाल्यास आपल्याला शिक्षा मिळणे निश्चित असल्याचे जाणून, आपल्या अपराधाला सर्वानी विसरावे व क्षमा करावी म्हणून अहोरात्र तो प्रयत्न करीत असतो.

मानव किंचिज्ञ असल्यामुळे त्याकडून अपराध घडणे स्वाभाविक आहे. अपराधा विषयी आपल्याला शिक्षा न होता

क्षमा करावी अशी अपेक्षा करणे हे सुद्धा स्वाभाविक आहे. आपल्या अपराधा विषयी दुसऱ्या कडून क्षमा झाल्यास मनाला सुख शांति मिळते. शिक्षा झाल्यास अशांति होते. या वरून प्रत्येक मानव क्षमा नियमाच्या द्वारे वैयक्तिक सुख शांतिसाठी परावलंबी असतो. आपण नैसर्गिक क्षमा नियमाचे पालन केल्याशिवाय दुसऱ्या कडून क्षमा संपादन करण्याविषयी तो असमर्थ होतो. क्षमा संपन्न असणारे लोक, मानव समाजामध्ये सन्मानित होऊन श्रेष्ठ व पूज्य समजले जातात. मात्र क्षमा नियम पालन न करणाऱ्या मानवाला राष्ट्र अपराधी समजत नसले तरी, राष्ट्राच्या व्यापक शांतिसाठी सर्वांनी क्षमाशील होणे आद्य कर्तव्य आहे. "पश्चात्तापेन परिशुध्द्यति" या उक्ती प्रमाणे अपराध घडल्यानंतर मनांला पश्चात्ताप वाटून तो शुद्ध होतो. ज्याना आपल्या अपराधा संबंधाने पश्चात्ताप होत नाही, अशा मंदमती मानवाकडून पुनःअपराध घडूनये, अशी त्यांची मनोवृत्ती स्थीर व्हावयासाठी त्यांस शिक्षा देणे आवश्यक असून ते न्याय्य आहे. मनुष्यास क्षमा संपन्न होण्यासाठी अपराधा पासून होणारे नुकसान सहन करावे लागते. क्षमा नियमाचे पालन करणे हे सर्व सामान्याना शक्य नाही. साधु, सत्पुरुष, ज्ञानी, मुनी, त्यागी, तपस्वी, हे सर्व सत्वगुणी असल्यांमुळे, पापी जीवांच्या पाप कर्माकडे व त्यांच्या निंदा स्तुतींकडे लक्ष न पुरविता, क्षमाशील होऊन वर्तन करीत असतात. ते उच्च, नीच, पाप व पुण्य ह्याद्विधा भावनेने न पाहाता, चराचर विश्व ब्रह्म चैतन्याची लीला आहे अशा शुद्ध भावनेत पाहांत असतात.त्या पासून त्यांची कोणी जीव हिंसा करो,नख,नेत्र, हात, पायाचे, छेदन करो, निंदा स्तुती करो ह्या सर्व अपराधाला शाप, ताप, शिक्षा कांही न देता, मरण्यांत्य कष्टामध्ये सुद्धा

कांही लोक अहिंसामय चारित्र्या मध्ये, कांही सत्यमय चारित्र्या मध्ये, कांही अस्तेय चारित्र्यामध्ये कांही दांपत्य जीवनांतील ब्रह्मचर्य चारित्र्यामध्ये आणि आपापल्या तत्व निष्ठ चारित्र्यामध्ये थोडे सुद्धा विचलित न होता शांत व क्षमाशील वर्तन करतात. ही शक्ती महा विभूती लोका शिवाय दुसऱ्याना शक्य नाही.

आई वात्सल्य भावनेच्या कर्म बंधनांत सांपडून आपल्या मुलाच्या अपराधा संबंधाने सदैव क्षमा शील असते. आचार्य, दीक्षा, शिक्षा सामर्थ्य संपन्न असतात. जो कोंणी पुण्य कर्मामध्ये तिरस्कार भावनेने पहातो. त्याला शांप मूळक पश्चात्ताप होण्याजोगे शिक्षा करतो. आणि पतित असलेल्या शिष्याच्या पापराशीला न भीता, तिरस्कार न करता पावन करण्याच्या उद्देशाने अनुग्रह करून उद्धार करण्याच्या कामामध्ये क्षमाशील असतो. ह्या सृष्टी मध्ये आई व आचार्य साधु, सत्पुरुष आदि थोर लोक शांती व क्षमाशील गणले जातात. सत्वगुण प्राधान्ययुक्त लोक दुसऱ्याच्या अपराधाला शिक्षा करण्याने, आपल्या भावनेत मलिनता येते म्हणून क्षमा नियमाचा अवलंब करीत असतात, क्रोधामध्ये भाव अधोवाहीनीं होऊन रक्त कण तापून जातात. त्या पासून ओज तत्व नाश पावते. आणि ज्ञान तंतूनिर्बल होत असल्या कारणाने, क्षमा संपन्न होऊन शांती संयमतेने वर्तन करण्यास तो असमर्थ होतो. आणि आत्मा अनात्म्याच्या विचाराचे अनुसंधान करणे अशक्य होते. क्षमा ही शांतीची पूर्वावस्था आहे. शांती प्राप्तीसाठी क्षमा ही साधन आहे. क्षमा ही केवळ हानी कारक प्रसंगी उपयोगी पडते. "सत्यपि सामर्थ्येअपकार सहनंक्षमा" अपकार करणाऱ्याना शिक्षा देण्याचे सामर्थ्य आपल्याअंगी असून ही, त्याना शिक्षा न करता त्याचे अपकार प्रसन्न मनाने

सहन करून घेणे याला क्षमा म्हणतात.

"क्षमायुक्तस्य तपो वर्धते" (चाणक्य सूत्र) क्षमायुक्त महाजनांची काया, मन, भाव परिशुद्ध असल्यामुळे त्यांची तपःशक्ती वाढत असते.

गायी आदि पशू आपल्या वासरांच्या संरक्षण प्रसंगी क्षमा शांति भावनेत वागत असतात. पृथ्वी सर्व प्राण्याना अन्न वस्त्र देऊन संरक्षण करते. तिच्यावर कोणी बसून पूजा जप करो. संध्या होमादि पवित्र कर्मानुष्ठान करो, निंदा करो, भोजन करो, चौर्य हिंसादि पापकर्म करो, मलमूत्र, विसर्जन करो, तसेच तिला कोणी खंदो, नांगरो, कुळवो, ती जीवाच्या शुभाशुभ सर्वकर्माला, समान अवस्थेमध्ये क्षमा धर्माने राहाते. पृथ्वीच्या अंगी क्षमा धर्म सदैव वास करून असल्यामुळे तिचे क्षमा हे नाव यथार्थ ठरते. तसेच नदीमध्ये स्नान पान करो, त्या पाण्याने देवाचा अभिषेक करो, तीर्थ रूपाने प्राशन करो, अथवा त्यात मलवस्त्र धुवून स्वच्छ करो. ती आपल्या शांतीमय प्रवाहामध्ये भंग न येऊ देता; क्षमा शीलतेने वाहाते. क्षमा ही पूजा जप, ध्यानादि पुण्य कर्मानुष्ठानांत उत्पन्न होणाऱ्या तपःशक्तीला संरक्षण करते.

मानव धर्म मंदिराचा षष्ठम सोपान असलेल्या
क्षमा नियमाची परि समाप्ती होते.



— दान —

ह्या चराचर प्रकृतीच्या गुण धर्माचे पृथःकरण करून पाहिले असता, पृथ्वी तत्व आपल्या उदरापासून अन्नौषधाची निर्मिती करून मनुष्य, पशू, पक्षी, कृमी कीटक आदि सकल प्राण्याच्या संरक्षणाकरीता अन्नौषधी दान करित असते. आप तत्व वर्षाकाली पाऊस पाडून नदी, नाले, विहीरी तळी आदि जलाशय भरून, मनुष्य पशू पक्षी व वनस्पति आदि सर्व जीवांच्या स्नान पान व पोषणासाठी जलदान करते. तेज तत्व पाण्यांत वडवाग्नी, प्राण्यांत जठराग्नी, भूमीत भौमाग्नी, वनांत दावाग्नी, पाक पानादिकामध्ये पाकाग्नी, उन्हाने तापविणारा सूर्याग्नी, यंत्र संचालनांतील विद्युताग्नी, अशा नानाप्रकारे संरक्षणासाठी अग्नी प्रदान करतो. वायू तत्व मानवादि सकल प्राण्यांच्या संरक्षणासाठी श्वासोच्छ्वासद्वारा सदा वाहात प्राणदान करतो. आकाश तत्व पृथ्वी, आप्, तेज, वायू या चार तत्वाच्या कार्यासाठी व सर्व प्राण्यांच्या रक्षणासाठी अवकाश दान करतो. वृक्ष, वेली, आदि वनस्पती आपल्यासाठी न जगता. पशू पक्षादि सर्व जीवांच्या रक्षणासाठी जीवित राहून फल मूलादि दान करतात. नद्या, ओढे तळी, विहीरी, आदि जलाशय आपल्यासाठी न जगता सकल जीवांच्या रक्षणासाठी जल दान करतात. सूर्य चंद्र नक्षत्रादि ग्रह आपल्यासाठी फिरत नसून, सर्व जीवांचा कर्मयोग चालविण्यासाठी प्रकाश दान करीत आहेत. गाई, म्हशी, शेळी आदि पशू आपल्या वासराना वात्सल्य भावनेत दूध दान करतात. आणि मानवाच्या रक्षणासाठी क्षीरदान करतात. बैल, घोडे आदि पशु कृषिकार्यासाठी श्रमदान करतात. आई शिशूला नऊ मास गर्भांत धारण करून असह्य प्रसव वेदना सहन करून देह

दान करते. शिशू आईच्या उदरातून बाहेर येण्यापूर्वीच प्रकृति मातेने तिच्या स्तनामध्ये दुग्ध प्रदान केले आहे. आणि आई आपल्या शिशूच्या रक्षणासाठी अमृतमय दूध दान करते. आई शिशूच्या संगोपनार्थं मल मूत्र शुद्ध करणे, स्नान करविणे, धूत-वस्त्र नेसविणे, जेवण घालणे, बसविणे, झोपविणे आदि सर्व क्रिये-मध्ये वात्सल्य भावनेत सेवा दान करते. आई, बाप, वरिष्ठ लोक आपल्या मुलाना प्रेम करीत असता, बोलत असता, पदार्थांचा परिचय करून देणारे ज्ञानदान करीत असतात. त्या नंतर आचार्य मुलाना विद्या, बुद्धी शिकवून पूर्ण मानव होण्यासाठी ज्ञानप्रदान करीत असतात. प्रकृति मातेने मानवाला जन्म देऊन पूर्णावस्थेला नेण्याच्या उद्देशाने चराचर सर्व वस्तू दान दिले आहेत. अर्थात् जेष्ठ वस्तू पासून कनिष्ठ मानवाला सकल भोग पदार्थं दान रूपांत प्राप्त होणे स्वाभाविक आहे. तेंव्हा "अरे मानवा तू आता पर्यंत जेष्ठ श्रेष्ठ लोकाकडून सर्व भोग वस्तू दान रूपांत संपादन करुन मोठा झाला आहेस. या पुढे तू जागा हो, तुझ्या जन्मसिद्ध कर्तव्याचे पालन कर. तू कर्तृत्वशक्तीने संपादन केलेले सकल भोगपदार्थं तुझ्या पेक्षा श्रेष्ठ व पूज्य असणाऱ्या सर्व लोकाना दान कर."

पंच महा भूतामध्ये पृथ्वी, आप, ही दोन तत्वे अधो-वाहिनी असून, तेज व वायु ही दोन तत्वे ऊर्ध्व वाही आहेत. या दोन तत्वाच्या परमाणूमुळे सृष्टीचा प्रवाह निरंतर चालत असतो. भूमीला बीजारोपण होताच अंकुर फुटून त्याचा वृक्ष होतो. मुळचा भूमीच्या अंतरंगात अधोवाहीनी आहेत. आणि शाखोप-शाखा पुष्प फल ऊर्ध्ववाहीनी होऊन वाढत असतात. एकाचे खाली वाहाणे व दुसऱ्याचें वर वाहणे. या दोन प्रकारच्या

क्रियेपासून वनस्पति स्थिर होऊन वाढत असतात. तसेच वर्षाकालांतील मेघ मंडल अंतरिक्षामध्ये संग्रहित केलेले जलबिंदु अधोवाही होऊन पाऊस पडतो. अनेक जलबिंदूचा संगम होऊन वाहात ओढे, नाले, नदीमध्ये मिसळून, महानदींत समरस पावून अखेर महा सागरांत लय पावतात व या व्यापक महाकार्याच्या अंतर्भूत होवून पुनः भूमीवर असलेल्या अल्प क्षेत्रातील वनस्पती व प्राणी पाणी पीवून जगून वाढत असतात. त्याच्या बरोबर दुसऱ्या एकीकडे सूक्ष्म गतीने ऊर्ध्व वाहिनी क्रिया अखंड पणे चालत असते. सूर्याच्या व वायूच्या उष्णतेने जलकण तापून बाष्प रूपाने ऊर्ध्व वाहिनी होऊन अंतरिक्षामध्ये मेघ रूपाने संग्रहीत होतात. सारांश :– प्रकृति मातेच्या विधानामध्ये एक अधो वाहिनी दुसरी ऊर्ध्व वाहिनी, अशा दोन प्रकारच्या क्रिया सदा चालत असतात. अधो भावनेत तुझ्या भोगासाठी संग्रहित केलेले पुत्र, दारा धनादि सकल भोगोपभोग वस्तू तुझ्या कर्तृत्व शक्तीच्या द्वारे पूज्य, श्रेष्ठ, ज्ञानी, मुनी, योगी, साधू, सत्पुरुष, आणि माता, पिता, आचार्य अतिथी आदि महाजनाच्या सेवेत व राष्ट्रसेवेत ऊर्ध्व भाव भक्तीने समर्पण कर. विसरूनको, विसरलास तर मानव पदा पासून पतित होशील.

– कर्म योग आणि ज्ञान योग –

दानाचे प्रयोजन काय आहे? या प्रश्नाला उत्तर असे की, सृष्टीतील सकल वस्तू आपापल्या उत्पत्ती स्थानी उपयोगी न पडता दुसरी कडे त्याचा उपयोग होत असतो. शेतकऱ्याने उत्पन्न केलेल्या अन्नधान्य, फळ फळावळ आदि सर्व वस्तू दुसऱ्याकडे विकून त्याला अवश्यक असणाऱ्या वस्तू तो घेऊन येतो. दुसऱ्या एका व्यापाऱ्यांनी तांबे, पितळ, आदि भूगर्भ धातू खाणी

पासून संपादन करून, त्या दुसऱ्याकडे नेऊन विकतो. त्याला अवश्यक असणारी भोग सामुग्री आणून उपजिवीका चालवितो. अनावश्यक वस्तू दुसऱ्याना देऊन अवश्यक वस्तू दुसऱ्याकडून घेऊन आपले जीवीत चालविण्याच्या कामी मानव परस्पर सापेक्ष होऊन असल्या प्रमाणे. "अन्नं ब्रह्मेति व्यजनात्" (भृगुवल्ली तैत्तिरीयोप निषत्) तू अधो भावनेत अन्नाला पदार्थ म्हणून न समजता ऊर्ध्वभाव भक्तीने परब्रह्म स्वरूप समज. असा या सूत्राचा अर्थ होतो. आणि "प्रज्ञानं ब्रह्म" चैतन्य रूप ज्ञानच परब्रह्म स्वरूप आहे असे जाण. याप्रमाणे उपनिषद् ग्रंथामध्ये दोन प्रकार सांगितले आहेत. त्याचे समालोचन केले असता मानव सृष्टीमध्ये कर्मयोग आणि ज्ञानयोग असे दोन मार्ग आहेत. उदा :— एकाच चाकाने रथ चालू शकत नाही, त्याला दोन चाके अवश्यक आहेत. किंवा अंतरिक्षामध्ये उडणाऱ्या पक्षाना दोन पंख अवश्यक आहेत. त्याप्रमाणे अनंत व अपार असलेल्या ह्या संसार समुद्रातून तरून जाणेचे साधन कर्मयोग व ज्ञानयोग असे दोन मार्ग अवश्यक आहेत.

अन्न परब्रह्म स्वरूप आहे म्हणून सांगणारा कर्मयोग आहे. अन्नाची उत्पत्ती करणारा शेतकरी कर्मयोगी म्हणवितो. या कर्म योगाचे अनुष्ठान करणे म्हणजे अन्नाची उत्पत्ती करणारा हा कर्मयोगी उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तीन तापाला न भीता तीक्ष्ण असलेल्या काटे धोंडयाच्या असह्य वेदना सहन करीत असतो. कर्म योगाचे साधन असलेल्या वाचाहीन दोन बैला बरोबर मंत्रमय सांकेतिक भावनेने बोलत नांगरणे, कुळविणें पेरणे आदि अनेक कार्य करीत अविश्रांतपणे कर्म योगामध्ये ध्यानसक्त होऊन राहातो. आणि सूर्याच्या तापाग्नीने आतपस्नान

करून अंगाचा घाम गाळतो. लोटक्याने पाणी पीतो. हातावर भाकर घेऊन खातो. भूमीचे अंथरूण व आपल्या हाताची उशी करून, झाडाच्या सावलीचे पांघरूण घेऊन शुद्ध वायूचे सेवन करीत झोपतो. आणि वाघ, सिंह, नाग इत्यादि हिंश्र जीव-जंतूना मुळीच न भीता शेतांत पडून राहतो. बायको मुलानां सोडून, फाटके कपडे नेसून, संसार मिथ्या आहे असे समजणाऱ्या वैराग्यशील योग्याप्रमाणे त्याची वेषभूषा दिसत असली तरी हा संसाराला सत्य समजून जड भावनेने प्रेरित होऊन पुत्र, दारा, धन या मायापाश बंधनांत गुरफटून असल्या कारणाने हा कर्म योगी म्हणवितो.

ज्ञानच परब्रह्म आहे, असे प्रतिपादन करणारा ज्ञानयोग आहे. त्या ज्ञानाचे अनुसंधान करणारा ज्ञानयोगी म्हणवितो. मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे. चैतन्य स्वरूप आहे. मन, बुद्धी, चित्त अहंकारातीत आहे. स्थूल, सूक्ष्म, कारण, तनुत्रयाला साक्षी-भूत होऊन पुनरावृत्ति रहित मोक्ष सुखच अंतिम साध्य समजतो. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा तीन्ही काल समान जाणतो. केवळ कौपीन कटिसूत्र धारण करून भूमीचे अंथरूण करून वृक्ष वेलीच्या छायाचे पांघरूण घेऊन सर्प, विंचू, व्याघ्र, सिंह आदि हिंश्र जीव जंतूना आपले सहचारी समजून गिरी गुहेमध्ये व वन पर्णशाले-मध्ये वासकरतो. प्रकाश अंधार समान जाणतो. तीक्ष्ण असलेल्या काटे धोंडचा मध्ये विहार करीत आपले जीवन व्यतीत करणारा ज्ञान योगी म्हणवितो. हा मानव कुलाच्या आत्मोन्नतीच्या विचा-राचे ज्ञान प्रदानकरीत संचार करीत असतो. हा पुत्र, दारा, धन, त्रिपाश रहित जीवन्मुक्त ज्ञानयोगी म्हणवितो.

कर्म योग आणि ज्ञान योग हे दोन्ही परशिव चैतन्याचा

धर्म आहे. अखेर या दोन्हीची परि समाप्ती परशिव ब्रह्यामध्येच होते. कर्मयोगी त्रिपाशाने बंधित असल्यामुळे त्याच्या अंगी पशुत्व आले आहे. प्रपंचाला सत्य समजून पुत्र, दारा, धन, हेच जीवनाचे अंतिम साध्य आहेत असे समजून तो वर्तन करतो. आज्ञान आवरणामुळे आत्मा परमात्मा स्वरूपाची जाणीव याला नसते.

ज्ञान योगी, या प्रपंचाचे परिवर्तनधर्माला मिथ्या आहे, असे समजून, अखेर याची परिसमाप्ती परशिव स्वरूपात होते असे समजत असतो. आतम तत्वाचे ध्यानानुसंधान करणारा ज्ञान योगी, पुत्र, दारा, धन, या भाव पाशांतून मुक्त झालेला असला तरी पूर्व संचित कर्मानुसार देह पाशाने मात्र बांधलेला आहे. त्या देह रक्षणासाठी अन्नाची अवश्यकता आहे. याला अन्न देणारा कोण आहे? कर्म योगीच आहे. भूक,तहान, लागून ज्ञान योग्याला कर्म योग्याचे स्मरण होते. मात्र कर्म योग्याला ज्ञान योग्याचे स्मरण होत नाही. कारण स्मरण करण्याची पात्रता देखील त्याच्या मनाला नसते. का म्हणजे हा, पुत्र, दारा, धन, या पाशाने बांधला गेला आहे. दोरीने बांधलेल्या पशूला बंधमुक्त करण्यासाठी त्याच्या मालकाची आवश्यकता असल्याप्रमाणें, ज्ञान योगीच कर्मपाशांतून मुक्त करण्यासाठी कर्म योग्याकडे जातो. प्रकाशच अंधारा पर्यंत जाऊन त्याचा नाश करतो. अंतरिक्षांतील मेघजल पृथ्वीवर पडून वनस्पतीचे रक्षण करते.जेष्ठ वस्तूच कनिष्ठवस्तू-प्रत जाऊन संरक्षण करीत असल्याप्रमाणे, ज्ञान योगीच कर्म योग्यापर्यंत जातो. कर्म योग्याचे अन्न खाऊन जीवित चालवीत ज्ञान योगी सहजावस्थेत विराम पावतो. **सारांश** — कर्मयोगी असलेल्या कृषिकाचे अन्न, ज्ञान योग्याच्या जठराग्नीमध्ये हविर्द्रव्या प्रमाणे जळून, त्या अन्न, रसाचे रक्त, मांस, मेध, अस्थि, मज्जा,

अखेर शुक्र होऊन ज्ञानानुसंधानाच्या तपामध्ये तापून "ओज" सत्व निर्माण होंते. ते ओजसत्व ब्रह्मानुसंधानाच्या ज्ञान योगाला उपयोगी पडते. म्हणजे कर्म योग्याच्या अन्नरसापासूनच ज्ञान-योगी आपले तप चालवितो. त्या कर्म योग्याचे अन्न सेवन करून तप करणाऱ्या ज्ञान योग्याने, त्याच्या अन्नाचे प्रति फल म्हणून आपली तप:शक्ती द्यावी लागते. कर्म योगा पासूनच ज्ञान योग लाभत असल्या कारणाने, ज्ञानच परब्रह्म म्हणून सांगितले आहे. ज्ञान योगा पासूनच कर्म योग्याचे कर्मक्षालन होऊन जीवन्मुक्त होतो. कर्मयोग, आणि ज्ञानयोग दोन्ही परस्पर सापेक्ष आहेत. कर्म योग्याचे अन्न दृष्टी गम्य असते. मात्र ज्ञान योग्याची पुण्य-मय तप:शक्ती काया वाचा मनाला जाणवत नसून अति सूक्ष्मआहे. कर्म योग्याचे अन्न, ज्ञान योगी सेवन करीत असतो. त्या अन्नाला पदार्थ म्हणून न समजता प्रसाद भावनेत तो सेवन करीत असतो. त्यामुळे काया, वाचा, मनाला, आनंद होतो.हे अनुभव सिद्ध असून बहिर्दृष्टीला गम्य होणारे नाही. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंच ज्ञानेंद्रियाचे सुख, जाग्रत अवस्थेमध्ये अनुभवाला येते. परंतू अन्न संतृप्तीचे सुख जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तीन्ही अवस्थेत अनुभवास येणारे आहे. अन्नाचा अभाव झाल्यास संताप होऊन झोप येत नाही जाग्रत अवस्थेंत अस्वस्थता येते. उदा—ध्वन्याकर्षक रेडिओ केंद्रात ध्वनिकण प्रसरण पावतात. त्याचे तरंग वायूमध्ये सर्वत्र व्यापून प्राण सृष्टीमध्ये प्रच्छन्न रूपाने संग्रह होतात. पुन: ते ध्वनी तरंग रेडिओ यंत्राद्वारे भूत सृष्टीमध्ये ऐकू येतात.म्हणजे बोललेले ध्वनि तरंग आणि श्वासोच्छ्वास क्रिया एका व्यष्टिमय शरीरामध्यें उत्थान पावल्या असल्या तरी, त्याची व्यापकतासूक्ष्म सृष्टीमध्ये व्यापून जात असल्याप्रमाणे, कर्म योग्याचे अन्नरस

ज्ञान योगाने सेवन करण्याने होणारे आनंदाचे तरंग, व्यापक प्राण भावामध्ये व्याप्त होऊन कर्म योग्याच्या प्राण भावामध्ये प्रवेशकरून जन्मांतरी सुख प्रदायक होतात. तप करणाऱ्या ज्ञानयोग्याला अन्नाची गरज आहे. आणि अन्नाचे उत्पादन करणाऱ्या कर्म योग्याला दुरित निवारण होऊन सकल संपत्ती, आणि शाश्वत मोक्ष सुखाची गरज आहे. "अंध पंगुवदन्योन्यसापेक्षे ज्ञानकर्मणी" अंधळा लंगडचा प्रमाणे कर्मयोग ज्ञान योग हे दोन्ही परस्परसापेक्ष संबंध असणारे आहेत, ज्ञान योग्याला कर्म योगी अन्नदान करून संतृप्त करतो. त्यामुळे सूक्ष्मतर पुण्य फल प्राप्त होते.

दान कर्म विचार

दान करण्याकरीता आपल्या पेक्षा वरिष्ठ व पूज्य लोकांची अवश्यकता आहे. दान करणे परोपकारार्थ नसून आपल्या उद्धारार्थ असते. दान घेण्यासाठी पात्र अपात्र कोण आहेत. याचा विचार करणे अवश्यक आहे. कर्म योगी शेतकरी भूमीच्या पात्र अपात्रतेचा विचार करून तिच्या गुण धर्मानुसार बीज पेरतो आणि काळ्या भूमीत ज्वारी गहू आदि अन्नधान्य पिकतात. आणि तांबड्या भूमीत उस आदि गोड फलवृक्ष वाढत असतात. आणि खडकाळ भूमी फलद्रूप न होता श्रम निष्फळ ठरतात. दान कर्मासाठी सत्पात्र पुण्य जीवी पाहिजेत. कारण दान घेणारा पूज्य असून दान देणारा पूजक असतो. पूज्य पूजक ही दोन्ही पदे कर्तव्य बोधक आहेत. दान घेणारा पूज्य पुण्य कर्मानुष्ठान तत्पर असावा. तप करणाऱ्या योग्यानी आपले उपजीवीकेसाठी, एखादा व्यवसाय स्वीकारल्यास त्याला कालाच्या अभावा मुळे त्याच्या तपाची पूर्ती होत नाही. विद्यार्जन करणाऱ्या ब्रह्मचाऱ्यानी एखादा व्यवसाय स्वीकारल्यास त्याला विद्याभ्यास

करणें शक्य नाही. विद्यार्जनासाठी दान स्वीकार करणे अवश्यक आहे. महापुरुष व आचार्यांनी लोक कल्याणासाठी किंवा महाविद्यालयाच्या योग क्षेमासाठी एखाद्या व्यक्तीच्या कष्टार्जित संपत्तीचा पुरवठा होणे शक्य नाही. म्हणून दान रूपाने येणाऱ्या सामुहिक-धन संपत्तीची अवश्यकता आहे. आपल्या पुत्र; पत्नी आदि कौटुंबीक जनाच्या चरितार्थासाठी मागणाऱ्या निकृष्ट व्यक्तींसाठी दान नाही. लोक कल्याणासाठी विनियोग करणाऱ्या पूज्य व्यक्तींनां दान कर्म असते. दानाद्वारे मिळालेली संपत्ती लोक कल्याणासाठी उपयोगांत आणून त्यांतील कांही अंश आपल्या स्वतः करिता उपयोगात आणल्यास हरकत नाही मात्र स्वार्थासाठी संग्रह करून ठेवल्यास तो पापी ठरतो.

दान घेणाऱ्या करीता सहाकर्मे आहेत. आणि दान देणाऱ्या करीता तीन कर्मे सांगितले आहेत.

यजन–पूजा,जप,ध्यान,यज्ञ,होमादिक पुण्य कर्म आपण स्वतः करणे.

याजन – पूजा, जप, ध्यान, यज्ञ, होमादि पुण्य कर्मानुष्ठान यजमानाच्या वतीने करणे.

अध्ययन – आपण वेद वेदांगाचा अभ्यास करणे.

अध्यापन – वेद वेदांगाचा अभ्यास दुसऱ्यांना सांगणे.

दान –आपण दुसऱ्यांना दान देणे.

प्रतिग्रह – आपण दुसऱ्याकडून दान घेणे.

दान घेणाऱ्या पूज्य व्यक्तिनी वरील सहा कर्मे प्रतिदिन आचरणांत आणावयास पाहिजेत.

दान देणाऱ्या – पूजक भक्तानी यजन,अध्ययन, दान, ही तीन कर्मे प्रतिदिन आचरणांत आणावयास पाहिजेत.

दान घेणाऱ्या पूज्य लोकानी सहा कर्माचे प्रतिदिन पालन

करावे. पालन नाही केल्यास दान कर्मा पासून पतित होवून अपूज्य म्हणवितात.

दान देणाऱ्या पूजक भक्तानी तीन कर्मांचे प्रतिदिन पालन नाही केल्यास, पुण्य कर्मा पासून वंचित होऊन पतित होतात. दान कर्मात नमस्कार विधी सांगितलेला आहे. नमस्कार पूर्वक दान नाही दिल्यास ते दान म्हणविले जात नाही. नमस्कार घेणाऱ्याना पूज्यत्व येण्यासाठी देहशुद्धी, करणारे धर्म संस्कार करणे अवश्यक आहे. त्यापासून तो सहा कर्मांचे पालन करण्यास पात्र होतो.

शिलेच्या देव मूर्तींचे शिलादोष, कर्षणदोष, परिहारासाठी षढध्वशुद्धी संस्कार पूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्याने त्या मूर्तीमध्ये पूज्यत्व प्राप्त होऊन, सर्व विध पूजा घेण्यास योग्यता येते. याप्रमाणे आचार्या पासून षढध्वशुद्धी संस्कार पूर्वक दीक्षा संपन्न शुद्ध देही दान देणाऱ्या पूजक भक्ताकडून प्रतिग्रह कर्मांत पूज्य होऊन नमस्कार घेण्यास पात्र होतो. आणि सगोत्रिय असल्यास आपला वंशज म्हणवून त्याला दान कर्म नाही. गण गोत्रज व ऋषि गोत्रज ब्राह्मण वटूच्या देहला षढध्वशुद्धी पूर्वक दीक्षा संस्कार होत असल्याने तो पूज्य होतो. दान कर्मात नमस्कार घेण्यासाठी त्यास अधिकार प्राप्त होतो.

क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या तीन्ही वर्णाला दीक्षा संस्कार होतो. मात्र त्याच्या शरीराला षढध्व शुद्धी संस्कार होत नसल्यामुळे यांना पूजक भक्त होऊन दान देण्याचा अधिकार आहे. मात्र दान घेण्याचा अधिकार नाही. दान कर्मांत नमस्कार करावा लागतो. त्या शिवाय ते दान पूर्ण फलद्रूप होत नाही. वस्तुतः विचार केला असता दानांतील नमस्कार विधीचे रहस्य अत्यंत

गूढ आहे. दान दिल्या जाणाऱ्या गो, अश्व, भूमी, जल, धन, धान्य, अन्न, वस्त्र, आदि वस्तू मानवाच्या श्रमा पासून प्राप्त होत असत्यामुळे मूल्यवान आहेत. या दान वस्तू जड असून वर्तमानकालीच त्याचा उपयोग होऊन नाश पावतात. परंतु प्रतिग्रह स्वरूपामध्ये दान स्वीकार करणारा आपण जड पदार्थ स्वीकार करून त्याचे प्रतिफल आपली तपोमय सूक्ष्म पुण्य शक्ती दात्याच्या उद्धारासाठी देतो. म्हणजे पाप कर्मरूपी विष पीऊन अमृतमय पुण्यप्रदान करतो. यजमान दान स्वीकारणाऱ्या पूज्याना उद्देशून नम्रता पूर्वक म्हणतो."महाराज आपण दिलेल्या पुण्याशिर्वादाच्या समान मूल्यवान अशी कोणतीही वस्तू माझ्याजवळच काय ह्या सृष्टीत ही नाही. जी, दिल्यामुळे मी आपल्या अपूर्वआशिर्वाद मूल्यांतून पूर्णपणे मुक्त होऊ शकणारनसल्यामुळे, आदान व प्रदान क्रियेमध्ये ऋण निर्देश न करता मला पूर्ण ऋण मुक्त करावे. मी कृतज्ञ होऊन आपल्या दया पूर्णतेला अनन्य भावे नमस्कार करतो."

– दान प्रभेद –

एकाच दान कर्माचे कार्य प्रभेदाने सोपाधिकदान, निरूपाधिकदान, सहजदान असे तीन प्रकार सांगितले आहेत.

फलाभिसंधिसंयुक्तं, दानं यद्विहीतं भवेत् ॥
तत्सोपाधिकमाख्यातं, मुमुक्षुभिरनाद्रुतम् ॥

(सि. शि. सोपाधिदान स्थल)

सोपाधिक दान कर्मामध्ये मी देह धारी असून पुत्र दारा धनादि भोगवस्तू माझ्या आहेत. अशा अहंभावनेच्या ग्रंथीचे भाव पाशाने बांधला जावून केले जाणारे दानकर्म सोपाधिक दान म्हणविले जाते. लंगडा, मुका, अंधळा, रोगी, भूमीहीन,

गृहहीन वस्त्रहीन, अन्नहीन, क्रियाहीन, ज्ञानहीन, विद्याहीन, बुद्धीहीन, असल्या पतित व अपंग जीवानी आपले चरितार्थासाठी मागणे यास याचना म्हणून सांगितले आहे.

यक्ष, राक्षस, भूत, प्रेत पिशाच्च, आदि दुष्टग्रह पीडा परिहारार्थ आणि चोरभय, शत्रुभय, राजभय, चिंता, पिडा, व्याधी इत्यादिकाच्या अनिष्ट परिहारार्थ आणि आयुष्य, आरोग्य, संतती, संपत्ती, विद्या, बुद्धी आदि इष्टार्थ सिद्धीसाठी काम्य कर्मात देणारे दान, काम्यदान आहे.

गर्भाधानादि नैमित्तिक मंगल कार्यात धन धान्यादि वस्तूचा विनियोग करणे नैमित्तिक दान आहे.

हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचार, अपेयपान, अभक्ष भक्षण ह्या निषिद्ध कर्माने अपराध घडून आल्यास त्याच्या परिमार्जनासाठी व्रत उपवास द्वारे प्रायश्चित्त विधी मध्ये उपयोगात येणारे धनधान्य प्रायश्चित्त दान म्हणून सांगण्यात येते. भोगप्राप्ती मध्ये येणाऱ्या अनिष्ट परिहारार्थ आणि सकलैश्वर्य प्राप्तीसाठी काम्य कर्मात करण्यात येणारे दान, मोक्षमार्गात उपाधी निर्माण करीत असल्यामुळे हे सर्व सोपाधिक दान होय.

फलाभिसंधिनिर्मुक्तमीश्वरार्पितकांक्षितम् ।
निरूपाधिकमाख्यातं दानं दानविशारदैः ॥

(सि. शि. निरूपाधि दान स्थल

निरुपाधिक दान कर्मापासून लाभणाऱ्या पुण्याची, फल प्राप्ती आपल्या भोग सुखासाठी अपेक्षा न करता ईश्वर प्रीत्य समर्पण होत असल्या कारणाने हे निष्काम कर्म म्हणविते. ह दान कर्मापासून पुत्र, दारा, धन या त्रिपाशाची निवृत्ती हो असल्यामुळे हे निरुपाधिक दान म्हणून सांगण्यात येते.

सर्व दानामध्ये अन्नदान सर्व श्रेष्ठ दान आहे. त्याला सर्व जीव पात्र आहेत. अतिथी आकस्मिक पणे आपल्या घरी येऊन धन, वस्त्र, गो, कोणतीही एखादी वस्तु मागितल्यास ती वस्तू यजमानाजवळ नसल्यास, अथवा एका पक्षाने जवळ असले-तरी "पात्रानु रूपं दानम्" (चाणक्य सूत्र) या उक्ती प्रमाणे त्या वस्तूच्या दानासाठी पात्रापात्र विचार करणे अवश्यक आहे. आकस्मिक पणे येणाऱ्या अतिथीसाठी दुसरे कोणतेही देणे योग्य नसून, अन्नदान एकच एक योग्य दान आहे.

राजा पासून रंका पर्यंत योगीपासून भोगीपर्यंत विद्या, बुद्धी, आयुष्य, आरोग्य, आदि सकल संपत्ती समान अवस्थेत नसते मात्र हे सर्व अन्न सेवन करून शरीर संरक्षणाच्या कामी समान अवस्थेत आहेत. या करीता अन्न हे अमूल्य आहे. जगातील सर्व उपभोग पदार्थ मूल्याने मिळतात. परंतु या जगात मानव शरीर मूल्यानेप्राप्तहोणारीवस्तू नसल्याने अमूल्य आहे.ब्रह्मचारी,संन्यासी, आदि मोक्षापेक्षी पुण्य जिवांच्या योगक्षेमासाठी अन्नदान हे महा दान आहे. अन्नदान प्रतिदिन सर्वांना लाभावे. सहज सुलभरीतीने पुण्य कर्माचा अवकाश सर्वांना मिळावा. ह्या उद्देशासाठी अन्नदान निष्काम नित्य दान आहे. असे सांगण्यात येते. ब्रह्मचारी, संन्याशी अतिथी अभ्यागत लोक यजमानाच्या घरी येऊन,

"गुरू धर्म स्वयंपाक भिक्षा" "गुरू धर्म सिद्धान्न भिक्षा"
"गुरू धर्म भवति भिक्षान् देही" असे म्हणून दान मागतो. यजमान त्यांना अन्न सामुग्री अथवा सिद्धान्न वाढतो. आकस्मिक पणे आलेल्या अतिथीच्या संकल्पाने स्वयंपाक केलेला नसतो. तथापि यजमान आपल्या भोजनातील अल्प भागाचे दान करतात. तो अतिथी घरोघर संचार करून एकेक घास संग्रह करीत

आपल्या क्षुधा पूर्ती जोगे मागून आणून खाऊन संतृप्त होतो. ब्रह्मचारी, संन्यासी, तपस्वी लोकाकरीता अथवा मठ मंदिरातील अन्नसत्रा करीता, सिद्धान्न भिक्षा मागण्याची आणि वाढण्याची पद्धत चालत आली आहे. कारण ते सर्व लोक एकांगी असल्या-मुळे दळणे, कांडणे, कुटणे, स्वयंपाक करणे, वाढणे, ह्या सर्व कार्याच्या पूर्तीसाठी, सेवक सेविका व अन्न सामुग्री पाहिजे. कोणा कडून कांही अपेक्षा न करणारा केवळ देह रक्षणा पुरतीच अन्नाची अपेक्षा करणारा, अशा वैराग्यशील संपन्न लोकांचा जीवन निर्वाह सुगम रीतीने चालावा, आणि कोणावरही त्यांचा विशेष भार पडू देऊनये, असा ह्या प्रथेचा मुख्य उद्देश आहे. दान देई पर्यंत ती वस्तू माझी असा भाव असून, अतिथीच्या भिक्षा पात्रात पडताच माझी नाही, अतिथीची आहे असा भाव होतो. तो अतिथी एकेक घास अन्न संग्रह करून आपल्या संतृप्ती पुरतेच मागून, तो प्रसाद सेवन करते वेळी अमुक घरच्या यजमानानी विशेष भिक्षा दिली म्हणून त्या अतिथीच्या भावनेला जाणवत नाही. एखाद्या यजमानाच्या घरी आमंत्रण पूर्वक भोजन केल्यास प्रेमाचा संपर्क विशेष वाढून वैराग्यशील ब्रह्मचर्याचे साधनपथ भ्रष्ट होऊनये या हेतूने त्याचा योग क्षेम केवल सिद्धान्न भिक्षे-वरच व्हावा. असा उपक्रम ठरविण्यांत आला आहे. एकेक घासासाठी घरोघर फिरणे हा विचार करण्या सारखा विषय आहे. मी तपस्वी, मी ब्रह्मचारी, मी योगी, मी विद्वान आहे या अहं भावनेला अवकाश मिळत नाही. शुद्ध भावनेत घरोघर संचार करून मागून आणलेले भिक्षान्नच मोक्षाला कारण आहे. असे समजून तो वागतो. धर्म क्षेत्रात दान कर्माला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. राष्ट्रात दान देणारे पुष्कळ लोक झाल्यास आणि

दान घेणारे तपस्वी लोक, कमी पडू लागल्यास, त्या दान कर्माचे पुण्य सर्व मानवानां समान अवस्थेत वाटून जावे. ह्या सामुहिक व व्यापक भक्ती भावनेत घरोघर जावून दान मागण्याची योजना धर्म संस्थेनी केली आहे.

राष्ट्रात पुण्यजीवी कमी होऊन पुण्य कर्माची वंचना करणारे अज्ञ जीवीच ज्यास्त असल्यामुळे त्यांच्या उद्धारासाठी तपस्वी लोक घरोघर संचार करून दान घेत असतात. दानघेणाऱ्या पुण्य जीवांच्या सान्नीध्यात जाऊन दान देणे सर्वांना साध्य नाही. मोह पाशाने बांधल्या गेलेल्या जीवांच्या कल्याणासाठी दया पूर्ण-तेने पूज्य भिक्षुकच त्यांचे कडे जावून त्याना दान देण्याची प्रेरणा करून दान स्विकारतो. कर्म योगातील प्रपंचातील मानव माझे घर, माझे शेत, माझी बायको, मुले असे माझे माझे म्हणत आपण सेवन करीत असलेल्या अन्न पाण्यांत देखील माझे म्हणून अहंभाव करीत असल्यामुळे त्याच्या मध्ये शरीर मोह वाढून बुद्धीमध्ये मालिन्य येते. जाग्रती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थेतील अहंभाव निरसन करण्याचे साधन भिक्षान्न (प्रसाद) सेवन करणे होय. आपल्या संरक्षणासाठी उपयोग केले जाणारे फळ, मूळ, अन्न, पाणी आदि वस्तू देवाला समर्पण करण्याच्या अगोदर त्या पदार्थां विषयी ममत्वाचा अहंकार असतो. देवाला सर्मपित केल्या नंतर माझे म्हणणाऱ्या अहंकाराचे निरसन होऊन, ईश्वर प्रसाद आहे अशी भावना होते. आणि ईश्वराच्या संन्निधीत ओटी पसरून त्या प्रसादाची भिक्षा मागतो. आणि तो प्रसाद सेवन करते वेळी हा ईश्वराचा प्रसाद आहे अशी भावना करतो. असले भिक्षान्न सर्वांना पाहिजेच पाहिजे. ब्रह्मचारी संन्यासी आदि महा जनानी, गृहस्थ लोंकाकडून मागून आणलेल्या अन्नामध्ये किंचित्

देखील अहंभाव येऊ नये म्हणून ईश्वरार्पित करून प्रसाद रूपानं सेवन करतात. निष्काम दानकर्म ईश्वरार्पित भावनेत होत असल्यामुळे फलापेक्षा नसते. जसे सर्वस्वी आश्रय करून असलेल्या शिशूच्या योग क्षेमाचा भार, आई वहात असते. त्याप्रमाणे त्या पुण्य जीवांना ईश्वर कर्ता होऊन इह लोकांतील सकल भोग देवून मोक्ष मार्गासाठी अनुग्रह करतो. कमल पत्र जलांत वास करून असले तरी जला पासून आलिप्त रहाते. त्याप्रमाणे सुख दुःख, निंदा, स्तुति, मानापमानात लिप्त न होता हे सर्व ईश्वराच्या इच्छेने प्राप्त होते. असे जाणून भाव बंधनापासून निवृत्त होऊन निरुपाधिक दानी म्हणवितो.

अदातृदातृदेयानां शिवभावं विचिन्त्य हि ।
आत्मनोऽकर्तृभावं च यद्दत्तं सहजं तु तत् ॥
(सि. शि. मणि सहज दान स्थल)

दान देणारा दाता, हे शरीर मी नाही. मन, बुद्धी, चित्त, अहंकार मी नाही. जाग्रत, स्वप्न, सुषुप्तीसुद्धा मी नाही. या सर्वाला साक्षीभूत असून मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे असे समजतो.

परशिव चैतन्यच दान पदार्थ होऊन दिसतात. दान स्वीकार करणारा अतिथी शिवयोग संपन्न आचार्य ब्रह्मस्वरूप आहे असे जाणतो. अर्थात दान देणारा यजमान दान घेणारा अतिथी आणि दान वस्तू ह्या तीन्ही परशिव चैतन्याच्या लीला आहेत असे समजतो. येथे मी म्हणणारा अहंभाव किंचित्‌ही नसता, दान कर्म होत असल्याकारणाने हे दान षढध्वातीत मोक्ष प्रदायक आहे. आचार्य शिष्याला ज्ञान प्रदान करतो. त्या ज्ञाना समान जगांत कोणतीही वस्तू नाही. अशा अमूल्य ज्ञानापासून

सत्कर्माची प्रेरणा होऊन पाप कर्माची निवृत्ति होते. आणि पुण्याभिवृद्धी होत जन्म जन्मांतरी त्या पुण्याचा संस्कार वाढत तो जीवन्मुक्त होतो.

शिवयोगिनि संतृप्ते तृप्तो भवति शंकरः ।
तत्तृप्त्या तन्मयं विश्वं तृप्तिमेति चराचरम् ।।
(सि. शि. मणि सहज दान स्थल)

शिवयोग संपन्न आचार्य आपले शरीरादिक चराचर वस्तू ब्रह्म चैतन्याचे लीला स्वरूप आहे असे समजून आचरण करतो. अशा शिवयोग संपन्न आचार्यांच्या संतृप्तीसाठी, विनियोग केले जाणारे अन्न ब्रह्मानुसंधानासाठी पोहोंचत असल्या कारणाने, त्याचे तप वाढून त्या द्वारे राष्ट्राचा योगक्षेम सुखमय होतो. आचार्याला तनु, मन, धन, समर्पण केल्यास, अनंत ब्रह्मांडाना पितृस्वरूप असलेला पंचब्रह्मसदाशिव संतुष्ट होतो. त्यामुळे चराचर सृष्टी संतुष्ट पावते.

दान देणारा दाता धन कनकादि सकल वस्तूचा स्वामी मी नसून आचार्य आहेत असे समजून भाव समर्पण करतो.सहज दान करणारा मानव, प्रपंचातील सर्व भोग पदार्थापासून लाभणाऱ्या सुख दुःखामध्ये सहज भावनामय होऊन राहातो. हे सर्व सद्गुरूच्या इच्छे पासून प्राप्त होते, असे समजतो. संपत्तीचामोह त्याच्या भावनेला होत नाही. सृष्टीचा चराचर व्यवहार गुरुरूप आहे. असे अंतर्भावनेत गृहित धरून, बाहेरील कर्म योगांतनिमित्त मात्र होऊन व्यवहार करीत असतो. तो गुरु सन्निधीत गुरुदक्षणा समर्पण करीत असता साष्टांग प्रणिपात पूर्वक, आपल्या दोन्ही तळहातात दक्षिणापात्र धरून गुरुदक्षिणा समर्पण करीत असतो. दान कर्मात दान, देणाऱ्या यजमानाचा हात वर असतो.

दान घेण्याऱ्या अतिथीचा हात खाली असतो.परंतू गुरुदक्षिणा समर्पण करते वेळी गुरूचा हात वर असून शिष्याचे हात खाली असतात. सहज दान कर्मामध्ये दान घेणारा व दान देणारा आणि दानवस्तू हे तीन्ही ब्रह्म स्वरूप आहेत, असे समजून आचरण करीत असल्या कारणाने, उत्पादक (आगामी) कर्माचा खंड पडून, संचित कर्माचे विभाजन होईपर्यंत प्रारब्ध कर्म शिल्लक राहते. जसे पाण्याचा उगम थांबल्यास त्याचा संग्रह व खर्च या दोन्ही क्रिया आपोआपच थांबतात. त्याप्रमाणे सहज दानामध्ये भोगनिवृत्ति होऊन उत्पादक कर्म खंड पडून, विभाजन कर्माची क्रिया आपोआप थांबते. म्हणजे सहज दानी चरम शरिरी (शेवटचे शरीर) होऊन अकर्मी जीवन्मुक्त होतो.

दान कर्माची अत्यावश्यकता :— धर्म क्षेत्रांत दानकर्म मानवाला नित्य संबंधित आहे. जात कर्म (जन्मकाल) विधीमध्ये दान आहे. नामकरण विधीमध्ये दान आहे. सूर्य, चंद्र, गुरु दैवतांच्या दर्शन करवावयाच्या उप निष्क्रमण विधीमध्ये दान आहे. उपनयन, दीक्षा, लग्न, गर्भाधान, पूंसवन, सीमंतोऽन्नयन ह्या सर्व विधीमध्ये दान करणे सांगितले आहे. आणि कर्म योगी जीवानां उद्देशून "तू पेरित असतानां बीज दान करून पेर, उत्पन्न झालेले धान्य घरास आणतानां दान देऊन आण, आणलेले धान्य आहारासाठी कांडीत असताना दान देऊन धान्याचे कांडणे दळणे कर, स्वयपाकासाठी काढून ठेवलेल्या अन्न सामुग्रीतून दान करून नंतर स्वयपाक कर. स्वयपाक झाल्यानंतर सिद्धान्न दान करून नंतर खाजेव, विशेष प्रसंगी तुला एक वेळ जेवण नसले तरी चालेल पण दान कर. शेवटी कोणी घरी मृत झाले असता पुत्र धर्मानुसार त्यांचे लोकोत्तर क्रियेच्या अंत्य संस्कारामध्ये ही दान कर" असे

धर्म क्षेत्रामध्ये दान कर्म जन्म दारभ्य मरणापर्यंत सांगितले आहे. त्या शिवाय जीवन चालत नाही. पति पत्नी पुत्र पौत्रादिकासाठी अधोभावनेत सकल भोगोपभोग पदार्थ सदा उपयोगांत येत असतात. ऊर्ध्व प्रवृत्तीमध्ये दान करण्यासाठी मात्र विवेक व विचार कर्तव्याची अवश्यकता आहे. त्याशिवाय दान करणे शक्य नाही.

मानव दान कर्मामध्ये आपल्या भोग वस्तूंचा वियोग विवेक संपन्न होऊन सहन करतो. मात्र आपली मुलगी दान देण्या विषयी सदा विवेक संपन्न होऊन जागृत राहातो. आपल्या मुलीला मागण्यासाठी योग्य वर यावा अशी अहोरात्र तो चिंता करीत असतो. कोणी मुलीला मागणी केल्यास त्याला आनंद होतो.इतर भोग वस्तू दान मागण्याकरीता कोणी आल्यास मनाला चिंता वाटते. मानवाच्या ठायी असलेली स्वाभाविक दान प्रवृत्ति सदैव जागृत राहावी तिचा विसर पडू नये, या महान उद्देशासाठी त्याची मुलगीच दान देण्याच्या नैर्सगिक प्रवृत्ति द्वारे प्रकृतीमातेचे शासन आहे. त्यामुळे इतर वस्तूच्या दान कर्मासाठी विचार करण्यास आवकाशच राहत नाही.

– दान घेणाऱ्याने पालन करावयाचे नियम –

दान घेणाऱ्या पूज्य वर्गाने सूर्योदया पूर्वी उठून, स्नान संध्यादि नित्य कर्मानुष्ठान करून त्यानंतर दान घ्यावे. स्नान न करीता दान स्वीकार करूनये. मूत्र विसर्जन काली जलाने शुद्ध व्हावे. नंतर हात पाय धुऊन आचमन करावे. प्रतिदिन धूत वस्त्र नेसावे. भिक्षा पात्र स्वच्छ असावे. गुरुदीक्षा घेतल्याशिवाय दान घेऊनये. क्षय, कुष्ट आदि रोग झाल्यास किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने, अवयवांत व्यंग झाल्यास यजमानाच्या वतीने पुरोहित कार्य करूनये. भिक्षा न वाढल्यास असंतुष्ट होऊ नये. त्याचे

मन दुखवू नये. भिक्षा वाढण्याकरीता आलेल्या स्त्रीयाना मातृ भावनेत पहावे. दूर उभे राहून भिक्षाग्रहण करावी. दानद्वारे संपादन केलेली संपत्ती जुगार, धुम्रपान आदि निंद्य कर्मात घालू नये. दान कर्मात प्राप्त झालेल्या गायी, पशू, धान्य, विकू नयेत. दान कर्मात प्राप्त झालेल्या वस्तू तुला अनावश्यक वाटल्यास सत्पात्री दानकर. सत्कर्मासाठीच दान मार्ग आहे. तुझ्या पेक्षा वरिष्ठ पूज्य लोका जवळ आणि गुरुमठांतून दान घेऊनको. पुरोहित विधानासाठी यजमानाकडून पैशाचा निश्चय करून घेऊनको. तू केलेल्या पुण्य कर्माचे प्रतिफल म्हणून मागू नको. यजमानाने आपल्या इच्छे प्रमाणे दिलेले दानच स्वीकार कर. यजमानाच्या वतीने केल्या जाणाऱ्या पुण्य कर्मानुष्ठानामध्ये. मंत्रलोप, भावलोप, क्रियालोप होईल असे देवासन्निधी अपराध करूनको. यजमानाला आशिर्वाद देत असताना त्यांना मनुष्य म्हणून न समजता, शिव स्वरूप समजून मनांत मंत्राचा जप करीत शुद्ध भावनामय होऊन राहा.

– दान देणाऱ्याने पालन करावयाचे नियम –

यजमानाने स्नान केल्या शिवाय दान करू नये. अंथरुणावर बसून दान करूनये उभे राहून विनम्र भावनेने दान करून नमस्कार करावा. मूत्रविसर्जना नंतर हात पाय धुवून शुद्ध होऊन दान करावा. दानासाठी आलेल्या पूज्य लोकांना कठोर वचनाने दुखवू नये. दानासाठी आलेल्या अतिथीनां आसनदेऊन नमस्कार करावा. भिक्षेसाठी आलेल्या लोकांना दीर्घकाल उभे न करीता शीघ्रदान करावे. नित्य नैमित्तिक मंगल कार्यासाठी आलेल्या पुरोहित लोकानां दान देऊन संतुष्ट करून आशिर्वाद प्राप्त करून घ्यावा. ते असंतुष्ट झाल्यास त्या पुण्य कर्माचे फल

तुला पूर्णांशाने मिळणार नाही, "सुरा, मद्य, मांस आदि मादक पदार्थ सेवन करून दान करूनको. सत्पात्रामध्ये दान कर. रजस्वला स्त्रीने दान करूनये. उच्छिष्ट खाद्य पदार्थ दानकरूनये. हिंसा कर्माकरीता दान करूनये. हिंसा कर्मासाठी गाय आदि पशू प्राणी दान करूनको. विद्या दान कर. सात्विक देश भक्ताना मत दान कर. देवता मंदिरासाठी दानकर. देव प्रतिष्ठेसाठी दान कर. दान कर्माला विसरूनको." विसरलास तर इह लोक परलोकाचा मार्ग तुझ्यासाठी सुरक्षित राहाणार नाही.

– अन्न दानाचे महत्व –

अन्ना पासूनच सकल जीव जगून चराचर सृष्टीचे व्यवहार चालत असल्यामुळे अन्न ह्या सृष्टीची जीवन दात्री देवता आहे. ज्ञानाने सकल जीवाचा कर्म प्रवाह चालत असतो. अन्न आणि ज्ञान दोन्ही वस्तू अमूल्य आहेत. मूल्याने विकू नये. अन्न विक्री, विद्या विक्री, न करीता दान रूपांत विनियोग करावा. अन्न आणि ज्ञान विक्री केल्या पासून मानव समाजाचा अपकर्ष होतो. सामुहिक रीतीने अन्नदान नाही झाल्यास, भूमी अन्न धान्याचे उत्पादन न करीता वांझ होऊन दुर्भिक्ष येते. राष्ट्रांत अन्नदान झाल्याशिवाय अन्नाची उत्पत्ती होतनाही. अन्नापासूनच अन्नाची उत्पत्ती होते म्हणून उपनिषद् ग्रंथामध्ये सांगितले आहे.

भूमी निसर्ग सिद्ध असून नांगरणे, कुळविणे, खात घालणे, शुद्धबीज पेरणे, आणि त्या पिकानां कृमी कीटकांचा दोष होऊनये म्हणून विविध उपचार करणे, ही मानवी कृती होय. केवळ एवढ्यानेच भूमी पिकत नाही. ह्या मानवी कृतीला निसर्ग शक्तीचा सहयोग पाहिजे. शेतकऱ्याचे श्रम केवळ भूमी संबंधीच होतात. ऊन वारा, पाऊस व थंडी यांच्या प्राप्ती साठी

त्याच्या बुद्धी ज्ञान श्रमाचा उपयोग मुळीच होत नाही. त्यांच्या प्राप्तीसाठी प्रकृती मातेची प्रसन्नता पाहिजे. आकाशांतील प्राण, भाव, तत्व परिशुद्ध होण्यासाठी सामुहिक अन्नदान पाहिजे. अन्नापासूनच अन्नाची उत्पत्ती होते. याचा अर्थ अन्न दान केल्याने सृष्टीतील व्यापक प्राण, भाव तत्व परिशुद्ध होतात. त्याद्वारे आकाशातून प्राप्त होणारे ऊन, वारा, पाऊस व थंडी हे सर्व प्राप्त होऊन अन्न समृद्धी होते. राष्ट्र सकलैश्वर्याने पूर्ण व्हावयासाठी विद्यादान व अन्न दानाचा प्रयोग प्रत्यक्ष अमलांत आणावयास पाहिजे.

"नान्नतोयसमं दानम्" (सिद्धांत शि. मणि. भक्ती मार्ग क्रियास्थल)

अन्नदान व जलदाना समान दुसरे दान नाही.

अन्नं ब्रह्मेति व्यजनात् ।

अन्न पर ब्रह्म आहे असे समज.

अन्नाद्‌ध्येव खल्वि मानि भूतानि जायंति ।

वस्तुतः अन्नापासूनच सकल प्राणी उत्पन्न होतात.

अन्नेन जातानि जीवंति ।

सर्व प्राणी अन्नांत जन्म पावून अन्नानेच जगतात.

अन्नं प्रयंत्यभि संवि शंतीति ।

मरणानंतर पुनःजन्म घेऊन येण्यासाठी अन्नामध्ये प्रवेश करून जन्म पावतात.

अन्नं न निंद्यात् । तद्व्रतम् ।

अन्नाची निंदा करूनको तें व्रत समजून आचरण करावे

अन्नं न परिचक्षीत् । तद् व्रतम्

अन्नाला तिरस्कृत भावनेने पाहू नये ते व्रत समजून आचरण करावे

अन्नं बहु कुर्वीत । तद् व्रतम् ।

कृषि कर्मद्वारे अन्नाचे उत्पादन वाढव आणि पुण्यात्म्याना दान करून निसर्गाचे अनुकूलतेने वाढ कर. हे व्रत समजून आचरण कर.

न कंचन वसौ प्रत्याचक्षीत् । तद् व्रतम् ।

आपले घरी राहण्यासाठी आलेल्या अतिथीला प्रतिकूल उत्तर देऊ-नको. हे व्रत समजून आचरण कर.

(भृगुवल्ला तैत्तीरीयोप निषत्)

"**श्रद्धया देयम्**" श्रद्धा पूर्वक दान कर.

"**अश्रद्धया देयम्**" श्रद्धे शिवाय दान करू नको.

"**श्रिया देयम्** । तुझ्या आर्थिक स्थित्यानुसार दान कर.

"**ह्रिया देयम्**" । मी दान देत असलेले धन विशेष आहे, असे न मानता अति अल्प आहे. असे समजून विनम्र भावनेने दान कर.

"**भिया देयम्**" पूज्य लोकांच्या सन्निधींत भय भक्तीने दान कर.

"**संविदा देयम्**" (शिक्षावल्ली तैत्तीरीयोप निषत्) पात्रापात्र-तेचा विवेक पूर्ण विचार करून कर्तव्य बुद्धीने सत्पात्रीदानकर.

मानवाच्या व्यक्तिगत जीवन उन्नतीसाठी आपल्यापेक्षा वरिष्ठ पूज्य लोकांना दान करावे. म्हणून आतापर्यंत विस्तार पूर्वक सांगण्यात आले आहे. या पुढे राष्ट्राच्या व्यापक सुख शांती-साठी निसर्ग देवतेची प्रसन्नता व्हावी, या उद्देशाने कुटुंबातील, गावांतील, व राष्ट्रांतील, लोकानी प्रार्थना करून दान मागाव-याचे वेद सूक्त खाली दिले आहेत.

— धन दान याचना —

दिवो वा विष्ण उत वा पृथिव्या ।
महो वा विष्ण उरोरंत रिक्षात् ।
उभा हि हस्तां वसुना पृणस्वा ।
प्रयच्छ दक्षिणादोत सव्यात् । (शुक्लयजुर्वेद ५-१९)

दिवो विष्ण उत वा पृथिव्या ।
महो विष्ण उरोरंतरिक्षात् ।
हस्तौ पृणस्व बहुभिर्वसव्यै ।
रा प्रयच्छ दक्षिणा दोत सव्यात् ।(अथर्ववेद ७-२६-८)

हे भगवान विष्णो आपण भूमीत जन्म पावणाऱ्या अन्नौषधी आणि अंतरिक्षांत जन्म पावणाऱ्या पाऊस थंडी, ऊन, वारा, ही सर्व प्रकारची धन संपत्ती दोन्ही हातांत धारण करा. आणि आपल्या इच्छे प्रमाणे डाव्या हाताने किंवा उजव्या हाताने, ती संपत्ती आम्हास प्रदान करा.

– इच्छा पूर्ति दान याचना –

धनं मे जुषतां देवी सर्वं कामांश्च देहि मे ।। (श्रीसूक्त)

हे लक्ष्मी माते, आपल्या प्रसन्नतेपासून मला धन प्राप्त व्हावे आणि माझ्या मनाची सर्व कामना पूर्ण व्हावी.

– परिवार द्वारा दान याचना –

यायं पात स्वास्तिभिः सदानः (ऋग्वेद ७–१००–७)

हे भगवद् विभूतीनो आपण आम्हा सर्वांचे सदा संरक्षण करा.

तां म आवाह जातवेदो लक्ष्मी मनप गामिनीम् ।
यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योऽश्वान् विंदेयम् पुरुषानहम् ॥
(श्री सूक्त)

हे जात वेद देवा आपण माता लक्ष्मी देवीना माझ्या घरी आणून ठेवा. माझे घर सोडून कधीही तिने जावू नये येथेच विराजमान होऊन राहावे. त्यांच्या आगमना पासून मला, प्रचुर सुवर्ण, गो, अश्व, दास, दासी, आणि पुत्र पौत्रांची प्राप्ती व्हावी.

पश्येमशरदः शतं जीवेम शरदः शतं श्रुणुयाम शरदः । (शुक्लयजुर्वेद
शतम् प्रब्रवाम् शरदःशतं दीनाःस्याम शरदः शतम् ।। ३६-२४)

आम्ही सर्वजण शंभर वर्षं जगून राहावे. नेत्राने पाहात राहावे. कानाने ऐकत राहावे. मुखाने बोलत राहावे. आणि राजा, प्रजा, पिता पुत्र, पति पत्नी, मित्र व मित्रत्व बंधु भगीनी, स्वामी सेवक, व गुरु शिष्य, परस्पर प्रेम शांतीने राहावे. आमचे अन्न वस्त्र धन कनकादि सकलैश्वर्यं युक्त योग क्षेम निरंतर चालावा व कें‍व्हाही दीन दुःखी राहू नये.

– ग्राम नगर द्वारा सुख वस्तू याचन –

इमाॅं रुद्राय तवसे कपर्दिने क्षयद्वीराय प्रभारामहेमतिम्।
यथानः शमसद्द्विपदे चतुष्पदे विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम् ।।
(ऋग्वेद १–११४–१)

आम्ही सर्वजण आमच्या सामुहिक प्रार्थना भगवान श्री रुद्राच्या समक्ष समर्पण करीत आहोत. तो ओजस्वी असून जटाजूट धारी आहे. आणि वीरगण त्यांच्या सेवेत आहेत. त्यांच्या कृपेने आमचा मानव वर्ग व पशु वर्ग सर्वथा सु मंगल असावा. ह्या गावांतील सर्व लोक धष्ट पुष्ट व निरोगी असावेत.

– राष्ट्रद्वारे योग क्षेम याचना –

आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम् ।
आराष्ट्रे राजन्यः शूरइषव्योऽति व्याधीमहारथो जायताम्।
दोग्ध्री धेनुर्वोढा नड्वानाशुः सप्तिः पुरंधिर्योषा ।
जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरोजायताम्
निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु ।
फलवत्यो न ओषधयः पच्यंताम् ।
योग क्षेमो नः कल्पताम् ।। (यजुर्वेद स. २२–२२)

हे परमत्मन् राष्ट्रांतील समस्त ब्राह्मण ब्रह्मज्ञ होऊन ब्रह्मतेजाने जन्मावे. राष्ट्रांतील समस्त क्षत्रिय गण शूर वीर

धनुर्धारी रोग मुक्त होऊन जन्मावा. मधुरमय विपुल दूध देणाऱ्या गायी जन्माव्या. ओझे वाहण्यामध्ये मागे न हटणारे कार्यक्षम बैल जन्मावे. दुर्गम मार्ग अतिशीघ्रपणे संचार करणारे घोडे जन्मावे. पति पुत्र युक्त सौभाग्यवती स्त्रीया जन्माव्या. विजयशील महा पराक्रमी धीर सारथी जन्मावे. राष्ट्राचा यजमान जो राजा त्याच्या पोटी सभावीर पुत्र जन्मावा. अतिवृष्टी, अनावृष्टी, विष-वृष्टी, अकाल वृष्टी न होता वेळो वेळी अवश्यकतेनुसार अमृत-मय वृष्टी व्हावी. आम्हासाठी फल मूलादि अन्नौषधी परिपक्व दशेत असावेत. राजा प्रजा, पिता पुत्र, पति पत्नी, बंधु भगिनी, स्वामी सेवक, गुरुशिष्यादि सकल लोक परस्पर प्रेमाचा वियोग न होता. अन्न वस्त्र धन कनकादि दारिद्र्य दुःखाने पीडित न होता सकलैश्वर्याने आम्हा सर्वांचा योग क्षेम निरंतर राष्ट्रदेवतेसाठी व्हावा.

सृष्टींतील चराचर सकल प्राणी दान तत्वामध्ये जन्म पावून त्यांतच वाढून त्या दानामध्येच त्याचे जीवन समाप्त होत असल्यामुळे दान साम्राज्यांत सकल व्यवहार चालतो.

मानव धर्म मंदिराचा सप्तम सोपान असलेल्या
दान नियमाची परि समाप्ती होते.



– पूजा आणि जप –

पूजा या शब्दाचे आदर, सत्कार, सन्मान किंवा वंदन असे अनेक प्रकारचे अर्थ होतात. व त्यातून प्रेमाचा बोध होतो.

जप या शब्दाचे पुनः पुनः स्मरण, आठवण, अभ्यास, स्तुती किंवा कीर्ती असे अनेक प्रकारचे अर्थ होतात व त्यातूनही प्रेमाचा बोध होतो.

कर्मयोगी माता आपल्या निरतिशय प्रेमात शिशूला नवमास गर्भात धारण करून जन्म देते. निरतिशय वात्सल्य प्रेमाने स्तनाद्वारे दुधाचा श्राव होतो. त्याच्या संगोपन भावनेत आई निरपेक्ष अवस्थेत राहाते. शिशूला हिच्या प्रेमाचे प्रतिफल देण्यास सामर्थ्य नसते. तथापि ती वात्सल्य भावनेने प्रेम करीत असते. शिशूच्या सर्व क्रिया सहजावस्थेत चालत असतात. शिशूच्या अंगी इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्ती अप्रकट असल्यामुळे ते आपल्या अहार विहारादि सर्व क्रियेमध्ये असमर्थ असून, त्याच्या मनाला शरीर धर्माच्या कोणत्याही क्रियेचे स्मरण होत नाही. जठराग्नीचा ताप समजणे, अंथरुणाचा कठिण मऊ पणा समजणे, हे त्वगेंद्रियाचे स्पर्शज्ञान असले तरी, ते आपल्या सुख पूर्तीमध्ये मन बुद्धी आणि शरीराने असमर्थ असते. तथापि आई कडून आपले संरक्षण व्हावे. अशी आपेक्षा करीत नाही. तिने संरक्षण केल्यास सुखाने जगत असते. कमल पत्र अहोरात्र पाण्यांत राहून पाण्यानेच संरक्षण होत असलेतरी त्याला पाण्याचा संपर्क नसल्या प्रमाणे, आई अहोरात्र संगोपनार्थ शिशूच्या भोवतीच जीवन व्यतीत करीत असली तरी, तिच्या कर्तव्याची जाणीव त्या शिशूला नसते. तथापि त्या निरपेक्ष शिशूला आई निरतिशय वात्सल्य प्रेमाने पालन करते. शिशू कर्म बंधनद्वारे त्याच्या ज्ञानावर आवरण

होऊन सुख दु:खामध्ये, क्षुधा तृषेमध्ये, मल मूत्राच्या शूची अशूची मध्ये, स्नान पानादि सर्व प्रकारच्या कार्यामध्ये सहजावस्थेत असून अलिप्त होऊन राहाते. तशा शिशूला आई निरंतर ध्यानात धरून, एकात्म भावनेने त्याचे संगोपन निरतिशय प्रेमात चालवीत असते.

आईने शिशूला विसरुन बहिर्जगाकडे तिचे मन जाताच शरीराच्या अंग प्रत्यांगाचे जाणीवेने दुसऱ्याची लाज वाटून वस्त्र परिधानाने मर्यादित राहते. या सीमित प्रपंचाला विसरून पुनः शिशूकडे तिचे मन गेल्यास निरतिशय प्रेमाच्या वात्सल्य भावनेत सर्व विसरून भावमग्न होतअसते. आईच्या अंगी वात्सल्य भावनेचे निरतिशय प्रेम असल्यामुळे तिने सेवन केलेला आहार दुधाच्या रूपाने परिवर्तीत होत असतो. ती दूध शिशूला पाजवून संरक्षण करते. आई निरतिशय वात्सल्य प्रेममय असल्या कारणानें तिला कर्म योगीनी असे नामाभिधान मिळाले आहे. योग म्हणजे दोन वस्तू तादात्म्य पावून एकात्म रूप होणे. आईला निरतिशय प्रेमाच्या कर्मयोगामध्ये शिशू ही भिन्न वस्तू दिसत नाही. आपल्या शरीराच्या नख, नेत्र, हात, पाय आदि अवयवा प्रमाणे शिशू हि तिला स्वत:चे अंग होऊन दिसते. शिशूच्या संगोपनार्थ इच्छा, ज्ञान क्रिया शक्तीचा निरतिशय प्रेमात उपयोग करीत असते. तीने करीत असलेली सुश्रूषा तीच जाणते. तीत तीने मिळून मिसळून भाव मग्न होऊन आनंदित होते. ती करीत असलेली सुश्रूषा ते शिशू जाणत नाही. कारण त्याचे मन मंत्रमय (प्रछन्न) आहे. शिशूला तेल, साबण, पीठ आदि नानाविध सुगंधीद्रव्याने, मर्दन करून उष्ण जलाभिषेक केल्याचा आनंद आईलाच असून त्याला नाही. तसेच नाना प्रकारचे कपडे घालून

काजळ, चंदन, भस्म, मोती, पवळे, सोने, चांदीचे आलंकार आदि उपचारपूजा सौंदर्याचा आनंद आईला असून त्या शिशूला नाही. शिशू स्तनपानाद्वारे दुग्धामृत सेवन करीत असले तरी त्याचा आनंद आईला असून त्याला नाही. मृदु अंथरुणावर निजविलेला आनंद आईला असून शिशूला नाही. आईच्या वात्सल्य भावनेच्या निरतिशय निर्व्याज प्रेमांत चालणाऱ्या कर्म योगाचा आनंद आईला असून त्याला नाही. हे सर्व शिशूच्या संगोपन कर्मयोगाचा पूजा विधी आई आपल्या निरतिशय प्रेमात समर्पण करते. शिशूचे मन, बाह्य सृष्टीच्या नाम रूपाला जाणत नाही. त्याच्या अंतर्यामी कोणत्याही एका वृत्ती रूपाचा संस्कार होत नाही. मुग्ध शिशू आईच्या गोष्टी जाणत नसला तरी मंत्रमय आपल्या वाणीचा उपयोग करण्यामध्ये ती कंटाळत नाही. आई आपल्या स्तनपान क्रिये बरोबर शिशूला उद्देशून "रडू नको इकडे तिकडे पाहू नको." प्यावयाला उशीर झाला का, भूक लागली का, तुला राग आला का, माझ्या वासरा माझ्या लाडक्या बाळा ! तू स्तन पी असे म्हणत मंत्रमय उपचार गोष्टी सांगत त्या शिशूला निरतिशय प्रेमात स्तनपान करविते. नाना प्रकारे किर्ती स्तुती केली तरी ते न जाणता एका आज्ञात सृष्टीच्या कार्य क्षेत्रांत ते मग्न झाले असावे अशा, गूढ अवस्थेत त्याच्या मनाची क्रिया चालत असते. त्या शिशूच्या मनाला आईच्या मंत्रमय गोष्टी समजत नसल्या तरी, आई आपल्या कर्म योग मंत्रमय वाणीचा जप त्या शिशूला सांगत भाव मग्न होऊन स्वतःला विसरत असते. आई पाळण्यांत शिशूला निजऊन आनंद मग्न होऊन मंत्रमय वाणीने मधुर व मंजूळ स्वरांत अंगाई गीते गात असते.

पाळणा हेच शिव मंदिर, त्यातील शिशू शिव स्वरूप,

आणि आईचे बोलणे उपचार मंत्राचा जप झाले आहेत. रसनेच्या चपलतेने निर्माण होणारे आईचे निनाद शिवद्वारातील घंटा होऊन आईच्या निरतिशय प्रेममय कर्मयोग रूप पूजा चालत असते. आणि त्या शिशू बरोबर ती बोलत तू जेवतोस, तू खातोस, तू घोडयावर बसतोस, रडू नको, काय पाहिजे ते सांग तू आमचा राष्ट्रपति, प्रधान मंत्री किंवा सेनापति होसिल नाहीतर राष्ट्राचा कर्म योगी हो. गुरु होऊन ज्ञान ज्योत प्रज्वलित कर असे अनेक प्रकारे मंत्रमय जप (बोलून) सांगून त्याला खेळविते. निरतिशय प्रेमाचे पुत्रवात्सल्य चित्र प्रत्यक्ष पाहणाऱ्याना शंका येवून ह्या आईला उन्माद होऊन बुद्धीभ्रंश झाला असावा. अथवा वेडी झाली असावी असे वाटते. याचे कारण न बोलणांऱ्या मूक शिशू बरोबर बोलून बोलून निरर्थक जीवन गमावण्याला तिचे अज्ञान हेच कारण आहे असे प्रेक्षक उहा पोह करतील, परंतु ते सत्य नाही. शिशू बरोबर आई बोलत असता तिला माझे बोलणे शिशूला समजत नाही. वृथा श्रम कशाला करावयाचे न बोलणाऱ्या मूक शिशू बरोबर बोलणे उपयोगाचे नाही. अशी जाणीव होताच ती बोलणारच नाही. सीमित प्रेमांत सुख दुःख किंवा लाभ, हानीची जाणीव होते. परंतु आईच्या निरतिशय वात्सल्य भावाचे निःसीम व निर्व्याज निरुपम प्रेम असल्यामुळे देहभान विसरून मंत्रमय जप पठण करीत कर्मयोगामध्ये ती तादात्म्य पावते.

प्रकृति मातेने आईला निरतिशय प्रेमाची सहजावस्था दिली असल्यामुळे शिशूच्या मनाला ज्ञानाचा आहार मिळत असतो. शरीर समृद्धीसाठी अन्न पाहिजे. ज्ञान समृद्धीसाठी वृत्ती विचाराचा अहार पाहिजे. ते प्राप्त होत नसल्यास ज्ञानमय कोष समृद्ध पावणार नाही. आई शिशूला स्तनपान तेवढेच करून त्या

शिशू बरोबर ध्वनि संकेत न करता कांही न बोलता त्याला एकांत स्थानांत ठेवल्यास त्याच्या मनाला ज्ञानाचा आहार प्राप्त होत नसल्याने ते वाचाहीन मुके होते. निरतिशय प्रेमाच्या वात्सल्य भावनेत मुग्ध शिशू बरोबर बोलण्याची नैसर्गिक प्रवृत्ती आईच्या ठिकाणी असल्या मुळेच तिने इच्छा,ज्ञान, क्रिया शक्तीचा वागेंद्रियद्वारा उपयोग करून मंत्र स्वरूप असलेले अनेक बोल, ती बोलत असते. तेच संस्कार शिशूच्या अंगी गूढावस्थेत असलेल्या भाव मनाला पुन: पुन: संपर्क होऊन ज्ञानमय कोष क्रमेण समृद्ध पावत असतो. गूढावस्थेत संचार करणाऱ्या शिशूचे मन प्रथम देवता असलेल्या आईच्या रूपाला जाणते. त्या नंतर तिच्या मंत्रमय ध्वनीला ओळखते. तिने जपणारे मंत्रमय बोलणे जाणत, आई ज्या भाषेत बोलत असते, त्याच भाषेत त्या शिशूचे भाव, मन विकास पावते. शिशूचे काया, वाचा, मन पूर्ण विकास पावण्यासाठी आईच्या निरतिशय प्रेमाची अवश्यकता असल्याचे प्रत्यक्ष प्रमाण आहे. शिशूच्या भाव मनाच्या विकासा बरोबर बाल्यावस्थेचा उदय होतो. सौंदर्य मूर्ती असलेल्या आईचे रूप नेत्राने पाहून कानाने तिचे नाम ऐकून बालकाचेठायी, अविरळ मातृ भक्ती उदय पावते, आईचा वियोग सहन होत नाही. आईच्या सर्व कार्याबरोबर मिळून मिसळून तादात्म्य पावून ते वर्तन करीत असते. आईच्या स्नानामध्ये त्याचे स्नांन, आईच्या भोजनांत त्याचे भोजन, आईच्या शयनांत त्याचे शयन, आईच्या विश्रांतीत त्याचा विश्राम, आई व लेकरू असे दोन विभक्त रूपांत दिसत असले तरी बालकाची काया, मन व भाव आईची काया मन व भावनेत मिसळून तादात्म्य स्वरूपांत वर्तन करीत असल्या कारणाने अशा अविरळ अखंड प्रेमाला भक्ती म्हणतात.

बालकाच्या सर्वक्रिया आईच्या सान्निध्यांत चालत असल्या कारणाने बालकाचे प्रेम भक्तीपूर्ण होते. आईच्या निरतिशय प्रेमाच्या श्रोतामध्ये ते संस्कारित झाले आहे. कोमल वाणीने बोलणाऱ्या बालकाचे बोल, चित्ताकर्षक व मनोरंजक असल्याने मनाला आनंदित करतात. प्रौढ वयस्क मानव सर्वभाषा सर्वविद्या प्राप्त करून पंडित म्हणवित असला तरी बालकाचे बोबडे बोल ऐकून आपल्यांतील पांडित्य विसरून तो विस्मय पावतो हे प्रत्यक्ष आहे. या वरून बाल वाणीच्या मधुर भाषेत साहित्य पूर्णता नसली तरी, सर्व भाषा कोविदाच्या मनाला आकर्षण करण्याची मंत्रमय शक्ती भरून आहे. आईची मंत्रमय तपःशक्ती बालकाच्या अंगी प्रगट होऊन विकास पावते.

बालकाच्या अंगी कायाभाव जागृत होऊन मी शरीरवान् आहे. अशी जाणीव होताच. आपले नाक, कान, डोळे, आदि अवयवाच्या परिचया बरोबर आईच्या मूर्तीचे अहोरात्र ध्यान करीत असतो. आईला पाहाताच त्याला अपार सहजानंद होतो. बालकाचे प्रेम आई विषयीं सहजावस्थेंत असते. आणि आई आपल्या मुलाला सांगते हे पहा तेथे चिमण्या, राघू, आहेत बघ, असे त्याला दाखविल्यास तो मुलगा आईला विसरून त्या पशू पक्ष्याकडे अति प्रीतीने पाहातो. बालकाचे मन आणि पशू पक्षाचे मन कर्म बंधनाने साम्य धर्मी असल्यामुळे प्रथमतः बालक पशू पक्षावर प्रेम करीत असणे स्वाभाविक आहे. पालक आपल्या मुलासाठी कुत्रा, वाघ, सिंह, घोडा, चिमणी, पोपट, आदि पशू पक्षाचीच खेळणी आणून देतात. मुलगा आईच्या मूर्तीला विसरून अनेक प्रकारच्या पशू पक्षाच्या मूर्तीला जाणत असतो. त्याबरोबर आपले घरचे बाप, बहीण, भाऊ, आणि शेजारी यांचापरिचय

होत जातो. तहान भूकेच्या वेळी आईचे स्मरण करून, इतर काळी खेळण्याच्या नादात मन गुंतवून सहजावस्थेच्या कर्मयोगात काल क्षेप करीत असतो. मुलाचें खेळणे निरतिशय प्रेमाच्या सहजावस्थेतील कर्मयोग आहे. मुलाना खेळण्याची अपेक्षा अती असून एखाद्या वेळी तहान भूकेचे सुद्धा स्मरण राहत नाही. मुलाच्या निरतिशय प्रेममय कर्म योगाचे निरीक्षण केले असता, सर्वानाच विस्मय वाटतो. त्याच्या खेळण्यामध्ये सुख दुःख किंवा लाभ हानी दुसऱ्यांना दिसत नाही व त्याला ही समजत नाही. बालक काठीचा घोडा करून त्यावर बसून आपल्या पायाने आपणच पळून घोडा पळतो, या भावनेत तो आनंद मानतो. प्रत्यक्ष पळण्याचे श्रमझाले असले तरी त्याला त्या श्रमाचा भार वाटत नाही. त्याच्याफलाची अपेक्षा देखील नाही. आणि घोड्याला निरतिशय प्रेमाने पाहात असला तरी तो घोडा मात्र त्याच्या प्रेमाला जाणत नाही. मुले चिखलाचा बैल करून पाना पाचोळ्याला कडबा गवत म्हणून खाऊ घालून प्रेम करतात. नांगरणे, कुळवणे, पेरणे, आदि कामे कल्पून भावपूर्णतेने करीत असतात. बैल कडबा खात नाही, पाणी पीत नाही. या मुलाचा प्रेम तो बैल जाणत नाही. तथापि तो मुलगा सर्व क्रिया निरतिशय प्रेमांत करीत असतो. मुली मातीची बाहुली बनवून आपले लेकरू आहे असे समजून त्याला नाहू घालणे, भोजन, शयन, निद्रा आदि उपचाराद्वारे त्या बाहूलीना आदर पूर्वक सत्कार करीत असल्या तरी त्यांचे प्रेम त्या बाहूल्या जाणत नाहीत. काल्पनिक शिशूच्या ठायी वात्सल्य भाव प्रेमानंदाचा अनुभव घेण्याच्या कामी बालीकेचे मातृस्थाननिरपेक्ष सहज कर्मयोग आहे. आणि चुली मांडून वेली व झाडाच्या पानालाच, पोळी, खीर, भाकर, चपाती, भात, भाजी, व सार, अशी

पाक सामुग्री कल्पून जेवावयाला वाढणे, जेवणे, हे परस्पर निरतिशय प्रेमाचा सहज कर्मयोग, निरुपयोगी पदार्थामध्ये निज पक्वान्नाचा आनंद अनुभवण्याचे सामर्थ्य सामान्य नव्हे. सारांश बालक आमच्या खऱ्या घोड्याला बैलाला आपला न जाणता त्याच्या निर्जीव घोड्या बैलावर तो प्रेम करतो. मुली आपल्या खऱ्या आईला आई न समजता. आपणच आई होऊन निर्जीव बाहुली बरोबर वात्सल्य प्रेमांत वर्तन करीत असतात. आणि खऱ्या पाक सामुग्रीचा त्याग करून निरर्थक पदार्थाला खाद्य, पेय, पक्वान्न समजतात. तसेच आपल्या घराला घर न समजता दुसरे एक घरकुल करून खेळतात. जसे चिमणी आमच्या घरांत आपले दुसरे घर (घरटे) करून जीवन चालवीत असते. त्याच प्रमाणे बाल जीवनांतील मुले आई बापाच्या क्षेत्रांत आश्रय करून राहत असले तरी, त्यांच्या मनाला जाणीव नसल्याप्रमाणे आपल्या निरतिशय प्रेम भावाच्या कर्म योगांत त्यांचा जीवन प्रवाह चालत असतो.

मुलाच्या खेळण्याच्या कर्म योगांत त्याच्या जवळ खऱ्या कोणत्याच वस्तू राहत नाहीत. त्यांच्या सर्व क्रिया केवळ शुद्ध भावनेत उदय पावून चालत असतात. मुलाच्या कर्म योग प्रपंच्यात त्याचा परिशुद्ध भावच मूळ कारण असल्यामुळे सर्व कार्य निरपेक्ष भावनेत चालतो. बाल्य जीवनांतील कर्म योग जसे कुंभारीण किडा चिखलांत असून सुद्धा तो निर्लिप्त होऊन राहातो त्याप्रमाणे मुले निरतिशय प्रेम भावामुळे अलिप्त होऊन राहातात. दुसरे लोक मुलांचे खेळ पाहून निरर्थक, निष्प्रयोजक, आहे असे समजतात. कारण फलापेक्ष बुद्धीने वर्तन करणाऱ्या मानवानां ते तसे वाटणे स्वाभाविकच आहे. परंतू अत्यंत गूढ अवस्थेंत आज्ञात अवस्थेंत संचार करीत असलेल्या शिशूच्या मनाला, ह्या सृष्टींत

वृत्ती रूपाने वाहून येण्यासाठी आईच्या निरतिशय प्रेममय कर्म योगाचे संस्कारच मूळ कारण असल्यामुळे मुलाचे मन निरपेक्ष प्रेमात खेळ खेळणे हा स्वाभाविक नियम आहे असे समजावे.

शैशव, आणि बाल्य ह्या अवस्थेंतील मुले आपल्या-पालन पोषणाला असमर्थ आहेत. तथापि आई बापाच्या अंगी निरपेक्ष निरतिशय पुत्र वात्सल्य निसर्ग सिद्ध प्रवृत्ति असल्या-कारणाने मुले रक्षण पावतात. तोच मुलगा इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्तीने मोठा होताच, आपल्या सुख दुःखात आपणच अधिष्ठान होऊन नाना प्रकारचा अभ्यास करून, मी विद्वान्, मी धनी, मी तरूण, वीर, योगी, स्वामी, सेवक, सती-पती व स्त्री पुरुष, या अनेक पदापैकी एका कोणत्या ही पदामध्ये असतोच. आपल्या शरीर संबंधात गौरव व्यक्त करीत सन्मानित भावनेत आपणच स्वतः श्रेष्ठ आहो असे समजून अहं भावनेत वागत असतो. प्रत्येक मनुष्य दुसऱ्याचे दुर्गुण व दुराचार आणि दुर्व्यसनाला निंद्य समजतो. मात्र आपल्यातील दुर्गुणाला ते चांगले आहेत असे समजतो यावरून प्रत्येक मनुष्याने आपणच श्रेष्ठ आहो सन्मानित व्यक्ती आहो. असे समजून वागणे ही निसर्ग प्रवृति असल्याचे दिसून येते. आपण सुंदर दिसावे अशी अपेक्षा स्त्री पुरुषानां स्वाभाविक आहे. वस्त्र परिधान क्रमांत लज्जा संरक्षण, शरीर संरक्षण, असून शरीर सौंदर्य साधन हे अंतिम लक्ष्य आहे, लज्जा संरक्षणा साठी व शरीर संरक्षणासाठी, झाडाच्या पानाची व सालीची (वल्कल) वस्त्रे व पशुचर्म नेसून पांघरून उपयोग करता येतो. परंतू शरीर सौंदर्य साधनेसाठी अशा वस्त्राचा मुळीच उपयोग न होता. रंगी बेरंगी चित्रकलायुक्त जरी पीतांबरादि वस्त्राचा उपयोग होतो. नेसणे पांघरणे या सर्व प्रभेदाचा शरीर सौंदर्यासाठी

उपयोग असून या शिवाय दुसरा उद्देश नाही. मोती, रत्न, हिरे, वैडूर्य, सोने, चांदी, आदी बहुमूल्य 'वस्तूपासून नाना प्रकारचे अलंकार निर्माण करून स्त्री, पुरुष धारण करीत असतात. आपल्या शरीरावरील निसर्ग सिद्ध असलेले केश, सौंदर्य पूर्तीला वाधक आहेत असे जाणून केश कर्तनाचे ही प्रकार अनेक आहेत. ते प्रकाशमय दिसावे म्हणून तेल लावून विचरणे आपले दैनिक कार्य समजून चालत असतात. आपले मुख तेजःपुंज दिसावे म्हणून साबण, स्नो, पावडर आदि वस्तूंचा उपयोग ते करीत असतात. हे सर्व निरर्थक न कल्पिता सौंदर्य साधन हेच अंतिम मानले आहे. मुख हेच आपल्या सौंदर्याचे अग्रस्थान कल्पिले आहे. आपल्या मुखाचे सौंदर्य आपल्याला दिसत नाही. दुसऱ्याच्या दृष्टीला आपले सौंदर्य आपल्या दृष्टीला दुसऱ्याचे सौंदर्य असे परस्पर एकमेकाने पाहून आनंद मानणे हे स्वाभाविक आहे. मी व माझे शरीर ह्या अहं भावाच्या ग्रंथीमध्ये सौंदर्य भाव निर्माण झाला आहे. तो विविध पदार्थामध्ये मिळून मिसळून प्रकट होतो. स्त्री पुरुषाचे शरीर नाना प्रकारचे सौंदर्य साधनाने सुन्दर दिसत असले तरी ते परस्पर पाहाण्यामध्ये त्याची पूर्तता होते. एकाने सुन्दर घोडयावर बसून अति वेगाने पळवित असलेल्या त्याच्या सौंदर्यपूर्ण आनंदाला, निरीक्षण करण्यासाठी दुसऱ्या एखाद्याची गरज आहे. मी विद्वान आहे असे म्हणणाऱ्याच्या विद्वत्पूर्ण वाणी सौंदर्याचा आनंद लाभण्यासाठी ह्याचे तत्व समजणारे श्रोते पाहिजेत. स्त्रीयां नाना प्रकारचे अलंकार धारण करून आपल्या पश्चिम चक्राच्या (बुचडा किंवा वेणी) पवित्रस्थानी पुष्प गुच्छ ठेवीत असतात. ते सौंदर्य त्या पाहून आनंद न मानता आपल्या पतीच्या नीरीक्षणामध्ये उपयोग करून आपण त्या सौंदर्याचा

आनंद मानतात. विचार केला असता आपले सौंदर्य आपल्याला दिसणे शक्य नाही. असे समजून आरशामध्ये आपल्या सौंदर्याचे प्रतिबिंब पाहून आपण दुसऱ्याना सुंदर दिसतो असे समजून आनंद मानतात. जसा सूर्य आपला प्रकाश सृष्टीतील सर्व जीवा-वर पाडून, आपल्या अस्तित्वाचे प्रकाशन करून पुनः त्या जीवा पासून आपण पाहून घेतो त्याच प्रमाणे मानव सुद्धा आपल्या शरीराचे विविध सौंदर्य दुसऱ्याच्या दृष्टीला दाखवून त्या द्वारे आपण आनंद मानीत असतो. आपले सुंदर शरीरच आदरणीय मूर्ती होऊन सौंदर्य साधनपदार्थ हेच पूजा द्रव्य होवून प्रेक्षक समूह हाच त्या सौंदर्याच्या आनंदाला साहाय्यक होतो. ह्या कर्म योगांतील अधोभावाची पूजा सदा चालत असते.

शंकर, दिगंबर, शिव, वीरभद्र आणि सीता, सावित्री, शांता, पार्वती अशा एकेरी मूल नावानेच बोलाविल्यास ते सर्व लोक असंतुष्ट होऊन निंद्य तिरस्कृत समजतात. तेच शंकरराव, दिगंबरराव, शिवप्पा, वीरभद्रप्पा अशा प्रकारे संबोधित होणे आणि सीताबाई, सावित्रीबाई, शांतादेवी, पार्वतीताई अशा गौरवपूर्ण नावाने बोलावल्यास आपल्या आई बापा समान दैवी भावनेत समजून आम्हाला स्तुती (जप) पूर्वक प्रेम करतात म्हणून आनंद मानीत असतात. हा अतिथी होऊन दुसऱ्याचे घरी गेल्यास ते स्वागत पूर्वक त्याला शरणार्थी भावनेत आदर सत्कार पूर्वक हात जोडून स्तुती वंदन, केल्यास आनंद होतो. आपण दया-शील, शांत, गंभीर, धीर, वीर आहात व पुनः पुनः अशी स्तुती (जप) केली असल्यास त्याला आनंद होतो. ह्याचे शील सद्-गुणांची महती दुसऱ्याने जाणून गुण गान नाही केल्यास ह्यांच्या-तील गुण वैशिष्ट्य प्रकाशित होणार नाहीत. मानवांच्या

कर्मयोगांत स्तुतिजप, स्वाभाविक असून ती निरंतर चालत असतात. प्रत्येक मनुष्य आपल्याला दुसऱ्याने आदर करावा, सत्कार (पूजा) करावा, अशी अपेक्षा करीत असतो. या वरून पूजा नियम मानवाला नैसर्गिक आहे. दुसऱ्याकडून आदर, सत्कार (पूजा) झाल्यास मनाला सुख शांति मिळते. आनादर झाल्यास अशांति होते. प्रत्येक मानव दुसऱ्याकडून आपली स्तुती (जप) कीर्ती व्हावी अशी अपेक्षा करीत असतो. दुसऱ्याने स्तुती कीर्ती गाईल्यास मनाला सुख शांती मिळते. निंदा अपकीर्ती केल्यास अशांति होते. या वरून पूजा, जप नियम मानवाला स्वभावसिद्ध आहेत. पूजा व जप नियम आपण दुसऱ्याविषयी आचरण करून पालन केल्याशिवाय दुसऱ्या कडून आपल्या आदर सत्कार (पूजा) आणि स्तुती, कीर्ती (जप) हे प्राप्त करण्याचे कामी असमर्थ होतो. मानव राष्ट्राचा अंशीभूत घटक असल्यामुळे व्यापक शांती संरक्षणासाठी पूजा, जप नियमाचे परिपालन करणे मनुष्याचे आद्य कर्तव्य आहे.

– प्रेमाचा विमर्श –

मानवाच्या कर्मयोगामध्ये दुःख निवृत्ती सुखप्राप्ती हेच मुख्य साध्य आहे. दुःख निवृत्ती मध्ये रोगादिकांच्या परिहारा साठी औषध उपचार व आरोग्य संपन्नतेसाठी अहार विहार आणि विषय सेवनामध्ये नियमितता असणे अवश्यक आहे. सुख-प्राप्तीसाठी पुत्र, दारा, धन अथवा पति, पुत्र, धन ही तीन साधने असणे अवश्यक आहे. ह्या पासून मानवाचा कर्मयोग निरंतर चालत असतो. आपण कर्ता असून पुत्र, दारा, धन किंवा पुत्र, पति, धन हे कर्मयोगाला साहाय्यक आहेत. पतीवर असलेले पत्नीचे प्रेम पतीसाठी नसून ते तिच्या आत्म सुखासाठी आहे.

पत्नीवर असलेले पतीचे प्रेम पत्नीच्या सुखासाठी नसून ते त्याच्या आत्म सुखासाठी आहे. धनावर असलेला लोभ धनासाठी नसून तो आपल्या सुखासाठी आहे. पुत्र, दारा, धन अथवा पुत्र, पति, धन, या तीन साधनापैकी मानवाच्या मनाला कोणतेही एक सतत पाहिजेच आहे चतुष्पाद पशू पाशाने बांधला गेल्या प्रमाणे देह मात्र असलेला अहंभावाचा मानव आपल्या भोग सुख समृद्धी साठी पुत्र, दारा, धन अथवा पुत्र, पति, धन ह्या तीन साधनाच्या द्वारे भाव पाशाने बांधले जावून पशू झाला आहे. पुत्र, दारा, धन, अथवा पुत्र, पति, धन, अधोभावनेत सुख, दुःख, निंदा, स्तुती, मान, अपमान, लाभ हानी अशा दोन प्रकारचा अनुभव येतो. शिशू आईचे एक स्तन पीत पीत, दुसऱ्या स्तनाला स्पर्श करीत चिंतन करीत असल्याप्रमाणे, पुत्र, दारा, धन, या पासून होणाऱ्या आनंदाचे द्वंद्व प्रभेद आहेत. इषण त्रयामधील प्रेम, दुःखनिवृत्ती सुख प्राप्तीला अनुलक्षून चालत असल्या कारणाने हे अधोवाहीनी प्रेम खंडरूपाने दिसत असते.

कर्ण (कान) त्वचा (चर्म) नेत्र (डोळे) रसना (जीभ) घ्राण (नाक), या पंच ज्ञानेंद्रियांचा स्वभावधर्म क्रमेण शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, ह्या विषय सुखाचा अनुभव घेण्यासाठी मुख, हस्त, पाद, गुह्य, (जननेंद्रिय) आणि गुद, हे पंच कर्मेंद्रिय साहाय्यक आहेत. डोळ्याने पाहात पुढे मार्गचालण्यासाठी पाय सहाय्यक आहेत. रसने पासून सेवन केलेल्या अन्नजलाने उत्पन्नझालेले वीर्य मूत्र विसर्जन करण्यासाठी गुह्येंद्रिय साहाय्यक आहे. नासिका पासून श्वासोच्छ्वासमूलक प्राणवायू सेवनकरीत असून त्याला गुदेंद्रिय अपान वायू द्वारे मल त्याग करण्यामध्ये साहाय्यक होते. कर्णेंद्रियाने ऐकलेले शब्दाचे उत्तर देण्यास वागेंद्रिय साहाय्यक होते.

त्वगेंद्रिय स्पर्श धर्मात कठीण मऊ जाणण्यासाठी हात साहाय्यक होतात. नेत्राला पाय, रसनेला गुह्य, घ्राणाला गुद, कर्णाला मुख, आणि त्वचेला हस्त या प्रकारे कर्मेंद्रिय व ज्ञानेंद्रिय परस्पर संबंधित आहेत.

जीवात्म्याला पंच कर्मेंद्रिय, पंचज्ञानेंद्रिय हे जाग्रत अवस्थेतील जड शरीराचे स्थूल आवरण आहे. स्वप्नावस्थेमध्ये प्राणमय शरीर सूक्ष्म आवरण आहे. मी म्हणविणारा अहंभाव ज्ञप्ती (जाणीव) मात्रांत अनुभवण्याचे, गाढनिद्रा रूप सुषुप्ति अवस्था हे कारण शरीराचे आवरण आहे. आत्मा स्थूल, सूक्ष्म, कारण, आवरणानी ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रियद्वारे सुख दुःखाचा अनुभव करीत असतो. आत्मा स्वभावतः प्रेम स्वरूप आहे.

"अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् (नारद भक्ती सूत्र ५१)

आत्मा प्रेम स्वरूप अनिर्वचनीय आहे. प्रेमाची मनोभावनेला प्रतीती होत असली तरी प्रत्यक्षपणे त्या प्रेमाची मूर्ती डोळ्यानां दिसत नाही. वाणीने वर्णन करून सांगणे साध्य नाही. आईच्या पुत्र वात्सल्य प्रेमात शिशूला खेळवित असता तिच्या नेत्र व मुखाचे हाव भाव, प्रेमातिशयाने कवटाळून धरीत असल्यावेळी, योग मग्न योग्या प्रमाणे दिसणारे तिचे सौंदर्य या सर्व बहिर्क्रिया दिसत असल्या तरी ती आतील प्रेमाची परिक्रियाआहे. परंतु ते प्रेम नव्हे. प्रेम, परिक्रिया पासून अनुभवाला येते. कोणत्याही इंद्रियाला गम्य होत नसल्यामुळे ते अनिर्वचनीय म्हणविते. परस्पर दोन मित्राची भेट झाल्यास प्रेमाच्या आनंदामध्ये एक मेकाना आलिंगन देणे, बोलणे, हसणे, आनंदमानणे या सर्व बहिर्क्रिया प्रत्यक्ष दिसत असल्या तरी त्या प्रेमाची परिक्रिया आहेत. मात्र प्रेम दिसणें शक्य नाही. ते विविध परिक्रिये पासून

अनुभवाला येत असल्या कारणाने अनिर्वचनीय स्वरूप आहे. दांपत्य जीवनांतील स्त्री, पुरुष प्रणय प्रेमांत देहभान विसरून आनंदांत असल्यावेळी त्यांचे वाचा, मन, भाव थांबून जातात. या सर्व बर्हिक्रिया पासून प्रेमाचा अनुभव होतो. वस्तुतः प्रेम हे अनिर्वचनीय आहे. मूलतः आत्मा प्रेम स्वरूप, आनंद स्वरूप, सुख स्वरूप आहे. इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीने नाम रूपमय होऊन, पंच कर्मेंद्रिय, पंच ज्ञानेंद्रियद्वारे सुख दुःखाचा अनुभव करतो. तरुण स्त्री पुरुषामध्ये प्रणयप्रेम प्रच्छन्नरूपाने स्वाभाविक आहे. लग्नविधीच्याद्वारे त्याचे विभाजन होते. पती पत्नीचे ठिकाणी वात्सल्य भाव प्रच्छन्न असून, त्या प्रेमाचे संतती निर्मितीत प्रत्यक्ष विभाजन होते. धनाचा लोभ मनुष्याला स्वभाव सिद्ध असला तरी ते व्यवसायद्वारे लाभून धन प्रेमाचे विभाजन होते. पुत्र, दारा, धन, व पुत्र, पति, धन, हे मूल सुख पदार्थ नसून प्राणमय सूक्ष्म शरीरांत प्रच्छन्नरूपाने असलेल्या भोग सुख विकासाचे साधनपात्र आहेत. जसे आरशामध्ये पाहिल्यास त्याचे मुख त्यालाच दिसते. याप्रमाणे, प्रेमस्वरूपाचा आत्मा अनंत विध प्रेयमय, भोग पात्रामध्ये आपले प्रेम ओतून आपण आनंद भोगीत असतो. आत्मा नेत्रद्वारे रूप सौंदर्य पाहून आनंदीत होतो. रसनेद्वारे रस सेवन करून आनंदित होतो. घ्राणेंद्रियद्वारे गंध सेवनकरून आनंदित होतो. त्वगेंद्रियद्वारे प्रेमी वस्तूच्यास्पर्शाने आनंदित होतो. अशा पंच ज्ञानेंद्रिय द्वारे पाच प्रकारच्या सुखाचा अनुभव येत असला तरी सुख अनुभवणारे प्रेम स्वरूप आत्मतत्व एकच आहे. उदा – झगझगीत प्रकाशमान दिव्य प्रदीप मूलतः शुभ्र असून त्याच्यावरील काचेवर हिरवा, पिवळा, तांबडा, निळा, अशा कोणत्याही, रंगाचे आवरण झाल्यास शुभ्र प्रकाश आवरण

रंगाच्या धर्मानुसार विविध रंगात दिसून येतें.

ध्वनि शास्त्राच्या नियमानुसार आकाशांत वायुच्या आघातामुळे नादोत्पत्ती होत असते. "अ" असी नादोत्पत्ती होऊन "अ" कारो ब्रह्म स्वरूपम् "अ" कार, नाद ब्रह्म आहे. "स" या व्यंजनामध्ये "अ" स्वर जोडल्यास "सा" स्वराची उत्पत्ती होते. एकच "सा" स्वर आरोह अवरोहामध्ये सा. री. ग. म. प. ध. नी. असा सप्त स्वर होत असल्या प्रमाणे, प्रेम स्वरूप आत्म्यावर पंचज्ञानेंद्रिय पंच कर्मेंद्रियाच्या संस्काराने विविध प्रकारच्या सुख दुःखाचा अनुभव येत असला तरी, सुख दुःख जाणणारा आत्मा एकटाच आहे. प्रेम स्वरूप आत्मा नेत्राद्वारे मूर्तीला पाहून आनंद मग्न झाला असता त्या काली दुसऱ्या घटनेला तो जाणत नसतो. कर्णेंद्रिया द्वारे गानानंदामध्ये मग्न झाल्यावेळी त्यास दुसऱ्या घटना जाणवत नाहीत. भोग पदार्थ सुख दुःख ग्रहण करणारी इंद्रिये अनेक असली तरी, सुख दुःखाचा अनुभव करणारा प्रेम स्वरूप आत्मा शरीरामध्ये एकटाच आहे. एका काळी एकाच इंद्रियाचे सुख अनुभवित असतो. चैतन्यरूप आत्मा शरीरमय होऊन अनुभव करणारा विषयानंद जड आहे. उदा – साखरेत रुची आत बाहेर व्यापून आहे. त्या मूल साखरेचा पाक बनवून पशू, पक्षी आदि अनेक नाम रूपमय खेळण्याच्या रूपामध्ये परिवर्तित केला असला तरी, ती साखरच होय. साखरेत, पाकात अनंत बाहुल्यात रुची व्यापून असली तरी साखरेच्या परिवर्तन धर्मा पासून रुची अलिप्त आहे. साखरेला होणाऱ्या अनंत संस्काराला त्या रुचीने आपल्या मध्ये कल्पून घेतल्या प्रमाणे नाम रूपाला साक्षीभूत असलेला आत्मा अज्ञान आवरण मय होऊन इंद्रियामध्ये व्यापून इंद्रियच मी आहे असे समजून विषयानंदाचा

अनुभव करीत असतो. या आनंदाला सविकल्प आनंद म्हणतात. आई आपल्या मुलाला कवटाळून निरतिशय प्रेमांत डोळे मिटवून स्वतःस विसरून मुलालाही विसरते त्या प्रमाणे दोन्ही जीवाच्या संगमामध्ये प्रेमाचे ऐक्य होऊन अत्यल्प काल सविकल्प आनंद होतो. दांपत्य जीवनाच्या विषय सुखामध्ये त्यांच्या प्रेमाचा संगम होऊन आपण स्त्री–पुरुष आहोत ही भावना देखील विसरून अती अल्प काल त्यांना सविकल्प आनंद होतो. रसना विविध पदार्थांच्या रसानंदामध्ये व कर्ण नादानंदामध्ये मग्न होऊन चित्तातील वृत्ती अत्यल्प काल थांबून सविकल्प आनंद होतो.

मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे असे आपल्या सहज स्थितीने आत्मानुभावाच्या ज्ञानामध्ये तन्मय होऊन चैतन्यमय आत्मानंदाचा अनुभव घेणे हा निर्विकल्प आनंद आहे.

जल, स्थल, काष्ठ शिलेमध्ये, पशू पक्षामध्ये, स्त्री पुरुषामध्ये, निंदा स्तुती मध्ये व मानापमानात देखील ब्रह्मभाव होऊन हे सर्व परशिव चैतन्याचे स्फुरण आहे असे जाणून तो त्याची लीला आहे म्हणून अंग (जीव) लिंग (ब्रह्म) सामरस्य पावणारी अविरळ जीवन्मुक्ती म्हणजेच सहजानंद होय. सारांश :– विषयानंद कर्म संश्रुतीचा आवरण करणारा आहे. शुद्ध आत्मानंद कर्म निवृत्त करणारा आहे. लिंग(ब्रह्म)अंग(जीव) सामरस्य अविरळ सहजानंद मोक्षप्रदान करणारा आहे.उदा–विद्युत् शक्ती मानवाच्या सुख सौकर्याचे साधन होऊन घर झाडणे,स्वयंपाक करणे, पाणी तापवणे, अंधार नाहीसा करणे, दळणे,कांडणे,ओढणे अशा नाना प्रकारच्या यंत्रामध्ये प्रेरित होऊन काम करीत विभाजन होत असल्या वेळी अनुभवासयेते. विद्युत् शक्ती उत्पादन काली गम्य होत नसून विभाजन कालीच गम्य होते.

भूमीला नांगरून कुळवून स्वच्छ करणे ही उत्पादन क्रिया होय. त्यांत बीज पेरून पीक वाढविणे ही त्रिभाजक क्रिया होय. एक उत्पत्ती होऊन दुसरी उत्पत्ती होण्याच्या मध्य काली नामरूपातीत अमूल्य अवस्था असते. पेरण्या योग्य शुद्ध भूमी-मध्ये लाभ हानी, सुख दुःख, कांही अनुभवाला येत नसून पेर-ण्यासाठी केवळ शुद्ध भूमीच असते. त्याप्रमाणे निरतिशय प्रेमाच्या ऊर्ध्व भावनेत इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्तीचा विनियोग करणे म्हणजे अनंत भोग सुख पदार्थाला कारणीभूत असलेल्या "भाव" द्रव्याचा संग्रह करणे होय. भाव द्रव्य संग्रह करणे हे उत्पादक कर्म आहे. या वर्तमान काली संग्रहित केलेल्या भाव द्रव्याचे जन्मांतरी सुख पदार्थाच्या रूपाने विनियोग होऊन भोग विभाजन होते. उदा – चिखलाच्या गोळ्यामध्ये ब्रह्मा, विष्णु रुद्र, लक्ष्मी, पार्वती आदि अनेक रूपाच्या मूर्ती जन्मतात. व कांही कालानंतर त्या मातीतच लय पावतात. एका मूर्ती पासून दुसऱ्या एका मूर्तीची उत्पत्ती होत नाही. ती मूर्ती मूल मातीत रूपांतर करून अमूर्त स्वरूपाच्या चिखलाचा गोळा बनवून त्याला इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्तीचा उपयोग केल्याने अनंत मूर्ती उदय पावतात. मूळ चिखलाच्या गोळ्यांत विशिष्ट नाम रूपाकृती दिसून येत नाही. याचे कारण की, त्यांत सृष्टीचे अनंत नाम रूप अप्रत्यक्षपणे गर्भित आहेत. गोळा नाम रूपाचे भांडार म्हणून जननी झाला आहे. अल्पज्ञ मानवाला एकाच वेळी अनेक नाम रूप जाणण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे तो दिग्मूढ होऊन, त्या चिखलाच्या गोळ्यामध्ये कोणतेही नाम रूप नाही असे समजतो. मानवाच्या उत्पत्तीमध्ये देखील शरीरापासून शरीर जन्मत नसून त्याचे रजो-वीर्य बिंदू रूपांत पतन होऊन पुढे तो मूर्तीमंत होतो. वृक्षापासून

वृक्षाची उत्पत्ती होत नसून, नाम रूपातीत बीजामध्ये वृक्षाची उत्पत्ती होते. यावरून सृष्टीच्या सकल नामरूप वस्तू नाम रूपातीत अवस्थेत उदय पावत असल्या प्रमाणे नाम रूपमय पुत्र, पति पत्नी, धन आदि नाम रूपातीत असलेल्या मूल भाव द्रव्यामध्ये उत्पन्न होतात. या वर्तमान काळी ऊर्ध्व भावाच्या निरतिशय भक्ती प्रेमात; इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीचा उपयोग होण्यापासून नाम रूपातीत अवस्थेत परिशुद्ध भाव द्रव्य प्राणमय सुक्ष्म शरीरा मध्ये प्रच्छन्न रूपाने संग्रहित होत असते. ते भाव द्रव्य पुनः जन्मांतरी नाम रूपमय पुत्र, पति, पत्नी, धनादि भोग रूपांत मूर्तीमंत रूपाने विभाजन होते.

विविध आलंकार व वस्तू निर्माण करावयास सोनार सुवर्ण, कुंभार माती, सुतार लाकूड, संग्रह करून, त्या त्या वस्तू निर्माण करीत असतात. अथवा शेतकरी शेतात धान्य पिकवितो. नंतर ते धान्य आपल्या स्वतःच्या उपयोगासाठी अथवा पेरण्यासाठी बीज रूपाने संग्रह करण्याचा निर्णय, शेत सांगत नसून, शेतकरी आपल्या परिस्थिती अनुसार मनाने ठरऊन कांही बीज संग्रह करतो.बीजासाठी संग्रह न करीता खाण्यासाठीचसर्व धान्याचा उपयोग केला तर पुढच्या पिकाच्या उत्पादनाला बीजाच्या अभावी तो परतंत्र होतो. त्या प्रमाणे मानवाने मागच्या जन्मीच्या पुण्याने आयुष्य, आरोग्य, संतती, संपत्ती, विद्या, बुद्धी, पति पत्नी आदि चेतन व अचेतन भोग पदार्थ प्राप्त केले आहेत. त्यातून कांही भाग आपल्या कर्तृत्व शक्तीने उर्ध्व भावनेत, ईश्वर प्रणिधान रूपी पूजा,जप या नियमांत उपयोग करण्याने तो भाव नामरूपातीत अवस्थेत सूक्ष्म शरीरांत संग्रहित होऊन, जन्मांतरी विविध भोग रूपाने प्रत्यक्ष मूर्तीमंतरूप धारण करून त्याचे सुख रूपाने विभाजन होते.

मानव, आई पासून जन्म पावून निरतिशय प्रेमांत वाढतो. आई, बाप, आजा, आजी, बहीण, भाऊ, आदि वरिष्ठ पालकानी उचलून कडे खांद्यावर घेऊन वात्सल्य भावनेत प्राकृतिक बंधनानुसार त्याचे पालन पोषण केले आहे. आणि आचार्य शिक्षक आदि वरिष्ठ पूज्य लोकाकडून, विद्या, बुद्धी, ज्ञान संपादन करून मोठा ज्ञानी म्हणवितो. आणि तारूण्यांत पुत्र पति, पत्नी धन या अधो भावांचे आवरण होऊन सर्व कांही विसरतो. ऊर्ध्व भावनेत इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीचा विनियोग करण्याच्या साधनाला पूजा व जप म्हणतात.

– पूजा जपाचे समालोचन –

पूजा – म्हणजे आदर, सत्कार, सन्मान, आणि वंदन अनेक अर्थ देणारा पूजा शब्द मानवाला प्रेमाचा बोध करतो. पूज्य लोकांचा आदरकर, त्यांच्या बरोबर विनम्र भावनेने आचरणकर, पूज्य लोकांच्या योग क्षेमासाठी अवश्यक वस्तू द्वारे सेवा भावनेत त्यांचा सत्कार कर, आणि पूज्य लोकांच्या समोर अहंकार भावनेत न वागता पूज्य पूजक भावनेत वाग. अनन्य भक्तीने शरणार्थी भावनेत तुझे व्यक्तित्व समर्पण कर. वंदन कर, अशा प्रकारे पूजा शब्द निरतिशय प्रेमाचा बोध करतो. पूजा शब्दाचा अक्षरशः अर्थ केल्यास "पू" म्हणजे पूत, शुद्ध पवित्र आणि "जा" म्हणजे जन्म पावणे. म्हणजे पवित्र शुद्ध, कर्म जेथे जन्म पावतात. तो पूजा विधी होय. निरतिशय प्रेमांत जे पवित्र पुण्य कर्म जन्म पावतात ते सर्व पूजा विधी आहेत. असे समजावयास पाहिजे. "पू" म्हणजे पूर्व "जा" म्हणजे जनित तुझ्या पूर्वी जन्म पावलेल्या जेष्ठ, श्रेष्ठ, व्यक्तींच्या, व प्रकृति मातेच्या चराचर सृष्टी देवतेशी पूज्य भावनेत वर्तन कर. असा पूजा शब्द नाना प्रकारच्या

प्रेमाचा बोध करतो.

जप म्हणजे पुनः पुनः स्मरण करणे, अभ्यास, अठवण, स्तुती, कीर्ती जप, असे अनेक विध अर्थ देणारा जप शब्द मानवाला प्रेमाचा बोध करतो. पूज्य लोकानां विसरू नको, पुनः पुनः त्यांचे स्मरण कर, पवित्र कर्म बोध करणाऱ्या वचनाचा अभ्यास कर, तुझ्या पेक्षा ज्ञानाने, वयाने, पदाने, श्रेष्ठ असणाऱ्या पूज्य लोकांचे गुण गान कर.स्तुती कर,आणि ईश्वर नामाचा निरंत्तर जप कर. जप शब्दाचा अक्षरशः अर्थ केल्यास "ज' म्हणजे जन्म "प" म्हणजे पवित्र म्हणजे. तुझ्या पूर्वी जन्मलेल्या पवित्र आणि श्रेष्ठ लोकांच्या निरतिशय वात्सल्य प्रेमांत तू वाढला आहेस. त्या पवित्र, व पूज्य लोकाविषयी निरतिशय प्रेम भक्तीने वर्तन कर.

जकारो जन्म विच्छेद पकारः पाप नाशकः ।
तस्माज्जप इति प्रोक्तो जन्म पाप विनाशकः ।।

(अग्नेय पुराण)

"ज" म्हणजे जन्म जन्मांतरातील ईषण त्रय बंधनाचा च्छेद करून "प" म्हणजे पाप प्रवृत्तीला रोखून पाप समूहांचा नाश करण्याच्या साधनेला जप म्हणतात. आपले हात व नेत्र यांचा ऊर्ध्व भावनेत निरतिशय भक्ती प्रेमांत विनियोग करणे ही पूजा होय. आणि वागेंद्रिय, कर्णेंद्रियांचा ऊर्ध्व भावनेत निरतिशय भक्ती प्रेमांत विनियोग करणे हा जप होय. फलापेक्षी अवस्थेत उपयोगी पडणारे पुत्र, दारा, धन, या अधो भावनेच्या प्रेम प्रवृत्तीला रोखून, माता, पिता, आचार्य, अतिथी, ईश्वर प्रणिधानरूप ऊर्ध्व भावनेच्या निरतिशय प्रेमांत इच्छा, ज्ञान, क्रिया शक्तीचा उपयोग करावयाच्या विधानाला पूजा जप म्हणतात. पूजा, जप, हे दोन्ही नियम मानवाला प्रेमाचा बोध करून प्रेमाची

अभिवृद्धी करणारे साधन आहे. पंच ज्ञानेंद्रियामध्ये डोळे, कान, दोन मुख्य आहेत. या दोन इंद्रियाचा सह योग नसल्यास, दुसरे इतर इंद्रिय कोणत्याही कामाला उपयोगी पडणारे नाहीत. नाम, रूप, या दोन अवस्था भिन्न नसून एकाच वस्तूचा बोध करतात. एका दंडाला दोन टोक असतात. त्या दोन्ही टोकाच्या मधल्या अवकाशाला दंड हे नांव आले आहे. दंडाचे टोक दोन आहेत. म्हणून वस्तू दोन नसून दंड एकच आहे. चराचर सृष्टींतील सर्व वस्तू नाम व रूप दोन प्रकारे दिसून येतात. उदा-"आंब्याचेझाड" हे एक नाव कानाला ऐकू येताच त्याच्या शाखा, उपशाखा, पाने, फूले, फळे, सर्व एका नामामध्येच अनंत नाम रूपाचे दर्शन होऊन भावनेला जाणवते. प्रकृती माता नाम रूपाच्या अंतर्भूत होऊन हा चराचर कर्म योग चालवीत असते. त्याचे घटक असलेला मानव आई पासून जन्म घेऊन प्रथम आईच्या रूपाला जाणतो. नंतर आईच्या नामाला जाणतो. त्या नंतर मी एक शरीर आहे. मला एक रुप आहे. एक नाम आहे. अशा अनेक नाम रूपाची कल्पना करीत असल्या कारणाने, त्याच्या प्रेमाला, कोणत्याहि एका रूपाची मूर्ती सदैव पाहिजे आहे. त्या प्रेम मूर्तीत नाम अंतर्भूत आहे. नाम व रूप नसता जीवनाचे अस्तित्व संभवत नाही. आपल्या नेत्राने एक वस्तू जाणणे रूप आहे. कानाने जाणणे नाम आहे. मानवाच्या भोगोपभोग सर्व वस्तू एका विशिष्ट नाम रूपाच्या आहेत. केवल भोग पदार्थ प्राप्ती करणे हेच मानवाचे ध्येय नसून, भोगोपभोग पदार्थामध्ये देखील रूप सौंदर्याचीअपेक्षा विशेष असते. रूप सौंदर्य केंवल मानवापुरतेच नसून सर्व प्राण्यामध्ये विविध प्रकारे व्यापून आहे. शेतकरी आपल्या शेताचे नांगरणे, कुळवणे, करून, केर, कचरा, काढून स्वच्छ ठेऊन शेताचे

रूप पाहून आनंद मानतो. उद्यानांतील झाडे, वेली, पत्र, पुष्प, फलानी सुशोभित झाली असल्यास त्यांचे रूप सौंदर्य पाहून संतोष होतो. घरांतील गायी, बैल, घोडा, आदि पाळीव पशू डोळे, कान पाय, शिंग आदि अवयवानी सुंदर असात्रेत म्हणून अपेक्षा करतो. आपले घर, गांव, देश, राष्ट्र, सर्व सुन्दर असावे म्हणून आपेक्षा करतो. एक गाय सुन्दर असल्यामुळे तिच्या रूप सौंदर्या विषयी तिचा मालक आनंदित होतो. आणि तिला पाहून दुसऱ्याना ही संतोष वाटेल. परंतू दांपत्य जिवनांतील रूप सौंदर्याचा आनंद पति पत्नी शिवाय दुसऱ्यानां उपयोगी नसतो. तुझी बायको अती सुन्दर आहे असे दुसऱ्या पुरूषानी म्हणाल्यास पतीला आनंद होत नाही. आणि तुझा नवरा फार सुन्दर आहे. असे परस्त्रीने म्हटल्यास पत्नीला प्रिय वाटणार नाही. याचे कारण दांपत्य जीवनांतील रूप सौंदर्याच्या आनंदामध्ये दुसऱ्याने हस्त क्षेप केल्यास, आपल्या प्रेमांत भंग आणतील अशी शंका निर्माण होते. परंतू तुझी बायको शील संपन्न असून गुणाने उत्तम आहे. अथवा तुझा नवरा सदाचारी सात्वीक आहे. असे दुसऱ्या स्त्रीने स्तुती केल्यास उभय दंपत्तीना आपल्या गुण गौरवा विषयी अत्यानंद होतो. सौंदर्याची कल्पना प्रपंचाच्या सर्व वस्तूमध्ये अपेक्षित असते. उपभोग वस्तूचे रूप सौंदर्य चित्ताकर्षक असले तरी पाहाणाऱ्याच्या भावनेला नाम रूपाचे आवरण विशेष होत नाही.

पति पत्नीचे दांपत्य प्रेम परस्पर सापेक्षक असून ते भाव पाशाने बांधले गेल्यामुळे परस्पर पति पत्नीच्या सूक्ष्म शरीरावर प्रेमाचे आवरण (संस्कार) होते, ते आवरण संस्कार जन्म जन्मांतरी इच्छित भोग प्राप्त करण्याच्या कामी पर तंत्र करीत असल्यामुळे आपल्यांतील जन्म सिद्ध ऊर्ध्व भावाची भोगोत्पादक

पुण्यकार्माची अभिवृद्धी करण्यासाठी, जगन्मातृ पितृ अशा दैवतांच्या शिला मूर्तीची पूजा करणे अवश्यक आहे.

– मूर्ती उपासना –

शिला मूर्तीची पूजा करण्यापेक्षा चैतन्यशील असलेल्या आई, बापाची पूजा का करू नये. असा प्रश्न उद्‌भवल्यास त्याचे उत्तर असे की, आई, बाप चैतन्य शील असले तरी जीवन चरितार्थासाठी आपला कर्मयोग चालविणे त्यांना अवश्यक आहे. आई, बापाची प्रतिदिन पूजा करून भक्ती प्रेमाचा विकास करणे शक्य नाही. आई बापाची पूजा म्हणजे त्यांचे स्नान पाना साठी जलाची व्यवस्था करणे, खाणे, पीणे, नेसणे इत्यादि द्वारे त्यांच्या योग क्षेमाची व्यवस्था करणे, व त्यांच्या मनाला हिंसा (दुःख) न होण्या सारखे विनम्र बोलणे, पूज्य पूजक भावनेत वर्तन करणे, दररोज त्यांचे दर्शन घेणे, हीच त्यांची पूजा होय. आई, बाप केवळ आपल्या मुला पुरतेच पूज्य असतात. दुसऱ्यांच्या बाबतींत सामान्य म्हणावितात. ह्या सर्व कारणा वरून शिलामय प्रतिमाच मातृ, पितृ, भावाचा विकास करण्यासाठी सर्व मानवास सुलभ साधन आहे.

आमच्या जड सृष्टीला मूल कर्तृ असलेले, सृष्टीकर्ता ब्रह्मा, स्थितिकर्ता विष्णु लयकर्ता रुद्र, निग्रहकर्ता ईश्वर, अनुग्रहकर्ता पंच आचार्य, व पंच ब्रह्म सदाशिव, आणि सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिका आदि देवता, अनंत जडच चेतन लोकांचे मातृ, पितृ असल्यामुळे त्यांची प्रतिमा शिला रूपांत कल्पूनआपले दैनिक पूजा, जप, साधनात उपयोग करणे, क्रम प्राप्त आहे. कोणत्याही काली कोणत्याही स्थितीत सुलभ साधनाद्वारे ऊर्ध्व भावांतील नाम रूपाचा संस्कार, व्हावा या उद्देशासाठी मूर्तीपूजा

ग्राह्य मानली आहे. परंतु स्त्री–पुरुषाकृति प्रतिमेची पूजा केल्याने भावनेला पवित्रता येण्या ऐवजी अपवित्रता येते. अशी शंका आल्यास त्याचे उत्तर असे की, ही शंका विचारयुक्त नाही. का? म्हणजे भक्त त्या मूर्तीला स्त्री–पुरुष म्हणून अधो भावनेत पाहात नसून माता पिता म्हणून ऊर्ध्व भावनेत पाहात असतो. त्यामुळे वैषयिक विचार उद्भवण्यास अवकाश नाही. एका पक्षाने मातृ पितृ भक्ती भावाचा अंश नसलेल्या जडमतिय साधकाला कामुक विषय विचार आला असल्यास ती सजीव मूर्ती नाही. इतकेच नव्हे आपल्या घरी बहीण, भाऊ आदि अनेक सजीव स्त्री–पुरुष मिळून मिसळून राहत असून परस्परांच्या भावनेत विषय विचार उद्भवत नाहीत. शिला प्रतिमेत अशा प्रकारची कल्पना करणे योग्य नाही हे युक्ती शून्य विचार शून्य आहेत.

शिला मूर्तीला गंध, पुष्प, धूप, दिपाने पूजा केल्यास त्या शिलेच्या जड संस्काराने साधकाचा भाव जड होतो. अशी शंका घेतल्यास त्याचे समाधान करण्यात येते. की, एका कागदावर लिहीलेला "राम" शब्द पाहाताच राम नावाच्या व्यक्तीचे स्मरण होते. त्याचे मुख, वर्ण, वेषभूषा गुणवैशिष्टच सर्व स्मरण होतात. "राम" नावाची व्यक्ती चैतन्यमय असून कागदावरील राम शब्द जड आहे. कागदावर लिहीलेला राम शब्द पहाणाऱ्या व्यक्तीच्या भावनेला राम शब्दाचे जड संस्कार न होता राम नावाच्या चैतन्य व्यक्तीचे स्मरण होते. शब्द आणि अक्षर जड असले तरी अनंत वस्तूंचा संयोग वियोग होतो.

मूर्ती प्रत्यक्ष जड आहे. त्या जड वस्तूमध्ये चैतन्य परमात्म्याची भावना करणे हा भाव नसून भक्ती शून्यता आहे. एका वस्तूमध्ये दुसऱ्या एका वस्तूची कल्पना करणे अज्ञान आहे.

अशी शंका वाटल्यास त्याचे उत्तर असे की,

राष्ट्र ध्वज एक जड पदार्थ चिंदी असून त्याला चिंदी म्हणून न समजता राष्ट्रध्वज समजून राष्ट्रदेवता या भावनेत पूजा, सन्मान करून भक्ती पूर्वक वंदन करतात. त्याचे गुणगान करतात. प्रत्यक्ष ती जड वस्तू असली तरी त्या ध्वजासंबंधी उपयोग केले जाणारे राष्ट्रप्रेम हा चैतन्य आहे. राष्ट्र ध्वजाला चिंदी समजणाऱ्याला राष्ट्रातच काय पण साऱ्या जगात देखील स्थान नाही.

जड वस्तू संबंधाने साधक आपल्या भक्ती प्रेमाचा उपयोग करीत नसून त्यांत व्यापून असलेल्या चैतन्य रूपी दैवी शक्ती संबंधाने ऊर्ध्व भाव भक्तीचा उपयोग करीत असतो. मानवाचे शरीर अस्थि मांसादिकाने जड असले तरी त्यातील जीवात्मा चैतन्यमय आहे. जड शरीराची सेवा पूजा त्या जीवात्म्याची सेवा पूजा आहे असे मानून सत्कार करीत असल्याप्रमाणे माती धोंड्याच्या बनविलेल्या मूर्तीची पूजा जड वस्तूची पूजा नसून त्या चैतन्यरूपी परमात्म्याची पूजा आहे. कारण परशिव ब्रह्म सर्व व्यापक असून त्या मूर्तीत सुद्धा व्यापून आहे. असे समजून ब्रह्म भावनेत केली जाणारी पूजा त्या परशिव ब्रह्माचीच पूजा होय. किंचिज्ञ मानवाच्या भावनेला सर्व व्यापी परमात्म्याचे स्वरूप जाणणे शक्य नाही. यासाठी प्रथम साधकाकरीता मूर्ती पूजा आवश्यक आहे. उदा – प्राथमिक शाळेतील बालवयाच्या विद्यार्थ्यांना प्रथमतः वर्ण ज्ञान करून देत असतात. कमळाचे "क" गणपतीचे "ग" नळाचे "न" अशा अक्षर संबंधित चित्राद्वारे शिक्षण देण्यात येते. वर्ण ज्ञान झाल्या नंतर कमळाचे "क" गणपतीच "ग" नळाच "न" ही भावना आपोआप विसरून

जातअसल्या प्रमाणे पुत्र, पति, पत्नी, धन या अधोभाव प्रवृत्तीच्या मानवाला माता, पिता, आचार्य, अतिथी व ईश्वर या ऊर्ध्वभाव प्रवृत्तीमध्ये परिवर्तन करण्यासाठी मूर्ती पूजेची अवश्यकता आहे.

मूर्ती सावयव असल्यामुळे उपासनेच्या वेळी त्याविविध अवयवा संबंधी साधकाच्या भावनेत विशेषे करून चंचलता प्राप्त होते अशी कोणास शंका येत असल्यास या शंकेला उत्तर असे की, मनुष्य डोळ्याने जगातील अनेक जड चेतन सरूप वस्तूना एका मागून एक अखंडपणे पाहात असतो. रूपा, शिवाय दृष्टीचे आस्तित्वच नाही. त्या प्रमाणे मूर्ती अनेक नसून एक आहे. अगणित अवयव नसून गणित अवयव आहेत. अशा स्थितीत अनेक सरूप वस्तू संबंधी संयोग वियोग करणाऱ्या दृष्टीला एकाच मूर्ती संबंधी मन केंद्रित करण्याने भाव स्थगित होतो. म्हणून मूर्तीची आवश्यकता आहे.

एक देशी जड मूर्तीमध्ये सर्व व्यापक असलेल्या परमात्म्याची उपासना अथवा दैवताची उपासना करणे योग्य नाही. अशी शंका काढल्यास त्याचे उत्तर असे की, किंचज्ञ एकदेशी मानवाला मननकरण्यासाठी मननीय वस्तू देखील एक देशीच असावयास पाहीजे. जसे व्यापक आकाशाच्या सर्व भागाला पाहाण्याच्या कामी तो असमर्थ असून त्याच्या एका भागालाच पाहात असतो. त्या प्रमाणे सर्व व्यापी परमात्म्याच्या उपासने करिता शिला मूर्तीचा उपयोग करणे अवश्यक आहे. परमात्मा न्यायी, दयाळू, सर्व व्यापक, सर्वप्रेमी, अक्षय, व अव्ययस्वरूप आहे. असे त्याच्या नामाची स्तुती व जप कितीही केला तरी ती उपासना एक देशीच आहे, असे म्हणावे लागेल. असे करणे किंचिज्ञ मानवाचा स्वभाव धर्म आहे.

पूज्य, पूजक, पूजा द्रव्य या तीन्ही वस्तूमध्ये परमात्मा व्यापून आहे. गंध, पत्र, पुष्पादि पूजाद्रव्य मूर्तीला समर्पण करण्या ऐवजी त्या त्या पूजा द्रव्यामध्येच परमात्म्याचे स्वरूप आहे अशी भावना करणे योग्य नाही काय? या शंकेचे समाधान असे की, कोण्याहि साधकाच्या दृष्टीला परमात्मा सर्वांतर्यामी आहे. पूर्ण, नित्य, न्यायी व दयाळू आहे अशी केवळ शाब्दिक व्यापकता असून भावनेत मात्र अव्यापकता असते. अशा अज्ञ जनाला पूजा नमस्कारादि विधी अग्राह्य वाटतात, जठराग्नी व अन्न ह्या दोन्ही मध्ये परमात्मा व्यापून आहे परंतु मनुष्याला आहाराची अवश्यकता का, असा भाव होतो. एका पक्षाने परस्पर वस्तूंचा एकमेकांत संयोग वियोग होत असल्याने परमात्म्याच्या पूर्णतेला बाधा येत असल्यास त्या अनेक वस्तूचा संयोग वियोगकृती पूर्ण स्वरूप परमात्म्या शिवाय आहे असे मानावे लागेल.

पंचब्रह्म सदाशिव, पंच आचार्य गुरुदैवत, ब्रह्मा, विष्णु रुद्र, ईश्वर, सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिकाआदि अनेक दैवता सूक्ष्म शरीर धारी असून देवलोकांत राहत असतात. प्रत्येक दैवतांचे मंत्र, जप वेगवेगळे आहेत. मंत्र द्रष्टा म्हणजे मंत्रानुष्ठानद्वारे मंत्राधीन असलेल्या दैवतांचा साक्षात्कार प्राप्त झालेल्या ऋषीमुनीनी त्या त्या दैवताची कल्पना सर्व सामान्य मानवाच्या दृष्टीला गम्य व्हावी म्हणून व भक्ती भावाच्या विकासासाठी साहाय्यक व्हावी या ऊद्देशाने सुवर्ण, रजत, ताम्र, शिला अनेक प्रकारच्या मूर्ती अवयव आयुध, आभरण, वाहान आदि प्रत्यक्ष भावगम्य होण्यासाठी शिल्पकाराकडून बनवून घेतल्या आहेत. त्या नूतन मूर्तीला प्रथमतः पूज्य आचार्याकडून संस्कार केल्याशिवाय ती पूजे करीता योग्य होत नाही.

संस्कार विधीमध्ये शिलादोष, कर्षणदोष परिहारासाठी धान्यादिवास, जलाधिवास आणि भुवनाध्व, वर्णाध्व, पदाध्व, कलाध्व, मंत्राध्व, तत्वाध्व अशा षडध्व संस्कार पूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. अशी संस्कार युक्त मूर्तीच पूजा करण्यासाठी योग्य असते. संस्कार न झालेल्या मूर्ती पूजानुष्ठानासाठी योग्य नसून पूजक भक्ताला अभिमुख होणार नाहीत. मूर्तीची संस्कार पूर्वक प्राणप्रतिष्ठा केल्याने त्या मूर्तीतील मंत्रमय दैवी शक्तीद्वारे पूजक भक्ताचा भाव शुद्ध होतो. यासाठी संस्काराची अवश्यकता आहे. पूज्य मूर्तीची निरतिशय प्रेमाच्या उर्ध्व भावनेत पूजा केल्याने भक्ताच्या प्राणमय सूक्ष्मशरीरात पुण्यरूपी भाव संग्रह होतो.

शिला मूर्तीमध्ये सूक्ष्म शरीर धारी दैवताला आपल्या शक्ती सहित येण्या विषयी अवाहन (बोलावून) करून पूजा करीत असतात. या वरून ती पूजा शिला मूर्तीची नसून शिला मूर्तीद्वारे प्राणमय सूक्ष्म शरीरधारी देवतेची पूजा होय. पुजेचा उद्देश व त्याची महती सर्व मानवानां सुलभ रितीने समजून येण्यासाठी उदाहरण म्हणून गणपति अवाहन विधीची माहिती खाली दिली आहे. अर्घ्य, पाद्य, आचमन, मधुपर्क, जल, गंध, अक्षता, पत्र, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, तांबूल व दक्षणा आदि पूजा साहित्य संग्रह करून पूजा प्रारंभ करण्यापूर्वी अवाहन विधी करावा लागतो. अवाहन विधीम्हणजे प्रत्यक्ष दिसणाऱ्या शिला मूर्ती मध्ये प्राणमय सूक्ष्म शरिरी असलेल्या गणपति मूर्तीला आमंत्रण द्वारे भक्ती भावनेत बोलावून आणणे होय.

"गणानांत्वा गणपति ँ हवा महे कविं कवीनां
मुप मश्र वस्तमं । जेष्ठ राजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत
आनः श्रुण्वन्नूतिभिः सीद सादनम्" (ऋग्वेद २-६-२९)

हे गणपति देवा आपण जन समूहाचे व देव समूहाचे स्वामी आहत आपणास आम्ही बोलावितो. अशी प्रार्थना करून "भूः गणपतिमावाहयामि" पंच भूतात्मक सृष्टीचे पति असणाऱ्या आपले आम्ही स्वागत करतो. "भुवः गणपतिमावाहयामि" प्राणमय सूक्ष्म सृष्टीचे पति असलेल्या आपले आम्ही स्वागत करतो. स्वाः गणपतिमावाहयामि" भावरूपी कारण सृष्टीचे पति असलेल्या आपले आम्ही स्वागत करतो. अशा त्रिविध रूप गणपति देवाला (शिलामय गणपती मूर्तीमध्ये) येण्यासाठी प्रार्थना करून त्या नंतर गणपतीच्या नऊ शक्तीनां उद्देशून त्याना आपल्या स्वामी बरोबर यावे. आपले सुद्धा आम्ही स्वागत करतो. असे सांगून नमस्कार करतो.

"ॐ नमो भगवते सकल गुणात्म शक्तियुताय महा गणाधीश्वराय योगपद्मपीठात्मने तुभ्यं सुवर्ण पीठं कल्पयामि"

ॐ कार स्वरूप असलेल्या हे भगवान् आपण सकल गुण शक्ती संपन्न असून सर्व गणामध्ये महा गणाधीश्वर म्हणविता योग पद्मासनांत बसणाऱ्या आपणासाठी सुवर्ण पीठाची कल्पना करतो. (शिलामय गणपति मूर्तीमध्ये सुवर्णं पीठाची कल्पना करणे)

ॐ भूर्भूवः सुवरोम् । स शक्ती सांग सायुध सहवान सह परिवार महागणाधीश्वरात्रागच्छागच्छ । अवाहयामि । आवाहितो भव । स्थापयामि स्थापितोभव । सन्निहितो भव । सम्मुखोभव । अवकुंठितो भव । वरदो भव ।

भौतिक, आधि भौतिक आणि आध्यात्मिक ह्या त्रिविध स्वरूपांत असणारे आपण आपल्या शक्ती सह आगमन करावे. आपण स्वतंत्र देहधारी आहांत, चतुर्भुज, त्रिनेत्रादि सर्व अवयवासह आगमन करावे. पाश, अंकुश, गदा इत्यादि आयधा सह आपले

आगमन व्हावे. आपण मूषक वाहानारूढ होऊन आगमन करावे. आपल्या परिवारासह आगमन व्हावे. मी आपले स्वागत करीतो. मी आपली स्थापना करतो आपण स्थानापन्न व्हावे. माझे समीप बसावे, माझे सम्मुख बसावे. आपण सरळ शरिरी होवून बसून घ्यावे. अभय हस्ताने आशिर्वाद देणारे व्हावे. पूजक भक्त अशी प्रार्थना करून भाव प्राधान्यतेखाली सूक्ष्म सृष्टींतील गणपतीला शिलामय गणपति मूर्तीमध्ये अवाहन करून स्थापना करतो.

पूजा विधीचा सारांश शिलामय गणपति मूर्तीमध्ये सूक्ष्म सृष्टीतील गणपति देवाला भाव भक्ती प्राधान्यतेने बोलावून स्थापना करून त्या भावमय गणपति देवाचेच स्मरण करीत ध्यान करीत पूजाविधी चालत असतो. केवळ शिला प्रतिमेची पूजा नसून त्या सूक्ष्म सृष्टीतील भावनामय गणपति देवाची ती पूजा आहे. शिला मूर्तीत देवाचे अवाहन करून षोडशोपचार विधीने पूजा करणे, म्हणजे त्या सूक्ष्म योग शरिरी असलेल्या भावना मय गणपति देवाची पूजा आहे.

आपल्या शरीर व्यामोहांत अधो भावनेत चालणाऱ्या इंद्रियानां ऊर्ध्व भावनेत पूज्य देवाच्या सन्निधींत दीर्घ काल थांबून मनाच्या वेगाला रोखण्याच्या उद्देशासाठी पंचोपचार, अष्टोपचार दशोपचार, आणि षोडशोपचार, अशी अनेक प्रकारची पूजा सांगितली आहे. आपल्या शरीर संरक्षणासाठी उपयोगी पडणाऱ्या अन्न, वस्त्र, धन, धान्यादि अनेक उपभोग वस्तू देवाच्या सेवेत पूजा विधीच्याद्वारे समर्पण होई पर्यंत भक्त भावमग्न होऊन आपल्या शरीर सौख्याला विसरतो. अर्ध्य, पाद्यादि अनेक पूजा द्रव्य देवाच्या सन्निधीत एका नंतर एक उपचार द्रव्य समर्पण कार्य चालत असल्यामुळे दुसऱ्या साकार वस्तूकडे मनाला व

इंद्रियाला जाण्यासाठी अवकाश मिळत नाही.

मानव दुसऱ्याच्या घरी सन्मानित अतिथी होऊन गेल्यास ते त्याच्या आदरार्थ पाय, हात, मुख, प्रक्षालनासाठी शुद्ध जल देत असल्या वेळी त्याच्याकडून प्राप्त होणारे उपचार द्रव्य आणि प्रेमोपचाराचे बोलणे, शरीर सौख्याच्या अधो भावनेत स्वीकार करून संतुष्ट होतो. त्या प्रमाणेच ईश्वरा प्रीत्यर्थ निरतिशय भक्ती प्रेमाच्या भावनेत मूर्तीच्या पाद पद्माला आपल्या हाताने अभिषेक करीत मुखाने मंत्र जप करीत अंतर्बहिर दोन्ही कार्य सतत चालत असल्यामुळे पूजकांचे मन अत्यंत गूढ सूक्ष्म सृष्टीत जावून भाव संग्रह होतो.

स्नान मंत्र – **परमानंद बोधाब्धौ निमग्न निजमूर्तये ।**
सांगोपांगमिदं स्नानं कल्पयामि प्रसीद मे ॥

परमानंदाचा बोध करणाऱ्या ज्ञान समुद्रांत निमग्न असलेल्या देवा तुझ्या अंग प्रत्यांगाच्या शुद्धीसाठी जल समर्पण करतो म्हणणे पूजा आहे. मुखाने मंत्र म्हणणे जप आहे.

गंध मंत्र – **परमानंद सौरभ्यं परिपूर्ण दिगंतरम् ।**
गृहाण परमं गंधं कृपया परमेश्वर ॥

परमानंद रूपी सुगंध दाही दिशामध्ये व्यापणारा परिमळ गंध तूला लेपन करतो. हे देवा दया दृष्टीने स्वीकार कर. असे सांगून गंध लावणे पूजा आहे. आणि प्रार्थना करणे, जप आहे.

पुष्प मंत्र – **तुरीय वन संभूतं नाना गुण समन्वितम् ।**
आनंद सौरभं पुष्पं गृह्यतामिदमुत्तमम् ।

वन उद्यानांतील वृक्ष वेलीवर उमललेली मकरंद युक्त

सेवंती, बकुल, चंपक आदि नाना प्रकारची सुगंधी पुष्पे आनंद देणारी आहेत. हे देवा स्वीकार कर. असे सांगून पुष्प समर्पण करणे पूजा आहे. आणि प्रार्थना करणे जप आहे.

धूप मंत्र – वनस्पतिरसोपेतो गंधाढ्यो धूप उत्तमः ।
आघ्रेयस्सर्व देवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ।

चंदन, गुगळ, कर्पूर, आदि सुगंध वनस्पतिरसयुक्त उत्तम धूप तुला आनंद देणारा आहे. हे देवा स्वीकार कर. असे सांगून धूप समर्पण करणे पूजा आहे. आणि मुखाने प्रार्थना करणे जप आहे.

दीप मंत्र – स्व प्रकाशो महादेव सर्वांतस्तिमिरापह ।
साबाह्याभ्यंतरं ज्योतिर्दीपोऽयं प्रति गृह्यताम् ।

स्वयं प्रकाशित असलेल्या देवा तू सर्व जीवांच्या आज्ञान-रूपी अंधाराचा नाश करून तो ज्ञान दीप आत बाहेर उजळणारा आहेस. मी मंगलमय दीपारती ओवाळीतो. स्वीकार कर. असे सांगून ओवाळणे पूजा आहे. आणि प्रार्थना करणे जप आहे.

नैवेद्य मंत्र – नैवेद्यं षड्रसोपेतं नानाभक्ष्य समन्वितम् ।
दधि, क्षीर, घृतोपेतं नैवेद्यं प्रति गृह्यताम् ॥

नाना विध भक्ष, भोज्य, पेय, षड्रस युक्त पक्वान्नाचा नैवेद्य तुला भक्तीने समर्पण करतो हे देवा स्वीकार कर असे सांगून नैवेद्य समर्पण करणे पूजा आहे. प्रार्थना करणे जप आहे.

तांबूल मंत्र – पूगी फल समायुक्तं नागवल्ली दलैर्युतम् ।
कर्पूर चूर्ण संयुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ॥

सुपारी, जायफळ, विलायची, लवंग आदि सुगंध द्रव्यानी युक्त असे तांबूल तुला समर्पण करतो. हे देवा तांबूल स्वीकार कर..असे सांगून अर्पण करणे पूजा आहे. मुखानें बोलणेजप आहे.

दक्षिणा मंत्र – **हिरण्य गर्भ गर्भस्थं हेम बीजं विभावसोः।**
अनंत पुण्य फलदं प्रयच्छामि महेश्वर ॥

भूमातेच्या गर्भातून जन्म पावलेले हेम (सोने) संपत्तीचे मूळ बीज आहे ते तुला भक्ती पूर्वक समर्पण करतो हे देवा स्वीकार कर. असे सांगून धन समर्पण करणे पूजा आहे. मुखाने प्रार्थना करणे जप आहे.

मानव आपले रूप सौंदर्य आरशांत पाहून अधो भावनेत संतुष्ट होतो. आपल्या नित्य कर्म योगांत पाऊस व ऊन्हाचा ताप होऊ नये, म्हणून छत्रीचा उपयोग करतो. ग्रीष्म कालांतील उष्णता शमविण्यासाठी व्यजन, (पंखा), व चामराचा (चवरी) उपयोग करीत असतो. आणि आपल्या भोग विलासांत विवाहादि मंगल कार्यात चौघडा, शहनाई, ताशा, ब्यांड आदि वाद्यांचेमधुर स्वर ऐकून त्यास संतोष होतो. हे सर्व आपल्या कर्म योगाच्या (व्यवहाराच्या) अधो भाव पूजेत उपयोग होत असलेले उपभोग पदार्थ ईश्वरा प्रीत्यर्थ निरतिशय प्रेमाच्या ऊर्ध्व भक्तीभावनेत देवाला समर्पण करणे भक्ती योगाची पूजा होय. या पदार्थाच्याद्वारे आपले भाव ईश्वर सन्निधीत समर्पण करणे हाच पूजेचा मूळ उद्देश आहे. ईश्वरार्पित पदार्थासंबधाने अहं भावाचेनिरसन होऊन ते सर्व ईश्वर प्रसाद व निर्माल्य आहेत अशी भावना होते.

ईश्वर भक्ती योगाच्या पूजेत सर्व भोग सामुग्रीचा विनियोग करण्याने भक्ता जवळ कोणताही पदार्थ शिल्लक न राहिल्याने आपले शरीरच शिल्लक आहे असे समजून भक्ती परवश होऊन नृत्य करणे, त्याचे सभोवती फिरून प्रदक्षणा घालणे, हा पूजा विधी होतो आणि मी स्त्री, मी पुरुष, मी धनवान, मी विद्वान अशा तनुगत अहं भावाचा त्याग करून

ईश्वर सन्निधीत शरणार्थी भावनेने स्वतःच समर्पण होणे हा नमस्कार विधी आहे. भक्ती भाव अभिव्यक्त करणाऱ्या या सर्व बहिर्क्रिया संपल्या नंतर साधक डोळे, झाकून हात जोडून सौंदर्यमय अशा त्याईश्वर मूर्तीचे स्वरूप मनांत धारण करून जल,गंध,पत्र, पुष्पादि सर्व उपचार वस्तू केवल भावनेत कल्पून भावनेनेच पूजा करीत भाव समर्पण करतो. ही मानस पूजा होय. जसे आचार्यादि पूज्य व्यक्तीना आपल्या घरी बोलावून आणून त्यांचे आदरातिथ्य केल्यानंतर पुनः त्याना सन्मान पूर्वक त्यांच्या स्थानाला पोहोंचविण्यांत येते. तसे परिशुद्ध भावनेत अवाहन विधीद्वारे बोलावून आणलेल्या देवाला सन्मान पूर्वक स्वस्थानाला परत पाठविण्याच्या विधीला विसर्जन म्हणतात.

"गच्छ गच्छ सुरेश्वर यथा स्थानं प्रतिष्ठाप यामि"

ह्या विसर्जन मंत्राद्वारे देवाला स्वस्थानाला जावून प्रस्थापित व्हा असे सांगणे हाच दैवत विसर्जन विधी होय. पूजा विधानाचे उपचार मंत्र म्हणजे निरतिशय भक्ती प्रेमांत ईश्वरावरोबर बोलणे होय.

आई न बोलणाऱ्या मुलाशी निरतिशय वात्सल्य प्रेमाने बोलून बोलून त्या मुलाचे अत्यंत गूढ अवस्थेतील भाव अभिमुख करून आपल्या बरोबर बोलावयास लावते. पुनः ते लेकरू बाल्य जीवनात निरपेक्ष हेतूने न बोलणाऱ्या, न चालणाऱ्या, न खाणाऱ्या निर्जीव खेळणीला निरतिशय प्रेमाने आपले सुख पदार्थ समजून खाणे, पीणे, बसणे, खेळणे अशा साऱ्या क्रिया मुलाकडून निरपेक्ष अवस्थेत चालत असतात. तो मुलगा मोठा झाल्यावर इच्छा,ज्ञान,क्रियाशक्तीने आपल्या पति पत्नी,पिता पुत्र,बंधु भगिनी धन संपदादि वस्तूचा आपल्या भोग सुखासाठी फलापेक्षक बुद्धीने

व्यवहारिक कर्मयोग करीत असतो. आपल्या मनाच्या अनुकूलते प्रमाणे ती वस्तू त्यास लाभल्यास तो सुख समजतो. आणि प्रतिकूल वाटल्यास दुःख समजतो. कर्मयोग प्रपंच्यात अशा सुख दुःखाची प्रतीती येते. सुखाचा अनुभव ज्या कार्यात येतो. ते ते सर्व कार्य पूर्व जन्मी केलेले कृत कर्म आपल्या सूक्ष्म शरीरांत प्रच्छन्न रूपाने संग्रहित असलेले ह्या वर्तमान काली विभाजित होते.

पूजा करणे, जप करणे म्हणजे भक्ती योगांतील क्रिया भावनेला अगम्यहोणाऱ्या ईश्वर नावाच्या महद् वस्तूला चैतन्य विशिष्ट अल्प मानवाने निरतिशय निरपेक्ष प्रेम करण्याला भक्ती-योग म्हणतात. ह्या भक्ती योगात भक्त आपल्या आराध्य देवाला स्नान घालतो. गंध, पत्र, पुष्पादिकाने अलंकारीत करतो. धूप दीपाने सन्मान करतो नैवेद्य दाखवितो. जल देतो. दक्षणा समर्पण करतो. प्रदक्षणा घालतो. नृत्य करतो. आणि नमस्कार करतो. ह्या प्रेमाच्या क्रियेला प्रतिक्रिया रूपाने या वर्तमान काली प्रतिफल मिळत नाही. भक्ती प्रेमाची प्रतिक्रिया ह्याच्या भावनेला जाणवत नाही. भक्त भक्ती प्रेमाने सर्व समर्पण करतो. ईश्वर नावाच्या व्यापक एका मध्य बिंदूमध्ये आपले व्यक्तीमय मी, मी म्हणणाऱ्या जीव दशेतील व्यष्टी बिंदूचे तादात्म्य पावणे, ऐक्य पावणे, हे भक्ती योगाचे भावसामरस्य होय. न बोलणाऱ्या, न प्रेम करणाऱ्या वस्तूला प्रेम करणे, बोलणे म्हणजे हे अमर्यादित निरतिशय भक्ती प्रेम आहे. व्यापक भाव क्षेत्रात अल्प शक्तीचा ऊर्ध्वभाव, बीजरूपाने संग्रह होऊन तादात्म्य रूपांत राहतो. **उदा –** भूमीत बीज पेरल्याने बीजाचे अस्तित्व नाहीसे होते. व्यष्टीमय बीज आपली अवस्था टाकून व्यापक भूमी क्षेत्रात प्रसरण पावते. भूमीत प्रच्छन्न अवस्थेत असलेल्या अनंत बीज

परमाणूला एकत्रित आणून अंकुराद्वारे वनस्पति पूर्णावस्थेला येऊन एका बीजापासून अनंत बीज उत्पन्न होतात. त्या प्रमाणे ईश्वर नावाच्या अज्ञात सृष्टीच्या व्यापक भाव क्षेत्रात निरतिशय भक्ती प्रेमाची अल्पक्रिया तादात्म्य पावून त्यात अंतर्भूत असलेले सर्व सुखपदार्थ शोषण करून आपल्या सृष्टीमध्ये ते भावरूपांत संग्रह होवून जन्मांतरी अनंत सुख पदार्थाच्या रूपाने विभाजन होण्यासाठी अवकाश करून देतो. बीजोत्पादनासाठी भूमी अवकाश आहे. त्याप्रमाणेअनंत सुख भोगपदार्थ उत्पादन करण्यासाठी अवकाशाच्या क्षेत्राला ब्रह्म व परमात्मा म्हणतात. व्यष्टी रूपाने भक्ती प्रेमाची क्रिया प्रगाढ भावनेत उपयोग करण्याला भक्त म्हणतात. अनंत भोग पदार्थ, भावनावाच्या चैतन्य सृष्टीमध्ये अंतर्भूत आहेत. त्या अनंत उपभोग पदार्थाला अभिमुख करून घेण्यासाठी निरतिशय प्रेमाची अल्पभक्ती ही साधन आहे. आई न बोलणाऱ्या लेकराशी बोलते. न बोलणाऱ्या देवाशी बोलणे, न प्रेम करणाऱ्या देवाशी प्रेम करणे, आईच्या प्रेमाच्या शतपटीनेच नव्हे तर सहस्र पटीने भक्ती प्रेमाची क्रिया बलवान आहे. महान् आहे. त्या योगे शिला प्रतिमेमध्ये व्यापून असलेली भावमय चैतन्य-शक्ती भक्ताला अभिमुख होऊन भाव, प्राण तत्वाची योगमय शरीर धारी दैवीशक्ती रूपाने ती भक्तालाप्रत्यक्ष दर्शन देते व बोलते. न होणाऱ्या गोष्टी म्हणजे मानवी शक्तीपेक्षा असामान्य शक्ती प्राप्तहोते. आई मोह पाशाच्या प्राकृतिक कर्म-बंधनात सापडून निरतिशय प्रेमांत कर्मयोग चालविते. आणि भक्त ज्ञानपूरित परिशुद्ध भावभक्तीने निरतियश प्रेमांत आपली अमर्याद प्रेम भक्ती समर्पण करतो. उदा– विद्युत्शक्ती उत्पादन काली अनुभवास येत नाही. पाणी ओढणे, प्रकाश देणे,

दळणे, कांडणे, वारा घालणे आदि कामे करणाऱ्या यंत्रामध्ये विद्युत् प्रवेश करून त्या यंत्राला चालना मिळण्याच्या कार्यामध्ये तिचा उपयोग होतो. तेंव्हा एक प्रच्छन्न शक्ती आहे असे समजून येते. तसे पूजा जपाच्या निरतिशय प्रेमामध्ये ऊर्ध्वभाव भक्तीत इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्ती काल द्रव्यांत उपयोग होतेवेळी लाभ, हानी किंवा सुख, दुःख कांहीच अनुभवास येत नाही. ती भाव शक्ती प्राणमय सूक्ष्म शरीरांत प्रच्छन्न रूपाने शिल्लक राहते. त्यालाच दुसऱ्या अर्थाने पुण्य म्हणतात. त्या संग्रहित पुण्य शक्तीने जन्मांतरी शरिरादिक भोग पदार्थ प्राप्त होतात.

शेतकरी बीजावरील कवच (टरपल) काढून बीज पेरतो. त्या बीजातूनच कवचा सहित अनंत बीज उत्पन्न होतात. त्या प्रमाणे मानवाच्या मृत्यूनंतर त्याच्या प्राणमय सूक्ष्म शरीरामध्ये नवीन देहाची उत्पत्ती होऊन मूर्तीमंत स्वरूपात अनंत भोग विकास पावतात.

शेतांत उत्पादन झालेल्या धान्यातून उपजीवीकेसाठी दळले गेलेले धान्य परत येत नाही, बीजा करिता राखून ठेवलेले धान्य पेरल्या नंतर अनंत बीजाच्या रूपाने परत येते. त्या प्रमाणे आपल्या व्यवहारीक कर्म योगांत पुत्र, पत्नी धनादिका संबंधी उपयोगात येणारा वेळ, बुद्धी, ज्ञान, धन, धान्य व श्रम या सकल वस्तू कायमच्या जातात. पूजा जपात ईश्वर प्रीत्यर्थ उपयोग केला जाणारा वेळ, बुद्धी, ज्ञान, श्रम, धन धान्य आणि आयुष्य आदि सकल वस्तू पुढील जन्माच्या भोगासाठी अनंत भोग रूपाने मिळत असतात. पूजा जप हे भोग प्राप्तीचे साधन आहे.

साकार मूर्तीच्या उपासनेने पुत्र, पति, पत्नी, धन आदि इह लोक सुख आणि सालोक्य, सामीप्य, सारूप्य, सायुज्य,

हीपरलोक सुखे प्राप्त होतात.परंतु पुनरावृत्ती रहित शाश्वत मोक्ष सुखाची प्राप्ती होत नाही. ब्रह्मा, विष्णू, रुद्र आदि देवता माया सहित शुद्ध विद्या तत्वाचे देह धारी असल्यामुळे काल पाशाच्या बंधनात आहेत. महा प्रलय काला पर्यंत त्यानी जीवन्मुक्त होणे शक्य नाही. दैवत उपासनेच्या द्वारे भोग प्राप्तीच होते. मोक्ष प्राप्ती होत नाही.

– शिवलिंगाचे विवेचन –

वाम मार्गी पाखंडी लोकांना शिवलिंगा विषयी विविध कल्पना केल्या आहेत. शिवलिंगाखालील पीठाचा भाग स्त्रीचे जननेंद्रिय आहे. पीठाचा वरील गोलाकारभाग पुरुषजननेंद्रिय आहे. या दोन्हीचा संगम करून लिंगाची आकृती झाली आहे. म्हणून कांही ग्रंथात सांगितले आहे. वस्तू स्थितीचा विचार केला असता स्त्री-पुरुषाचे जननेंद्रिय एक मूत्रपूरितद्वारआहे आणि स्त्री पुरुषानी परस्पर विषय सुख भोगून संतती प्रदान करणारे वासनामय भोगेंद्रिय आहे. त्याचे चिंतन, स्मरण, निधिध्यास केल्यास विषयासक्ती विषयाभिलाषा जास्त वाढते. त्या योगाने मनुष्याच्या मनांत पाप वासना निर्माण होऊन पाप कर्मास प्रवृत्त होतो. यामुळे मनुष्य जीवनास पशूत्व येते. तो मानव पापी, अधमजीवीहोतो. यदाकदाचित शिवलिंग हे स्त्री-पुरुष जननेंद्रियाचे द्योतक चिन्ह आहे असे गृहित धरल्यास शिलामय जननेंद्रियाची पूजा करण्यापेक्षा प्रत्येक स्त्री पुरुषाजवळ जननेंद्रिय प्रत्यक्ष आहे. त्यानी आप आपल्या इंद्रियाची पूजा केल्यास बरे होईल.

कांही ग्रंथात शंकर पार्वती एकांतात वास करून भोगविलास करीत असता भगवान विष्णु शंकराच्या भेटीस गेले. शंकर आपली भोग क्रीडा सोडून बाहेर आले नाहीत. भगवान

विष्णूचे स्वागत व आतिथ्य केले नाही म्हणून भगवान विष्णूला राग आला आणि शंकराला शाप दिला. त्या शापाने शंकराचे जननेंद्रिय तुटून बारा तुकडे झाले तेच द्वादश ज्योतिर्लिंग झाले आहेत. असे सांगितले आहे.

मानवाचे शरीर पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश, असे पंच भूतात्मक आहे. माया सहित अशुद्ध विद्या तत्वाचा देह असल्यामुळे स्त्री पुरुषानें परस्पर भोग क्रीडा करून विषय सुख भोगण्याची आपेक्षा होत असते. मानवजन्म पुण्यविशेष पापअल्प म्हणजे पाप पुण्य मिश्रित जीव असल्याकारणाने मूत्रपूरित जननेंद्रिय स्थानी सुखाचा विराम आहे.

वस्तुस्थितीचा विचार केला असता देव म्हणजे भूतपंचकाचे जडशरीर धारी किंचिज्ञ मानव जीव नव्हेत. लक्ष्मी, पार्वती, विष्णु शंकरादि दैवतांना योगमय सूक्ष्म शरीर आहे. मायासहित शुद्ध विद्या तत्वाचे देहधारी असल्यामुळे ते स्वयंप्रकाशित आहेत. त्याना स्वप्न निद्रा नसून अखंड जागृदवस्था आहे. त्यांच्या नेत्राला निमिषस्पंदन नाही. वार्धक्य व रोगादि दुःख नाही. त्यांच्या उपभोग वस्तू शुद्ध प्राण तत्वाच्या असल्यामुळे त्या पदार्थाच्या उपभोग क्रियेंत शुद्ध सुखाचा अनुभव होतो. इच्छित वस्तू इच्छा मात्रे प्राप्त होत असल्यामुळे ते इच्छा भोगी आहेत. त्याना जल सेवन नसून आमृत पान करीत असल्यामुळे त्या पदार्थाच्या प्रतिक्रिया म्हणून मल मूत्राचे विसर्जन होत नाही. त्यांच्याकानाला मधुर नाद ध्वनीचा स्तुती स्तोत्राचा श्रवणानंद असून निंदा कर्कशादि कठोर ध्वनी श्रवणाचे दुःख नाही. त्वचेला मृदु पदार्थाचे स्पर्शसुख असून कठिणपदार्थस्पर्शाचे दुःखनाही. नेत्र अखंड प्रकाशित असून अंधाराचा लवलेश नाही. घ्राणाला शुद्ध सुगंधाचे


सुख असून दुर्गंधाचे दुःख नाही. दूरश्रवण, दूर दृष्टी असून भूत भविष्य, वर्तमान त्या त्रिकाल ज्ञानी आहेत. या वरील विशेष कारणामुळे शंकर पार्वती आदि देवता मानवा प्रमाणे जननेंद्रिय-द्वारे भोग क्रीडा करीत नाहीत. केवल स्मरण मात्रे त्यांना मैथु-नाचा आनंद होतो. मैथुनामध्ये ही अनेक प्रकार आहेत. मोरपक्षी मादी पुढे नाचतो. नृत्यामध्ये विशेषानंद होऊन आनंदाश्रु गळ-ताच मादी ते पीऊन टाकते. हाच त्यांचा मैथुनानंद होय. कासव स्मरण मात्रे करून आपल्या दूरस्थ लेकराला वात्सल्य भावांत दूध पाजविते. गीधपक्षी अहोरात्र अखंड आकाशांत भ्रमण करीत असतात. झाडावर व भूमीवर त्याचे घर नसते. प्राणी मरताच खाली उतरतात मांस खाऊन पुनः आकाशात संचार करीत अस-तात. ह्या जगांत अनेक जीव आहेत. प्रत्येक जीवीचे खाणे, पीणे, विषय भोग घेणे, विविध प्रकारचे आहेत. मग स्वर्ग वैकुंठातील सूक्ष्म शरीर धारी दैवतांच्या विषय भोगाचे प्रकार मानव सृष्टीच्या नियमाप्रमाणे आहेत असे निर्धारित करून साहित्य रूपाने ग्रंथाचे लिखाण करणे म्हणजे देवा संबंधीचे त्यांचे अज्ञान आहे. कपोल-कल्पित साहित्य निर्माण करून मानव कुलाचा भाव मलिन कर-ण्याचे महा पातक करीत आहेत. देव म्हणजे काय? देवाचे शरीर कोणत्या तत्वाचे आहे? याचा विचार न करीता विष्णूच्या शापाने शंकराचे जननेंद्रिय तुटून बारा तुकडे होऊन द्वादश ज्योतिर्लिंगे झाली आहेत. असे म्हणणे पापी जीवाचे लक्षण आहे.


शैव, पाशुपत, लाकूळ, भागवत, वैष्णव, सौर, शाक्त, आनंदमार्ग, कौळयामल आदिमत सांप्रदायिक, लिंग म्हणजे कैलास-वासी शंकराची मूर्ती आहे असे मानतात. परंतू लिंग देवतेचे नीरक्षण करून पाहिले असता शंकराप्रमाणे एकमुख, त्रिनेत्र,

चतुर्भुज, जटामुकुट, त्रिशूल, डमरू, व्याघ्रांबर, चंद्रशेखर, गंगाधर, नीलकंठ, नंदीवाहान, रुंडमालाधर, नागकंकण, सतीपार्वती, पुत्र-गणपति, ह्या अनेक चिन्हापैकी एकचिन्हतरी ह्या शिवलिंगा-मध्ये दिसून येतें का? नाही नाही. लिंग म्हणजे लय कर्ता शंकराची मूर्ती नव्हे. निग्रय कर्ता ईश्वराची मूर्ती नव्हे. स्थिति कर्ताविष्णूची मूर्ती नव्हे. हे सर्व नामरूप पुल्लिग स्त्रीलिंग, नपूसक लिंग बोधक सावयव मूर्ती आहेत, परंतू शिवलिंग हे नाम रूपातीत परशिव ब्रह्मचिन्ह आहे. शिवलिंगाविषयी शंकराची मूर्तीआहे. असे कल्पून शंकराचे वाहन नंदीविग्रह, लिंगासमोर स्थापना कर-ण्याची प्रथा आलेली आहे. खरोखर याचा विचार केला असता शिवलिंग ही परब्रह्म वस्तू आहे. कांही पुराण ग्रंथात शिवलिंग ही शंकराची मूर्ती आहे असे सांगितल्या वरून शिवलिंगा विषयी अनेक कल्पना अस्तित्वात आल्या.

शिवलिंग म्हणजे इष्टिका चितेवर धडाडून पेटलेल्या यज्ञाग्नीचे मूर्तरूप आहे. अर्थात यज्ञ कुंडातून प्रकट होणाऱ्या अग्नीलाच लिंग म्हटले आहे. पिंडी (लिंग) खालची साळुंका म्हणजे यज्ञ कुंड आणि साळुंका वरील पिंडी (लिंग) म्हणजे यज्ञ कुंडातून उसळणारा अग्निस्तंभ असा अर्थ केला आहे. पूर्वकाली यज्ञच करीत होतें. त्याचे रूपांतर होत होत लिंगाचे अस्तित्व आलेआहे लिंग म्हणजे यज्ञाची प्रतीक वस्तूआहे. अशी कांही आस्तिकवादी लोकांची कल्पना झाली आहे.

"ॐ इत्येकाक्षरंब्रह्म" "ब्रह्मेति लिंगमाख्यातम्"





शिवलिंग हे देवनागरी लिपीतील "ॐ" अक्षरच शिलेमध्ये कोरून निर्माण केले आहे. ॐ कारांतील बिंदू लिंग असून त्याच्या खालच्या भागाचे अक्षर पीठ आहे. मधला चंद्राकार खालच्या पीठाला वरील बिंदूला संयोजित करणारी खाच आहे. शिलामय ॐ काराचा उजवा व डावा भाग अखंडपणे दिसून येत असल्यामुळे ॐ अंक्षरच लिंगा प्रमाणे दिसून येते. ॐ काराची उपासना म्हणजे नामरूपांतीत परशिव ब्रह्माची उपासना आहे.

चराचर अनंत ब्रह्मांड ज्या मूळ वस्तूंत सृष्टी, स्थिति, लय, निग्रह, अनुग्रह ह्या पंच विधान पूर्वक वर्तन करतात. त्या अनंत ब्रह्मांडाला आधार भूत असलेल्या महद्वस्तूला परब्रह्म, परशिव,पूर्ण व लिंग असे म्हणतात. हे चराचर विश्व दिशा व काल यादोन्हीच्या अंतर्भूत आहे. शिवलिंग, दिशा व काल या दोन्हीच्या अतीत आहे. परशिव ब्रह्माची सर्व लक्षणे प्रत्यक्षानुभवांत आणून देणारी वस्तू म्हणजे या जगात (०) बिंदू एकच आहे.

— व्याकरण शास्त्र नियमानुसार —

व्यंजनाला वर्ण बनविण्याकरिता स्वराची अवश्यकता असते. अनुस्वाराला कोणत्याही स्वर वर्णाची अवश्यकता नसून

तो स्वयंभू आहे. स्वर व व्यंजने सापेक्षक असून अपूर्ण आहेत. अनुस्वार (०) मात्र पूर्ण रूपी परमात्म्याच्या सादृश्य गुणधर्माने युक्तअसल्यामुळे स्वयंभू, नित्यतृप्त, व पूर्ण स्वरूप आहे. एका पुढे एक अक्षर लीहीत गेल्याने शब्दोत्पत्ती होते. कमल, वसंत, ह्या शब्दाचे द्योतक कमल, वसंत, नावाऱ्या व्यक्तीचे रूप भावने पुढे येऊ लागते. तसे एका पुढे एक बिंदू (..) लीहीत गेल्याने विश्वांतील अनेक नाम रूपा पैकी एक ही नाम व रूप भावनेस गोचर होत नाही. ह्या वरून शब्द नाम रूपांकित आहे. व बिंदू नाम रूपातीत आहे. म्हणून परमात्माही नामरूपातीत आहे.

जगांतील भिन्न भिन्न भाषेत वर्णाची आकृती भिन्नभिन्न रूपांत असल्याचे दिसून येते· मराठी "म" इंग्रजी "M" कानडी व उर्दू वगैरे भाषेत म हे अक्षर वेग वेगळचा पद्धतीनेलिहीले जाते. मात्र साऱ्या विश्वांत बिंदूची आकृती एक सारखीच आहे. ह्या वरून बिंदू अविनाशी आहे. अर्थात परमात्माही अविनाशीआहे

— गणित शास्त्र नियमानुसार —

१,२,३,४,५,६,७,८,९, हे अंक पाहिल्याने भावनेला संख्येचा बोध होतो. केवळ (०) शून्य पाहिले असता कोणत्याही वस्तूची संख्या भावनेपुढे येत नाही. ह्या वरून अंक गणित आहेत. शून्य अगणित आहे. अर्थात परमात्माही अगणित आहे. गणिता मधील अंक वृद्धी व क्षय पावतात. "१" एक ह्या अकांत १ एक मिळविला तर २ दोन होतात. २ दोन ह्या अंकात पुन: १ एक हा अंक मिळविला तर ३ तीन होतात. तसेच ९ ह्या अंकामधून १ अंक वजा केल्यास ८ आठ राहातात. ८ ह्या अंकातून १ एक काढल्यास ७ सात राहतात. गणितातील अंक वृद्धी क्षयाने युक्त आहेत. शून्यापुढे (०००) शून्य दिल्याने अथवा (०/०) शून्यांत

शून्य मिळविल्याने किंवा वजा केल्याने वृद्धी व क्षय होत नाहीं. म्हणून शून्य अक्षय, अव्यय आहे. अर्थात शून्यस्वरूप परमात्मा अक्षय, अव्यय स्वरूप आहे. एक १ ह्या अंकापुढे शून्य दिल्यास १० होतात. १० ह्या अंकापुढे शून्य दिल्यास १०० होतात म्हणजे दसपटीने वाढ होते. यावरून बिंदू हा सर्व शक्तीमान् परमात्म स्वरूप असल्याचे प्रत्ययास येते. अंकापुढे शून्य देण्या ऐवजी अंकाच्या मागे दिल्यास, शून्याची गणना होत नाही म्हणून शून्य, अगणित परमात्म स्वरूप आहे.

– खगोल व भूगोल शास्त्र नियमानुसार –

आकाशाकडे निरीक्षण करून पाहिल्यास आकाश बिंदू सारखे गोल दिसते. आणि पृथ्वीचे निरीक्षण केल्यास पृथ्वी गोल बिंदूच्या आकृति प्रमाणे दिसते. सर्व चराचर वस्तू पृथ्वी व आकाश या दोन्हीमध्ये समाविष्ट आहेत. पृथ्वी वआकाश दोन्ही बिंदू-सारखे गोल आहेत म्हणून बिंदू विश्व बोधक परमात्म स्वरूप आहे.

– रेखा शास्त्राच्या नियमानुसार –

बिंदू (चिन्ह) एक वस्तू मानिली आहे. ती एक वस्तू आहे अशी कल्पना करावी तर त्या बिंदूपासून अमुक एक वस्तू आहे म्हणून बोध होत नाही. कांही नाही म्हणावे तर कांही तरी भावनेला गम्य होते. बिंदू पेक्षा लहान कोणतीच वस्तू होऊ शकत नाही आणि त्याचे खंडण व स्थलांतर करणे शक्य नाही. ह्या वरून बिंदू नित्य, अचल, परमात्मस्वरूप आहे. बिंदूला (.) आकृती नाही (———) रेषेला आकृती आहे. अनंत बिंदूच्या संयोजनाने रेषा बनते. पृथ्वी, आप, तेज, वायू, ह्या चार तत्वामध्ये अति सूक्ष्म परमाणुबिंदू अनंत आहेत. म्हणून परमात्माही अनंत आहे.

– योग शास्त्राच्या नियमानुसार –

प्राणायामाने वायू नियमन करून षण्मुखी, शांभवी योगमुद्रेचा अभ्यास केल्यास प्रत्येक मनुष्याच्या नासिकाग्री, भ्रुकुटी, वा ब्रह्मरंध्री प्रकाशमान तेजोमय विंदूरूप प्राणलिंगाचे दर्शन होते. सारांश स्वयंभू, सर्वशक्तीमान् परिपूर्ण, नित्यतृप्त अविनाशी, अगणित, अक्षय, अव्यय, अचल, अनंत, विश्वबोधक आणि नाम रूपातीत ह्या परमात्म्याची सर्व लक्षणे विंदूच्या ठिकाणी प्रत्यक्षपणे अनुभवास येतात. या वरील सर्व प्रमाणावरून लिंग म्हणजे शंकराची उपासना नसून निर्गुण परमात्म्याची उपासना आहे असे सिद्ध होते.

लिंग या शब्दाचा अर्थ चिन्ह असा होतो. कोणत्याही एका वस्तूला ओळखण्यासाठी उपयोग होणाऱ्या साधनाला लिंग अथवा चिन्ह म्हणतात. लिंग आणि चिन्ह दोन्ही शब्द एकार्थ बोधक आहेत, व्याकरण शास्त्रांत स्त्री लिंग, पुल्लिग, नपूसकलिंग असे तीन प्रकारचे लिंग आहेत. स्त्री वाचक लक्षणाचा बोध करणारा स्त्रीलिंग, पुरुष वाचक चिन्हाचा बोध करणारा पुल्लिग, नपूसक वाचक चिन्हाचा बोध करणारा नपूसकलिंग असा आहे. स्त्रीलिंग, पुल्लिग, नपूसकलिंग हे तीन्ही लिंग नाम, रूप, गुण स्वभाव दर्शविणारे आहेत. म्हणजे नाम रूपात्मक सकल प्रपंचातील वस्तू कोणत्याही एका लिंग भेदात आश्रय करून जीवीत आहेत. नाम, रूप, स्वभाव, गुण भिन्नतेमुळे हे लिंग भेद झाले आहेत. चराचर सृष्टी विषम स्वभावाने पूरित आहे. सृष्ट पदार्थाच्या लिंग भेदामुळे सर्व जीव परस्पर सापेक्ष भावनेत वर्तन करतात. स्त्रीला स्त्रीची आपेक्षा न होता, पुरुषाची अपेक्षा होते. पुरुषाला पुरुषाची आपेक्षा न होता स्त्रीची आपेक्षा होते. पृथ्वी ही

बीजाची आपेक्षा करून वनस्पतीना जन्म देते, अर्थात सृष्टीतील उत्पत्तीचा क्रम सजातीय लिंगामध्ये नसून विजातीय लिंगामध्ये आहे. लिंग भेदामुळे सृष्टीत आनंत प्रभेद होऊन अनंत नाम, अनंत रूपाने भासमान होत आहेत. संसार समुद्र म्हणजे लिंग भेदांचे अनंत परमाणू समूहच समजावे. लिंग भेदानेच मानवांतील इच्छा, ज्ञान, क्रिया या शक्तीचा विविध वस्तूत उपयोग होत असल्याने अनंत कर्माची उत्पत्ती होते. जेणे करून जीव जन्म मरण रूपी भव बंधन चक्रात भ्रमण करीत असतो. नाम रूपात्मक हे प्रपंच नाम रूपातीत परशिव लिंगातच उत्थान पाऊन त्याच्या आश्रयात राहून शेवटी त्या परशिव लिंगामध्येच ऐक्य पावतात.

-'लीयते यत्र गम्यंते तल्लिंगम् ब्रह्म केवलम् (सि. शि. मणि नि स्थ)

स्थूल सूक्ष्म अनंत लोक ज्या वस्तूत जन्मून ज्या वस्तूत विलय पावतात त्या मूलआधारभूत महद्वस्तूला ब्रह्मअथवा लिंग म्हणतात.

अव्यक्तं लिंगमित्याहुर्जगतां मूल कारणम् । (सि.शि.मणि नि.स्थल)

या जगाचे मूल कारण असलेल्या अव्यक्त स्वरूप अशा परब्रह्माला लिंग म्हणातत.

अव्यक्तं लिंगमाख्यातमनंतमजरं ध्रुवम् (चंद्रज्ञानागम तृतीय पटल)

काया वाचा मनाला अगोचर असून जन्म मरण विरहित निश्चल स्वरूप अशा परमात्म्याला लिंग म्हणतात.

अपरिच्छिन्नमव्यक्तं, लिंग, ब्रह्म, सनातनम् । (सिशि.म लि.धा.स्थ)

अखंड व अव्यक्त स्वरूप असलेल्या सनातन परशिव ब्रह्माला लिंग म्हणतात.

शिवाख्यं परमं ब्रह्म परमाकाशलक्षणम् ।
लिंगमित्युच्यते सद्भिर्यद्विना न जगत्स्थितिः ॥

(सि. शि. मणि महाकाश स्थल)

परमाकाश लक्षणस्वरूप परब्रह्माला शिव म्हणतात व लिंग म्हणतात

लयं गच्छति यत्रैव जगदेतच्चराचरम् ।
पुनः पुनः समुत्पत्ति तल्लिंगं ब्रह्म शाश्वतम् ॥

(सि. शि. मणि लिंग धारण स्थल)

ज्या वस्तूमध्ये चराचर अनंत ब्रह्मांड लय पावतात. व पुनः पुनः उत्पन्न होतात. त्या महद्वस्तूला ब्रह्म म्हणतात. लिंग म्हणतात.

मानव नाम रूपात्मक प्रपंचाच्या कर्म बंधनांत सापडला आहे. त्याच्या बंध निवृत्तीसाठी जीवन्मुक्ती देणाऱ्या नाम रूपातीत लिंगरूपी परब्रह्माची उपासना करणे अवश्यक आहे. अधो प्रवृत्तीमध्ये वाहाणाऱ्या स्वाभाविक प्रेमाला देवता मूर्तीच्या उपासना द्वारे ऊर्ध्व भावनेंत परिर्वातत करून पुनः त्या शुद्धभावाला भावातीत जीवन्मुक्तीची सहजावस्था प्राप्त होण्यासाठी ब्रह्मचिन्ह शिवलिंग पूजा महत्तर साधन आहे.

ब्रह्मा विष्णु आदि देवता सावयव साकार मूर्ती आहेत. मात्र लिंग हे सावयव सगुण साकार मूर्ती नसून निर्गुण निराकार नित्यस्वरूप असलेले ब्रह्मचिन्ह शिवलिंग आहे. साधकाना प्रयोगात्मक स्वरूपांत अवकाश मिळावा या उद्देशाने सुवर्ण,रजत,ताम्र धातू अथवा रत्न, वज्र, काळा, पांढरा, तांबडा, स्फटिक,चंद्रकांत सूर्यकांत, बाण आदि अनेक प्रकारच्या शिला पासून लिंग रूपी ब्रह्म चिन्ह निर्माण करून भूमीवर स्थापन करण्यांत आले आहे. अनेक भक्तांच्या सामुहिक पूजेसाठी भूमीवर स्थापन कलेले स्थावर लिंग होय.

एका गोल शिलामय बिंदू रूप शिवलिंगाला



भूमीवर स्थापन केल्यास ते भूमीवर थांवत नाही. वायूने चलन पाऊन स्थलांतर होते. उपासक भक्त आपल्या भक्ती भावांत जल, गंध, अक्षता, पत्र, पुष्पादिकाने पूजा करतानां हस्त स्पर्श होऊन स्थानांतर होण्याचा संभव असतो. त्यामुळे उपासक भक्तांचा साधन क्रम तुटून जातो. त्या पूज्य वस्तूला केवळ भुमीवर स्थापन करणे योग्य नाही असे समजून शिलामय पीठाची कल्पना करण्यांत आली. त्या पीठावर बिंदू रूप लिंगाला स्थापन केल्यास ते गोल असल्यामुळे थांवत नाही म्हणून त्या पीठाच्या मध्यभागी किंचित् छिद्र निर्माण करून



त्यांत गोलाकार लिंगाची स्थापना करण्यांत आली आहे.



पूजा करताना वाहिलेले अभिषेक द्रव्य समोवती वाहून पवित्र

भज्जन व पत्र पुष्पादिक निर्माल्य द्रव्य पूजक भक्ताच्या पायांत येवून त्या निर्माल्या विषयी अनादर व अपूज्य भाव निर्माण होऊ नये म्हणून त्या पीठाला जलहरीची (पन्हाळ) कल्पना करून जोडण्यात आली.



उत्तरोत्तर त्या लिंगाच्या आकृतीत विकास होत गेला त्या लिंगास अधिक सौंदर्य यावे आणि वरील गोलाकार शिवलिंग पूजक भक्ताला पूजेसाठी व त्राटक (दृष्टी) प्रयोगाच्या वेळी नेत्र सम असावे म्हणून त्यापीठाखाली दुसऱ्या अधो पीठाची जोडणी करण्यांत आली:



त्या लिंगाला कोणी वरील गोलक लिंगच मोठा बनवतील कोणी खालचा पिठाचा भाग मोठा ठेवतील कोणी जलहरीचा भाग लांब करतील कसेही राहिले तरी चालेल मात्र मानव सौंदर्यप्रिय असल्यामुळे या लिंगामध्ये कोणतेही अवयव नसले तरी नाम रूपातीत शिवलिंगाच्या ठिकाणी सहज स्वभाव सिद्ध सौंदर्य या मानवाला पाहिजेच म्हणून लिंग रूपी ब्रह्म चिन्हाला कला पूर्ण पंच सूत्री विधान पूर्वक बनविण्यात आले आहे.

लिंग वृत्त समं पीठं दीर्घं विस्तार मेवच ।
तदर्धम् गोमुखं चैव गो मुखाग्रं तदर्धकम् ।।
तदर्धम् नाळ विस्तारं पंच सूत्रंप्रकीर्तितम् ।।

पीठाच्या वरील गोलकाला लिंग म्हणतात.

१) सूत्राने लिंगाच्या सभोवतीचे माप घेऊन त्या सूत्राच्या प्रमाणांत पीठ पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, समान लांबी रूंदीचे असावे.

२) लिंगाच्या सभोवतीच्या प्रमाणांत पीठाची उंची असावी.

३) लिंगाच्या सभोवतीच्या प्रमणाच्या अर्ध्या भागा इतकी गोमुखाची लांबी असावी.

४) गो मुखाचा अर्धा भाग या प्रमाणांत गो मुखाग्रअसावे.

५) गों मुखाग्राचा अर्धाभाग या प्रमाणांत नाळ(पन्हाळ) असावी. या प्रमाणात असलेल्या लिंगाला पंचसूत्री शिवलिंग म्हणतात.

– अवाहन व विसर्जन –

सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिका, ब्रह्मा, विष्णु, रूद्र, ईश्वर आणि पंच आचार्य या सावयव साकार दैवतांची उपासना पूजा करतानां प्रथम त्या शिलामय मुर्तीत अथवा कलशामध्ये देवाना अवाहन करावे लागते. अवाहन म्हणजे त्या सूक्ष्म शरीर धारी दैवताला बोलावणे होय. अवाहान केल्या शिवाय पूजा करता येत नाही. पूजा विधी समाप्त झाल्यानंतर त्या दैवताचे विसर्जन करावे लागते. विसर्जन म्हणजे भावनामय संकल्पाने त्या सूक्ष्म शरीर धारी दैवताला त्यांच्या स्वस्थानाला पाठऊन देणे होय. अवाहन विसर्जन या विधीवरून कल्पना होते की दैवता सूक्ष्म शरीर धारी असून एकदेशी असल्यामुळे त्यांना अवाहन

विसर्जन करावे लागते. परंतू शिवलिंगाची पूजा करताना अवाहन विसर्जन करण्याची अवश्यकता नाही. कारण लिंगरूपी परमात्मा सर्व व्यापक, सर्वांतर्यामी, सर्वाधार, सर्वभरित, जल, स्थल, काष्ठ पाषाण, तरु, लतादि या सर्वामध्ये व्याप्त असल्यामुळे त्या महान वस्तूला कुठे बोलवावे व कुठे पाठवावे?

यदा शिवकलायुक्तं लिंगं दद्यान्महा गरुः ।
तदारभ्य शिवस्तत्र तिष्ठत्याह्वानमत्र किम्? ॥
संस्कारेषु लिंगेषु सदा सन्निहितः शिवः ।
तत्राह्वानं न कर्तव्यं प्रति पत्ति विरोधतः ॥

(सि. शि. मणि अह्वान निरसन स्थल)

महा आचार्यांनी प्रथमतः एक वेळ नूतन शिवलिंगाला शिवकला संपन्न करून दिल्यानंतर त्या लिंगात मूळ परशिव ब्रह्मभक्तासाठी सदा सर्वदा अभिमुख झालेला असतो. पुनः अवाहन करणे विरोध असून अपराध होतो. या करीता अवाहन व विसर्जनाची अवश्यकता नाही.

– स्थावर शिवलिंग उपासना –

सकल मानवाना लिंगोपासनेचे संस्कार व्हावे या उद्देशाने महा आचार्य, ऋषि, मुनी लोकानी अनेक शिवलिंग भूमीवर स्थापन केले आहेत. ते सर्व आता महा तीर्थक्षेत्र म्हणवितात. सौराष्ट्र श्री सोमनाथ लिंग, श्रीशैल मल्लिकार्जुन लिंग, उज्जयनी श्री महांकालेश्वर लिंग, मांधाता श्री ॐ कार ममलेश्वर लिंग, परळी श्री वैद्यनाथ लिंग, डाकिनी क्षेत्रांतील भीमाशंकर लिंग रामेश्वरातील श्री रामेश्वर लिंग, वाराणशी (काशी) श्री विश्वेश्वर लिंग, गौतमी (गोदावरी) तटी श्री त्र्यंबकेश्वर लिंग दारुक वनांतील औंढा श्री नागनाथ लिंग, वेरूळ क्षेत्रातील

घुश्रुणेश्वर लिंग, हिमालय पर्वतातील श्री केदारेश्वर लिंग असे द्वादश ज्योतिर्लिंग रूपांत विराजमान होऊन भक्तांच्या भक्ती प्रेमाला अवकाश देत आहेत. अशा महा पुण्य क्षेत्राला जाण्या पासून त्या क्षेत्रातील शिवलिंगामध्ये आपल्या भक्ती भावनेत तन, मन, धन समर्पण करण्या पासून शिव भक्तीचा संस्कार होतो. आणि तेथे जमलेल्या महा विभूतींचे, योग्यांचे, आचार्यांचे पाद पद्म दर्शन, आशिर्वाद आणि उपदेश द्वारे भक्ती भावाचा संस्कार दृढ होतो. त्या तपो भूमीच्या पवित्र संस्कारातील अन्न, पाणी एक कण देखील सेवन केल्यानें भक्ताचे मन व शरीर पवित्र होते. यासाठी महा तीर्थ क्षेत्रे, सामुहिक लोकांच्या भक्ती प्रेमाचा विकास करण्यासाठी साधन आहेत. ही पुण्यक्षेत्रे राष्ट्राची दैवी संपत्ती आहेत.

कर्म योगातील मानवाने आपल्या सुखासाठी एक घर कल्पून घेतले आहे. आमचे गांव या सामुहिक रूपांत वास करून ते सर्व लोक ईश्वर प्रीत्यर्थ एक मंदिर निर्माण करून त्यांत देव मूर्तीची स्थापना करतात. ते ग्राम दैवत मंदिर होय. मंदिर जड असले तरी देव नावाची वस्तू ह्या सृष्टीमध्ये न दिसणारी असल्यामुळे मंदिराचे स्मरण होताच भक्ताचे भाव मन एका अत्यंत गूढ सूक्ष्म अवस्थेत जाऊन पोहोंचत असते. कर्म योगी मानवाला देखील अत्यल्प काल अकर्मत्व स्थितीमध्ये नेऊन पोहोंचविते. मंदिराच्या सभोवती. मल मूत्र विसर्जन करूनये. विषय सेवनादि कोणतेही प्रमाद करूनयेत. पुण्य कर्म करावे. मठ मंदिर मानवाच्या भोग सुखासाठी नसून विषयाचा त्याग व वैराग्याचे शिक्षण देणाऱ्या पाठ शाळा आहेत. आपले भोग मंदिर (घर) सोडून त्याग मंदिरातील भक्ती संस्कार प्रतिदिन

एक निमिष तरी मानवाला प्राप्त व्हावेत या उद्देशाने मठ मंदिरे अस्तित्वात आलेली आहेत. घर मानवाच्या अधोभावनेतील भोग साधन आहे. आणि मठ मंदिर ऊर्ध्व भावनेच्या पुण्य कर्माचे साधन आहे. पुरवासी सर्व जन परस्परांच्या घराला फलापेक्ष बुद्धीने जातात. विशेषत: विवाहादि मंगल कार्यात आमंत्रण नसता कोणी जात नाही. तेथे अमंत्रणाने गेल्यास आदरातिथ्य मनाजोगे नाही झाल्यास विषाद वाटतो. कोणीही असो मी एक व्यक्ती आहे ही भावना असून आपल्या प्रेमाला प्रतिफलाची आपेक्षा करतो. परंतू मठ मंदिराला जाण्यास्तव मी एक सन्मानित व्यक्ती आहे. अशी भावना न करीता सेवक आहे अशा भावनेने जात असतो. आणि तेथे उत्सव, भजन, कीर्तन, पुराण, प्रवचन अन्न संतर्पण आदि पुण्य कर्मानुष्ठान चालत असतात. त्यात सेवा भावनेने भाग घेतो. हे सर्व कर्मयोगी मानवाच्या मनाला संघमय जीवनांत भक्ती प्रेमाचा संस्कार वाढावा या उद्देशार्थ मठ मंदिराची निर्मिती झाली आहे. मठ मंदिराच्या विकासासाठी मार्गदर्शक व्यक्तित्व असणारे आचार्य पाहिजेत. तसेच मंदिरात ईश्वराची पूजा, आरती, नानाविध वाद्य वैभव प्रतिदिन चालावे आणि ग्रामाचे क्षेमारोग्य सकलैश्वर्य वाढावे या उद्देशाने पुरवासी सर्व लोक आपल्या संघमय जीवनाद्वारे ते पुण्य कर्म चालवीत असतात. सर्व सामान्य लोकानां प्रतिदिन जावून सेवा पूजा करणे शक्य नाही. सर्वांच्या वतीने पुण्य कर्म दररोज चालावे या उद्देशाने मंदिरात अर्चकाची व्यवस्था केली आहे. त्या अर्चकाच्या कर्म योगाचा भार पुरवासी लोक सेवा भावनेने चालवीत असतात. आर्चक म्हणजे ईश्वराचा प्रतिनिधी होय. परंतू तो मानव समाजाचा सेवक नाही. भक्ताच्या वतीने अर्चक पत्र, पुष्प, फल

समर्पण करीत असतो. पूजा विधी संपल्या नंतर अर्चक भक्तासाठी आशिर्वाद रूपांत फल, पुष्प देत असतो. भक्ताच्या प्रेमाला ईश्वर प्रतिनिधी स्वरूपांत अर्चक नसल्यास देवापुढील प्रसाद आपला आपणच उचलून घेतल्याने आपली सर्मपित क्रिया भक्ताने सोडल्या सारखी होईल. ईश्वरार्पित वस्तूवर भक्ताची मालकी नाही.तथापि भक्ती भावनेतील याचना एकच एक आहे. या साठी ईश्वर प्रतिनिधी अर्चकाने आशिर्वाद रूपांत दिलेल्या खाद्य पेय वस्तू भक्त प्रसादभावनेने सेवन करीत असतो. मठ मंदिरात यज्ञ, याग, होम, हवन, भजन, कीर्तन, अन्नसंतर्पण आदि पुण्यकर्म ईश्वरा प्रीत्यर्थ उपयोगी पडून तद्वारा राष्ट्राला सर्वतोपरी मंगल व्हावे म्हणून राष्ट्राच्यावतीने मठ मंदिराच्या संरक्षणासाठी भूमीदान, धनदान करण्यांत आलेले आहे.

पुण्य कर्मानुष्ठानाचा संस्कार होण्यासाठी त्यांचे संदर्शन पुनः पुनः व्हावे लागते. ते न घडले तरी चालेल पण त्यास उपाय नसतो. आपल्या संसार कर्मापासून एक निमिष का होइना निवृत्त होऊन देवाच्या मंदिराला दररोज जावून देवाला नमस्कार केला तरी पुरे. एवढ्याच अल्पभक्ती संस्काराने भावनेला परिशुद्धता येते. त्या पासून शिवपूजा व शिवव्रत आचरण करावे म्हणून भावनेत क्रमेण विकास होत वर्षाला एक दिवस, महिन्याला एक दिवस, पक्षाला एक दिवस, आठवड्याला एक दिवस, पुण्य कर्माचरण करीत गेल्यास प्रतिदिन आचरण करावे म्हणून भक्ती प्रेमाचा अंकुर स्थिरावतो. मंदिरात स्थापलेले शिवलिंग सामुहिक भक्ताच्या वतीने असल्यामुळे प्रतिदिन मनाची पूर्ती होण्या जोगी वेळ घेऊन शिवलिंगाची पूजा करावी म्हणणाऱ्या भक्ताला जागेच्या अभावी प्रवेश शक्य नाही. जो आपल्या भक्ती

भावनेत प्रथम देवळात जाऊन पोहोंचतो. तोदेव त्याभक्ताचा असतो. जसे धर्मशाळा, प्रवाशी लोकाच्या सोईसाठी असली तरी जो प्रवाशी त्या स्थानाला अगोदर आलेला असतो ते त्याच्या मालकीत असते त्याप्रमाणे जो शिवभक्त प्रथम देवळांत जातो तो देव त्या भक्ताच्या आधीन असल्यामुळे शिवमंदिरांत सामुहिक भक्तवृंदाचे पुण्य कर्म चालत असल्यामुळे प्रशांत वातावरण प्राप्त होणे त्याला शक्य नाही. व्यक्तिगत भक्ती प्रेमानुष्ठानासाठी आपल्या घरीच एक देवघर कल्पून घेतलेले आहे. त्या घरांत पुण्य कर्मानुष्ठान चालत असणार, कुटुंबांतील सर्व लोक त्या देवघरा विषयी वैराग्य संपन्न होऊन पूज्य भाव दर्शवितात. त्या देव घरांत एक पीठ निर्माण करून त्या पीठावर आचार्यांच्या हाताने शिवलिंगाची स्थापना करावी. साधु, सत्पुरुषांच्या, ऋषि मुनींच्या भावचित्राने अलंकारीत करून त्या घरात प्रवेश घेताच भक्ती प्रेमाचा उदय होतो. पूजा घरांत प्रतिदिन पूजानुष्ठान व्रत चालविण्याने घरातील लहान मोठया सर्व लोकाना भक्ती भावाचा संस्कार होतो. आणि शिवलिंगाची पूजा करणाऱ्या भक्ताचे मन शिवसंस्काराने क्रमेण शुद्ध होते. दररोज पूजा करणाऱ्या स्थावरलिंगाचे व्रत कांही कामा निमित्त ग्रामांतर व देशांतर करण्याचा योग आल्यास शिवलिंग पूजा व्रतांत खंड पडतो. घरांत स्थापित केलेले शिवलिंग देखील एका कुटुंबांतील लोकांच्या भक्ती प्रेमाची संपत्ती अर्थात अल्प क्षेत्राचे भक्ती प्रेमाचे केंद्र बनलेले असते. जसे वात्सल्य भावमय असलेली माता आपल्या शिशूचा वियोग थोडाही सहन करीत नाही त्या शिशूला जसे अखंडपणे भाव,मन, कायेने धारण करते तसे शिवव्रती असलेला भक्त पूजा करीत असलेलेशिवलिंग आपले प्राण दैवत समजतो. स्थावर लिंगाच्या पूजाव्रतात आपले

जीवन समर्पण करून सेव्य सेवक भावनेने आचरण करतो. तो भक्त म्हणवितो. भक्त देवाचा अविभाज्य घटक आहे. तोच भक्त व्रत निवृत्त झाल्यास देवा पासून विभक्त होऊन भवि म्हणवितो.

भवि शब्दाचा विचार केला असता; "भू" (धातु) "भव" म्हणजे होणे, असणे, जन्मणे, असा अर्थ देणारा भवी शब्द जन्म मरणाच्या आधीन असलेला असा अर्थ होतो. पुत्र, दारा, धन या तीन्ही पदार्थाला आपण अधिपति होऊन अधो भावनेने आचरण करीत असल्याने त्याच्या भावनेला कर्म प्रवृत्तीचा लेप होऊन भवित्व दोष प्राप्तहोतो. चतुष्पाद पशूला एक मालक असून त्या मालकाच्या स्वामीत्वांत त्याचा अहार विहार असून सुखाने तो जीवीत असतो. तो पशू आपल्या मालकाचे आधिपत्य गमावून स्वच्छंद पणे भ्रमण करीत असल्यास ते कोणत्याही संकटाला स्वयं सिद्ध असल्याप्रमाणे भूत, प्राण, भाव, तनुत्रय आवरणमय मानवपशू, देवाचे आधिपत्य न स्वीकारता अधो भावनेत स्वच्छंद भ्रमण करतो व भवित्व दोषाद्वारे मोक्ष प्राप्तीला तो असमर्थ होतो. पशुत्व निवृत्तीसाठी पति आधिपत्य असणे अवश्यक आहे. मानवाने कोणत्याहि एका व्रताचा अंगीकार केल्यास त्या व्रताचा अधिपति असलेला देव पति असून आपण पशू (भक्त) होऊन वर्तन करणे व्रताचरण होय.

"व्रत" शब्दाचा विचार केल्यास "व्र" (धातु) म्हणजे मानणे, अर्पण होणे, म्हणजे आपण मान्य केलेले व अर्पण झालेले असा अर्थ होतो. **"स्वकर्तव्य विषये नियतः संकल्पो व्रतम्"** (मिमांसा) आपण एक पुण्य कर्म करावे म्हणून निश्चय करून त्याप्रमाणे संकल्प करून आचरणात आणावयास व्रत म्हणतात देवाच्या आधिपत्यात

निरतिशय प्रेमाची भक्ती नियमित पणे समर्पण करणे व्रताचरण होय. मास व्रताचरणामध्ये भक्त महिन्याला एक दिवस भक्त होऊन राहतो. पक्षांत एक दिवस व्रत पूजा करणारा एक दिवस भक्त राहतो.आठवड्यात एक दिवस व्रताचरणारा एक दिवस भक्तहोऊन असतो. दररोज एक वेळ पूजा करणारा, दररोज दोन वेळ पूजा-व्रत करणारा, दररोज प्रातःकाल, मध्यान्ह व सायंकाल अशी त्रिकाल पूजा करणा भक्त त्या पूजेच्या वेळीच देवाच्या अधिपत्यांत असतो.मात्र व्रत निवृत्त होताच देवाचे अधिपत्य टाकून भवी होऊन जगतो. उपनयन, विवाहादि मंगल कार्याच्या निमित्ताने आचरण करण्यांत येणारे नैमित्तिक व्रत, पुत्र धन धान्यादि प्राप्ती साठी फलापेक्ष भावनेत करणारे काम्य व्रत, पुण्य प्राप्तीसाठी करण्यात येणारे निष्काम व्रत, पापक्षालनार्थ करण्यात येणारे प्रायश्चित्त व्रत ही वरील सर्व व्रते, सप्त कोटी आहेत. मानव कोटीच्या उध्दारासाठी सप्त कोटी मंत्र आहेत. सप्त कोटी दैवत आहेत. भक्त व्रताचरण करीत असल्यावेळीच देवाच्या अधिपत्यात भक्त होऊन राहतो. व्रत निवृत्त होताच देवा पासूनविभक्त होऊन भवी होतो. ही सर्व व्रते खंड व्रते आहेत.

– लिंग धारणेची अवश्यकता –

मानवाला भूत, प्राण व भाव, या तनु त्रयाच्या आवरणामुळे मी देही आहे, अशा अहं भावाने पशुत्व प्राप्त झाले आहे. पशुत्व निवृत्ती हेच जीवाचे अंतिम लक्ष्य आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्रादि देवता भाव, प्राण या तनुव्दयाच्या आवरणाने युक्त असल्याने त्यानां सुद्धा पशुत्व आहे. किंचित् मानव,पशू असून ब्रह्मादि देवता पती असले तरी सालोक्य सामीप्य,सारूप्य व सायुज्य,या परलोकांतील पदवीप्रदाना पुरतेच समर्थ आहेत. मात्र तनु त्रयाच्या

आवरणाचा परिहार करून जन्म मरण रहित मोक्ष प्रदानामध्ये त्या असमर्थ आहेत. तनु त्रयापासून उत्पन्न झालेल्या पशुत्व निवृत्तीसाठी पशुपति असलेल्या परशिव ब्रह्माची उपासना मानवाना अखंड पाहिजे. अधोवाहीनी असलेले जलकण अग्नि संस्काराने वाष्परूप होऊन ऊर्ध्व गतीने वायु रूपांत तादात्म्य पावतात. त्या प्रमाणे पशु निवृत्तीसाठी लिंगरूपी पतीच्या सानिध्यातील तप्तसंस्काराने तनुत्रयामधील मलकणाचा विक्षेप होऊन भवित्व दोष नष्ट होतो. स्थावरलिंग उपासनेमध्ये शिवलिंगाचे आधिपत्य अखंडपणे लाभत नाही. लिंगाधिपत्य अखंड लाभण्यासाठी शरीरावर लिंग धारणा अखंड पाहिजे.

पंच ज्ञानेंद्रिय व पंच कर्मेन्द्रिय युक्त मानव शरीर आहे. कान, डोळे, नाक, जीभ व त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये आहेत, मुख हस्त, पाय, गुद व गुह्य ही पाच कर्मेंद्रिये आहेत. तोंडाने बोलतो, कानाने ऐकतो, डोळ्याने पहातो, पायाने चालतो, पानवायू नाकाने घेतो, गुदाने अपान वायु सोडतो, जिभेने रस पदार्थ चाखतो व जननेंद्रियाने मूत्र व वीर्य विसर्जन करतो. त्वचेचा-स्पर्शधर्म, हाताने जाणवतो. हे इंद्रिय परस्पर एकमेकास संबंधित आहेत. मात्र सर्वांगामध्ये स्पर्शज्ञान व्यापक असल्यामुळे शरीराच्या कोणत्याही स्थानाला स्पर्शकेल्यास स्पर्शज्ञानाची जाणीव होते. इतर चार ज्ञानेंद्रियाचा एका विशिष्ट स्थानीच अनुभव येतो. जीभ, रसपदार्थ स्पर्शाने रसस्वाद जाणते. घ्राण वायु स्पर्शाने गंधजाणतो. नेत्र तेज स्पर्शाने रूप जाणतात. कान नाद स्पर्शाने ध्वनी जाणतात. ही चार इंद्रिये स्पर्शज्ञानातच विकास पावतात. आणि मल मूत्र कोषातील त्वचेच्या स्पर्शज्ञानाने मलाचे विसर्जन कार्याची जाणीव होते. तहान भूकेचा ताप जठराग्नीच्या

स्पर्शानें जाणवतो. शीतोष्ण किंवा कठीण, मऊ सर्वांगातील स्पर्श ज्ञानाने जाणवतो. रोगाचा ताप त्वचेच्या स्पर्शज्ञानाने समजतो. मार्गांत खडे काटे नसावेत विश्रांती साठी अंथरूण मऊ असावे. भोजनांत देखील मऊ पदार्थ प्रिय वाटतात. वात्सल्य भावनेत मुलाना हाताने स्पर्श करणे, मुखाने चुंबन घेणे व अंगाला कवटाळून धरणे ही सर्व त्वगेंद्रिय स्पर्श ज्ञानाची सुखे आहेत. स्त्री पुरुषाच्या स्पर्शानंदात मानवाची उत्पत्ती होते. शिशू जन्म घेताच शितोष्ण वायु व भूमीचे काठिण्य ही त्याच्या त्वगेंद्रियाला स्पर्श होताच ते रडत असते. या वरून त्वगेंद्रिय स्पर्शज्ञान सर्व इंद्रिया पेक्षा बलवान आहे, महान् आहे. त्वगेंद्रिय स्पर्श ज्ञानामध्ये सर्व इंद्रिय आश्रय घेऊन कर्म करीत असतात.

मनुष्याच्या ठिकाणी आई, बाप, पुत्र, पति, पत्नी, बंधु, भगीनी, धन आणि शरीर या विषयीचे प्रेम स्वाभाविक आहे. ते वयोमाना प्रमाणे विकास पावते. जीवाने अनंत कर्म करून मागच्या जन्मीचे संचित कर्म या जन्मी प्रारब्ध रूपाने भोगून तो विभाजन करीत असला तरी आतील प्राण, भाव, सूक्ष्म शरीरात त्या भोगाचे संस्कार म्हणजे आवरण होत असल्या मुळे ते संस्कार बलवत्तर होऊन सुखाच्या आपेक्षेने जीवा कडून अनंत नवीन कर्म घडत असतात. उदा – कृषी व्यवसायांत बीज पेरल्यानंतर पिके वाढवून शेतकरी शेतापासून पिकाचे विभाजन करीत असला तरी त्या वनस्पतीचा संस्कार म्हणजे बेवड भूमीमध्ये अदृश्य रूपात जड दृष्टीला न दिसण्या सारखे शिल्लक राहाते. ते बेवड पुढच्या पिकाला उत्पादन करण्यासाठी साहाय्यक होते. या वर्तमान काली कारळे, हरवरा, कापूस, भुईमूग, उडीद आदि पिकांचे संस्कार (बेवड) पुढे भविष्य काळी

पेरावयाच्या ज्वारी आदि पिकाच्या उत्पादनासाठी सहाय्यक होतात. पेरणे, कोळपणे, अंतर्मशागत करणे व पिके वाढविणे ह्या सर्व क्रिया इंद्रिय गम्य आहेत. वेवड मात्र केवळ भावगम्य आहे. ज्ञानेंद्रिय, कर्मेन्द्रिय, चर्मेंद्रियांत अंतर्भूत होऊन काम करीत असतात. नेत्र, प्रकाशस्पर्शाने रूप पाहातात. नाक, वायुस्पर्शाने पदार्थ रूपांत गंध घेतो. कान नादस्पर्शाने पदार्थ भावनेत शब्द ऐकतात. हात, पाय सर्वांग, कठिण, मऊ, शीत, उष्ण आदि वस्तू पदार्थ भावनेत स्पर्श करून अनंत सुख वस्तूचा उपभोग घेत असतात. त्या योगे मनुष्यास कर्म करण्याची प्रवृत्ती वाढून जन्म मरणास कारणीभूत असलेला भवित्वदोष येतो. ब्रह्म भावनेत सर्व पदार्थ प्रसादरूपाने स्पर्शकरीत गेल्याने त्या भोगाचा संस्कार निरसन होतो. जसे अग्नी संस्कार झालेल्या बीजास अंकुर फुटत नाहीत. तसा त्याचा भवित्वदोष नाहीसा होतो. आणि अनंत भोगपदार्थाच्या संस्काराच्या निवारणासाठी ब्रह्म भावनेत स्पर्शकरणे म्हणजे अंगावर शिवलिंग (ब्रह्म) धारण करणे होय. अंगाला ब्रह्म (लिंग) स्पर्श केल्याने तनुगत, भावगत व प्राणगत दोष निरसन होऊन जन्म मरण रूपी भवित्व संस्कारातून विमोचन होऊन तो मोक्ष संपादन करतो. या साठी अंगावर लिंग धारण करणे म्हणजे भक्ती योगात नेत्राने शिवदर्शन, कानाने शिवमंत्र श्रवण, हाताने शिवलिंग पूजा, पायाने शिव प्रदक्षणा, जिभेने शिवलिंग तीर्थ व प्रसादसेवन केल्यापासून अधो वाहीनी वाहाणाऱ्या भावनेला ऊर्ध्व वाहीनी तपो संस्काराच्या ब्रह्मभावनेत सकल पदार्थाचा स्पर्श होत असल्याने स्पर्शगतदोष परिहारार्थं लिंगस्पर्शकरणे अवश्यक आहे. प्रत्येक 'मानवाला अंगावर अखंड शिवलिंग धारण केल्याशिवाय त्याच्या कर्माचे निरसन होत नाही.

शिव जीवैक्य होत नाही शिर, कंठ, हृदय, पोट, बाहू आणि कर-पीठ यापैकी कोणत्याही स्थानी शिवलिंगाचा स्पर्श झाल्यास ती पूज्य वस्तू, भक्ताच्या भावनेला जाणवते. त्वचेच्या स्पर्श ज्ञानानेच लिंगाधिपत्य अखंड होंत असल्यामुळे मानव शरीराला ब्रह्म धारणेची अवश्यकता आहे. मानवाच्या भूतशरीरामध्ये अस्थि, मांस, मज्जा त्वचा आदि हे सर्व पृथ्वी अंश आहेत. शिलामय ब्रह्म चिन्ह हाही पृथ्वी अंश आहे, या दोन्हीच्या साम्य धर्मामुळे मानवाच्या भूतावरण परिहारासाठी शरीरावर अखंड शिवलिंग धारण करणे अवश्यक आहे.

पूजा आणि जप हे दोंन्ही अहोरात्र अखंडपणे चालत नसून दररोज कांही नियमित कालीच चालत असतात. उदा – शरीर संरक्षणासाठी अन्न, जल व वायु ह्या तीन्ही वस्तू आवश्यक आहेत. दररोज एक वेळ अन्न व पाणी सेवन केले तरी चालेल एखाद्या वेळी तीही नसल्यास जीवन चालेल मात्र वायु आहाराशिवाय एक निमिष देखील जगणे शक्य नाही. अन्न पाणी अवश्यक असले तरी अल्प कालाचा अवकाश मिळतो. मात्र वायु आहारासाठी अर्धा निमिष काल देखील अवकाश नसतो. त्याची सेवन क्रिया अखंडपणे चालत असल्या प्रमाणे भक्तासाठी पूजा जप दोन्ही अन्नोदका प्रमाणे नियमित कालीच चालत असल्यामुळे शिवाधिपत्याच्या काल खंडाचा बोध करतात. मात्र अंगावर शिवलिंग धारणकेले असता लिंगाधिपत्य वायूच्या आहारा सारखा अखंड कालाचा बोध करीत असल्या प्रमाणे ब्रह्म (लिंग) धारणा मानवासाठी अवश्यक आहे. लिंग धारण न करणारा लिंगाधिपत्य नसलेला मानव आपल्या शरीराला आपणच अधि-पति होऊन अहं भावनेत तो सर्व कर्म चालवीत असतो. मात्र

शिवलिंग धारण करून ब्रह्माधिपत्य प्राप्त केलेल्या भक्ताच्या सर्व कर्मयोगास ब्रह्म (परमात्मा)च साक्षीभूत आहे. ह्याभावनेत तो चालत असल्यामुळे कर्म संस्कार भक्ताच्या प्राण व भावा-मध्ये विशेष आवरण करणार नाहीत. कारण लिंग धारण केले असल्यामुळे तो भार प्रपंचातील तापत्रयाचा भार कमी कर णारा असून इच्छित सुख देणारा आहे. शिवलिंग धारण करण्या पासून तनूला तप्त संस्कार होतो. जन्म जन्मांतरा पासून आलेला विषय संस्कार दग्ध होऊन अखेर जीवन्मुक्ती प्राप्त होते. ह्या सर्व विचारा वरून मानवासाठी लिंग धारणाअखंडपणे पाहिजेच असे सिद्ध होते.

— लिंग व यज्ञोपवीताचे उपासना वैशिष्टय —

यज्ञोपवीत धारण क्रमाचा विचार केला असता. उपनयन संस्कारामध्ये आचार्याकडून बटूला यज्ञोपवीत प्रदान करण्यांतयेते. प्रत्येक मानवाने यज्ञोपवीत धारण केलेच पाहिजे. अशी धर्म-संस्कार पद्धती बहुजन समाजांत रूढ आहे. अशौच काली (सूतक) म्हणजे मल, मूत्र, विसर्जन काली उजव्या कानांत यज्ञोपवीत अडकविण्याचे विसरले असल्यास अथवा त्याचे पतन झाले अस-ल्यास किंवा ते जीर्ण झाले असल्यास नूतन यज्ञोपवीत धारण करणे अवश्यक आहे.

धारणविधी असा आहे ब्राह्मी मुहूर्तावर उठून शौच स्नाना नंतर धूत वस्त्र परिधान करून तृणासन, पर्णासन, दर्भासन किंवा कंबलासन या पैकी कोणत्याही एका आसनावर बसून आच-मन करून नूतन यज्ञोपवीत डाव्या तळ हातात धारण करून "अपो हिष्ठा" ह्या मंत्र द्वारा जलाने अभिषेक करावा.त्या नंतर यज्ञोपवीतच्या तंतू मध्ये क्रमशः "ॐ" कार, अग्नी,

सर्प, सोम, पितर, प्रजापति,वायु,यम, विश्वेदेवा," या नऊ देवाचे आवाहन करून व स्मरून तीन ब्रह्मगाठीत, क्रमशः ब्रह्मा, विष्णु, रुद्र, यांचे आवाहन व स्मरण करून

⊙ **"यज्ञोपवीत मिति परमेष्ठी ऋषिः त्रिष्टुप्च्छंदः**
लिंगोक्ता देवता श्रौत स्मार्त कर्मानुष्ठानाधिकार सिद्धये
यज्ञोपवीत परिधाने विनियोगः याविनियोग मंत्रा नंतर
"ॐ यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरुस्तात् ।
आयुष्य मग्र्यम् प्रतिमुंच शुभ्रं यज्ञोपवीतम् बलमस्तुतेजः ॥

या मंत्राचे पठण करीत एक जोड यज्ञोपवीत धारण करावे आणि एकवीस वेळा गायत्री मंत्राचा जप करावा. बली वैश्वदेव करणाऱ्या लोकानी तीन यज्ञोपवीत धारण करून तीस वेळा गायत्री मंत्राचा जप करावा. त्या नंतर पूर्वीचे यज्ञोपवीत काढून **"समुद्रंगच्छ स्वाहा"** या मंत्राने जलाशयामध्ये विसर्जन करावे.

या नियमानुसार यज्ञोपवीत धारण केल्यानंतरच संध्या होम, पूजा, जप, यज्ञ, विवाहादि मंगल पुण्य कर्मानुष्ठान करण्या करीता अधिकार प्राप्त होतो. विनियोग मंत्रातील.
"श्रौत स्मार्त कर्मानुष्ठानाधिकार सिद्धये' या वाक्याने मनुष्य इह, पर व पारमार्थीक त्रिविध सुखासाठी श्रुति स्मृति मध्ये सांगितलेले सर्व पुण्य कर्मानुष्ठान करण्याचा अधिकार यज्ञोपवीत धारण करण्यानेच प्राप्त होतात. जो यज्ञोपवीत धारण करणार नाही, त्याला कोणत्याही पुण्य कर्मानुष्ठान करण्याचा अधिकार नाही.

प्रचलित रूढीतील शैव, वैष्णव, सौर, शाक्त, विश्वकर्मा, वारकरी, आर्य समाजादि मत पंथ सांप्रदायिक लोकांत

⊙ **सध्योपासनाविधी (मंत्रनुवाद सहित) मुद्रक तथा प्रकाशक घनःश्यामदास जालान गीता प्रेस, गोरखपूर उ. प्र. विक्रम संवत्सर २०११अष्टम संस्करण.**

स्त्रीयानां यज्ञोपवीत धारणा नाहीत. परंतु यज्ञोपवीत विनियोग मंत्रांत यज्ञोपवीत धारण करावे असे सांगितले आहे. पुरुषानी धारण करावे व स्त्रीयानी धारण करूनये. असा कांही त्या मंत्रात स्पष्ट उल्लेख नाही. यावरून सर्व मानवानी ते धारण करावे असा अर्थ होतो. स्त्रीयानां यज्ञोपवीत धारणा नसल्यास व त्यांचे जीवित पुण्य कर्मा शिवाय चालवावयाचे झाल्यास जगाचा कल्याण मार्ग कुंठित होईल. स्त्रीयानां पुण्य कर्मानुष्ठानाचा अधिकार नसल्यास त्यांचे भाव, मन, शरीर अशुद्ध राहून उत्तम संतती प्रदान करण्याची कार्यक्षमता त्यांच्या ठिकाणी असणे शक्य नाही. त्यांच्या रक्तात जन्म घेतलेल्या शिशूला उत्तम पवित्र संस्कार लाभणार नाहीत हे निर्विवाद आहे. कांही मत सांप्रदायिकामध्ये पत्नीच्या वतीने पतीच दोन यज्ञोपवीत धारण करतो. परंतु पतीने केलेल्या पुण्य कर्माचे फल पत्नीला विनायासे प्राप्त होत असते असा त्यांचा अभिप्राय असल्यास, बैल, गाय, घोडा, घर, शेत, आदि कर्तृत्व हीन जीवानां आपली उपभोग वस्तू आहे असे कल्पून उपभोग घेत असतात त्याप्रमाणे स्त्रीयांची सुद्धा उपभोग्य वस्तू मध्ये गणना केल्या सारखे होईल. स्त्री ही जड, भोग वस्तू नसून चैतन्य मानव संपत्ती असल्यामुळे धर्मक्षेत्रांत त्यांना ही पुरुषा समान अधिकार असावयास पाहिजे. पतीने केलेल्या पुण्य कर्माचे फल पत्नीला विनायासे प्राप्त होत असल्यास आणि पति पुण्य कर्म करणारा नसल्यास किंवा पतिहीन विधवा असल्यास अथवा लग्न न झालेली कुमारी असल्यास त्यानी पुण्यकर्म करू-नये का ? स्त्रीयाना मासिक ऋतु येतो आणि प्रसूती मध्ये अस्वच्छता असल्यामुळे कांही लोक आक्षेप घेतील. वस्तुस्थितीचा विचार केला असता, मानव शरीर मलमय आहे. मासिक ऋतु

येणे व प्रसूती होणे ही सर्व स्त्रीयानां शारीरिक व प्राकृतिक बंधने आहेत. या प्राकृतिक नियमाचे उल्लंघन कोणीही करू शकणार नाही. या सर्व क्रियेने मानव जीवन, आमरण बद्ध झाले आहे. प्राकृतिक बंधनाला दोष आहे असे समजून स्त्रीयानां पुण्य कर्मात प्रवेश न देणे हे महापातक आहे. स्त्री ही मातृ देवता आहे. त्या मातृ देवतेला पुण्य कर्म करण्यापासून वंचित ठेवणे हा धर्म ज्ञानाचा अभाव होय.

यज्ञोपवीताच्या विनियोग मंत्रात "लिंगोक्ता देवता" असे देवाधिदेव असलेला शिवलिंगच यज्ञोपवीताची अधिदेवता आहे असे सांगितले आहे. शिवलिंगाचे आधिपत्य नसलेला मानव कोणत्याही देवाची पूजा करण्यासाठी तो योग्य नाही असा त्याचा भावार्थ आहे. राष्ट्रपति पासून एका कर्मचाऱ्यापर्यंत राष्ट्र शासनाचे मुद्रांकित चिन्हाला सर्वांनी आदर भावनेत जाणून कर्म चालवीत असल्याप्रमाणे ब्रह्मादि दैवताची उपासना असो नित्य, नैमित्यक, काम्य व प्रायश्चित्त् कोणतेही कर्मानुष्ठान असो यज्ञोपविताचे अधिदैवत लिंगाचे स्मरण करून मानव तनूला यज्ञोपविताचा स्पर्श झाल्याविना पुण्य कर्मासाठी कोणासही अधिकार नाही. यज्ञोपवीत धारणा म्हणजे अप्रत्यक्ष शिवलिंग धारणाच होय. यज्ञोपवीत सूत्ररूप लिंगधारणा असून लिंग शिलारूप ब्रह्म धारणा आहे. सकल मानवानां कोणत्याही रूपांत का होईना लिंग धारणा पाहिजे आहे असे सिद्ध होते. मानव शरीर ब्रह्मार्पित व्हावे व देहामध्ये दैवी शक्तीचा संचार व्हावा या उद्देशासाठी यज्ञोपवीत सूत्र रूप लिंग धारणविधी सांगण्यांत आलेला आहे. यज्ञोपवीत ब्रह्म चिन्ह धारण करण्यासाठीच उपयोगी आहे. साधन करण्यासाठी ते उपयोगी पडत नाही आणि खाद्य पेयादि वस्तू

ब्रह्मार्पित करून तीर्थ प्रसाद रूपाने सेवन करण्याचे अनुपम सौभाग्य लाभत नाही. पत्र पुष्पादिकानी पूजा करता येत नाही. शांभवी योग मुद्रेने त्राटक प्रयोगाने दृष्टी वाढविण्याच्या साधन क्रमांत ते उपयोगी पडत नाही. इतकेच नव्हे तर यज्ञोपवीत जीर्ण होते आणि अशौच काली नूतन यज्ञोपवीत धारण करावयाचे असल्यामुळे यज्ञोपवीत विसर्जन करून दुसरे यज्ञोपवीत धारण करी पर्यंतचा मध्यंतरी अल्पकाल मानव तनूला ब्रह्म (लिंग) धारणेचा अभाव होतो.

लिंगरूपी ब्रह्मचिन्हाची पत्र पुष्पादि पूजा द्रव्याने पूजा करून खाद्य पेयादि वस्तू ब्रह्मार्पित भावनेत समर्पण करून तीर्थ-प्रसाद रूपांत सेवन करण्याचा सुयोग लाभून येतो. शांभवी योग मुद्रेच्या त्राटक प्रयोगाने दृष्टी स्थिर करण्यासाठी ते (ब्रह्म चिन्ह) उपयुक्त आहे. आणि मानव तनूला शिलामय शिवलिंग अखंड पणे शरीरावर धारण करण्यास उपयुक्त होते. यज्ञोपवीत सूत्र बिंदू असून लिंग शिला बिंदू आहे. लिंग व यज्ञोपवीत नाम मात्रे भिन्न असले तरी दोन्ही एका ब्रह्म चिन्हाचेच दर्शक आहेत.

तनुत्रय आवरणमय मानवपशूला पशुपति असलेल्या शिवलिंगाची धारणा अखंडपणे पाहीजेच असे अनेक विषयावरून सिद्ध होते. तनुत्रय आवरणमय पशू स्वतः आपण होऊन शिवलिंग धारण करणार नाही. जसे शेतकरी सर्व कामामध्ये बैलाचे सांहाय्य घेत असला तरी तो पशू स्वतः आपण होऊन कामासाठी न जाता पशूचा मालक आपल्या कामाची प्रेरणा त्यांत निर्माण करून उपयोग घेत असल्याप्रमाणे भूत, प्राण, भाव, आवरणमय मानव पशु इहलोक, परलोक, पारमार्थ त्रिविध सुख प्राप्तीसाठी शिवलिंग धारणा स्वतः आपण होऊन करून घेणे शक्य नाही.

मानवपशूना, गुरु, पशुपति असल्यामुळे आचार्यां कडूनच लिंग धारणेची प्रेरणा व्हावी लागते. एका व्यक्तीच्या शरीरावर लिंग स्थापना करण्यासाठी गुरु पाहीजे. दुसऱ्या एका तनूवर लिंग स्थापना करावयाची असल्यास पुनः गुरु पाहिजे. जितके मानव जीव जन्म पावतात. त्यांचे पिंड नूतन सृष्टी असल्यामुळे नूतन लिंग स्थापन करण्यासाठी गुरूची अवश्यकता आहे. स्थावर शिव लिंग ब्रह्मांडावर स्थापित असल्यामुळे त्याची पूजा करून भक्ती-भाव दर्शविण्यासाठी सर्व भक्त समान अधिकारी आहेत. मात्र पिंडांड मय मानव तनूवर स्थापित लिंगाला पिंडमयभक्त एकटाच पूजा करण्यासाठी अधिकारी असतो. मानव पशूच्या त्रिविध दुःखाचे निरसन होऊन मोक्षप्राप्तीसाठी गुरुशिवाय लिंग धारणा व लिंगाधिपत्य लाभत नाही.

ब्रह्मादिस्तंभ पर्यंतम् पशवं परिकीर्तिताः ।
शिवं पतिरितिप्रोक्तः पाशः कर्ममलादिकम् ।।
अतः पशुरसौ सर्वः पाशमुक्तः पतेर्बलात् ।
समाश्रयेद्गुरुवरं ततो मोक्षमवाप्नुयात् ।।

(सुक्ष्मागम क्रिया पाद पचम पटल)

ब्रह्मादि देवापासून यःकश्चित एका खोडा पर्यंत सर्व वस्तू पशू म्हणविले जातात. शिव केवळ पति म्हणवितो. दोरीने बांधलेल्या पशूला बंधनातून मुक्त होण्यासाठी आपल्या पतीच्या बलाची गरज आहे. त्याप्रमाणे तनुत्रय आवरणमय मानव पशु-पाश निवृत्तीसाठी गुरूचा आश्रय घेतल्याशिवाय मुक्त होणार नाही. प्रत्येक मानव आपल्या कर्मयोग प्रपंचातील बायको, मुलगा पैसा, शेत, घर, बैल, घोडा आदि आपल्या स्वामित्वात असलेल्या सर्व भोगोपभोग वस्तुचा मालक आहे असे समजतो. उदा – ग्रह

सेनापति, ग्रामपति, तालुकापति, जिल्हाधिपति, राजाधिपति अशा समस्त लोकानां राष्ट्रपति, पतीअसतो. त्याशिवाय राष्ट्राचा योगक्षेम चालणार नाही. राष्ट्रपति आपल्या स्वामित्वात दुष्टाना शिक्षाकरतो. शिष्टांचा योगक्षेम चालवितो. तथापि अहंभावाचीग्रंथी आपल्याला बाधक आहे व पतितावस्थेला नेणारी आहे असे समजून राष्ट्रपति सुद्धा राष्ट्रध्वजाला आपला पति समजून विनम्र भावनेत त्यास शरण जातो. राष्ट्रपतीचे सर्व कार्य राष्ट्रध्वजाच्या छाये खाली चालत असते. राष्ट्रातील प्रजेला शासन करण्यासाठी तो पति असला तरी आपल्या अंतरंगात राष्ट्रध्वज माझा पति आहे असे अखंडपणे ध्यान करीत राष्ट्राचा कर्मयोग चालवीत असतो. त्याप्रमाणे पत्नी, पुत्र, धनादिक जड चेतन सर्व वस्तूना मानव पती असला तरी त्याचा पति कोण आहे याचे स्मरण होते का? तुझा पति गुरु आहे. "पतनात् त्रायते इति पतिः" पाश बद्ध चतुष्पाद पशू आपल्या पती शिवाय स्वसंरक्षण करून घेण्यास असमर्थ असतो. त्याप्रमाणे कर्म बंधनात सापडलेल्या मानव पशूने आपले रक्षण करून घेण्यासाठी गुरुरूपी पतीला अनन्य भावे शरण जावे लागते. यासाठी गुरु तत्वाचा विचार करण्यात येतो.



– गुरु –

ह्या सृष्टीमध्ये "गुरु" "लघु" असे दोन सिद्धांत आहेत. "गुरु" म्हणजे जेष्ठ असून "लघु" म्हणजे कनिष्ठ आहे. जेष्ठ व कनिष्ठ दोन्ही पद परस्पर पूरक आहेत. "गुरु" म्हणविणाऱ्या जेष्ठ वस्तूमध्ये "लघु" म्हणविणारी कनिष्ठ वस्तू आश्रित आहे. गुरु पदापासून लघु पदाची प्रतीती येते.

भूत कणाचे परिशीलन केले असता, पृथ्वी गुरुत्वाकर्षण शक्तीने सर्व पदार्थ आपल्याकडे ओढून घेत असल्यामुळे तिची क्रिया अधोवाहीनी आहे. जल सदा उर्ध्व स्थानापासून अधोस्थानाकडे वाहात असते. पृथ्वी व जल हे दोन्ही जेष्ठ स्थानापासून कनिष्ठ स्थानाला जात असतात. अग्नी ज्वाला ऊर्ध्व गतीने जात असतात. वायु पृथ्वीचे रसद्रव्य ऊर्ध्व गतीने मेघ मंडलाकडे नेतो. सारांश पृथ्वी व आप हे दोन्ही अधोवाहीनी असून अग्नी व वायु ही दोन ऊर्ध्व वाहीनी आहेत. सृष्टीचे सकल परमाणू अधो ऊर्ध्व दोन प्रकारे अखंड वाहात असतात. लघु अधोवाहीनी असून गुरूच्या ऊर्ध्व वाहिनी क्रियेत आश्रित आहे. वायु पासून अग्नी, अग्नी पासून जल, जलापासून पृथ्वी, अशा क्रमाने त्यांनी जन्म घेतला आहे. जी वस्तू जन्य आहे ती लघु आहे. जी वस्तू जनक आहे ती गुरु आहे. गुरु लघु दोन्ही पद एकमेकाशी पूरक असले तरी त्यांची परि समाप्ती व्हावयाची असल्यास लघुपदच गुरुपदाप्रत जाऊन पोहोंचते. ते असे की, पृथ्वी जलामध्ये, जल अग्नीमध्ये, अग्नी वायुमध्ये, वायु प्राणामध्ये याप्रमाणे लघुतत्त्व गुरु तत्त्वाकडे क्रमेण जाऊन परि समाप्ती पावतात.

आता चेतन कणाचे परिशीलन केले असता जगांतील सर्व प्राणी गुरु, लघु दोन प्रकारे चालत असल्याचे दिसून येते.

परस्पर जीव जेष्ठ कनिष्ठ भावनेने वागून आपले जीवन चालवीत असतात. आईच्या उदर रूपी गुरु म्हणविणाऱ्या मोठ्या गर्भाशयांत शिशू नऊ महिने लघु (लहान) होऊन जीवीत असते. आणि ते जन्म घेतल्या नंतर माता गुरु होऊन लघु शिशूला पोषण करीत असते. जेष्ठ वस्तू शिवाय कनिष्ठ वस्तूचे पालन पोषण होणे शक्य नाही. त्यासाठी गुरु,व लघु,सिद्धांतानुसार जेष्ठ वस्तू मध्ये कनिष्ठ वस्तू आश्रय पावतात. हा सृष्टीचा स्वाभाविक नियम आहे.

बाल्य वयांतील मुलगा बुद्धी, ज्ञानाने, विकास पाऊन बहीण भावाचा, पशू पक्षाचा, शेजाऱ्या पाजाऱ्यांचा परिचय करून घेत असतो. घरांतील वडील लोक (गुरु) त्याला नाम रूपाचा परिचय देत ज्ञानदर्शनकरीत असतात. म्हणजे कनिष्ठ असलेल्या बालका पेक्षा जेष्ठ असलेले सर्व लोक पोषण करीत असल्यामुळे लघुबालकाचे जीवन चालत असते. तरुणवयाचा मुलगा एक लघु जीवी असून सामुहिक गुरु जीवनाच्या प्रपंचाला जाणत असतो. आपल्या पेक्षा अगोदरच्या सर्ववस्तू गुरु असून आपण एकटाच लघु असतो.

शिक्षक गुरु, विद्यार्थी लघु आहे.न्यायधीश गुरु,अपराधी लघु आहे. राजा गुरु, प्रजा लघु आहे. वैद्य गुरु, रोगी लघु आहे. स्वामी गुरु, सेवक लघु आहे. असा समस्त प्रपंच गुरु, लघु, ह्या दोन तत्वामध्ये चालत असतो. मानव दुसऱ्या बरोबर बोलत असता बाबा, आण्णा, काका, आई, आजी, काकू, आक्का असें गुण गौरवाच्या गुरुभावनेत आपण लघु भावनेने वागत असतो आणि आपल्याला सर्वांनी गुरु भावनेने पाहावे अशी अपेक्षा करतो. लघु भावनेने पाहिल्यास अपमान समजून तो दुःखी होतो. सारांश सर्व मानवाना लघु पद अप्रिय वाटून गुरु पद प्रीय वाटत असते.

ही जन्म सिद्ध प्रवृत्ती आहे. एका सामान्य मानवा पासून राष्ट्रपति पर्यंत पूज्य पूजक भावनेत गुरु तत्व सर्वामध्ये व्याप्त असून लघु तत्व त्याच्या आश्रयात आहे. मानव हिंसा असत्य, स्तेय, व व्यभिचार ह्या पाप प्रवृत्तीचा विचार करीत असल्यावेळी त्याच्या मनाच्या अंतरंगांत हिंसा करूनको, असत्य बोलू नको, चोरी करूनको. व्यभिचार करूनको. अशा अनैसर्गिक प्रवृत्तीचा लघु पदाचे नियमन करून अहिंसा सत्य अस्तेय व ब्रह्मचर्य या ऊर्ध्व प्रवृत्तीच्या गुरुपदा पासून पतीत होऊनको. असा गुरु पदाचा अनुग्रह होतो. पाश बद्ध पशूच्या पाशविमोचनासाठी त्याच्या पतीचा अनुग्रह नसल्यास तो परतंत्र असतो. त्याप्रमाणे तनुत्रय आवरणमय लघु मानवपशूला पती असलेल्या गुरु कडून अनुग्रह न झाल्यास भवरोग निवृत्तीसाठी तो असमर्थ होतो. काष्ठांत अग्नी प्रच्छन्न व्याप्त असला तरी तो स्वयमेव ज्वाला उत्पन्न करू शकणार नाही. वहिराग्नीच्या संस्काराने सुप्त असलेला स्वाभाविक अग्नी प्रचेतन पावून काष्ठाचे अस्तित्व नाहीसे होते. काष्ठात अग्नि तत्व नसते तर केवल बहिराग्नीच्या योगाने काष्ठाचे अस्तित्व नाहीसे होत नव्हते. मानवामध्ये गुरुतत्व विशेष असले तरी त्याच्या प्रचेतनासाठी बहिर्सृष्टीतील गुरूची अवश्यकता आहे. गुरूचे अधिपत्या शिवाय मानवाच्या अंतः करणांतील ज्ञानचक्षु प्रकाशित होणार नाहीत. अंधळा स्वतः आपल्या पायाने चालत असला तरी मार्ग दर्शकाचा आश्रय नसल्यास त्याचे अधः पतन होते. त्याप्रमाणे इहलोक, परलोक व पारमार्थ या त्रिविधसुखाच्या प्राप्तीसाठी ज्ञान प्रदान करणाऱ्या गुरूचे आधिपत्य न लाभल्यास शिष्यातील ज्ञान चक्षु प्रकाशित न होऊन पाप कर्म प्रवृत्तीमध्ये तो सापडतो. त्यामुळे पुढे मानव जन्म मिळणे दुस्तर

होऊन मानवेतर पशु पक्षी वनस्पत्यादि योनीमध्ये जन्म घेऊन केवल पाप क्षालन करीत त्याला फिरावे लागते. बहिर्सृष्टीतील गुरु, ज्ञान प्रदान करून लघु (पाप) प्रवृत्तीला रोखून गुरु(पुण्य) ऊर्ध्व प्रवृतीमध्ये त्याचा प्रवेश करवितो.गुरु व्यष्टीमय जिवनाचा नसून तो समष्टी जीवनाचा असतो. पुत्र, दारा व धन या इषणत्रय बंधना विरहित गुरु असल्यामुळे त्याचे जीवत केवळ लोक कल्याणार्थ असते. मठ, मंदिर, धर्मशाला मानव समाजाची स्थावर संपत्ती असल्या प्रमाणे गुरु व्यक्तीमात्राने दिसत असला तरी मानव समूहाला ज्ञान प्रदायक असल्यामुळे तो मानव जनाचा ज्ञान निधी विश्व कुटुंबी, व जंगमसंपत्ती आहे. गुरूला, आई, बापाचा संबंध न राहता पूर्वाश्रय निसरन केल्यामुळे त्याला गोत्र संबंध नसतो. गुरूचे भाव जन्य गुरु पुत्राला दुसरे जन्म होऊन पूर्व गोत्राचा विच्छेद होत असल्याने गुरु अगोत्रिय म्हणवितो. गुरूला सूत्र संबंध तेवढाच असतो. सूत्र म्हणजे लोक कल्याणार्थ अभ्युदय व निःश्रेयस सिद्धीसाठी ज्ञान क्रिययेचा बोध करणारे जे निजज्ञान आहे तें धर्म सूत्रहोय. लोककल्याणासाठी गुरूचे वंश सूत्र अखंड पणे यावे लागते. जसा शेतकरी बीजाची परंपरा रक्षण करीत आलेला असतो, तसे लोक कल्याणार्थ ज्ञान प्रदान करणाऱ्या गुरु वंशाची परंपरा नसल्यास ज्ञान प्रदान क्रियेचा खंड पडून मानव समाजाला ज्ञान प्राप्त होणे दुर्लभ होते. गुरु परंपरा चालवावयास धर्म रक्षणासाठी ऋषि मुनी लोकाकडून आचार्यांना पुत्रदान करावे लागते. पुत्रप्रदान करणाऱ्या ऋषि मुनीचे दांपत्य जीवन परिशुद्ध संस्कारीत असावे. तपोमय संस्कारांत वाढलेल्या संततीचाच आचार्यांनी स्वीकार करावा. त्या बटूला गुरुपरंपरेचेशिक्षण देऊन जितेंद्रिय ठेऊन गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र

पादोदक, व प्रसाद या अष्टावरणाचे शिक्षण केवळ शास्त्रद्वारे बोध न करीता भक्ताच्या मनाला प्रयोगात्मक स्वरूपांत प्रत्यक्ष अनुभव करून देण्याचे सामर्थ्य असावे. भौतिकविज्ञान शिक्षण क्रमांत प्रयोजन, प्रमेय, आणि प्रयोग असल्याप्रमाणे धर्म शिक्षण-प्राप्त केलेल्या गुरूने न्याय, वेदांत, व्याकरण, छंदस्स, मिमांसा, तर्क, योग, सांख्य, आदि शास्त्राच्या आध्यायनाद्वारे मूल शिव (ब्रह्म) तत्वाचे विश्लेषण न करीता आपल्या योग बलाने प्राणलिंगी असावे. सर्व सामान्य मानवाचे प्राण पंचभूताधीन असल्यामुळे ते किंचिज्ञ किंचित शक्तीमान असतात. परंतू गुरूचा देह प्राणाधीन भूत तत्व असल्यामुळे त्याला भूक, ताहान निमित्तमात्र असतात. भक्ताच्या संतुष्टतेसाठी तो आहार सेवन करू शकतो, अथवा योग मग्न होऊन अमृत पान करीत योग निद्रेत संतृप्त होतो.

वेधा, मनु, क्रिया त्रिविध दीक्षा भक्तानां देण्यासाठी तो स्वतंत्र व समर्थ असतो. जो भक्त गुरूचे आधिपत्याचा धिःकार करतो. तसल्या निंद्य भक्ताला शिक्षा देण्यासाठी तो स्वतंत्र असतो. गुरूचे आधिपत्य अंगीकार न केलेल्या भक्ताला गुरु आपल्या इच्छा मात्रे शाप देऊन त्याच्या शरीर धर्मांत नियमित रूपांत असलेल्या पंच भूतामध्ये कोणत्याहि एका तत्वाला कमी व जास्त करून म्हणजे पृथ्व्यांश वाढवून धोंड्याप्रमाणे तो त्याचे शरीर जड करतो. अग्न्यांश वाढवून शरीरामध्ये दाह निर्माण करतो. वायु अंश वाढवून तृण पर्णा प्रमाणे उडून जाण्यासारखे करतो. असे अनेक चमत्कारा द्वारे गुरु भक्ताला शाप ताप देत असले तरी ही सर्व क्रिया भक्ताच्या उद्धारासाठीच अनुग्रहित भावनेत तो करीत असतो. अशा अलौकिक दिव्यशक्ती संपन्न गुरूवर जारण, मारण, स्तंभन, उच्चाटण व वशीकरणअसले दुष्ट

प्रयोग चालत नाही. अशा दिव्यशक्ती संपन्न तो असला तरी त्यांना महा आचार्याकडून गुरु पदाचा संस्कार व्हावयास पाहिजे. संस्कार नसल्यास गुरु परंपरा नष्ट होण्याचा संभव असल्यामुळे संस्कार करणे अत्यंत महत्वाचे आहे.

जगद्गुरूपासून सामान्य मानवापर्यंत गुरुपट्टाभिषेक दीक्षा, उपनयन विवाहादि मंगलसंस्काराच्यावेळी सूक्ष्म-सृष्टीच्या प्रमथ लोकातील मूल गुरु दैवत पंचआचार्यांचे पंच कलश आवाहन पूर्वक स्थापन करून पूजा करावीलागते. या मानव सृष्टीमध्ये पूर्ण गुरूत्व नसल्यामुळे मूळ आचार्यांच्या साक्षित्वामध्ये भूलोकातील प्रतिनिधी स्वरूप आचार्यांच्या नेतृत्वांत प्रत्येक मंगल कार्य करावे अशी धर्माज्ञा आहे. गुरुपट्टा-भिषेक संस्कारविधीत आचार्य, महा आचार्य, शिष्यगण आणि सभावृंद ह्यांच्या मध्यभागी भद्र व सुंदर सिंहासन करून त्या पीठावर सकल दैवतांचे जगद्गुरु रेणुकादि पंच आचार्यांचे कलश आवाहन पूर्वक त्यांची स्थापना करून पूजाकरावी. आणि भूलो-कांतील प्रतिनिधी स्वरूप असलेले आचार्य आपल्या गुरु पुत्राला उद्देशून मानव कुल हेच तुझे कुटुंब, मानव कुलाचा उद्धार हेच तुझ्या जीवनाचे अंतिम साध्य, तुझे त्रिकाल पूजानुष्ठान सर्व मानव कुलाच्या योग क्षेमासाठी असावे. धर्म रक्षणासाठी कटि-बद्ध होऊन सदैव सिद्ध रहावे. अशी आज्ञा करीत असतात. आणि शिष्यगण सभावृंदाला उद्देशून मानव कोटीच्या उद्धारासाठी याना अनुग्रहित केले आहे. गुरूचे आधिपत्य संपादन करून हा गुरु तुम्हा भक्तासाठी पति झालेला आहे, अशी आज्ञा करतात. त्यानंतर सर्व भक्तवृंद महाराज आपली आज्ञा आम्हाला शिर-सावंद्य असून आम्ही तिचे अंतःकरण पूर्वक पालन करतो, असे

म्हणून साष्टांग प्रणिपात पूर्वक विनंती करतात. त्यानंतर महा आचार्य आपल्या गुरु पुत्राला आपल्या हाताने अभिषेक करून शास्त्रविधी नियमानुसार संस्कार पूर्वक त्या नूतन गुरुमूर्तीला दंड, कमंडलु, भस्मघुंटिका, शंख, प्रसादपात्र, ह्या पंचमुद्रा प्रदान करीत असतात. तो पंच जटा युक्त, एक वस्त्र परिधान, काष्ठ पादुका वेषभूषा संपन्न असतो. गुरुचा दंड दुष्ट निग्रह शिष्टपरिपालनासाठी, कमंडलु तीर्थ संग्रहासाठी, भस्मघुंटिका भस्म प्रदाना साठी शंख तीर्थ देण्यासाठी, प्रसाद पात्र प्रसाद प्रदानासाठी, अशा पंच मुद्रा सदा धारण कराव्या म्हणून आज्ञा करतात. गुरुपट्टाभिषेक विधी पूर्ती नंतर त्या नूतन आचार्यांना गुरु सिंहासनावर विराजमान करतात. त्यानंतर भक्त गणानी गुरु दक्षणा पूर्वक नमस्कार केल्यानंतर आचार्य सर्वांना मंगलाशिर्वाद देतात. संस्काराद्वारे आचार्यांच्या मनांत भक्तजन माझे शिष्यआहेत आणि त्या भक्त लोकांच्या मनात आमचे गुरु महाराजआहेत. अशी भावना होते. अशाने परस्पर लोकांच्या एकमेका विषयी भावना दृढ होतात. गुरूला पुत्र दारा धनादिकाचे बंधन नसले तरी माझे शिष्य आहेत, अशा व्यापक रूपाचे भाव बंधन मात्र त्याला आहे. गुरूला परिशुद्ध भावबंधन असल्यामुळे त्यांना बाधक होत नाही.

गुरु ज्ञानी असले तर पुरे त्याला संस्काराची अवश्यकता नाही असे कांही लोकांचे म्हणणे असेल. वस्तू स्थितीचा विचार केला असता कोणत्याही संस्काराची अवश्यकता नाही असे म्हणावे लागेल. मातेच्या गर्भारंभापासून मरणा पर्यंत मानव जीवन संस्काराने चालत असते. नामकरण संस्काराने नामाभिधान नाही झाल्यास मानवाचा कर्मयोग चालेल का ? नाही.

विवाह संस्कार न केल्यास दांपत्य जीवन साध्य आहेका? नाही. मग कांही संस्कार अवश्यक मानणे कांही संस्कार अनावश्यक समजणे हे योग्य नाही. गुरु ज्ञानी असून सर्व गुण संपन्न असावा. भक्त लोकांना दीक्षा, शिक्षा देण्या मध्ये योग्यता संपन्न असला तरी संस्कार नसल्यास तो गुरु होऊ शकत नाही. गुरु योग्यता संपन्न, संस्कार संपन्न आणि वर्ण संपन्न असावा. गुरु होणे म्हणजे शास्त्राध्ययनाव्दारे प्रवचन सांगून गुरु दक्षणा घेणे, पालखीत बसून मिरवणे आदि भौगैश्वर्य विलासी जीवन समजून असले गुरुपद कोणास ही नको वाटणार नाही. आई बापाच्या वंशात पूर्वीच्या सात पीढचात कोणाकडूनही पाप कृती नं संभवता दंड, शिक्षा, प्रायश्चित्त, बहिष्कार न होता शुध्द संस्कारांत जन्म पावलेली संतती गुरु होण्यास योग्य आहे. गुरु होण्यासाठी योग्यता आणि संस्कार या पैकी कोणतेही एक नसल्यास तो गुरु होणार नाही.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, हे चारी वर्ण, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यास, हे चार आश्रम मोक्षापेक्षी असून गुरु मोक्षप्रदायक आहे. कर्म योग प्रपंचात शेती, युद्ध आणि गुरुपद ही तीन कार्यं उत्तरोत्तर कष्ट प्रद आहेत. शेती व्यवसायात थंडी पाऊस, ऊन, दिवस रात्र सम भावनेत जाणून कष्ट करावे लागते.

राष्ट्र रक्षणासाठी मरणाला सिद्ध होऊन सैनिक होणे कष्ट साध्य आहे. याही पेक्षा आमरण इंद्रिय संय्यम पूर्वक ब्रह्मचर्य पालन करणे, आहार विहारा मध्ये नियमित असणे, लोक कल्याणासाठी उग्र तपश्चर्या करणे, ही सर्वात अत्यंत कष्टप्रद आहे. गुरु पदवी त्याग, वैराग्य संपन्न असल्यामुळे भोगप्रवीण जीवांना ती नकोशी वाटून गुरु पदवीचा अभाव होण्याच्या भीतीने गुरु परंपरा राखून ठेवणे अवश्यक आहे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही वर्ण व्यवस्था कर्म-योगाच्या सुरक्षतेसाठी असून तद्वारे राष्ट्राची व्यापक शांती होते. कोणताही संस्कार आपले आपण कोणी करून घेऊ शकणार नाही. जातक कर्मा पासून अंत्यकर्मापर्यंत सर्व संस्कार आचार्याकडून होत असतात आचार्य वर्ण व आश्रम प्रदान करतो मात्र तो वर्णाश्रमातीत असून तो अतिवर्णाश्रमी म्हणवितो. अति वर्णाश्रमी-आचार्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ह्या चतुर्वर्णियांना पूज्य असून ते पूजक आहेत. आचार्यांच्या पाद कमलाची पूजा आहे. पायापासून गुडघ्यापर्यंत पृथ्वी स्थान असल्यामुळे मानवाच्या भूत शरीराचा मोह नष्ट होण्यासाठी गुरूची पादकमल पूजा अग्रस्थानी मानिली आहे ब्राह्मणाला क्षत्रिय, वैश्य शूद्र या तीन वर्णाकडून पूजा घेण्याचा अधिकार आहे, मात्र पादतीर्थ प्रदान करण्याचा अधिकार नाही. क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या तीन वर्णीयांच्या पायाची पूजा व नमस्कार नाही. विवाहादि मंगल कार्यामध्ये त्यांच्या शीरो भागाला कुंकुमादिकाने पूजा करून पुष्प गुच्छ देतात. आणि सौभाग्यवती महिलांच्या भाळी कुंकु व मस्तक पुष्प मालानी आलंकारीत करीत असतात. परस्पर समान भावनेत एकमेकानां शरणु शरणार्थी अथवा राम राम असे म्हणून हात जोडून नम्रता व्यक्त करीत असतात.

मानवाचा देह ज्यांच्या त्यांच्या हाताच्या अंगुलीने (चोबे किंवा चंपा) चौऱ्याऐंशी अंगुल दीर्घ (उंची) परिमाण असते आणि ब्रह्म चक्रा (मस्तक) पासून मागे बारा अंगुलाच्या पलिकडे अंगुष्ठ मात्र पश्चिमचक्राचे स्थान आहे. पाद परिमाण केल्यास बारा अंगुलाच्या पलीकडे अंगुष्ठाग्र आहे, एकंदरमिळून पाद बारा अंगुल, शरिराची उंची चौऱ्याऐंशी अंगुल, ब्रह्मचक्रापासून मागच्या

पश्चिमचक्रा पर्यंत बारा अंगुल असे एकूण एकशे आठ अंगुल होतात. पादाग्रापासून पश्चिमांत्यापर्यंत परि गणना केली असता पश्चिमस्थान एकशे आठ अंगुलाच्या पलिकडे आहे. पश्चिमादि करून पादांगुष्ठापर्यंत गणना केल्यास पादाअंगुष्ठाग्र एकशे आठ आंगुलाच्या पलिकडे आहे. रुद्राक्ष, तुळशी, स्फटिक, चंदन आदि जप मालेला एकशे आठ मणी असून न गणलाजाणारा एक शिखा मणी असल्याप्रमाणे अंगुष्ठ मात्र अवशेष होऊनराहातो.

परशिवाचे सगुण साकार रूप गुरु आहे. ह्या भावनेने भक्ती योगाच्या साधनेला आचार्यांचे पादांगुष्ठ पूजा करण्यासाठी पूज्य स्थान आहे. पाद तीर्थ प्रदान करण्यासाठी आचार्यांचे पादांगुष्ठ श्रेष्ठ आहेत. पश्चिम चक्र तनूला साक्षीभूत होऊन आत्मतत्त्वानुसंधानाच्या ध्यान, धारणा, व समाधी ह्या तीन अंगानी युक्त असलेल्या लिंगांग योगाच्या साधनेला पूज्य स्थान मानले आहे.

औपचारिक देहित्वाज्जगदात्मत्त्व भावनात् ।
मायासंबंधराहित्यादकायो हि परः स्मृतः ।
(सि. शि. मणि अकाय स्थल)

माया संबंध रहित असलेला आचार्य अकाय म्हणवितो. निमत्त मात्र देहधारी असून लोक कल्याणार्थ तो संचार करीत असतो. चराचर सकल वस्तू त्याच्या अंतर्भावनेत परशिवाचे लीलामय स्वरूप दिसतात मात्र बहिर्भावनेत भक्त वृंदाच्या उद्धारासाठी पती होऊन वर्तन करीत असतो. जसा नाटकांतील वेषधारी राजा सकल लोकाना राजा प्रमाणे आज्ञा करीत असला तरी आपल्या अंतर्भावनेत मी एक व्यक्ती आहे. अशा भावनेत तो वागत असतो. त्याप्रमाणे आचार्य सुद्धा अनुग्रहित भावनेने भक्तासाठी पति होऊन वर्तन करीत असतो. भक्तानी अनन्य भावनेत

गुरूच्या पादपद्‌माला मस्तक स्पर्श पूर्वक नमस्कार करीत असल्या वेळी गुरू बहिर्भावनेत आशिर्वाद भाव दाखवीतअसलातरी अंतर्भावनेत ब्रह्म स्वरूप आहे असे समजून भक्ताच्या मस्तकावर हस्तस्पर्श करून शिव तत्वाचे ध्यान करतो. आचार्य भक्ताचे दीक्षा शिक्षादि सर्व कार्य ब्रह्म भावनेत करीत असल्याकारणाने त्यांच्या ठिकाणी असलेली दैवी शक्ती पुनरावृत्तिरहित मोक्ष प्रदानासाठी साहायक होते. अग्नी संस्कार झालेले काष्ठ दुसऱ्या एका काष्ठाला जाळते. मात्रत्याआग्नीची राख दुसऱ्या काष्ठाला जाळीत नसते. त्या प्रमाणे शिवयोग तत्पर आचार्य ब्रह्म भावनेत आचरण करीत असले तरी भक्ताच्या उद्धारासाठी ते सृष्टीला अभिमुख होऊन आचरण करीत असतात. ध्यान धारणा ह्याक्रिया-मध्ये त्यांचा भाव असल्यामुळे भक्तांच्या उद्धारासाठी अभिमुख असतात. तोच भाव, समाधी पदाला गेल्यास अग्नी प्रशांत पाव-लेल्या राखे प्रमाणे भक्तांच्या भावनेला ज्ञान क्रियेची चेतना देणार नाहीत.

ब्रह्मा, विषणु रुद्र, सरस्वती, लक्ष्मी, पार्वती या देवता वाहाना रूढ होऊन पति झाल्या आहेत. ब्रह्मदेवाला हंसवाहान. विष्णूला गरुड वाहान, रुद्राला नंदीवाहान, पार्वतीला सिंहवाहान सरस्वतीला मयूर वाहान, गणपतीला मूषक वाहन, अशा प्रकारे सर्व देवानां एकेक वाहन असून ते पशुपति म्हणवितात. पशुपति असलेल्या देवतामध्ये पति पदाच्या अहंभावाचे आवरण होऊन आपले अध:पतन होईल या भीतीने वाहाना विषयी पती होऊन वर्तन करीत असले तरी त्या पशूची मुद्रा शिरोधार्य मानून आपल्या ध्वज पताका वरील भक्ताच्या छायामध्ये आपले जीवित चालवीत असतात. ब्रह्माला हंसध्वज, विष्णूला गरूड ध्वज,रुद्राला

नंदी ध्वज, गणपतीला मूषक ध्वज, सरस्वतीला मयूर ध्वज, पार्व-तीला सिंह ध्वज, असे सकल देवता आपल्याला वाहान झालेल्या पशूना अंतर्भावनेत पति (श्रेष्ठ) समजतात. परंतू आचार्य भक्ताना पति असून भक्त वृंद त्याना पशू असल्यामुळे गुरूला नर वाहान आहे. महोत्सवामध्ये गुरूच्या पालखीचे ओझे वाहाण्याचे पराका-ळेचे तपाचरण मोठ्या भक्ती भावाने करीत असतात. गुरु दंडा-ग्राच्या ध्वज पताका लिंग चिन्हांकित असून सकल भक्तांना ब्रह्म सामरस्य जीवन्मुक्ती प्रदान करणारी ब्रीद मुद्रा आहे.

गुणातीतं गुवर्णं च रूपातीतं रुवर्णकम् ।
गुणातीतमरूपं च यो दद्यात् स गुरुः स्मृतः ।

(सि. शि. मणि दीक्षा गुरु स्थल)

"गु" म्हणजे गुणातीत "रु" म्हणजे रूपातीत अशी परशिव वस्तू जो शिष्याला प्रत्यक्ष पणे दर्शविण्याचा अनुग्रह करतो. तो गुरुम्हणवितो. मानव पाप कर्मात पतीत होऊनये म्हणून चित्तांतील अंतर्नादाद्वारे गुरु तत्त्वच ज्ञान रूपाने संदेश देतो. आणि पूण्य कर्माची प्रेरणा साक्षात मूर्तीमंत रूपाने भक्त वृंदाना सन्मार्ग दर्शन करीत संचारकरीत असतो.आचार्य भक्ताना इह, पर, परमार्थ सुखप्राप्तीसाठी ज्ञानदान करीत स्वयमेव भक्ताच्या निवास स्थानाला जातो. मात्र गुरूच्या स्थानाला भक्तास जाणे सुलभसाध्य नाही. कारण तो पुत्र, दारा, धन, त्रिपाशाने बांधला गेल्यामुळे गुरु सन्निधीस जाण्या साठी तो असमर्थ असतो. जसा दयाशील वायु स्वयमेव जीवाच्या श्वासोच्छ्वासामध्येवाहून प्राण सरंक्षण करतो. पाऊस स्वयमेव पडून पिकाचे संरक्षण करतो. आईच शिशू पर्यंत जाऊन संरक्षण करीतअसते. त्या प्रमाणे आचार्यच भक्ताच्या उद्धारासाठी भक्तापर्यंत जाऊन त्यास सन्मार्ग

प्रवृत्त करीत असतात. म्हणजे लघुवस्तू गुरुवस्तूपर्यंत जाणे शक्य नाही. गुरुवस्तूच दयाभावनेत लघु पदाकडे जाते.

निष्कलोऽपि महादेवो नित्यज्ञान महोदधिः ।
सकलो गुरुरूपेण सर्वानुग्राहको भवेत् ।।
यः शिवःस गुरुर्ज्ञेयो यो गुरुःस शिवःस्मृतः ।
न तयोरंतरं कुर्यात् ज्ञानावाप्त्यै महामतिः ।।
(सि. शि. मणि गुरु महात्म्य स्थल)

ज्ञान समुद्र स्वरूप असलेला शिव अवयव रहित असला तरी गुरु रूपाने अवयव विशिष्ट होऊन सर्व प्राण्यांवर अनुग्रह करतो. शिवच गुरु रूप झाला आहे. गुरु आणि शिव ह्या दोन्ही मध्ये भेद नाही. गुरूचा अनुग्रह नाही झाल्यास शिवाचा अनुग्रह होत नाही. मानव देंह, मोक्षाधिकारीअसला तरी मोक्ष संपत्ती गुरूच्या आधीन असल्यामुळे गुरूच्या अधिपत्याचा आश्रय करणे मानवाचे आद्यकर्तव्य आहे. आचार्यानी धर्मरक्षण करणे म्हणजे आपण स्वतः लिंग मंत्रादि अष्टावर्णाचे अनुष्ठान करणे; लिंग व मंत्राचा उपदेश देणे; भक्त लोकाना लिंग मंत्राचा प्रयोगात्मक-रूपांत अनुग्रह करणे हे होय.

"न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं
विदितं विदितं विदितं,शिव शासनतः शिवशासनतः शिवशासनतः"

मी शिवाची शपथ वाहुन त्रिवार सांगतो की गुरु-पेक्षा श्रेष्ठ दैवत नाही, अशी श्रुती घंटा घोष करून सांगत आहे.

गुरु लोकानी विषयांध मूढ जीवाप्रमाणे सोने, चांदी, मोती, रत्नादि आलंकार धारण करणे गुरुपदाला अत्यंत लांछना-स्पद आहे. कारण ते मूल्यवान पदार्थ आहेत. भस्म रुद्राक्ष महा गुरू पासून प्राप्त झालेली अमूल्य दैवी संपत्ती असल्यामुळे सर्वश्रेष्ठ

परम वैराग्य संपन्न गुरुजनानी सामान्य लोकाप्रमाणे मूल्यवान् वस्तू धारण करूनये. आपल्या खाद्य, पेय, पात्र, आसन शय्यादि वस्तू स्वतंत्र असाव्यात दुसऱ्यांच्या वस्तूचा उपयोग करूनये. गुरुला पंच जटा स्वभावसिद्ध त्यागमयसौंदर्य असून मुंडण कृत्रिम सौंदर्य आहे. अनेक लोकांचे केश कर्तन करणारा नाभिक अधम जीवी असल्यामुळे आचार्यांच्या मस्तकाला त्याचा हस्त स्पर्श होऊनये. आचार्यांचे सेवा पूजा कालीच भक्ताने आचार्यांच्या अंगाला स्पर्श केलातरी चालेल, इतर लोकानां स्पर्श करण्याचा अधिकार नाही.आचार्यांनी सदा अनुष्ठान तत्परअसावे. त्रिकाल लिंग पूजा तत्परअसून रुद्राध्याय पंचाक्षरमंत्र जापक असावे. शेषकाली भक्त वृंदाना सदुपदेश प्रदानकरीत असावे. कृषी वाणिज्यादि व्यवसाय त्यांच्या अखंड व्रतानुष्ठाला बाधक होत असल्यामुळे निषिद्ध आहेत. कोणत्याही एका विशेष कार्यानिमित्त त्यानी अन्न, जल, सेवन नाही केलेतरी चालेल, नित्य-कर्म संध्या पूजा जपानुष्ठान इत्यादि कार्यांत खंड पडूनये. भूपती असलेला राजा प्रजेकडुन भू दक्षणा (सेतसारा) घेतो. त्याप्रमाणे मानवाचापति गुरु, शिष्याचा देहाधिपत्याचा गुरु दक्षणा घ्यावी. व ते धन लोक कल्याणार्थ पूजा, जप, यज्ञ, याग, होम, हवन अन्न संतर्पणादि सत्कर्मानुष्ठानामध्ये त्याचा उपयोग करावा भक्ताच्या घरी गुरूने स्वयमेव जाऊन ज्ञान प्रदान न केल्यास त्या गुरूला भक्ती द्रोह घडतो. मानापमानाला सम भावनेत जाणून लोक कल्याणाच्या कार्यासाठी वंचना न करिता संचारकरावा. भक्त भव रोग ग्रस्त होऊन पापकर्माच्या प्रावल्याने गुरूचा धिःकार करील तो आपराध न गणता केवल दयाद्रष्टीने अज्ञान भक्तानां सन्मार्ग प्रवृत्त करणे आचार्यांचे कर्तव्य आहे.

गुरू पेक्षा दुसरे कोणतेच पद श्रेष्ठ नाही. ब्रह्मादिसकल देवापेक्षाही गुरूच सर्व श्रेष्ठ आहे. अशा गुरुपद वाच्य आचार्यांनी मानव कल्पित वेदांताचार्य, विद्यावाचस्पति, बी. ए., एम. ए., डॉक्टर आदि कोणतीही पदवी धारणकरणे योग्यनाही. ह्या पदव्या अर्थोपार्जन उपजीवीकेचे साधन आहेत.

गुरुपदस्थ आचार्य षट् स्थलब्रह्मी या महान पदवीनं विभूषित आहेत. या पदवीपेक्षा दुसरी कोणतीच पदवी श्रेष्ठ नाही.

षट्स्थल ब्रह्मी म्हणजे साहा प्रकारे ब्रह्मानुसंधान तत्पर असणारा असा अर्थ होतो.

स्थल शब्दाचा अर्थ करीत असता स्थान आवकाश, आधारभूत, असलेले स्थल असा बोधहोतो. म्हणजे जल, स्थल तरु लतादि अचेतन आणि पशु पक्षी मानवादि चेतन अशा दोन प्रकारच्या सृष्टीतील जीव ज्या वस्तूमध्ये जन्मून, जगून अखेर ज्यांत लयपावतात त्या आधारभूत असलेल्या महद्वस्तूला "स्थल" म्हणतात. स्थल शब्द परशिव ब्रह्म वाचक आहे. हा देहच मी आहे, अशा अहं भावाचा जडजीव, जीवन्मुक्ती पावेपर्यंत सहा प्रकारे ब्रह्मानुसंधान करणे यास षट्स्थल म्हणतात. पुत्र, दारा, धन, त्रिपाशाने बांधलेला जन्म मरण भवरोग ग्रस्त मानव, गुरु दीक्षाद्वारे गुरू, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक, व प्रसाद हे आष्टावरण युक्त वीरव्रत स्वीकारून आमरण अखंड भक्ती भावाने आचरण करणे भक्त स्थल होय.

अष्टावरण साधनाद्वारे त्या भक्ताच्या भावाचा मल विक्षेप होऊन अनंत जन्मांतील कर्म निरसन होऊन माहेश्वर होतो. माहेश्वर शब्दाचा अक्षरशः अर्थ केल्यास "मा' म्हणजे माया मोह संबंधित असलेला देह, पुत्र, दारा, धनादिक सकल वस्तूविषयीं,

"हे"म्हणजे हेय बुद्धीने मला प्रमाणे तिरस्कार वाटणे"श्व"म्हणजे आपल्या आत्मानुभवाच्या स्व स्वरूपामध्ये "र" म्हणजे रममाण होणारा माहेश्वर म्हणवितो. म्हणजे माया मल तिरस्कृत भावनेत जाणून आपल्या निज स्वरूपांत रमणे हे माहेश्वर स्थल आहे.

त्या माहेश्वराचे अष्टावरण साधनद्वारा भाव परिशुद्ध होऊन सर्व प्रपंच ब्रह्म भावनेत दिसतो. चर प्रपंच सर्व गुरु जंगम रूपानेदिसतो. अचरप्रपंच लिंगरूपाने दिसतो. सूर्य चंद्रादि प्रकाश भस्मरूप दिसतो. सर्वजल तीर्थरूपाने दिसते. आहार वस्तू प्रसादरूप दिसतात. परस्पर बोलली जाणारी भाषा मंत्र रुपांत ऐकू येते. पाहाण्याच्या नेत्रक्रिया रुद्राक्षआहेत. अर्थात् पदार्थ रूपाने दिसणारे प्रपंच प्रसाद (ब्रह्म) भावनेत जाणणे प्रसादि स्थल होय.

तो प्रसादि भाव शुद्धीच्या द्वारे भोगरूप अधोवाहीनी इंद्रीयाचा बहिर्व्यापार स्वभावत: निरोध होऊन ऊर्ध्वमुखी ब्रह्म भावनेत वाहात असल्यामुळे तों भाव अंतर्मूख होतो. त्या योगाने प्राणवायुचे नियमन होऊन आतील प्राणलिंग तेजो रूपात दिसून त्यातून अखंड ॐ कार नाद ऐकूयेतो. वीणा, डमरू, घुंगरू, घंटा आदि अनेक सुस्वर नाद ऐकू येतात. आणि तारकाकृती सोन्याच्या रंगाचा मनोहर प्रकाश दिसतो. तो क्रमेण विकास पावत सूर्य चंद्र आकृती दिसते. ते प्राण लिंग तेजोमय रूपाने साहा प्रकारे दिसून कोटि सूर्याच्या प्रकाशापेक्षा ही श्रेष्ठ व प्रशांतमय दिव्य प्रकाशा मध्येआपल्या स्व स्वरूपांत विराम पावणे, त्यास योग निद्रा प्राण-लिंगी स्थल म्हणतात.

तो प्राण लिंगी अंतर्बहिर्सर्वप्रपंच ब्रह्मभावनेत जाणत असल्यामुळे जीव दशेंतील त्याच्या सर्वक्रिया ब्रह्म भावनेत

परिवर्तित होतात. त्या पासून मी तू म्हणविणारी द्वैत भ्रांती नाश पावते. परशिव ब्रह्मच अनंत रूपाने दिसत असते म्हणून व्यष्टी-मय जीवभाव, समष्टी रूप ब्रह्म भावनेत आचरण करणे म्हणजे शरणस्थल होय.

तो शरण अखंड भावलिंगानुसंधनद्वारे ब्रह्म भाव स्थिर करून निंदा स्तुती, मानापमान, सुख दुःख याना समान भावनेत समजून त्याचा द्वंद्वभाव निरसन होतो आणि आगामी कर्मांचा (क्रियमाण) निरोध होऊन त्यास सहज समाधी होते.त्याचे संचित कर्म निःशेष होऊन विदेही अवस्था प्राप्त होऊन जीवन्मुक्ती पावणे ऐक्य स्थल होय.

प्रत्येक मानवाला जनन, शैशव, बाल्य, तारुण्य, वार्धक्य मरण अशा सहा अवस्था प्राप्त होणे स्वाभाविक आहे. त्या प्रमाणे मुमुक्षू मार्गातील साधकांना भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण, ऐक्य अशा साहा अवस्थेत ब्रह्मानुसंधान करण्यास षट्स्थल म्हणतात.

आचार्यानी ज्ञान प्रदानासाठी भजन, प्रवचन, उपदेश, पूजा, जप, ध्यान याचे शिक्षण द्यावे. सामुहिक रूपाचा जपयज्ञ मठ मंदिरात पुण्य क्षेत्रात शिष्य वृंदाला अनुग्रह होण्यासाठी पक्षोत्सव, मासोत्सव, वार्षिकोत्सव निरंतर चालवावेत. त्यापासून पूजा, जप, ध्यान ह्या पुण्य कर्मांचा संस्कार होतो. मानव दररोज स्थावर लिंगाची पूजा करीत असला तरी त्या पासून शिवाधिपत्य अखंड लाभत नाही. असे जाणून आवरण परिहारासाठी प्रती आवरण पाहिजे असा बोध होतो. तांबे, पितळ, चांदी आदि प्रकाशमय धातूपात्र वायू संस्काराच्या आवरणाने मलीन होतात. त्यानां राखेने उजळल्यास त्या प्रकाशमय दिसतात. पात्रावरील

आवरण परिहारासाठी राखरूपी दुसरे आवरण अवश्यक आहे. उदा – पायात काटा मोडून त्या आवरणाने दुःख होते. त्याच्या परिहारासाठी दुसऱ्या प्रबल काटयाचा उपयोग करावा लागतो. तसेच धन्वंतरी ऋषिप्रणित आयुर्वेद औषधी लेह, आसव, आरिष्ट क्वाथ, घृत, तैल, वटी, गुटी, क्षार, भस्म, गुगुळ, पाक, अर्क, चूर्णादि अनेक प्रकारचे असले तरी त्यासर्व केवल रोगपरिहारासाठी असून मानव शीघ्रपणे आरोग्यवान व्हावा या उद्देशाने वैद्य चिकित्सा पूर्वक औषध देतो. त्याप्रमाणे शिष्य भवरोग निवृत्त होऊन त्यास लिंगांग सामरस्य जीवन्मुक्ती प्राप्तव्हावी या उद्देशासाठी आचार्य गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद असे अष्टावर्ण प्रदानकरतो. पतीच्या अधिपत्यांत असलेली पतीव्रता मंगलसूत्र सदा आपल्या गळयात धारण करीत असते. त्या प्रमाणे गुरूकडून प्राप्त झालेले शिवलिंग, गुरुरूप आहे असे समजून अखंड शरिरावर धारण करावे.

परशिव ब्रह्माचे सगुण साकाररूप गुरु आहे. सगुण निर्गुण उभयरूप लिंग आहे. निर्गुण निराकार रूप जंगम आहे.

परशिव ब्रह्मच शिष्याला ज्ञानप्रदान करण्यासाठी गुरु रूप झाला आहे. भक्ताकडून सेवा पूजा घेण्यासाठी लिंगरूप झाला आहे. भक्ताच्या ज्ञानानुसंधानद्वारे होणारे आनंदमयरूप जंगम आहे. परशिव ब्रह्माची ज्ञान प्रभा भस्म आहे. परशिव ब्रह्माचा ज्ञानचक्षु रुद्राक्ष आहे. परशिव ब्रह्मांतील प्रच्छन्न चैतन्य रूप ज्ञानशक्ती मंत्र आहे. आणि परशिव ब्रह्माचे ज्ञानामृत पादोदक आहे. परशिव ब्रह्माचा ज्ञानानंद नित्यतृप्ती हाच प्रसाद आहे. शिष्याच्या भूतावरण परिहारासाठी गुरु सेवा व लिंग पूजा आहे. भावावरील पापरूपी मलावरण परिहारासाठी

गुरूचे ज्ञानांजन आहे. सर्वइंद्रियातील स्पर्शविषय आवरण परिहारासाठी लिंगधारणा आहे. नेत्राच्या रूपविषयावरण परिहारासाठी भस्म व रुद्राक्ष आणि शिवलिंग दर्शन आहे. कानाच्या शव्द आवरण परिहारासाठी मंत्रश्रवण व मंत्र जप आहे. रसनेच्या रसस्वाद आवरण परिहारासाठी तीर्थ व प्रसाद आहे. आत्मानुसंधानाच्या सहजानंद प्राप्तीसाठी जंगम आहे. ह्या प्रकारे अष्टावरणाची योजना करण्यात आली आहे. अष्टावरण धारण केलेल्या भक्ताचा देह ऊर्ध्वभावभक्ती तपाच्या तप्त संस्काराने क्रमेण मलावरणाचा परिहार होऊन जीवन्मुक्ती लाभत असल्यामुळे अष्टांग युक्त अष्टावर्णाचा शिवयोग परम श्रेष्ठ आहे.

गुरु अष्टावर्णाचा मूल कर्ता आहे. गुरु लिंग विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक व प्रसाद असे सात क्रियारूप साधन आहेत. जंगम साध्य आहे. गुरु, भक्तासाठी अष्टावर्णाचा महिमा सांगून लिंगाधिपत्य म्हणजें गुरूचे आधिपत्य अशी जाणीव देऊन शरीरावर शिवलिंग धारण करतो.



– लिंग –

स्फाटिकं शैलजं वापि चंद्रकांतमयं तु वा ।
बाणं वा सूर्यकांतं वा लिंगमेकं समाहरेत् ॥

(सि. शि. मणि लिंग धारण स्थल)

आचार्य स्फटिकलिंग, श्रीशैल शिलालिंग, चंद्रकांत शिलालिंग, सूर्यकांत शिलालिंग, अथवा देव निर्मित नर्मदाबाण-लिंग यापैकी कोणतेही एक घेऊन दीक्षा संस्काराद्वारे शिष्याच्या अंगावर स्थापन करून त्या भक्ताला आज्ञा करीत असतात. हे शिवलिंग तुझ्या प्राणापेक्षाही श्रेष्ठ आहे असे समजून सांभाळ. कोणत्याही काळी, कोणत्याही अवस्थेत कोणत्याही स्थळी या शिवलिंगास तुझ्या शरीरापासून तू वेगळे करुनकोस, तसे केल्यास भूमीवर स्थापनकेलेल्या दैवतमूर्तीला उपटून काढल्याने जसा दोष घडतो तसा तुला महादोष प्राप्त होतो.

"सर्वलिंगं स्थापयति पाणिमंत्रं पवित्रम्"

(यजुर्वेद तैत्तीरियारण्यक प्रपाठक १० अनुवाक १६)

दीक्षा समयी गुरु, शिष्याच्या डाव्या तळहातात शिवलिंगाची स्थापना करून त्याच्या रहस्याचा बोध करतो. जागृत, स्वप्न, या अवस्थेमध्ये देखील शुची अशुची आदि सर्वकाली शिवलिंग एक निमिष देखील वेगळे काढून न ठेवता अखंड धारण करून पूजा कर. असा यजुर्वेदातील पाणि मंत्राचा अभिप्राय आहे. पाणि म्हणजे हात, हातावर लिंगधारण केल्यामुळे याला पाणिमंत्र म्हणतात. लिंगधारी भक्ताचा देह लिंगाला आर्पण होऊन लिंगाचे पीठ झालेला आहे. त्याच्याने भक्ताच्या जागृतावस्थेतील अहार, विहार, विषय सेवनादि कर्म व स्वप्न, निद्रादि क्रिया शिव सन्नि-धीमध्ये अखंड चालत असतात. शिवाधिपत्य धारण केलेले हे व्रत

सर्वव्रतामध्ये महाव्रत आहे. आमरण लिंग अखंडधारण करीत असल्या मुळे याला नित्य व्रत म्हणतात. लिंग अंगाचे सामरस्य बोध करणारा शिवयोग साधनाचे महाव्रत गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष मंत्र, पादोदक व प्रसाद अशा अष्टांगाने युक्त आहे. महाव्रती शिवभक्ताने अष्टावर्णाचा उपयोग प्रतिदिन करावा.

नाभेरधस्ताल्लिंगस्य धारणं पापकारणम् ।
जटाग्रे त्रिकभागे च मलस्थाने न धारयेत् ।।
मूर्ध्नी वा कंठदेशे वा कक्षे वक्षःस्थलेऽपिवा ।
कुक्षौ हस्तस्थले वापि धारयेल्लिंगमैश्वर्यम् ।।

(सि. शि. मणि लिंग धारण स्थल)

नाभीच्याखाली, जटेच्या शेंडीमध्ये, पाठीवर, मल-स्थानी लिंगधारण करूनये मस्तकावर, कंठात, दंडावर, हृदयावर, पोटावर आणि पूजेच्या वेळी तळहातावर त्या पैकी कोणत्यादि ठिकाणी ते धारण करावे. प्रातःकाल, मध्यान्ह व सायंकाल तीन वेळा अथवा दोनवेळा, निदान एकवेळा तरी रोज अचूक आमरण शिवलिंगपूजा करावी. नाही केल्यास वीर व्रतापासून तो भ्रष्टहोतो. सर्व सामान्यपणे विचार करून पाहिले असता गुरूचीपूजा दररोज लाभणे शक्यनाही. गुरु ज्ञान निधी असल्यामुळे सन्मार्ग दर्शनासाठी संचार करीत असतो. त्या चर गुरूचे पादपद्म प्रतिदिन सकल भक्तानां लाभणे शक्य नाही. आणि गुरूच्या सेवापूजा संतृप्तीसाठी अन्न जल, वस्त्र, स्थल, धन, धान्यादि वस्तू लागतात. याचा अभाव असल्यास गुरु पूजा घडणे शक्य नाही. कार्या निमित्त असो अथवा आकस्मिक पणे त्यांचे आगमन झाल्यासच गुरु पूजा लाभते यासाठी लिंगरूपांतच गुरूची पूजाकरावी. लिंगामध्ये गुरूचे स्मरण करीत पत्र पुष्पादिकाने

पूजा करून नमस्कार करणे ही प्रथम पूजा आहे. परशिव साकार निराकार उभय रूप इष्टलिंगाची पूजा करणे द्वीतीय पूजा आहे. निराकार निर्गुणरूप जंगम पूजा लिंगामध्येंच स्मरण करीत पूजा करून नमस्कार करणे ही तृतीय पूजा आहे. अशी दररोज गुरु लिंग जंगमाची प्रत्येक वेळी पूजा करावी. विभूती, रुद्राक्ष, धारणकरणे, पंचाक्षर मंत्रजपणे, लिंग रूपानेच गुरु, लिंग, जंगम, तीर्थ तीन वेळा जलधारापूर्वक सेवनकरावे. अन्नोदक लिंगरूपांतच गुरु लिंग, जंगम तीन वेळा समर्पण करून प्रसाद सेवन करणे म्हणजे अष्टावरण परिपालन करणे होय. या आठ आवरणापैकी कोणतेही एखादे न केल्यास तो महा व्रतापासून पतीत होतो.

दीक्षा विधीनाद् गुरुणा यल्लिगम् दत्तमादरात् ।
मंत्रोपदेशसहितमिष्टलिंगमुदाहृतम् ॥

(सूक्ष्मागम क्रियापाद अष्टम पटल)

"इष" (धातु) इष्ट म्हणजे इच्छा करणे, अपेक्षा करणे असा अर्थहोतो. **"इष्टार्थ प्रदमिति इष्ट लिंगम्"** इच्छित वस्तू देणारे म्हणजे इहलोक परलोकांतील भोग सुख देऊन जन्म मरण रहित मोक्ष सुख देत असल्यामुळे त्यास इष्टलिंग म्हणतात आणि भक्त गुरु सन्निधीमध्ये जाऊन आपेक्षून लिंग धारणकरून घेत असल्यामुळे त्याला इष्ट लिंग म्हणतात. अथवा आई, बाप आपल्याला भवि संस्कार होऊनये या अपक्षेने आपल्या शिशूला जन्मकालीच लिंगधारणा करवीत असतात. शिशूचे मन व शरीर लिंग पूजेसाठी असमर्थ असते त्या शिशूच्या देह रक्षणा-साठी आई वस्त्र धारण करीत असते. त्या शिशूला हस्त पादादि इंद्रियाच्या परिचयाबरोबर वस्त्राचा परिचय होतो. आपल्या

अंगाच्या अवयवाप्रमाणे वस्त्र स्वाभाविक आहे असे तो समजतो. तो बालक मोठा झाल्यानंतर एक निमिष देखील वस्त्राच्या अभावी राहू शकत नाही. मातेचा कृत्रिम वस्त्र परिधान क्रम, पुढे त्या शिशूच्या अंगी नैसर्गिक रूपाने वाढून आमरण तो वस्त्र धारण करतो. त्याप्रमाणे शिशूच्या ठिकाणी स्वभावतः ज्ञानाभाव असला तरी त्याच्या अंगावर लिंगधारणकेले असल्यामुळे अवयवाच्या परिचयाबरोबर शिवलिंगाचा त्याला परिचय होतो. अंगाबरोबर लिंगाला जाणत लिंग म्हणून वेगळी एक वस्तू त्याला वाटत नसून आपल्या शरीराच्या अविभक्त अवयवा प्रमाणे ते वाटते. त्यामुळे शिवलिंगभाव दृढहोऊन भक्तीभावाला स्वाभाविकता येते. शिशू केवळ सृष्ट पदार्थ जाणून शिवलिंगाला जाणत नसेल तर त्या शिशूच्या मनाला शिव संस्कार न झाल्यामुळे भवित्त्व भावाचा संस्कार होईल या भीतीने आणि आपल्याला असलेले घर, शेत, धन, दौलत आदि संपत्ती आपल्या संततीला असावी आपल्याला असलेली शिवभक्ती व शिवलिंगसंस्कार आपल्या मुलाला असावा या भावनेत आई, बाप, आचार्याकडून शिशूला जन्म कालीच लिंग धारणा करवीत असतात. ते संततीला शिवलिंग धारण केल्याने जन्म जन्मांतरी इह, पर, पारमार्थ सुखे लाभावीत ह्या दया पूरीत भावनेने जन्म कालीच लिंग धारणा करवीत आहेत. त्या योगे शिशूला भक्ती प्रेमाचा संस्कार होऊन जिज्ञासा प्राप्त होते. गुरु आठव्या वर्षी दीक्षा संस्काराने त्या लिंगाला पुनः प्राण प्रतिष्ठा करून ते शिष्याला अभिमुख व्हावे म्हणून मंत्रसहित अनुग्रह करून त्याभक्ताच्या कर कमलावर स्थापन करून अष्टावर्ण प्रदान करतो. बाल्यकालीच वीरव्रताचे अष्टावर्ण प्राप्त होत असल्यामुळे त्याचे भावी जीवन मोक्ष मार्गाकडे प्रवृत्त होते.

पिंडांडमय असलेल्या भक्ताचा एक हात शिवलिंगाचे पीठासन असून दुसरा हात सेवा पूजेसाठी असतो. डोळ्याने शिवपूजेचे दर्शन घेत असतो. आपल्या शरीराच्या स्मरणाने भस्म रुद्राक्ष दिसतात. वागेंद्रिय पंचाक्षर मंत्राचा जप करीत श्रवणेंद्रियाने तो ऐकतो. जिभेने तीर्थ प्रसाद सेवन करीतो. घ्राणेंद्रियाने पुष्प धूपाचा परिमळ सुगंध घेतो. काया, मन, भावनेत तपोसंस्कार होऊन पाप कर्माचे क्षालन होते.

विष्णु रुद्रादि देवतामूर्तीची पूजा असो अथवा स्थावर लिंगोपासना असो भूमीवर स्थापून पूजा सेवा करावयाची असते. त्यावेळी पत्र पुष्पादि पूजाद्रव्य देवता सन्निधीस समर्पण करीत असता. एक वस्तू समर्पण करून दुसरी वस्तू समर्पण करण्याचे आंत अल्पकाल देवाचे अधिपत्य खंड पडते. परंतू इष्टलिंग पूजेमध्ये आपला देहाचा एक भाग शिवलिंगाचे पीठासन करून दुसऱ्या भागानें पूजा सेवा चालत असल्यामुळे शिवलिंगाचे अधिपत्यात एक आर्धा निमिष देखील खंड पडत नाही. या कारणाने सप्त कोटी व्रता मध्ये इष्टलिंग पूजा वीरव्रत सर्वात श्रेष्ठ आहे.

ब्रह्मविष्ण्वादयो देवा मुनयो गौतमादयः ।
धारयंति सदा लिंगमुत्तमांगे विशेषतः ॥
लक्ष्म्यादिशक्तयः सर्वाः शिवभावविभाविताः ।
धारयंत्यलिकाग्रेषु शिवलिंगमहर्निशम् ॥

(सि शि. मणि लिंग धारण स्थल)

ब्रह्मा, विष्णु, आदि देवता, गौतमादिमहर्षी, लक्ष्मी आदि सकल शक्ती देवता सदा सर्वदा मस्तकावर शिवलिंग धारण करतात. त्या सूक्ष्म सृष्टीतील देवताचे प्रतिक असलेल्या पूज्य मूर्ती म्हणविणाऱ्या पंढरपूर क्षेत्रांतील श्री विट्ठल मूर्तीच्या

मस्तकावर शिवलिंग आहे. बार्शी क्षेत्रांतील श्री भगवंत देवाच्या मस्तकावर शिवलिंग आहे. अनंत शयन (पट्टणा) शहरामधील अनंत पद्मनाभ श्री विष्णु मूर्तीच्या मस्तकावर शिवलिंग आहे. बल्लारी जिल्ह्यांतील नरसिह डोंगरातील श्री नृसिंहमूर्तीच्या हातावर शिवलिंग स्थापना आहे. सोंडुर कुमारस्वामी, तुळजापूर भवानी, गुड्डापूर दानम्मा, कोल्हापूर महालक्ष्मी, काश्मीर शारदादेवी, कांची कामाक्षी, काशी विशालाक्षी, बेंगलूरमधील हनुमंत, काशीतील घंटाकर्ण, व व्यासमुनी, धारवाड जिल्ह्यातील सूर्यदेवादि प्रत्येक मूर्तीच्या हातावर किंवा मस्तकावर शिवलिंग आहे. अशा अनेक देवतांच्या मस्तकावर व हातावर शिवलिंग असल्याचे प्रत्यक्ष आहे. देवतांचे शिरोभाग लिंगाचे पीठासन असून लिंग सकल देवा कडून नमस्कार घेण्यासाठी पूज्य असल्यामुळे सकल देवता शिरोव्रती, वीरव्रती, महाव्रती, अखंडव्रती म्हणवितात. सप्त कोटीव्रतनियम उद्यापन विधीने समाप्तहोतात. म्हणून ते खंडव्रत आहेत. लिंगधारण व्रत भक्ताला आजन्म आमरण असल्यामुळे त्याचे उद्यापन होत नाही. म्हणून सर्व व्रत नियमामध्ये वीर व्रत शिखामणी आहे.

अर्चयेद्गंधपुष्पाद्यैः करपीठे समाहितः ।
बाह्यपीठार्चनादेतत्कर पीठार्चनं वरम् ॥

(सि शि मणि लिंग धारण स्थल)

वीरव्रत धारी भक्ताने आपल्या इष्टलिंगास कर कमलावर स्थापून पूजा करावी. देहाच्या व्यतिरिक्त सोने चांदी मोती, व रत्नानी आलंकृत सुंदर शोभा मय भव्य सुंदर पीठ करून या पीठावर आपले इष्ट लिंग ठेवून अनेक प्रकारच्या उपचाराने पूजा करणे मुमुक्षू वीर व्रतीला योग्य नाही. अंगापासून लिंग एक

निमिष देखील वेगळे ठेऊनये असा व्रताचा मुख्य नियम आहे. लिंग धारण करण्यामध्ये सर्व समान आहेत.कोणी एक वेळ पूजा करो, दोन वेळ पूजा करो. अथवा तीन वेळ पूजा करो, पूजा विधी ज्यांच्या त्यांच्या इच्छे प्रमाणे कमी अधिक असणे सहज आहे. परंतू लिंग धारण करण्यामध्ये मात्र कमी जास्त होता कामा नये.

वीरव्रत, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, व संन्यासी चारी आश्रमीयानां ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चतुर्वर्णियाना समान आहे. ब्राह्मणाला जलस्नान, मुख्य असून आपध्दर्मामध्ये देखील जल स्नान करूनच त्याने लिंगपूजा करावी. क्षत्रियांना मंत्र स्नान मुख्य आहे. अपद्धर्मामध्ये अथवा युद्धादि महत्प्रसंगी पंचाक्षरी मंत्राने आपले दोन्ही तळहात अभिमंत्रवून त्या मंत्रमय हाताने सर्वांगाला चोळणे मंत्र स्नान होय. वैश्याला भस्मस्नान मुख्य आहे. आपध्दर्मामध्ये गुरु कडून मिळालेल्या भस्माने सर्वांगाला चोळणे हे भस्म स्नान होय. शूद्राला मृत्तीका स्नान मुख्य आहे. आपध्दर्मामध्ये त्याने मातीला अभिमंत्रवून सर्वांगाला चोळणे हे मृत्तिका स्नान होय. जलस्नान सर्ववर्णाश्रमीयानां दर रोज अवश्यक असले तरी आपद्धर्मामध्ये मात्र भस्म स्नान, मंत्रस्नान मृत्तिका स्नान इत्यादि स्वीकारले आहेत. ब्राह्मण व अतिवर्णाश्रमी आचार्याला नित्य कर्मानुष्ठानासाठी जल स्नान, मंत्रस्नान, भस्मस्नान तीन्ही अवश्यक आहेत. सर्व वर्णातील स्त्रीया देखील लिंग धारण करून आमरण वीर व्रती होऊन लिंग पूजा करू शकतात. स्त्रीयानां शिवलिंग धारणा नाही झाल्यास मानव समाजांतील अर्धा भाग जन्म मरणास कारणी भूत असलेला भवी संस्कार होतो.वीरशैव व्रती स्त्रीयांचे लिंग व मंत्रानुष्ठानाने भाव मन व शरीर पवित्र होतात. त्यांच्या पासून जन्मलेल्या संततीला

लिंग संस्कार होतो. आईने लिंगाचे तीर्थ, प्रसाद सेवन केलेल्या पवित्र अन्नोदकापासून उत्पन्न होणाऱ्या अन्न रसाचेच शिशू पान करते. त्यासाठी शिवलिंग व्रत स्त्रीयांना देखील अवश्यक आहे. धर्म शस्त्राचा विचार केला असता व्रतस्थ स्त्रीपुरूषानां सूतकनाही.

बहुकालिक संकल्पो गृहीतश्च पुरायदि ।
सूतके मृतके चैव व्रतं तन्नैव दुष्यति ।।
(शुध्दी तत्व विष्णु)

विष्णु ध्यानरतानांच सदैव व्रत चारिणाम् ।
गृह मेधी व्दिजानांतु तथैव ब्रह्मचारिणाम् ।।
वेद तत्त्वार्थ वेतृणां नित्य स्नान कृतां तथा ।
अथा संसर्गिणामेषां नाशौचं नापि सूतकम् ।
(सष्टोऽध्याय बृहत्पाराशरीस्मृति)

जो कोणी विष्णु पूजा ध्यानामध्ये तत्पर आहे. जो गृहस्थ सदा व्रत धारी असून एक पत्नीव्रतस्थ होऊन राहातो. आणि जो वेदाचे तत्वार्थ जाणणारा आहे. जो कोणी दररोज विधी पूर्वक स्नान करणार आहे. त्या सर्वानां अपवित्र लोकांचा स्पर्शझाल्यास अशौच व सूतक नाही.

दानोव्दाहेष्टी संग्रामे देश विप्लव कादिषु ।
सद्यःशौचं व्दिजातीनां सूतका शौच योरपि ।
(षष्टोऽध्याय बृहत्पाराशरीस्मृति)

दानकाली, विवाह समयी, यज्ञकाली, युद्धकाली, देशोपद्रवकाली द्वीजातीचे सूतक आणि अशौच तात्काल शुद्ध होते.

व्रताचरण करीत असता तो भक्त दैवताच्या अधिपत्यात असतो. एकादशीव्रत, प्रदोषव्रत, सोळासोमवारव्रत, चतुर्दशी व्रत, चांद्रायण व्रत, या व्रतां चरणामध्ये असताना व्रताचे उद्यापन

होई पर्यंत स्त्री पुरुषानां रजकसूतक, प्रसूतीसूतक, मृतसूतक, राहत नाही.

यज्ञ विवाहादि मंगल कार्यामध्ये नांदी श्राद्ध विधीच्याद्वारे पूर्वज पितृनां व ब्रह्मादि देवतानां आवाहन पूर्वक स्थापून पूजा केल्या नंतर सूतक नाही. मंगल प्रसंगी भूमीवर दैवत प्रतिष्ठापना केल्याने घरांतील लोकानां सूतक नाही. मग अखंड आमरण वीरव्रती लिंगधारी स्त्री पुरुषानां सूतक कसे राहील ?

न तस्य सूतकं किंचित् प्राणलिंगांगसंगिनः ।
जननोत्थं मृतोत्थं च विद्यते परमार्थतः ॥
लिंगार्चनरतायाश्च ऋतो नार्या न सूतकम् ।
तथा प्रसूतिकायाश्च सूतकं नैव विद्यते ॥

(सि. शि. मणि भक्ती मार्ग क्रिया स्थल)

शिवलिंग धारी स्त्री पुरुषाचे शरीर शिवलिंगाधिपत्यांत असल्यामुळे आमरण अखंड व्रती असून त्या व्रताला उद्यापन विधी नाही. तसेच पौंडरीक, राजसूय, वाजपेय, अश्वमेध, यज्ञामध्ये आणि अग्नी होत्री कर्मांत स्त्री पुरुषानां सूतक नाही सारांश पुण्यकर्मासाठी सूतक नसून स्वयपाक करणे,पाणी आणणे अशा लौकीक कामासाठी सूतक आहे.

वीरव्रती स्त्री पुरुष अंगावर शिवलिंग धारण करून भोगोपभोगाचे सर्वकर्म प्रसादरूपाने उपभोग घेत असतात. आपल्या स्नानाच्या अगोदर लिंगाला स्नान घालून आपण स्नान करतो. आपण नेसावयाचे वस्त्र अगोदर शिवार्पित करून आपण नेसतो. अंगास लावावयाचे तेल, साबण, व शिकेकाई आदि वस्तू अगोदर शिवलिंगार्पित करून त्यांचा उपयोग करतो. पुष्प, गंध आदि परिमळ द्रव्य लिंगार्पित करून आपण उपयोगकरतो.

आपणास सेवन करावयाचे अन्नोदक शिवलिंगार्पित करून प्रसाद रूपांत सेवन करतो. सर्वकर्मयोग शिवलिंगाचे सानिध्यात चालत असतात. पुत्र, पति, पत्नी, धनादिकाने युक्त असलातरी तो अंतर्भावनेतील सर्व प्रपंच गुरु, लिंग, जंगम सेवेसाठी आहे, असे जाणून भोगोपभोग वस्तू शिवयोग साधन आहेत असे समजून तो वागत असतो.

जडसृष्टीचा अंश (भाग) लिंग असून, चेतन सृष्टीचा अंश गुरु आहे. गुरुपूजा व लिंगपूजा म्हणजे चराचर सृष्टीची पूजा होय. गुरू पूजनाने चरसृष्टी गुरुरूप दिसते. लिंग पूजेने जल, स्थल, तरू लतादि जड वस्तू लिंग रूपात दिसू लागतात. क्रमेण भावाचा मलविक्षेप होत तनुत्रयाला साक्षीभूत असून "मी" शुद्ध ज्ञान स्वरूप आहे असा भक्ताला आत्मानुभव येतो. भक्तांच्या करतलावर विराजमान असणारा शिवलिंग पूज्य, भक्तपूजक व पत्र पुष्पादि पूजाद्रव्य म्हणजे ही त्रिपुटी लिंग रूपांत दिसून अंग (जीव) धर्म, लिंग धर्मात रूपांतर पावून लिंगांग सामरस्य म्हणजेच तो जीवन्मुक्त होतो. आष्टांग योगाने चित्तावरील वृत्तीचा निरोध होतो आणि अणिमादि अष्ट महा सिद्धीप्राप्त होतात. मात्र मोक्षप्राप्ती होतनाही. गुरु, लिंग, जंगमादि अष्टावर्ण संपन्न शिवयोग साधनाने भाव शुद्धहोऊन चित्तावरील वृत्ती निर्मूलन पावतात. त्याने सहज समाधी अवस्था येवून जीवन्मुक्ती प्राप्तहोते. शिवयोग साधक पद्मासन व सिद्धासन घालून आपले इष्टलिंग डाव्या तळहातावर धारण करून नेत्रासम शिवलिंग धरून घ्यावे. लिंगामध्ये दृष्टी ठेवून मनांत पंचाक्षर मंत्राचा जप करीत दृष्टी वाढविण्याच्या विधानाला त्राटक योगमुद्रा म्हणतात. अथवा लिंग हातात घेऊन नाशिकाग्रीधरून

अखंड निरीक्षण करणे ही शांभवी योगमुद्रा आहे. शांभवी व्रत ही म्हणतात. दृष्टी वाढविण्याच्या साधनेमध्ये अश्रु गळतात. पापण्या न हलविता दृष्टी वाढवीत वाढवीत एक प्रहरपर्यंत लिंगावर सारखी दृष्टी स्थिर करावी. कांही कालानंतर लहानशा तेजोमय बिंदूचे दर्शन होते. तो क्रमेण वाढून इष्टलिंग ज्योतिर्मय स्वरूपांत दिसू लागतो. ह्या इष्टानुसंधानाने चित्त वृत्ती निर्मूलन होत-असल्यामुळे श्वासोच्छ्वास रूपांत वाहणारा प्राणवायु सहजगत्या कुंभक रूपाने संग्रह होतो. त्यापासून अपानवायूचे उत्थान होऊन अधोमुखी सुषुम्नानाडी उर्ध्वमुखीहोऊन ऊर्ध्वकुंडली (ऊर्ध्वरेता) जागृत होते. आधार, स्वाधिष्टान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी, आज्ञा नावाचे साहा चक्र क्रमेण गुद, गुह्य, नाभी, हृदय, कंठ, भ्रूमध्य या सहा स्थाना मधून प्राणवायु प्रवेश करीत जाऊन अखेर ब्रह्म रंध्रामध्ये साधकाला सहजसमाधी लागते. इष्टानु-संधानाने प्राणलिंग व भावलिंगाचा अनुभव होतो. इष्टलिंग जड शरीर आवरण परिहारासाठी, प्राणलिंग सूक्ष्मशरीर आवरण परिहारासाठी, भावलिंग कारण शरीर आवरण परिहारासाठी आहे. इष्टलिंगानुसंधान न करीता प्राणलिंग व भावलिंगाचे अनुसंधान साध्य होत नाही. जीवाने कितीही जन्म घेतले तरी जीवाच्या अंगी परिपक्व अवस्था येऊन मोक्षप्राप्तीसाठी इष्टलिंग उपासना पाहिजेच. ब्रह्मा, विष्णु आदि देवाच्या पूजा उपासने पासून भोगप्राप्ती होते परंतू लिंग पूजेने भोग व मोक्ष दोन्ही प्राप्त होतात. भक्त ज्या देवाची उपासना करीत आसतो तोच देव साक्षात्कार रूपाने प्रत्यक्ष दर्शन देतो. मात्र लिंग पूजेने सकल देवाचे साक्षात्कार व दर्शन होते. लिंग नामरूपातीत परशिव ब्रह्म असल्यामुळे नाम रूपात्मक सकल देव त्या ब्रह्म चैतन्य

शवतीचे अंग असल्यामुळे लिंगपूजा म्हणजे सकल देवाची पूजा आहे. अनंत ब्रह्मांडाची पूजा आहे.

लिंगपति अंग (जीव) सती, लिंगपति शरण (भक्त) सती, असा कांही ग्रंथात उल्लेख केलेला आहे. पति सति हे दोन्ही शब्द प्रणय प्रेम वाचक आहेत. भक्त म्हणजे सतीनव्हे, स्त्री नव्हे, भक्त शब्द स्त्री पुरुष या दोघाना संबोधिला जातो. सती शब्द केवळ स्त्री वाचक आहे. पति शब्दाचा केवळ नवराच असा अर्थ होतनसून राष्ट्रपति, सेनापति, जिल्हाधिपति, ग्रामाधिपति, स्वामी–मालक असे अनेक अर्थ होतात. नवऱ्यातील पतित्त्व हक्क मर्यादित आहे. आपल्या घरी आलेल्या अतिथी अभ्यागताचे सेवेत स्त्री असता, आई, बाप, सासू, सासरे यांच्या स्नान पानादि सेवेत असता, देवपूजेचे व्रतानुष्ठानात असता तिच्यावर पतित्त्वाचा हक्क चालविणे शक्य नसते. यावरून ते मर्यादित असल्याचे दिसून येते. बाई विधवा झाली तर तिच्यावरील पतित्त्व नाहिसे होते. खंड पडते. या करिता अंगसति लिंगपति. शरण सति, लिंग पति म्हणणे योग्य नसून ऊर्ध्वभावभक्ती मार्गात गुरुपति शिष्य पशु लिंगपति अंगपशू असे सांगणे यतार्थ आहे.

वीर व्रतीच्या मृत काली त्याच्या उत्तर क्रियेत त्याच्या प्रित्यर्थ करण्यांत येणारे पुण्य कर्म त्याच्या मुलाकडून पूर्ण करण्यांत येते. मुलाने स्नान पूर्वक शुचिर्भूत होऊन मृत आई किंवा बाप यांची नित्यपूजाविधी पूर्ती करण्याच्या उद्देशाने आचार्यांना बोलावून त्यांच्या पाद प्रक्षालन केलेल्या धूळोदकाने स्नान घालून नूतन धूतवस्त्र परिधान करून भस्म रुद्राक्ष धारण करून मृताला बसवावे. त्या शवाच्या अंगावरील शिवलिंग काढून त्याच्या डाव्या तळहातावर ठेऊन मुलाने आपला हात त्याशवाच्या

हाताखाली धरून गुरु, लिंग, जंगम ह्या तीन देवाच्या स्मरणार्थ तीन वेळा जल, भस्म, पत्र, पुष्प, धूप, दिप या पंचोपचारानी त्याची पूजा करावी. आचार्यांनी पूजा सांगावी. या वेळी उपस्थित सर्व लोकानी आप आपल्या स्थानी हातजोडून उभे रहावे. नंतर त्याशिवलिंगाला मंगलार्ती करावी. पुष्पांजली नंतर लिंग दंडात बांधावा. या नंतर शिवनाम घेत शव समाधी स्थानी न्यावे.

वीर व्रत्तीच्या स्वतंत्र रुद्रभूमीच्या चार कोणाला चार चतु:सिमा दर्शक शिवलिंग मुद्रांकित शिला स्तंभाने ती रुद्रभूमी देखील गुरुकडून लिंग संस्कारीत केलेली असते. अशा पवित्र स्थानी कोणी पादत्राण घालून फिरूनये, थुकूनये, मलमूत्र विस-र्जन करूनये. अन्नोदक सेवन करूनये, कोणतेही निंद्यकर्म करू-नये. अशा पवित्र रुद्रभूमीमध्ये वीर व्रतीच्या मृत देहाला समा-धीत बसवून पूर्ववत शिवलिंगाची पूजा मंगलार्ती पुष्पांजली सर्वांनी करावी. या नंतर समाधी झाकावी. आणि त्या समाधीवर आसन घालून आचार्यांना बसवावे. त्यांच्या पायाची पूजा मंगलार्ती पूर्वक पुष्पांजली करून गुरु दक्षणा पूर्वक नमस्कार करावा.

वीर शिवव्रत आमरण असून व्रतस्थलोकाना सूतक नसल्यामुळे वीर व्रतीच्या अंत्य संस्कार काली मृत सूतक पालन न करीता त्या वीर व्रतीचे जीवन पुण्य कर्मानुष्ठानामध्येच परि समाप्त होत असते. त्याची मृतक्रियासुद्धा व्रताच्या परिसिमे-मध्येच चालत असते. म्हणजे शिवलिंगाधिपत्यामध्येच त्या शिव भक्ताचा देह विसर्जन होत असल्या मुळे त्या वीर व्रतीला लिंगैक्य झाला, शिवैक्य झाला, असे म्हणतात. गुरुस्पर्शाने गुरुझाला असे समजून त्याच्या समाधीवर लिंग स्थापना करावी.

वीर व्रतीच्या संन्यासाश्रमीच्या मृत देहाला दहन

संस्कार नाही. त्याच्या शरीराला अग्नी संस्कारकरून जाळून टाकल्यास त्याच्या अंगावरील शिवलिंग व भस्म रुद्राक्ष जाळल्याचे महा पातक होत असल्यामुळे त्यानां दहन नाही. ब्रह्मा विष्णु, रुद्रादि देवता भक्त जीवंत असल्यावेळीच सेवा पूजा घेतात. भक्त मृत झाल्यास देव आपल्या देवळात आणि भक्त स्मशानांत असे देव आणि भक्त विभक्त होतात. परंतू वीर व्रती मृत झाल्यास त्याच्या देहावर असलेले शिवलिंग देखील त्याच्या बरोबर जात असल्यामुळे सप्त कोटी व्रत नियमामध्ये अखंड व्रत असलेले हे वीर व्रतच सर्व श्रेष्ठ आहे. आणि वीर व्रताधिपती शिवलिंगच सकल देवाधी देवांना सर्वश्रेष्ठ आहे.

●●

– जंगम –

ही सृष्टी स्थावर जंगम अशा दोन प्रकारची आहे. पृथ्वी, जल हे दोन्ही अधो वाहीनी असून स्थावर आहेत. घर, मंदिर वृक्ष, वेली सदा स्थानबद्ध असून स्थिरहोऊन जगतात. घराचे स्थानांतर केल्यास घर नष्टहोऊन माती, दगड, शिल्लक राहातात. वनस्पतीचे स्थानांतर केल्यास त्या वाळून जातात. हे स्थान बंधनामुळे स्थावर म्हणवितात.

अग्नी ज्वाला ऊर्ध्व गतीने जाते. सूर्य आपल्या तापाग्नीने भूमीचे व वनस्पतीचे रसद्रव्य ऊर्ध्वगतीने शोषण करतो. वायु सर्वप्राण्यांच्या रक्षणासाठी श्वास क्रियेत ऊर्ध्वगतीने वाहुन संरक्षण करतो. सर्व जलाशयाच्या जलाला ऊर्ध्वगतीने शोषण करून अंतरिक्षांत मेघरूपाने संग्रह करतो. अग्नी व वायु दोन्ही जंगम आहेत.

पशु, पक्षी, कृमी, कीटकादि सर्व प्राणी जंगम असून आपले जीवित रक्षणासाठी सृष्टींतील स्वाभाविक फल, मूल, स्थावर पदार्थ सेवन करून जगतात. पशु, कृषी व्यवसायाच्या सर्व कामामध्ये आपण होऊन श्रम करून अन्न, वस्त्र, उत्पादन करण्याच्या कामी ते असमर्थ असल्यामुळे स्थावर आहेत. मानव कर्तृत्व हीन पशूनां पति होऊन त्यापशू कडून अनेक प्रकारच्या श्रमाचा लाभ घेतो. अनेक पदार्थ विकास करण्याच्या बौद्धिक श्रमांत मानव महान असल्यामुळे तो एकटाच जंगम असून सृष्टीच्या सकलवस्तू व प्राणी स्थावर आहेत. पृथ्व्यादि पंच तत्वे,पशु पक्षादि सर्व प्राणी, कर्तृत्व शक्ती हीन असल्यामुळे असलेल्या परिस्थिती पेक्षा उन्नत अवस्थेला जाणेची पात्रता त्यांच्या मनाला नाही. ते केवळ पूर्व संचित कर्माच्या भोग विभाजना साठीच जगून आहेत. संचित कर्माच्या मर्यादित क्षेत्रामध्ये बांधल्या गेल्यामुळे सर्वप्राणी आणि पदार्थ स्थावर होऊन भोज्य पदार्थ झाले आहेत.मानव एकटाच जंगम होऊन भोक्ता झाला आहे.

मानव पुण्य कर्म करण्यासाठी स्वतंत्र आहे. पाप कर्म प्रवृत्तीकडे त्याचे मन जात असता त्याच्या मनाच्या अंतरंगात पाप प्रवृत्त होऊनको अशी निग्रह करणारी दिव्य शक्ती सदैव जाग्रत आहे. त्याला न जुमानता तो पापकर्म प्रवृत्त झाल्यास त्या कर्माच्या फलस्वरूप मानवेतर पशूपक्षादि योनीमध्येजन्म घेऊन कर्म बंधनाच्या शासनाधीन होऊन स्थावर होतो. परंतू तो पुण्यकर्म प्रवृत्तीमध्ये स्वतंत्र होऊन आचरण केल्यास जंगम म्हणवितो. मानव, पुत्र, दारा, धन, आणि पुत्र, पति, धन या पदार्थद्वारे भाव पाशाने बांधला गेला आहे. आणि परलोकांतील ब्रह्मादिदेवता मायासहित शुद्धविद्या तत्त्वाच्या देहधारी

होऊन प्राण व भाव या दोन आवरणाने युक्त असल्यामुळे महाप्रलय कालापर्यंत त्यांना जीवन्मुक्ती मिळणे शक्य नाही. ते सर्वदेव देह बंधन, काल बंधनात बांधले गेल्यामुळे स्थावर म्हणवितात.

मूल शिव तत्त्वाच्या व्यतिरिक्त शक्ती आदि पृथ्व्यांत पस्तीस तत्वानां आश्रयभूत जी महद् वस्तू आहे ती सर्व बंधन विरहित असून सर्व तंत्र स्वतंत्र असल्यामुळे ते परशिव ब्रह्म एकच एक जंगमपद वाच्य आहे.

जं कारज्जननं दूरं गकारद्गति नाशनम् ।
म कारान्मरणं नष्टं जंगमस्त्र्यक्षरात्मकः ॥
यस्यनास्ति पुनर्जन्म गतिर्नाऽस्ति कदाचन ।
वाधतेयं न मरणं श्रुणुनाथे स जंगमः ॥
जरा मरण शून्यात्वाद् गमनागमन वर्जनात् ।
मनुष्याचार राहित्या जंगमो ऽ यमुदाहृतः ॥
निरालंबो निर्विकल्पः कर्म पाश विवर्जितः ।
निः शुन्यो निष्कलः साक्षा ज्जंगमः सपरः स्मृतः ॥
गुणातीतः क्रियातीतः कलातीत श्चिरंतनः ।
तत्त्वातीतः परः साक्षाज्जंगमः श्रुणुमत्प्रिये ॥

(सुप्रभेदागम)

या जंगम शब्दाचा अर्थ "जं" म्हणजे अति वेगाने, "गम" म्हणजे "गच्छतीति" जातो जात असतो. जी वस्तू अति वेगाने स्वतंत्र होऊन संचार करीत असते त्या वस्तूला जंगम म्हणतात. आणि "ज" कार "ग" कार, "म" कार असे तीन वर्ण आहेत "ज" म्हणजे जन्म, "ग" म्हणजे गमन "म" म्हणजेमरण जो जन्म मरण रूपी संसार समुद्रामध्ये गमनागमन क्रिया

विरहित आहे, जी वस्तू सहजानंदांत भ्रमण करीतअसते आणि ज्याला कोणतेही बंधन आवरण करण्याच्या कामी समर्थ होत नाही असा मूल परशिव ब्रह्मच जंगम म्हणवितो.**उदा**– जसे फळ परिपक्व झाल्यास वृक्षा पासून बंध मुक्त होते. तसे जीवाला परिपक्व अवस्था प्राप्त झाल्यास जन्म मरण रूप गमनागमन क्रिये पासून बंध निवृत्त होतो. त्या मुक्तावस्थेला जंगम म्हणतात.

अष्टावरण युक्त शिवयोग तत्पर असणाऱ्या वीर व्रती साधकाच्या स्थूल, सूक्ष्म, कारणरूपी मलाचा विक्षेप होतो. त्या योगे "**मी**" शुद्ध ज्ञान स्वरूप आहे. ह्या आत्मतत्त्वाचा विवेक होतो. दृष्टा रूप आत्मा, नाम रूपात्मक दृश्यप्रपंचाला साक्षी-भूत होऊन सहज लिलामात्रे भ्रमण करणारी सहजानंद अवस्था सर्व जीवानां एक वेळ प्राप्त होणे निश्चित आहे. तथापि जो जीव उत्पादक (क्रियमाण) कर्म निःशेष होऊन पूर्व संचितकर्म कांही अंशाने शिल्लक राहिलेले असते. त्या प्रारब्ध कर्माच्या उपभोगा-साठी जीवीत असलेल्या चरम (अखेरचा) देहीला जंगम म्हणतात. जंगम अवस्था असलेल्या शिवयोग्यास भूक ताहान नाही. माना-पमान नाही. निंदा स्तुती नाही. शुची अशुची नाही. शीतोष्ण, तसेच सुख दुःख, म्हणविणारा व्दंद्वभाव नाही. ह्या सहजानंद स्थितीच्या शिव योग्याला कर्मबंध, भावबंध, कालबंध, अशा कोणत्याही बंधनाला न सापडणाऱ्या त्या ब्रह्म भावाला रोखून धरण्यासारखे कोणतीही बंधने न राहिल्यामुळे जन्म मरणाच्या गमनागमन क्रियेच्या अतीत अशा अवस्थेतील जीवाना जंगम म्हणून संबोधण्यात येते. जंगमावस्था जीवाचा अखेरचा विराम आहे. जीवाचे अंतीम साध्यआहे. गुरु, लिंग विभूती, रुद्राक्ष, मंत्र पादोदक, आणि प्रसाद हे सात आवरण साधन आहेत. जंगम हे

आवरण साध्य आहे. **उदा–** धन प्राप्ती करणारा वृत्तीरूपसाध्य भावनेत धारणकेल्यापासूनच त्याचे साधन असलेला व्यवसाय करीत असतो. **दुसरे उदा–** संगीत शास्त्राचे मूलसाध्य'**नादब्रह्म**' आहे. नाद ब्रह्म अती सूक्ष्मअसून त्याची प्रयोगामध्येच जाणीव होते. पेटी, तबला, वीणा, सतार तंब्रोरा, आदि वाद्य दृष्टीगम्य असले तरी त्याच्या अंतर्भूत असलेला "**नाद ब्रह्म**" प्रयोगामध्ये केवळ मनो गम्य होते साध्य प्राप्तीसाठी साधने उपयोगी पडतात. साध्याचे विस्मरण झाल्यास साधने आपोआप निष्फल होतात. त्या प्रमाणे आष्टावर्ण संपन्न वीरव्रती साधकाचा जंगमपद साध्य असून बाकीचे सात आवर्ण साधन आहेत.साध्य व साधान मिळून अष्टावर्ण होतात. जंगम आवर्ण साधकाच्या भाव, मन, कायेला जाणवणारी वस्तू नव्हे. जंगम ही वस्तू जाती वाचक नव्हे, कुल वाचक नव्हे, वंश वाचक नव्हे, सांप्रदाय वाचक नव्हे, आश्रम वाचक नव्हे, वर्ण वाचक नव्हे, संस्कार जन्य नव्हे, जड चेतन मूर्ती वाचक वस्तू नव्हे, तर साधकाचे साध्य आहे. जंगम पद साधकाच्या भावनेत विस्मरण होऊ नये म्हणून दररोजच्या अष्टावर्ण क्रिया प्रयोगांत लिंग रूपातच जंगम पूजा व तीर्थ सेवन सांगण्यांत आले आहे. गुरूची पूजा व जंगम पूजा लिंगरूपामध्येंच तीन वेळा पूजा करून गुरु, लिंग जंगमाचे तीर्थ तीन वेळा धार देऊन सेवन करण्यास सांगितले आहे. आणि गुरूचे पाद पद्माची पूजा करून पादोदक सेवन करण्याच्या विधानामध्ये दोन्ही पादांगुष्ठावर आणि त्यांच्या संगमामध्ये त्रिवार मंत्रोदकाची धार दिलेले पादोदक गुरु लिंग जंगम स्मरण पूर्वक सेवन करावे. गुरु व लिंगाच्या उपासनेत जंगम उपासना सांगितली आहे. मूल परशिव ब्रह्म जंगम असल्यामुळे भक्ताच्या भावनेला अगोचर

अगम्य असल्या कारणाने साधन रूपात उपयोगकरणे साध्य नाही. काष्ठ अग्नी संस्काराने जळून भस्म रूपांत आपल्या नाम रूपाचे अस्तित्व गमाऊन घेते. आणि अनंत नद्या अखेर समुद्रांत लय पावून आपल्या नाम रूपाचे अस्तित्व गमावून विराम पावतात. त्याप्रमाणे अष्टावर्ण वीरव्रती शिवयोग्याला विदेही म्हणजे मुक्तावस्था प्राप्तहोते. परशिव ब्रह्माचे साकाररूप गुरु आहे. साकार निराकार उभयरूप लिंग आहे. निराकार सहज स्वरूप जंगम आहे.

जानंत्यतिशयाद्ये तु शिवं विश्वप्रकाशकन् ।
स्वस्वरूपतया ते तु जंगमाइति कीर्तिताः ।

(सि. शि. मणि जंगम महात्म्य स्थल)

अष्टावर्ण वीर व्रती शिवयोगी हे चराचर प्रपंच शिवाचे लिला स्वरूप आहे असे समजतो. ते ज्ञान अंतर्मुख होऊन ज्ञान रूप जंगम पदाच्या ठाई विराम पावतो अशी ज्ञानरूप सहज समाधी अवस्था प्राप्त होणाऱ्याना जंगम म्हणतात. जंगमपद साधकाची मुक्तावस्था होय.



— विभूती —

मानवाच्या अंगी शरीर सौंदर्याच्या भोग प्रवृत्तीमध्ये भाव, अधोवाहीनी होऊन सदा वाहात असल्यामुळे भवित्व दोष उत्पन्न होतो. आपले शरीर सौंदर्यमय असावे अशी अपेक्षा असल्यामुळे वस्त्र परिधानामध्ये अनेक प्रकार आले आहेत. केश कर्तन विधीत अनेक प्रकार आहेत. स्त्रीयांच्या केशकलेमध्ये

देखील अनेक प्रकार आहेत आणि विशेषत: सोन्या चांदीचे अनेक विध अलंकार शरीराचे सौंदर्य वाढवितात. ते सौंदर्य आपल्याला आनंद दायक दिसत असलेतरी दुसऱ्याकडून देखील प्रशंसा-व्हावी अशी आपेक्षा असते. शरीर व्यामोह या ग्रंथीमध्ये मनाची क्रिया सदा चालत असते. मानव पुत्र, दारा, धन, व पुत्र पति, धन, या भोग पदार्थामध्ये देखील सौंदर्याची आपेक्षा करीत असतो. एवढेच नव्हे तर सौंदर्य भाव आपल्या व्यतिरिक्त आपल्या परिवारामध्ये देखील त्याने स्वाभाविक पणे कल्पून घेतले आहे. आपल्यांतील अधोभाव प्रवृत्तीला निरोध करून ऊर्ध्वभाव प्रवृत्तींतील सौंदर्य लाभावे ह्या उद्देशाने विभूती व रुद्राक्ष हे दोन आवर्ण सांगितले आहेत. दररोज विभूती रुद्राक्ष धारण करावयास पाहिजे. धारण नाही केल्यास वीरव्रत पूर्ण होत नाही.

"**विभूती**' शब्दाचा अर्थ "**भूती**" शब्दाच्या मागे "**वि**' उपसर्ग लागल्याने विभूती शब्द झाला आहे. "**वि**" म्हणजे विशेष "**भूती**" म्हणजे ऐश्वर्य, विभूती विशेष ऐश्वर्य देणारी आहे असा अर्थ होतो. भोग प्रवृत्तीमध्ये मन न वाहता त्याग प्रवृत्तीमध्ये वाहून वैराग्य संपन्नता यावी म्हणून विभूती, रुद्राक्ष धारणक्रम सांगितला आहे भोगामध्ये त्याग भावना उत्पन्न होणे म्हणजे त्याभोग-पदार्था संबंधी अश्रद्धा अप्रीती उत्पन्न होऊन ते आपल्याला बाधक आहेत आणि आपल्याला जन्म मरण रूपी भव संसृतीला नेणारी आहे म्हणून त्याग करावयाचा असतो. केवळ भोग पदार्थाच्या त्यागानेच त्या पदार्थाचा त्याग म्हणता येत नाही. मानवाच्या अंगी भोगोपभोग वस्तूचे संस्कार भावनेच्या अंतर्भूत असल्या-कारणाने भाव शुद्धीसाठी वैराग्य उत्पन्न होणे अवश्यक आहे. मूल विराग शब्द "**वि**" म्हणजे विशेष "**राग**" म्हणजे प्रेम विरागाचा

वैराग्य शब्द झाला. वैराग्य म्हणजे विशेष प्रेमानंद उत्पन्न करणारा असा अर्थ होतो. कर्मयोग प्रपंचातील मानवाचे विषय सुख दोन प्रकारे अनुभवास येते. रसनेच्या रसानंदामध्ये कडू पदार्थाचे स्मरण असते. धानानंदामध्ये दारिद्र्याचे स्मरण असते. अशा दोन प्रकारे अनुभवास येते. ह्या जड सुखामध्ये वावरणारे भाव खंड, खंड होऊन दिसत असल्यामुळे ह्यात विशेष आनंद नाही. परशिव ब्रह्मच नानाविध रूपाने नटला आहे म्हणून आशा अखंड आनंदाला वैराग्य म्हणतात. ह्या वैराग्य संपन्नतेसाठी विभूती व रुद्राक्ष अवश्यक आहे. भोगप्रवृत्तीच्या अलंकाराने सुशोभित होणाऱ्या देहाला भोगनिवृत्ती करणारे, विभूती व रुद्राक्ष धारण करणे अवश्यक आहे.

विभूती धारण क्रमात भस्मोद्धूलन, भस्मस्नान, भस्मधारण असे तीन प्रकार आहेत. भस्मोद्धूलन मानव शरीराच्या त्या त्या स्थानाला दैवताचे स्मरण पूर्वक भस्माचा स्पर्श करणे हे भावाच्या कर्ममल निरसनासाठी आहे. भस्मस्नान, जलस्नान, मंत्रस्नान, मृत्तीकास्नान ही चार स्नाने मानवाच्या भूत, प्राण, भाव आवर्णाच्या शुद्धीसाठी कल्पिली आहेत. मानवाला मुख्यतः दररोज जल स्नान अवश्यक आहे. मानवाच्या अंगावरील दूषित जंतूच्या परिहारासाठी जल स्नान विधी आहे. त्या जलाला मंत्रसंस्कार करून स्नानकरणे मंत्रस्नानआहे. जल स्नान, भूत देहाच्या शुद्धीसाठी आहे. मंत्रस्नान भस्मस्नान प्राण व भाव शुध्दीसाठी आहे. जल स्नानापासून कृमी कीटकांचा परिहार होतो. तसेच नवीन कृमींचा प्रभाव होऊनये म्हणून हे भस्म स्नान कल्पिले आहे. भस्म स्नानामध्ये कृमी नाश करण्याचा गुणधर्म आहे. भस्माला मंत्राने अभिमंत्रन त्यामंत्रमय

संस्काराचे भस्म सर्वांगाला चोळून घेणे भस्म स्नान व मंत्र स्नान आहे. भस्म धारण त्रिपुंड्र असते. वीरव्रती स्त्री-पुरुष गुरु, लिंग, जंगम, या तीन देवाच्या आधिपत्यांत असल्यामुळे गुरु लिंग,जंगमाचे प्रतीक समजून त्रिपुंड्र भस्मधारण स्वीकृत केले आहे.

भस्मामध्ये अनेक प्रकार आहेत. कोणते भस्म स्वीकारावे असा प्रश्न येतो. कांही शैवपुराणामध्ये चिताभस्म सर्वश्रेष्ठ आहे असे वर्णन आले आहे. चिताभस्म म्हणजे स्मशानांत जाळलेल्या शवाची राख होय. हे चिता भस्म लयकर्ता रुद्राने धारण केले आहे असे सांगितले आहे. रुद्रादि सकल देवता सूक्ष्म देहधारी असून लीला मात्रे चालणारे आहेत. ते जे जें कर्म करतात ते ते सर्व मानवाशी संबंधित नाहीत. शंकराने विष प्राशन केले, त्याला स्मशानवासी म्हणतात. तो आपल्या अग्रणी भक्तांची मुंडमाला धारण करतो. हे सर्व अलौकिक सामर्थ्याचे अनुकरण करणे मानवास शक्यनाही, कारण चिताभस्म शवाच्या अंत्य क्रियेत उत्पन्नहोते. त्यांत रक्त, मांस, मज्जा, अस्थी, मल, मुत्रादिकांचा संस्कार प्रत्यक्ष पणे दिसत नसला तरी त्या वस्तूचा संस्कार त्यात असणे निश्चित आहे. यासाठी चिता भस्म, श्रुति स्मृतीमध्ये सांगितलेले पुण्य कर्मानुष्ठान तत्पर लोकानां चिता भस्म धारण करणे योग्य नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्याशी व अतिवर्णाश्रमी आचार्यांना देखील सर्वथा निषिद्ध आहे. शुद्ध गोमय भस्मच सकल वर्णाश्रमीयांना धारणकरण्यांस योग्यआहे.

भस्मोत्पादनमुद्दिष्टं चतुर्धा तंत्रवेदिभिः ।
कल्पं चैवानुकल्पं च उपकल्पमकल्पकम् ।।

सि शि मणि भस्म धारण स्थल)

भस्माचे कल्प, अनुकल्प, उपकल्प, अकल्प असे चार प्रकार आहेत. या पैकी पहिले कल्पभस्मच सर्वोत्तम आहे. ते कल्प भस्म मिळत नसल्यास राहिलेल्या तीन भस्माचा उपयोग करावा.

भस्म करण्याचे विधान – भस्म उन्हाळ्यात तयार करावे. प्रखर उष्णतेमुळे गोमयामध्ये (गाईचेशेण) कृमी दोष उत्पन्न होत नाही. इतर काली कृमी दोष उत्पन्न होतो. गाय रोगी, वांझ किंवा कालवड नसावी. म्हणजे संतती प्रदान करीत असलेली गाय असावी. शास्त्रोक्त विधीने भस्म तयार करावे. ते असे की भस्म तयार करणाऱ्या व्यक्तीने मलमूत्रादि अशौच काली स्नानकरून धूतवस्त्र नेसावे. त्यागाईला स्नान घालून सारविलेल्या पवित्र स्थानी वांधावे. तेथे कोणी मूत्रविसर्जन करूनये, थुंकूनये त्यागाईला कडबा, पाणी, अहार द्यावा. कळणा, पेंड, धान्य व अन्न, हिरवे गवत, खाण्यास देऊनये, त्यापासून शेणांत कृमी दोष होतो. या प्रकारे पहिले तीन दिवस गेल्यानंतर त्यागाईला स्नान घालून सोवळ्यात संगोपन करीत, वाळलेलाशुद्ध कडबा किंवा गवत घालावे. त्यानंतर "**ॐ सद्योजातं प्रपद्यामी**" यामंत्राने शेण धरावे. "**ॐ वाम देवाय नमो**" या मंत्राने पवित्र स्थानी लहान लहान शेण्या कराव्या. "**ॐ अघोरे भ्यो**" या मंत्राने वाळू घालणे, वाळल्या नंतर स्वच्छ पवित्र स्थानी एक खड्डा खणून तो गो मयाने सारवावा आणि त्यात त्या शेण्या भराव्या "**ॐ तत्पुरुषाय विद्महे**" या मंत्राने अग्नी संस्कार करावा. अग्नी शांत झाल्यानंतर "**ॐ ईशानः सर्व विद्यानाम्**" या मंत्राने ती राख नवीन वस्त्राने गाळून शुद्ध पात्रात संग्रह करावी. हे कल्प भस्म सर्वांत उत्तम आहे. अरण्यांतील शेण्या आणून त्या गो मूत्रात भिजवून वाळवून वरील प्रमाणे अग्नी संस्कार करून

वस्त्रगाळ केलेले अनुकल्प भस्म होय. दुकानांतील भस्म आणून त्याला गो मूत्रात भिजवून, गोळे बनवून, वाळवून, संग्रह करणे उपकल्प भस्म होय. मंत्र ज्ञान शून्य लोकाकडून तयार झालेले भस्म अकल्प भस्म होय. असे भस्माचे चार प्रकार आहेत. भस्म शुभ्र होण्यासाठी एका पात्रात पूर्वोक्त तयार केलेले भस्म दोन दिवस पाण्यात घालून भिजत ठेवावे. त्याला वाटून कुटून जला सहित वस्त्रगाळ करावे. पुनः लहान लहान गोळे करून साव-लीत वाळवावे. एका मातीच्या नवीन पात्रात भरून झाकून एका खड्यांत ठेवावे. त्याच्या खाली वर सभोवती गोवऱ्या रचून अग्नी संस्कार करावा, त्यामुळे भस्मामध्ये शुभ्रता येते. असे पवित्र भस्म गुरु सन्निधीला नेऊन गुरूकडून अभिमंत्रून प्राप्त करूनघ्यावे. अथवा गुरूला आपल्या घरी बोलावून त्यांचे कडून अभिमंत्रवून प्राप्त करूनघ्यावे. आपल्या शरीराचे मस्तक, कपाळ, दोन्हीकान, कंठ, मान (खांदे) दोन्हीभुजा हृदय, दोन्हीकोपरे, नाभी, पाठ, दोन्हीमनगटे अशा प्रकारे पंधरा ठिकाणी मूल पंचाक्षरी मंत्राचा उच्चार करीत जल मिश्रित भस्म त्रिपुंड्र धारण करावे. आपल्या उजव्या हाताच्या मधल्या तीन बोटानें (तर्जनी मध्यमा अनामिका) कपाळ भरून किंवा दोन्ही डोळ्याचे समान धारण करावे. हे भस्म शुभ्र सरळ व सुटसुटीत इत्यादी सुलक्षणाने युक्त असावे. मानवाने शरीरावर विभूती धारण केल्याने गुरु लिंग जंगम आधिपत्याचा बोध होतो.



- रुद्राक्ष -

इह लोक परलोक व परमार्थ ह्या त्रिविध संपत्तीचे मूल कारण रुद्राक्ष आहे. रुद्राक्ष शब्दाचा अर्थ "रु" म्हणजे दुःख "द्र" म्हणजे वितळविणारा "अक्ष" म्हणजे चक्षु, दुःख तापाला वितळविणारा ज्ञानचक्षू म्हणजेच रुद्राक्ष होय. साधकाच्या अंतःकरणात सत्यासत्याचा विचार करणारा विवेक, परशिव चैतन्याचा ज्ञान चक्षूच रुद्राक्ष झाला आहे. रुद्राक्ष ज्ञानचक्षूचे प्रतीक असल्यामुळे तनुत्रयाच्या आवरण परिहारासाठी रुद्राक्ष धारणकरणे अवश्यक आहे.

सुवर्णाप्रमाणे कांती असणारा रुद्राक्ष सर्वात उत्तमअसतो. किडका नसलेला दुसऱ्याने न वापरलेला असावा. शिवयोग तत्पर वीरव्रतीने अशा प्रकारचा रुद्राक्ष धारणकरावा एक रुद्राक्ष शिखेंत, दोन, तीन, बारा मुखाचे तीन रुद्राक्ष शिरावर धारण करावेत. अकरा मुखाचे छत्तीस रुद्राक्ष मस्तकावर धारण करावे. दहा, सात, पाच, मुखाचे सहा सहा रुद्राक्ष दोन्ही कानात, सहा व आठ मुखाचे बत्तीस रुद्राक्ष कंठात धारण करावेत. चार मुखाचे पन्नास रुद्राक्ष हृदयावर धारण करावेत.तेरा मुखाचे सोळा सोळा रुद्राक्ष दोन्ही दंडात बांधावे. नऊ मुखाचे बाराबारा रुद्राक्ष दोन्ही मनगटांत बांधावेत. चवदा मुखाचे एकशे आठ रुद्राक्ष यज्ञोपवीता सारखे धारण करावे, या प्रकारे पूजानुष्ठान काली रुद्राक्ष धारण करावेत. वर विवरण केलेल्या प्रकारचे रुद्राक्ष न मिळाल्यास

पंच वक्त्रं तु रुद्राक्षं पंच ब्रह्म स्वरूपकम् ॥

(चंद्र ज्ञानागम क्रिया पाद सप्तम पटल)

पंच ब्रह्म स्वरूप असलेला पंच मुखी रुद्राक्ष धारण करावा.

एकशेआठ मण्याचीमाला धारणकरावी अथवा बत्तीस रुद्राक्षमण्याचीमाला गळयात धारण करावी. ते देखील साध्य नसल्यास अखेर पंच मुखी असलेला एकरुद्राक्ष तरी धारण करावा. परशिवब्रह्माच्या ज्ञान चक्षूचा बोध करणारा रुद्राक्ष शरीरावर अखंड धारण करावा. भस्म धारण केल्यानंतर थोडया वेळाने घामाने, जलाने वायूने अन्य कांही कारणाने पुसून जात असते. पुनः धारण करण्याच्या कालावधीमध्ये शरीरावर भस्माचा अभाव होतो. मात्र अंगावर लिंग आणि रुद्राक्ष हे दोन्ही अखंड राहावेत. व रुद्राक्ष धारण करण्यास विसरुनये.

मानव शरीराला रुद्राक्षाचा स्पर्श दररोज थोडावेळ तरी लाभावा. या उद्देशाने जपविधीमध्ये जप गणनेसाठी रुद्राक्ष माला स्वीकृत केली आहे. आजारी मनुष्य संभाषण करण्यास असमर्थ झाल्यावेळी आवळचा एवढा मोठा रुद्राक्ष मधामध्ये उगाळून रोग्यास चाटविल्यास तो कांही निमिष बोलू शकतो. आणि रुद्राक्षामध्ये विद्युत् संचार करण्याचा गुणधर्म असल्यामुळे कंठामध्ये, हृदयावर धारण केल्यास सूक्ष्म प्रकारचे रोग परमाणू नाश पावतात. हृदय क्रियेच्या परिशुद्धतेने मननात्मक शक्ती परिशुद्ध होऊन उत्तम शुभ संकल्पाचे तसेच दैवी गुणाची रुद्राक्षापासून प्रेरणा मिळते. या करीता एक रुद्राक्षतरी शरीरावर सदा धारण करावा. आपल्या स्नानामध्ये रुद्राक्षाचे स्नान होऊन पवित्र रुद्राक्षोदकाने शरीर शुद्धी होते. रुद्राक्ष संस्कारपूर्वक आचार्यांकडून प्राप्त करावा. तो स्वयमेव धारण केल्यास फलद्रूप होत नाही. स्त्री पुरुषाने सदाकाली धारण करावा. विवाह संस्कारामध्ये वधू मणी मंगल सूत्र सुवर्णाचे आलंकार धारण करून पति आधिपत्यांत राहात असल्या प्रमाणे भूत, प्राण व भाव

आवरणमय मानव पशूला गुरु, दैवी संपत्तीचे बोध करणारे भस्म व रुद्राक्ष धारण करून आलंकारीत करतो. आणि पंच ज्ञानेंद्रियातील त्वगेंद्रियाचा स्पर्श धर्मच अती बलवान असल्यामुळे स्पर्शधर्मगत भवित्व दोष परिहारासाठी भस्म व रुद्राक्ष धारणा सांगण्यांत आली आहे. अष्टावर्णामध्ये लिंगधारण करण्यासाठी व पूजा करण्यासाठी साधन आहे. परंतू भस्म रुद्राक्ष हे दोन्ही केवळ धारण करण्या पुरतेच उपयुक्त आहेत. अधोभावाच्या भोग प्रवृत्ती जड जीवाना रुद्राक्ष प्रिय वाटणार नाही. ज्ञानी असलेल्या शिव भक्ताचे हे दैवी आलंकार आहेत. भस्म रुद्राक्ष धारण केल्याने आपले शरीर आपल्यालाच दैवीगुणाचा बोध करीत असून अनुपम सौभाग्य दर्शवितो. आणि दुसऱ्यानी पाहिल्यास त्याच्या दृष्टीमध्ये पूज्य भाव उदयपावून त्यागप्रवृत्ती उत्पन्न होते. जे पुण्यात्मे भस्म रुद्राक्ष धारण करीत असतात ते साक्षात् रुद्रस्वरूप होतात हे निःसंशय आहे. नित्यकर्म, काम्यकर्म, नैमित्तिक कर्म, कोणत्याही काली भस्म रुद्राक्ष धारण करावेत. विभूती व रुद्राक्ष धारण करणारा परम श्रेष्ठ म्हणवितो.



— मंत्र —

"मंत्र" शब्द झाकून असणे, लपून असणे, प्रच्छन्न असणे, गुप्त असणे, गूढ असणे अशा अनेक अर्थाचा बोध करणारा आहे. पृथ्वी आपल्या उदरात बीज (मंत्र) झाकून घेऊन अंकुराद्वारे वनस्पतिरूपांत परिवर्तन करते. आपतत्त्व वायुमंडलात प्रच्छन्न (मंत्र) स्वरूपात असून जलरूपात अधोवाहीनीहोऊन खाली पडते. अग्नी, जलांत वडवाग्नी पृथ्वीत भौमाग्नी, उदरात जठराग्नी यंत्रात विद्युताग्नी होऊन मंत्र, स्वरूपात प्रच्छन्न असून कार्य रूपांत प्रकटहोतो. वायु मंत्रस्वरूप असून कार्य रूपात प्राण, अपान, समान, व्यान, उदान अशा अनेक रूपांत प्रकट होतो. आकाश-तत्त्व, पृथ्वी, आप, तेज व वायु या चार तत्त्वांना मंत्र स्वरूपात ठेवून अनेक कार्य रूपात प्रकट होण्यासाठी त्यांना अवकाश देतो.

वनस्पतीचे बीज आपल्याउदरात अंकुर, सस्य, पर्ण फूल, फळ आदि अनेक प्रकारची परिवर्तन शक्ती मंत्रस्वरूपामध्ये ठेऊन ते सर्व कार्यरूपात प्रकटहोते. पशू, पक्षी, जनन पावण्याचे अगोदर आईच्या गर्भात पिंडरूपाने मंत्र (प्रच्छन्न) स्वरूपांत वास करून त्यानंतर जनन पावतात.

शिशु जन्मास येण्यापूर्वी आपल्या मातेच्यागर्भात पिंड-रूपाने "मंत्रस्वरूपांत"नऊ महिने वास करून राहत असते. प्रकृती त्याशिशूला मांसमय आवर्णामध्ये ठेऊन मंत्रस्वरूपात जन्म देते. त्याशिशूच्या अंगी मनो भावनेची शक्ती कोणत्याहि कार्य-क्षमतेसाठी उपयुक्त नसून प्रच्छन्न अवस्थेतून क्रमेण ती मंत्रमय शक्ती विकास पावते. पुढे कर्मयोग प्रपंच चालविण्यासाठी ती प्रकट होते. बाल्य अवस्थेतील मुलाना वागेंद्रियामध्ये बोलण्याची शक्ती प्रच्छन्न असल्याकारणाने आई बापाच्या संस्काराद्वारे ती

मंत्रमय प्रच्छन्न शक्ती विकासपावून वाक्सामर्थ्यरूपाने प्रकट होते. शिक्षक आपल्यातील मंत्रमय ज्ञानशक्ती मुलानां पाठ्यक्रमाद्वारे त्याच्या भावनेत प्रेरणा करून मुलांतील मंत्रमय ज्ञानशक्ती विकसित करतात.

मानव आपल्या अनैसर्गिक प्रवृत्तीमध्ये हिंसा, असत्य, स्तेय, व्यभिचारादि पाप कर्मे घडली असल्यास त्यांचा दुसऱ्याना परिचय होऊनये म्हणून मंत्र (गुप्त) रूपात ठेऊन वागत असतो. शेतकरी भूमीच्या उदरी बीज लपवून ठेऊन अन्नधान्याचे उत्पादन करीत असतो. मानव धन कनकादि अनेक वस्तूची चोरी होऊनये ह्या भावनेत दुसऱ्यांना परिचय न होण्याजोगे मंत्र (गुप्त) स्वरूपात ठेऊन वागत असतो. राष्ट्रपति राष्ट्राच्या योग क्षेमासाठी मंत्रीमंडळा बरोबर गुप्त विचारविनिमयकरून त्यानंतर तो मंत्रमय शासनाद्वारे प्रजेला आज्ञा करितो. प्रपंचातील सर्व कर्मयोग पहिल्याने प्रच्छन्न स्वरूपांत असून त्या नंतर ते प्रकट होतात. प्रपंचातील सर्व मानव परस्पर आपल्या बोलण्याने कर्मयोग चालवीत असतात. तोंडाने बोललेली भाषा कानाने ते ऐकत असतात. कानाला शब्दस्पर्श होताच त्या शब्दार्थाची जाणीव त्यांना होत असते. साखरेतील गोडी चंदनांतील सुगंध हे जसे मंत्रस्वरूपांत असतात त्याप्रमाणे वाक्साहित्य पंडिता कडून निर्मित श्लोकपदामधील अर्थ देखील मंत्रस्वरूपात असतो. शब्द आणि अर्थ हे दोन्ही विभक्त होणार नाहीत. अविनाभाव संबंधात ते आहेत. चराचर सकल वस्तूच्या नामामध्ये अर्थ मंत्र, स्वरूपांत गर्भित असतो. मानवाचे बोलणे म्हणजे मंत्रआहे. बोलल्यानेच मानव परस्पराच्या भाषेतील अर्थ जाणून ते सुखी होऊन जगत असतात. बोलणे म्हणजे इह लोकाचे सुख पदार्थ

प्राप्त करून देणारे मंत्रच आहेत.

मानवाच्या भाषेत देखील विशेष शक्ती मंत्र स्वरूपांत भरून आहे. कांही गोष्टी आनंद देणाऱ्या आणि कांही गोष्टी दुःख देणाऱ्या आहेत. 'तुम्ही ज्ञानी आहात विव्दान आहात'' अशी स्तुती कोणी केल्यास मंत्रमय शब्दार्थाची जाणीव भावनेला होताच त्याला अत्यानंद होतो. तेच दुसऱ्या एखाद्यानी ''तू दुष्ट नीच व पापी आहेस तुझे तोंड पाहू नये'' असे बोलल्यास त्या मंत्र स्वरूपात असलेल्या शब्दार्थाची जाणीव होताच तो अत्यंत दुःखीहोतो. साहित्य शब्दामध्ये देखील कांही सुखप्रदशब्द आहेत. कांही दुःखप्रद आहेत. ह्या प्रपंचांतील सर्व जीव आपल्या मंत्रमय वाचेने जगून सुख दुखाःचा अनुभव घेत असतात. आणि मंत्र स्वरूपांत असलेले पूर्व संचित केवळ बोलण्याच्या अर्थानेच प्रारब्धकर्म प्रकट होऊन अधोभावनेत त्याचे विभाजन होते. अधोभावनेतील शब्दार्थ सर्व इहलोकाचे सुख देणारे आहेत. परंतू परलोक व परमार्थाचे विशेष सुख देण्याचे सामर्थ्य या लोकभाषेत नाही. साधु, सत्पुरुष, ऋषी, मुनी, योगी, तपस्वी या महा आचार्यांच्या वाणींत देखील एक (प्रच्छन्न) मंत्रमय शक्ती भरून असते. यांच्या प्रसाद वाणींने पतित लोक देखील पाप कर्मापासून निवृत्त होऊन पुण्यकर्माकडे जात असतात. जन्म, मरण ह्या भव संसृती-मध्ये गुंतून असलेल्या मानवाला आचार्य, आत्मानात्मा या विचाराचा विवेक उत्पन्न करणारे बोधामृत पाजवून अनुगृहित करतो. भवबंध निवृत्ती करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीमध्ये आहे. आचार्यांच्या बोध वचनामध्ये लोक, परलोक, परमार्थ ह्या त्रिविध सुख देणाऱ्या शक्ती मंत्र स्वरूपांत आहेत.

शुद्धज्ञान स्वरूप असलेला आत्मा भूत, प्राण, व भाव

या आवर्णाने मंत्रस्वरूपांत बांधला गेल्यामुळे पशु झाला आहे. सुख दुःखाच्या द्वंद्व प्रतीतीमुळे आपल्या मूल अवस्थेला विसरून वागत असतो. त्यापासून आत्म्यावरील आवर्ण परिहारासाठी मंत्रावरण अवश्यक आहे. राजाच्या अधिपत्यांत राष्ट्रशासन सत्ता असल्याप्रमाणे गुरूच्या अधिपत्यांत मंत्र असून त्याला तो दृष्टा असतो. म्हणजे मंत्र जाणणारा, मंत्र तत्त्व जाणणारा मंत्र दैवत साक्षात्कार असणारा गुरु आहे असा त्याचा भावार्थ होतो. गुरूच्या मंत्रात सूक्ष्म शरीर धारी सकल देवाचा निवास असून इच्छित सुख देणारी शक्ती गुप्तस्वरूपांत असल्यायुळे त्याला मंत्र म्हणून नामाभिधान आहे.

मानवाच्या साहित्य शब्दार्थामध्ये देखील जडसृष्टी प्रच्छन्न (मंत्र) रूपांत अंतर्भूत आहे. परंतू गुरूच्या मंत्रांत प्राण भाव, सूक्ष्म सृष्टी मंत्र स्वरूपात अंतर्भूत आहे. इह, पर, पार-मार्थ ह्या त्रिविध सुखाची आपेक्षा कारणाऱ्या मानवाला मंत्राधिपत्य असलेल्या गुरूला शरण जावे लागेल.मंत्र (प्रच्छन्न) स्वरूपांत असणाऱ्या साध्यसुखाच्या प्राप्तीसाठी गुरुमंत्रसाधन असल्यामुळे त्यासाध्याला अनुलक्षून त्याच्या साधनेला सुद्धा मंत्र म्हणून सांगण्यात येते. मंत्र शब्दाचा अर्थ "मं" म्हणजे मरणापासून "त्र" म्हणजे रक्षण करणारा "मरणात् त्रायते इति मंत्रं" म्हणजे जो मरणा पासून तारण करतो तो मंत्र आहे. मरणापासून रक्षण करणारा म्हणजे अमरत्व प्राप्त करुन देणारा असा त्याच्या भावार्थ होतो. मरणा पासून रक्षण करणे म्हणजे जन्म मरण ह्या दोन्हीच्या अतीत असलेल्या अमरत्वा प्रत क्रमेण नेणारा असा त्याचा बोध होतो. आणि "मं" म्हणजे मनाला "त्र" म्हणजे रक्षण करणारा. "मननात् त्रायते इति मंत्रम्"

म्हणजे हिंसादि पापकर्माकडे जाणाऱ्या मनाला पुण्य-कर्माकडे जाण्याची प्रेरणा करून रक्षण करणारा असा या मंत्राचा अर्थ होतो. भूत, प्राण व भाव या तनुत्रयाच्या आवरण परिहारासाठी आचार्य शिष्याला मंत्र प्रदानकरून अनुग्रह करतो व पुनः पुनः जप कर अशी तो आज्ञा करीत असतो. नाम रूपा-त्मक कर्मयोग प्रपंचाचा बोध करणारेशब्द नामरूपांच्या आवरणाद्वारे जन्म मरण प्राप्त करणारे आहेत. जन्म मरणा-पासून रक्षण करण्याचे सामर्थ्य मानवी शब्दांत नसल्यामुळे मान-वाला गुरूच्या आधिपत्यांत असलेला मंत्र घेणे अवश्यक आहे.

– मंत्राचा विनियोग क्रम –

ऋषी, छंद, देवता, बीज, शक्ती व कीलक या सहा अंगाने युक्त मंत्र असतो. प्रथम ज्यांच्याकडून मंत्र संशोधित होऊन अभिमुख झालेला आहे. म्हणजे त्यास मंत्र दैवताचा साक्षात्कार झालेला असतो. तो त्या मंत्राचा ऋषी म्हणविला जातो. अक्षर संख्येचा बोध करणाऱ्या छंद शास्त्राप्रमाणे गायत्री, त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप्, पंक्ती, बृहती, उष्णिक् आदि ज्या त्या मंत्राला संबंधित असलेल्या छंदोबद्धाने त्यामंत्राचा जप करणे हा छंद आहे. मंत्राला आधिष्ठान असलेल्या मूल अधिदैवताचे स्मरणकरणे ही देवता आहे. मंत्र देवतेच्या नाम वर्णाला मूल कारण असलेले बीज आहे, मंत्राधिपत्य देवताच्या सामर्थ्याचा बोध करणारी ती मंत्र शक्ती होय. देवताचे मुख्यांग दर्शविणे कीलक आहे. शिरामध्ये ऋषी, मुखामध्ये छंद, हृदयामध्ये देवता नाभीमध्ये बीज, गुह्यामध्ये शक्ती, पादामध्ये कीलक असे ज्या त्या स्थानी स्पर्शकरित पठण करण्याचा क्रम सांगीतला आहे. शिर, मुख, हृदय, नाभी, गुह्य पाद ह्या साहा मुख्यांगाला

स्पर्शकरण्याचे कारण म्हणजे शिरादि पादापर्यंत अधोभावनेतील शारीरिक संस्काराला उर्ध्वभाव प्रवृत्तीमध्ये परीवर्तन करून देह, मंत्राधिपत्यांत ठेवणे होय. ज्ञानाला अवकाश देणारे शिर आहे. मंत्र द्रष्टा ऋषी, आमच्या मस्तकाला पूज्य झालेला असतो. त्यासाठी मंत्र द्रष्टा ऋषीचे स्मरण करीत शिराला स्पर्श करावयाचा असतो. मुखाने मंत्र जप करावयाचा असतो. छंदाच्या क्रमाप्रमाणे मुखाने जप करावा म्हणून मुखाचा स्पर्श करावयाचा असतो. मंत्राधिपत्य देवाच्या निवासासाठी हृदयाकाश अवकाश देत असल्यामुळे हृदयाला स्पर्शकरावयाचा असतो. संतती बीजाचे मूलस्थान नाभी असून ते भवित्व दोष करणारे असल्यामुळे नाभीतील बीज, मंत्रमय व्हावे म्हणून नाभीला स्पर्श करावयाचा असतो. गुह्येंद्रियामधील अधोरेत शक्ती ऊर्ध्वरेत होऊन ओज रूपांत परिवर्तन व्हावी म्हणून गुह्येंद्रियाला स्पर्श करावयाचा असतो. पाय कर्मयोगांत चालणारे असल्यामुळे त्याला आसनांत बंधिस्त करून मंत्र कीलक रूपांत पायाना स्पर्श करावयाचा असतो.

मंत्र जपारंभी करन्यास, देहन्यास व अंगन्यास असे तीन प्रकारचे न्यासविधी सांगितले आहेत. दोन्ही हात मंत्राधिपत्यांत ठेऊन मंत्र जपाच्या गणनेसाठी जपमाला धारण करण्यास हातामध्ये पावित्र्य येण्यासाठी करन्यास विधी आहे. मंत्राक्षरासहीत देवतांचे मूल नामाचे ध्यानकरीत सर्वांग मंत्राक्षराने पवित्र बनविणे हा देहन्यास विधी आहे. मंत्रानुष्ठानासाठी कोणतेही दोष उत्पन्न न होण्याजोगे व त्याचे निर्विघ्नतेने रक्षण व्हावे म्हणून मंत्र शक्तीने बंधिस्त करणे म्हणजे अंगन्यास विधी होय. आधिभौतिक, आधिदैवीक व आध्यात्मीक या त्रिविध तापाचा

स्पर्शहोऊनये म्हणून दाही दिशेला बंधान करणे हा दिग्बंधान विधी होय. जसे राजा आपल्याला शत्रूची बाधा होऊ नये म्हणून लोह-वज्रादिक कवच आपल्या अंग प्रत्यांगावर धारण करीत असतो. आणि शत्रूने आपल्या राज्यसीमेत प्रवेश करुनये म्हणून शस्त्रास्त्राने सुसज्जीत सैन्य ठेऊन आपले रक्षणकरून घेतो. तसे जप साधक करन्यास, देहन्यास, अंगन्यास, पूर्वक मंत्र शक्तीचा मंत्राक्षराचा मंत्र देवाचे ध्यान करून स्थापून शरीर मंत्रमयकरून त्याला मंत्राधिपत्यात ठेवतो आणि आपल्या देहाच्या सर्वांगाला अवकाश दिलेल्या दाही दिशेलासुद्धा देवाच्या आधिपत्यांत ठेऊन त्या जप-स्थानाच्या परिमित सीमा मंडलाचे उल्लंघनकरून कोणीही आत प्रवेश करूनये म्हणून दिग्बंधान करीत असतो.

मंत्रामध्ये अनेक प्रकार आहेत. हिंसा मैथुनादि निषिद्ध कर्मापासून तो अकाल मृत्यु येण्याजोगे करणे हा मारण विधी होय. सुप्ती, विष, मूर्छा, अदृश्यकरणे त्यास मोहन विधि म्हण-तात. अग्निस्तंभ, जलस्तंभ, इंद्रियस्तंभ खड्गस्तंभ, व जिव्हा-स्तंभ हा स्तंभन विधी होय. पुर्व सुखाश्रयापासून वंचित करणे हा उच्चाटन विधी आहे. वस्त्र, आभरण, वनितादिकाचे व वस्तूचे स्थानांतरकरून अंतरिक्षातून येण्याजोगे करणे हा आकर्षण विधी आहे. मित्र मित्रामध्ये बंधु बंधु मध्ये, पति पत्नीमध्ये माता पिता पुत्रादि परस्परामध्ये वैर निर्माण करणे हा विद्वेषण विधी आहे. राजवश, जनवश, स्त्रीवश, पतिवश, भूत, प्रेत, पिशाच्च आदिना वश करून घेणे हा वशी करण विधी आहे. मारण मोहन, स्तंभन, उच्चाटन, आकर्षण, विद्वेषण, वशी करण हे मंत्र केवळ इहलोकांतील सुखालाच अखेरचे सुख समजून हिंसा, असत्य स्तेय व व्यभिचार या पाप कर्मामध्ये प्रवृत्त करणारे दुष्ट मंत्रआहेत.

या मंत्रामध्ये पुण्यांश मुळीचनाही. असले दुष्टमंत्र जपणारे पापाधिक्याने पुन: मानव जन्माला न येता पशू, पक्षी, क्रमी, कीटक योनीत जन्म घेतात.

भूत, प्रेत, पिशाच्च, यक्ष, राक्षस, गंधर्व आदि मंत्राने आणि रवी आदि नवग्रहाच्या मंत्रजपापासून पापाचे निरसन होते. संध्या, होम, पूजा, जपादि नित्य क्रियेमध्ये उपयोगात येणारे नारायण अष्टाक्षरी, विष्णु द्वादशाक्षरी, गणपति नवाक्षरी, रुद्र-दशाक्षरी, शक्ती त्रयोदशाक्षरी, सूर्य गायत्री, शिवगायत्री आदि मंत्राच्या अनुष्ठानापासून पाप क्षालन होऊन पुण्य प्राप्ती होते. इह लोकातील सकलैश्वर्यं लाभून परलोकातील सालोक्यादि फल पदव्या प्राप्त होतात. ब्रह्मा, विष्णु, रुद्र आदि देवतांच्या मंत्र जपाने परलोक प्राप्ती होते मात्र जीवन्मुक्ती होत नाही.

– पंचाक्षर महा मंत्र –

शिवतत्त्वापेक्षा श्रेष्ठ दुसरे तत्त्व नाही. सप्त कोटी मंत्रामध्ये पंचाक्षरी महा मंत्रापेक्षा दुसरा कोणताच मंत्र श्रेष्ठ नाही. अनंत ब्रह्मांडाच्या उत्पत्ती, स्थीत्ती, लय, निग्रह व अनुग्रह ह्या पंचविध कार्याला परशिव ब्रह्मच कारण आहे. आणि हा पर-शिवनामात्मक पंचाक्षर मंत्रच सर्व मंत्रांला मूलकारण आहे. पंचाक्षर महामंत्र शिवाचा अभिधान मंत्र आहे. शिव अभिध्येय झालेला आहे. परशिवाला ह्या पंचाक्षर मंत्राचा वाच्य वाचक-भाव संबंध असल्यामुळे ह्या मंत्रापासून शिव प्रकाशित होतो. अर्थात शिवस्वरूप प्रकृती सर्व ह्या मंत्रामध्ये अंतर्भूत आहे.

शिव ही दोन अक्षरे सकल तत्त्वातीत परशिव ब्रह्म-स्वरूप आहेत. शिव तत्त्व भावातीत असल्यामुळे भक्ताच्या भाव-नेला ते न पोहोंचणारे असीम आहे. आणि भक्ताना स्तुती

स्तोत्राने वर्णन करण्यास असाध्य असून ते वर्णनातीत आहे. "**शिव**" शब्द सगुण साकार मूर्ती असलेल्या ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर ह्या दैवतांचे दर्शक नाम नव्हे, रुद्रादि सकल देव सुद्धा परशिव ब्रह्माचे उपासक असून "**शिव**" शब्द त्याना देखील मंत्र रूपाने पूज्य आहे. "**शिव**" शब्द सगुण मूर्ती लयकर्ता रुद्राचा, निग्रह कर्ता ईश्वराचा, द्योतक नसून निर्गुण निरूप परशिव ब्रह्म वाचक आहे. त्या परशिव ब्रह्मामध्ये अविनाभाव संबंध रूपांत असणाऱ्या चैतन्य शक्तीमध्ये उन्मेषण शक्तीचे उत्थान होऊन आपल्या विमर्शाशक्ती पासून सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान पंचब्रह्म सदाशिव उदय पावला आहे. तो मायाविरहित परिशुद्ध देहधारी असून सृष्टी, स्थिती, लय, निग्रह व अनुग्रह या पंच सामर्थ्यसंपन्न कालातीत व कर्मातीत आहे. ब्रह्मा, विष्णु रुद्र व ईश्वर ह्या देवता प्रत्येकी एकेक सामर्थ्य संपन्न असून काल बंधनाच्या त्या आधीन आहेत. पंचब्रह्म सदाशिव सगुण निर्गुण या दोन्ही अवस्थेला सर्व तंत्र स्वतंत्रअसून नित्यमुक्त म्हणवितो. "**शिव**" या शद्बामागे "**सदा**" शद्ब लावल्याने सदाशिव नाम होते. "**शिव**" म्हणजे मंगल "**सदाशिव**" म्हणजे नित्य मंगल असा बोध होतो. पंच ब्रह्म सदाशिव सगुण निर्गुण उभय वाचक असून परशिव ब्रह्म निष्कल ब्रह्म वाचक आहे. "**नमःशिवाय**" ही पाच अक्षरे सगुण प्रतिपादक असून "**ॐ**" कार निर्गुण ब्रह्म प्रतिपादक असल्यामुळे "**ॐ**" कारा सहित पंचाक्षर मंत्र होतो. "**ॐ**" कार बीज असून "**नमः शिवाय**" त्याची चैतन्य शक्ती आहे. ती शक्ती पंचविध होऊन "**ॐ नमः शिवाय**,, या मंत्रात साहा अक्षरे आहेत. म्हणून षडाक्षर मंत्र आहे असे कांही लोक समजतात. त्यांचे असे समजणे बरोबर नाही "ॐ,, हे

अक्षर वर्ण मालिकेतील अक्षर नाही. "क,, पासून "क्ष,, पर्यंत व्यंजनाची पूर्णाक्षरे होण्यासाठी स्वर संयोजनाची अवश्यकता असते. स्वर साह्य नसल्यास व्यंजने नाद रूपांत प्रकट होत नाहीत. "अ पासून अ:,, पर्यंत स्वर आपल्या उच्चार क्रमामध्ये कोणत्याही व्यंजनाची अपेक्षा न करीता स्वतंत्रपणे नाद रूपात प्रकट होतात. (ं) अनुस्वार आणि (:) विसर्ग या दोन्हीचा उच्चार होत नाही ते निःशब्द आहेत. ते स्वर व व्यंजनामध्ये मात्र उच्चार होऊन गोचर होतात. त्याचा नाद स्वरामध्ये आपणास अनुभवास येतो. प्रथम उद्‌भवलेला नाद "अ,, कार स्वरूप असतो. संगीत शास्त्रामध्ये सा.री.ग.म.प.ध.नी. सप्त स्वरांत मूल "सा,, मधून "स्,, व्यंजन वजा केल्यास "अ,, स्वरच शिल्लक राहातो. सप्त स्वरच विविध प्रकारे ऐकू येत असलेतरी "सा,, स्वराच्या आरोह अवरोहापासून सप्तस्वर होतात. प्रथम कोणत्याही स्वर पात्राला (वाद्याला) स्पर्श केला तरी "सा,, स्वराचाच अनुभव येतो. मूलत: एकच एक "अ,, स्वरच संगीत शास्त्र रूपांत परिणत होऊन नाद ब्रह्माचा अनुभव येतो.

"अ,, "ऊ,, दोन स्वर आणि एका (•) अनुस्वाराने "ॐ" कार बनतो, "ॐ,, कार अक्षर म्हणविले जात नाही "क,, पासून "क्ष" पर्यंत व्यंजने स्वराने पूर्ण होऊन अक्षरे बनतात. त्या योगे शब्द सृष्टी प्रत्ययास येते. "अ,, स्वराच्या पुढे "ऊ,' स्वर दिल्यास "ओ,, स्वर होतो. त्याच्यावर बिंदूरूप (•) अनुस्वार दिल्याने (ॐ) होतो स्वर आणि अनुस्वाराची अक्षरामध्ये गणना होत नाही म्हणून "ॐ,, अक्षर आहे अशी कल्पना करणे उचित नाही. "अ,, "उ,, आणि अनुस्वार (•) या तीन मात्राचा उच्चार स्वाभाविक होतो. मनुष्य रोग काली अऽऽऽऊ. ऊऽऽऽऊ

ऊऽऽऽऊ. सतत कण्हत असतो. मुक्याला वर्ण उच्चार करता येत-नसल्यामुळे अऽऽऽअं, अऽऽऽअं, अऽऽऽअं, अशा ध्वनी संकेताने तो बोलत असतो. मनुष्याला कोणी हाक मारल्यास "ओ,, म्हणून उत्तर देत असतो. दीर्घ काल असे म्हणून श्वास घेते वेळी दोन्ही ओठाच्या संगमात अनुस्वाराचा उच्चार होतो. "ॐनमः शिवाय,, पंचाक्षर मंत्र ॐ कार सहित आहे. त्याला षडाक्षर मंत्र म्हणणे योग्य नाही. ॐ अक्षर ह्या सृष्टीच्या अतीत आहे. पंचाक्षर मंत्राला ॐ कार बीज आहे. त्याला सोडून राहीलेल्या "नमः शिवाय,, या पाच अक्षराने पंचाक्षरमंत्र पूर्ण होतनाही. बीज कारण आहे. वृक्ष, पुष्प व फल त्याचे कार्य असल्या प्रमाणे "ॐ,, निष्कल ब्रह्म वाचक "नमः शिवाय' सकल ब्रह्म वाचक आहे.

प्रणवः सर्वतत्त्वानां बीजं कारण कारणम् ।
तस्मादयं महामंत्रः सर्वस्य जगतः प्रभुः ॥

(सूक्ष्मागम क्रियापाद चतुर्थ पटल)

पंचाक्षर महा मंत्राचा ऋषी वामदेव आहे. वामदेव हे नाम निग्रह सामर्थ्य संपन्न ईश्वर वाचक आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर या देवाला मोक्षप्राप्तीसाठी वाधाहोऊनये आणि सृष्टचादि कार्यासाठी मंगल प्रेरणा व्हावी म्हणून निग्रह कर्ता वामदेवास (ईश्वर) प्रथम पंचाक्षर मंत्र अभिमुख झाला आहे. म्हणून त्याला मंत्र द्रष्टा ऋषी म्हणतात.

ब्रह्मादिनां च देवानां जगत्सृष्टचादि कर्मणी ।
मंत्रस्यास्यैव महात्म्यात् सामर्थ्यमुपजायते ॥

(सि. शि. मणि पंचाक्षर जप स्थल)

नगाधीराज हिमालयाच्या उत्तुंग शिखरांतील गंगोत्री-मध्ये जनन पावलेले गंगाजल समस्त जीवाच्या कल्याणासाठी

भूमीवर वहात संचार करीत असल्याप्रमाणे निग्रहकर्त्या ईश्वराला (वामदेव) प्रथम पंचाक्षर मंत्र अभिमुख होऊन रुद्र, विष्णु, ब्रह्मा या देवाना क्रमेण अभिमुख होत होत अखेर मानव सृष्टीला अभिमुख झाला आहे. पंचाक्षरमंत्र पंक्तीछंदामध्ये जप केल्यास मंत्राक्षराचा दीर्घ ऱ्हस्व लोप होतनाही. अन्यथा जप क्रम सदोष होतो. पंचाक्षर मंत्राचे अधिदैवत "पंचब्रह्म सदाशिव" आहे. त्याच्या सद्योजात मुखापासून "न" कार, वामदेव मुखापासून "म" कार, अघोर मुखापासून "शि" कार, तत्पुरुष मुखापासून "वा" कार व ईशान मुखा पासून "य" कार उत्पन्न झाले आहेत. त्यामुळे पंचाक्षरमंत्र पंचब्रह्म सदाशिव स्वरूप आहे.

ब्रह्मा विष्णुस्तथा रुद्रईश्वरश्च सदाशिवः ।
तथा परशिव श्चैव षड्देवात्मा षडाक्षरः ।।

(सूक्ष्मागम क्रियापाद चतुर्थ पटल)

पंचब्रह्म सदाशिव सृष्टयादि पंच सामर्थ्य संपन्न असून अनुग्रह कार्यासाठी पंचआचार्य, निग्रह कार्यासाठी ईश्वर, लय कार्यासाठी रुद्र, स्थिती कार्यासाठी विष्णु, आणि सृष्टी कार्यासाठी ब्रह्मा अशा सृष्टीच्या पंचविध कार्याला पांच अधि देवता नेमून पंचब्रह्म सदाशिव पितृ झाला आहे. पंचाक्षर मंत्राच्या अनुष्ठानाने पंचब्रह्म सदाशिवाचा साक्षात्कार होतो. आणि त्याचे अधिपत्यांत असलेल्या ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर व पंचाचार्य आदि समस्त देवांचे साक्षात्कार होतात. पंचब्रह्म सदाशिवाला आणि पंच आचार्यानां मूर्तीमंत शक्ती (पत्नी) नाही. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर या चार देवानां मूर्तीमंत शक्त्या आहेत. ब्रह्माला सरस्वतीशक्ती, विष्णुला लक्ष्मी शक्ती, रुद्राला पार्वती शक्ती, ईश्वराला अंबिका शक्ती आहेत.

पंचाक्षर मंत्राला उमाशक्ती आहे असा कांही ठिकाणी

उल्लेख केलेला आहे.'उमा'ही रुद्राची शक्ती आहे.पंचाक्षर मंत्राला उमापती असलेला लयकर्ता रुद्र अधिदैवतनसून पंचब्रह्मसदाशिव अधिदैवतआहे. परशिव ब्रह्मातील अविनाभाव संबंधात असलेल्या उन्मेषणादि पंच शक्ती मूर्तीमंतरूप धारणकेलेला पंचब्रह्म सदाशिव आहे. पंचाक्षर मंत्राचे अधिदैवत असलेल्या पंचब्रह्म सदाशिवाला उमा शक्ती आहे असे सांगणे तत्त्वा विरुद्ध आहे. पंचाक्षर मंत्रामध्ये उन्मेषण, विमर्शा, इच्छा, ज्ञान, क्रिया, या पाच शक्त्या अंतर्गत आहेत. या पंचाक्षर मंत्राला "शिव" शब्दच मुख्यत्त्वाने आहे. पंचाक्षर मंत्रानुष्ठान करणाऱ्या जप साधकाला शिवदैवताचा अनुग्रह होतो. साधनीभूत असलेला "शिव" शब्दांतील हे दोन अक्षर पंचाक्षर मंत्राचे कीलक आहे. पंचाक्षर मंत्राचाजप न्यासपूर्वक करावा. रुद्रसूक्त मृत्युंजय मंत्र, गणपती नवाक्षरी मंत्र, नारायण अष्टाक्षरी मंत्र, अशा अनेक मंत्राचे परिशीलन केले असता त्या मंत्राचा न्यास, चतुर्वर्णाश्रमीयासाठी वेगवेगळा सांगितला नाही. एकच प्रकार सांगीतला आहे. त्याप्रमाणें पंचाक्षरी महा मंत्राचा जपविधी व न्यासविधी सर्व वर्णाश्रमीयाना एकच प्रकारचा आहे.

– पंचाक्षर महामंत्र विनियोग क्रम –

अस्य श्रीपंचाक्षर महा मंत्रस्य वामदेव ऋषिः (सिरशी) पंक्तीश्छंदः (मुखे) पंचब्रह्म सदाशिवो देवता (हृदये) ॐबीजं (नाभौ) उन्मेषण, विमर्शा, इच्छा, ज्ञान, क्रिया पंचशक्तयः (गुह्ये) शिवइति कीलकं (पादयोः) पंचब्रह्म सदाशिव प्रीत्यर्थे जपे विनियोगः

करन्यास – "नं" ब्रह्मणे नमः अंगुष्ठाभ्यां नमः। "मं" विष्णवे नमः तर्जनीभ्यांनमः। 'शि' रुद्राय नमः मध्यमाभ्यां नमः। 'वां' ईश्वरायनमः

अनामिकाभ्यां नमः । "यं" पंचब्रह्म सदाशिवाय नमः कनिष्ठिकाभ्यां नमः । 'ॐ' परशिव ब्रह्मणेनमः करतलकर पृष्ठाभ्यांनमः

देहन्यास – "नं" सद्योजाताय नमः पादव्दयोः । "मं" वामदेवाय नमः गुह्ये । "शिं" अघोराय नमः हृदये । "वां" तत्पुरुषायनमः मुखे । "यं" ईशानाय नमः सिरशी । "ॐ" परशिव ब्रह्मणेनमः सर्वांगे ।

अंगन्यास – "नं" उन्मेषण शक्त्यै हृदयाय नमः । "मं" विमर्शा शक्त्यै सिरसे स्वाहा । ".शिं" इच्छा शक्त्यैशिखायै वषट् । "वां" ज्ञान शक्त्यै कवचाय हुं । "यं" क्रिया शक्त्यै नेत्रत्रयाय वौषट् । ॐ पराशक्त्यै अस्त्राय फट् । ॐ भूर्भुवःसुवरोमिति दिग्बंधः ॥

॥ पंचब्रह्म सदाशिव स्तोत्रम् ॥

स्वतेज स्फटिकाभासम् जटाजूट विराजितम् ।
शिरोभिः पंचभिर्युक्तम् पंचानन समन्वितम् ॥
प्रत्याननं विशेषेण त्रिनेत्रं भस्म भूषणम् ।
दशभिर्बाहुभिर्युक्तम् पादव्दय सुशोभितम् ॥
पद्मसंस्थं महादेवम् सर्वा भरण भूषितम् ।
दिव्य वस्त्र परिधानम् दिव्यायुध धरं शुभम् ॥
शूलंच परशुं चैव खड्गं वज्राभये तथा ।
दधतं दक्षिणै र्हस्तैस्तथा वाम करैः शुभैः ।
नागं पाशंचांकुशंच घंटा वन्हिं तथैवच ॥
सर्वं लक्षण संयुक्तम् भुक्ति मुक्ति प्रदायकम् ॥
सृष्टयादि पंच सामर्थ्यम् पंचाक्षर मंत्र मयम् ॥
पंचब्रह्मात्मकं देवम् सदाशिव महंभजे ।

पंचाक्षर मंत्र दीक्षेमध्येच गुरु मुखाने घ्यावा. गुरु मुखाने न घेता मंत्र जपल्यास मंत्र चौर्य होते. गुरूच्या आधीन

मंत्र असून मंत्राधिन देवता असल्याकारणाने गुरुकडून मंत्र घेणे अवश्यक आहे. नसल्यास महा पातक म्हणविते. त्या पासून उन्माद अपस्मारादि अनेक रोग संभवतात. एवढेचनव्हे तर मंत्र-सिध्दी होत नाही. पंचाक्षर मंत्रानुष्ठानाकरीता सर्वमानव समान अधिकारी आहेत. स्त्रीयानां व शूद्राना ॐ प्रणावाक्षर रहित पाच अक्षराचा मंत्र जपावा म्हणून कांही पुराण ग्रंथामध्ये सांगितले आहे. ते योग्य नाही. अष्टावर्ण वीरव्रताचे पालन कर-ण्यासाठी स्त्री पुरुष दोन्ही समान आहेत. मंत्र जपण्याच्या विधी-मध्ये भेदभाव कल्पून घ्यावयाचा असल्यास लिंग धारण, भस्म धारण, रुद्राक्ष धारण ह्या सर्व आवरण प्रदान कार्यामध्ये देखील स्त्रीयासाठी एक, पुरुषासाठी एक असे दोन प्रकार कल्पून घ्यावयाचे होते. पुरुषासाठी ॐ प्रणवाक्षर सहित असावे व स्त्रीयासाठी प्रणवाक्षर रहित मंत्रप्रदान व्हावा म्हणणे आयोग्य आहे. सृष्टी-मधील सर्व मानव पंचाक्षर मंत्र जपण्यासाठी समान अधिकारी आहेत. ॐ प्रणवाक्षर, मंत्राचे बीज असून त्या शिवाय कोण-ताही मंत्र पूर्णहोत नाही. पंचाक्षर मंत्र,मुखाने जपत शिवलिंगास नेत्राने पाहात, हाताने पूजा केल्यास, अनंत पापकर्माचा पतित देखील उध्दरून जातो. या पंचाक्षर महा मंत्राच्या अनुष्ठानाद्वारे आत्मानात्माचा विचार करणारा शिवज्ञान संपन्नहोऊन त्यास सर्व वेदोपनिषदाचे ज्ञान होते. व सर्वज्ञत्व प्राप्तहोते.

जपे देतां महाविद्यां शिवरूपामनन्यधीः ।
जपस्तु त्रिविधः प्रोक्तो वाचिकोपांशुमानसः ।।

(सि. शि. मणि पंचाक्षर जप स्थल)

या साठी या मंत्राला महाविद्या म्हणून संबोधण्यात आले आहे. या महामंत्राचा, वाचक, उपांशुक व मानसिक अशा तीन प्रकारे

जपक्रम सांगितलेला आहे.

आपल्या जपस्थानाच्या सभोवती वसलेल्या लोकांना ऐकू जाईल असा जपकरणे वाचक जप होय. ओठ जीभ हलवीत दुसऱ्याना न ऐकू जाण्यासारखा अगदी सूक्ष्मरीतीने जपकरणे उपांशुक जपहोय. जीभ ओठ न हलविता केवळ मनाने जप करणे मानसिक जपहोय. प्रथम सांगितलेला वाचकजप गुरु शिष्याला उपदेश करावयाचे वेळी मात्र त्याजपाचा उपयोग होतो. सामुहिक लोकात पंचाक्षर मंत्राचे भजनकरूनये. त्या पासून गुरूकडून घेतलेला मंत्र गुप्तठेवण्याच्या आज्ञेचा भंग होतो. आणि छंद व अर्थ दोष होतो. भजनाच्याद्वारे सामुहिक लोकांना मंत्राचा परिचय झाल्यामुळे गुरूकडून मंत्र घेण्याचे जे धर्म बंधन आहे. ते नाहिसे होते. यासाठी गौप्यस्फोट न व्हावा म्हणून सांगितले आहे.

अभिषिच्य गुरुः शिष्यमासीनं पुरतः शुचिम् ।
ततःपंचाक्षरीं शैवीं संसारभयतारिणीम् ।।
तस्य दक्षिण कर्णे तु निगूढमपि कीर्तयेत्।
छंदो रूपमृषिचास्य देवतां न्यास पद्धतिम् ।।

(सि. शि. मणि गुरु कारूण्य स्थल)

गुरु आपल्या शिष्याच्या उजव्या कानामध्ये गुप्तरीतीने एकांतात छंदोबद्ध पद्धतीने मंत्र प्रदान करतात. वाचकजप केवळ गुरुमुखा पासूनच ऐकावा. इतरानी वाचक जप करूनये. मंत्र दुसऱ्यानां ऐकू जाण्यासारखा केल्यास स्तुती स्तोत्रांत त्याची गणना होते. मंत्राचा सर्वांना परिचय होऊन "अति परिचयादवज्ञादरम्" याउक्ती प्रमाणे मंत्राचा आनादर होऊन निष्ठा कमी होते.

उपांशु जपविधीमध्ये मनाला स्थिर करून आपण उच्चार

करीत असलेला मंत्र अनुलक्षून जप करावयाचा असतो. मन दुसऱ्या वृत्तीकडे गेल्यास मंत्राचा विसर होतो. दुसऱ्याना ऐकू न जाण्या जोगा हळू हळू मुखाने मंत्र जपत असलातरी त्या बरोबर मनाची क्रिया सुद्धा मंत्रात असणे अवश्यक आहे. वाचक जपापेक्षा उपांशुकजप श्रेष्ठ आहे. उपांशुक जपापेक्षा मानसिक जप श्रेष्ठ आहे. मानसिक जपामध्ये वागेंद्रिय व कर्णेंद्रिय याचा उपयोग न होता केवळ मनानेच त्याचा उच्चार होत असतो.

उदा – श्रमजीवी, बुद्धीजीवी यादोघानी समानकाल परिश्रम केले असले तरी श्रमजीवीपेक्षा बुद्धीजीवीच बहुलाभ संपादन करीत असतो. श्रमजीवी एकादिवसाला दहा रुपये मिळवितो. बुद्धीजीवी तेवढयाच वेळांत शंभर रुपये मिळवितो. कालावधी समान असलातरी बुद्धीमध्ये समानता नसल्यामुळे कालामध्ये बुद्धी जितकी जास्त खर्च होते. त्याचे फल देखील ज्यास्तच मिळते. त्याप्रमाणे वाचक उपांशुक जपापेक्षा मानसिकजपामध्ये मनात्मक शक्ती विशेषखर्च होतअसल्यामुळे वाचक, उपांशुक, जपापेक्षा मानसिक जप सहश्र पटीने श्रेष्ठ आहे.

काल द्रव्यामध्ये इच्छा शक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती, मंत्ररूपी साध्यद्रव्या संबंधी जितक्या गूढ (गुप्त) अवस्थेमध्ये स्थिर पावतात. तितक्या जास्त प्रमाणात भाव संग्रह होतो. कर्मयोगामधीलभाव, नामरूपात्मकवृत्तीच्या मनन क्रियेमध्ये नामरूपमय वृत्त्याकार होऊन जाणत असल्यामुळे तो अधो वाहिनी होऊन पूर्व संचित कर्माचे विभाजन करतो. परंतू मंत्रजपामध्ये भाव नामरूपातीत अवस्थेमध्ये स्थिरपावतअसल्यामुळे ऊर्ध्ववाहीनी होऊन भावसंग्रह होणे याला पुण्य संग्रह म्हणतात. जो पुढच्या जन्मी सुख पदार्थांद्वारे विभाजन करण्यासाठी संचय होतो.

मंत्रांतरेषु सिद्धेषु मंत्रएष न सिद्धयति ।
अस्मिन् सिद्धे महामंत्रे तेऽपि सिद्धा भवंतिहि ॥
(चद्र ज्ञानागम अष्टम पटल)

पंचाक्षर मंत्र सोडून इतर मंत्राने त्या त्या मंत्र दैवताचा साक्षात्कार होत असतो. शक्ती त्रयोदशाक्षरी मंत्रानुष्ठानाने भगवती अंबा भवानी मूर्तीचे दर्शनहोते. नारायण आष्टाक्षरी मंत्रानुष्ठ.नाने भगवान विष्णु मूर्तीचे दर्शन होते. अन्य देवाचे दर्शन होत नाही. परंतू पंचाक्षरी मंत्रानुष्ठानाने ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर. सरस्वती, लक्ष्मी, पार्वती आदि सकल देवाचा साक्षात्कार होतो.

सप्तकोटिषु मंत्रेषुः मंत्रः पंचाक्षरो महान् ॥
(सि. शि. मणि पचाक्षर जप स्थल)

सात कोटी मंत्रामध्ये पंचाक्षरमंत्र सर्वश्रेष्ठ आहे. या पंचाक्षर मंत्राने इहलोक, परलोकाचे भोगसुख प्राप्तहोऊन जन्म मरण विरहित मोक्षप्राप्ती होतअसल्यामुळे सातकोटी मंत्राचा हा मंत्र राज म्हणवितो.

इष्टानुसंधानामध्ये "ॐ नमः शिवाय" हा पंचाक्षरमंत्र दहा मात्रानी युक्तआहे. मूल "ॐ„ कार अ, ऊ आणि अनुस्वार (.) या तीन मात्रांचा संगम आहे. "नमःशिवाय,, शद्बामधील विसर्ग सहित मोजल्यास सात मात्रा होतात.

अ, ऊ, (.) अनुस्वार 'ॐ नमः शिवाय, असा पंचाक्षरमंत्र, दहामात्राच्या वर्णरूपांत दिसून येतो.

प्राणानुसंधानामध्ये पंचाक्षरमंत्र घाटी, घुंगरू, वीणा, मृदंग, मेघध्वनी, नगारा, भेरी, घंटा, शंख व टाळ असा दहा प्रकारे नादब्रह्म अंतर्नादरूपाने अनुभवास येतो. आणि

ज्योती रूपांत तारक(*) दंड(----) कुंडल(U) अर्ध चंद्र (◡) दर्पण (▯) ती ज्योती अशा पाच प्रकारे दिसते. मूल प्रकाश पंचाकृती मध्ये अंतर्बहिर्व्यापून ॐ कार स्वरूप दिसतो.

'न' कारस्तारकाकारो 'म' कारो दंडमुच्यते। 'शि' कारः कुंडलाकारो 'वा' कारश्चार्ध चंद्रकः। 'य' कारो दर्पणाकार ॐ कारः पंचवर्णराट्॥ 'न' कार तारकाकृती 'म' कार दंडाकृती 'शि' कार कुंडलाकृती, 'वा' कार अर्धचंद्राकृती, 'य' कार दर्पणाकृती 'ॐ' कारच पंचाकृती होऊन पंच वर्णाला प्रकाशित करतो. हे प्राणानुसंधान होय.

पंचाक्षर मंत्राचा अर्थ पंच म्हणजे पाच, अक्षर म्हणजे नाश रहित, म्हणजे अविनाशी असा परशिव ब्रह्मच पाच प्रकारे अनुभवास येतो. तो पंचाक्षर मंत्रहोय. शुद्ध ज्ञानस्वरूप आत्म्याला भूत, प्राण व भाव आवरणाद्वारे शरीरच मी आहे अशी अहं भावना होऊन शरीराला होणारे जन्ममरण अक्षर स्वरूप आत्म्याच्या ठिकाणी कल्पीत झाल्यामुळे त्याला क्षरत्त्व (नाश) प्राप्त झाले आहे.

पंचाक्षर मंत्राच्या भावानुसंधानामध्ये भावाचा मलविक्षेप होऊन मन, बुद्धी, चित्त व अहंकार याला 'मी' साक्षीभूत आहे असे ज्ञान स्वरूप आत्मज्ञानाने पंच ज्ञानेंद्रियाद्वारे पंचाक्षर स्वरूप होऊन वर्तन करीत असतो. ॐ कार स्वरूप असलेला आत्माच न कार, म कार, शि कार, वा कार, य कार, अशा पंचाक्षर मंत्र रूपाने, न कार त्वगेंद्रिय स्पर्शाद्वारे शीतोष्ण कठिण मऊ जाणतो. म कार रसनेंद्रियाद्वारे रसस्वाद जाणतो. शि कार नेत्रेंद्रियाद्वारे रूप जाणतो. वा कार घ्राणेंद्रियाद्वारे गंध जाणतो. य कार कर्णेंद्रियाद्वारे शब्द जाणतो. असा मूल ज्ञान प्रकाशच

अनंत रूपाने इंद्रियाद्वारे अनुभवास येतो. उदा – पांढऱ्या काचे-वर तांबडा, निळा, हिरवा, पिवळा आदि पंच रंगाचे आवर्ण झाल्यास तो प्रकाश बहिर्भागामध्ये पाच रंगात दिसतो. या प्रमाणे अंतर्भूत असलेली ज्ञान चैतन्य वस्तू एकच असून ती पंच-ज्ञानेंद्रियाद्वारे पंचाक्षर स्वरूपांत वर्तन करते. अक्षर स्वरूप ज्ञान-रूपी अंतरात्मा पंच ज्ञानेंद्रियाला साक्षीभूत असून अकर्मी होऊन पंचाक्षर मंत्र स्वरूपांत चराचर सृष्टीला जाणत असतो. हा भावानुसंधानाचा पंचाक्षर मंत्रजप होय. मूळ परशिव ब्रह्माचे सत्, चित्, आनंद, नित्य, परिपूर्ण, पंच लक्षण. उन्मेषण, विमर्श इच्छा, ज्ञान, क्रिया, पंचशक्ती. सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पु-रुष, ईशान, पंचमुख पंचब्रह्म. ईश्वर, रुद्र, विष्णु, ब्रह्मा पंचदैवत आणि त्यांचे अनुग्रह, निग्रह, लय, स्थिती, सृष्टी, पंचविध कार्य. प्राण, अपान, समान, उदान, व्यान, पंचप्राण. रूप, गंध, रस, शब्द, स्पर्श, पंच विषय. नेत्र, घ्राण, जिव्हा, कर्ण, त्वचा, पंचज्ञानेंद्रिय. पाद, गुद, गुह्य, वाक्, पाणि, पंच कर्मेंद्रिय. आकाश, वायु, अग्नी जल, पृथ्वी, पंचभूत असे पाच पाच प्रतिपादन करीत असलेली चराचर सृष्टी पंचाक्षर मंत्रानेच प्रकाशित झाल्यामुळे चराचर अनंत ब्रह्मांड सर्व पंचाक्षर मंत्र स्वरूप आहे.

मूलं विद्या शिवः शैवसूत्रं पंचाक्षरस्तथा ।
एतानि नाम ध्येयानि कीर्तितानि महामनोः ।।

(सि. शि. मणि पंचाक्षर जप स्थल)

पंचाक्षर मंत्राला मूल विद्या, शिव सूत्र, महामनु असे पर्यायी नावे आहेत. पंचाक्षर मंत्र जीवाला जन्म मरण विरहित जीवन्मुक्ती देणारी मूल ब्रह्म विद्येचा बोध करणारी असल्यामुळे या मंत्राला मूलविद्या म्हणतात. दूर स्थानातून तारेच्याद्वारे

दोन व्यक्ती परस्पर बोलत असतात. त्या उभयतांच्या क्रियेला तार (सूत्र) एक असल्या प्रमाणे या पंचाक्षर मंत्राने शिव जीवाचे ऐक्य होत असल्यामुळे हा पंचाक्षर मंत्र सूत्ररूप आहे. या मंत्राला शिवसूत्र म्हणतात. सप्तकोटीमंत्र इहलोक, परलोक, भोगसुख देणारे आहेत. परंतू पंचाक्षर महामंत्र इह, पर, पारमार्थ त्रिविध सुखाचा अनुग्रह करणारा आहे. म्हणून या पंचाक्षर मंत्राला महामंत्र म्हणतात.

पंचाक्षर मंत्राचे अधिदैवत पंचब्रह्म सदाशिवमूर्तीचे मनांत स्मरण करीत मंत्रजप करावा. अथवा अनुगृहित गुरु मूर्तीचे पादकमल स्मरणकरीत जपकरावा अथवा पंचाक्षरमंत्राचे एकेक अक्षर क्रमाने भावनेत स्मरण करीत जपकरावा. अथवा शिवलिंगाला निरीक्षण करीत जप करावा. अंगावर शिवलिंग धारणा असून अंतर्भागांत शिवमंत्राचा जप चालत असल्याने आतील व बाहेरील अनुष्ठानाद्वारे भवित्रदोष परिहार होतो. दररोज पंचाक्षर मंत्र जपावा. आपला कर्मयोग प्रपंच चालवीत शुची अशूची ही भावना न करीता अखंडपणे मानसिकजप करावा. दररोज आपल्या दैनंदिन क्रमात कनिष्ठ तीनतास जपानुष्ठानासाठी वेळ देत जावा. या पासून मानसिक शांती लाभत असते. पूजा अनुष्ठाना करीता स्थान, आसन, बेल, फूल आदि पूजा द्रव्य पाहिजेत. संचित कर्मांच्या प्रादुर्भावामुळे विशेष वेळ मिळत नसल्यास निदान एक मुहूर्त (चोवीस मिनीट) वेळ पूजानुष्ठानासाठी अचूकपणे देतजावा. मानसिक, श्रमजीवी, लेखक, शिक्षक, उपदेशक, वकील, न्यायाधीश आदि लोकाना आपल्या कर्मयोगाबरोबर मानसिक मंत्रानुसंधान चालविणे अशक्य असते. स्वतंत्र वेळघेऊन त्यांना जप करावालागतो.

परंतू श्रमजीवी, शेतकरी. कर्मचारी. मजूर आदि कर्मयोग प्रपंचा-बरोबर आपल्या मनांत मंत्रानुसंधान अखंड चालवूशकतील या साठी हे श्रमीक लोक अतिसूक्ष्म दैवीसंपदा प्राप्त करण्यासाठी वरिष्ठ दर्जाचे आहेत. मंत्रानुसंधानामुळे दोन निमिष मंत्रातसहज समाधी लागल्यास मंत्राधिपति पंचब्रह्म सदाशिवदेवाचा साक्षात्कार होतो. हा पंचाक्षर मंत्र अभिमुख होण्यासाठी सातकोटी मंत्रजप करावा लागतो. पंचब्रह्म सदाशिवमूर्ती भक्तावरोबर बोलत नाही. तोच देव गुरुमूर्ती रूपांत दर्शनदेऊन भक्ता बरोबर बोलत असतो. दोन कोटी जप पूर्ती झाल्यानंतर प्रथम स्वप्नावस्थेंत मूर्तीचे दर्शन होते. आणि क्रमेण जपानुष्ठानकाली मंत्रात देहभाव विसरल्याप्रमाणे होतो. जागृत अवस्थेंत देखील सृष्टीची बहिर्प्रवृत्ती विसरताच गुरुमूर्तीच्यारूपाने अथवा दुसऱ्या देवाच्या रूपाने प्रत्यक्ष दर्शन होते. पुन: देहभानावर येताच मूर्ती अंतर्धान पावते. आणि उठता, बसता. पहाता. धरता व सोडता सर्व कर्मयोगांच्या सृष्ट वस्तूमध्ये प्रत्यक्ष मूर्ती दर्शन देत असते. सप्तकोटी मंत्रानुष्ठानाच्यापूर्ती नंतर अनुगृहित गुरूच्यारूपाने दर्शन होते. शिवच गुरुरूपांत दर्शन देत असल्यामुळे भक्ताच्या इच्छापूर्तीसाठी गुरु दैवत समर्थ असते. योग व अध्यात्म विद्येचा प्रयोग सुद्धा त्या गुरुमुर्तीद्वारे साधक जाणू शकतो. ह्या मंत्रानुष्ठानाने आगोचर दिव्य शक्ती प्राप्त होते. भूत, प्रेत, पिशाच्च, ब्रह्मपिशाच्च सर्पविषबाधा नाना रोगाचे गंडांतर व दुर्मरणाच्या परिहारासाठी भस्म अभिमंत्रून प्रदान केल्यास सर्व परिहार होतो. परंतू या लोक प्रवृत्तीमध्ये मंत्रानुष्ठान शक्तीचा उपयोगकेल्यापासून पुण्यक्षीण होऊन देवाचा साक्षात्कार नाहिसा होतो. इतकेच नव्हे तर दैवीकोपामुळे आयुर्बलादि पुण्य धन सर्व नाश पावते.

या करीता मंत्रानुष्ठान तत्पर साधकाच्या पूर्णावस्थेला पोहोंचे-पर्यंत कीर्ती, मान सन्मान आदि लोकेषण मोहाला बळी न पडता आपल्या साधनाव्यतिरिक्त अन्यत्र लक्ष न देता सावध पणाने वर्तन करावे.

– जपकालातील निषिध्द आचरण –

शिलासन, काष्ठासन, भूम्यासन व चर्मासन ही सर्व निषिद्ध आहेत. घोडयावर, मंचकावर बसल्यावेळी, अंगरखा, टोपी, रुमाल धारण केल्या वेळी, नग्न असल्यावेळी, डोके खाजवीत, केस विचरीत असता जपमालाधरून जपकरूनये. जपकाली आपान वायु सोडल्यास पाण्याने आचमन करावे. मूत्र विसर्जन तांबूल भक्षण, इतर विषय सेवन केल्यावेळी तसेच गुद, गुह्य स्थानास स्पर्श केला असता शुचिर्भूत झाल्या खेरीज जपमालाद्वारे जपकरूनये. गडबडीने जप करू नये.

– जप कालांतील उपयुक्त नियम –

दर्भासन, तृणासन, पर्णासन, (पान) चित्रासन, श्वेतकंबलासन, वल्कलासन व श्वेतवस्त्रासन ही उत्तम आहेत. चौऱ्याऐंशी योगासना पैकी सिद्धासन, पद्मासन, स्वस्तिकासन व सुखासन ही चार आसने श्रेष्ठ आहेत. मोक्षापेक्षी साधकाकरीता पूर्व व उत्तर दिशा उत्तम आहेत. भोगापेक्षी साधकासाठी पश्चिम दिशा आहे. शत्रु नाशाकरीता दक्षिण दिशा आहे. निर्विकार होऊन स्थिर चित्ताने मौन धारण करून इंद्रिय संयमाने व सरळ शरी-राने ध्यानमुद्रा समन्वित होऊन भस्म, रुद्राक्षादि दैवी अलंकार धारणकरून स्फुट मंत्रोच्चार पूर्वक छंदोबद्ध मंत्राक्षराचे स्मरण करीत जप करावा.

– पंचाक्षर महा मंत्रानुष्ठान प्रयोग –

जप साधनेला रुद्राक्षमाला आवश्यक आहे. रुद्राक्ष अतिमोठा अतिलहान व किडका फुटका नसावा. दुसऱ्याने धारण केलेला नसावा. एका मालेंत वेगवेगळ्या मुखाचे रुद्राक्ष असू– नयेत. गोल, कांतीमय, सुंदर, वजनदार, एकाकृती व ते नूतन असावेत. सोने, चांदी, पितळ, तांब्याच्या तारेने गुंफलेले अथवा शुद्ध सुताच्या दोरीने मालिका क्रमाने रुद्राक्षमाला तयार करावी. रुद्राक्षमालेत मुखाला मुख बुडाला बुड या प्रमाणे ओवून प्रत्येक रुद्राक्षाच्यामध्ये रुद्रगाठ असावी. अशी एकशे आठ मण्या- चीमाला असावी. आणि त्यावर शिखा, मणि वेगळा असावा.

सप्तकोटी पंचाक्षर मंत्राचे अनुष्ठान करणाऱ्या साध- काने जनवस्तीपासून कनिष्ठ एक मैलाच्या अंतरावर आंबा, शमी, बिल्व, पारिजात, वड, पिंपळ, उंबर, चंदन आदि पुण्य वृक्षालंकृत रम्य व जलाशय युक्त निर्जन निर्भय व निरुपद्रवीअशा पवित्र स्थानामध्ये एक पर्ण शाला तयार करावी. जितेंद्रिय राहून एक वस्त्र परिधान करून, तृणासन शयन होऊन, तिखट,आंबट, पदार्थाचा त्याग करून एकान्न एकभुक्त व प्रत्याहार युक्त असावे. अथवा दुग्धाहार किंवा फलाहार करावा. प्रातःकाल सायंकाल व मध्यान्ह अशा तीन वेळा जलस्नान करून अखंड मौन व्रती राहून दुसऱ्याकडून सेवा न घेता स्वयमेव आपल्या पूजानुष्ठानाची सिद्धता करून घ्यावी. सिद्धासने किंवा सुखासना- मध्ये बसून मानसिक जप सावकाश दररोज दहा हजार करावा. याप्रकारे वीस वर्षं अनुष्ठान केल्यास सात कोटी पंचाक्षर मंत्राचे अनुष्ठान पूर्ण होते.

पंचाक्षर महा मंत्र महिमा

पंचाक्षर महामंत्रो दृश्य पापं विनाशयेत् ।
पंचाक्षर महामंत्रो दुष्टमंत्रां विनाशयेत् ॥१॥
पंचाक्षर महामंत्रो देहदोषं विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रो जन्म पापं विनाशयेत् ॥२॥
पंचाक्षर महामंत्रो मृत्युपाशं विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रो व्दैत दुःखं विनाशयेत् ॥३॥
पंचाक्षर महामंत्रो भेद बुद्धि विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रश्चिंता दुःखं विनाशयेत् ॥४॥
पंचाक्षर महामंत्रो बुध्दि व्याधि विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रश्चित्तबंधं विनाशयेत् ॥५॥
पंचाक्षर महामंत्रस्सर्व व्याधीं विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रस्सर्व शोकं विनाशयेत् ॥६॥
पंचाक्षर महामंत्रः कामादीन्नाशयेत्क्षणात्
पंचाक्षर महामंत्रः क्रोध शक्तिं विनाशयेत् ॥७॥
पंचाक्षर महामंत्रश्चित्त वृत्तिं विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्रस्संकल्पादीन् विनाशयेत् ॥८॥
पंचाक्षर महामंत्रः कोटि दोषं विनाशयेत्
पंचाक्षर महामंत्र स्सर्वतंत्रं विनाशयेत् ॥९॥
पंचाक्षर महामंत्र स्सर्वांस्तान् मोक्ष यिष्यति ।
पंचाक्षर महामंत्रो ज्ञानानंदं प्रयच्छति
सप्त कोटि सर्वमंत्रं जन्मकोटि शतप्रदम् ॥१०॥
सर्व मंत्रान् समुत्सृज्य एतं मंत्रं समभ्यसेत्
सद्यो मोक्षमवाप्नोति नात्र संदेहमण्वपि ॥११॥

– पंचाक्षर महा मंत्र काम्यानुष्ठान प्रयोग –

आयुर्वृद्धीसाठी – पर्वताच्या अग्रभागी वासकरून एकलक्ष पंचाक्षर महा मंत्राचा जप करावा. अथवा महानदीच्या तटाकी बसून दोन लक्ष जप करावा आणि वट (वड) वृक्षाखाली प्रतिदिन दहा हजार मंत्र जप आकरा दिवस करून शेवटी हरळी, किंवा तीळ, या कोणत्याही वस्तूचा उपयोग करून होम करावा.

विद्या प्राप्तीकरिता – सूर्योदयापूर्वी आपले नित्य विधी आटोपून पलाश (पळस) पात्रात गो भस्म गोघृत अथवा पंच गव्य (गोमुत्र गोमय, गोक्षीर,गोदधी, गो घृत,) कोणतेही आपल्या इच्छे प्रमाणे संग्रह करून हस्त स्पर्श करीत १००८ वेळा मंत्रवून प्रसादरूपाने चार महिने त्याचे सेवन करावे.

अकाल मृत्यु परिहाराकरिता – अश्वत्थ (पिंपळ) वृक्षा खाली बसून दोन लक्ष मंत्र जप करावा. अथवा अश्वत्थ वृक्षाला हस्तस्पर्श करीत प्रतिदिन एक हजार याप्रमाणे एक लक्ष जप करावा.

सकल व्याधी परिहारासाठी – सूर्याच्या सम्मुखी बसून एक लक्ष जप करावा. अथवा नदीच्या जलाने भरलेल्या कुंभाला हस्तस्पर्श करून दहा हजार मंत्राने मंत्रवून त्या मंत्रमय जलाने चार महिने प्रतिदिन स्नान करावे. नंतर अर्क (रुचकी) पुष्पाचा अथवा पलाश (पळस) पुष्पाचा होम करावा.

सकलैश्वर्य प्राप्तीसाठी – बिल्व वृक्षाखाली बसून प्रति दिन दहा हजार मंत्र जप आणि बिल्व कुसुमाचा एकशे आठ होम याप्रमाणे एकशे आठ दिवस करावा.

शत्रुनाश करिता – चंद्र सूर्य ग्रहण समयी समुद्र गामिनी नदीत उपवास पूर्वक शुचिर्भूत होऊन ग्रहणान्त काला पर्यंत एक तोळा ब्राह्मी रसाला दहा हजार मंत्राने अभि मंत्रवून प्रसाद रूपाने

सेवन करावे.

सर्व लक्षण संपन्न पुत्र प्राप्तीसाठी – प्रति दिन दहा हजार जपा प्रमाणे आकरा लक्ष जप करून शेवटी छिद्र रहित पलाश पुष्पाचा एक लक्ष होम करावा.

नक्षत्र ग्रह पीडा निवारणा करिता -पलाश कुसुमाने प्रतिदिन १००८ होम विधिपूर्वक आकरा दिवस करावा.**चिंतित कार्य सिध्दीसाठी** सूर्य चंद्र ग्रहणा समयी लिंगाची षोडशोपचाराने पूजा करून त्या लिंग सन्निधीत एक हजार जप करून एकशेआठ वेळा होमकरावा.

दुःस्वप्न परिहारासाठी –दहा हजार जप दररोज करावा.व गो घृताच्या एकशे आठ आहुतिने एक्के चाळीस दिवस होम करावा.

चिंता परिहारासाठी – प्रतिदिन अन्नोदक एकशे आठ वेळा पंचाक्षर मंत्राने मंत्रवून प्रसाद रूपाने सेवन करावे.

अंतर्नाद सिद्धीसाठी – मध्य रात्रीच्या समयी प्राणायाम विधीपूर्वक प्रतिदिन पंचाक्षर मंत्राचा एक हजार जप या प्रमाणे एक्के चाळीस दिवस अनुष्ठान करावे.

तेजोमय बिंदु दर्शनासाठी – मौनव्रत, प्रत्याहार, विषयसंय्यम, पद्मासनयुक्त प्राणायाम विधी पूर्वक डोळे मिटवून भ्रूमध्ये अंतर्दृष्टी ठेवून प्रतिदिन मध्यरात्री तीनहजार पंचाक्षर मंत्राचा जप करावा. या नियमाने एक लक्ष जपानुष्ठान करावे.

काम्य अनुष्ठानामध्ये एक लक्ष जप केल्यास त्याच्या दशांश भाग दहा हजार मंत्र जप तर्पणरूपाने करावा. तर्पण जपाच्या दशांश एक हजार होम विधी करावा. त्या होमाचा दशांश भाग शंभर माहेश्वर किंवा ब्राह्मणास अन्न संतर्पण करून त्याना दक्षणा व तांबूल द्यावा. जपानुष्ठान स्वतः करणे अतिउत्तम तसे शक्य नसल्यास सच्चारित्र्य पुरोहित लोकाकडून

करविणे. जपानुष्ठानाची पूर्णता होई पर्यंत यजमान व पुरोहित उभयतानी ब्रह्मचर्य वृताचे पालन करावे.

काम्य अनुष्ठानांत मल मूत्र संस्कार नसलेल्या आणि शुभा शुभ कोणत्याहि कामात उपयोग न केलेल्या नित्य धूत, नतन वस्त्राचा उपयोग करावा. रेशमाचे सोवळे अथवा वल्कल-वस्त्र धारण करावे, ह्या क्रमाप्रमाणे अनुभवी गुरु मुखाने जाणून काम्यानुष्ठानांत किंचित ही कमी जास्त न होऊ देता आचरण करावे. नसता मंत्र दैवताचा कोप होऊन नुकसान होते. इच्छित कार्य फलद्रूप होत नाही.

– राष्ट्र शांती प्रीत्यर्थ पंचाक्षर महा मंत्र जप यज्ञ प्रयोग –

जप यज्ञाचा उद्देश हा आहे की पूजा, जप व ध्यानाचे प्रयोगात्मक शिक्षण मानव समाजाला मिळावे आणि त्या योगे राष्ट्रात पुण्य समृध्दी होऊन शांती प्रस्थापित व्हावी. "यज" (धातू) चा "यज्ञ' होतो.म्हणजे पूजा करणे,जपकरणे, दान करणे असा अर्थ होतो. दुसरा अर्थ समर्पण करणे असा होतो.

"चक्षुर्यज्ञेन कल्पताम्" । श्रोत्रंयज्ञेन कल्पताम् । वाग्यज्ञेन कल्पताम् मनो यज्ञेन कल्पताम् । (यजुर्वेदरुद्रसूक्त चमकाध्याय)

पुत्र, दारा, धनादिक भोग प्रवृत्तीत अनंतरूप पाहाणाऱ्या ढोळ्याना ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, शिवलिंग, गुरु आदि देवांच्या दर्शनाच्या कामी उपयोग करणे हा नेत्र यज्ञ आहे. कर्म योग प्रपंचातील भोग पदार्था संबंधीचे अनंत शब्द ऐकणाऱ्या कानाला ईश्वराचे नामजप, व नामसंकीर्तन ऐकण्याच्या कामी उपयोग करणे हा कर्ण यज्ञ आहे. भोग प्रपचांत बोलण्याच्याकामी उपयोग होणाऱ्या वाणीचा ईश्वराच्या नाम जपाचा व तीर्थ प्रसाद सेवन करण्याच्या कामी उपयोग करणे हा वाग्यज्ञ (तोंड) आहे.

भोगविषयाच्या चिंतन करणाऱ्या मनाला ईश्वर ध्यानांत तन्मय होऊन समर्पण करणे हा मनोयज्ञ आहे. सारांश सर्व इंद्रिये ईश्वर सन्निधीत समर्पण करणे यालाच "यज्ञ" ही संज्ञा आलेली आहे.

कांही प्रयोगांत अग्नी पूजेला, अग्न्याहुतीला प्राधान्य देऊन होम कुंडात घृत, चंदन, कर्पूर, दर्भ, दही–दूध व मध आदि अनंत विध समिधा द्रव्य समर्पण करण्यांत येतात. अश्वमेध, पौंडरीक राजसूय, ज्योतिष्टोमयाग, चंडीहोम, गायत्रीहोम, मृत्युंजयहोम, प्रायश्चित्त होम, ईत्यादि अनेक व्रतविधान आहेत हे सर्व बर्हिविधान होत.

यावंतः कर्मयज्ञाद्या व्रतदानतपांसि च ।
सर्वे ते जपयज्ञस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥

(सि. शि. मणि पंचाक्षर जपस्थल)

ज्योतिष्टोमादि यज्ञ आणि व्रत, दान, तपादि सर्व या जपयज्ञाच्या सोळाव्या अंशाची ही बरोबरी करू शकणार नाहीत.

"यज्ञानां जपयज्ञोऽस्मि" (भगवद् गीता अध्याय १०)

सर्व यज्ञामध्ये जपयज्ञ माझे रूप आहे.

विधीयज्ञा पाकयज्ञा ये चान्ये बह्वो मखाः ।
सर्वे ते जपयज्ञस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥

(बृहत्पाराशरी स्मृति व्दितीय अध्याय)

विधीयज्ञ पाकयज्ञ, अशा अनेक प्रकारच्या सर्वयज्ञे जपयज्ञाच्या सोळाव्या अंशाची देखील बरोबरी येऊ शकणार नाही. असे अनेक प्रमाणावरून जपयज्ञच सर्व श्रेष्ठ आहे म्हणून सिद्ध होते.

जपाचा उच्चार करताना वायु व आकाश या दोन तत्त्वाच्या संघर्षाने ध्वनीची उत्पत्ती होते. मंत्र जपताना वायु व

आकाशांत साधकांचा ऊर्ध्वं भावभक्तीचा उपयोग होत असल्यामुळे "जपयज्ञ" ही अंतर्क्रिया आहे. वायुतत्त्व प्राणतत्त्वापासून उत्पन्न झालेले आहे. जपाच्या प्रयोगाने साधकाचे भाव व प्राण परिशुद्ध होतात.

सामूहिक लोक संघशक्तीच्याद्वारे शुभसंकल्पात मानव धर्माचा प्रचार व्हावा व विश्वशांती व्हावी, या व्यापक भावनेत उपयोग केल्या जाणाऱ्या ईश्वर प्रणिधानाला यज्ञ म्हणतात. यज्ञ अनेक भक्त लोकांची सामुहिक क्रिया असल्यामुळे व्यापक सृष्टींतील भाव, प्राण परिशुद्ध होतात. त्यायोगेकरून युद्ध, भूकंप, झंझावात, अतिवृष्टी, अनावृष्टी, अकालवृष्टी, विषवृष्टी, अन्नाभाव, जलाभाव व वस्त्राभाव होऊन नानाविध दुःख दारिद्र्य, पीडा, भय, व्याधी आदि द्वारे निसर्गाचा कोप न होता राष्ट्रांत प्रेमसमृद्धी, धर्मसमृद्धी, सुप्रजासमृद्धी, सकलैश्वर्यप्राप्त होऊन मानव जातीत एकात्मभाव, सर्वात्मभाव, ऐक्यभाव होऊन सुख शांती व्हावी या महान उद्देशाच्या पूर्तीसाठी जपयज्ञ करणे अत्यंत अवश्यक आहे.

राष्ट्रांतील सर्व जनतेला सकलैश्वर्य प्राप्त व्हावे या उद्देशासाठी प्रति वर्ष पंचाक्षरी महा मंत्राचे हजारो जपयज्ञ लहान मोठ्या प्रमाणांत गावोगावी व्हावेत अनेक महायज्ञापासून सामूहिक लोकांचे पापक्षालन होऊन प्रकृतीमध्ये प्राण शुध्दी होते. त्या पासून प्रकृती नियमाधीन असलेला पावसाळा, हिवाळा, व उन्हाळा, ह्यांचे योग्य वेळी आगमन होऊन राष्ट्राचे संरक्षण होते. जपयज्ञाद्वारे प्रजाजनाला पूजा जपाचे शिक्षण मिळत असल्यामुळे ते धर्माचरण तत्पर होतात. यासाठी महा आचार्यांनी जपयज्ञ करावेत. त्यापासून भक्तवृंदाना इह लोक व परलोक

सुख प्राप्त होऊन जन्म मरणरहित शाश्वत मोक्षाची प्राप्ती होते. आणि राष्ट्रांत व्यापक सुखशांती नांदते.

— जप यज्ञ साधकांचे नियम —

१) यज्ञ शाळेत पंधरा वर्षावरील वयाच्या साधकास प्रवेश असावा व मिळावा. २) साधकांत स्त्री व पुरुष किमान निम्मे निम्मे असावेत. ३) स्त्री साधकानां प्रवेश देण्यासाठी त्यांच्या पालकाकडून लेखी सम्मती घ्यावी. ४) स्तनपान करणारे तान्हे मुल असलेल्या स्त्रीयानां प्रवेश देवूनये. ५) स्त्रीयांनी टेरीन टेरी-कॉट, काळे लुगडे आणि चोळी तसेच बहुमोल जरी रेशमी पितांबर धारण करूनये पांढरे पातळ व चोळी उपयोगात आणावी. ६) पुरुषानी पायजमा, प्यांट, टोपी, रुमाल, घालूनये. पांढरे धोतर अथवा पंचा नेसावा. ७) स्त्री पुरुषानी यज्ञ पूर्ती होईपर्यंत ब्रह्मचर्य वृताचे पालन करावे. ८) साधक अशक्त रोगी नसून आरोग्य संपन्न असावा. ९) यज्ञ शाळेत, बीडी, सिगारेट, चहा, पान, तंबाखू सेवनकरूनये. १०) यज्ञपूर्ती होईपर्यंत पुरुष साधकानी क्षौर करूनये. ११) जप यज्ञाच्या तपोभूमीत पादत्राण घालून कोणीही फिरुनये. १३) मानव धर्माचा विजय असो. धर्मानेच विश्वाला शांती, हा जय घोषच कार्यारंभी व शेवटी करावा. १४) साधक मद्यपान मांसभक्षण निषिद्धाचार रहित असावा. १५) यज्ञ प्रारंभ होण्यापूर्वी तीन दिवस आणि यज्ञ समाप्ती नंतर एक दिवस यज्ञ संस्थेच्या स्वामित्वांत साध-काना राहावे लागेल. त्यानी सीमा उल्लंघनकरूनये. संसार बंधनात राहूनये. १६) जपयज्ञ व्रताचा स्वीकार केलेल्या साधकाना आकस्मिकपणे जनन सूतक मरण सूतक, रजसूतक कोणत्याही सूतकाचा योग आल्यास सूतक नाही. कारण ते देवाच्या

सन्निधानांत सदा शुची असतात. १७) लिंग अथवा यज्ञोपवीत न धारण केलेल्या साधकानी सोने, चांदी, अथवा तांबे आदि धातु निर्मित ॐ काराची पूजा करावी. १८) जपसाधक गुरूला शरण जाऊन मंत्रदीक्षा घेतलेला असावा. १९) जप यज्ञात भाग घेणाऱ्या साधकाकडून प्रतिज्ञापूर्वक लेखी प्रवेश पत्रिका घ्यावी. २०) ऊन, वारा, पाऊस, याची बाधा न होईल असा यज्ञ मंडप सुरक्षित असावा. २१) यज्ञाचा सभापति म्हणून शिवलिंगाची स्थापना करावी. २२) यज्ञ शालेवर हिरवा, तांबडा, पांढरा, निळा, पिवळा, अशा पंचवर्णी ध्वजारोहणकरून यज्ञ कार्यास प्रारंभ करावा. २३) साधकाने सुखासनात बसण्याजोगे दीड फूट रुंदी दोन फूट लांबीचे दर्भासन, तृणासन, पर्णासन, श्वेत-कंबलासन, व वल्कलासन, या पैकी कोणत्याही असनाचा उपयोग करावा. २४) जपकाली पुरुषानी पुढे रांगेत बसावे. स्त्रीयानी मागे बसावे. अनुष्ठान पूर्ती होईपर्यंत निश्चित एका स्थानीच बसावे. २५) सूर्योदय व सूर्यास्त यापुण्यकाली जपाचेकार्य चालू असावे. २६) तुलशी, चंदन, बेल, अथवा मोती, पवळे, शंख स्फटिक, व रुद्राक्ष, या पैकी कोणतीही एक माला असावी. जप मालेचेमणी अतीलहान अतीमोठे नसावेत. बोरांच्या बीया एवढे असावे. एकशे आठ मण्याची कोणतीही जप माला असो त्याच्या वरचा शिखा मणी मात्र रुद्राक्षाचा असावा. २७) अंगा-वर सदा एक रुद्राक्ष धारण कारावा. २८) अनुष्ठानासाठी लाग-णारे सर्व पूजा साहित्य प्रत्येकाचे स्वतंत्र असावे. २९) यज्ञसाध-काने जल, भस्म, पत्र, पुष्प, धूप, या पंचोपचारानेच पूजा करावी ह्या साधन सामुग्री साधकाना आणणे शक्य नसल्यास यज्ञ संस्थे-कडून प्राप्त व्हाव्यात. ३०) मंत्रानुष्ठानाचा पुण्यांश राष्ट्राच्या

योग क्षेमासाठी व विश्व शांतीसाठी या शुभ संकल्पाने प्रत्येक साधकाने समर्पण करावा. २९) मंत्राचा उच्चार सावकाश करीत एक मंत्र म्हणून एक मणी ओढावा. ३०) उपस्थिती पत्रिकेत साधकानी आपल्या जपाची नोंद करावी. ३१) दीक्षा संपन्न भक्ताकडून स्नान शुचिर्भूतपूर्वक यज्ञपाक तय्यार व्हावा. ३२) जपाच्या पूर्तीनंतर महा मंगलारती व्हावी व आचार्यांच्या कडून तीर्थ प्रसाद घ्यावा. ३३) दुपारी एक तास आचार्याकडून उपदेश श्रवण करावा. ३४) जप यज्ञ साधकानी रात्री झोपते वेळी अंथरूणावर बसून हात जोडून "ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, पंचाचार्याः मां रक्षंतु" असे म्हणून नमस्कार करून झोपावे. पुनः प्रातःकाळी उठताच अंथरूणावर उठून बसल्यास्थानीच "ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, पंचाचार्याः प्रसीदंतु" असे म्हणून लिंगधारी लोकानी शिवलिंगाला, यज्ञोपवीतधारी लोकानी ब्रह्मगाठीला इतर लोकानी हृदयाला स्पर्श करून नमस्कार करावा. ३५) यज्ञ पति शिवलिंगाला सुवासिनीकडून पवित्रस्थानाहून गंगाजल मंगल-वाद्यासहित आणून सहश्र कुंभाभिषेकाव्दारे महापूजाकरावी. ३६) जपसाधकानी आपले नित्यकर्मानुष्ठान आटोपून त्यानंतर यज्ञ संकल्पातील जप करावा. ३७) जप साधकानी परस्पर प्रेम शांती व विनयाने वर्तन करावे. ३८) जपानुष्ठानाच्या वेळा-शिवाय इतर वेळांत शरीर शुद्धीसाठी अवश्यक सेवा समर्पण करावी. हास्य, विनोद, श्रृंगारिक विषय याचीं चर्चाकरून वेळ गमावू नये. ३९ यज्ञ मंडपांत ब्रह्मादि देवांचे व आचार्यांचे भावचित्र लतापल्लवानी सुशोभित करावे. ४०) जपसाधकांच्या निवासासाठी वेगळी व्यवस्था असावी. ४१) जलबाधा न होण्या-साठी पवित्र नदिच्या काठी अथवा संगमावर किंवा सरोवराच्या

तटाकी यज्ञ करावा. ४२) आचार्यांचे सम्मुखी स्त्री-पुरुष साधकानी वेगवेगळच्या रांगेत हात जोडून उभेराहावे. आचार्यांनी आपल्या अमृत वाणीने गुरुगीत, राष्ट्रगीत, धर्मगीत, ईशगीत म्हणावे. त्यांचे मागे सर्व साधकानी म्हणावे. ४३) करन्यास, देहन्यास, अंगन्यास विधी आचार्यांनी सर्वांना सांगावेत त्याप्रकारे मागाहून सर्वांनी उच्चार करीत न्यास विधीची पूर्तता करावी.

सप्तकोटी पंचाक्षर महा मंत्राच्या पूर्तीला पंचाक्षर जपयज्ञ म्हणतात. सात कोटी मंत्राचा दशांश म्हणजे सत्तर लक्ष तर्पण जप करावा. तर्पण जपाचा दशांश म्हणजे सातलक्ष होमस्वाहाकार करावा. त्या होमाचा दशांश म्हणजे सत्तर हजार लोकाना (साधका व्यतिरिक्त) अन्न संतर्पण करावे. त्या अन्नसंतर्पणाच्या समान दक्षणा द्यावी.

सातकोटि जपाच्या!पूर्तीसाठी एक हजार जप साधकानी दररोज प्रत्येकी पाच हजार यज्ञजप आणि पाचशे तर्पण जप या प्रमाणे चवदा दिवस केल्यास सातकोटी यज्ञजप आणि सत्तर लक्ष तर्पण जप अशा प्रकारे जपाची पूर्ती होते. शंभर पुरोहितानी दररोज प्रत्येकी पाचशे प्रमाणे स्वाहाकार विधी करावा चवदा दिवसांत सात लक्ष होमाची पूर्ती होते. अथवा सात कोटी जपाच्या पूर्तीसाठी एक हजार दोनशे पन्नास जप साधकानी प्रातः सायं. दोन्ही वेळा मिळून आठ हजार यज्ञजप आणि आठशे तर्पण जप या प्रमाणे सात दिवस केल्यास सात कोटी यज्ञजप आणि सत्तर लक्ष तर्पणजप अशाप्रकारे जपाची पूर्ती होते. आणि शंभर पुरोहितानी दररोज एक हजार स्वाहाकार (आहुती) करावा. सात दिवसात सात लक्ष होमाची पूर्ती होते. किंवा एकेक कोटीचे सात जपयज्ञ वेगवेगळच्या ठिकाणीही करून सात कोटी जपाच्या

महायज्ञाची पूर्तता करता येते. होमांत गोक्षीर, गोघृत आणि पळ-शाच्या फुलाची अथवा बेलाच्या फुलाची आहुती द्यावी.

किमिह बहुभिरुक्तैर्मंत्रमेनं महात्मा ।
प्रणवसहितमादौ यस्तु पंचाक्षराख्यम् ॥
जपति परमभक्त्या पूजयन् देव देवम् ।
सगतदुरितबंधो मोक्षलक्ष्मीं प्रयाति ॥
(सि. शि. मणि पंचाक्षर जप स्थल)

पर्वतामध्ये मेरु पर्वत, नद्यामध्ये गंगानदी, पशूमध्ये गाय, मण्यामध्ये कौस्तुभमणि, धातूमध्ये सुवर्ण सर्वश्रेष्ठ असल्याप्रमाणे सकल मंत्रामध्ये मंत्रराज शिवपंचाक्षर महामंत्र आहे. याचा महिमा अगणित, अपार असून त्याचे वर्णन कितीही केले तरी थोडेच आहे. जे ॐकार सहित पंचाक्षर मंत्राचा जप करीत शिव-लिंगाची पूजा करतात त्यांचे पाप क्षालन होऊन इह पर सौख्य लाभून अखेर त्यांना मोक्षलक्ष्मी प्राप्त होते.

– पादोदक आणि प्रसाद –

प्रकृती माता पृथ्वीवर असलेल्या जड चेतन सकल जीवाच्या पानासाठी मेघ मंडळाच्या ऊर्ध्व स्थानांतून जलश्राव करीत असते. पशूच्या गर्भात वासकरून राहिलेल्या पिंडाला त्याच्या आईने सेवन केलेले अन्नोदक नाळद्वारे प्रदान होतात. तो पिंड जन्मल्यानंतर वात्सल्य भावनेत पशू आपल्या वासराला अमृतप्राय दूध अनुगृहितभावनेत अधोमुखी होऊन श्राव करीत असते.

मानव जीव पिंडरूपांत आईच्या गर्भात वासकरून असल्यावेळी आईने सेवन केलेले अन्नोदकच त्यापिंडाच्या रक्षणा-साठी प्रदान होते. तोपिंड जन्मल्यानंतर आईच्या वात्सल्य-

भावनेत स्तनाग्रापासून ती आपल्या शिशूला अमृत प्राय दुधाचा अनुग्रह करते. शिशू ऊर्ध्वमुखी होऊन क्षीरामृत पानकरते. आणि बाल्य जीवनांत आई आपल्या पवित्र हाताने गो क्षीरादि नाना विध अन्न रसाचा अनुग्रह करीत असते. आईच्या पवित्र हाताने अन्नोदक ऊर्ध्व भावनेत सेवन करतो. मोठा झाल्यावर अधो भावनेत आपल्या हाताने अन्नोदक सेवन करित असतो. मानव जन्मतः आपल्याहून श्रेष्ठ पूज्य असलेल्या आई बापादिकाच्या हाताने ऊर्ध्व भावनेत अन्नोदक सेवन करून शरीर समृद्ध करणे स्वाभाविक आहे. परंतू कर्तृत्वशील झाल्यावर आपल्या पुत्र, पत्नी, भगिनीकडून अधोभावनेत अन्नोदक स्वीकार करीत असतो. त्या पासून शरीर संरक्षण होतअसलेतरी भाव, प्राणामध्ये भवित्व दोष उत्पन्न करणारा आहे. यासाठी आपल्याहून पूज्य व श्रेष्ठ असलेल्या आचार्य अतिथी ईश्वर व देवाकडून अनुग्रहीत भावनेंत प्राप्त करून तीर्थ प्रसाद रूपाने सेवन केल्यास भाव प्राणामध्ये परिशुद्धता येते. अन्नोदक सकल प्राण्याच्या रक्षणासाठी अवश्यक वस्तू आहे. त्या पासूनच संतती बीज उत्पन्न होते. त्या मुळे सर्व जिवांचा जन्म होतो. अन्नोदक जड वस्तू असली तरी त्यामध्ये प्राण भावाचे चैतन्य कण अत्यंत गूढ अवस्थेत आहेत. त्या कारणाने अन्नोदक सेवन करण्यापासून शरीर, प्राण, भाव, सर्व वस्तू रक्षण पावून सर्वदा कार्यक्षमतेमध्ये तत्पर होतात. सकल चराचर प्रपंच अन्नोदकापासून जन्मघेऊन नानाप्रकारे रूप धारण करून, जगून अखेर अन्नोदकाच्या मूल असलेल्या पंच भतातच लय पावतात.

सृष्टीचे विविधजीव विविध प्रकारचे अन्नोदक सेवन करीत असतात. रोग काली वटी, गुटी, आसव, अरिष्ट चूर्णादि

अनेक विध औषधे रोग परिहारार्थ अन्नोदका प्रमाणेच आहेत. दूध, दही आदि स्निग्ध पदार्थाच्या सेवनाने ज्ञानकण विशेष वाढतात. आम्ल, तिक्त,लवण आणि मद्य, मांस सेवन केल्यापासून बुद्धीमध्ये जडत्व प्राप्त होते. काम क्रोधादिक प्रमाद स्वभाव ज्यास्त प्रमाणात वाढतात. मानवाने सेवन करीत असलेल्या आहारांत देखील अनेक प्रकार असून त्यामध्ये कांही आरोग्याला बाधक आहेत. कांही सहाय्यक आहेत. हे सर्व "मी" देही ह्याजड भावनेत शरीर सुखासाठी कल्पून घेतले आहेत.

एकच औषध, अनुपान भिन्नतेमुळे अनेक रोगावर उपयोगी पडते त्याप्रमाणे अधो भावनेत अन्नोदक सेवन केल्याने पूर्व संचित सुखदुःखादिककर्म प्रारब्धारूपाने विभाजनहोते. आणि त्याच अन्नोदकाचा ऊर्ध्वभावनेत तीर्थ प्रसाद रूपाने स्वीकार केल्यास ऊर्ध्व भावाच्या अनुपानामुळे पापक्षालन होऊन जन्म मरण रूपी भवरोग नाहिसा होऊन मोक्ष प्राप्ती होते.

पादोदक शब्दाचा विचार केल्यास **पाद + उदक = पादोदक "पा"** म्हणजे पाप व पान "द' म्हणजे **दहनकरणे, दमन** करणे, **"उदक"** म्हणजे पाणी, पादोदक शब्द असा होतो. पादोदक पान केल्याने पाप दहन होते. प्रसाद शब्दाचा विचार केल्यास **"प्र"** म्हणजे **प्रकृष्ट, श्रेष्ठ, "सा"** म्हणजे साक्षात किंवा प्रत्यक्ष **"द"** म्हणजे दर्शवितो दाखवितो.

जो श्रेष्ठ तर परशिव ब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव दर्शवितो. दाखवितो. तो प्रसाद होय. देवाला अर्पित झालेल्या अन्नोदकाचे रूप, गुण, रुची बदलत नाही. तथापि त्या पदार्था संबंधी भाव बदलतो. देवाला अर्पित होण्याचे अगोदर पदार्थ समजत होता. अर्पित केल्या नंतर तीर्थ प्रसाद समजतो. ही सर्व क्रिया देवासाठी नसून आपल्या भावपरिवर्तनासाठी आहे.

बीजाला अग्नी संस्कार झाल्यास अंकुर फुटत नाही. अग्नीच्या संतृप्तीसाठी बीजाला अग्नी संस्कार करावयाचा नसतो. बीजातील अंकुर रूपी जडांश परिहारासाठी करावयाचा असतो. त्याप्रमाणे देवाच्या संतृप्तीसाठी अन्नोदक अर्पण करावयाचे नसून त्या पदार्थां संबंधी आपल्या भावनेतील जड भाव दोष परिहारासाठी अर्पण करावयाचे असते. परमात्मा नित्यतृप्त असल्यामुळे त्याला भूक ताहान नाही. जन्म मरण नाही. अन्नोदक ब्रह्मार्पित करून पादोदक प्रसाद भावनेत स्वीकार करण्याने दासोहं भाव निर्माण होतो."दासः+अहं दासोहं"मी दास आहे. पादोदक प्रसाद माझे स्वामी आहेत. या दासोहं भावनेत अहंभाव नाहीसा होतो. स्वकष्टार्जित अन्नोदका मधील अहं भावाचे स्वामित्व नाहिसे करण्यासाठी ते शिवलिंगार्पित करावेलागेल. दळणे, कांडणे, कुटणे, पाक बनविणे ही सारी क्रिया मी या अहंभावनेत चालत असली तरी त्या अन्नोदकाला प्रत्यक्ष खात पीत असताना अहं भावनेत न खाता न पीता ती वस्तू शिवार्पितकरून तीर्थ प्रसाद म्हणून खाणे व पीणे देवाला अर्पित केल्यानंतर त्या पदार्थासंबंधीचा स्वामी हीभावना नाहीसी करून देवा कडून भिक्षा मागून घेतो. भिक्षान्न प्रसादाने मोक्ष मिळतो. यासाठी शिवलिंगार्पित होणारे अन्नोदक जलस्नान, मंत्रस्नान, भस्मस्नान व भस्मधारण करून पवित्र शरिरी होऊन अखंड मनांत मंत्र स्मरण करीत पाक सिद्ध करावा. या सिद्धान्न पाक क्रियेला पाकयज्ञ म्हणतात. पादोदक गुरूच्या चरण कमलांचे असते. तीर्थ दैवतमूर्तींचे असते. तीर्थ आणि पादोदक दोन्ही एकार्थ बोधक आहेत. भक्तानी आचार्यांची पाद पूजा करून दोन्ही पायांच्या अंगुष्ठाच्या अग्रभागावर त्यांच्या संगमावर तीन वेळा मंत्रोदकाची धार द्यावी. हेच

गुरु, लिंग जंगम त्रिविध रूप पादोदक होय. ते पादोदक सेवन केल्याने भक्ताच्या पाप राशी जळून जातात.

आचार्यांनी आपली शंख मुद्रा डाव्या हातात उर्ध्वमुखी धरून उजव्या हाताने त्या शंख मुद्रेत पादोदक तीन वेळा घालावे त्या शंखाखाली शिष्याने डाव्या हातावर उजवा हात ठेऊन ते पादोदक प्राशन करावे. आणि प्रसाद पात्रात सिद्धान्न भरून पंचाक्षर मंत्राने अभिमंत्रावे.तो प्रसाद भक्ताना प्रदान करावा. गुरूचे पादोदक व प्रसाद दररोज मिळणे शक्य नाही.गुरु ज्ञानप्रदान करीत, संचार करीत असल्यामुळे त्यांच्या आगमन कालीच तीर्थ प्रसाद लाभतो. त्यासाठी वीरव्रती शिवभक्ताने दररोज शिवलिंग रूपातच गुरु लिंग जंगमाची पूजा करून लिंग रूपांतच पादोदक व प्रसाद सेवन करावा.

अखंड शिवलिंगाधिपत्य संपन्न वीरव्रती शिवाय इतराना इच्छा मात्रे पादोदक प्रसाद लाभणे शक्य नाही याचे कारण असे की, विष्णू व रुद्रादि देवतामूर्तीचे उपासकभक्त देवाच्या देवळात गेल्या वेळीच त्याना त्या देवाचे तीर्थ प्रसाद लाभण्याचा सुयोग प्राप्त होतो. इतर काली लाभत नाही. पादोदक प्रसाद सेवन करण्यापासून रसनेंद्रियाद्वारे संभवणारे भवित्व दोष परिहार होऊन प्राण भावाची शुद्धता होते. पदार्थ स्वरूपात दिसणारा प्रपंच सर्व ब्रह्मस्वरूप दिसू लागतो. यासाठी प्रसाद व पादोदक अती अवश्यक आहे.

गुरुचे पादोदक सेवन करीत असल्यावेळी शिष्याने आपल्या हाताने इष्ट लिंगावर घालून स्वीकार करूनये. कारण गुरुच्या पादकमलामध्ये देखील लिंग व जंगम दैवताचा निवास आहे. यासाठी पुन: लिंगावर घालून सेवन करण्याची अवश्यकता नाही.

आणि आचार्यानी आपले पादतीर्थ आपणच स्विकार करूनये. कारण त्यांचे पादतीर्थ त्यांच्यासाठी नसून भक्तासाठी आहे. पादोदक करीत असताना आचार्याना आपल्या लिंगाची पूजा भक्ताकडून करुन घेऊनये. ते लिंग भक्तासाठी नसून स्वतःच्या पूजेसाठी आहे. भक्ताच्या पूजेकरिता गुरुचे पादपद्म आहेत. आचार्यानी पूजा करण्याचे लिंग, भस्म, रुद्राक्ष, मंत्र हे सर्व महा आचार्याकडून प्राप्त केलेले असते. त्याप्रमाणे महा आचार्याकडूनच तीर्थ प्रसाद स्वीकार करावा.

शिष्याने अनन्य भक्तीभाव पूर्वक गुरूची प्रार्थना केल्यावेळीच व गुरूच्या पाद पद्माची पूजा करुनच पादोदक तो प्राप्त करतो. परंतू आचार्य शिष्य लोकांच्या उद्धारार्थ आपल्या स्वबुद्धीने सर्व काली शुद्धोदक मंत्रसंस्कारपूर्वक अभिमंत्रित करुन ते मंत्रमय जल उजव्या हाताने शंखमुद्रेत घालून भक्ताच्या उजव्या हातात तीर्थ रूपाने प्रदान करतो.

पूजा, जप, यज्ञ, होम, पुराण, भजन, अखंड नामसप्ताह आदि पुण्य कर्मानुष्ठानाच्या उद्यापन विधीत अनंत भक्ताकडून धन, धान्य सेवा रूपांत संग्रह करावे. पवित्र देवता मंदिरामध्ये पुण्य क्षेत्रामध्ये अनेक हजारो लोकाना अन्न संतर्पण करावे. अशा पुण्य स्थानी तय्यार झालेला प्रसाद सर्वाना लाभावा हा उद्देश आहे. ईतकेच नव्हे तर अशा योगभूमी, तपोभूमी, पवित्र स्थानाचे वायूकण, जलकण, अन्नकण सर्वानी सेवन करावे. या पासून भूत, प्राण, भाव परिशुद्ध होऊन पुण्य कर्मानुष्ठानाला पात्र व्हावे या उद्देशाने महा प्रसादाचा दान विधी आहे.

अन्नजाते तु भक्तेन भुज्यमाने शिवार्पिते ।
सिक्थे सिक्थेऽश्वमेधस्य यत्फलं तदवाप्यते ॥

(सि. शि ,ाणि प्रसाद स्वीकार स्थल)

शिवप्रसाद परम भक्तीने सेवनकेल्यास, अश्वमेध यज्ञ केल्याने जे फळ मिळणार आहे ते फळ शिव प्रसादाचा एक कण सेवन केल्याने मिळणार आहे. सर्व सामान्य लोकाना शिव प्रसाद लाभणे शक्य नाही. शिवप्रसाद एक कण सेवन केला असला तरी त्याचा पुण्यांश जन्मजन्मांतरी पुण्यकर्माची प्रेरणा करून जीवन्मुक्ती पावे पर्यंत ते पुण्यांश सहाय्यक होतो म्हणूनच शिवप्रसाद महिमा असामान्य आहे. अन्नदानापासून जन्मांतरी विपुल अन्न संपत्ती प्राप्त होण्याचे पुण्य लाभते परंतू प्रसाद दानाद्वारे प्रकृष्टतर पाप नाश होऊन पुण्य कर्माची प्रेरणा होते आणि भोग मोक्ष दोन्ही प्राप्त होत असल्यामुळे अन्नदाना-पेक्षा प्रसाद दानाची महती अगणित आहे. प्रसाद दान कार्य पुर-पट्टणामध्ये देखील सर्वत्र चालावे. प्रसाद दान करणारे महा महोत्सवामध्ये सर्व भक्तलोक प्रसाद स्वीकार करुन पुण्य शरिरी होतात. इतकेच नव्हे तर राष्ट्रातील दुर्भिक्ष,दुर्मरण, दुर्गति दौर्मन, दुर्व्यसन, अकालवृष्टी, अनावृष्टी, अतीवृष्टी, भूकंप, झंझावात, अग्नी प्रलयादि अनेक विघ्न तापांचा परिहार होऊन सकालवृष्टी, सुवृष्टी लाभून अन्न, वस्त्र, धन, धान्यादि सकल भोग वस्तूंचा प्रकृती माता अनुग्रह करीत असते.

मानवाने आपल्या इष्ट दैवत मूर्तीचा प्रसाद स्वीकार करावा. वीरव्रती शिवभक्तानी गुरु लिंग जंगमाचा प्रसाद दररोज घ्यावा. प्रसादाविषयी तिरस्कृत भाव न दाखविता अत्यादर पूर्वक स्वीकार करावा. रस्त्यात, दुकानात, बाजारात, स्मशानात, अप-वित्र स्थानात सेवन न करीता पवित्र स्थानी स्वीकार करावा. मूत्र विसर्जनानंतर हात, पाय, तोंड धुवून प्रसाद स्वीकार करावा. उठता, फिरता, विनोद भाषण करीत प्रसाद स्वीकार करूनये.

पादत्राण, अंगी, रूमाल काढून मुखमार्जन करून भस्मधारण करून प्रसाद सेवन करावा. प्रसाद पात्र फुटके व छिद्राचे नसून स्वच्छ असावे. प्रसाद अवश्यक तेवढाच वाढून घ्यावा. जास्त घेऊन टाकू नये. प्रसाद सेवन करीत असता काम क्रोधादि प्रमाद स्वभावाच्या गोष्टी करूनये. प्रसाद सेवन केल्यानंतर ते पात्र एक वेळ धुवून प्यावे. मनात ईश्वर चिंतन करीत प्रसाद सेवन करावा. प्रसाद पर्ण पात्रात सेवन करूनये. प्रसादपात्र भूमीवर न ठेविता कोणत्याही आसनावर ठेऊन प्रसाद सेवन करावा. प्रसाद स्वीकार करण्याच्या पूर्वी हस्तस्पर्श करून आई, बाप, गुरु व इष्ट दैवताचे स्मरण करून प्रसादाला नमस्कार पूर्वक सेवन करावे. प्रसाद स्वीकार करताना भूमीवर न बसता कोणत्याही आसनावर बसून स्वीकार करावा. उजव्या हाताने जलपान करावे. एका पात्रात दोघे मिळून प्रसाद स्वीकार करुनये. अपेयपान, अभक्ष भक्षण, निषिद्धाचारयुक्त लोकाबरोबर सेवन करूनये. संसर्ग जन्य रोगी लोकाबरोबर बसून प्रसाद घेऊ नये.

– अष्टावर्णाचा उद्देश व व्यापकता –

गुरु, लिंग, जंगम विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद अष्टांग युक्त अष्टावर्णाचे वीरव्रत सर्वश्रेष्ठ आहे. त्याला वीर शिवव्रत, वीरव्रत, महाव्रत, वीरशैवव्रत,पाशुपत व्रत, शांभव व्रत, सिरोवृत, महाशैव व्रत अशी अनेक नांवे आहेत. कोणत्याही वर्णातला कोणत्याही आश्रमातला मानव हे व्रत स्वीकार करू- शकतो. अष्टावर्ण वीरव्रत इहलोक, परलोक व पारमार्थ त्रिविध सुखाच्या प्राप्तीसाठी परम सोपान आहे. अष्टावर्णापैकी कोणतेही एक आवर्ण स्वीकार करून आचरण करणारा शैव म्हणवितो. शिवलिंग पूजा करणारा शैव, भस्म धारण करणारा शैवच रुद्राक्ष-

धारण करणारां शैवच केवळ पंचाक्षर मंत्र जपणारा शैवच, तीर्थ सेवन करणारा शैवच, शिवप्रसाद स्वीकार करणारा शैवच, अखेर त्या अष्टावर्णाविषयी श्रद्धा भक्ती ठेवणारा देखील शैवच म्हणविती. पूर्ण अष्टावर्ण पालन करणारा वीरशैव म्हणविती. उदा – प्रथमतः आरण्यातील काष्ठापासून उत्पन्न झालेली अग्नीची ज्योत क्रमेण विकास पावत तैलदीप, घृतदीप, ग्यासदीप अखेर विद्युद्दीपापर्यंत विकास पावली आहे. आणि पायाने चालून प्रवास करणारा मानव, हत्ती, ऊंट, घोडा आदि सजीव वाहानापासून चालत चालत, रेल्वे, मोटार पासून अती वेगाने अंतरिक्षात संचार करणाऱ्या आकाश यानापर्यंत विकास पावला आहे. बुद्धी जीवी मानवाने अल्प काली अल्प श्रमाने बहुलाभ कसा प्राप्त होईल या विचाराने हे सर्व आविष्कार केले आहेत. याप्रमाणे अखंड शिवलिंग धारण करून नित्य व्रतरूपाने पूजा करून अल्प काली अल्प-श्रमामध्ये बहुपुण्य कसे प्राप्त करावे. या अपेक्षेने वीरशैव व्रताचा आविष्कार झाला आहे. भक्तीयोगाच्या उपासना क्रमात सप्त कोटी व्रत नियम सर्व भूमीवर स्थापन केलेल्या स्थावर दैवत मूर्तीचे आधिपत्य बोध करणारे आहेत. या भक्ती योगाचा अत्यंतिक विकासच वीरव्रत रूपांत आविष्कृत झालेला आहे. सप्तकोटी व्रत पूर्वांग असून वीरशैव व्रत उत्तरांग आहे.

विशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिका ।
तस्यां रमंते ये शैवा वीरशैवास्तु ते मताः ॥

(सि. शि मणि परिच्छेद ५)

"वी" म्हणजे विद्या "र" म्हणजे रममाण होणे, "शिव" म्हणजे ब्रह्म अर्थात् लिंगांग सामरस्य रूप शिव जीव ऐक्याचा बोध करणाऱ्या ब्रह्म विद्येमध्ये जो शैव रममाण होतो, तो वीरशैव

म्हणविला जातो. "अन्येषामपिदृश्यते" (६-३-१३७) ह्या पाणिनी सूत्रानुसार "वि" अक्षरास दीर्घत्व प्राप्त होऊन "वी" झाले आहे अशा प्रकारे वीरशैव या शद्वाची उत्पत्ती झाली आहे. अनंत जन्मामध्यें स्थावर शिवलिंगाची उपासना करून शिवव्रताचे आचरण करणारा शैवच वीरशैव होतो. शैव अवस्थेपासूनच वीरशैव अवस्था प्राप्त होते.

ब्रह्म विद्येत रममाण होणाऱ्याला वीरशैव म्हणतात. वीरशैव पद केवल त्या मुमुक्षू साधकांच्या अवस्था वाचक आहे. बी. ए., एम्. ए., पी. एच. डी. ह्या पदव्या विद्यार्थ्यांचे नांव, स्वभाव, कुल, वर्ण याचा बोध करणाऱ्या नसून केवल त्याच्या ज्ञानाची योग्यता कोणत्या स्थितीतली आहे हे निश्चित करून दाखवीत असल्याप्रमाणे वीरशैव व्रत मोक्षमार्गाच्या साधन क्रमाचा बोध करणारा आहे. "शिव,, शब्दच शैव होऊन वीरशैव झालेला आहे. हे एक व्रत आहे. वीरशैवव्रत मत वाचक नव्हे, वर्ण वाचक नव्हे, आश्रम वाचक नव्हे, सांप्रदाय वाचक नव्हे तर इह पर, पारमार्थ या त्रिविध सुखाच्या प्राप्तीसाठी बोध करणाऱ्या ज्ञान क्रियात्मक व्रतानुष्ठानाला वीरशैव म्हणतात.

वीरशैव लोकानी लिंगाशिवाय दुसऱ्या देवाची पूजा करूनये. स्तुती करूनये, नमस्कार करूनये, म्हणून कांहीग्रंथात सांगितले आहे. एका पक्षाने पूजा केल्यास, नमस्कार केल्यास तो धर्म बाह्य होतो. अंग सति लिंग पति समजून वर्तन करणारा विरशैव लिंगाशिवाय दुसऱ्या देवाची पूजा व नमस्कार केल्यास तीस व्यभिचार भक्ती म्हणतात. पतीव्रता स्त्रीने पतीला सर्वस्वी मानीत असली तरी आपल्या घरी दुसरा कोणी अतिथी आल्यास सत्कार, सन्मान, स्नान भोजनादि सेवाकार्य ती करीत असते.

मात्र संतानोत्पत्तीच्या दांपत्य प्रेमाचा विनियोग दुसऱ्या बरोबर ती करीत नाही त्याप्रमाणे लिंग पूजा महाव्रत जन्मदारभ्य मरणा-पर्यंत असली तरी कर्मयोग प्रपंच्यातील मानवाला लग्न, उपनयन, दीक्षा, गर्भाधान, नामकरण, चौल आदि धर्म संस्कारामध्ये गंगा-पूजा, गणपति पूजा, पंचब्रह्मकलश पूजा, दश दिक्पाल पूजा, सप्त मातृका पूजा, नवग्रह पूजा, अग्नी पूजा अशा अनेक देवाच्या पूजा अवश्यक आहेत असे सांगितले आहे. संस्कार पालन नाही केल्यास संस्कृतीची परंपरा तुटून मानव जीवन क्रमयुक्त चालणे शक्य नाही. आणि पाप क्षालनार्थ करीत असलेल्या प्रायश्चित्त कर्मांत देखील पतित जीवाच्या आत्मशुद्धीसाठी अनेक देवाची पूजा सांगि-तली आहे. कर्मयोग प्रपंचातील सर्वजीव आपल्या दैनंदिन कार्यामध्ये दैवी भावनेंत वर्तन करीत असतात. नूतन गृह प्रवेशा-साठी वास्तू शांती विधानामध्ये अनेक दैवतांची पूजा सांगितली आहे. दीपावलीच्या सणांत लक्ष्मी, सरस्वती, गणपतीची पूजा करीत असतात. शंकराने विषपान केल्याचे स्मारक म्हणून वर्षप्रतिप-देच्या (गुढी पाडवा) सणा दिवशी निंब पत्र पुष्प सेवन करीत असतात. मदांध राक्षसाचा संहार करून जगावरील संकट परिहार केल्याचे स्मारक म्हणून नवरात्र महोत्सवामध्ये पार्वती देवीची पूजा होत असते. मकर संक्रमणादिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करीत असतो. दक्षणायनांतून उत्तरायणात प्रवेश करीत असले-ल्या संध्या पर्व कालात अनेकलोक सूर्याची पूजा करीत असतात. आणि शेतकरी नांगराला नमस्कार करुन शेतनांगरीत असतो. पेरावयाच्या तिफणीची पूजा करून तो पेरित असतो. या प्रकारे कृषि व्यवसायाच्या सर्व साधन सामुग्रीला प्रथम नमस्कार करू-नच आपले कर्मयोग दैवी भावनेत लोक प्रारंभ करीत असतात.

व्यापारी तराजूला नमस्कारकरून तो तोलित असतो. लेखक लिखाणारंभी लेखणीस नमस्कार करून लिहीत असतात. नैमित्तिक शुभ कर्मांत देखील उखळ, मुसळ, जाते आदिकांची सुद्धा महिला पूजा करीत असतात. कांही लोक आपण वास करीत असलेल्या घराच्या महाद्वाराची देखील पूजा दररोज करीत असतात. आपल्या घरास आकस्मिक पणे कोणी सुवासिनी बाया आल्यास त्यांच्या कपाळाला गृहिणी हळदी कुंकुमार्चन करीत असतात. कोणी अतिथी आल्यास शरणु शरणार्थी, म्हणून दैवीभाव समर्पण करणाऱ्या प्रेमाची पूजा सदा चालत असते. न्यायालयातील न्यायाधीशाला प्रजाजन नमस्कार करतात. राष्ट्रध्वजाची पूजा करून नमस्कार करतात. आम्ही लिंगव्रती वीरशैव आमचे लिंगच सर्व श्रेष्ठ आहे असे समजून राष्ट्रध्वजाला व राष्ट्रपतीला सेवा पूजा नमस्कारादि विनम्रभाव समर्पण न केल्यास राष्ट्रात वास करून असलेले लिंग व्रती वीरशैवाचे कर्मयोग प्रपंच सुखाने चालेल का? चालणे शक्य नाही. आई, बाप, गुरु याना देव समजून नमस्कार न करता त्यांना मानव समजून वर्तन केल्यास त्याच्या जीवाचे सार्थक होईल का? शक्य नाही. आमचे लिंगच सर्व श्रेष्ठ आहे असे समजून परम वीर भक्तानी आपल्या मुला मुलीनां वैजनाथ, वीरभद्र, षण्मुख गणपति, शंकर, सरस्वती लक्ष्मी, पार्वती आदि दैवी भाव प्रकट करणारे स्त्री पुरुष वाचक अनेक नावे ठेऊन न बोलविता केवळ एकच एक लिंगप्पा, लिंगम्मा असे सकल मानवाना एका नावानेच संबोधून बोलून सांगणे, ऐकणे, घेणे, देणे, परस्पर जीवांचे कर्मयोग चालणे शक्य आहे का? नाही. या पासून लिंग धारणा, लिंगपूजा हे नित्यव्रत असले तरी त्याचे अंतर्गत कर्म योगाच्या सुरक्षतेसाठी अनंत प्रकारची

उपासना प्रसंगोपात करावी लागत असल्याचे प्रत्यक्ष दिसून येते. लिंगरूपी परमात्मा सर्वाभरितअसल्यामुळे सामान्यपणे कोण्याहि देवाची पूजा केली असली तरी त्या लिंगाचीच पूजा आहे असे समजून घ्यावे. ब्रह्मादि देवता लिंगधारीअसल्यामुळे त्या देवाची पूजा वीरशैव भृत्याचाराला संबंधित आहे. लिंगधारी सेव्य आहेत. भक्त त्याचा सेवक आहे असे वर्तन करणे भृत्याचार होय. सकल देव लिंगोपासकअसल्यामुळे भृत्याचार तत्त्वाप्रमाणे विचार करून पाहिले असता कोण्याही देवाची पूजा नैमित्तिक रूपाने केली तरी ती शिवलिंगपूजा असून वीरशैवांचे लिंगव्रत भंग पावत नाही. पूजा जपादि सर्व व्रत नियम केवळ भावशुद्धी साठी आहेत. त्या पासून पुण्य संचय अर्थात भाव संचय होतो. दैवतोपासनेमध्ये सामान्य भावसंचय होतो. लिंगोपासनेमध्ये विशेष भाव संचय होतो. तीन हजार वर्षापूर्वी लिंगपूजा व्रतरूपानेच होती त्या वेळी सर्व लोक लिंग पूजाच करीत असत. काल गतीच्या योगाने त्या व्रताला क्रमेण वीरशैव नावाने सांप्रदायिक मत पद्धतीने नाव प्रारंभ झाले. लिंगी अलिंगी असा भेदभाव मानव समाजात वाढला. त्या पासून परस्पर वेगवेगळचा मतामध्ये स्पर्धा प्रारंभ झाली. तेंव्हापासून लिंगधारी लोकानां दुसऱ्या देवाची पूजा नमस्कारादि विषय निषिद्ध केले आहेत हे मत द्वेषाशिवाय दुसरे कांही नाही.

वीरशैव हे मत, पंथ, सांप्रदाय नसून उपासना विभागांतील एक महान व्रत आहे. या बाबतीत खालील प्रमाणे आहेत

एवमाचारसंयुक्तो वीरशैवो महाव्रती ।
पुजयेत्परया भक्त्या गुरुं लिंगं च संततम् ।।

(सि. शि. मणि उभय स्थल)

वेधा मनु क्रिया दीक्षा यत्र ह्यंतर्गताः पराः ।
शिरो व्रतं महा गुह्यमिदं ते नैव लभ्यते ॥
यह कर्म साम्य संगत्या न पुनर्जन्म भाग्भवेत् ।
यह सर्व शास्त्रविदपि कर्मयोगरतोऽपिच ॥
शांभव व्रत हीनोऽयं प्रोच्यते केवलः पशुः ॥

(मुकुटागम क्रियापाद प्रथम पटल)

महाशैव व्रतस्थानां मद्भक्तानां विशेषतः ।
न निष्कृत्यंतरं मुख्यं मत्तीर्थ प्राशनादृती ॥

(मुकुटागम चर्यापाद द्वितीय पटल)

भक्त्युत्साह विशेषोपि वीरत्वमिति कथ्यते ।
वीरव्रत समायोगाद्वीरशैवं प्रकीर्तितम् ॥

(चंद्रज्ञानागम क्रिया पाद दशम पटल)

वेधामनु क्रिया भिख्यदीक्षा त्रितय शोभितम् ।
षढध्वशुद्धी कलितं गुरुकारुण्यं संभृतम् ॥
भस्म रुद्राक्षश्रीलींग धारणात्मकमुत्तमम् ।
शांभाव व्रतमेतद्‌ध वेद शास्त्रैकचोदितम् ।
इदं शिव प्रसादैक कारणं भव वारणम् ।

(चंद्र ज्ञानागम क्रिया पाद प्रथम पटल)

व्रतं पाशुपतं येन सम्यगाचरितं बुधो ।
तस्य ज्ञानं विजायेत तेन पाश विमोचनम् ॥

(विरशैवानंद चंद्रिका चतुर्दश प्रकरण)

लिंगांग सामरस्य (शिवजीवैक्य) जीवन्मुक्ती चिरसुख हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. दैवतांच्या उपासनेने व स्थावर लिंगाच्या उपासनेने पुत्र, दारा व धन ह्या भाव पाशांतून भक्त विमुक्त होतो. आणि परशिव लिंग अखंड धारण करून

अष्टावर्ण युक्त शिवयोग संपन्नभक्त पशु, पाश बंधनातून मुक्त होऊन लिगांग सामरस्य पावतो.

मानव धर्म मंदिराचा अष्टम, नवम सोपान असलेल्या पूजा व जप ह्या नियमाची परिसमाप्ती होते.



- ध्यान -

जगांतील कृमी, कीटक, पशू, पक्षी आपण सुखाने राहावे असे सदा ध्यान करीत असतात. सुख प्राप्ती हेच अंतीम साध्य ध्यानांत धरून वागत असतात. आणि आहार सेवन करण्यापासून जठराग्नीचा ताप कमी होतों असे समजून सदा आहाराच्या ध्यानामध्ये संचार करीत असतात. आपली कोणी हिंसा करूनये ह्याभीतीने सदा ध्यान करीत चालत असतात.आपल्या परिवारा-बरोबर संघ रूपांत सुखाच्या ध्यानामध्ये संचार करीत असतात. सर्व प्राणी आहार, निद्रा, भय, मैथुन ह्या सामान्य सुख प्राप्तीच्या ध्यानामध्ये अहोरात्र संचार करीत, पूर्व संचित कर्माचे विभाजन करीत असतात. तथापि सुख प्राप्तीच्या ध्यानामध्ये इच्छा, ज्ञान, क्रिया, शक्ती यांचा प्राकृतिक नियमानुसार उपयोग होतो.

पशु पक्ष्यादि प्राणी कर्तृत्त्वहीन असल्यामुळे त्यांच्याकडून पाप पुण्य संभवत नाही.

शिशू आईच्या उदरापासून जन्मपावताच शीतोष्ण वायुस्पर्शाने आणि शयन स्पर्शाने रडत असते. त्या रडण्याच्या क्रियेमध्ये सुखाचे ध्यान आहे असा बोध होतो. आणि कांही दिवसानंतर त्यास आईचा वियोग सहन न होता तिचा सहयोगच सुखमय आहे असे समजून आईचे सदा ध्यान करीत असते. बाल्यजीवनांतील नाना प्रकारच्या खेळण्याच्या ध्यानामध्ये सदा सुखाने राहून जीवीत असतो. सृष्टीतील सर्व वस्तूनां मनाने जाणत ध्याना मध्ये धरीत असतो. सकल विद्या, शास्त्र जाणत ध्यानांत ठेवतो. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप या या नियमास ध्यानामध्ये धारण करतो. ध्यानांतील विचार वाणीने उच्चार करून प्रत्यक्ष कृतीमध्ये आणित असतो. ध्यानामध्ये धारण केल्या शिवाय ध्येय वस्तूची प्राप्ती होत नाही. या वरून ध्यान नियम मानवाला नैसर्गिक आहे.

पुत्र दारा धन या त्रिपदार्थामध्ये देखील सदा सुखाचेच ध्यान करीत असतो. सुखाच्या ध्यानामध्ये बायकोची अपेक्षा होत असते, सुखाच्या ध्यानामध्ये नवऱ्याची अपेक्षा होत असते, सुखाच्या ध्यानामध्ये पुत्राची अपेक्षा होत असते, सुखाच्या ध्यानामध्ये धनाची अपेक्षा होत असते, सुखाच्या ध्यानामध्ये परिवाराची अपेक्षा होत असते, सुखाच्या ध्यानांत जाग्रत स्वप्नावस्था चालत असतात. सुखच मानवाचे अंतिम ध्यान आहे. सुख सुख म्हणून सदा त्याच्या ध्यानामध्ये वागणाऱ्या मानव जीवीतासाठी सुख एक विशाल अवकाश झाला आहे. सुखाच्या ध्यानामध्येच निरंतर चालणाऱ्या मानवाने भोग पदार्थांच्या प्राप्तीमध्ये सुख आहे.

असे कल्पून घेतले आहे. परंतू कोणत्याहि भोग पदार्थामध्ये त्याच्या मनाला संतृप्तीच नाही. सुखाच्या ध्यानामध्ये स्त्री पुरुष प्रेमाने वर्तन करीत असतात. अल्पकालीच ते सुख तिरस्कृत वाटते. सुखाच्या ध्यानामध्ये बाप, मुलाला प्रेमकरीत असतो. परंतू अल्पकालीच ते प्रेम नकोसे वाटते. सुखाच्या ध्यानामध्ये अखंड श्रम करून धन संपादन करीत असला तरी त्याचा देखील अल्पकालांतच तिरस्कार करतो. मन, बुद्धी, चित्त, अहंकार युक्त असलेल्या जाग्रत आणि स्वप्न या दोन्ही अवस्थेमध्ये सुखाची संतृप्तीच नाही.

जीवाला देह मात्र म्हणवून आपले जीवित चालविण्या-साठी एक अवकाश पाहिजे. अंतरिक्षामध्ये दिसून येणारी अनंत नक्षत्रे ब्रह्मांडामधील एकेक मृत्युलोकच असून अहोरात्र महदा-काशामध्ये संचार करीत असतात. सूर्य, चंद्र, अनंत लोकानां प्रकाश प्रदान करीत महदाकाशांत सतत संचार करीत असतात. वायु महदाकाशांत सदा वाहात असतो. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे तीन्ही काल महदाकाशांत वर्तन करीत असतात. दिवस व रात्र महदाकाशांत फिरत असतात. कृमी कीटकादि सकल जीव स्वेच्छानंदामध्ये महदाकाशांत संचार करीत असतात. वनस्पति भूमीमध्ये जनन पावून महदाकाशांत वाढून पुष्प फल रूपाने सकल प्राण्यानां अहार प्रदान करून संरक्षण करतात. पृथ्वी, आप, तेज, वायु, वर्षादि तीन्ही काल, सूर्यादि गोल, हे सर्व निश्चित वेळी निश्चितदिशेमध्ये उदयास्त पावून संचार करीत असतात. त्याच्या नियमित क्रियेमध्ये कोणतीही अडचण किंवा बाधा न व्हावी म्हणून महदाकाशाने आश्रय दिला आहे. त्या महदाकाशालाच ते सर्व माझे माझे या भावनेत आपले स्वामित्व स्थापित करून

चालत असतात. आकाशाने अवकाश नाहीदिल्यास प्रपंचाचे कोणतेही कार्य चालणार नाही. महदाकाशाने प्रपंचाचे स्वामित्व वाहून घेतले आहे. त्यांत मानवाने आपल्यासाठी एक घर कल्पून किंचित आकाश (अवकाश) संग्रहित केला आहे. महदाकाशात सूर्य चंद्राचा शीतोष्ण, अतीव असतो. वायु अति वेगाने वाहात असतो. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा आपल्या प्रखर धर्माने चालत असतात. हे सर्व अतीव सहन करणे मानवाला शक्य नसल्यामुळे महदाकाश आपल्या रक्षणासाठी उपयुक्त नाही असे जाणून आपल्या स्वामित्वात दुसरे किंचित आकाश कल्पून घेतले आहे तेच एक घर म्हणवितो.

गिरी, गुहा, आरण्यामध्ये संचार करणारे पक्षी, वृक्ष, वेलीचा आश्रय करून आपले तृण, पर्णाचे घर निर्मून घेत असतात. श्वापदे गिरी गुहेत आश्रय करून त्यालाच आपले घर समजून राहात असतात. मानव आपल्यासाठी घर निर्माण करून किंचित् आकाश संग्रहाला सुखाचे स्थान समजून जगत असतो. गिरी, गुहा असो, पर्णशाला असो, दगड मातीचे घर असो अथवा नाना प्रकारच्या चित्र कलेने, मोती माणीकाने आलंकृत केलेला राजमहाल असो ती सर्व घरेच होत. कोणत्याही प्रकारचे घर असले तरी त्यातील अंतर्भूत किंचित् आकाश निवास स्थानासाठी तेवढेच सुखमय असते. पर्णशालेचे घर असो, माणीक मोत्याचे घर असो, राजमहल असो त्यांच्या अंतर्भागातील अवकाशामध्ये भिन्नता नाही. फार श्रमाने बांधलेले, दीर्घकाल टिकून राहाणारे व नयन मनोहर आणि बहुमूल्य घर असले तरी अथवा अल्पश्रमाने अल्पकाल टिकून राहाणारी अल्पमूल्यात तय्यार केलेली पर्णशाला असली तरी, अल्पमूल्य, बहुमूल्य ही अवस्था, आवरणरूप

भिंतीचे मूल्यमापन होय. घरामधील अवकाशाचे मूल्य नव्हे. आतील अवकाश (पोकळी) अमूल्य आहे. त्याला कोणत्याही प्रकारचे मूल्य नाही. घर म्हणजे महदाकाशांतील किंचित् अकाश (पोकळी) संग्रह करणे होय. उदा – नयन मनोहर कितीही मूल्यवान् घर असले तरी त्याच्या आतील आकाशामध्ये अती दुर्गंध येऊ लागल्यास व अती धूर झाल्यास अथवा दुषित कृमी कीट-कांचा उपद्रव झाल्यास ते घर निवास करण्यास निरुपयोगी ठरते. अथवा एखाद्या घर मालकाने दुसऱ्यास भाड्याने राहावयास दिले असता व मालकाच्या मनांत स्वतः राहण्यासाठी भाडेकराना काढावयाचे असल्यास भाडे करूने "तुम्ही घराचे मालक आहात मी हे मान्य करतो. भाड्याचे पैसे देईन. बाहेर निघणे मला जमणार नाही" असे म्हणताच मालकाला दुःख होते. घरामधील जो अवकाश आहे तो याच्या स्वामीत्त्वात नाही. घराचे सुख म्हणजे निरवयव (आकाश) पोकळीच समजावयास पाहिजे. किंवा जल संग्रहासाठी कुंभाची अवश्यकता असते. कुंभामध्ये जल भरणे म्हणजे त्या मधील आवकाशामध्ये ठेवणे भरणे होय. त्याच कुंभाला छिद्र पडल्यास जल संग्रहासाठी उपयुक्त नसते. अर्थात् घटाकाशाच्या प्राप्तीसाठीच कुंभ संग्रह करण्यांत येतो. मूर्तीमंत मानव अमूर्त स्वरूपाच्या पोकळी (आकाश) मध्ये नाना-विध सुख सौकर्याचे ध्यान करीत असतो. आकाश विशिष्ट नाम-रूपांत दिसत नसून केवळ कांही नाही म्हणून भासमान होणारे आकाश निरवयव शून्याप्रमाणे आहे. त्या शून्यामध्येच सर्व कांही आहे असे समजून ध्यान करीत असतो.

अत्यंत निकृष्ट जीवी मानव मद्य, गांजा, अफू आदि अनेकविध निषिद्ध पदार्थांचे सेवन करीत असतो. त्या पासून

ध्याच्या ज्ञान तंतूची क्रिया कुंठित होऊन चित्तवृत्तीचा कांही अंशी निरोध होऊन, मनाची चंचलता दूरावते. एकच एक विषय वृत्तीमध्ये एकाग्रतेनें राहात असतो. ते एक प्रकारचा अनैसर्गिक प्रवृत्तीची अत्यल्प कालाची विषय उन्माद सुख निद्राच होय. जड जीवी मानव या सुखाचे ध्यान करीत असतात.

सर्वं सामान्य मानवजीव कर्ण, नेत्र, त्वचा, रसना, घ्राण या पंच ज्ञानेंद्रियाद्वारे शद्व, स्पर्श, रूप, रस, गंध अशा पाच प्रकारच्या विषयानंदाचा अनुभव घेत असतो. या विषयानंदामध्ये त्याचे भाव, मन, शरीर तादात्म्य पावून विषय आणि विषयी या द्वंद्व भावाचे विस्मरण होत असल्यामुळे अत्यल्प कालाच्या नैसर्गिक प्रवृत्तीची विषय जन्य निर्वीकल्प सुखनिद्रा प्राप्त होत असते. सामान्य मानव या सुखाचे ध्यान करीत असतात. कर्णेंद्रिय नाद श्रवणाद्वारे विषय सुखाचा अनुभव घेऊन घेऊन कंटाळत असते. नेत्रेंद्रिय रूप विषयसुखाचा अनुभव घेऊन घेऊन कंटाळते. घ्राणेंद्रिय गंध सुख घेऊन घेऊन कंटाळते. रसनेंद्रिय अनेक विध रसस्वादाचे सुख घेऊन घेऊन कंटाळते. त्वगेंद्रिय नानाविध प्रेमी वस्तूस स्पर्श करून करून कंटाळते. असे पंच ज्ञानेंद्रिय पंच कर्मेंद्रिय सुखामध्ये मानवाला संतृप्ती होत नसल्यामुळे यांच्याही पेक्षा दीर्घ कालाचे सुख कोणते आहे याचे ध्यान करीत असतो.

सुषुप्ती अवस्थेमध्ये मन, बुद्धी, चित्त, अहंकार ही अंतःकरण चतुष्टय लय पावतात. जेथे कांही जाणवत नाही, दिसत नाही. गाढ अंधःकारामध्ये सकलेंद्रियाचा व्यापार दीर्घं कालापर्यंत लय पावत असल्यामुळे गाढ निद्रा सुख सर्व सुखापेक्षा विशेष सुख आहे. असे समजून निद्रासुख घेत असतो. गाढ निद्रे-

पासून जागे होऊन जाग्रत अवस्था आल्यास मला गाढ झोप लागली होती मी सुखाने झोप घेतली म्हणून सांगत असतो. यावरून कांही नाही कांही दिसत नाही गाढ अंध:कार आहे याला जाणणारा साक्षीभूत असा कोणी तरी एक स्वतंत्र वेगळाच आहे असा बोध होतो. तो सुषुप्ती अवस्थेत गाढ अंध:कारात तादात्म्य पावून सुखानंदाचे ध्यान करीत असतो. जाग्रती, स्वप्न या दोन अवस्था नामरूपमय असून सुषुप्ती अवस्था त्या नाम रूपाला आश्रय भूत आहे. उदा – एका चिखलाच्या गोळयाचे निरीक्षण केल्यास त्यामध्ये कोणतेही नाम, रूप दिसत नसून केवळ एका गोल शून्याकाराप्रमाणे दिसतो. त्या गोळया विषयी इच्छा ज्ञान क्रिया शक्तीचा उपयोग केल्यास अनंत प्रकारच्या नाम रूपात्मक बाहुल्या उत्पन्न होतात. मूल चिखलाच्या गोळयामध्ये विशिष्ट रूपाकृती दिसत नाही. का? म्हणजे मानव किंचिज्ञ असल्यामुळे एका काळी एकच नाम व एकच रूप जाणण्याची पात्रता असणारा आहे. परंतू तो गोळा सकल नाम रूपाचा आश्रयभूत म्हणजे अनंत नाम रूपाचे भांडार आहे. ह्या गोळयात कोणतेही रूप नाही म्हणून समजत असतो. तो गोळा कारण असून अनंत बाहुल्या त्याचे कार्य असल्या प्रमाणे या गाढ सुषुप्ती शून्यावस्था कारण असून जाग्रत व स्वप्न या दोन्ही अवस्था त्याचे कार्य आहेत. दररोज सुपुप्ती अवस्थेतील निद्रासुख घेणारा देखील अल्प कालीन सुख समजून पूर्ण संतृप्त होत नसल्यामुळे याच्याही पेक्षा दीर्घ कालाचे कोणते सुख आहे याचे ध्यान करीत असतो.

या प्रपंचातील सर्व सुखे अल्पकालीच अनुभवास येत असल्यामुळे तिरस्कार भावनेत पाहाणारा योगी अती दीर्घकालाचे म्हणजे योग निद्रेचे सुख सर्व सुखापेक्षा श्रेष्ठ आहे असे समजून

त्याचे ध्यान करीत असतो. प्राणलिंगी योग्याची योगनिद्रा सर्व सामान्य जडशरीरधारी जीवाच्या निद्रे सारखी नसते.प्राणायाम द्वारे कुंभक वाढवून प्राणाचे नियमन करीत असतो. अपानवायूचे उत्थान होऊन सुषुम्नेंतील कुंडली ऊर्ध्वं मुखी होऊन वाहात असते. ती आधार, स्वाधीष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी,आज्ञा नामक षट्चक्र क्रमाने भेंदन करून गुद, गुह्य, नाभी, हृदय, कंठ, भ्रूमध्य-मार्गाने जावून ब्रह्मरंध्रातील कोटि सूर्याच्या प्रकाशापेक्षाही अधिक असलेल्या तेजःपुंज प्रशांत दिव्य प्रभेत तादात्म्यस्वरूप होऊन ध्यान करणे सूक्ष्म शरीराची योग निद्रा होय. योग साधकाच्या प्राण सिद्धीच्या क्रमाप्रमाणे तो हजारो वर्षापर्यंत योगसमाधीत राहून योगनिद्रेचे ध्यान करीत असतो. त्या योग निद्रेच्या आनंदा-समान दुसरा कोणताही आनंद नाही. योग निद्रेंत अनुभवास येणारा परम प्रकाश अमृततुल्य असतो. अशा योग निद्रासुखापेक्षा दुसरी सुखे त्याच्या सहस्त्रांशाची ही बरोबरी करणारी नाहीत. योगी योग निद्रेच्याद्वारे पूर्व संचित कर्मानुसार आपल्या शरीं-राची आयुर्वृद्धी करून योग निद्रेत असलातरी अखेर त्या शरी-राची आयुर्मर्यादा परिसमाप्त होताच त्याच्या योग निद्रेचे ध्यान खंडित होऊन दीर्घ कालाच्या योग्य निद्रेत देखील संतृप्ती न पाव-णारा योगी आधि भौतिक योग निद्रा सुख देखील अल्प काला-चेच आहें असे समजून त्यांच्याही पेक्षा दीर्घकालाचे सुख या खेरीज दुसरे कोणते आहे असे ध्यान करीत असतो. इह लोकां-तील सुखाची परिसमाप्ती झाली. अता या पुढे परलोक सुख पाहिजे म्हणून ध्यान करीत असतो.

पुण्य विशेष मूलक प्राप्त होणाऱ्या सूक्ष्मशरीरा द्वारे अनुभवणारे दीर्घ कालीन परलोक सुख प्राप्त व्हावे म्हणून

ध्यानकरीत असतो.सर्व सृष्टीचे नियामक म्हणविणारे ब्रह्मा,विष्णु, रुद्र, ईश्वर या देवांचे ब्रह्मपद, विष्णुपद, रुद्रपद, ईश्वरपद या परलोकांतील देव पदव्या सालोक्य, सार्ष्टी, सामिप्य, सारूप्य, सायुज्य म्हणून पाच प्रकारच्या आहेत. तेथे दुःखाचा लवलेश नाही. शुद्ध सुखाचाच अनुभव येतो. परलोकांतील सुखामध्ये सालोक्य सुख म्हणजे ब्रह्मादि देवांच्या लोकामध्ये वास करून सुख भोगणे. सार्ष्टी सुख म्हणजे त्या दैवताच्या समान ऐश्वर्य प्राप्त करून सुख भोगणे. सामिप्य सुख म्हणजे त्या देवाच्या समीप वास करून राहणे. सारूप्य सुख म्हणजे त्या देवा प्रमाणे मूर्तीमंत देहधारण करून सुखाचा अनुभव घेणे.ही चार अलौकिक सुखे सूक्ष्म देहधारण करून अती दीर्घ कालापर्यंत अनुभव घेत असली तरी ते देखील नको वाटून यांच्याही पेक्षा श्रेष्ठ तर सुख म्हणजे ब्रह्मा, विष्णु आदि दैवतांच्या सगुण साकार देहामध्ये मिळून म्हणजे त्या मूर्तीमध्ये आपले शरीर तादात्म्य करून महा प्रलय काला-पर्यंत त्यांच्या देहांतच वास करून योग निद्रा सुख अनुभवणे सगुण सायुज्य सुख होय. जसे वर्षाकाळांतील मेघजल, ओढे, नाले, नद्या, महानद्यामध्ये मिसळून अखेर समुद्र राजाच्या उदरांत ऐक्य पावतात. तसेच शुद्ध पुण्यमय योग जीवी, ब्रह्मादी देवता-मध्ये समरस पावून वास करून योग निद्रारूप आधिदैविक सुखाचा अनुभव घेत असतो. महा प्रलय काली ब्रह्मा,विष्णु आदि देवांची जीवन परिसमाप्ती होत असल्यामुळे त्यांच्या शरीरामध्ये समरस पावून योग निद्रेचा अनुभव घेणाऱ्या योग्याची योग निद्रा देखील खंड पडते. पुनर्सृष्टीमध्ये ते जीव पुनः जन्म घेऊन येत असल्या-मुळे सायुज्य पदवीमध्ये अनुभव करणारे योग निद्रेचे सुख देखील त्या योग्याला तिरस्कृत वाटून कधीही नाश न पावणारी चिरनिद्रा

म्हणजे अखंड सुख कोणते आहे असे ध्यान करीत असतो. ही सर्व सुखे मी म्हणविणाऱ्या जीव दशेच्या मूळ अहंकार ग्रंथीच्या अंतर्भूत आहेत. मूळ अहंकार ग्रंथीच जन्म मरणाला कारणीभूत असल्यामुळे तिचा नाश करून आनंद प्राप्त करणारे सुख अजून कोणते आहे, त्याचे ध्यान करीत असतो.

"मी" म्हणविणारा "अहं" भाव जाग्रत,स्वप्न, सुषुप्ती या तीन्ही अवस्थेमध्ये अनुभवास येतो. "मी" या अहं भावनेत सर्व इंद्रियाचे कार्य चालत असते "मी" हा अहं भाव कर्णेंद्रिया-द्वारे नाद श्रवण करीत असल्यावेळी नयनेंद्रिय रूपविषय जाणत नाही. घ्राण गंधविषय जाणत असल्यावेळी रसना रसस्वाद जाणत नाही. त्वगेंद्रिय स्पर्शविषय जाणत असल्यावेळी नेत्र रूप विषय जाणत नाही, "मी' म्हणविणाऱ्या अहं भावाच्या देहधारी जीवास एकाकाळी एकच विषय ग्रहण करावयाचे सामर्थ्य असून सकल इंद्रियामध्ये तो कर्ता असल्याचे स्पष्ट होते जाग्रतावस्थे-मध्ये माझा देह ह्या अहं भावनेत वर्तन करणारा जीव आपल्या जड देहाला अंथरुणावर विसर्जन करून स्वप्नमय सूक्ष्मशरीर-धारी होऊन स्वप्न सृष्टीच सत्य आहे अशा अहं भावनेत वर्तन करीत असतो. स्वप्नावस्थेत जाग्रत अवस्था विसरून जातो. परंतू जाग्रतावस्थेमध्ये स्वप्नावस्था विसरत नाही. जाग्रत अवस्थेतील सर्व क्रियाच स्वप्नावस्थेत चालत असतात. जाग्र ी व स्वप्न या दोन्ही अवस्था भिन्न असून त्यामध्ये अहं भावनेत वर्तन करणारा कर्ता एकटाच आहे. जाग्रती, स्वप्न या दोन्ही अवस्थेच्या कार्याला साक्षी भूत असणारा "मी" म्हणविणारा "अहं" भावाचा जीव सुषुप्ती अवस्थेत विराम पावतो. सुषुप्ती अवस्थेमध्यें मन, बुद्धी, चित्त, अहंकार लय पावत असल्यामुळे गाढ निद्रा अनुभव करीत

असतो. पुनः निद्रेतून जागा होऊन मला गाढ झोप लागली होती. असे सागंत असतो. त्या सुषुप्ती अवस्थेच्या गाढ निद्रेला जाणणारा जीवात्मा वेगळा आहे. यावरून मी म्हणविणारा अहंभावाचा जीवात्मा तनुत्रयाच्या तीन्ही अवस्थेच्या व्यतिरिक्त असल्याचा प्रत्यक्ष बोध होतो. जाग्रती व स्वप्न दोन्ही अवस्थेमध्ये मला गाढ निद्रा लागली होती असे स्मरण होईल परंतू गाढ सुषुप्ती अवस्थेमध्ये मात्र जाग्रती व स्वप्न, या दोन्हीची जाणीव व स्मरण नसते. सुषुप्ती अवस्था कारण आहे जाग्रती व स्वप्नावस्था त्याचे कार्य आहेत. कार्यामध्येच कारण अनुभवाला येत असते मात्र कारणामध्ये कार्याची प्रतीती होत नाही. यासाठी नाम रूपातीत असलेल्या सुषुप्ती अवस्थेतील भावावरणाच्या परिहारासाठी भाव लिंगानुसंधानाची अवश्यकता आहे.

नामरूपात्मक जाग्रती व स्वप्न दोन्ही अवस्था ज्याप्रमाणे सुषुप्ती अवस्थेत लय पावतात. त्याप्रमाणे त्या सुषुप्ती अवस्थेतील अहंभाव जेथे लय पावतो त्याला भावलिंग म्हणतात. गाढ सुषुप्ती अवस्थेला आत्मा साक्षीभूत असून मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे या स्वस्वरूपाच्या यतार्थ ज्ञानाची जाणीव होणे भाव लिंगाचे ज्ञानानुसंधान होय. मन, बुद्धी, चित्त, अहंकार मी नाही. मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे. असे आत्म ज्ञान होताच तो द्विजन्मा होऊन गुरुपुत्र म्हणवितो. आत्मज्ञानी गुरुपुत्राला प्रपंच, पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे मिथ्या स्वरूपांत दिसू लागतो. जन्म मरणातीत असलेल्या लिंगांग सामरस्य रूप जीवन्मुक्ती चिर सुखाचे ध्यान करीत असतो. मी केवळ ज्ञानस्वरूप आहे अशा आत्मज्ञान्याला "मी सत्य आहे" नित्य आहे ही जाणीव होऊन आपल्या व्यतिरिक्त जगाला मिथ्या समजत असतो. तो द्रष्टा

असून त्याच्याप्रतीतिस येणारे द्रश्यजग मिथ्या आहे असे समजतो.

जग कार्यरूपांत परिवर्तन होऊन मिथ्या दिसत असले तरीत्याला कारणरूप असलेली परशिवब्रह्मशक्ती सत्य आहे. परशिव ब्रह्मचैतन्यशक्ती कारण रूपांत सद्रूप होऊन, कार्यरूपात असद्रूप होऊन दिसत असलीतरी ही सर्व त्या परशिव ब्रह्माची लीला आहे. इहलोक व परलोकाचे सर्वसुख पुण्य कर्माचे परिणाम स्वरूप आहेत. परंतू पुनरावृत्ती रहित लिंगांग सामरस्य जीवन्मुक्ती मात्र पुण्यकर्माच्याही अतीत असून आत्म ज्ञानाच्या ध्यानानुसंधानाद्वारे संपादन होते.

उत्पादक आणि विभाजक या कर्म प्रवृत्ती नियमाप्रमाणे सदा परिवर्तन पावत असलेल्या द्रश्य प्रपंचाला पिंडज्ञानी द्रष्टा होऊन द्रश्य कर्मापासून अलिप्त राहातो. एक वेळ आत्मतत्त्वाचे ध्यान केल्यास अखंड कर्म प्रवृत्तीमध्ये खंड पडतो. आणि पुनः पुनः आत्म ध्यानामध्ये निरत झाल्यास त्या कर्म प्रवृत्तीमध्ये अनंत खंड पडत असतात. म्हणजे आत्मा जितका काल आपल्या निजस्वरूपाच्या ध्यानाद्वारे अकर्मत्व साधित असतो. तितका काल कर्माचा खंड पडत असतो. उदा — एक लाकूड कापल्यास दोन तुकडे होतात. पुनः पुनः कापल्यास अनेक तुकडे होतात. अखेर कापता न येण्याजोगे अतिसूक्ष्म परमाणू बनतात. अखेरचा परमाणूच्छेदन, भेदन करण्यास, उचलण्यास, उतरण्यास, स्थलांतर करण्यास न येण्याजोगा होतो. ही एक वस्तू आहे असे निर्धारित करण्यास देखील शक्य होत नाही. केवळ त्याचे अस्तित्त्व जाणवते. नामरूपाच्या अंतर्भूत असलेले लाकूड अखेर परमाणू स्वरूपामध्ये परिवर्तन झाल्याने त्यांत अकर्मत्व प्राप्त होतअसल्याप्रमाणे द्रष्टारूप पिंडज्ञानी पुनःपुनः आपल्या स्वरूपाच्या

निजज्ञानामध्ये द्रश्य प्रपंचाला साक्षीभूत राहून त्याच्या ठिकाणी अकर्मत्व अवस्था प्राप्त होते. म्हणजे उत्पादककर्म खंड पडून अखेर अकर्मी होतो. उत्पादककर्म कारण असून विभाजक कर्म त्याचे कार्य आहे. कारणापासून कार्य संभवते. कारण नसल्यास कार्य सुद्धा नाहीसे होते. उदा – जल उगम स्थानापासून बाहेर पडून कूपामध्ये संग्रह होऊन कोणत्याही एका साधन पात्राद्वारे ते जल विभाजन केल्यास जलाचा उगमच जल संग्रहाला आणि त्याच्या विभाजनाला कारण आहे. जलाचा उगम थांबल्यास त्याच्या कार्य स्वरूपाच्या सर्व क्रिया स्वाभाविकपणे थांबत असतात. त्याप्रमाणेच उत्पादक कर्माचा निरोध झाल्यास त्याचे विभाजन कार्य स्वाभाविकपणे थांबते. जन्म मरण दोन्ही उत्पादक कर्माचे कार्य आहेत. कर्माला जाणणारा आत्मा प्रत्यक्ष कर्मामध्ये असला तरी कर्म त्याच्या ठिकाणी ज्ञप्ती मात्रात चिकटलेले असते. आत्म्याला प्रपंच मिथ्या स्वरूपांत जाणवत असल्यामुळे त्या प्रपंचाला कारणरूप असलेल्या शुद्ध चैतन्याचे आवरण होऊन लिंगांगसामरस्य जीवन्मुक्तीसाठी अवकाश प्राप्त होत नाही. चराचरप्रपंच पदार्थ रूपाने न जाणता परशिव ब्रह्माचे लीलास्वरूप आहेअसे समजून त्याला साक्षीभूतहोऊन राहणे हा लिंगांग योगआहे.

मिथ्या रूप प्रपंच्याला सत्य (ब्रह्मरूप) आहे असे मानल्यास त्या मिथ्या प्रपंच्याचा संस्कार (आवरण) आत्म्यावर होत नाही याचे कारण काय? या प्रश्नाचे उत्तर:– चराचर जगांतील प्रपंच्याची क्रिया विषम स्वभावामुळे चालत असते. केवळ बीजापासून अंकुर फुटत नाही, केवळ मातीपासून अंकुर फुटत नाही, बीज आणि माती मिसळल्यास अंकुर फुटतो. उत्पत्ती क्रिया सजातीय वस्तूपासून न होता विजातीय वस्तूपासून होणे.

स्वाभाविक आहे.त्याप्रमाणे चराचर प्रपंच्याचा अनंत विध्न कार्याला साक्षीभूत असलेल्या ज्ञान स्वरूपी आत्म्यावर द्रश्य पदार्थाच्या विविधतेमुळे व आत्म्याला जाणण्याच्या क्रियेमध्ये देखील विविधता असल्यामुळे आत्म्यावर आवरण होते. परंतू प्रपंच्याला अखंड ब्रह्म भावनेत जाणत असल्याने त्या ब्रह्माचे अंशमय आत्मतत्त्व व ब्रह्मस्वरूप प्रपंच ही दोन्ही सजातीय असल्यामुळे आत्म्यावर आवरण होत नाही. देहधारी असलेल्या जड जीवीला सर्व प्रपंच पदार्थ रूपाने दिसण्याला अज्ञानच मूळ कारण आहे. "वस्तुन्यवस्त्वारोपे अज्ञानम्" एका वस्तूमध्ये दुसऱ्या वस्तूची कल्पना करणे अज्ञान आहे. उदा :– "रज्जु सर्पवत्" अंधारात दोरीला सर्प समजणे अज्ञान आहे. "मृगजलवत्" दुरून दिसत असलेल्या उन्हाळ्यातील वातावरणाच्या मृगजळाला प्रत्यक्ष जल प्रवाह समजणे अज्ञान आहे. अशी एका वस्तूमध्ये दुसऱ्या वस्तूची कल्पना करणे म्हणजे अज्ञान होय. त्याप्रमाणे चराचर सर्व प्रपंच ब्रह्मरूप असून त्याला पदार्थ भावनेत मिथ्यारूप समजणे अज्ञान आहे. अज्ञान शद्वाचा अक्षरश: अर्थ करून पाहिल्यास "अ,, म्हणजे अक्षरस्वरूप अविनाशी, "ज्ञा,, म्हणजे जाणणे, "न,, म्हणजे नाही अर्थात् प्रपंचातील जड चेतन वस्तूमध्ये अक्षरस्वरूप अविनाशी वस्तूची जाणीव जेथे नाही ते अज्ञान आहे. अथवा अक्षर स्वरूप अविनाशी वस्तूला जड पदार्थ समजणे अज्ञान आहे. सारांश परशिव ब्रह्मच आपल्या चैतन्य शक्तीच्या योगाने प्रपंच रूपाने दिसत असतो. त्या परशिवरूप प्रपंच्याला पदार्थ समजणे अज्ञान आहे असे सिद्ध होते.चराचर प्रपंच्याविषयी ब्रह्म भावनेची व्यापकता व्हावी म्हणून मोक्षापेक्षी साधकाला भक्ती स्थलाची उपासना सांगितली आहे.

माता पिता आचार्य अतिथी व ब्रह्मा, विष्णु, रुद्र ईश्वर आणि सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, अंबिका शक्ती आदि दैवतांच्या उपासनेने प्रपंचातील सर्व स्त्री पुरुषाविषयी मातृ पितृ पूज्यभाव स्थिर होतो. त्या योगाने पुत्र, दारा, धन या त्रिपाशाची निवृत्ती होते. आणि भूत, प्राण, भाव या तनुत्रयाच्या आवरणाने आलेल्या पशुत्व निवृत्तीसाठी वीर व्रताच्या अष्टांगयुक्त गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद हे अष्टावर्ण साधन आहेत· त्या साधनापासून भावांचा मल विक्षेप होऊन एकदेशी विशुद्ध भाव विस्तृत पावून चराचर सर्व प्रपंच अष्टावर्णमय दिसतो. उदा – पुष्पगुच्छ एका विशिष्टस्थानी असलातरी त्याचा सुगंध आणि धूपाचा परिमळ वायूच्या संस्काराने व्यापक रूपांत प्रसरण पावतो. तसेच ध्वन्याकर्षण यंत्रामध्ये (रेडिओ) बोललेले ध्वनी-कण प्राणवायुद्वारे प्रसरण पावून चराचर सर्व प्रपंचामध्ये व्यापून जातात. त्याच प्रमाणे एकदेशी उपासना क्रमाचा ऊर्ध्व भाव प्रसरण पावून सकल प्रपंच ब्रह्ममय दिसू लागतो. चराचर सृष्टी-च्या वस्तूमध्ये ब्रह्मभाव विकास होणे हेच उपासना क्रमाचे अंतिम लक्ष्य आहे. गुरुभक्ती पासून चरप्रपंच गुरुरूप दिसतो. लिंग भक्तीने अचर प्रपंच लिंगरूप दिसतो. विभूती धारण करण्याने भावातील ज्ञान ज्योत उदय पाऊन सूर्य, चंद्र नक्षत्रादि-कांचा प्रकाश विभूतीरूप दिसू लागतो. रुद्राक्ष धारण केल्यापासून ज्ञान चक्षूचा उदय होऊन प्रपंच रुद्ररूप दिसू लागतो. पंचाक्षर मंत्राचा जप करण्याने जगांतील सर्व निनाद (शब्द) मंत्रमय ऐकू येतात. पादोदक सेवन करण्याने जगांतील सर्व जलाशय तिर्थरूप दिसू लागतात. प्रसाद सेवनाने सर्वप्राणी सेवन करीत असलेले खाद्य, अन्न धान्य शिव प्रसादरूप दिसू लागतात. चराचर सर्व प्रपंच ब्रह्म स्वरूप आहे.

पत्रशाखादिरूपेण यथा तिष्ठति पादपः ।
तथा भूम्यादिरूपेण शिव एको विराजते ॥
(सि. शि. मणि शिव जगन्मयस्थल)

पत्र, पुष्प, शाखादि रूपाने वृक्ष जसा विराजमान आहे तसाच परशिव ब्रह्म भू, जलादिक रूपाने विराजमान आहे.

हे चराचर विश्व ब्रह्मस्वरूप आहे म्हणून यजुर्वेद तैत्तीरीय संहितांतर्गत (४।५।१।११) रुद्रसूक्तामध्ये सविस्तर सांगितले आहे. रुद्रशब्दाचे अनेक अर्थ होतात.

रुद् दुःखं दुःख हेतुं वा द्रावयति नः प्रभुः ।
रुद्र इत्युच्यते सद्भिः शिवः परम कारुणिकः ॥

"रुद्र" शब्दाचा अर्थ आमच्या दुःखाचे द्रावण (वितळून) करून सुख प्राप्ती करून देणारा असल्यामुळे तो परम मंगलकारी व दया समुद्र आहे. "रुद्र" म्हणजे रोदन करविणारा, रडविणारा मानव, हिंसा, असत्य, स्तेय व व्यभिचार ह्या अनैसर्गिक पापकर्मात प्रवृत्त झाल्यास त्याला दुःख ताप देऊन रडवितो व पश्चात्ताप करवितो. मानवाच्या पापकर्माला शिक्षा नाही केल्यास त्या पाप्याला यापुढे मी पाप करूनये ही भावाना त्याच्या अंतःकरणांत उदय होणार नाही. म्हणून त्याने केव्हाही पापकर्म करूनये अशी मंगलमय प्रेरणा होते.

"रुद्र" शब्दाचा अर्थ अग्नि, ज्ञानज्योती, ज्ञानाग्नी असा होतो. गतीमान असाही रुद्र शब्दाचा अर्थ होतो. स्थूल सूक्ष्म कारण या तनुत्रयाचा आवरणमय मानवपशु विषयसुखाच्या आतुरतेने जन्म मरण रूपी कर्म प्रवृत्तीत अखंड गमन करतो. जसे चतुष्पाद पशु आपल्या मनाच्या स्वैर वर्तनाने स्वच्छंद भ्रमण करीत असल्यावेळी त्याचा पति (श्रेष्ठ) अति सामर्थ्याने त्याचे

मार्गे लागून नियमन करतो तसे पुत्र, पति, पत्नी धनादिक अधो-प्रवृतीमध्ये स्वच्छंदाने वर्तन करणाऱ्या मानव पशूला रुद्र नियंत्रण करून ऊर्ध्व पुण्यकर्माची प्रेरणा करणारा पति आहे म्हणून तो रुद्र गतिमान आहे. माता, पिता, आचार्य, अतिथी, ईश्वर व राष्ट्रसेवा या ऊर्ध्व प्रवृत्तीने भावनेतील मल विक्षेप होतो. आत्म्याच्या ठिकाणी अकर्मत्व प्राप्त होते. आणि दृश्य दृष्टा ह्या द्वैत प्रतीतीचे निरसन होऊन आत्मा ब्रह्मस्वरूप होतो. रुद्र अधो प्रवृत्तीत भ्रमण करणाऱ्या सर्व जीवांना पुण्यकर्माच्या ऊर्ध्व-प्रवृत्तीत गमन करण्यासाठी प्रेरणा करून जीवन्मुक्तकरतो. यामुळे रुद्र शब्द येथे परशिव परब्रह्म वाचक आहे.

ॐनमस्ते रुद्र मन्यव उतोत इषवे नमः ।
नमस्ते अस्तु धन्वने बाहुभ्यामुत ते नमः ।।

निर्गुण निरूप निष्कल ॐकार स्वरूप परशिव रुद्रला नमस्कार असो. सगुण साकार रूपाने विराजमान असलेल्या हे रुद्रा तुझ्या तेजोमय सामर्थ्याला नमस्कार असो. आणि तुझ्या बाणाला तुझ्या धनुष्याला नमस्कार असो. तुझ्या बाहूना नमस्कार असो.

यात इषुः शिवतमा शिवं बभूवते धनुः ।
शिवा शरव्या या तव तया नो रुद्र मृडय ।।

जो तुझा बाण भक्ताना कल्याणकारक ठरलेला आहे. ते तुझे धनुष्य भक्ताचे कल्याण करणारे आहे. तुझ्या बाणाचा भाताही कल्याणकारक आहे. हे रुद्रा,त्याने तू आमचे रक्षण कर. साकार रुद्राच्या उपासनाक्रमात भक्त आपल्याला इहलोकातील पति-पत्नि पुत्र धनादिक सुख,परलोकांतील ब्रह्मपद,विष्णुपद,रुद्र-पद, या देवपदाचे सुख आणि जन्म मरण रहित शाश्वतमोक्ष सुख

ह्या त्रिविध सुख प्राप्तीच्याकामी त्याला आड येणाऱ्या अनिष्ट दुरिताचा परिहार करून मोक्ष सुखाला अनुरूप साहायक भोग वस्तूचा लाभ व्हावा ह्या फलापेक्ष भावनेत रुद्राच्या धनुष्य, वाण, हात, पाय, डोळे, अंग प्रत्यंगाची प्रार्थनामंत्र व जपाच्या द्वारे अनन्य भक्ती भावाने नमस्कार करतो. प्रथमोऽनुवाकातील मंत्र जपाने पापक्षालन होऊन शत्रूचा नाश होतो. द्वितीय, तृतीय, चतुर्थ या तीन अनुवाकामध्ये रुद्र जगांतील सकल वस्तूचा अधिपति आहे अशा विस्तृत भावनेत सकल वस्तूना आणि त्या रुद्राला (जोडीने) नमस्कार करतो.

नमो हिरण्य बाहवे सेनान्ये दिशांच पतये नमो (अ.२)

दोन्ही बाहूना सोन्याचे अलंकार धारण केलेल्या व पराक्रमशाली महाबाहु असलेल्या आणि देव, दानव, मानव, पशु, पक्ष्यादि रूप सेनेचा पालक असलेल्या श्रीरुद्राला नमस्कार, आकाशांत सूर्य, चंद्र, नक्षत्र रूपाने दिसणारे अनंत मृत्युलोक आणि स्वर्ग, वैकुंठादि सूक्ष्म सृष्टीचे अनंत देवलोक हे सर्व पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण ह्या चारी दिशांच्या अंतर्भूत आहेत आणि प्रभवादिसाठ संवत्सर, कृत त्रेतादि युगे ज्या कालरूपी महान अवकाशांत उत्थान व विलीन पावतात त्या सीमातीत व कालातीत दिशाधिपति श्रीरुद्राला नमस्कार.

नमः सस्पिंजराय त्विषीमते पथीनां पतये नमो । (अ.२)

कोवळ्या गवताप्रमाणे व पानाप्रमाणे कांती असणाऱ्या पीतवर्णाने सुशोभित अशा श्रीरुद्राला नमस्कार. परस्थानाला जाणारा असाह्यक पथिक म्हणजे पायी जाणाऱ्या प्रवाशाना हिंसा चौर्यादिक भीतीपासून संरक्षण करण्याच्या कामी सर्व समर्थ पति (श्रेष्ठ) असलेल्या श्रीरुद्राला नमस्कार. हिंसादिक पापकर्म

करणाऱ्या दुर्बल जीवांच्या अंतःकरणांत सदैव वास करून सद्-सद्विवेक रूप ज्ञानज्योतीचा प्रकाश देऊन अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, ह्या नैतिक सुमार्गाला अनुसरून वर्तन करण्याची प्रेरणा करणाऱ्या पथिकांचा पति (श्रेष्ठ) अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमः सूतायाहंत्याय वनानां पतये नमः । (अ. २)

शत्रूपासून पराभव न होणाऱ्या अशा वीर सारथीरूप रुद्राला नमस्कार. वन उद्यानाचे संरक्षण करून उन्नतावस्थेला नेणारा पति अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमो भुवंतये वारिवस्कृतायौषधीनां पतये नमो । (अ. २)

भूमीला नमस्कार कृषी व्यवसायाने भूमीची सुधारणा करून विपुल धनधान्य उत्पादन करण्याच्या कामी सर्व समर्थक्षेत्र पति असलेल्या श्रीरुद्राला नमस्कार.

नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यः पशूनां पतये नमो । (अ. २)

हिरवीगार पाने ज्याची आहेत त्या वृक्षरूपी रुद्राला नमस्कार. स्थूल, सूक्ष्म, कारण तनुत्रयाचे आवरणमयजीव पुत्र, दारा, धन ह्या त्रिपाशाने बद्ध होऊन जन्म मरण रूपी दुःखात भ्रमण करणाऱ्या पशूचा पति अशा रुद्राला नमस्कार.

नमो बभ्लुशाय विव्याधिनेऽन्नानां पतये नमो । (अ. २)

बैलावर बसून संचार करणाऱ्या व विशेषत्वेकरून शत्रूचा वेध घेणाऱ्या रुद्राला नमस्कार. अन्नाच्या उत्पादनाला वायु, उष्णता, हिम जलादिक वस्तूच्याद्वारे साहाय्य करून अन्न-समृद्धी करणारा अन्नाचा जो पति अशा रुद्राला नमस्कार.

नमो हरि केशायोपवीतिने पुष्टानां पतये नमो । (अ. २)

ज्याचे केश हरित वर्णाचे आहेत आणि जो मंगल यज्ञोपवीत धारण करतो अशा रुद्राला नमस्कार. ज्ञान, वाणी,

देह, इंद्रिय, गृह, भूमी, धन,धान्य, प्रजा आणि पशु ह्या दशविध-त्वलाने पुष्ट असणाऱ्यांचा पति अशा रुद्राला नमस्कार.

नमो भवस्य हेत्यै जगतां पतये नमो । (अ. २)

जगद्रूपी चैतन्य शक्तीला मूळ कारण असणाऱ्या रुद्राला नमस्कार. सृष्टी, स्थिति, लय, निग्रह, अनुग्रह या पंच विधान-पूर्वक या जगाचा पालन करणारा जगत्पति पंचब्रह्म सदाशिव-रूपी रुद्राला नमस्कार.

नमो रुद्रायाततताविने क्षेत्राणां पतये नमो । (अ. २)

भक्त लोकांना आलेल्या दुःखाचा परिहार करण्यात सुसज्जित धनुष्याचा उपयोग करणाऱ्या रुद्राला नमस्कार. अन्न-धान्याचे पिकाने भरून असलेल्या शेताचे रक्षण करणाऱ्या क्षेत्रा-धिपति अशा रुद्राला नमस्कार.

नमो रोहिताय स्थपतये वृक्षाणां पतये नमो । (अ. न.)

तांबूस रंगाच्या व विश्वाची रचना करणाऱ्या रुद्राला नमस्कार वृक्षाचे पालन करणाऱ्या वृक्षाधिपति अशा रुद्राला नमस्कार.

नमो मंत्रिणे वाणिजाय कक्षाणां पतये नमो। (अ. २)

गुप्तपणे योग्य अभिप्राय देणाऱ्या व व्यापार करणाऱ्या रुद्राला नमस्कार, गहन आरण्याचा संरक्षक अधिपति अशा रुद्राला नमस्कार.

नम उच्चैर्घोषाया क्रंदयते पत्तीनां पतये नमो । (अ. २)

शत्रूना दरडावण्यासाठी मोठ्याने घोषणा करणाऱ्या व वीर रसाच्या गर्जनेने शत्रूना रडविणाऱ्या रुद्राला नमस्कार. पायदळ सैन्यगटाचा अधिपति अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमः कृत्स्न वीताय धावते सत्वानां पतये नमः । (अ. २)

शत्रूच्या सैन्याला पूर्णपणे वेढणाऱ्या व धावून पाठलाग करणाऱ्या रुद्राला नमस्कार. आणि सत्त्वशील जनांचा संरक्षकपति अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमः सह मानाय निव्याधिन आव्याधिनीनां पतये नमो । (अ.३)

भक्तांचा अपराध सहन करणाऱ्या व शत्रूचा पूर्णपणे नाश करणाऱ्या रुद्राला नमस्कार. सर्व बाजूनी शत्रूचा निःपात करणाऱ्या अधिपति श्रीरुद्राला नमस्कार.

नमः ककुभाय निषंगिण इषुधिमते तस्कराणां पतये नमो । (अ.३

श्रेष्ठ खड्गधारी अशा रुद्राला नमस्कार. चोरांच्या अपराधाला सुशासन करणाऱ्या अधिपति अशा श्रीरुद्रला नमस्कार

नमो निषंगिण इषुधिमते तस्कराणां पतये नमो । (अ. ३)

धनुष्य बाण घेतलेल्या रुद्राला नमस्कार. लुटारूंच्या दुष्ट कृत्याला शासन करणाऱ्या अधिपति अशा श्रीरुद्रला नमस्कार.

नमो वंचते परिवंचते स्तायूनां पतये नमो । (अ. ३)

विश्वासघात करून फसविणाऱ्या व विश्वास देऊन फसविणाऱ्याना शासन करणारा अधिपति अशा श्रीरुद्राला नमस्कार अनंत लोक समूहांत मिसळून गुप्तपणे चोरी करणाऱ्या चोराना शासन करणारा अधिपति अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमो निचेरवे परिचरायारण्यानां पतये नमो । (अ. ३)

विशेष सेवा घडावी अशा सद्बुद्धीने जो वावरत असतो आणि परिचर्या घडावी अशी अपेक्षा ज्याला असते अशा रुद्राला नमस्कार. अरण्यांत वास करणाऱ्या ऋषिमुनीला व देवदारू. चंदन, पारिजात, बिल्व,बकुल इत्यादि फल पुष्प या पुण्य वृक्षाना चोरांचा उपद्रव होऊनये म्हणून संरक्षण करणाऱ्या पति अशा

रुद्राला नमस्कार.

नमः सृकाविभ्यो जिघा ँसद्भ्यो मुष्णतां पतये नमो । (अ. ३)

चोरानां टोळे देणाऱ्या गधाधारी देवाला माझा नमस्कार. राखण करावयास नेमले असताना देखील याच्या गैर सावधामुळे चोर चोरी करीत असल्याने याच्या सामान्य अपराधाला पश्चात्ताप होण्याजोग्या राजदंडाद्वारे शासन करणाऱ्या आणि अक्षम्य अपराध घडल्यास आमरण अनुताप देऊन शासन करणाऱ्या अधिपति रुद्राला नमस्कार.

नमोऽसिमद्भ्यो नक्तंचरद्भ्यः प्रकृंतानां पतये नमो । (अ. ३)

हातात खड्ग घेऊन रात्री फिरणाऱ्या देवाला माझा नमस्कार आणि ठार मारून चोरी करणाऱ्या महापातकी लोकाना आमरण राज दंडाच्या द्वारे शासन करून पुनः जन्म जन्मांतरी रोग, दुःख, दारिद्र्य, भय, चिंता, अपमानादिक रूपाने अनुताप देऊन शिक्षा करणाऱ्या अधिपति अशा रुद्राला नमस्कार.

नम उष्णीषिणे गिरि चराय कुलुंचानां पतये नमो । (अ. ३)

शिरोवेष्टण (शिरस्त्राण) रुमाल टोपी घालणाऱ्या व अरण्यात फिरणाऱ्या रुद्राला नमस्कार. शेतीबाडीची जोपासना करून विपुल धान्य उत्पादन करणाऱ्याचा पति अशा रुद्राला नमस्कार.

नमः स्वपद्भ्यो जाग्रद्भ्यश्चवो नमः । (अ. ३)

झोपेंत असणाऱ्या जीवरूपी रुद्राना नमस्कार. निद्रेपासून जागे झालेल्या रुद्राला नमस्कार.

नमस्तिष्ठद्भ्यो धावद्भ्यश्चवो नमो । (अ. ३)

उभे राहाणाऱ्या रुद्राला नमस्कार. धावत जाणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः सभाभ्यः सभापतिभ्यश्चवो नमो । (अ. ३)

आचार्य सन्निधीत ज्ञानार्जनासाठी बसलेल्या श्रोतृगणांच्या सभेला नमस्कार. ज्ञान प्रदान करणारा आचार्य सभापति अशा रुद्राला नमस्कार.

नम अश्वेभ्योऽश्वपतिभ्यश्चवो नमो । (अ. ३)

अश्वाला नमस्कार अश्वारूढ झालेल्या अश्वपति रुद्राला नमस्कार

नमो गृत्सेभ्यो गृत्सपतिभ्यश्चवो नमः । (अ. ४)

चतुर सेनेला नमस्कार चतुर सेनेच्या अधिपति अशा रुद्राला नमस्कार.

नमोव्रातेभ्यो व्रात पतिभ्यश्चवो नमो । (अ. ४)

लोक हितार्थ ज्ञान प्रदान करण्याकरिता अतिथी रूपाने संचार करणाऱ्या योगी लोकाना नमस्कार. त्या योग्यांचा पति अशा श्रीरुद्राला नमस्कार.

नमो गणेभ्यो गणपतिभ्यश्चवो नमो ।

लोक कल्याणासाठी असलेल्या देव, दानव, मानव या गण समूहाला नमस्कार. त्यांना क्रमयुक्त मार्गात नियुक्त करून उन्नतावस्थेला नेणारा पति अशा रुद्राला नमस्कार.

नमो विरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्चवो नमो । (अ. ४)

नाम रूपातीत रुद्राला नमस्कार. सगुण साकार अनंत विश्वरूप रुद्राला नमस्कार.

नमो महद्भ्यः क्षुल्लकेभ्यश्चवो नमो । (अ. ४)

विद्या, बल, तेज, धन, धान्यादिक अष्टैश्वर्याने महान बनलेल्या श्री रुद्राला नमस्कार. व्याधी, दुःखादिक अष्ट दारिद्र्याने पीडित क्षुद्र स्वरूपाच्या रुद्राला नमस्कार.

नमो रथेभ्यो रथपतिभ्यश्चवो नमो । (अ. ४)

रथाला नमस्कार. रथावर बसून संचार करणाऱ्या रथपति अशा श्री रुद्राला नमस्कार.

नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्चवो नमो । (अ. ४)

लाकूड तासून अनंत उपयोगी वस्तू निर्माण करून देणाऱ्या सुताररूपी रुद्राला नमस्कार. रथ करणाऱ्या कलाविद रुद्राला नमस्कार.

नमः कुलालेभ्यः कर्मारेभ्यश्चवो नमो । (अ. ४)

गाडगे, मडकी बनविणाऱ्या कुंभाररूपी रुद्राला नमस्कार लोखंडाचे काम करणाऱ्या लोहाररूपी रुद्राला नमस्कार

नमः श्वभ्यश्वपतिभ्यश्चवो नमो । (अ. ४)

कुत्र्याला नमस्कार. कुत्र्याचे रक्षण करणारा पति अशा श्री रुद्राला नमस्कार.

द्वितीय, तृतीय, चतुर्थ ह्या अनुवाकामध्ये प्रत्येक मंत्राला पति शब्द जोडलेला आहे. साऱ्या जगाचा पति रुद्र आहे आणि जगातील जड चेतन सर्व वस्तू पशू आहेत. ज्याप्रमाणे चतुष्पाद पशु पाशबद्ध होऊन आपल्या अधिपतीच्या नियंत्रणात राहत असतो. त्याप्रमाणे स्थूल, सूक्ष्म कारण या तनुत्रयाच्या आवरण युक्त मानवपशु पुत्र, दारा, धन ह्या त्रिपाशाच्या भाव बंधनाने बंधित होऊन अनंत कर्मे करीत जन्म मरणरूपी भवबंधनात अखंडपणे फिरत असतो. त्याला नियंत्रण करणारा पति असल्याशिवाय जगाचे राहाटगाडगे चालणे शक्यनाही. म्हणून या जगाचा पति रुद्र आहे व हे जग रुद्राच्या अधिपत्याखाली आहे अशा सुसंबद्ध स्वरूपांत रुद्र मंत्रातील भाव प्रकट होतो.

रुद्रउपासक भक्त रुद्राच्या अधिपत्यात असणाऱ्या चराचर सर्व प्रपंचाचे आणि श्री रुद्राचे आधिपत्य स्वीकारून या दोघांना नमस्कार करतो. रुद्र मंत्राच्या जपानुष्ठानाने उपासक

भक्तांचा भाव परिशुद्ध होऊन पुढच्या पंचम, षष्ठम, सप्तम, अष्टम आणि नवम अनुवाक मंत्रांत रुद्राच्या अधिपत्यातील चराचर विश्वाला पदार्थ भावनेने न पाहाता रुद्ररूप आहे असे तो समजतो. सारांश परशिव आपल्या चैतन्य शक्तीच्या लीलामात्रे जगद्रूपाने भासमान होतो म्हणजेच या व्यापक भावनेचे दिग्दर्शन होते.

नमो भवाय च रुद्राय च। (अ. ५)

जगद्रूपी रुद्राला व भक्तांच्या जन्म मरण रूप भव रोग दुःखाचा परिहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः कपर्दिने च व्युप्तकेशाय च (अ- ५)

जटाधारी रुद्राला आणि केशमुंडण केलेल्या रुद्राला नमस्कार.

नमो ऱ्हस्वाय च वामनाय च । (अ. ५)

शरीराने अल्प आणि संकुचित अवयवाच्या वामन मूर्तीला नमस्कार

नमो बृहते च वर्षीयसे च । (अ. ५)

प्रचंड आकाराच्या रुद्राला आणि गुणांनी समृद्ध अशा रुद्राला नमस्कार.

नमः स्रोतस्याय च द्वीप्याय च । (अ- ५)

जलप्रवाहात रहाणाऱ्या रुद्राला आणि बेटावर रहाणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो ज्येष्ठाय च कनिष्ठाय च । (अ. ६)

विद्या ऐश्वर्यादिकयुक्त ज्येष्ठरूपी रुद्राला आणि दुःख दारिद्र्याने युक्त अशा कनिष्ठरूपी रुद्राला नमस्कार.

नमः पूर्वजाय चा परजाय च। (अ. ६)

सृष्टीच्या आदि आणि अन्त्य असलेल्या रुद्राला नमस्कार.

नमो जघन्याय च बुध्नियाय च। (अ. ६)

कनिष्ठ वस्तूरूप रुद्राला आणि सर्व वस्तूंच्या बुडाशी आधाररूप रुद्राला नमस्कार.

नमो याम्याय च क्षेम्याय च। (अ. ६)

यमलोकी पापी लोकांचा शासक असणाऱ्या आणि भक्तावर मोक्षाचा अनुग्रह करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नम उर्वर्याय च खल्याय च। (अ. ६)

सर्व धान्याच्या रूपाने भूमीत वास करणाऱ्या आणि खळयाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः श्लोक्यायचावसान्याय च। (अ. ६)

साहित्य श्लोकात अर्थरूपाने असणाऱ्या आणि श्लोकांच्या अंति अनुभव रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो वन्याय च कक्षाय च। (अ. ६)

वनरूपी रुद्राला आणि लतादिकरूपी रुद्राला नमस्कार.

नमः श्रवायच प्रतिश्रवाय च। (अ. ६)

शब्दरूपाने असलेल्या आणि प्रतिशब्दरूपाने असलेल्या रुद्राला नमस्कार.

नमः शूरायचावभिंदते च। (अ. ६)

शूर शत्रूवर प्रहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो दूताय च प्रहिताय च। (अ. ६)

सेवकरूप आणि सकल जीवाचे अत्यंत हितकरणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः श्रुत्याय च पथ्याय च। (अ. ७)

पाऊल वाटेने जाणाऱ्या आणि मोठ्या रस्त्याने जाणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः काट्याय च नीप्याय च। (अ. ७)

अल्प प्रवाहात उदकरूपाने असणाऱ्या आणि धबधब्यात उदक-रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो नाद्याय च वैशंताय च । (अ ७)

नदीत जलरूपाने असणाऱ्या आणि अल्पसरोवरात उदकरूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो वर्षाय चावर्षाय च । (अ. ७)

पावसाच्या पाणीरूपाने असणाऱ्या आणि समुद्रात पाणीरूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो मेघ्याय च विद्युत्याय च । (अ. ७)

मेघजलरूपी असणाऱ्या आणि विद्युल्लतारूपाने संचार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो वात्याय च रेष्मियाय च । (अ. ७)

झंझावाताच्या रूपाने असणाऱ्या आणि धूळवाळूसह येणाऱ्या वावटळीरूप रुद्राला नमस्कार.

नमः कूप्याय चावट्याय च । (अ. ७)

विहीरीच्या रूपाने असणाऱ्या आणि आडाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमोवास्तव्याय च वास्तुपाय च । (अ. ७)

निवासस्थानी राहाणाऱ्या रुद्राला आणि वास्तु पुरुषरूपी रुद्राला नमस्कार.

नमः सोमाय च रुद्राय च । (अ. ८)

चंद्ररूपी रुद्राला आणि त्रिविध दुःखाचा नाश करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमस्ताम्राय चारुणाय च । (अ. ८)

उदयकाळी अत्यंत तांबड्या रंगाच्या असलेल्या सूर्यरूपी रुद्राला

आणि उदयानंतर काहीसा आरक्त अशा सूर्यरूपी रुद्राला नमस्कार

नमः उग्राय च भीमाय च । (अ. ८)

उग्ररूपी रुद्राला आणि महाभयंकर रूपाने दर्शन देणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो हंत्रेच हनीयसे च (अ. ८)

वध करणाऱ्यारूपी रुद्राला आणि सर्व संहारकरूपी रुद्राला नमस्कार

नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यो । (अ. ८)

वृक्षरूपाने असणाऱ्या रुद्राला आणि हिरव्या पानाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः शंकराय च मयस्कराय च । (अ. ८)

सर्व प्राणीमात्राना सुख देणाऱ्या आणि मोक्षसुखाचा अनुग्रहकरणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः शिवाय च शिवतराय च ।(अ. ८)

सगुण पदवाच्य नित्य मंगलमय पंचाक्षर रूप पंचब्रह्म सदाशिवाला आणि शिवतर म्हणजे निर्गुण पदवाच्य अत्यन्त मंगलमय मूल बीजाक्षर ॐकाररूप परशिव ब्रह्माला नमस्कार.

नमस्तीर्थ्याय च कूल्याय च । (अ. ८)

आचार्यांच्या पादतीर्थरूपाने असणाऱ्या दैवतमूर्तीच्या पादतीर्थरूपाने असणाऱ्या अनेक नद्यांच्या संगमात तीर्थरुपाने असणाऱ्या त्या तीर्थसेवनाने भक्तांचा पाप नाश करणाऱ्या आणि नद्यांच्या तटाकी वास करून पुण्यक्षेत्ररूपाने विराजमान असणाऱ्या श्रीरुद्राला नमस्कार. **नमः शष्प्याय चफेन्याय च । (अ. ८)**

कोवळ्या गवताच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला आणि केसाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः सिकत्याय च प्रवाह्याय च । (अ. ८)

वाळूच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला आणि प्रवाहाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नम इरिण्याय च प्रपथ्याय च। (अ. ९)

ओसाड प्रदेशात रहाणाऱ्यांच्या रूपातील रुद्राला आणि राज्य मार्गावर रहाणाऱ्यांच्या रूपातील रुद्राला नमस्कार.

नमः कि्ँशिलाय च क्षयणाय च। (अ. ९)

खडकाळ प्रदेशात राहाणाऱ्या रुद्राला आणि योग्य निवासस्थानी वास करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः कपर्दिने च पुलस्तये च। (अ. ९)

जटाधारी रुद्राला आणि केश मोकळे सोडलेल्या रुद्राला नमस्कार

नमो गोष्ठ्याय च गृह्याय च। (अ. ९)

गोठ्यात वास करणाऱ्या रुद्राला आणि घरात वास करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमस्तल्प्याय च गेह्याय च। (अ. ९)

माचाणावर रहाणाऱ्या रुद्राला आणि वाड्यात रहाणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः काट्याय च गव्हरेष्ठाय च। (अ. ९)

खेड्यात वास करणाऱ्या रुद्राला आणि गुहेत वास करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमो हृदय्यायच निवेष्प्याय च। (अ. ९)

डोहात असणाऱ्या रुद्राला आणि दहिवरात (दव) रहाणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमः पा्ँसव्याय च रजस्याय च। (अ. ९)

सूक्ष्म धूळीतील कणरूपी रुद्राला आणि स्थूलकणरूपी रुद्राला नमस्कार.

नमः शुष्क्याय च हरित्याय च । (अ. ९)

पूर्ण वाळलेल्या निरस पदार्थरूपी रुद्राला आणि हिरव्यागार सरस पदार्थरूपी रुद्राला नमस्कार.

नमो लोप्यायचोलप्याय च । (अ. ९)

गवतसुद्धा उगवणार नाही अशा ओसाड भूमीरूप रुद्राला आणि खुरटे गवत वाढविणाऱ्या भूमीरूपी रुद्राला नमस्कार.

नम ऊर्व्याय च सूर्म्याय च । (अ. ९)

पृथ्वी तत्त्वरूपी रुद्राला आणि तेज तत्त्वरूपी रुद्राला नमस्कार

नमः पर्ण्याय च पर्णशद्याय च । (अ. ९)

पानाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला आणि पाचोळयाच्या म्हणजे उकिरडयाच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

नमोऽपगुरमाणायचा भिघ्नते च । अ. ९)

शस्त्र उपसून असणाऱ्या रुद्राला आणि प्रहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

उपासक भक्तास त्याच्या भावशुद्धीमुळे प्राणी मात्राच्या सर्व क्रिया पहाणे, ऐकणे, करणे त्यायोगे विषम स्वभावमय प्रपंच लय पावतो म्हणजे ब्रह्म भावनेत सामावून जातो. रुद्र मंत्राच्या जपानुष्ठानामुळे भावाचा मल विक्षेप होऊन पुढील दशम अनु-वाकाच्या मंत्रामध्ये उपासक भक्त आपली माता, पिता, आचार्य अतिथी, इष्ट, मित्र, पुत्र, पौत्र, पति, पत्नी ह्या सर्व भोगोपभोग वस्तूना देखील पदार्थ भावनेत न पहाता ब्रह्म भावनेत पहातो. याचा भावार्थ असा आहे की मोक्षमार्गाला तो विघ्नकारी न होता योग्य सहाय्यक होणाऱ्या भोगवस्तूचा अनुग्रह व्हावा म्हणून तो रुद्र मंत्राचा जप करतो.

मा नो महांत मुत मा नो अर्भकं मान ।
उक्षंत मुत मा न उक्षितम् ॥
मा नो वधीः पितरं मोत मातरं प्रिया ।
मान स्तनुवो रुद्र रीरिषः ॥ (अ. १०)

आमच्या आजा, गुरु इत्यादि वरिष्ठ पूज्य लोकाना मृत्यूची पीडा करूनकोस. आमच्या गर्भात वास करणाऱ्या शिशूला व तरुण वयाच्या, मुला–मुलीना आणि आईला व बापाला आमच्या प्रिय पत्नीला व नात-नातवाना मृत्यूची पीडा करूनकोस. यावरून मरणच नको वाटल्यास जन्मसुद्धा नकोच असा भावार्थ होतो. जन्म मरणापासून होणारे सुख दुःख नको असा भाव दाखवून पुनरावृत्तीरहित शाश्वत मोक्ष सुखाची अपेक्षा होते.

आतापर्यंत केलेल्या विवेचनात पृथ्वीवर असणाऱ्या चराचर सर्व वस्तू रुद्ररूप आहेत म्हणून सांगण्यात आले आहे. पुढील एकादश अनुवाकातील मंत्रात रुद्राच्या व्यापकत्वाची महती वर्णिली आहे. या भूतलावर अनंत अगणित वस्तू असल्या-मुळे उपासक भक्त पृथक् पृथक् रुद्र रूपाची उपासना करतो. तसेच स्वर्ग वैकुंठादि सूक्ष्म लोकातील रुद्राची आणि आकाशा-तील वायू जलादिक रुद्राची उपासना करतो. त्या योगे चालणे, बोलणे, इत्यादि सहजस्थितीत ब्रह्मभावनेत दिसतात.

नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येंतरिक्षे ये दिवि ।
येषामन्नं वातो वर्षमिषवस्तेभ्यो । (अ. ११)

पृथ्वीवर वास करणाऱ्या रुद्राना अन्नच बाण झाला आहे. म्हणजे मानवानी अन्नाला पदार्थ भावनेत सेवन केल्यास सकल इंद्रियांना विषय सुखाची प्रचेतना होते म्हणूनच जन्ममरणरूपी

भवित्व दोष करणारे अन्न हा रुद्राचा मारकबाण आहे. अन्न अति सेवन केल्यास अजीर्ण दोप होऊन प्रकृतीमध्ये विषमज्वरादि अनेक प्रकारची पीडा करणारा रुद्राचा मारकबाण आहे. अपथ्यान्न सेवन केले असल्यास तेही रोगप्रद रुद्राचा मारक बाण आहे.अन्न नसता एक दिवस देखील प्राणीमात्रांना सहन करणे शक्य नाही म्हणून अन्न हे रुद्राचा मारकबाण आहे.अन्न कोणत्याही प्रकारे सेवन- करा किंवा न करा ते विषरूपाने रुद्राचा मारक बाण होतो त्या- करीता "रुद्रंमुक्तं भुंजीत" अन्न शिवार्पित करून प्रसाद या भावनेने सेवन केले असता जन्म मरणाच्या रूपाने बाधा न करता कधीही नाश न पावणाऱ्या अमरत्व सुखाची प्राप्ती होते. म्हणून अन्नरूपी रुद्राला नमस्कार.

अन्तरिक्षामध्ये वासकरून रहाणाऱ्या रुद्रगणांना वायूचा बाण आहे म्हणजे मानव आपल्या श्वासोच्छ्वासक्रियेच्या द्वारे अखंड सेवन करीत असलेला वायूचा आहार त्याचे संरक्षण करणारा असला तरी दूषितवायू प्राणरक्षणाला सहायक न होता मारक बाण होतो. अतिकामी, अतिक्रोधी, अतिविषयसेवन करणे अतिबोलणे, अतिनिद्राकरणे, अतिजागरणकरणे, अति आहार सेवन करणे, या क्रियेने प्राणवायूचा कोप होऊन आयुष्य क्षीण होत असल्यामुळे वायू रुद्राचा मारकबाण आहे. झंजावात व चक्रवाताने वृक्ष,वल्लरी,सस्य,घर इत्यादिकांचा नाश होऊन पापी लोकांना पीडाकरून प्रायश्चित्त देणारा वायू हा रुद्राचा मारक- बाण आहे. प्राणवायू दूषित होऊन प्लेग, कॉलरा, श्लेष्मज्वर आदि सांसर्गिक रोगाचा प्रसार होऊन पापी लोकांना पीडा कर- णारा वायू हा रुद्राचा मारकबाण आहे. श्री रुद्राचा वायूबाण आपल्याला प्रसन्न होऊन त्याच्या अनुग्रहाची अपेक्षा करणाऱ्याना आकाश व वायु दोन्हीपासून ध्वनिसंकेत प्रकट करणाऱ्या

वागेंद्रियाने (मुख) अखंडपणे चालणाऱ्या श्वासोच्छ्वासक्रियेत रुद्रमंत्राचा जप केल्यास अनेकविध तापाचा व मृत्यूचा नाश होऊन अमर सुखाची प्राप्ती होते. याकरीता वायुरूपी रुद्राच्या बाणाला नमस्कार.

जें रुद्रगण या लोकात वास करणारे आहेत त्यांना पाऊस हा मारक बाण झाला आहे. ते असे आहे की पावसाने साऱ्या जगाचे संरक्षण होते. सर्व लोकांना संरक्षणासाठी पाणी पीणे आवश्यक आहे. जलाच्या अभावी जगणे शक्य नाही. अतिवृष्टी झाल्यास अन्नौषधीचा नाश होतो. पापी लोकांना पीडा करून प्रायश्चित्त देणारेजल रुद्राचा मारकबाण आहे. अनावृष्टी झाल्यास पीक व प्राणी जलाभावामुळे मारून टाकणारा मारक बाण आहे. अकालवृष्टी झाल्यास सर्वांचा नाश करणारा मारक बाण आहे. विषवृष्टी झाल्यास अन्नौषधींना रोगजंतूच्या द्वारे नाश करणारा मारक बाण आहे. रुद्राचा हा मारक बाण सुवृष्टी रूपाने अभिमुख होऊन त्याच्या अनुग्रहाची अपेक्षा करणाऱ्यानी "रुद्रंपीतंपिबेत" म्हणजे ते जल ब्रह्मभावनेत रुद्राच्या तीर्थरूपाने प्राशन करावे. त्यायोगे अनेकविध ताप व कष्ट देणारा रुद्राचा बाण सर्व तापाचे व मृत्यूचे निवारण करतो. आणि शाश्वत मोक्ष सुख देतो याकरीता जलरूपी रुद्राला नमस्कार असो. जीव हा किंचिज्ञ असल्यामुळे सर्वव्यापी, सर्वांतर्यामी, अशा रुद्रदैवतांची उपासना करणे अशक्य वाटून या पुढे दिशांच्या रूपात रुद्राची प्रार्थना करतो.

दश प्राचीर्दश दक्षिणादश प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वा
स्तेभ्यो नमस्ते नो मृडयंतु ते यं द्विष्मो यश्चनो द्वेष्टितम्
वोजंभे दधामि। (अ. ११)

स्वर्ग, मृत्यू, पाताळ, भूमी, आकाश व अनंत ब्रह्मांड हे सर्व पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण अग्नेय नैऋत्य वायव्य, ईशान्य अधो आणि ऊर्ध्व ह्या दाहि दिशांच्या अंतर्भूत आहेत. पूर्व व पश्चिम इतकीच आहे म्हणून याची सीमा नाही. दिशा केवळ भावगम्य आहेत ज्यास्थानी मनुष्य राहतो तो तेथून दिशाची कल्पना करतो .दहा वीस तीस कितीही हजार मैलांचे स्थानांतर करून गेला तरी तो आपल्या स्वस्थानापासून दिशाची मर्यादा ठरवितो यावरून असा भाव होतो की दिशा अगणित अपार व असीम आहेत. दिशांची उपासना म्हणजे अनंत अगणित ब्रह्मांडरूपी रुद्राची उपासना होय.

भक्त पूर्व दिशेच्या रुद्रानां दाहीबोटाने हातजोडून नमस्कार करतो. दक्षिण दिशेच्या रुद्राना दाही बोटाने हातजोडून नमस्कार करतो. पश्चिम दिशेच्या रुद्रानां दाही बोटानेहात जोडून नमस्कार करतो. उत्तर दिशेच्या रुद्रानां दाहीबोटाने हात जोडून नमस्कार करतो. अधो व ऊर्ध्व दिशेच्या रुद्रानां दाही बोटाने हात जोडून नमस्कार करतो. ते सर्व रुद्रगण आम्हाला सुख देवोत मृत्यू आम्हास नको म्हणून आम्ही त्याचा द्वेषकरतो. मृत्यू आमचा अखंड जन्म मरणाच्या रूपाने द्वेष करीत आहे. त्या मृत्यूला तुमच्या तेजोमय अग्निरूप जबड्यात आम्ही ठेवतो. त्यांचा नाश करून आम्हास शाश्वत सुखाचा अनुग्रह करा असा या मंत्राचा भावार्थ होतो.

रुद्रसूक्ताच्या नमक मंत्रात जडचेतन सर्व प्रपंच रुद्ररूप आहे अशा ब्रह्मभावनेत उपासक भक्त नमस्कार करतो. ज्याअर्थी नमस्कार करतो त्याअर्थी तो पूजक भक्त आहे.असा अर्थ होतो.रुद्र नमकाध्या-याच्या जपानुष्ठानाने भाव परिशुद्धहोऊन "सर्वं खल्विदं ब्रह्म"

या महावाक्याप्रमाणे सारे जग रुद्ररूपाने दिसले तरी "अहं" (मी) नावाची मूळ अहंकृती बीजरूपात अजून आहेच असे सिद्ध होते. त्याकरीता "अहं" (मी) नावाचा एकदेशीय द्रष्टारूप आत्मा "अहंब्रह्मास्मि" या महावाक्याप्रमाणे मी केवळ ज्ञान स्वरूप ब्रह्म-रूप आहे असे चमकाध्याया द्वारे ध्यानानुसंधान करतो.

रुद्रसूक्त चमकाध्याय (४।७।१।११) या अनुवाकामध्ये प्रत्येक नामापुढे "मे" चा उच्चार होतो. संस्कृत भाषेतील "अस्मद्" शब्द चतुर्थी विभक्ती एकवचनात "मह्यम्" आणि "मे" दोनप्रकार आहेत षष्ठी विभक्तीच्या एकवचनात "मम" आणि "मे" असे दोन प्रकार आहेत. चतुर्थी विभक्तीमधील "मे" चा अर्थ "मला" होतो आणि षष्ठी विभक्ती मधील "मे" चा अर्थ "माझा" किंवा माझे असा होतो.

चमकाध्यायाच्या अनुवाक मंत्रात जगातील सर्व वस्तू मल पाहिजे. मला दे अशा प्रार्थना रूपात याचना केलेली आहे म्हणून चतुर्थी विभक्ती एकवचनाप्रमाणे अर्थ अनेक ग्रंथात केल्याचे आढळून येते परंतू तशाप्रकारे अर्थ येथे न करता सकल वस्तू ब्रह्मरूप व माझेच रूप आहेत. म्हणजे मीच सर्व आहे म्हणून षष्ठी विभक्तीच्या भावार्थांत सांगितले आहे. चराचर सर्व प्रपंचाला ब्रह्म-भावनेत जाणून शाश्वत मोक्षसुख हेच अन्तिम साध्य मानणारा परम भक्त अधोप्रवृत्ती तामस बुद्धीचा जडजीवी इच्छा करीत असल्याप्रमाणे नाशवंत भोगवस्तू मला पाहिजे अशी अपेक्षा करतो म्हणून चतुर्थ्यंत येथे तसा अर्थ करणे अनुभवाला विसंगत होते. एका पक्षाने चतुर्थी विभक्तीचा अर्थच आम्ही गृहीत धर-ल्यास दहाव्या अकराव्या नमकाध्यायात मोक्ष मार्गाला आड न येणाऱ्या सर्व भोगोपभोग वस्तूची याचना केलेलीच आहे. तीच

वस्तू पुनः पुनः मागतो म्हणजे किती वेळा मागतो ? याच्याने पुनरुक्तीचा दोष संभवतो. भोगापेक्षी जीव आपल्यासुखाला अनुरूप असणाऱ्या भोगवस्तूच मागतो परंतू येथे तसे न मागता वेड्या जीवाप्रमाणे अनावश्यक व सुखाला आड येणाऱ्या भोग वस्तूची मागणी कशाला करील ? येथे काही वाक्ये उदाहरणा-साठी देण्यात येत आहेत "अनड्वांचमे' वांझ गाई मला दे.'जराचमे' म्हातारपण मला दे. "अहोरात्र वृष्टचा" अहोरात्र अखंड वृष्टी करणारा पाऊस मला दे. 'पशव आरण्याश्च यज्ञेन कल्पन्तां' वाघ, सिंह, अस्वलादि वनचर हिंस्त्र पशु मला दे. ही सर्व भोगापेक्षी सुखमय जीवाला बाधक असून दुःख देणारी आहेत. जीव दशेतील भोगापेक्षी मानव आपल्या स्वभावाला विरूद्ध असणाऱ्या भोग-वस्तू मागतो म्हणणें ते सुसंगत होणार नाही. मागणारा आप-ल्याला केवळ सुखमय अशा भोग वस्तूच मागत असतो. तो दुःख-दायक वस्तूची अपेक्षा कधीच करणार नाही.

"'दिशश्चमे' पूर्वादि सर्व दिशांची मला प्राप्ती होवो. दहा दिशामध्ये मानव जन्मतो व जगून रहातो. अखेर त्यातच मरण पावतो. दिशा मानवाला विभक्त वस्तू नसून अविभक्त (अखंड) वस्तू आहे. मग दिशा मला पाहिजे अशी आपेक्षा करतो म्हणून सांगणे सुसंगत आहे का ? नाही "मनश्चमे" मन मला पाहिजे असा अर्थ करणे अत्यंत हास्यास्पद गोष्ट आहे. मनानेच सारी, इंद्रिये कार्यं प्रवृत्त होतात. जीवदशेचे अस्तित्व मनापासून सिद्ध-होते मन ही जीवाहून वेगळी वस्तू नाही व दूर रहाणार नाही अविभक्तवस्तू असून देखील तो मनाची मागणी करतो असा अर्थं करणे योग्य दिसणार साही. "जगच्चमे" जग मला मिळो जगाच्या विरहित कुणाचेही अस्तित्व नाही जगात वास करून

जग मला पाहिजे अशी अपेक्षा करतो म्हणून अर्थ करणे समंजस पणाचे वाटत नाही. या वरील सर्व विवेचनावरून विचार केला असता चतुर्थी विभक्तीपेक्षा षष्ठी विभक्तीचा अर्थच सुसंगत आहे.

"शंचमे" सुख माझे "मयश्चमे" परलोक सुख माझे "ऊर्क्चमे" अन्न माझे "सूनृताचमे" प्रिय भाषण माझे 'पयश्चमे' दूध माझे "रसश्चमे" नानाविध रसद्रव्य माझे "मधुश्चमे" मद्य माझे "कृषिश्चमे" शेत माझे"वृष्टीश्चमे" पाऊस माझा'क्षुच्चमे' जठरांग्निपासून होणारा ताप माझा "माषाश्चमे" उडीद माझे "तिलाश्चमे" तीळ माझे "मुद्गाश्चमे" मूग माझे"अश्वमेधश्चमे" अश्वमेध यज्ञ माझा "दीक्षाचमे" गुरूदीक्षा माझी "तपश्चमे" तपोरूप माझा "ऋतुश्चमे" वसंतादि ऋतू माझे "व्रतंचमे" पुण्य कर्माचे व्रत माझे "आयुर्यज्ञेन कल्पताम्" विषय सुखामध्ये खर्च होणारे आयुष्य पूजा जपादिक पुण्यकर्मानुष्ठानात समर्पण करणे हा आयुर्यज्ञ माझा "प्राणोयज्ञेन कल्पता" प्राणशक्ती सत्कर्मात उपयोग करणे हा प्राणयज्ञ माझा "अपानोयज्ञेन कल्पतां" "व्यानो यज्ञेन कल्पतां" रेचक पूरक व कुंभक या प्राणायामविधीने आपानवायूचे उत्थान करून सुषुम्नाद्वारे प्राणवायु ऊर्ध्वमुखाने ब्रह्मरंध्रात समर्पण करून योग समाधी लावणे हा पंचप्राणवायूचा यज्ञ माझा "चक्षुर्यज्ञेन कल्पतां" सृष्टीचे अनंतरूप पाहाणाऱ्या डोळ्यांना रुद्ररूपात ब्रह्मरूपात सकल वस्तू पाहणे हा नेत्रयज्ञ माझा "श्रोत्रंयज्ञेन कल्पतां" भोग प्रवृतीचे अनेक शब्द ऐकत असणाऱ्या कानाला रुद्राच्या स्तुती जपाच्या श्रवणात उपयोग करणे हा श्रोतृ यज्ञ माझा"वाग्यज्ञेन कल्पतां"सुख दुःख निंदास्तुति या पाप कर्मात उपयोग होणाऱ्या वाणीला ईश्वराच्या नामजपात विनियोग करणे हेच वाग्यज्ञ माझा "मनोयज्ञेन कल्पतां" अनंत

वृत्तीच्या रूपात वाहाणाऱ्या मनाला मी केवळ शुद्ध ज्ञान स्वरूप आहे. तनुत्रयाला साक्षीभूत आहे. अशा आत्मानुसंधानात मनाचा लय पावणे हा मनोयज्ञ माझा "आत्मा येज्ञेनकल्पतां" मी शरीरधारी आहे. अशा अहंभावनेच्या जीवाला चित्तातील मलविक्षेप होऊन मी केवळ शुद्ध ज्ञानरूप आहे असे आत्मानुसंधान करणे हा आत्म यज्ञ माझा "यज्ञो यज्ञेन कल्पतां" आत्मानुसंधान करणाऱ्या ज्ञानयोग्याला "सर्वं खल्विदं ब्रह्म" "अहंब्रह्मास्मि" या महावाक्यानुसार भासमान होणारे जग ब्रह्मभावनेत समरस होते. जेथे मी तू म्हणणारी अहं भावाची ग्रंथी नाश पावते व आत्मा ब्रह्मरूपात ऐक्य पावतो त्या यज्ञातील महायज्ञ माझा. चराचरात्मक हे विश्व ब्रह्मरूप आहे. परशिव चैतन्य शक्तीचे परिणाम स्वरूप आहे. सत्यआहे.असा यजुर्वेद, रुद्राध्याय,शिवाद्वैत सिद्धांताचा बोध करतो.

– ध्यान प्रयोग –

मी केवळ शुद्धज्ञान स्वरूप आहे. मन, बुद्धी, चित्त, अहंकाराला साक्षी भूत आहे अशी जाणीव होऊन आत्मानुसंधान स्थिर करण्याला ध्यान म्हणतात. मुमुक्षू साधक आत्मतत्त्वाच्या ध्यानानुसंधानामध्ये आपल्या देहाच्या मागच्या भागांतील पश्चिम चक्राच्या थोडचा अंतरावरील अवकाशामध्ये तीन लिंग कल्पून ध्यावे. आपण ज्ञानरूपांत स्थित राहून ते तीन्ही लिंग ज्या ज्ञानाकाशामध्ये आश्रयी झाले आहेत. तो ज्ञान स्वरूप आत्मा मी आहे असा अनुभव करणे आत्मतत्वाचे ध्यानानुसंधान होय.

डोळे झाकून आपल्या ब्रह्मरंध्राच्या महदाकाशामध्ये लक्ष ठेवून पाहाता गाढ अंधकार दिसतो. तेथे कांही साधकांना सूर्य,चंद्र,नक्षत्र,अनेक विधप्राण लिंगाचे दर्शन होते.द्रश्य नामरूप-

क्रिया ज्या ज्ञान चैतन्याच्या अवकाशामध्ये गर्भित आहेत त्याला साक्षीभूत होऊन पहाणे तेच आत्मतत्त्वाचे ध्यानानुसंधान होय.

ब्रह्मरंध्राच्या महदाकाशामध्ये दीप ज्योतीची कल्पना करावी. त्या ज्योतीमध्ये खाली वर आणि सभोवती व्यापून असलेली जाणीव क्रिया मीच आहे असे जाणणे आत्मानुसंधानाचा ध्यान प्रयोग आहे.

आत्म्याच्या ठिकाणी मी केवळज्ञान स्वरूप आहे म्हणून इच्छा शक्ती उत्पन्न होताच त्याच्याधारणेसाठी ज्ञान शक्ती व क्रिया शक्तीचा काल द्रव्यामध्ये उपयोग होत असल्यामुळे साध्य व साधनाचा आपल्या स्वस्वरूपाच्या निजज्ञानामध्येच उपयोग होत असतो. त्यासाठी आत्म्यातील एकदेशीय तूर्यावरण नाश पावून सर्वात्म भावनेत सर्व कांही मीच व माझेच रूप असा भाव होतो. सकल चराचर प्रपंचामध्ये परिपूर्ण व्यापून असलेल्या परशिव ब्रह्माच्या स्वानंदामध्ये ध्यान मग्न होतो. असा शिवयोगी जंगम म्हणवितो. जीवन्मुक्त शरीरी द्वैत प्रतीतीचा देह भाव विसरून जंगम अवस्था प्राप्त करतो.त्यामध्ये पूर्व संचित कर्माचा अवशेष असून त्या भोग विभाजनासाठी देहभोग समाप्त होई पर्यंत तो चरम देही जंगम देहधारी म्हणवित असलातरी त्याच्या मध्ये जीव दशेतील कोणतीही क्रिया दिसून येत नाही.

सृष्टींतील प्रत्येक वस्तूच्या ठिकाणी आदि व अंत्य एकाच प्रकारचे असतात. बीजापासून अंकुर पत्र, पुष्प,फल रूपाने परिवर्तन पावत अखेर बीजरूपाने दिसून येते. आदि व अंत्य दोन्ही बीजरूपात दिसून येत असल्याप्रमाणे मानवाला जन्मतः बाल्यावस्था प्राप्त होते. ही कर्मबंधनांतील बाल्यावस्था होय. पूर्व संचित कर्म प्रारब्ध रूपाने अनुभवीत पुनः जन्म न येण्याजोगे

लिंगांग सामरस्य जीवन्मुक्तीच्या अखेरच्या देहामध्ये जो असतो तो चरमदेही जंगम म्हणवितो. त्या चरम देही जंगमावस्थेमध्ये ज्येष्ठ, कनिष्ठ, म्हणविणारा द्वैत भाव लय पावत असतो. सकल प्रपंच परशिवरूपाने पाहात अखंड सहज समाधी लागत असते. अशा जंगमाला तहान भूक लागत नाही. दुसऱ्याने तोंडात घास घातल्यास जेवतो. पाणी पाजविल्यास पीतो. मल मूत्र इंद्रिय-धर्माने आपोआप विसर्जन होतात. त्यास त्याचा विधी निषेध नसतो. मान रक्षणासाठी व पाऊस ऊन थंडीच्या बचावासाठी वस्त्र परिधान करावे म्हणून त्याला स्मरत नाही. जीवन्मुक्त चरमदेही जंगमाला जन्म मरणापासून मुक्त करणारी ज्ञानमय बाल्यावस्था येते. जसे परिपक्व फळ वृक्षापासून आपोआप तुटून पडत असते. त्याप्रमाणे जीवन्मुक्त अखेरचा देहधारी जंगम कर्म प्रवृत्ती पासून अलिप्त होऊन व त्याच्या ठिकाणी अकर्मत्व प्राप्त होत असल्यामुळे द्वैत ज्ञान शून्य होऊन जीवनमुक्त जंगमावस्था म्हणजे विदेही अवस्था प्राप्त होत असते.

जले जलमिव न्यस्तं वन्हौ वन्हिरिवार्पितः
परब्रह्मणि लीनात्मा विभागेन न द्रश्यते
(सि. शि. मणि ज्ञान शून्य स्थल)

पाण्यांत पाणी मिसळल्याप्रमाणे, विस्तवात विस्तव अर्पण झाल्याप्रमाणे परब्रह्म स्वरूपी महालिंगांत आत्मा लयपावून चरम देही जंगम लिंगांग सामरस्य ब्रह्मानंदामध्ये ऐक्य पावत असतो.

मानव धर्म मंदिराचा दशम सोपान असलेला ध्यान नियम पर्व समाप्त होतो.


– उपसंहार –

या ग्रंथात मानव विकासाच्या साधनाला धर्म म्हणून सांगितले आहे. मानवाचा विकास म्हणजेच राष्ट्राचा विकास होय. मानवाची उन्नती व अवनती या दोन्ही क्रिया त्यांच्या अंतर्भूत आहेत. अवनतीचे भाव बीजाणू नाहीसे करण्याकरिता बाहेरील ज्ञानाचा आहार मिळाल्या शिवाय उन्नती होणे शक्य नाही. उदा :– मनुष्याच्या अंगी स्वाभाविक प्राण शक्ती संरक्षक अवस्थेत असली तरी त्या प्राणशक्तीचे संवर्धन करून दीर्घकाल जगून रहाण्याकरिता बाहेरील अन्न जलाचा उपयोग मानव बुद्धी पुरस्सर दैनंदिन आहाराच्या रूपाने करतो. त्या योगे प्राणबल वाढवून जगून रहातो. त्या प्रमाणे मानवाच्या विकासाला कुंठित करणाऱ्या दुषित भावनेच्या बहिर्भाव रूपी अहाराचा संसर्ग न होऊ देता भाव उन्नतीच्या योगाने सर्व सुखे लाभून शास्वत मोक्ष सुखाप्रत पोहोंचवितो. यालाच मानव विकास अथवा मानवधर्म म्हणतात. या करीता मानवाला धर्म शिक्षणाची अत्यंत अवश्यकता आहे.

हिंसा, असत्य, स्तेय (चौर्य) व्यभिचार हे चार, चौऱ्याऐंशी लक्ष प्रकारचे पाप कर्म उत्पादन करणारे आहेत.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य या चार नियमाचे पालन करण्याने पाप कर्माला निरोध होऊन पुण्य कर्म करण्यास योग्य पात्रता येते.

दया, क्षमा, दान हे तीन नियम पालन करणे अवश्यक आहे. तथापि दया करण्यास दयेची आपेक्षा करणारा दयार्थी पाहिजे आपल्या अपराधासंबंधी क्षमेची अपेक्षा करणारा क्षमार्थी-



कै. भिमराव पाटील चाकूर

पितृ स्मरणार्थ (११००१) रुपये

श्रीमान त्रिंबकराव उर्फ बाबासाहेब पाटील, चाकूर यांनी ग्रंथ प्रकाशनासाठी दान दिले आहे.



श्रीमान त्रिंबकराव ऊर्फ बाबासाहेब पाटील लातूर: सौ॰ कमलादेवी त्रिंबकराव पाटील

श्री. गुरु ष. ब्र. राचोटि शिवाचार्य चरपट्टाधिपती
कट्टीमनी संस्थान हिरेमठ मेहकर जि. बिदर यांचे

आशिर्वचन



गु. भ. श्री. कांतप्पा सांबप्पा अंबुलगे रा. देवणी (बाजार) हे मेहकर मठाचे परंपरागतशिष्य गुरुसेवातत्पर आहेत यानी मि. माघ शु. १५ शके१८९९ रोजी मेहकर मठाचे मूल आचार्य "श्री गुरु विरूपाक्षलिंग" गुरुगादीस महारुद्राभिषेक व अकरा लक्ष शिव-पंचाक्षरी महा मंत्राचा जप यज्ञ केला त्या प्रित्यर्थ २१ हजार रुपये खर्च केले. त्याना गुरुकृपा झाली आणि मठाचे बांधकामासाठी पाच हजार रुपये रोख दान दिले असून श्री सुरेश स्वामी हिरेमठ गोरटा याना त्यांच्या त्रिकाल पूजानुष्ठानाच्या सेवेसाठी (२१०००) रु. किमतीचीं ७ एकर भूमी दान दिली आहे.

एवढेच नव्हे तर चाकूर येथील "विश्वशांतिधाम" मंदिर निर्मिती करिता १००१ रुपये दान दिले आणि या ग्रंथ प्रकाशनासाठी सुद्धा (१२५१) रुपये दान दिले आहेत. त्यांचें औदार्य अवर्णनीय आहे.

त्यांना व त्यांच्या मातृश्रीना व धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई ज्या परमभक्त आहेत याना व त्यांच्या सर्व कुटुंबियाना शुभआशिर्वाद.

--००--

पाहिजे. दान करण्यास आपल्या जवळ धन धान्यादि वस्तू पाहिजेत. अथवा दान घेणारा अतिथी पाहिजे. या करिता दया, क्षमा, दान या तीन्ही नियमाचे आचरण करण्यास परस्पर उभय जीवांची अवश्यकता असल्यामुळे सर्वांनां प्रतिदिन आचरण करणे परतंत्र व कष्टसाध्य आहे. म्हणून दया, क्षमा, दान ह्या तीन्ही नियमाचे नित्य आचरण होत नसून नैमित्तिक रूपानेच आचरण करण्यांत येते आणि हे सामान्य पुण्य फल देणारे आहेत.

पुत्र, दारा धनादिक अनेक भोगवस्तूंच्या ठिकाणी अहोरात्र अखंड भ्रमण करणाऱ्या देहप्रेमाला निरोधकरून सुखमय भोगप्राप्त करून देणारे पुण्योत्पादनाचे साधन माता, पिता, गुरु, अतिथी, राष्ट्र व ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर इत्यादी मूर्ती रूपा-विषयी प्रेमाचे भक्ती भावानुष्ठानांत परिवर्तन करणे हा देह शुद्धीचा पूजाप्रयोग होय.

पति, पत्नी, पुत्र पौत्र, गृह, भूमी आदि या भोगोपभोग विषयप्रेमाच्या अनेक नामरूपी विचार वृत्तींत, अखंड भ्रमण करणाऱ्या बहिर्गत मनाला, पुण्योत्पादनाचे साधन ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वरादि दैवत नाम जपाच्या मंत्ररूपी विशिष्ट वृत्तींत भक्ति भावानुष्ठानाने मनाला एकत्रित करून चित्तात उत्थान पावणाऱ्या अनंत विषयवृत्तीचे निर्मूलनकरणाऱ्या मनोमय सूक्ष्म शरीररूप प्राणाची परिशुद्धी करणे, हा जपप्रयोग होय.

"ध्यानेनात्मनि विंदत्ति" ह्या श्रुति वाक्यानुसार प्रत्यक्ष हा जडदेहच मी आहे. याला होणारे शीतोष्ण, तहान, भूक, सुख-दुःख, सर्व मलाच होतात म्हणून अनुभवणाऱ्या नामरूपात्मक तनुगत जडज्ञानाला नामरूपातीत परिशुद्ध ज्ञान-स्वरूप मीच आहे म्हणून आत्मानुभव होऊन जागृती स्वप्न

सुषुप्ति या तीन्ही अवस्थेत स्थूल सूक्ष्म कारण या तीन्ही तनूला सर्व साक्षी मी आहे असे जाणून भावातीत अवस्था प्राप्त करून देणारे आत्मानुसंधान हा भाव शुद्धीचा ध्यान प्रयोग होय.

पूजा जप, ध्यान ह्या तीन नियमांचे सर्व मानवानी नित्यव्रतरूपाने आचरण केल्याने स्थूल, सूक्ष्म व कारण तीन्ही देहातील पापमय मलावरण नाहीसे करून विशेष पुण्योत्पादन करणारे आहेत. पूजा करण्यास उपास्य दैवतमूर्तीची अवश्यकता असते. जप करण्यास नाम मंत्राची अवश्यकता असते. ध्यान करण्यास भावशुद्धीची अवश्यकता असते. ह्या तीन्ही वस्तू साधन करणाऱ्या भक्तांच्या मनांत पूजा-जप व ध्यानाची प्रेरणा होताच त्या पूजनीय वस्तू त्यांच्या हृदयांत, सान्निध्यांतच असल्यामुळे उच्च नीच कोणत्याही परिस्थितितील सर्व मानवानी पूजा, जप, ध्यान प्रतिदिन आचरणांत आणण्याविषयी ते स्वावलंबी व स्वतंत्र आहेत पूजा, जप, व ध्यान हे इहलोक परलोक पारमार्थ इच्छित सर्व सुखे प्राप्त करून देणारी उत्तरोत्तर साधने आहेत.

संमाप्त